## घटक १
# आर्थिक विकास
## (Economic Development)

**अनुक्रमणिका**

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

१.२.१ स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळची भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये

१.२.२ विकसनशील भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये

१.२.३ उदयोन्मुख भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये

१.२.४ भारताचे राष्ट्रीय उत्पन्न

१.२.५ भारताचे दरडोई उत्पन्न

१.२.६ सर्वसमावेशक वृद्धी

१.२.७ शाश्वत विकास

१.२.८ नैसर्गिक साधन संपत्ती व आर्थिक विकास

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द

१.५ स्वयंअध्ययन प्रश्न

१.६ सरावासाठी प्रश्न

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

## १.० उद्दिष्ट्ये :

(१) स्वातंत्र्य प्राप्त झाले त्यावेळी भारतीय अर्थव्यवस्था कशी होती याची माहिती घेणे.

(२) विकसनशील भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये जाणून घेणे.

(३) उदायोन्मुख भारतीय अर्थव्यवस्था म्हणजे काय ते माहित करून घेणे.

(४) भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाची व दरडोई उत्पन्नाची माहिती करून घेणे.

(५) भारताचा सर्वसमावेशक विकास झाला आहे का त्याचा अभ्यास करणे.

(६) शाश्वत विकासाचे निकष अभ्यासणे.

(७) नैसर्गिक साधनसंपत्ती व आर्थिक विकास यांच्यातील संबंधांचा अभ्यास करणे.

## १.१ प्रस्तावना :

सन १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्य मिळाले तेंव्हा भारतीय अर्थव्यवस्था रिकामी व लंगडी होती. म्हणजे अप्रगत किंवा मागासलेली होती. आज भारत जगात एक प्रमुख विकसनशील देश म्हणून ओळखला जातो. म्हणून विकसनशील भारतीय अर्थव्यस्थेच्या वैशिट्यांचा आपणास अभ्यास करावा लागतो. तसेच भारतीय अर्थव्यवस्थेत विकसित देशांची सुध्दा काही लक्षणे आढळतात. वेगाने विकासाच्या दिशेने धावणारा देश म्हणून आज भारताला जगात ओळखले जाते. म्हणून उदयोन्मुख भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये पहावी लागतात. ती वैशिष्ट्ये या पहिल्या घटकात दिली आहेत. तसेच भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात आणि दरडोई उत्पन्नात होत असलेले बदल, सर्वसमावेशक वृद्धी आणि शाश्वत विकास याबाबत सुद्धा माहिती या पहिल्या भागात दिली आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीवर देशाचा आर्थिक विकास अवलंबून असतो. म्हणून नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य वापर करून देश आर्थिक विकास कसा घडवून आणता येतो याचीही माहिती या भागात दिली आहे

## १.२ विषय विवेचन

### भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये

**प्रस्ताविक :–**

आजची भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये पाहणापूर्वी कालची म्हणजे स्वातंत्र्यपूर्वकाळातील भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये सुद्धा पाहणे आवशक आहे. या प्रकरणात ब्रिटिशपूर्व काळातील भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये स्पष्ट केली आहेत. तसेच ब्रिटिश काळातील भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये स्पष्ट केली आहेत. विकसनशील भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये स्पष्ट केली आहेत. आणि भारतीय अर्थव्यवस्था आता वेगाने विकसित होत असल्याने उदयोनन्मुख भारतीय अर्थव्यवस्थेची सुदधा काही वैशिष्ट्ये स्पष्ट केली आहेत.

**(अ) ब्रिटिशपूर्व काळातील भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये** (Indian Economy in the Pre-British Period)

भारतात ब्रिटिशांची राजवट येण्यापूर्वी भारतीय अर्थव्यवस्था कशी होती? ते पाहिले पाहिजे. भारतात इंग्रज येण्यापूर्वी भारताच्या अनेक भागात परकीय मुघलांची सत्ता होती. मुघलांची येथील राजवट अर्थातच अन्यायी किंवा जुलमी होती. येथील जनतेवर अन्याय करणारे, त्यांची लुट करणारे अनेक कायदे मुघल सत्ताधीशांनी बनवले होते. ब्रिटिश भारतात येण्यापूर्वीची भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये किंवा भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहे.

**(१) स्वयंपूर्ण खेडी :–**

ब्रिटिशपूर्वकाळातील भारतातील सर्व खेडी जवळ जवळ स्वयंपूर्ण होती. म्हणजेच अनेक बाबतीत ती स्वावलंबी होती. खेड्यातील लोकांच्या सर्व गरजा खेड्यात भागत असत. बाहेरच्या जगाशी त्यांचा फारसा संपर्क येत नसे, ग्रामीण भागात बारा बलुतेदार आणि अठरा अलुतेदार होते. खेड्यातील शेती करणाऱ्या शेतकऱ्याला हे बलुतेदार आणि अलुतेदार सेवा पुरवत असत. त्याबद्दल शेतकरी त्यांना अन्नधान्याच्या किंवा कृषी मालाच्या स्वरूपात मोबदला देत असत. अशा प्रकारे ब्रिटिशपूर्व काळातील भारतीय खेडी स्वयंपूर्ण किंवा स्वावलंबी होती.

**(२) खेड्यांचा कारभार :–**

ब्रिटिशपूर्वकाळात खेड्यांचा सर्व कारभार खेड्यातूनच चालत असे. तलाठी, पाटील आणि कुलकर्णी ही मंडळी गावचा कारभार पाहत असत. गावातील जेष्ठ मंडळी, पंच मंडळी गावचा कारभार पाहत. हे सर्वजण गावच्या विकासाला दिशा देत असत. मुघल सत्तेचा हस्तक्षेप होता. परंतु तो मर्यादित होता. ही सत्ता गावाकडून खंड किंवा खंडणी वसूल करत असत. मुघल सत्तेकडून प्रत्येक गावाकडून जबरदस्तीने खंडणी वसूल होत असे. एवढा हस्तक्षेप गावच्या कारभारात मुघल सत्तेकडून होत असे. हा भाग वगळता बाकीचे सर्व निर्णय खेड्यातच तलाठी, पाटील, कुलकर्णी, पंच घेत असत.

बलुतेदार, अलुतेदार खेड्यातील लोकांच्या गरजा भागवत असत. साळी, माळी, कुंभार, सुतार, लोहार हे लोक शेतकऱ्यांना लागणाऱ्या सेवा पुरवत असत. आणि त्या बदल्यात शेतकऱ्यांकडून बलुतेदार व अलुतेदारांना अन्नधान्य मिळत असे. खेड्यातील श्रमविभागणी अत्यंत चांगली होती. बलुतेदार व अलुतेदारांकडून शेतकऱ्यांना वेळच्या वेळी सेवा मिळत असत. कारण त्यांनी त्यांची कामे वाटून घेतली होती. कोणी कोणती कामे करावयाची? हे ठरलेले होते. उदाहरणार्थ बुरूडाकडून टोपल्या, कणगी आणि लोहाराकडून शेतीची अवजारे शेतकऱ्यांना मिळत असत. पैसे न देता शेतकऱ्यांना या सुविधा गावतच मिळत असत. तसेच शेतीसाठी लागणारी साधने विकत घेणासाठी दुसऱ्या गावी अथवा लांबच्या गावी शेतकऱ्यांना जावे लागत नसे. त्यामुळे शेतकऱ्यांना शेती करणे अडचणीचे होत नसे. खेड्यात राहणाऱ्या बारा बलुतेदारामुळे शेतीची कामे वेळेवर होत असत. सुगी झाली की बलुतेदारांना शेतकऱ्यांकडून धान्याच्या स्वरूपात त्यांच्या कामाचा मोबदला मिळत असे. शेतकरी आणि बलुतेदार एकमेकांना उपयोगी पडत असल्याने शेतकऱ्यांना शेती व्यवसाय करणे फारसे जिकिरीचे वाटत नसे.

**(३) शेती हा प्रमुख व्यवसाय :–**

ब्रिटिशपूर्व काळात 'शेती' हाच भारतीय लोकांचा प्रमुख व्यवसाय होता. शेतकरी दोन प्रकारचे होते. स्वत:ची शेतजमीन असणारे आणि स्वत:च्या मालकीची शेती नसणारे. भूमिहीन शेतकरी 'कुळ' म्हणून दुसऱ्यांच्या शेतात काम करत असत. बहुसंख्य लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हाच होता.

**(४) जमिनदारी पद्धत :-**

ब्रिटिशपूर्व काळात जमिनदारी पद्धत अस्तित्वात होती. राजेशाहीमुळे जमिनदारी पद्धत अस्तित्वात आली होती. हे जमीनदार लोक कुळांकडून शेती करवून घेत. कुळांना ते फारसा मोबदला देत नसत. शेतीला लागणारा विपुरवठा जमीनदार किंवा सावकार करत असत. राजाला खंड द्यावा लागत असे. तो खंड जमीनदार देत असत. किंवा खंड वसूल करण्यासाठी अधिकारी नेमलेला असे. जमीनदारी पद्धतीमुळे शेती करणाऱ्या सामान्य कुळांची आणि बलुतेदार, अलुतेदारांची स्थिती फारशी चांगली नव्हती. अशा प्रकारे ब्रिटिशपूर्व भारतात (१) जमीनदार, (२) कुळे, बलुतेदार, अलुतेदार आणि (३) पाटील, कुलकर्णी असे तीन वर्ग खेडाात अस्तित्वात होते.

**(५) शहरांची संख्या अगदी नगण :-**

ब्रिटिशपूर्व काळात भारतात खेड्यांची संख्या लक्षणीय होती. भारत हा खेड्यांचाच देश होता. शहरांची संख्या मात्र अगदी नगण्य होती त्या काळात हिंदुस्थानात फारशी शहरे अस्तित्वात नव्हती. काही शहरे धार्मिक स्थळामुळे निर्माण झाली होती. काही धार्मिक स्थळांच्या ठिकाणी वर्षभर गर्दी असे. देशभरातून लोक देवदर्शनाला येत असत. त्यामुळे शहरांची निर्मिती होऊन शहरांची वाढ झाली होती. पण अशी शहरे नगण्य होती. अलाहाबाद, नाशिक, बनारस ही शहरे धार्मिक स्थळामुळे मोठी झाली होती. तर भारतात ज्या ज्या ठिकाणी दागिणे, मलमलचे कापड, कलाकुसरीच्या वस्तू तयार होत असत, ती ठिकाणे शहरे बनली आणि त्यामुळे त्या शहरांचा विकास होत गेला. इंदौर, माहेश्वर अशा काही शहरांची उदाहरणे सांगता येतील. अशा प्रकारे ब्रिटिशपूर्व काळात आपल्या देशात शहरे खूप कमी होती.

**(६) छोटे उद्योग आणि हस्तोद्योग :-**

ब्रिटिशपूर्वकाळात खेडाामध्ये छोटे उद्योग आणि हस्तोद्योग मोठ्या प्रमाणात होते. आणि हे सर्व उद्योग नफ्यात किंवा तेजीत होते. शस्त्रास्त्र निर्मिती, शेतीची अवजारे खेडोपाडी तयार होत असत. कलाकुसरीच्या वस्तू मोठ्या प्रमाणात तयार होत. हस्तोद्योग तेजीत होता. कारागिरांना राजाश्रय होता. ब्रिटिशपूर्व काळात दागिणे, कलाकुसरीच्या वस्तू, मलमलचे कापड साड्या इ. विविध वस्तूंचे उत्पादन होत असे. दगड, लाकूड आणि धातूच्या विविध वस्तू (उदाहरणार्थ मूर्ती) बनवल्या जात.

**(७) वस्तुविनिमय पद्धत**

ब्रिटिशपूर्व काळात भारतात वस्तुविनिमयाची पद्धत होती. वस्तूच्या खरेदी-विक्रीत पैशाचा वापर खूपच कमी केला जात होता. बलुतेदारी व अलुतेदारी पद्धत असल्याने शेतकऱ्यांकडून बलुतेदारांना व अलुतेदारांना कृषी मालाच्या स्वस्त सेवेचा मोबदला मिळत असे. तसेच एका वस्तूच्या मोबदल्यात लोकांना दुसरी वस्तू मिळत असे. गव्हाच्या बदल्यात तांदूळ, तांदळाच्या बदल्यात बाजरी मिळत असे. जास्तीत जास्त व्यवहार हे वस्तू-वस्तूमध्ये होत असत. पैशाचा वापर खूपच कमी प्रमाणात होत असे.

**(८) प्रगत आणि समृदध देश :–**

ब्रिटिशपूर्व काळात भारतावर जरी मुघलांची सत्ता होती तरी भारत देश काही बाबतीत प्रगत आणि समृद्ध होता. भारतातील छोटे छोटे उद्योग, कुटिर उद्योग, हस्तोद्योग, हे चांगले प्रगत होते. या उद्योगातील उत्पादनांना देशातून आणि देशाबाहेरून मोठी मागणी होती. साड्या, मलमलचे कापड, धातूच्या वस्तू विदेशात विशेषत: युरोपात मोठ्या प्रमाणात निर्यात होत असत. १७ व्या व १८ व्या शतकात भारतातून युरोपात मोठ्या प्रमाणात निर्यात होत असे. ब्रिटिशपूर्व काळात भारतातील माल युरोपात विकला जात असल्याने/भारतीय मालाला युरोपातून मागणी असल्याने भारतातील काही बंदरांचाही विकास घडून आला. अशा प्रकारे भारतातील छोट्या उद्योगात आणि हस्तोद्योगात तयार होणाऱ्या मालाला देशातून व जगभरातून मोठी मागणी ब्रिटिशपूर्व काळात होती. म्हणून भारत ब्रिटिश येण्यापूर्वी प्रगत व समृदध होता.

**समारोप :–**

अशा प्रकारे ब्रिटिशपूर्व काळात भारताची अर्थव्यवस्था समृद्ध होती. भारताचा निर्यात व्यापार चांगला होता. वस्तू जरी खेड्यात तयार होत होत्या तरी त्या वस्तूचा दर्जा खूपच चांगला होता. परदेशातील व्यापारी हिंदुस्थानात येऊन येथील उत्पादने खरेदी करत असत. शेती आणि हस्तकला व्यवसाय हे एकमेकावर अवलंबून होते. कुटिर उद्योग, हस्तकला उद्योग, लघुउद्योग हे चांगले चालत होते. कारण त्यांची उत्पादने खेड्यातच खपत होती. तयार होणाऱ्या सर्व मालाला खेड्यातच मागणी येत होती. तर काही उत्पादने परदेशी निर्यात होत होती. शहरांची संख्या मर्यादित होती व शहरे आटोपशीर होती. आजच्यासारखी बकाल, अस्ताव्यस्त पसरलेली नव्हती. या शहरांची निर्मिती धार्मिक कारणामुळे (देव देवतांच्या मंदिरामुळे), व्यापारी कारणामुळे निर्माण झालेली होती. ब्रिटिशपूर्व काळात हिंदुस्थानातील लोकांना शेतीत, छोट्या उद्योगात रोजगार मिळत होता. ब्रिटिशपूर्व काळात एकही मोठा उद्योग नव्हता. खेड्यामध्ये छोटे छोटे उद्योग व्यवसाय होते. त्यामुळे लोकांना खेड्यातच रोजगार मिळत होता. आणि त्यांच्या सर्व गरजा खेड्यातच भागत होत्या. ही खेडी आणि त्या खेड्यातील लोक आपल्या आपल्या गरजासाठी (वस्तूसाठी) शहरावर अवलंबून नव्हती. खेडी स्वयंपूर्ण व स्वतंत्र होती. ब्रिटिश येण्यापूर्वी भारताची अर्थव्यवस्था ग्रामीण अर्थव्यवस्था होती आणि ती स्वयंपूर्ण होती.

**(ब) ब्रिटिशकालीन भारतीय अर्थव्यवस्था :– (Indian Economy During British Period)**

भारतात ब्रिटिश लोक व्यापारी म्हणून आले आणि काही वर्षात अवघा देश ताब्यात घेऊन ते राज्यकर्ते बनले. सन १६०० साली इंग्रज भारतात आले. इंग्लंडमधील ईस्ट इंडिया कंपनी व्यापाराच्या निमित्ताने भारतात आली. परंतु त्यांनी आपल्या बरोबर शस्त्रे आणली होती. या शस्त्रांच्या जोरावर कंपनीने देशात हातपाय पसरले. १८३५ पर्यंत संपूर्ण देशावर कंपनी सरकारने वर्चस्व मिळवले. सन १७५७ मध्ये प्लासीची लढाई झाली. या लढाईत इंग्रजांचा (रॉबर्ट क्लाईव्ह) यांचा विजय झाला. त्यानंतर इंग्रजी राजवट हिंदुस्थानच्या जास्तीत जास्त प्रदेशात पसरली. सन १८५८ मध्ये भारतात विविध ठिकाणी इंग्रजांच्या विरूद्ध बंड झाले. त्याला १८५७ चा उठाव असे म्हणतात. तसेच त्या उठावास स्वातंत्र्ययुद्ध असेही म्हणतात.

१८५७ च्या बंडामुळे हिंदुस्थानचा कारभार सन १८५७ मध्ये इंग्लंडच्या राणीने आपल्या हातात घेतला. ब्रिटिश येण्यापूर्वी म्हणजे सन १६०० पूर्वी आणि त्यानंतरही अनेक वर्षे हिंदुस्थानात अनेक भागात परकीय मुसलमानांची सत्ता होती. मुघलांनी हिंदुस्थानात येऊन आक्रमणे करून अनेक वेळा हिंदुस्थानची प्रचंड लूट केली. इंग्रजांनी हिंदुस्थान ताब्यात घेऊन हेच लुटीचे धोरण अवलंबले. सन १६०० पासून १९४७ पर्यंत हिंदुस्थानावर ब्रिटिशांची राजवट होती. या ब्रिटिश राजवटीच्या काळात भारताची अर्थव्यवस्था कशी होती त्याची माहिती थोडक्यात पुढीलप्रमाणे दिली आहे.

### १.२.१ ब्रिटिशकालीन भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये/स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळची भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये (Major features of the Indian Economy at Independence)

सुमाारे तीनशे-साडेतीनशे वर्षे हिंदुस्थानची लूट करून इंग्रजांनी सन १९४७ साली देश आपल्या ताब्यात दिला. १५ ऑगस्ट १९४७ साली हिंदुस्थान इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त झाला. इंग्रजांनी आपल्या इंग्लंड देशाचाच अधिक फायदा होईल अशी आर्थिक, व्यापारी धोरणे आखली व राबवली. हिंदुस्थानाचा विकास करण्यासाठी इंग्रज देशात आले नव्हते. तर आपल्या अर्थव्यवस्थेची लूट करण्यासाठी आले होते. बिंटिशांची भारतातील राजवट अत्यंत अन्यायी आणि जुलमी होती. ब्रिटिशांनी नुसती सोन्याचीच लूट केली असे नाही तर अमाप जंगल संपत्ती सुद्धा आपल्या देशात नेली. सुमारे दोनशे-तीनशे वर्षे इंग्लंड भारताची लूट करीत होता. ब्रिटिशांनी नैसर्गिक साधन संपत्तीची (लोखंड, कोळसा, लाकूड, सोने इत्यादी) प्रचंड लूट केल्याने भारत जगातील अत्यंत गरीब देश बनला. एकेकाळी अत्यंत श्रीमंत व समृध्द असणारा हिंदुस्थान अत्यंत दरिद्री बनला. १९४७ साली हिंदुस्थान ब्रिटिशांच्या जोखडातून मुक्त झाला. ज्यावेळी देशाला स्वातंत्र्य मिळाले, त्यावेळी भारत जगातील एक गरीब/अविकसित/मागासलेले राष्ट्र होते. इंग्रजांनी भारताची अर्थव्यवस्था जवळ जवळ रिकामी आणि लंगडी करून टाकली होती. देशाला स्वातंत्र्य मिळून आज ७७ वर्षे पूर्ण झाली आहेत. या ७७ वर्षात भारताने विविध क्षेत्रात बरीच प्रगती केली आहे. तरीही भारताची अर्थव्यवस्था विकसित देशाइतकी समृदध नाही. त्यास अनेक कारणे आहेत. त्यापैकी एक कारण म्हणजे सन १६०० पासून १९४७ पर्यंत ब्रिटिशांनी भारताची केलेली प्रचंड आर्थिक लूट हे आहे. म्हणून ब्रिटिश राजवटीच्या काळात सन १६०० पासून १९४७ पर्यंत म्हणजे स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत भारत हा अविकसित किंवा मागासलेला देश होता. जेंव्हा जुलमी इंग्रजांनी हिंदुस्थान आपल्या ताब्यात दिला तेंव्हा हिंदुस्थानची अर्थव्यवस्था कशी होती? त्याची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे दिली आहे. यालाच स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळची भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये असे म्हणतात.

**(१) मागासलेली/अप्रगत अर्थव्यवस्था**

ब्रिटिश भारतात येणापूर्वी भारतीय अर्थव्यवस्था प्रगत व समृद्ध होती. परंतु ब्रिटिशांनी हिंदुस्थान ताब्यात घेतल्यानंतर हिंदुस्थान साडेतीनशे वर्षे १९४७ पर्यंत मागासलेला राहिला. ब्रिटिश राजवटीत भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत भारताची अर्थव्यवस्था मागासलेली/अप्रगत होती. इंग्रज अधिकाऱ्यांचे पगार, पेन्शन, युदध खर्च, गृह खर्च अमाप वसूल करून लुट केली. लाभांश, व्याज, नफा हिंदुस्थानातून इंग्लंडला जात

होता. हजारो टन सोने व मौल्यवान धातू इंग्लंडला पाठवण्यात आले. त्यामुळे हिंदुस्थानची अर्थव्यवस्था अक्षरश: रिकामी व लंगडी झाली. भारताचा आर्थिक विकास करणे हा ब्रिटिश राज्यकर्त्यांचा उद्देश नव्हता. इंग्लंडचा विकास करणे हाच ब्रिटिश राज्यकर्त्यांचा उद्देश होता. इंग्लंडचा विकास करणे हाच ब्रिटिश राज्यकर्त्यांचा उद्देश असल्याने ब्रिटिश्यांना हिंदुस्थानातून लोखंड, कोळसा, लाकूड, सोने यांची लूट केली. त्यामुळे ब्रिटिश राजवटीच्या काळात आणि ब्रिटिश लोक भारतातून जाईपर्यंत १९४७ पर्यंत भारतीय अर्थव्यवस्था मागासलेली होती.

**(२) वसाहतवादी अर्थव्यवस्था :–**

ब्रिटिश राजवटीत भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप 'वसाहतवादी अर्थव्यवस्था' असेच होते. हिंदुस्थान ही ब्रिटिशांची एक मोठी वसाहत होती. ब्रिटिशांची हिंदुस्थावर हुकमत होती. हिंदुस्थानचे सर्व आर्थिक निर्णय (शेती, उद्योग, व्यापार, कर, जकाती, साधनसंपत्तीचा वापर इत्यादी) ब्रिटिश राज्यकर्ते घेत असत. कोणतेही निर्णय घेणाचे अधिकार भारतीयांना नव्हते. स्वत:ला, इंग्लंड देशाला अनुकूल ठरतील अशीच अर्थिक धोरणे ब्रिटिश राज्यकर्ते आखत होते. विविध माध्यमातून इंग्रजांनी हिंदुस्थानचे शोषण केले. इंग्रजांनी वाहतूक, दळणवळण, वीज निर्मिती इत्यादी क्षेत्रात जी गुंतवणूक केली, त्या गुंतवणुकीवरील व्याज आणि नफा सोन्याच्या स्वरूपात मोठ्या प्रमाणात इंग्लंडला नेला. कर्जावरील व्याजाची रक्कमही वसूल केली ब्रिटिश नोकर, सैनिक, अधिकारी यांचे वेतन, भत्ते, पेंन्शन हा खर्चही आपल्याकडून वसूल केला. यालाच वसाहतवादी पिळवणूक (Colonial Exploitation) असे म्हणतात. अशा प्रकारे १९४७ पर्यंत भारतीय अर्थव्यवस्था ही वसाहतवादी अर्थव्यवस्था (Colonial Economy) होती.

**(३) ग्रामीण अर्थव्यवस्था :–**

ब्रिटिश राजवटीतील भारतीय अर्थव्यवस्थेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे भारतीय अर्थव्यवस्था ही ग्रामीण अर्थव्यवस्था (Rural Economy) होती. भारतात खेड्यांची संख्या प्रचंड होती. लाखो खेडी भारतात अस्तित्वात होती. सुमारे सहा लाख खेडाात लोक राहत होते. खेडी लहान–लहान होती. खेड्यात राहणाऱ्या लोकांचे प्रमाणही मोठे होते. ९० टक्क्यापेक्षा अधिक लोक खेडाात राहत होते. सन १८७२ मध्ये खेड्यात राहणाऱ्या लोकांचे शेकडा प्रमाण ९१.३० एवढे मोठे होते भारत स्वतंत्र झाला तेंव्हा म्हणजे १९४७ साली ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांचे प्रमाण सुमारे ८३ टक्के इतके होते. ब्रिटिश राजवटीत खेड्यांची, खेड्यात राहणाऱ्या लोकांची संख्या प्रचंड असल्याने, शेती हाच प्रमुख व्यवसाय असल्याने भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप ग्रामीण अर्थव्यवस्था असेच होते.

**(४) 'शेती' हाच प्रमुख व्यवसाय :–**

ब्रिटिश राजवटीत भारतीय लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हाच होता. उदरनिर्वाहासाठी आणि उपजीविकेसाठी कृषी क्षेत्रावर अवलंबून असणाऱ्या लोकांचे प्रमाण ९० टक्क्यापेक्षा जास्त होते. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी छोटे उद्योग, हस्तोद्योग बंद पाडण्याचे धोरण स्वीकारल्याने शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांच्या संख्येत वाढ घडून आली. भारताच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा लक्षणीय होता.

९०टक्क्यापेक्षा अधिक उत्पन्न शेतीपासून मिळत होते. रोजगार पुरवठ्यातही शेतीचे योगदान मोठे होते. त्यामुळे, ब्रिटिश राजवटीत भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप 'कृषीप्रधान अर्थव्यवस्था' (Agricultural Economy) असेच होते.

**(५) कृषी व्यवसायाचे व्यापारीकरण :-**

ब्रिटिश राजवटीच्या काळात भारतीय शेतीचे काही प्रमाणात व्यापारीकरण घडून आले. ब्रिटिशांनी प्रोत्साहन दिल्यामुळे सन १७६५ नंतर भारतात नीळ, कापूस, ऊस, रबर, चहा, कॉफी, तेलबिया यांच्या उत्पादनात वाढ होऊ लागली. यातील बराचसा माल इंग्लंडच खरेदी करत असल्यामुळे व्यापारी पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत गेली. इंग्लंडला कापूस, मसाल्याचे पदार्थ, चहा, रबर, नीळ यांची गरज असल्याने ब्रिटिश राज्यकर्त्यांनी या व्यापारी पिकांची उत्पादने घेणासाठी भारतीय शेतकऱ्यांना उद्युक्त केले. त्यामुळे या पिकांच्या लागवडीखालील क्षेत्रातही वाढ घडून आली. अशा प्रकारे ब्रिटिश राजवटीत शेतीचे काही प्रमाणात व्यापारीकरण घडून आले. शेतीचे व्यापारीकरण करण्याचा उद्देश्य इंग्लंडचे हित करणे हाच होता. त्यामुळे या बाबीचा जास्त फायदा इंग्लंडलाच प्राप्त झाला.

**(६) जमीनदारी पदधत/अर्ध-सरंजामशाही अर्थव्यवस्था (Semi Jeudal Economy) :-**

ब्रिटिशपूर्व काळातही भारतात जमीनदारी पद्धत अस्तित्वात होती. ही पद्धत ब्रिटिशांनीही पुढे चालू ठेवली. १९४७ पर्यंत ही पद्धत भारतात होती. आपल्या हितासाठी ब्रिटिशांनी ही पद्धत कायम ठेवली आणि कुळे, शेतमजूर यांच्याऐवजी जमीनदारांचे हित पाहिले. वॉरन हेस्टिंग्ज, लॉर्ड कॉर्नवॉलिस यांनी जमीनदारांना काही अधिकार दिले. सारा वसूल करणाचा अधिकार जमीनदारांना दिला. जमिनीचे मालकी हक्क जमीनदारांना दिले. जास्तीत जास्त जमीन महसूल जमीनदारांकडून वसूल करता यावा असा यामागे ब्रिटिशांचा हेतू होता. ब्रिटिशांनी जमीनदारी पद्धत कायम ठेवल्यामुळे ब्रिटिशांचा व जमीनदार लोकांचा फायदा झाला. कुळांचा फारसा फायदा झाला नाही. ब्रिटिश सरकार जमीनदारांकडून खंड वसूल करीत असे. शेतकरी आणि सरकार यांच्यामध्ये जमीनदार हे मध्यस्थ म्हणून काम करत होते. जमीनदारांनी खंडाचे दर वाढवल्यामुळे कुळांचे, शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. जमीनदार, सावकार, व्यापारी हे शेतकऱ्यांचे शोषण करत असत. म्हणून या पद्धतीला अर्ध-सरंजामशाही पद्धत असे म्हटले जात असे.

**(७) अनुकूल परकीय व्यापार :-**

ब्रिटिश राजवटीत भारताचा विदेशी व्यापार वाढला. ब्रिटिश राजवटीत भारताचा परकीय व्यापार फायदेशीर होता. परदेशात विशेषत: इंग्लंडमध्ये भारतातून कृषी मालाची मोठ्या प्रमाणात निर्यात होत होती. आयातीपेक्षा निर्यात जास्त होती. वाहतूक, दळणवळण, सिंचन, व्यापारी पिकांची लागवड यामध्ये वाढ होत गेल्याने भारताचा निर्यात व्यापारही वाढत गेला. त्यामुळे ब्रिटिश राजवटीत भारताचा व्यापारतोल हा अनुकूल किंवा फायदेशीर होता.

**(८) स्थिर अर्थव्यवस्था (Stagnant Economy) :-**

ब्रिटिश राजवटीत भारतीय अर्थव्यवस्थेचा फारसा विकास झाला नाही. आर्थिक विकास दरात वाढ झाली नाही. ब्रिटिश राजवटीत राष्ट्रीय उत्पन्नातील (GDP) आणि वास्तव दरडोई उत्पन्नातील वाढीचा सरासरी वार्षिक दर खूपच कमी म्हणजे केवळ अर्धा टक्के इतकाच होता. ब्रिटिश राजवटीत दरडोई उत्पन्नात वाढ होणाऐवजी घटच होत होती. दादाभाई नौरोजी सारख्या अनेक तज्ज्ञांनी हे दाखवून दिले होते. भारतात विपुल प्रमाणात नैसर्गिक साधनसामग्री असूनही त्याचा पुरेसा आणि योग्य वापर ब्रिटिश राजवटीने केला नाही. त्यामुळे भारताचा आर्थिक विकास घडून आला नाही. आर्थिक वाढ (Economic Growth) झाली नाही. नवीन तंत्रज्ञानाचा उत्पादनात भारतीयांनी वापर केला नाही. ब्रिटिशांनी देशाची मोठी आर्थिक पिळवणूक केली. १७५७ ते १९३१ या काळात ब्रिटिश सरकारने भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या सुमारे तीन टक्के शोषण केले. ब्रिटिश सरकारने वसाहतविषयक धोरण इत्यादी कारणामुळे ब्रिटिश राजवटीत भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास झाला नाही. म्हणून दादाभाई नौरोजी, रोमेश दत्त यांच्यासारख्यांनी ब्रिटिश काळात भारतीय अर्थव्यवस्था 'स्थिर अर्थव्यवस्था' (Stagnant Economy) होती असे म्हटले आहे. म्हणून 'स्थिर अर्थव्यवस्था' हे ब्रिटिशकालीन भारतीय अर्थव्यवस्थेचे ठळक वैशिष्टो मानले जाते.

**(९) मागासलेले/जुनाट तंत्रज्ञान :-**

ब्रिटिश राजवटीतील कृषी, उद्योग, व्यापार, सेवा क्षेत्रातील तंत्रज्ञान आजच्यापेक्षा खूपच मागासलेले किंवा जुनाट होते. तांत्रिक मागासलेपणा हे ब्रिटिश राजवटीतील भारतीय अर्थव्यवस्थेचे ठळक वैशिष्ट्य होते. सर्व क्षेत्रात अत्यंत जुन्या, टाकावू तंत्राने वस्तू व सेवा निर्माण केल्या जात असत. त्यामुळे कृषी, उद्योग या क्षेत्रातील उत्पादकता खूपच कमी होती. भारतात तांत्रिक प्रगती घडून येण्यासाठी ब्रिटिशांनी काहीही प्रयत्न केले नाहीत. इंग्लंडमधील पक्का माल भारतात विकण्याचे धोरण ब्रिटिशांनी अवलंबल्याने भारतातील खेड्यापाड्यातील अनेक उद्योग बंद पडले. त्यामुळे तांत्रिक प्रगतीला ब्रिटिश राजवटीत चालना मिळाली नाही. बहुसंख्य भारतीय उद्योजकांजवळ भांडवलाची चणचण असल्याने जुन्या, साध्या तंत्राचा वापर करूनच त्यांना उत्पादन करावे लागत असे.

**(१०) पायाभूत सुविधांची वाणवा :-**

ब्रिटिशांनी आपल्या शे-दोनशे वर्षाच्या राजवटीत देशात काही ठिकाणी रेल्वे, रस्ते, पूल, धरणे, बंधारे बांधले. परंतु या पायाभूत सुविधांचा उपयोग त्यांनी आपल्या मायदेशाच्या म्हणजे इंग्लंडच्या भरभराटीसाठीच केला. भारतातील नैसर्गिक साधनसंपत्ती आपल्या देशात सहज घेऊन जाता यावी यासाठीच त्यांनी त्यांच्या सोयीच्या ठिकाणीच रस्ते, पूल यांची उभारणी केली. देशाच्या इतर भागात पायाभूत सुविधांची खूपच वानवा होती. स्वातंत्र्यप्राप्तीच्यावेळी भारतात पायाभूत सुविधा खूपच कमी प्रमाणावर होत्या. रस्त्यासारख्या महत्वाच्या सुविधाही पुरेशा प्रमाणात नव्हत्या. देशाच्या अनेक भागातील रस्ते कच्चे होते. पावसाळ्यात तर या रस्त्यांचा काहीच उपयोग होत नव्हता. ग्रामीण भागातील बहुतेक वाहतूक ही बैलगाडीतून होत होती. इंग्रजांनी १८५३ मध्ये भारतात रेल्वे सुरू केली. १९४७ पर्यंत रेल्वे वाहतूकीच्या सुविधांत त्यांनी वाढ केली.

परंतु ही वाढ पुरेशी नव्हती. देशात हवाई वाहतूक, जलवाहतूक सुविधाही फारशी समाधानकारक नव्हती. ब्रिटिश राजवटीत भारतातील वाहतूक व्यवस्था ही अत्यंत अपुरी (तुटपुंजी), गैरसोयीची व अकार्यक्षम होती.

**(११) उद्योगक्षेत्राची पीछेहाट :–**

ब्रिटिशांच्या चुकीच्या धोरणामुळे भारताचा औद्योगिक विकाससुद्धा चांगल्या प्रकारे होऊ शकला नाही. भारतात ब्रिटिश येण्यापूर्वी भारतातील उद्योग व्यवसाय चांगले चालत होते. खेड्यातील लहान लहान उद्योग, कुटिर उद्योग, हस्तोद्योग यांची चांगली प्रगती झाली होती. त्यामुळे खेडी स्वयंपूर्ण व स्वावलंबी होती. परंतु ब्रिटिश राजवटीच्या काळात भारतातील ब्रिटिश राज्यकर्त्यांनी भारतातील कापूस व इतर कच्चा माल इंग्लंडला निर्यात करून आणि इंग्लंडमधील पक्का माल भारतात विक्रीस आणून भारतातील खेड्यापाड्यातील छोटे–छोटे उद्योग, कुटीरोद्योग, हस्तोद्योग बंद पाडले. इंग्लंडमधून पक्का माल भारतात विकण्याचे धोरण इंग्रजांनी अनुसरल्याने भारतातील कारागीर उध्वस्त झाले. ते बेरोजगार, दरिद्री व कर्जबाजारी झाले. भारतातील खेड्यातील उद्योग व्यवसाय नष्ट झाल्यामुळे त्याचा फटका शेतकऱ्यानांही बसला. ब्रिटिशांनी भांडवली उद्योगात फारशी गुंतवणूक केली नाही. त्यांना सोयीच्या वाटणाऱ्या मोजक्या उद्योगात त्यांनी पैसे गुंतवले. त्यामुळे त्याचे फायदे इंग्लंडलाच अधिक झाले. अशा प्रकारे ब्रिटिशांच्या चुकीच्या व अन्यायकारक औद्योगिक धोरणांमुळे स्वातंत्र्यप्राप्तीच्यावेळी भारतातील औद्योगिक क्षेत्र खूपच मागासलेले होते. त्यामुळे भारताच्या आर्थिक विकासाचा दर सुद्धा खूपच कमी होता. १९२० नंतर महात्मा गांधी व त्यांच्या कॉंग्रेस पक्षाने भारतात स्वदेशीची चळवळ सुरू केली. ब्रिटिश राजवटीविरोधात लढा तीव्र केला. त्यामुळे इंग्लंडमधील पक्क्या मालाची आयात हळूहळू कमी झाली. त्यामुळे भारतीय (देशी) उद्योगांचा हळूहळू विकास होऊ लागला. असे असले तरी स्वातंत्र्यप्राप्तीच्यावेळी म्हणजे १९४७ साली भारत औद्योगिक क्षेत्रात खूपच मागासलेला/पिछाडीवर होता.

**(१२) प्रचंड दारिद्र्य :–**

प्रचंड दारिद्र्य हे स्वातंत्र्यप्राप्तीच्यावेळच्या भारतीय अर्थव्यवस्थेचे ठळक वैशिष्ट्य होते. या दारिद्र्यास भारतातील ब्रिटिश राजवट हा घटक जसा कारणीभूत होता, तसा लोकसंख्या वाढ हा घटक सुद्धा कारणीभूत होता. परंतु सर्वात जास्त प्रभावी घटक ब्रिटिशांची जुलमी राजवट हा घटक होता. ब्रिटिशांच्या अन्यायी राजवटीमुळेच भारतातील शेतकरी, शेतमजूर, कारागीर इत्यादी घटकांना वर्षानुवर्षे दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकावे लागले. ब्रिटिशांचा भारतीय जमीनदारांना वरदहस्त असल्याने जमीनदारांचे कल्याण झाले तर जमीनदारांच्या जमिनीवर राबणाऱ्या कुळांच्या नशीबी भयंकर दारिद्र्य आले. जमीनदारांचे प्रमाण ५ ते १० टक्के होते. तर कुळांचे प्रमाण ९० ते ९५ टक्के होते. ही सर्व कुळे अत्यंत गरीब होती. त्यामुळे ब्रिटिश राजवटीत म्हणजेच स्वातंत्र्यप्राप्तीच्यावेळी भारतातील दारिद्राचे प्रमाण ९० टक्केपेक्षा जास्त होते.

**(१३) प्रचंड बेकारी :–**

प्रचंड बेरोजगारी हे सुद्धा स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळच्या भारतीय अर्थव्यवस्थेचे ठळक वैशिष्ट्य होते. इंग्लंडमधून पक्का माल भारतात आणून विकण्याच्या ब्रिटिशांच्या धोरणामुळे भारतातील कारागीर, मजूर आणि

शेतकरी बेरोजगार झाले. त्यामुळे त्यांना दारिद्र्य, उपासमार, बेकारी या प्रश्नाशी सामना करावा लागला. ब्रिटिशांच्या चुकीच्या धोरणामुळे खेड्यातील ग्रामोद्योगातील, कुटीर उद्योगातील, हस्तोद्योगातील कारागीर मोठ्या प्रमाणात बेकार झाले. संस्थानिक राजे लोकांचे महत्व कमी झाल्याने कारागीरांना राजाश्रय मिळणे बंद झाले. त्यामुळे बेकारीत वाढ झाली. इंग्लंडहून आलेल्या वस्तूशी दर्जा व किंमत याबाबतीत भारतीय देशी उद्योगांना स्पर्धा करता न आल्याने हे उद्योग बंद पडले व त्यामुळे देशभरातील कुशल, अकुशल कामगार बेरोजगार झाले. संपूर्ण हिंदुस्थानभर अशी बेरोजगारी निर्माण झाली होती. शेतीक्षेत्रातही छुपी बेकारी आढळत होती.

**(१४) अविकसित नाणेबाजार व भांडवल बाजार :-**

स्वातंत्र्यप्राप्तीच्यावेळी म्हणजे १९४७ साली भारतातील नाणेबाजार आणि भांडवल बाजार अविकसित होता. ब्रिटिश राजवटीत काही बँका स्थापन झाल्या. परंतु ९० टक्केपेक्षा अधिक भारतीय जनतेला त्यांचा काहीच उपयोग होत नव्हता. देशात सावकारांचे मोठे प्राबल्य होते. सावकारावर कोणतेही नियंत्रण नव्हते. सावकारांच्या विळख्यात ग्रामीण भारत अडकून पडला होता. ब्रिटिशांनी जाणून-बूजून भारतीय नाणेबाजाराचा व भांडवल बाजाराचा विकास घडवून आणला नाही. त्यामुळे भारतातील कृषी, उद्योग व सेवा क्षेत्राचा विकास झाला नाही. ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या चुकीच्या धोरणामुळे शेतकरी, शेतमजूर, कारागीर दारिद्री झाले. त्यांचे दारिद्र्य व बेकारी खूप वाढली. त्यामुळे त्यांची बचत घटली. जी थोडीफार बचत होत होती, तिची गुंतवणूक सोने, जमीन, घरदार यात होत होती. त्यामुळे भारतात भांडवल बाजाराचा विकास झाला नाही.

**(१५) वेठबिगारी :-**

स्वातंत्र्यप्राप्तीच्यावेळी भारतात वेठबिगारी पद्धत सुद्धा अस्तित्वात होती. जमीनदारी पद्धतीमुळे वेठबिगारीची समस्या निर्माण झाली. ब्रिटिश राज्यकर्ते जमीनदारांच्या बाजूचे असल्यामुळे त्यांनी भारतातील वेठबिगारी नष्ट करणासाठी काहीच केले नाही. अत्यंत कमी मजुरीत वेठबिगारांना वर्षानुवर्षे राबावे लागत असे. देशाला स्वातंत्र्य मिळून २०-३०वर्षे झाली तरी ही भयंकर व क्रूर पद्धत अस्तित्वात होती.

**(१६) मागासलेली शेती :-**

मागासलेली शेती हे सुद्धा स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळच्या भारतीय अर्थव्यवस्थेचे ठळक वैशिष्ट्य होते. सन १९४७ साली म्हणजे देश जेंव्हा स्वतंत्र झाला तेंव्हा भारतीय शेती खूपच मागासलेली होती. ब्रिटिशांनी जोपासलेली जमीनदारी पद्धत हा प्रमुख घटक त्यास जबाबदार होता. भारतातील जमीनदार स्वत: शेती करत नसत. कुळांकडून शेती करून घेत. तसेच जमीनदार फारसे भांडवल शेतीत गुंतवत नसत. त्यामुळे शेतीचा विकास झाला नाही. कुळांना फारसा मोबदला मिळत नसल्याने उत्पादन वाढीची प्रेरणा त्यांच्यात नव्हती. ब्रिटिश राजवटीकडून सामान्य शेतकऱ्यांना मदत मिळत नव्हती. शेती ही संपूर्णपणे निसर्गावर अवलंबून होती. ओलिताखालील क्षेत्र वाढावे यासाठी ब्रिटिशांनी काहीही विशेष प्रयत्न केले नाहीत. त्यामुळे शेतीचा विकास होऊ शकला नाही. स्वातंत्र्यप्राप्तीच्यावेळी म्हणजे १९४७ साली शेती मागासलेली असल्याने भारतीय अर्थव्यवस्था सुद्धा मागासलेली होती.

**(१७) भांडवल निर्मितीचा मंद वेग :–**

भांडवल निर्मितीचा अत्यंत मंद वेग हे सुध्दा स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळच्या भारतीय अर्थव्यवस्थेचे ठळक वैशिष्ट्य होते. सन १६०० पासून म्हणजे भारतात ब्रिटिश आल्यापासून ते १९४७ पर्यंत भारतातून सतत इंग्लंडला सोने पाठवले जात होते. तसेच ब्रिटिशांनी रेल्वे व इतर उद्योगात जी गुंतवणूक केली होती, त्या उद्योगांना मिळणारा नफा सुध्दा इंग्लंडला पाठवला जात होता. त्यामुळे भारतात भांडवलनिर्मिती फारशी होतच नव्हती. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था खिळखिळी होऊन तिच्या विकासाचा वेग खूपच मंदावला होता.

**(१८) प्रचंड आर्थिक विषमता :–**

प्रचंड आर्थिक विषमता हे सुध्दा स्वातंत्र्यप्राप्तीवेळच्या भारतीय अर्थव्यवस्थेचे ठळक वैशिष्ट्य होते. भारत स्वतंत्र झाला त्यावेळी भारतात प्रचंड आर्थिक विषमता होती. मूठभर लोकांच्या हातात जमिनीचे केंद्रीकरण झाले होते. ५ ते १० टक्के जमीनदार होते. त्यांच्याकडेच एकूण जमिनीपैकी ८० टक्के पेक्षा अधिक शेतजमीन होती. शेतमजूर, कारागिर, शेती करणारी कुळे यांना अत्यल्प वेतन मिळत असल्याने ब्रिटिश राजवटीत आर्थिक विषमता कमालीची वाढली होती.

**(१९) सामाजिक विषमता :–**

समाजिक विषमतासुध्दा स्वातंत्र्यप्राप्तीच्यावेळी खूपच होती. जातीव्यवस्था मजबूत होती. जातीवरून श्रेष्ठ, कनिष्ठ ठरवले जात असे. काही जातीच्या लोकांना इतर जातीच्या लोकांकडून जनावरांपेक्षा वाईट वागणूक मिळत होती. जातीय, धार्मिक विद्वेश कमालीचा निर्माण झाला होता. जातीय दंगे, धार्मिक दंगे यांनी देशात ऊत आणला होता. प्रचंड सामाजिक विषमता हे स्वातंत्र्यप्राप्तीच्यावेळच्या भारतीय अर्थव्यवस्थेचे ठळक वैशिष्ट्य होते. सामाजिक विषमतेमुळे कित्येक लोकांना उत्पादनाच्या प्रक्रियेत भाग घेता येत नव्हता. त्यामुळे त्यांच्या वाट्याला आलेले दारिद्र्य हे खूपच भयंकर होते. 'फोडा आणि झोडा' हे धोरण अवलंबून ब्रिटिशांनी भारतावर सुमारे दोनशे–तीनशे वर्षे राज्य केले. जाती–जातीत, धर्मा–धर्मात भांडणे लावली. हिंदु–मुस्लीम झगडे ब्रिटिशांनी अधिक तीव्र केले. ब्रिटिश राजवट भारतात येणापूर्वी भारतीय लोक गुणागोविंदाने राहत होते. पण ब्रिटिशांनी भारतीय लोकात जात, धर्माच्या नावाने भांडणे लावून सामाजिक स्वास्थ नष्ट केले. ब्रिटिशांच्या चुकीच्या धोरणामुळे ब्रिटिश राजवटीत सामाजिक विषमता अधिकच तीव्र झाली.

**समारोप**

भारतात ब्रिटिश येण्यापूर्वी भारतातील खेडी स्वयंपूर्ण होती. परंतु भारतात ब्रिटिश आल्यानंतर त्यांनी चुकीची, अन्यायकारक आर्थिक, सामाजिक राजकीय धोरणे राबवली. त्यामुळे प्रगत, समृद्ध आणि वैभवशाली असणारी भारतीय अर्थव्यवस्था मागासलेली बनली. ब्रिटिशांनी गृहखर्च, युद्ध खर्च, पेन्शन, वेतन इत्यादी खर्च भारतातून वसूल केला. लाकूड, लोखंड, कोळसा, सोने यांची लूट केली. व्याज, नफा, लाभांश या स्वरूपातही भारताची लूट केली. पक्का माल भारतात जादा दराने विकून अमाप संपत्ती इंग्लंडला पाठवली. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था दरिद्री, रिकामी (Depleted) आणि लंगडी (Amputeted) बनली. जाता जाता

ब्रिटिशांनी भारताचे दोन तुकडे करून टाकले. भारत आणि पाकिस्तान अशी देशाची फाळणी झाली. फाळणीमुळे भारताची २३ टक्के जमीन पाकिस्तानला द्यावी लागली. आणि भारताच्या वाटााला ७७ टक्के जमीन आली. १८ टक्के लोकसंख्या पाकिस्तानात गेली तर ८२ टक्के लोकसंख्या भारतात राहिली. पाकिस्तानतून ७० लाख हिंदू निर्वासित भारतात आले. त्यांच्यावर प्रचंड खर्च भारत सरकारला करावा लागला. ताग आणि गव्हाच्या लागवडीखालील सुपीक जमीन पाकिस्तानात गेल्यामुळे भारतात अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली. अशा प्रकारे ब्रिटिश राजवटीत भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास होणाऐवजी अधोगतीच झाली. देशही कंगाल झाला आणि देशातील ९० टक्क्यापेक्षा अधिक असणारी शेतकरी, शेतमजूर, कारागीर ही जनता सुदधा कंगाल झाली. भिकेला लागली. देशोधडीला लागली.

## १.२.२ विकसनशील भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये

**प्रास्ताविक :-**

विकसित अर्थव्यवस्था (Developed Economy) अविकसित अर्थव्यवस्था (Undeveloped Economy) आणि विकसनशील अर्थव्यवस्था (Developing Economy) अशा तीन प्रकारच्या अर्थव्यवस्था जगात आढळून येतात. विकसित अर्थव्यवस्था असणाऱ्या देशांना श्रीमंत देश असे म्हणतात. तर अविकसित अर्थव्यवस्था असणाऱ्या देशांना गरीब देश (Poor Countries) किंवा मागासलेले देश (Backward Countries) असे म्हणतात. आणि जे देश अविकसित नाहीत व विकसितही नाहीत अशा देशांना विकसनशील देश (Developed Countries) असे म्हणतात.

**विकसित अर्थव्यवस्था :-**

ज्या देशांचा संपूर्ण आर्थिक विकास घडून आला आहे, आर्थिक विकासाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे, प्राथमिक, द्वितीय व तृतीय अशी तिन्ही क्षेत्रे प्रगत आहेत, वास्तव राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्न सर्वोच्च आहे किंवा ज्या देशातील नागरिकांच्या राहणीमानाचा/जीवनमानाचा दर्जा अत्यंत चांगला आहे, दारिद्र्याचे प्रमाण शून्य आहे अशा देशांना विकसित देश असे म्हणतात. अशा देशांच्या अर्थव्यवस्थेला विकसित अर्थव्यवस्था असे म्हणतात. इंग्लंड अमेरिका, जपान, कॅनडा, ऑस्ट्रेलिया इत्यादी देशांच्या अर्थव्यवस्था प्रगत/विकसित/श्रीमंत आहेत. विकसित देशांची संख्या जगात सुमारे दहा ते बारा इतकी आहे.

**अविकसित अर्थव्यवस्था :-**

ज्या देशांचा अद्याप आर्थिक विकास झालेला नाही किंवा ज्या देशात आर्थिक विकासाच्या प्रक्रियेला फारशी सुरवात झालेली नाही, अशा देशांना अविकसित देश असे म्हणतात. अप्रगत देशांची प्राथमिक, द्वितीय आणि तृतीय अशी तिन्ही क्षेत्रे मागासलेली असतात. जगात अशा देशांची संख्या सुमारे १०० इतकी आहे.

**विकसनशील अर्थव्यवस्था :–**

ज्या देशांचे वास्तव दरडोई उत्पन्न (Real per capita income) अमेरिका, ऑस्ट्रेलिया, कॅनडा या देशापेक्षा कमी आहे, अशा देशांच्या अर्थव्यवस्थांना विकसनशील अर्थव्यवस्था असे म्हणतात. ज्या देशांचा आर्थिक विकास झालेला नाही परंतु त्यांची वाटचाल विकासाच्या दिशेने सुरू आहे किंवा ज्या देशात आर्थिक विकासाची प्रक्रिया चालू आहे अशा देशांना विकसनशील देश असे म्हणतात. जगात विकसनशील देशांची संख्या सुमारे १०० इतकी असून भारत आणि चीन हे जगातील प्रमुख विकसनशील देश आहेत.

**विकसनशील भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये**

जगातील इंग्लंड, अमेरिका, कॅनडा, जपान इत्यादी राष्ट्राप्रमाणे भारताची अर्थव्यवस्था प्रगत नाही. या प्रगत देशातील कृषी, उद्योग, व्यापार, वाहतूक, दळणवळण या क्षेत्रांचा जेवढा विकास झालेला आहे तेवढा भारताचा विकास झालेला नाही. परंतु या विविध क्षेत्रांचा गतीने विकास सुरू आहे. म्हणून भारताची अर्थव्यवस्था ही विकसित नसून विकासाच्या दिशेने वाटचाल करणारी म्हणजे विकसनशील आहे. भारताची अर्थव्यवस्था कृषीप्रधान आणि ग्रामीण आहे. प्रगत देशांच्या तुलनेत दरडोई उत्पन्न कमी आहे. बहुसंख्य लोकांचे राहणीमान निकृष्ट दर्जाचे आहे. दारिद्रय व बेकारीची समस्या गंभीर आहे. म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेला विकसनशील अर्थव्यवस्था असे म्हणतात. अशा विकसनशील भारतीय अर्थव्यवस्थेची ठळक वैशिष्ट्ये थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत.

**(१) अतिरिक्त लोकसंख्या :–**

ज्या देशांची लोकसंख्या अतिरिक्त असते किंवा प्रचंड आकाराची असते ते देश अविकसित किंवा विकसनशील असतात. यास काही देश अपवाद आहेत. अतिरिक्त लोकसंख्या हे विकसनशील देशांचे ठळक वैशिष्ट्य आहे. भारतीय लोकसंख्येचा आकारही प्रचंड असून सुमारे ३० ते ४० कोटी लोकसंख्या ही अतिरिक्त आहे. आज भारताची लोकसंख्या ही १४० कोटीच्या आसपास आहे. लोकसंख्येच्या बाबतीत चीनचा जगात प्रथम क्रमांक आहे तर भारताचा दुसरा क्रमांक आहे. भारतात जन्मदर जास्त आणि मृत्यूदर कमी असल्याने अतिरिक्त लोकसंख्येची समस्या देशात निर्माण झाली आहे. भारतात जन्मदरात आणि मृत्यूदरात मोठी तफावत असून ही तफावत दिवसेंदिवस वाढतच आहे. सन २००९–१० मध्ये जन्मदर २२.५ होता आणि मृत्यू दर ७.३ इतका होता. जन्मदरात आणि मृत्यूदरातील तफावत १५.२ इतकी होती. त्यामुळे भारतात लोकसंख्येचा स्फोट घडून आला आहे. सन १९५१ मध्ये भारताची लोकसंख्या ३६.१ कोटी होती. २००१ मध्ये ती १०२.७ कोटी होती. २०११ मध्ये ती १२१ कोटी होती. २०२१ मध्ये ती १४० कोटीच्या पुढे गेली असावी (अजून २०२१ ची जनगणना झाली नाही. अंदाजित आकडेवारी दिली आहे.) प्रचंड आकाराच्या लोकसंख्येमुळे आणि वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्या वृद्धी दरामुळे भारतात जीवनाश्यक वस्तूंचा तुटवडा निर्माण झाला आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीवर मोठा ताण पडला आहे. बेकारी, दारिद्र्य, उपासमार, कुपोषण, बालमृत्यू, महागाई या समस्या वाढत्या/अतिरिक्त लोकसंख्येमुळे गंभीर बनल्या आहेत.

**(२) कृषी क्षेत्राचे प्राबल्य :–**

आजही भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचे प्राबल्य आहे. भारतात आजही सुमारे ६० टक्के लोकसंख्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या उपजीविकेसाठी आणि रोजगारासाठी कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. विकसित देशात शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण १ ते ५ टक्के आहे. इंग्लंडमध्ये १%, अमेरिकेत ४%, जपामध्ये ५ टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. अशा प्रकारे भारतात आजही शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण विकसित देशांच्या तुलनेत जास्त आहे. विकसित देशांच्या तुलनेत भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा आजही जास्त आहे. विकसित देशात कृषी क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा १ ते ४ टक्के आहे. तर भारताचा तो १४ टक्के आहे. अशा प्रकारे (१) विकसित देशांच्या तुलनेत कृषी क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा जास्त असल्याने आणि (२) विकसित देशांच्या तुलनेत भारतात कृषी क्षेत्रावर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण मोठे असल्याने भारतीय अर्थव्यवस्थेवर कृषी क्षेत्राचे प्राबल्य आहे. भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्राचे महत्व कमी झालेले नाही भारतातील कृषी उद्योग शेतीवर अवलंबून आहेत. व्यापार व सेवा क्षेत्रही बऱ्याच प्रमाणात कृषी व्यवसायाच्या विकासावर अवलंबून आहे. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचे प्राबल्य दिसून येते.

**(३) ग्रामीण अर्थव्यवस्था :–**

भारतीय अर्थवस्थेला 'ग्रामीण अर्थव्यवस्था' (Rural Economy) असे सुद्धा म्हणतात. कारण भारतात खेडयांची आणि खेडयात राहणाऱ्या लोकांची संख्या मोठी आहे, भारतात खेडयांची (Villages) संख्या सुमारे सात लक्ष इतकी असून वाड्या, वस्त्या आणि पाडे यांची संख्या सुद्धा जवळजवळ तेवढीच आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार भारतात खेडयात राहणाऱ्या लोकांची संख्या ८३.३० कोटी इतकी आहे. तर शहरात राहणाऱ्या लोकांची संख्या ३७.७१ कोटी इतकी आहे. भारतात ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण ६८.८३ टक्के असून शहरी लोकसंख्येचे प्रमाण ३१.१७ टक्के इतके आहे. इंग्लंडसारख्या देशात शहरात राहणाऱ्या लोकांचे प्रमाण ९० टक्यापेक्षा जास्त आहे. भारतात दरवर्षी ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांच्या प्रमाणात घट होत असली तरी विकसित देशांच्या तुलनेत भारतात आजही ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांचे प्रमाण मोठे आहे. म्हणून भारतीय अर्थव्यवस्था ही ग्रामीण अर्थव्यवस्था आहे.

**(४) द्विक्षेत्रीय अर्थव्यवस्था :–**

भारतीय अर्थव्यवस्थेचे आणखी एक ठळक वैशिष्ट्य म्हणजे भारतीय अर्थव्यवस्था ही 'द्विक्षेत्रीय अर्थव्यवस्था' आहे. भारतीय अर्थव्यवस्थेची विभागणी आधुनिक क्षेत्र आणि परंपरागत क्षेत्र अशा दोन क्षेत्रात झालेली आहे. भारतात वस्तू आणि सेवांचे उत्पादन आधुनिक क्षेत्रातही होते आणि परंपरागत क्षेत्रातही होते. आधुनिक क्षेत्र म्हणजे शहरी क्षेत्र होय. तर परंपरागत क्षेत्र म्हणजे ग्रामीण क्षेत्र होय. आधुनिक क्षेत्रात नफा जास्त मिळतो. तर परंपरागत क्षेत्रात निर्वाहापुरते किंवा जगण्यापुरते उत्पादन मिळते. म्हणून परंपरागत क्षेत्रास निर्वाह क्षेत्र असेही म्हणतात. भारतात कृषी, उद्योग, व्यापार, वाहतूक, दळणवळण या क्षेत्रातील उत्पादन

आधुनिक आणि परंपरागत अशा दोन्ही क्षेत्रात होते. आधुनिक क्षेत्रातील उत्पादन अत्याधुनिक तंत्राच्या साहाय्याने केले जाते. त्यामुळे आधुनिक क्षेत्रापेक्षा परंपरागत क्षेत्रात नफा खूपच कमी मिळतो.

**(५) दरडोई उत्पन्न कमी :–**

विकसित देशांच्या तुलनेत आजही भारतातील दरडोई उत्पन्न खूपच कमी आहे. म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेला विकसनशील अर्थव्यवस्था असे म्हणतात. सन १९९९ मध्ये भारतातील दरडोई उत्पन्न (Per Capita income) ४५० डॉलर्स इतके होते. सन २००५ मध्ये ६२० डॉलर्स होते. सन २००९ मध्ये भारताचे दरडोई उत्पन्न ११८० डॉलर्स होते. स्वित्झर्लंडचे दरडोई उत्पन्न ५६३७० डॉलर्स होते. अमेरिकेचे ४७२४० डॉलर्स, जपानचे ३७८७० डॉलर्स, जर्मनीचे ४२५६६ डॉलर्स, इंग्लंडचे ४१५२० डॉलर्स दरडोई उत्पन्न होते. अशा प्रकारे विकसित देशांच्या तुलनेत भारताचे दरडोई उत्पन्न खूपच कमी आहे. चीन हा विकसनशील देश असूनही चीनपेक्षा सुद्धा आपले दरडोई उत्पन्न खूपच कमी आहे. उदाहरणार्थ सन २००९ साली चीनचे दरडोई उत्पन्न ३५९० डॉलर्स होते. तर भारताचे केवळ ११८० डॉलर्स एवढे होते. राष्ट्रीय उत्पन्नाला देशाच्या लोकसंख्येने भागून दरडोई उत्पन्न काढतात. भारताची लोकसंख्या प्रचंड असल्याने भारताचे दरडोई उत्पन्न कमी येते. तसेच राष्ट्रीय उत्पन्न कमी असल्यानेही दरडोई उत्पन्न कमी भरते.

**(६) सार्वत्रिक दारिद्र्य :–**

सार्वत्रिक दारिद्र्य हे भारतीय अर्थव्यवस्थेचे ठळक वैशिष्ट्य आहे. सार्वत्रिक दारिद्र्य म्हणजे सर्वदूर पसरलेले, देशाच्या सर्व भागात आढळून येणारे व अनेक शतकांपासून अस्तित्वात असलेले दारिद्र्य होय. भारतातील दारिद्र्याची समस्या आजची नसून जुनाट समस्या आहे. ज्यांना आपल्या उत्पन्नातून अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि शिक्षण या गरजा सुद्धा भागवता येत नाहीत, त्या लोकांना दरिद्री लोक किंवा गरीब लोक असे म्हणतात. १९७३–७४ मध्ये भारतातील ५४.९०% टक्के लोक दरिद्र्यरेषेखाली होते. तर १९९९–२००० साली दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण २६.१० टक्के इतके होते. अलीकडच्या काही वर्षापासून भारतात जीवनावशक वस्तूंच्या किंमतीत बेसुमार वाढ होत आहे. त्यामुळे जीवनावश्यक वस्तूंची खरेदी करणे बहुसंख्य लोकांच्या आवाक्याबाहेर गेले आहे. दिवसेंदिवस गगनाला भिडणाऱ्या महागाईमुळे भारतात दारिद्र्याचे प्रमाण वाढत आहे. महागाई, कोरोनासारखी आपत्ती अशा कारणामुळे भारतातील दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण ४० ते ६५ टक्क्यापर्यंत जाऊन पोहचते. भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी भारतात ८० टक्केपेक्षा अधिक लोक दरिद्री किंवा गरीब होते. त्यावेळी आपला देश अविकसित (Undeveloped) होता. आज सरकारी आकडेवारीनुसार भारतातील दरिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण २५ टक्क्यापर्यंत कमी झाले आहे. म्हणून भारताची अर्थव्यवस्था ही विकसनशील अर्थव्यवस्था आहे. इंग्लंड, अमेरिका इत्यादी विकसित देशात दारिद्र्याचे प्रमाण शून्य आहे. म्हणून भारतीय अर्थव्यवस्था विकसित अर्थव्यवस्था म्हणून गणली जात नाही.

**(७) प्रचंड बेरोजगारी :–**

जे लोक शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सुदृढ आहेत आणि प्रचलित वेतन दरावरती काम करण्याची त्यांची तयारी आहे परंतु तरीही त्यांना काम मिळत नाही, त्या लोकांना बेरोजगार व्यक्ती असे म्हणतात. भारतात बेरोजगार व्यक्तींची संख्या दिवसेंदिवस वाढत असून बेकारीच्या समस्येने उग्र स्वरूप धारण केले आहे. भारतात शहरी बेकारी, ग्रामीण बेकारी, सुशिक्षितांची बेकारी, अशिक्षितांची बेकारी, उघड बेकारी, छुपी बेकारी, अर्ध बेकारी अशी सर्व प्रकारची बेकारी आढळते. विकसित देशातील बेकारीचे स्वरूप चक्रीय आहे. तर भारतातील बेकारीचे स्वरूप संरचनात्मक आहे. विकसित देशात बेकारी असली तरी ती भारताइतकी गंभीर स्वरूपाची नाही. भारतात कृषी क्षेत्रात आढळून येणारी बेकारी प्रामुख्याने छुपी बेकारी किंवा अदृष्य बेकारी अशा स्वरूपाची आहे. म्हणजेच भारतीय शेतीत गरजेपेक्षा जास्त लोक काम करतात. या जादा लोकामुळे शेतीच्या उत्पन्नात काहीच भर पडत नाही. भारतात सर्वत्र शिक्षणाचा प्रसार वेगाने होत असल्याने सुशिक्षितांच्या बेकारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. भारतात आजमितीस सुमारे दहा कोटीपेक्षा अधिक लोक बेरोजगार असून बेकारीमुळे देशात अनेक आर्थिक आणि सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत.

**(८) आर्थिक विषमता :–**

आर्थिक विषमतेला उत्पन्नातील विषमता किंवा साधनसंपत्तीच्या वाटपातील विषमता असे म्हणतात. देशातील थोडया लोकांजवळ राष्ट्रीय उत्पन्नाचा मोठा वाटा असणे आणि मोठया संख्येने असणाऱ्या लोकांजवळ राष्ट्रीय उत्पन्नाचा कमी वाटा असणे याला आर्थिक विषमता किंवा उत्पन्नातील विषमता असे असतात. भारतात स्वातंत्र्यपूर्वकाळापासून आर्थिक विषमता आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण झाली तरी देशात आर्थिक विषमता आढळते. या विषमतेचे स्वरूप खूप मोठे आणि गंभीर आहे. संख्येने कमी असणाऱ्या लोकांचे उत्पन्न खूप प्रचंड आहे. तर काही लोकांच्याकडे व्यवस्थित जगता येईल एवढे सुद्धा उत्पन्न नाही. कोट्याधीश, अब्जाधीश लोकांची संख्या भारतात वाढत आहे. पण गरीब लोकांची संख्याही प्रचंड आहे. भारतात शहरी भागात सुद्धा आर्थिक विषमता आढळते आणि ग्रामीण भागात सुद्धा आर्थिक विषमता आढळते. ग्रामीण भागातील थोडया लोकांकडे शेतजमिनीचे मोठे क्षेत्र आहे. तर बहुसंख्य लोक सीमांत व कोरडवाहू शेतकरी आहेत. अल्पभूधारक व सीमांत शेतकऱ्यांचे प्रमाण ८० टक्कयांपेक्षा जास्त आहे. थोडया लोकांकडे पुष्कळ गुरे किंवा जनावरे आहेत. भारतातील ग्रामीण भागातील ४० टक्के लोकांच्या मालकीची ५% मालमत्ता आहे. तर ८ लोकांच्याकडे ४६ टक्के मालमत्ता (संपत्ती) आहे. शहरी भागातही आर्थिक विषमता मोठया प्रमाणात आहे. गरीबी आणि श्रीमंती यामध्ये मोठे अंतर असणे याला आर्थिक विषमता असे म्हणतात. ही आर्थिक विषमता भारतात आजही आढळते आणि ती गंभीर स्वरूपाची आहे.

**(९) भांडवलाची कमतरता/ दुर्मिळता :–**

भांडवल आणि आर्थिक विकास या दोघोंचा अत्यंत जवळचा संबंध असतो. भांडवल निर्मितीचा दर जितका जास्त तितका आर्थिक विकासाचा दर जास्त राहतो. परंतु भारतात आजही भांडवलाची कमतरता

किंवा दुर्मिळता जाणवते. भारतात दरडोई भांडवलाची उपलब्धता आणि भांडवल निर्मितीचा दर अत्यंत कमी आहे. भांडवलाची कमतरता ही भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील प्रमुख समस्या आहे. भांडवलाची टंचाई हा भारताच्या आर्थिक विकासाच्या मार्गातील प्रमुख अडथळा आहे. भारतातील बहुसंख्य लोकांचे उत्पन्न अत्यंत कमी आहे. त्यामुळे त्यांची बचत क्षमता कमी आहे. बचतीचा दर कमी असल्याने भांडवल निर्मितीचा दर सुद्धा कमी आहे. अशा प्रकारे विकसित देशांच्या तुलनेत भारतात भांडवल निर्मितीचा दर कमी असल्याने आर्थिक विकासाचा वेगही समाधानकारक नाही. लोकसंख्या वृद्धीच्या दरापेक्षा भांडवल गुंतवणूकीचा दर चौपट असला पाहिजे. त्याशिवाय विकासाचा दर वाढत नाही. म्हणजे लोकसंख्या वृद्धीचा दर वार्षिक २ टक्के असेल तर वार्षिक ८ टक्के गुंतवणूक केली पाहिजे. कच्च्या लोखंडाचे दरडोई उत्पादन आणि उर्जेचा दरडोई उपभोग भारतात कमी आहे. कारण हे दोन निर्देशक भांडवलाची कमतरता दर्शविणारे आहेत. भारतात उर्जेचा दरडोई उपभोग सन २००७ साली ५२९ किलोग्रॅम होता. अमेरिकेचा ७७६६ किलोग्रॅम होता. इंग्लंडमध्ये ३४६४ तर जपानचा ४०१९ किलोग्रॅम होता.

**(१०) मानवी भांडवलाचा निकृष्ट दर्जा :–**

भारतात लोकसंख्या प्रचंड आहे. परंतु लोकसंख्येचा गुणात्मक दर्जा कमी आहे. भारतातील मानवी भांडवलाचा दर्जा चांगला नाही. मानवी भांडवलाचा दर्जा सुमार किंवा निकृष्ट आहे. निरक्षरता, अल्पशिक्षितपणा, शिक्षणावर, आरोग्यावर आणि संशोधनावर कमी खर्च ही मानवी भांडवलाचा दर्जा निकृष्ट असण्याची प्रमुख कारणे आहेत. भारतातील मानवी भांडवलाचा निकृष्ट दर्जा हा भारताच्या आर्थिक विकसातील मोठा अडसर ठरला आहे. भारतातील मनुष्यबळाची कार्यक्षमता आणि उत्पादन क्षमता अत्यंत कमी आहे. कारण यांत्रिक व तांत्रिक शिक्षण, इतर उच्च प्रकारचे शिक्षण, वैद्यकीय व वैज्ञानिक शिक्षण घेणाऱ्यांचे व घेतलेल्यांचे प्रमाण भारतात कमी आहे. सरासरी आयुर्मान, प्रौढ साक्षरतेचे प्रमाण, संयुक्त नोंदणीचे प्रमाण (Combined Enrolment Ratio), दरडोई वास्तव जी.डी.पी. इत्यादी प्रमुख घटक मानवी भांडवलाचा दर्जा निश्चित करतात. सन २०१५ या वर्षात मानव विकासाच्या बाबतीत १८८ देशात नॉर्वे या देशाचा प्रथम क्रमांक होता. ऑस्ट्रेलियाचा दुसरा, स्वित्झर्लंडचा तिसरा, जर्मनीचा चौथा आणि डेन्मार्कचा पाचवा क्रमांक होता. मानव विकासाच्या बाबतीत २०१५ मध्ये चीनचा ९० वा क्रमांक होता. तर भारताचा १३१ वा क्रमांक होता. यावरून मानव विकासाच्या बाबतीत भारत किती मागासलेला आहे, ते स्पष्ट होते. सन २०११ मध्ये मानव विकासाच्या बाबतीत १८७ देशात भारताचा १३४ वा क्रमांक होता.

**(११) निकृष्ट राहणीमान:–**

भारतातील सुमारे ४० टक्केपेक्षा जास्त लोकांचे राहणीमान हे निकृष्ट दर्जाचे आहे. म्हणून भारतीय अर्थव्यवस्था ही विकसनशील अर्थव्यवस्था म्हणून जगात गणली जाते. बहुसंख्य भारतीय लोकांचा आहार चांगला नाही. आहारात प्रोटीन्स, कार्बोहायड्रेटस् आणि व्हिटॅमिन्सचे प्रमाण कमी आहे. विकसित देशांच्या तुलनेत बहुसंख्य भारतीय लोकांच्या आहारात कॅलरीजचे प्रमाण खूपच कमी आहे. भारतात कुपोषित बालकांचे आणि कुपोषित मातांचे प्रमाण जास्त आहे. रेडिओ, टी.व्ही., मोटार सायकल, मोटारी इत्यादी

वस्तू मालकीच्या असणाऱ्या लोकांचे प्रमाण विकसित देशांच्या तुलनेत भारतात खूपच कमी आहे. म्हणून भारत हा अर्धविकसित किंवा विकसनशील देश आहे.

**(१२) लोकसंख्याविषयक वैशिष्ट्ये :-**

भारताच्या लोकसंख्येची अशी काही वैशिष्ट्ये आहेत की ज्यामुळे भारत जगात विकसनशील देश म्हणून गणला जातो. विकसित देशांच्या तुलनेत भारतात लोकसंख्येची घनता जास्त आहे. लोकांचे सरासरी आयुर्मान कमी आहे. ० ते १४ या वयोगटातील मुलांचे प्रमाण. अधिक आहे. बालमृत्यूचे प्रमाण जास्त आहे. लोकसंख्येच्या या वैशिष्ट्यामुळे भारताची अर्थव्यवस्था ही विकसनशील अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. सद्या भारतात लोकसंख्येची घनता ३८२ आहे. अमेरिकेत लोकसंख्येची घनता ३२ आहे. कॅनडाची लोकसंख्येची घनता ०३ आहे. तर ऑस्ट्रेलियाची सुद्धा तेवढीच आहे. भारतात प्रति १००० पुरूषामागे स्त्रियांची संख्या ९४० एवढी आहे. विकसित देशात ती १००० ते ११०० एवढी आहे. भारतात लोकांचे सरासरी आयुर्मान ७० वर्षे आहे. तर विकसित देशात ते ८० वर्षापेक्षा जास्त आहे. भारतीय लोकसंख्येच्या या वैशिष्ट्यावरून भारत हा विकसनशील देश असल्याचे स्पष्ट होते.

**(१३) विकासाला खिळ घालणारी सामाजिक वैशिष्ट्ये :-**

भारतीय समाजाची अशी काही वैशिष्ट्ये आहेत की, जी देशाच्या आर्थिक विकासाला खिळ घालणारी आहेत. या सामाजिक वैशिष्ट्यामुळे विकासात अडथळे निर्माण होतात. उदा. भारतात निरक्षर व अल्पशिक्षित लोकांचे प्रमाण मोठे आहे. (२५ टक्के निरक्षर + २५ टक्के अल्पशिक्षित = ५० टक्के) या लोकांचा राष्ट्राच्या आर्थिक विकासाला फारसा उपयोग होत नाही. पुरूषप्रधान संस्कृती भारतात आढळते. कुटुंबात पुरूषांचे वर्चस्व आढळते. त्यामुळे काही स्त्रियांना प्रगती करता येत नाही. एकूण लोकसंख्येत ५० टक्के स्त्रिया आहेत. परंतु विविध कारणामुळे राष्ट्राच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत त्यांचा वाटा पुरूषांच्या तुलनेत खूपच कमी आहे. भारतात उद्योजकता गुणधर्म असणाऱ्या लोकांचे प्रमाण खूपच कमी आहे बालमजूरांचे प्रमाण मोठे आहे. समाजात अंधश्रद्धा, धर्मांधता, प्रादेशिकता यांचे प्रमाण मोठे आहे. भारतीय समाजाच्या अशा वैशिष्टयामुळे भारत जगात विकसनशील देश ठरतो.

**(१४) प्रादेशिक असमतोल :-**

प्रादेशिक विषमता किंवा प्रादेशिक असमतोल हे सुद्धा भारतीय अर्थव्यवस्थेचे ठळक वैशिष्ट्य आहे. भारतात सद्या सुमारे २९ घटक राज्ये आहेत. परंतु या सर्व राज्यांची सारखी प्रगती झालेली नाही. २९ राज्यापैकी महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, तामिळनाडू, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, राजस्थान या मोजक्या राज्यांचीच बऱ्यापैकी प्रगती झाली आहे. उर्वरित राज्ये मागासलेली आहेत. बिहार आणि ईशान्यपूर्वेकडील राज्ये खूपच मागासलेली आहेत. एवढेच नव्हे तर जी घटक राज्ये पुढारलेली राज्ये म्हणून ओळखली जातात, त्या राज्यातील काही प्रदेश किंवा जिल्हे इतर प्रदेशापेक्षा व जिल्ह्यापेक्षा खूपच मागासलेले आहेत. उदाहरणार्थ आपल्या महाराष्ट्र राज्यात पश्चिम महाराष्ट्राची जेवढी प्रगती झालेली आहे, तेवढी कोकण,

मराठवाडा आणि विदर्भाची झालेली नाही. म्हणून प्रादेशिक असमतोल हे भारतीय अर्थव्यवस्थेचे ठळक वैशिष्ट्य मानले जाते.

### १.२.३ उदयोन्मुख भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये

### (Features of the Indian Economy as an Emerging Economy)

मागच्या दशकापासून भारतीय अर्थव्यवस्थेचा वेगाने विकास होत आहे. स्थूल देशाांतर्गत उत्पादन (GDP), आर्थिक वृद्धीचा दर, कृषी व औद्योगिक उत्पादकता, पायाभूत सुविधा, बचत आणि गुंतवणूक यात वेगाने वाढ होत आहे. जागतिक अर्थव्यवस्थेत भारताने चांगले स्थान मिळवले आहे. अर्थव्यवस्था दिवसेंदिवस मजबूत होत आहे. संपूर्ण जगात वेगाने विकास होत असलेली अर्थव्यवस्था म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेकडे पाहिजे जाते. भारताची आर्थिक वाढ वेगाने होत असल्याने भरतीय अर्थव्यवस्थेला उदयोन्मुख भारतीय अर्थव्यवस्था असे म्हणतात. अशा उदयोन्मुख भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्टये थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत.

**(१) स्थूल देशांतर्गत उत्पादनात (GDP** मध्ये**)** मोठी वाढ

भारतीय अर्थव्यवस्थेला वेगाने विकास पावणारी अर्थव्यवस्था किंवा उदयोन्मुख अर्थव्यवस्था असे म्हणतात. याचे कारण मागच्या काही वर्षापासून दरवर्षी सातत्याने भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात म्हणजेच स्थूल देशांतर्गत उत्पादनात (Gross Domestic Production) वेगाने व मोठी वाढ होत आहे. स्थूल देशांतर्गत उत्पादन (GDP) ही राष्ट्रीय उत्पन्नची महत्त्वाची संकल्पना आहे. यावरून राष्ट्राच्या आर्थिक स्थितीची/ आर्थिक विकासाची कल्पना येते. कृषी, उद्योग, वाहतूक, दळणवळण या क्षेत्रांचा वेगाने विकास होत असल्याने भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनात म्हणजेच राष्ट्रीय उत्पन्नात मोठी वाढ घडून आली आहे. स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या बाबतीत सन २०१६ मध्ये भारताचा जगात सातवा क्रमांक होता. अमेरिकेचा पहिला क्रमांक होता. चीनचा दुसरा, जपानचा तिसरा, जर्मनीचा चौथा, इंग्लंडचा पाचवा, फ्रान्सचा सहावा क्रमांक होता. GDP बाबतीत सध्या जगात भारताचा पाचवा क्रमांक आहे. अशा प्रकारे राष्ट्रीय उत्पन्नाच्या बाबतीत भारताचा जगात पहिल्या दहा देशात क्रमांक लागतो म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेला उदयोन्मुख अर्थव्यवस्था असे म्हणतात. अशाच वेगाने भारत जर प्रगती करत राहिला तर आणखी काही वर्षांनी राष्ट्रीय उत्पन्नाच्या बाबतीत भारत अमेरिकेला सुद्धा मागे टाकू शकेल.

**(२) कृषी क्षेत्राचा वेगाने विकास :–**

भारतातील कृषीक्षेत्र हे देशाच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे क्षेत्र आहे. देशातील बहुसंख्य लोकांचे उपजीविकेचे आणि रोजगाराचे शेती हे महत्वाचे साधन आहे. अलीकडच्या काही वर्षापासून भारतीय कृषी क्षेत्रात मोठे बदल होत आहेत. शेतीच्या उत्पादनात आणि उत्पादकतेत वाढ घडून आली आहे. आधुनिक शेतीकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे. शेतीचे यांत्रिकीकरण घडून येत आहे. सिंचन सुविधेत, संकरित बियाणांच्या वापरात वाढ होत आहे. अन्नधान्य, डाळी, तेलबिया, व्यापारी पिके यांच्या

उत्पादनात लक्षणीय वाढ झाली आहे. अन्नधान्य, फुले, फळे यांची निर्यात दिवसेंदिवस वाढत आहे. म्हणून कृषी क्षेत्राचा वेगाने होत असलेला विकास हे उदयोन्मुख भारतीय अर्थव्यवस्थेचे ठळक वैशिष्ट्य मानले जाते. सन १९६६ सालीच भारत कृषी क्षेत्रात आत्मनिर्भर किंवा स्वावलंबी झाला आहे. काही शेती उत्पादनांच्या बाबतीत भारताचा जगात पहिला, दुसरा, तिसरा असा क्रमांक आहे. कृषी मालाच्या निर्यातीत भारताचा जगात सातवा क्रमांक आहे. भारतात गहू, तांदूळ, बटाटे, चहा, कॉफी मसाल्याचे पदार्थ यांचे उत्पादन मोठया प्रमाणात होते.

**(३) औद्योगिक क्षेत्राचा मोठा विकास**

अलीकडच्या काही दशकात भारताच्या उद्योग क्षेत्राची सुदधा मोठी प्रमाणात प्रगती घडून आली आहे. दूरसंचार उद्योगाने मोठी प्रगती केली आहे. भारतातील दूरसंचार उद्योग वेगाने वाढत आहे. त्याने याबाबतीत अमेरिकेलाही मागे टाकले आहे. चीनच्या खालोखाल भारत या क्षेत्रात आघाडीवर आहे. भारतातील ऑटोमोटिव्ह उद्योगही जगातील दुसऱ्या क्रमांचा उद्योग असून हाही उद्योग वेगाने वाढत आहे. फार्मास्युटिकल उद्योग, बायोटेक्नॉलॉजी उद्योग, संगणक उद्योग, अन्नप्रक्रिया उद्योग, बांधकाम उद्योग, स्टील उद्योग, सिमेंट उद्योग, वस्त्रोद्योग, पर्यटन उद्योग, वीज उपकरणे, वाहतूक उपकरणे तयार करणारा उद्योग, जहाज बांधणी, पेट्रोलियम उद्योग या उद्योगांची झपाट्याने वाढ होत आहे. औद्योगिक क्षेत्रातील उत्पादन, उत्पादकता, निर्यात मोठया प्रमाणात वाढत आहे. उपभोग्य वस्तू, भांडवली वस्तू निर्माण करणाऱ्या उद्योगांची वेगाने प्रगती होत आहे. भारतात औद्योगिक क्षेत्राची सुदधा वेगाने प्रगती होत असल्याने भारतीय अर्थव्यवस्थेला उदयोन्मुख अर्थव्यवस्था असे म्हणतात.

**(४) माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा वेगाने विकास :–**

अलीकडच्या काही वर्षात भारतातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा वेगाने विकास झाला आहे. विद्यार्थी, संशोधक, व्यापारी, उद्योजक, शेतकरी या सर्वांना माहिती तंत्रज्ञान उद्योगाचे लाभ होतात. देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय माहिती मिळवण्यासाठी, स्पर्धेत टिकून राहण्यासाठी माहिती तंत्रज्ञान क्षेत्र उपयुक्त मानले जाते. डेस्क टॉप, लॅपटॉप, मिनी कॉम्प्यूटर, मेन फ्रेम कॉम्प्यूटर, महासंगणक, सॉफ्टवेअर, हार्डवेअर, नेटवर्क, इंटरनेट ही माहिती तंत्रज्ञानाची साधने आहेत. या साधनांच्या उत्पादनात आणि वापरात भारताने जगात अव्वल स्थान पटकावले आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा भारतात दिवसेंदिवस वेगाने विकास होत आहे. संगणक, महासंगणक यांची निर्यातही वेगाने वाढत आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा वेगाने विकास होत असल्याने त्याचा कृषी, उद्योग, व्यापार, वाहतूक, शिक्षण अशा सर्व क्षेत्रांना मोठा लाभ होत आहे. माहिती तंत्रज्ञान उद्योगाच्या वेगवान प्रगतीमुळे आर्थिक विकासाचा वृद्धीचा दरही वाढत आहे. अशा प्रकारे भारतात माहिती तंत्रज्ञान क्षेत्राची झपाटयाने प्रगती होत असल्याने भारतीय अर्थव्यवस्थेला जलद वेगाने विकास साधणारी अर्थव्यवस्था किंवा उदयोन्मुख अर्थव्यवस्था असे संबोधले जाते.

**(५) वाहतूक क्षेत्राची लक्षणीय प्रगती :–**

भारतात अलीकडच्या काही वर्षात वाहतूक क्षेत्रही वेगाने प्रगती करू लागले आहे. देशाचा आर्थिक विकास वाहतूक क्षेत्राच्या प्रगतीवरही अवलंबून असतो. रस्ते वाहतूक क्षेत्राची भारतात झपाट्याने प्रगती होत आहे. संपूर्ण देशभर रस्त्यांचे जाळे विणले जात आहे. रस्ते आणि पूल यांचे बांधकाम देशभर चालू आहे. महाराष्ट्रातील नागपूर ते मुंबई हा रस्ते महामार्ग आंतरराष्ट्रीय दर्जाचा बनवण्यात आला आहे. अशा प्रकारचे अनेक महामार्ग देशात साकारत आहेत. हे महामार्ग जागतिक दर्जाचे असून त्यामुळे वाहतूक सुलभ झाली आहे. त्याचा फायदा जास्त करून उद्योग क्षेत्राला होत आहे. तसेच पर्यटन उद्योगही त्यामुळे वाढीस लागला आहे. रस्ते वाहतूकीखालोखाल रेल्वे वाहतूक, जल वाहतूक, हवाई वाहतूक क्षेत्राचीही प्रगती घडून येत आहे. त्याचा फायदा संपूर्ण अर्थव्यवस्थेला होत आहे. अशा प्रकारे अलीकडच्या काही वर्षापासून भारतात वाहतूक व्यवसायाची वाढ मोठया प्रमाणात होत असल्याने भारतीय अर्थव्यवस्थेला उदयोन्मुख अर्थव्यवस्था असे म्हणतात.

**(६) विदेशी व्यापारात वाढ :–**

भारताच्या विदेशी व्यापारात (आयात व निर्यात यामध्ये) लक्षणीय वाढ झाली आहे. स्थूल देशांतर्गत उत्पादनात (GDP मध्ये) विदेशी व्यापाराचा वाटा ६ टक्क्यावरून २४ टक्यापर्यंत वाढला आहे. दागिणे, कापड, वस्तू, स्फॉटवेअर, रसायने, अभियांत्रिकी वस्तू इत्यादींची भारतातून मोठया प्रमाणात निर्यात केली जाते. निर्यातीच्या बाबतीत भारताचा जगात दहावा क्रमांक आहे. अशा प्रकारे भारताचा विदेशी व्यापार ही दिवसेंदिवस वाढत असल्याने भारतीय अर्थव्यवस्थेला उदयोन्मुख अर्थव्यवस्था असे म्हणतात.

**(७) तांत्रिक प्रगतीत वाढ :–**

भारताची अर्थव्यवस्था वेगाने विकास पावत आहे त्याचे आणखी एक कारण म्हणजे देशात तांत्रिक प्रगती वेगाने घडून येत आहे. कृषी, उद्योग, व्यापार या सर्व क्षेत्रांचा विकास तांत्रिक प्रगतीवर अवलंबून असतो. भारतात अलीकडच्या काही वर्षात तांत्रिक ज्ञानात, अद्यावत तंत्रज्ञानाच्या वापरात फार मोठी वाढ घडून आली आहे. कृषी क्षेत्रात ट्रॅक्टर सारख्या साधनांचा वापर मोठया प्रमाणात वाढला आहे. शेतीचे यांत्रिकीकरण, आधुनिकीकरण यास सरकारने मोठी चालना दिली आहे. पॉली हाऊस, ग्रीन हाऊस उभारणीस सरकार शेतकऱ्यांना प्रोत्साहन देत आहे. कारखानदारी, बांधकाम क्षेत्रात सुद्धा अत्याधुनिक यंत्रे व तंत्रज्ञान वापरले जात आहे. अशा प्रकारे भारतात तांत्रिक ज्ञानाची पातळी दिवसेंदिवस उंचावत असल्याने भारताला वेगाने विकास करणे शक्य झाले आहे. म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेला उदयोन्मुख अर्थव्यवस्था म्हणतात.

**(८) उच्च शिक्षणात आघाडीवर :–**

भारताने उच्च शिक्षणातही मोठी प्रगती केली आहे. कृषीविषयक शिक्षण देणारी कृषी विद्यापीठे, कृषी महाविद्यालये, शेतकी शाळा सरकारने देशभर सुरू केली असून त्याचा लाभ लाखो शेतकरी कुटुंबातील मुले मुली घेत आहेत. तांत्रिक विद्यापीठ, इंजिनिअरिंग कॉलेजिसही सरकारने आणि खाजगी क्षेत्राने देशभर

उघडली आहेत. वैद्यकीय शिक्षण देणारी विद्यापीठ, महाविद्यालयेही सुरू करण्यात आली आहेत. जगातील ११० देशातील विद्यार्थी शिक्षणासाठी सदया भारतात आली असून भारतात शिक्षणासाठी येणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांच्या संख्येत दिवसेंदिवस मोठी वाढ होत आहे.

**(९) राष्ट्रीय उत्पन्नातील सेवा क्षेत्राचा वाढता हिस्सा :–**

भारतीय अर्थव्यवस्थेत/राष्ट्रीय उत्पन्नात सेवा क्षेत्राचा हिस्सा दिवसेंदिवस वाढत आहे. स्थूल देशांतर्गत उत्पादनात सेवा क्षेत्राचा वाटा वाढणे ही बाब देश झपाट्याने विकास करत आहे हे स्पष्ट करते. आर्थिक, सामाजिक, संस्थात्मक अशा सर्व क्षेत्रांची झपाटयाने प्रगती होत आहे. सन १९५०–५१ मध्ये तृतीय क्षेत्राचा भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा २९.६० टक्के होता. तो २०११–१२ मध्ये ५८.९० टक्क्यापर्यंत वाढला. अशा प्रकारे भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नातील सेवा क्षेत्राचा वाटा दिवसेंदिवस वाढत असल्याने भारतीय अर्थव्यवस्थेला वेगाने विकास साधणारी अर्थव्यवस्था किंवा उदयोन्मुख अर्थव्यवस्था असे म्हणतात.

**(१०) बचत आणि भांडवलनिर्मितीच्या दरात वाढ**

भारतात दरडोई उत्पन्न वाढत आहे. त्यामुळे देशांतर्गत बचत आणि भांडवल निर्मितीच्या दरातही वाढ घडून येत आहे. देशाचा आर्थिक विकास हा भांडवलनिर्मितीच्या दरावर आणि वेगावर अवलंबून असतो. भांडवल निर्मितीचा दर जितका जास्त असतो तितका आर्थिक विकासाच्या वृद्धीचा दर जास्त असतो. म्हणून सरकारने भांडवलनिर्मितीचा दर वाढेल याकडे विशेष लक्ष दिले. बचत आणि भांडवल निर्मितीचा दर वाढल्याने भारतात भांडवल गुंतवणूकही वाढली. कारण भांडवल गुंतवणूक ही भांडवल निर्मितीच्या दरावर अवलंबून असते. अशा प्रकारे अलीकडच्या काळात भारतात बचत, भांडवल निर्मिती आणि भांडवल गुंतवणूक वेगाने वाढत असल्याने विकासाच्या दिशेने वेगाने वाटचाल करणे भारताला शक्य होत आहे.

**(११) तरूणांच्या संख्येत वाढ :–**

उदयोन्मुख भारतीय अर्थव्यवस्थेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे भारतात तरूणांची संख्या प्रचंड आहे. भारतात जरी अतिरिक्त लोकसंख्या असली तरी तरूणांची संख्या प्रचंड असल्याने अर्थव्यवस्थेचा वेगाने विकास करून घेण्यासाठी देशाला या युवाशक्तीचा मोठा लाभ होणार आहे. तरूणांच्या लोकसंख्येला उत्पादक लोकसंख्या (Production Population) किंवा कर्ती लोकसंख्या (Working Population) असे म्हणतात. विकसित देशापेक्षा भारतात ही उत्पादक लोकसंख्या कितीतरी प्रचंड आहे. या लोकसंख्येचा, त्यांच्या श्रमाचा, गुणवोचा, बुद्धीमत्तेचा उपयोग करून विकासाचा वेग वाढवण्याची फार मोठी संधी भारताला प्राप्त झाली आहे. या तरूणांच्या लोकसंख्येचा योग्य उपयोग केला तर नजिकच्या काही वर्षातच भारत जगात महासत्ता म्हणून उदयास येऊ शकेल.

**(१२) नाणेबाजार आणि भांडवल बाजाराचा वेगाने विकास**

भारतात नाणेबाजार आणि भांडवल बाजाराचा वेगाने विकास घडून येत आहे. अलीकडच्या काळात खाजगी बँकांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. खाजगी, सरकारी बँकांच्या संख्येत, शाखांच्या

संख्येत, कर्जव्यवहारात प्रचंड वाढ झाली आहे. बँकाकडून देण्यात येणाऱ्या क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, ए.टी.एम सुविधेत मोठी वाढ झाली आहे. विकसित देशाप्रमाणे भारतातही अनेक बँकांनी ग्राहकांना Online Banking किंवा Mobile Banking सुविधा पुरवण्यास सुरवात केली आहे. उद्योगासाठी जे भांडवल लागते त्याची उभारणी भांडवल बाजारातून केली जाते. नाणेबाजाराप्रमाणे (बँकिंग क्षेत्राप्रमाणे) भांडवल बाजाराचीही मोठी प्रगती घडून आली आहे. विकसित देशातील विकसित भांडवल बाजाराची सर्व वैशिष्टये भारतीय भांडवल बाजारात दिसून येतात. भांडवल बाजारातील शेअर्स आणि कर्जरोख्यांचे व्यवहार प्रचंड वाढले आहेत. भारतातील शेअर बाजार हे इंग्लंड व अमेरिकेच्या शेअर बाजाराशी जोडले गेले आहेत.

**(१३) नवोन्मेषात वाढ :–**

साहसी संयोजकांना, नवीन संशोधनाचा वापर करून उत्पादन करणाऱ्यांना नवप्रवर्तक असे म्हणतात. उत्पादनाची नवीन पद्धत शोधून काढणे, नवीन वस्तू तयार करून बाजारात विक्रीसाठी आणणे, नवीन बाजारपेठ शोधून काढणे, वस्तूमध्ये बदल करून वस्तू विकणे याला नवप्रवर्तन असे म्हणतात. असे नवप्रवर्तन आणि नवप्रवर्तक भारतात खूपच कमी होते. परंतु अलीकडच्या काही वर्षात भारतातील नवप्रवर्तकांच्या संख्येत आणि त्यांच्या नवप्रवर्तनात (नवोन्मेषात) खूप चांगली वाढ घडून आली आहे. तांत्रिक आणि व्यवस्थापकीय शिक्षण देणाऱ्या शिक्षणसंस्थांची, विद्यापीठांची, संशोधन केंद्राची संख्या भारतात मोठया प्रमाणात वाढल्याने नवप्रवर्तकांची संख्याही वाढली आहे. उत्पादनात, वितरणात नवोन्मेष वाढल्याने विकासाचा वेग वाढण्यास मदत झाली आहे. भारतात आय.आय.टी सारख्या संस्था हया आंतरराष्ट्रीय दर्जाच्या आहेत. त्यामुळे अनेक चांगले उद्योजक, संयोजक, नवप्रवर्तक, व्यवस्थापन शास्त्रज्ञ भारतात तयार होत आहेत. म्हणून वाढती उपक्रमशीलता हा घटक भारताचा वेगाने विकास घडवून आणण्यात महत्वाची भूमिका बजावत आहे.

**१.२.४ भारताचे राष्ट्रीय उत्पन्न (National Income of India)**

**प्रास्ताविक :–**

एका वर्षात देशात तयार झालेल्या वस्तू आणि सेवा यांची पैशातील किंमत म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय. प्रा. डॉ. आलफ्रेड मार्शल यांनी राष्ट्रीय उत्पन्नाची व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

''देशात असणाऱ्या श्रम आणि भांडवल या घटकांच्या साहाय्याने नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर करून तयार झालेल्या मूर्त आणि अमूर्त वस्तू व सेवांचे निव्वळ उत्पादन म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय.''

सन १९५१ च्या भारताच्या राष्ट्रीय उत्पन्न समितीने राष्ट्रीय उत्पन्नाची व्याख्या खालीलप्रमाणे दिली आहे.

''एका वर्षाच्या काळात दुहेरी मोजणी टाळून देशात उत्पादित झालेल्या वस्तू व सेवा यांचे केलेले मापन म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय.''

**राष्ट्रीय उत्पन्नाच्या संकल्पना :–**

राष्ट्रीय उत्पन्नाच्या विविध संकल्पना आहेत. या संकल्पनांचे थोडक्यात स्पष्टीकरण खालीलप्रमाणे दिले आहे.

**(१) स्थूल राष्ट्रीय उत्पादन (Gross National Product – GNP) :-**

स्थूल राष्ट्रीय उत्पादनालाच एकूण राष्ट्रीय उत्पादन असेही म्हणतात. स्थूल राष्ट्रीय उत्पादनाची व्याख्या खालीलप्रमाणे दिली आहे.

''देशात एका वर्षाच्या कालावधीत तयार झालेल्या अंतिम वस्तू आणि सेवा यांची पैशातील किंमत म्हणजे स्थूल राष्ट्रीय उत्पादन होय.''

**(२) निव्वळ राष्ट्रीय उत्पादन (Net National Product – NNP) :-**

निव्वळ राष्ट्रीय उत्पादन या संकल्पनेची व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

''देशात एका वर्षाच्या कालावधीत सर्व अंतिम वस्तू व सेवांच्या पैशाच्या मूल्यातून झीज खर्च किंवा घसारा वजा केल्यानंतर जे उत्पन्न मिळते, त्यास निव्वळ राष्ट्रीय उत्पादन (राष्ट्रीय उत्पन्न) असे म्हणतात.''

**(३) स्थूल राष्ट्रीय उत्पन्न (GNI) :-**

स्थूल राष्ट्रीय उत्पादनामधून (GNP मधून) अप्रत्यक्ष कराची रक्कम वजा केल्यानंतर जे उत्पन्न शिल्लक राहते, त्यास स्थूल राष्ट्रीय उत्पन्न (GNI) असे म्हणतात.

**(४) घटक खर्चानुसार राष्ट्रीय उत्पन्न (राष्ट्रीय उत्पन्न) (National Income at factor cost / National Income) :-**

''उत्पादन घटकांना मिळणाऱ्या मोबदल्यांची बेरीज म्हणजे घटक खर्चानुसार राष्ट्रीय उत्पन्न होय.'' घटक खर्चानुसार राष्ट्रीय उत्पन्न काढताना बदली उत्पन्न (पेन्शन, बेकार भत्ता इत्यादी) वजा केले जाते.

**(५) चालू किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न (National Income at current Prices) :-**

''देशात एका वर्षात तयार झालेल्या वस्तू व सेवांचे मूल्य त्या वर्षीच्या किंमतीनुसार (बाजारभावाने) जेंव्हा मोजले जाते, तेंव्हा त्यास चालू किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न असे म्हणतात.''

**(६) स्थिर किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न (National Income at constant Prices) :-**

एक आधारभूत वर्ष निवडून त्या वर्षातील किंमतींचा विचार करून जेंव्हा इतर वर्षातील राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन केले जाते, तेंव्हा त्यास स्थिर किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न असे म्हणतात.

**(७) व्यक्तिगत उत्पन्न (Personal Income – PI ) :-**

व्यक्तिगत उत्पन्नाची व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

''एका वर्षाच्या काळात देशातील व्यक्तींना पैशाच्या स्वरूपात मिळालेले उत्पन्न म्हणजे व्यक्तिगत उत्पन्न होय.''

**(८) खर्चयोग्य उत्पन्न/खर्च शक्य (व्ययशक्य उत्पन्न) (Disposable Income) :-**

वैयक्तिक उत्पन्नातून प्रत्यक्ष कराची रक्कम वजा केल्यानंतर जे उत्पन्न शिल्लक राहते, त्यास खर्चशक्य उत्पन्न असे म्हणतात.

**(९) दरडोई उत्पन्न (Per capito income) :-**

राष्ट्रीय उत्पन्नाला देशाच्या लोकसंख्येने भागले असता दरडोई उत्पन्न प्राप्त होते. चालू किंमतीनुसार आणि स्थिर किंमतीनुसार दरडोई उत्पन्न काढता येते.

**भारताचे राष्ट्रीय उत्पन्न :–**

भारतात सर्वप्रथम दादाभाई नौरोजी यांनी १८६८ मध्ये स्वातंत्र्यपूर्वकाळात राष्ट्रीय उत्पन्नाची मोजणी केली. खालील तक्ता क्रमांक १ मध्ये स्वातंत्र्यपूर्वकाळातील भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक १ स्वातंत्र्यपूर्वकाळातील भारताचे राष्ट्रीय उत्पन्न**

| अ. क्र. | अभ्यासक | वर्ष | राष्ट्रीय उत्पन्न (कोटी रुपये) |
|---|---|---|---|
| १ | दादाभाई नौरोजी | १८६८ | ३४० |
| २ | एफ. जे. एटकिनसन् | १८७५ | ५७४ |
| ३ | बारिंग व बारबोर | १८८२ | ५२५ |
| ४ | लॉर्ड कर्झन | १८९७–९८ | ६७५ |
| ५ | विल्यम डिगबी | १८९९ | ३९० |
| ६ | फिन्डले शिराज | १९११ | १९४२ |
| ७ | वाडिया व जोशी | १९१३–१४ | १०८७ |
| ८ | शहा व खंबाटा | १९२१–२२ | २३६४ |
| ९ | व्ही. के. आर. व्ही. राव | १९३१–३२ | १६८९ |
| १० | ईस्टर्न इकॉनॉमिस्ट | १९३९–४० | १९३४ |
| ११ | कॉमर्स (डिसेंबर १९४२) | १९४२–४३ | ४२६५ |
| १२ | वाणिज्य मंत्रालय | १९४६–४७ | ५५८० |

स्त्रोत : कायंदे पाटील गंगाधर वि. भारतीय आणि जगतिक आर्थिक विकास, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक, जून २००१, पृ. क्र. ७८

वरील तक्ता क्रमांक १ मध्ये स्वातंत्र्यपूर्वकाळातील भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाची माहिती दिली आहे. सन १८६८ ते १९४६–४७ या कालावधीतील राष्ट्रीय उत्पन्नाची माहिती या तक्त्यात दिली आहे. तसेच या राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करणाऱ्या अभ्यासकांची माहिती सुद्धा या तक्त्यात दिली आहे. वरील तक्त्यावरून असे दिसते की, सन १८६८ मध्ये भारताचे राष्ट्रीय उत्पन्न ३४० कोटी रुपये एवढे होते. या उत्पन्नाचे मापन

दादाभाई नौरोजी यांनी केले होते. सन १९४६-४७ मध्ये भारताचे राष्ट्रीय उत्पन्न ५५८० कोटी रूपये होते. वाणिज्य मंत्रालयाने या राष्ट्रीय उत्पन्नाची मोजणी केली होती. स्वातंत्र्यपूर्व काळात भारताचे राष्ट्रीय उत्पन्न खूपच कमी होते. कारण देश खूपच मागासलेला होता आणि देशावर सन १६०० पासून १९४७ पर्यंत ब्रिटिशांची सत्ता होती.

**स्वातंत्र्योत्तर काळातील भारताचे राष्ट्रीय उत्पन्न**

खालील तक्ता क्रमांक २ मध्ये स्वातंत्र्योत्तर काळातील भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक २ – घटक खर्चानुसार निव्वळ राष्ट्रीय उत्पादन (राष्ट्रीय उत्पन्न)**

(१९५०-५१ ते २००९-१०) ( Net National Product at Factor cost i.e. National Income – 1950 - 51 to 2009-10 )

| अ. क्र | वर्ष | घटक खर्चानुसार निव्वळ राष्ट्रीय उत्पादन (राष्ट्रीय उत्पन्न) | |
|---|---|---|---|
| | | चालू किंमतीनुसार (को. रू) | २००४-०५च्या किंमतीनुसार (को. रू) |
| १ | १९५०-५१ | ९५२३ | २१९७७९ |
| २ | १९६०-६१ | १५७७४ | ३१४०५६ |
| ३ | १९७०-७१ | ४०००४ | ४३७५३० |
| ४ | १९८०-८१ | १२०९२८ | ५८३२५६ |
| ५ | १९९०-९१ | ४५४१२१ | ९६३६१५ |
| ६ | २०००-०१ | १७००४६७ | १६४७९०३ |
| ७ | २००४-०५ | २६२९११८ | २६२९११८ |
| ८ | २००५-०६ | २९९९७९२ | २८७८४१० |
| ९ | २००६-०७ | ३५००३९६ | ३१५०९०४ |
| १० | २००७-०८ | ४०७६३५२ | ३४५४२६४ |
| ११ | २००८-०९ | ४६८५८७३ | ३६६९९८० |
| १२ | २००९-१० | ५४३९५५७ | ३९४६५४० |

स्रोत : Puri V. K and Misra S. K., Indian Economy, Himalaya Publishing House. 2011, Page No 192.

वरील तक्ता क्रमांक २ वरून असे दिसते की, स्वातंत्र्योत्तर काळात भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात मोठी वाढ घडून आली आहे. सन १९५१ पासून नियोजनाच्या (पंचवार्षिक योजनांच्या) माध्यमातून भारत सरकारने आर्थिक विकासाचा कार्यक्रम गतीने राबवला. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात मोठी वाढ घडून आली. सन १९५०-५१ मध्ये २००४-०५ च्या किंमतीनुसार भारताचे राष्ट्रीय

उत्पन्न २१९७७९ को. रू. होते. २००४-०५ मध्ये (२००४-०५ च्या किंमतीनुसार) भारताचे राष्ट्रीय उत्पन्न ३९,४६,५४० कोटी रूपये एवढे होते.

**चालू किंमतीनुसार स्थूल देशांतर्गत उत्पादन (Gross Demestic Product GDP in current Prices from 2010 to 2028 in billion U. S. Dollars)**

खालील तक्त क्रमांक ३ मध्ये सन २०१० ते २०२८ या काळातील भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाची माहिती बिलियन डॉलर्समध्ये दर्शवली आहे.

**तक्ता क्रमांक ३ चालू किंमतीनुसार स्थूल देशांतर्गत उत्पादन**

| अ.क्र. | वर्ष | चालू किंमतीनुसार स्थूल देशांतर्गत उत्पादन (In billion U. S. dollars) |
|---|---|---|
| १ | २०१० | १७०८.४६ |
| २ | २०११ | १८२३.०५ |
| ३ | २०१२ | १८२७.६४ |
| ४ | २०१३ | १८५६.७२ |
| ५ | २०१४ | २०३९.१३ |
| ६ | २०१५ | २१०३.५९ |
| ७ | २०१६ | २२९४.८ |
| ८ | २०१७ | २६५१.४७ |
| ९ | २०१८ | २७०२.९३ |
| १० | २०१९ | २८३५.६१ |
| ११ | २००० | २६७१.६ |
| १२ | २०२१ | ३१५०.३१ |
| १३ | २०२२ | ३३८९.६९ |
| १४ | २०२३ | ३७३२.२२ |
| १५ | २०२४ | ४१०५.३८ |
| १६ | २०२५ | ४५११.८५ |
| १७ | २०२६ | ४९५१.६२ |
| १८ | २०२७ | ५४२७.३९ |
| १९ | २०२८ | ५९४४.३८ |

स्रोत : www.stasta.com

वरील तक्ता क्रमांक ३ वरून असे दिसते की, सन २०१० पासून भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात प्रचंड वाढ झाली आहे. सन २०१० मध्ये भारताचे राष्ट्रीय उत्पन्न १७०८.४६ बिलियन डॉलर्स होते. ते सन २०२३ मध्ये ३७३२.२२ बिलियन डॉलर्स एवढे झाले. सन २०२८ साली ते ५९४४.३८ बिलियन डॉलर्स पर्यंत पोहचेल असा अंदाज आहे.

**स्थूल देशांतर्गत उत्पादन ( GDP नुसार ) जगातील १० मोठ्या अर्थव्यवस्था**

**( Top 10 Largest Economies in the World/ richest countries in the world in 2024, sourced from IMF data (as of April 30,2024)**

खालील तक्ता क्रमांक ४ मध्ये GDP नुसार जगातील १० मोठ्या देशांची नावे आणि त्यांचे राष्ट्रीय उत्पन्न दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक ४ – स्थूल देशांतर्गत उत्पादन (GDP नुसार) १० देशांचे राष्ट्रीय उत्पन्न**

| देशाचे नाव | GDP नुसार क्रमवारी (Rank) | स्थूल देशांतर्गत उत्पादन GDP (USD billion) |
|---|---|---|
| अमेरिका | १ | २८७८३ |
| चीन | २ | १८५३६ |
| जर्मनी | ३ | ४७३० |
| जपान | ४ | ४११२ |
| भारत | ५ | ३९४२ |
| इंग्लंड | ६ | ३५०२ |
| फ्रान्स | ७ | ३१३२ |
| ब्राझील | ८ | २३३३ |
| इटली | ९ | २३३२ |
| कॅनडा | १० | २२४२ |

(Source – www.forbesindia.com)

वरील तक्ता क्रमांक ४ वरून असे दिसते की, जगात सर्वात जास्त स्थूल देशांतर्गत उत्पादन (GDP – राष्ट्रीय उत्पन्न) अमेरिका या देशाचे आहे. अमेरिकेचे स्थूल देशांतर्गत उत्पादन २८७८३ अमेरिकन बिलियन डॉलर्स एवढे आहे. GDP च्या बाबतीत जगात अमेरिका प्रथम स्थानावर आहे. GDP च्या बाबतीत जगात चीनचा दुसरा, जर्मनीचा तिसरा, जपानचा चवथा, भारताचा पाचवा, इंग्लंडचा सहावा, फ्रान्सचा सातवा, ब्राझीलचा आठवा, इटलीचा नववा, कॅनडाचा दहावा क्रमांक लागतो. भारताचे राष्ट्रीय उत्पन्न (स्थूल देशांतर्गत उत्पादन - GDP) ३९४२ अमेरिकन बिलियन डॉलर्स एवढे आहे. GDP च्या बाबतीत भारताचा

जगात पाचवा क्रमांक लागतो. इंग्लंड, फ्रान्स, ब्राझील, इटली आणि कॅनडा या देशापेक्षा भारताचे राष्ट्रीय उत्पन्न जास्त आहे.

**GDP च्या बाबतीत जगात ११ ते २० क्रमांकावर असणारी राष्ट्रे**

खालील तक्ता क्रमांक ५ मध्ये GDP च्या बाबतीत (राष्ट्रीय उत्पन्नाच्या बाबतीत) जगात ११ ते २० क्रमांकावर असणाऱ्या राष्ट्रांची नावे आणि त्यांचे राष्ट्रीय उत्पन्न (GDP) बिलियन डॉलर्समध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक ५ – GDP च्या बाबतीत जगात ११ ते २० क्रमांकावर असणारी राष्ट्रे**

| देशाचे नाव | GDP नुसार क्रमवारी (Rank) | स्थूल देशांतर्गत उत्पादन GDP (USD billion) |
|---|---|---|
| रशिया | ११ | २०६२ |
| मेक्सिको | १२ | २०२१ |
| ऑस्ट्रेलिया | १३ | १७९० |
| दक्षिण कोरिया | १४ | १७६० |
| स्पेन | १५ | १६५२ |
| इंडोनेशिया | १६ | १४८४ |
| नेदरलँण्डस | १७ | ११४२ |
| तुर्की | १८ | १११३ |
| सौदी अरेबिया | १९ | १११२ |
| स्वित्झर्लंण्ड | २० | ९३८.४६ |

(Source : www.forbesindia.com)

वरील तक्ता क्रमांक पाच वरून असे दिसते की, GDP च्या बाबतीत रशियाचा जगात ११ वा क्रमांक लागतो. रशियाचे स्थूल देशांतर्गत उत्पादन (राष्ट्रीय उत्पन्न) २०६२ बिलियन डॉलर्स एवढे आहे. GDP च्या बाबतीत रशियाच्या खालोखाल मेक्सिको (१२), ऑस्ट्रेलिया (१३), दक्षिण कोरिया (१४), स्पेन (१५), इंडोनेशिया (१६), नेदरलॅण्डस (१७), तुर्की (१८), सौदी अरेबिया (१९) आणि स्वित्झर्लंण्ड (२०) या देशांचा क्रम लागतो. या सर्व देशापेक्षा भारताचे राष्ट्रीय उत्पन्न जास्त आहे.

**भारताच्या आर्थिक विकासाच्या वाढीचा दर (India's GDP Growth Rate)**

खालील तक्ता क्रमांक सहामध्ये गेल्या दहा वर्षातील भारताच्या आर्थिक विकासाच्या वाढीचा दर दर्शविला आहे.

**तक्ता क्रमांक ६ – भारताच्या आर्थिक विकासाच्या वाढीचा दर (GDP Growth Rate)**

| वर्ष | जी. डी. पी. वृद्धी दर (%) | वार्षिक बदल (%) |
|---|---|---|
| २०१३ | ६.३९ | ०.९३ |
| २०१४ | ७.४१ | १.०२ |
| २०१५ | ८.०० | ०.५९ |
| २०१६ | ८.२६ | ०.२६ |
| २०१७ | ६.८० | -१.४६ |
| २०१८ | ६.४५ | -०.३४ |
| २०१९ | ३.७४ | -२.७२ |
| २०२० | - ६.६० | -१०.३३ |
| २०२१ | ८.६८ | १५.२८ |
| २०२२ | ७ | १.६८ |
| २०२३ | ६ ते ६.८ | १ ते ०.२ |

(स्रोत Cleartax.in )

वरील तक्ता क्रमांक सहा वरून असे दिसते की, सन २०१३ ते सन २०१६ पर्यंत भारताच्या आर्थिक वृद्धी दरात (GDP Growth Rate मध्ये) वाढ घडून आली आहे. २०१३ मध्ये आर्थिक वृद्धी दर ६.३९% होता. २०१४ मध्ये ७.४१% , २०१५ मध्ये ८.०० टक्के आणि २०१६ मध्ये ८.२६ टक्के होता. सन २०१७ पासून २०२० पर्यंत आर्थिक वृद्धी दर घटलेला आहे. सन २०१७ साली आर्थिक वृद्धी दर ६.८० टक्के होता, २०१८ साली तो ६.४५ टक्के होता. २०१९ साली तो ३.७४ टक्के होता. तर २०२० साली आर्थिक वृद्धी दर हा -६.६० टक्के होता. २०२१ मध्ये आर्थिक वृद्धी दर चांगला होता. तो ८.६८ टक्के एवढा होता. २०२१ मध्ये आर्थिक वृद्धी दर सात टक्के होता. आणि २०२३ मध्ये भारताचा आर्थिक वृद्धी दर ६ टक्के ते ६.८ टक्के एवढा होता. वरील तक्ता क्रमांक सहाकडे नजर टाकली तर असे दिसते की, गेल्या दहा वर्षात भारताच्या आर्थिक वृद्धी दरात चढ-उतार आहेत. वृद्धीचा दर सतत वाढता हवा. परंतु तसे दिसत नाही.

**भारताचे राष्ट्रीय उत्पन्न कमी असण्याची कारणे**

राष्ट्रीय उत्पन्नाच्या बाबतीत (स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या बाबतीत - GDP च्या बाबतीत) जगात भारताचा पाचवा क्रमांक असला तरी अमेरिका, चीन, जर्मनी आणि जपान या देशापेक्षा भारताचे राष्ट्रीय उत्पन्न खूपच कमी आहे. चीनचे राष्ट्रीय उत्पन्न (GDP) १८५३६ बिलियन डॉलर्स एवढे आहे. भारताचे राष्ट्रीय उत्पन्न (GDP) ३९४२ बिलियन डॉलर्स आहे. भारतापेक्षा चीनचे राष्ट्रीय उत्पन्न चार पटीपेक्षा जास्त आहे. अमेरिकेचे राष्ट्रीय उत्पन्न (स्थूल देशांतर्गत उत्पादन) २८७८३ अमेरिकन डॉलर्स आहे. भारताचे राष्ट्रीय

देशांतर्गत उत्पादन २८७८३ अमेरिकन डॉलर्स आहे. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा अमेरिकेचे राष्ट्रीय उत्पन्न सात पटीपेक्षा जास्त आहे. अशा प्रकारे जागतिक क्रमवारीत GDP च्या बाबतीत भारताचा जगात जरी पाचवा क्रमांक असला तरी चीन आणि अमेरिकेपेक्षा भारताचे राष्ट्रीय उत्पन्न खूपच कमी आहे. चीन आणि अमेरिकेचे राष्ट्रीय उत्पन्न भारता पेक्षा चार ते सात पटीपेक्षा जास्त आहे भारताचे राष्ट्रीय उत्पन्न कमी असण्याची काही प्रमुख कारणे खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत.

**(१) प्रचंड आकाराची लोकसंख्या :–**

लोकसंख्येच्या आकाराच्या बाबतीत जगात चीन नंतर भारताचा क्रमांक लागतो. भारताची लोकसंख्या आज १४०कोटीपेक्षा अधिक आहे. वाढलेली लोकसंख्या ही वाढलेले उत्पादन फस्त करते. भारताची मूळचीच लोकसंख्या प्रचंड असल्याने आणि ती वेगाने वाढत असल्याने भारतीय अर्थव्यवस्थेवर मोठा ताण पडला आहे. त्यामुळे आपल्या देशाच्या राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा वेग (आर्थिक विकासाचा वेग) कमी आहे.

**(२) मागासलेली शेती :–**

विकसित देशांच्या तुलनेत भारतीय शेती खूपच मागासलेली आहे. शेतीत यंत्रांचा, खतांचा, चांगल्या बियाणांचा वापर खूपच कमी आहे. त्यामुळे उत्पादकता अत्यंत कमी आहे. तसेच वाढत्या लोकसंख्येने शेतजमिनीचे तुकडीकरण व विभाजन झाले असून जमिनीचे खूपच लहान–लहान तुकडे पडले आहेत. त्यामुळे भारतीय शेतीची उत्पादकता खूपच कमी आहे. शेती क्षेत्राची राष्ट्रीय उत्पन्नात पडणारी भर खूपच कमी असल्याने भारताचे राष्ट्रीय उत्पन्न इतर देशांच्या तुलनेत खूपच कमी आहे.

**(३) जुनाट यंत्र व तंत्राचा वापर :–**

केवळ कृषी क्षेत्रातच नव्हे तर उद्योग क्षेत्रात (लघु व कुटीर उद्योग क्षेत्रात) अदाापही जुनाट किंवा कालबाह्य उत्पादन तंत्राचा अवलंब केला जातो. त्यामुळे उत्पादन व उत्पन्न वाढत नाही. अशा प्रकारे विविध क्षेत्रात वापरले जात असलेले जुनाट तंत्रज्ञान हे सुद्‌धा राष्ट्रीय उत्पन्न कमी असण्याचे प्रमुख कारण आहे.

**(४) भांडवलाची टंचाई :–**

भांडलाशिवाय उत्पादकता व उत्पन्न वाढत नाही. भारतात भांडवल कमी असल्याने व भांडवल निर्मितीचा वेग कमी असल्याने गुंतवणूक कमी आहे. गुंतवणूक कमी असल्याने रोजगार व उत्पन्न निर्मितीचा आणि वाढीचा वेग कमी आहे. भारतात कृषी, उद्योग, व्यापार इत्यादी सर्व क्षेत्रात भांडवलाची गुंतवणूक विकसित राष्ट्रांच्या तुलनेत कमी आहे. त्यामुळे भारताचे राष्ट्रीय उत्पन्न कमी आहे. त्यामुळै विकसित राष्ट्रापेक्षा भारताचा आर्थिक विकास कमी आहे.

**(५) गरीबी / दारिद्र्य :–**

भारतात २५ टक्केपेक्षा अधिक लोक गरीब किंवा दरिद्री आहेत. यामध्ये शेतकऱ्यांचा, कारागिरांचा भरणा अधिक आहे. शेतकरी, कारागीर, छोटे किंवा किरकोळ व्यापारी गरीब असल्याने पुरेशी गुंतवणूक करू शकत नाहीत. त्यामुळे भारताचे राष्ट्रीय उत्पन्न कमी आहे.

**(६) प्रचंड बेकारी :–**

भारतात बेकारीचे प्रमाण खूप मोठे आहे. कोट्यावधी तरूण, प्रौढ लोक बेरोजगार आहेत. बेकारीमुळे भारतातील चांगली श्रमशक्ती वाया जात असून बेकारांना रोजगार नसल्यामुळे त्यांना उत्पादनाच्या प्रक्रियेत भाग घेता येत नाही. त्यामुळे उत्पादन व उत्पन्न वाढत नाही. म्हणून बेकारी हे सुद्धा भारताचे राष्ट्रीय उत्पन्न कमी असण्याचे प्रमुख कारण आहे.

**(७) मानवी भांडवलाचा निकृष्ट दर्जा :–**

भारतात मानवी भांडवलाचा दर्जा अत्यंत निकृष्ट आहे. भारताचा मानव विकास निर्देशांक विचारात घेतला तर याबाबतीत भारताचा जगात १३१ वा क्रमांक लागतो. नॉर्वे या देशाचा जगात प्रथम क्रमांक लागतो. ऑस्ट्रेलियाचा दुसरा क्रमांक लागतो. अशा प्रकारे भारताची लोकसंख्या जरी प्रचंड असली तरी लोकसंख्येचा/मनुष्यबळाचा दर्जा फारसा चांगला नाही. भारतातील बरीचशी मानवी साधनसंपत्ती निकृष्ट आहे. त्यामुळे भारताचे राष्ट्रीय उत्पन्न कमी आहे.

**(८) अनुत्पादक कामासाठी भांडवलाचा वापर :–**

भारतात भांडवलाचा काही भाग अनुत्पादक कामासाठी सुद्धा वापरला जातो. सरकार सुद्धा अनुत्पादक कामावर दरवर्षी प्रचंड खर्च करते. सभा, समारंभ इत्यादी बाबींवरील खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे उत्पादकता व उत्पन्न वाढत नाही. थोडक्यात, वाढता अनुत्पादक खर्च हे सुद्धा भारताचे राष्ट्रीय उत्पन्न कमी असण्याचे प्रमुख कारण आहे.

**(९) उत्पादन क्षमतेचा अपुरा वापर :–**

भारतात काही उद्योगात (कारखान्यात) प्रचंड मोठी गुंतवणूक करण्यात आली आहे. परंतु कच्च्या मालाचा तुटवडा, मागणीची करतरता, नैसर्गिक आपत्ती इत्यादी विविध कारणामुळे उद्योगातील उत्पादन क्षमतेचा पुरेपूर वापर करता येत नाही. काही मोठे कारखाने किंवा औद्योगिक प्रकल्प वर्षातील काही दिवस बंद ठेवावे लागतात. त्यामुळे उत्पादन व उत्पन्न कमी प्राप्त होते. थोडक्यात, विविध उद्योग धंद्यातील उत्पादन क्षमतेचा पुरेपुर वापर केला जात नसल्याने भारताचे राष्ट्रीय उत्पन्न कमी आहे.

**(१०) सार्वजनिक क्षेत्र अकार्यक्षम :–**

भारतातील सार्वजनिक क्षेत्र अकार्यक्षम आहे. बहुतेक सरकारी उद्योग तोट्यात आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सरकारने सार्वजनिक क्षेत्रात अनेक उद्योग काढले. सार्वजनिक क्षेत्रास अमर्याद अधिकार दिले. परंतु अनेक

कारणामुळे सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग फारशी परिणामकारक कामगिरी करू शकले नाहीत. त्यामुळे भारताचे राष्ट्रीय उत्पन्न कमी आहे.

**(११) नैसर्गिक साधनसंपत्तीचा अपुरा व चुकीचा वापर :-**

भारतात नैसर्गिक साधनसंपत्ती विपूल प्रमाणात आहे. काही विकसित देशापेक्षा सुद्धा भारतात नैसर्गिक साधनसंपत्ती अधिक प्रमाणात आहे. परंतु या साधनसंपत्तीचा पुरेसा व योग्य वापर केला जात नाही. त्यामुळे भारताचे राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्न कमी आहे.

अशा प्रकारे वरील विविध कारणामुळे अमेरिका व चीन या देशापेक्षा भारताचे राष्ट्रीय उत्पन्न खूपच कमी आहे. जागतिकीकरणाचे थोरण स्वीकारल्यापासून भारतात हजारो कारखाने बंद पडले आहेत. त्यामुळे औद्योगिक उत्पादन घटले आहे. राष्ट्रीय उत्पन्नात औद्योगिक उत्पादनाचा सुद्धा समावेश होत असल्याने भारताचे राष्ट्रीय उत्पन्न कमी होत आहे.

**राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवून आणण्यासाठी उपाय :-**

सापेक्ष आणि निरपेक्ष दृष्ट्या विचार करता भारताचे राष्ट्रीय उत्पन्न कमीच आहे. जगातील काही विकसित देशांशी तुलना करता आणि विकसनशील मानल्या जाणाऱ्या चीन या देशाशी तुलना करता भारताचे राष्ट्रीय उत्पन्न खूपच कमी आहे. राष्ट्रीय उत्पन्न आणि आर्थिक विकास यांच्यात जवळचे संबंध असतात. देशाचे राष्ट्रीय उत्पन्न जितके जास्त तितका देशाच्या विकासाचा दर जास्त असतो. म्हणून आर्थिक विकासाचा वेग वाढण्यासाठी देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवून आणणे अत्यंत आवश्यक असते. राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवून आणण्यासाठी काही उपाय खालीलप्रमाणे सुचवले आहेत.

**(१) लोकसंख्या वाढीच्या वेगावर नियंत्रण ठेवणे :-**

वाढलेली लोकसंख्या ही वाढलेले उत्पादन फस्त करून टाकते. त्यामुळे उत्पादन वाढूनही काही उपयोग होत नाही. वाढती लोकसंख्या किंवा प्रचंड आकाराची लोकसंख्या आर्थिक विकासाला मारक असते. म्हणून राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवून आणायची असेल तर लोकसंख्या वाढीच्या वेगावर नियंत्रण ठेवलेच पाहिजे.

**(२) गुंतवणूकीचे प्रमाण वाढवणे :-**

विकसित देशांच्या तुलनेत आजही भारतात सर्व क्षेत्रात गुंतवणूकीचे प्रमाण खूपच कमी आहे. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्न कमी आहे. म्हणून खाजगी व सरकारी गुंतवणूक पुरेशा प्रमाणात वाढणे आवश्यक आहे. जास्तीत जास्त गुंतवणूक उत्पादन क्षेत्रात झाली पाहिजे. त्याशिवाय राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा वेग वाढणार नाही.

**(३) उत्पादन क्षमतेचा संपूर्ण वापर करणे :-**

उत्पादन क्षमतेचा अपुरा वापर केल्याने उत्पादनात वाढ होत नाही. भारतात ज्या उद्योगातील/ कारखान्यातील/ प्रकल्पातील उत्पादन क्षमतेचा पुरेपुर वापर केला जात नाही. तेथील उत्पादन क्षमतेचा पुरेपूर वापर केला पाहिजे. त्यासाठी विविध उपाय योजले पाहिजेत. उत्पादन क्षमतेचा संपूर्ण वापर केला तर राष्ट्रीय उत्पन्नात चांगली वाढ घडून येईल.

**(४) शेतीची उत्पादकता वाढवणे :–**

भारतीय शेतीची उत्पादकता खूपच कमी आहे. विशेष म्हणजे शेतीची उत्पादकता वाढवण्यास खूप वाव आहे. आपण काही पिकांची दिडपट, दुप्पट, तिप्पट उत्पादकता वाढवू शकतो. अशा प्रकारे जर शेतीची उत्पादकता वाढली तर राष्ट्रीय उत्पन्नात सुद्धा चांगली वाढ होऊ शकेल.

**(५) श्रमिकांची कार्यक्षमता व उत्पादकता वाढवणे :–**

भारतीय श्रमिकांची कार्यक्षमता व उत्पादकता खूपच कमी आहे. ही उत्पादकता जर विकसित देशातील श्रमिकांच्याइतकी वाढवण्यास आपणास यश आले तर राष्ट्रीय उत्पन्नातही वाढ घडून येईल. म्हणून राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवून आणण्यासाठी म्हणजेच आर्थिक विकासाचा वेग वाढविण्यासाठी भारतातील श्रमिकांची कार्यक्षमता व उत्पादकता  यात वाढ घडवून आणली पाहिजे.

**(६) मानवी साधनसंपत्तीचा दर्जा उंचावणे :–**

भारतातील मनुष्यबळाचा दर्जा खूपच निकृष्ट आहे. परंतु राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवून आणण्यासाठी मानवी साधनसंपत्तीचा दर्जा उंचावला पाहिजे. चांगले सकस शिक्षण देऊन, आरोग्याच्या चांगल्या सुविधा पुरवून आणि इतर उपाय योजून मानवी साधनसंपत्तीचा दर्जा उंचावता येतो. म्हणून भारत सरकारने मानवी साधनसंपत्तीचा दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. मनुष्यबळाचा दर्जा उंचावला तर राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडून येईल.

**(७) बेरोजगारांना उत्पादन प्रक्रियेत सामावून घेणे :–**

भारतात आज सुमारे दहा कोटी लोक बेरोजगार आहेत. हे लोक कोणताही कामधंदा करत नाहीत. कित्येक कोटी लोक प्रछन्न किंवा सुप्त बेकार आहेत. त्यांच्या कामाने उत्पादनात काहीच भर पडत नाही. अश बेरोजगारांना कृषी, उद्योग, व्यापार, सेवा क्षेत्रात (उत्पादनाच्या प्रक्रियेत) भाग घेण्याची संधी दिली तर भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात (स्थूल देशांतर्गत उत्पादनात – GDP मध्ये) वाढ घडून येईल.

**(८) अत्याधुनिक यंत्राचा व तंत्राचा वापर करणे :–**

शेती, पशुपालन व इतर प्राथमिक, दुय्यम व्यवसायात जुनाट, कालबाह्य यंत्रे व तंत्रज्ञान न वापरता अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरले पाहिजे. तरच या क्षेत्रांचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा वाढू शकेल.

**(९) सार्वजनिक क्षेत्राची कार्यक्षमता वाढवणे :–**

भारतात अद्यापही सरकारी (सार्वजनिक) क्षेत्राला महत्व आहे. खाजगीकरणाचे वारे वाहत असतानासुद्धा सार्वजनिक क्षेत्राचे महत्व कमी झालेले नाही. अद्यापही सार्वजनिक क्षेत्रात अनेक मोठ मोठे उद्योग कार्यरत आहेत. या उद्योगांची कार्यक्षमता वाढवून उत्पादनात व उत्पन्नात वाढ घडवून आणता येईल. आर्थिक विकासात सार्वजनिक क्षेत्राची भूमिका खूप महत्वाची असल्याने सरकारने सार्वजनिक क्षेत्राची

कार्यक्षमता आणि उत्पादकता वाढविण्याला प्राधान्य दिले पाहिजे. यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात चांगली वाढ घडून येईल.

**(१०) देशांतर्गत बचत वाढवणे :–**

लोकांचा अनावश्यक (अनुत्पादक) उपभोग खर्च कमी झाला तर बचत वाढू शकते. बचत जितकी जास्त तितकी गुंतवणूक अधिक राहते. म्हणून देशांतर्गत बचतीचे प्रमाण वाढवले पाहिजे. बचत वाढल्यास गुंतवणूक वाढून राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडून येईल.

**(११) विदेशी चलनाचा योग्य वापर करणे :–**

विदेशी चलनाचा उपयोग कृषी, उद्योग या क्षेत्रांच्या विकासासाठीच केला पाहिजे. या क्षेत्रांना लागणारी यंत्रे व तंत्रज्ञान खरेदी करण्यासाठी विदेशी चलनाचा वापर करणे आवश्यक आहे. सरकारी दौऱ्यावर व इतर अनुत्पादक बाबींवर दरवर्षी कोट्यावधी रूपयांचे विदेशी चलन खर्च होते. ते पैसे वाचवून त्या पैशाचा उपयोग कृषी, उद्योग क्षेत्राची उत्पादकता वाढेल अशी यंत्रे, खते आयात करण्यासाठी केला पाहिजे. अशा प्रकारे विदेशी चलनाच्या योग्य उपयोग केला तर राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडून येईल.

**समारोप :–**

भारताचे राष्ट्रीय उत्पन्न सापेक्षतेने व निरपेक्षतेने कमी आहे. विकसित देशापेक्षा ते कमी आहेच. शिवाय शेजारी असलेल्या चीन या विकसनशील देशापेक्षा सुद्धा खूपच कमी आहे. देशाला महासत्ता बनविण्यासाठी देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवून आणली पाहिजे.

## १.२.५ भारताचे दरडोई उत्पन्न (Per Capita Income of India)

**प्रास्ताविक :–**

दरडोई उत्पन्नास सरासरी उत्पन्न असेही म्हणतात. राष्ट्रीय उत्पन्नाला देशाच्या लोकसंख्येने भागून दरडोई उत्पन्न काढतात. राष्ट्रीय उत्पन्न भागिले देशाची लोकसंख्या म्हणजे दरडोई उत्पन्न होय. दरडोई उत्पन्नाचे सूत्र खालीलप्रमाणे दिले आहे.

$$\text{दरडोई उत्पन्न} = \frac{\text{राष्ट्रीय उत्पन्न}}{\text{देशाची लोकसंख्या}}$$

राष्ट्रीय उत्पन्न जितके जास्त असेल तितके दरडोई उत्पन्न अधिक असते. आणि दरडोई उत्पन्न अधिक असेल तर लोकांच्या राहणीमानाचा दर्जा उच्च राहतो. याचा अर्थ देशातील दरडोई उत्पन्न अधिक असणे म्हणजे त्या देशातील लोकांच्या राहणीमानाचा दर्जा चांगला असणे होय. ज्या देशांचे वास्तव राष्ट्रीय उत्पन्न आणि दरडोई उत्पन्न अधिक असते, त्या देशांच्या विकासाचा वेग अधिक असतो. आणि दरडोई उत्पन्न व दरडोई उत्पन्न वाढीचा वेग कमी असेल तर देशाच्या आर्थिक विकासाचा वेग सुद्धा कमी असतो. कमी

दरडोई उत्पन्न असणारे देश हे कमी विकसित किंवा विकसनशील असतात. दरडोई उत्पन्न स्थिर किंमतीनुसार आणि चालू किंमतीनुसार काढतात. दरडोई उत्पन्नाच्या या दोन्ही संकल्पनांचा अर्थ खालील शब्दात दिला आहे.

**(१) स्थिर किंमतीनुसार दरडोई उत्पन्न (Per Capita Income at Constant Prices) :-**

जेंव्हा एखादे मूळ वर्ष (आधार वर्ष - Base Year) विचारात घेऊन दरडोई उत्पन्न काढतात तेंव्हा त्यास स्थिर किंमतीनुसार दरडोई उत्पन्न असे म्हणतात.

$$\text{स्थिर किंमतीनुसार दरडोई उत्पन्न} = \frac{\text{मूळ वर्षातील किंमतीनुसार एखाद्या वर्षाचे राष्ट्रीय उत्पन्न}}{\text{त्या एखाद्या वर्षीची लोकसंख्या}}$$

**(२) चालू किंमतीनुसार दरडोई उत्पन्न (Per Capita Income at Current Prices)**

जेंव्हा चालू वर्षातील किंमतींचा किंवा सध्याच्या किंमतींचा विचार करून दरडोई उत्पन्न मोजले जाते, तेंव्हा त्यास चालू किंमतीनुसार दरडोई उत्पन्न असे म्हणतात.

$$\text{चालू किंमतीनुसार दरडोई उत्पन्न} = \frac{\text{चालू किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न}}{\text{चालू वर्षातील/सद्याची लोकसंख्या}}$$

**भारताचे दरडोई उत्पन्न :-**

खालील तक्ता क्रमांक १ मध्ये स्वातंत्र्यपूर्वकाळातील (ब्रिटिश राजवटीतील) भारताच्या दरडोई उत्पन्नाची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक १ स्वातंत्र्यपूर्वकाळातील भारताचे दरडोई उत्पन्न (रुपयामध्ये)**

| अ. क्र | वर्ष | दरडोई उत्पन्न (रूपये) |
|---|---|---|
| १ | १८६८ | २० |
| २ | १८७५ | ३१ |
| ३ | १८८२ | २७ |
| ४ | १८९७-९८ | ३० |
| ५ | १८९९ | १७ |
| ६ | १९११ | ८० |
| ७ | १९१३-१४ | ४४ |
| ८ | १९२१-२२ | ७४ |

| | | |
|---|---|---|
| ९ | १९३१-३२ | ६२ |
| १० | १९३९-४० | ६७ |
| ११ | १९४२-४३ | १४२ |
| १२ | १९४६-४७ | २२८ |

(स्त्रोत : कायंदे पाटील गंगाधार वि. भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक, जून २००१, पृ. क्र. ७.८

वरील तक्ता क्रमांक १ वरून आपल्या असे लक्षात येते की, स्वातंत्र्यपूर्वकाळात भारताचे दरडोई उत्पन्न खूपच कमी होते. त्याचे एक प्रमुख कारण म्हणजे भारतावर परकियांची (ब्रिटिशांची) राजवट होती. आणि ही राजवट जुलमी व अन्यायकारक होती. सन १८६८ मध्ये भारताचे दरडोई उत्पन्न अवघे २० रूपये होते. १९३१-३२ मध्ये ते ६२ रूपये एवढे होते. १९४६-४७ मध्ये भारताचे दरडोई उत्पन्न २२८ रूपये होते. या आकडेवारीवरून स्वातंत्र्यपूर्वकाळात भारतीय जनता किती गरीब होती याची कल्पना येते. स्वांतत्र्यपूर्वकाळात भारताचे राष्ट्रीय उत्पन्न खूपच कमी होते. तुलनेने देशाची लोकसंख्या प्रचंड होती. त्यामुळे देशाचे दरडोई उत्पन्न कमी होते. राष्ट्रीय उत्पन्न कमी आणि देशाची लोकसंख्या जास्त यामुळे ब्रिटिश राजवटीत (स्वातंत्र्यपूर्वकाळात) भारताचे दरडोई उत्पन्न कमी होते. (राष्ट्रीय उत्पन्नाला देशाच्या लोकसंख्येने भागून दरडोई उत्पन्न काढतात.)

**स्वातंत्र्योत्तर काळातील भारताचे दरडोई उत्पन्न**

खालील तक्ता क्रमांक २ मध्ये सन १९६० पासून सन २०२२ पर्यंतचे भारताचे दरडोई उत्पन्न दर्शविले आहे.

**तक्ता क्र. २ स्वातंत्र्योत्तर काळातील भारताचे दरडोई उत्पन्न**

(India GDP Per Capita Historical Data)

| अनु. क्र | वर्ष | दरडोई उत्पन्न GDP Per Capita (US $) (अमेरिकन डॉलर्समध्ये |
|---|---|---|
| १ | १९६० | ८३ |
| २ | १९६५ | ११९ |
| ३ | १९७० | ११२ |
| ४ | १९७५ | १५८ |
| ५ | १९८० | २६७ |
| ६ | १९८५ | २९८ |
| ७ | १९९० | ३६९ |
| ८ | १९९५ | ३७४ |

| | | |
|---|---|---|
| ९ | २००० | ४४२ |
| १० | २००५ | ७११ |
| ११ | २०१० | १३५१ |
| १२ | २०१५ | १५९० |
| १३ | २०१६ | १७१४ |
| १४ | २०१७ | १९५८ |
| १५ | २०१८ | १९७४ |
| १६ | २०१९ | २०५० |
| १७ | २०२० | १९१३ |
| १८ | २०२१ | २२३८ |
| १९ | २०२२ | २४११ |

स्त्रोत : www.macrotrend.net

वरील तक्ता क्रमांक २ वरून असे दिसते की, स्वातंत्र्यपूर्वकाळापेक्षा स्वातंत्र्योत्तर काळात भारताच्या दरडोई उत्पन्नात मोठी वाढ घडून आली आहे. सन १९६० मध्ये भारताचे दरडोई उत्पन्न ( प्रतिव्यक्ती वार्षिक सरासरी उत्पन्न ) ८३ डॉलर्स एवढे होते. ते १९८० साली २६७ डॉलर्स झाले. १९६० च्या तुलनेत १९८० मध्ये भारताच्या दरडोई उत्पन्नात तिपटीपेक्षा अधिक वाढ घडून आली १९८५ साली भारताचे दरडोई उत्पन्न २९८ डॉलर्स होते. २०१० साली ते १३५१ डॉलर्स झाले १९८५ च्या तुलनेत २०१० मध्ये भारताचे दरडोई उत्पन्न चार पटीपेक्षा अधिक वाढले. २०१५ साली भारताचे दरडोई उत्पन्न १५९० डॉलर्स होते. २०२२ साली ते २४११ डॉलर्स पर्यंत वाढले. २०१९ मध्ये भारताचे दरडोई उत्पन्न २०५० डॉलर्स होते. ते २०२० मध्ये १९१३ डॉलर्स एवढे कमी झाले. २०२१ पासून भारताच्या दरडोई उत्पन्नात पुन्हा वाढ होत असल्याने दिसते. २०२१ साली भारताचे दरडोई उत्पन्न २२३८ डॉलर्स होते. ते २०२२ साली २४११ डॉलर्स एवढे झाले.

**भारतातील विविध राज्यांचे आणि केंद्रशासित प्रदेशांचे दरडोई उत्पन्न :–**

(List of Indian States and Union Territories by GDP per Capita – Net State domestic product NSD P per capita Current Prices)

खालील तक्ता क्रमांक ३ मध्ये भारतातील विविध राज्यांचे आणि केंद्रशासित प्रदेशांचे दरडोई उत्पन्न दर्शविले आहे. २०२१–२२ वर्षातील ही आकडेवारी आहे.

**तक्ता क्रमांक ३ भारतातील विविध राज्यांचे आणि केंद्रशासित प्रदेशांचे दरडोई उत्पन्न (२०२१-२२)**

| दरडोई उत्पन्नाची क्रमवारी (Rank) | राज्य / केंद्रशासित प्रदेश | दरडोई उत्पन्न (रुपयात/ INR) (२०२१-२२) | दरडोई उत्पन्न USD $ (अमेरिकन डॉलर्समध्ये) (२०२१-२२) |
|---|---|---|---|
| १ | गोवा | ४७२०७० | ६२१५ |
| २ | सिक्कीम | ४६३५०९ | ६१०२ |
| ३ | दिल्ली | ३८९५२९ | ५१२८ |
| ४ | चंदिगड | ३३३९३२ | ४३९६ |
| ५ | तेलंगणा | २७०८३९ | ३५६६ |
| ६ | कर्नाटक | २६५६२३ | ३४९७ |
| ७ | हरियाणा | २६४८३५ | ३४८७ |
| ८ | पांडेचरी | २५१३४४ | ३३०९ |
| ९ | तमिळनाडू | २४२२५३ | ३१८९ |
| १० | गुजरात | २४१९३० | ३१८५ |
| ११ | केरळ | २३३८५५ | ३०७९ |
| १२ | अंदमान, निकोबार बेटे | २२९०८० | ३०१६ |
| १३ | महाराष्ट्र | २१५२३३ | २८३४ |
| १४ | उत्तराखंड | २११६५७ | २७८६ |
| १५ | अरूणाचल प्रदेश | २०५६४५ | २७०७ |
| १६ | हिमाचल प्रदेश | २०१२७१ | २६५० |
| १७ | मिझोराम | १९८९६२ | २६१९ |
| १८ | आंध्रप्रदेश | १९२५८७ | २५३५ |
| १९ | पंजाब | १६८७०५ | २२२१ |
| २० | त्रिपुरा | १३७४७२ | १८१० |
| २१ | राजस्थान | १३५९६२ | १७९० |
| २२ | ओडिसा | १२८१८१ | १६८७ |
| २३ | नागालॅण्ड | १२५८८७ | १६५७ |
| २४ | पश्चिम बंगाल | १२४७९८ | १६४३ |
| २५ | मध्य प्रदेश | १२१५९४ | १६०१ |
| २६ | जम्मू व काश्मिर | १२०७९० | १५९० |

| | | | |
|---|---|---|---|
| २७ | छत्तीसगड | १२०७०४ | १५८९ |
| २८ | मेघालय | १०३३३५ | १३६० |
| २९ | आसाम | १०२९६५ | १३५६ |
| ३० | मणिपूर | ९१५६६ | १२०५ |
| ३१ | झारखंड | ८४०५९ | ११०७ |
| ३२ | उत्तर प्रदेश | ७३०४८ | ९६२ |
| ३३ | बिहार | ४७४९८ | ६२५ |
| भारत | | १४८५२४ | १९५५ |

(स्रोत : en.m.wikipedia.org)

वरील तक्ता क्रमांक ३ मध्ये भारतातील विविध घटक राज्यांचे आणि केंद्रशासित प्रदेशांचे सन २०२१-२२ या वर्षातील दरडोई उत्पन्न डॉलर्समध्ये आणि भारतीय रूपयात दर्शविले आहे. वरील तक्त्यावरून असे दिसते की, भारतात सर्वात जास्त दरडोई उत्पन्न गोवा राज्याचे असून ते ४,७२,०७० रूपये एवढे आहे. दरडोई उत्पन्नाच्या क्रमवारीत भारताचा १ क्रमांक लागतो. दरडोई उत्पन्नाच्या बाबातीत देशात महाराष्ट्र राज्याचा १३ वा क्रमांक लागतो. २०२१-२२ मध्ये महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न २१५२३३ रूपये एवढे होते. दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत भारतात कर्नाटकाचा सहावा, हरियाणाचा सातवा, तामिळनाडूचा नववा आणि गुजरातचा दहावा क्रमांक लागतो. दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत पंजाबचा देशात १९ वा, मध्यप्रदेशाचा २५ वा, उत्तरप्रदेशचा ३२ वा आणि बिहारचा ३३ वा क्रमांक लागतो. दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत प्रथम स्थानावर असलेल्या गोवा राज्याचे दरडोई उत्पन्न ४७२०७० रूप्ये आहे. तर दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत शेवटच्या (३३ व्या) स्थानावर असलेल्या बिहारचे दरडोई उत्पन्न ४७४९८ रूपये एवढे आहे.

**स्थूल देशांतर्गत उत्पादनात (GDP मध्ये) जागतिक क्रमवारीत पहिल्या १० क्रमांकामध्ये असलेल्या देशांचे दरडोई उत्पन्न ( GDP Per Capita USD Thousand )**

खालील तक्ता क्रमांक ४ मध्ये स्थूल देशांतर्गत उत्पादनात (GDP मध्ये) जागतिक क्रमवारीत समाविष्ट असलेल्या अमेरिका, चीन, जर्मनी, जपान, भारत, इंग्लंड, फ्रान्स, ब्राझील, इटली, कॅनडा या दहा बलाढ्य अर्थव्यवस्था असलेल्या १० श्रीमंत राष्ट्रांचे दरडोई उत्पन्न अमेरिकन डॉलर्समध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक ४ – स्थूल देशांतर्गत उत्पादनात (GDP मध्ये) जागतिक क्रमवारीत पाहिल्या १० क्रमांकामध्ये असलेल्या देशांचे दरडोई उत्पन्न**

| GDP Rank | देशाचे नाव | राष्ट्रीय उत्पन्न (स्थूल देशांतर्गत उत्पादन) GDP USD billion | दरडोई उत्पन्न (GDP Per Capita USD Thousand ) |
|---|---|---|---|
| १ | अमेरिका | २८७८३ | ८५.३७ |
| २ | चीन | १८५३६ | १३.१४ |
| ३ | जर्मनी | ४७३० | ५६.२९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जपान | ४११२ | ३४.१४ |
| ५ | भारत | ३९४२ | २.७३ |
| ६ | इंग्लंड | ३५०२ | ५१.०७ |
| ७ | फ्रान्स | ३१३२ | ४७.३६ |
| ८ | ब्राझील | २३३३ | ११.३५ |
| ९ | इटली | २३३२ | ३९.५८ |
| १० | कॅनडा | २२४२ | ५४.८७ |

(स्त्रोत : www.forbesindia.com)

वरील तक्ता क्रमांक चार वरून असे दिसते की, जगात सर्वात जास्त दरडोई उत्पन्न अमेरिका या देशाचे असून ते ८५.३७ हजार अमेरिकन डॉलर्स एवढे आहे. राष्ट्रीय उत्पन्न (GDP) आणि दरडोई उत्पन्न (GDP Per Capita) या दोन्ही बाबतीत जागतिक क्रमवारीत अमेरिकेचा प्रथम क्रमांक आहे. जर्मनीचे दरडोई उत्पन्न ५६.२९ हजार डॉलर्स आहे. कॅनडाचे दरडोई उत्पन्न ५४.८७ हजार अमेरिकन डॉलर्स आहे. भारताचे दरडोई उत्पन्न विकसित देशांच्या तुलनेत खूपच कमी म्हणजे २.७३ हजार डॉलर्स एवढे आहे. चीनचे दरडोई उत्पन्न भारताच्या पाच पटीपेक्षा जास्त (१३.१४ हजार डॉलर्स) एवढे आहे. अशा प्रकारे राष्ट्रीय उत्पन्नाच्या बाबतीत (GDP च्या बाबतीत) भारताचा आज जगात पाचवा क्रमांक असला तरी दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत भारताचा जगात १३६ वा क्रमांक आहे.

**भारताचे दरडोई उत्पन्न कमी असण्याची कारणे :–**

वरील विविध तक्त्यावरून असे दिसते की, जगातील विविध देशांच्या तुलनेत भारताचे दरडोई उत्पन्न खूपच कमी आहे. ज्याप्रमाणे सापेक्षतेने (इतर देशांशी तुलना करता) भारताचे दरडोई उत्पन्न कमी आहे, त्याप्रमाणे निरपेक्षतेने सुद्धा भारताचे दरडोई उत्पन्न कमी आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारताचे दरडोई उत्पन्न वाढले असले तरीही झालेली वाढ समाधानकारक नाही. भारताचे दरडोई उत्पन्न सापेक्षतेने आणि निरपेक्षतेने कमी असण्याची काही कारणे थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत.

**(१) प्रचंड आकाराची लोकसंख्या :–**

भारताची लोकसंख्या प्रचंड आकाराची आहे. लोकसंख्या वाढीचा वेगही मोठा आहे. त्यामुळे भारताचे दरडोई उत्पन्न अत्यंत कमी आहे. राष्ट्रीय उत्पन्नाला लोकसंख्येने भागून सरासरी दरडोई उत्पन्न काढतात. देशाची लोकसंख्या जितकी जास्त तितके देशाचे दरडोई उत्पन्न (प्रतिव्यक्ती वार्षिक सरासरी उत्पन्न) कमी राहते. भारताची लोकसंख्या सतत वाढत असल्याने आणि भारताच्या लोकसंख्या वाढीचा वेग मोठा असल्याने भारताचे दरडोई उत्पन्न कमी आहे.

**(२) राष्ट्रीय उत्पन्न कमी :–**

जगातील विविध प्रमुख देशांच्या तुलनेत भारताचे राष्ट्रीय उत्पन्न कमीच आहे. एकूण राष्ट्रीय उत्पन्नावरून देशाचे दरडोई उत्पन्न काढतात. भारताचे राष्ट्रीय उत्पन्न कमी असल्याने दरडोई उत्पन्न सुद्‌धा कमी आहे.

**(३) भारतीय श्रमिकांची कार्यक्षमता व उत्पादकता कमी :–**

विकसित देशांच्या तुलनेत भारतीय श्रमिकांची उत्पादकता व कार्यक्षमता अत्यंत कमी आहे. त्यामुळे त्यांचे उत्पन्न सुद्‌धा कमी आहे. प्रगत देशात एक कामगार जे काम करतो, तेच काम करण्यासाठी भारतात चार ते सहा मजूर लागतात. त्यामुळे भारतातील नागरिकांचे दरडोई उत्पन्न कमी आहे.

**(४) निरक्षरता व अल्पशिक्षितपणा :–**

भारतात निरक्षर व अल्पशिक्षित लोकांचे प्रमाण सुमारे ५० टक्के आहे. त्यामुळे त्यांना कमी मोबदला मिळतो. त्यामुळे भारताचे दरडोई उत्पन्न कमी आहे.

**(५) प्रशिक्षित लोकांची कमतरता :–**

भारतात प्रशिक्षणाच्या सुविधा अत्यंत कमी आहेत. त्यामुळे प्रशिक्षण घेतलेल्या कामगारांची संख्या कमी आहे.

**(६) यंत्रांचा कमी वापर :–**

कृषी व इतर प्राथमिक क्षेत्रात यंत्रांचा वापर खूपच कमी आहे. त्यामुळे दरडोई उत्पन्न कमी आहे. भारतात भांडवली वस्तूंचा उत्पादक कामासाठी वापर कमी आहे. त्यामुळे उत्पन्न वाढत नाही.

**(७) अल्पसंतुष्ट वृत्ती :–**

भारतातील बरीचशी जनता अल्पसंतुष्ट आहे. त्यांच्यात फारशी महत्वाकांक्षा नाही. थोड्या यशात समाधान मानण्याची त्यांची प्रवृत्ती आहे. त्यामुळे त्यांचे उत्पन्न कमी आहे.

अशा प्रकारे वरील विविध कारणामुळे भारताचे दरडोई उत्पन्न कमी आहे.

**दरडोई उत्पन्नात वाढ घडवून आणण्यासाठी उपाय :–**

भारताचे दरडोई उत्पन्न सापेक्षतेने जगातील इतर देशांशी तुलना करता खूपच कमी आहे. तसेच निरपेक्षतेने सुद्‌धा ते कमी आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारताच्या दरडोई उतपन्नात वाढ झाली असली तरी ही वाढ समाधानकारक नाही. एवढेच नव्हे तर भारतातील एकूण २९ राज्यापैकी फारच थोड्या राज्यांचे दरडोई उत्पन्न चांगले आहे. इतर राज्यांचे दरडोई उत्पन्न खूपच कमी आहे. दरडोई उत्पन्न हा देशाच्या आर्थिक विकासाचा महत्वाचा निर्देशक आहे. वास्तव राष्ट्रीय उत्पन्न आणि वास्तव दरडोई उत्पन्न जितके जास्त

तितका देशाचा आर्थिक विकास अधिक झालेला असतो असा त्याचा अर्थ होतो. भारतातील सरासरी दरडोई उत्पन्नात वाढ घडवून आणण्यासाठी काही उपाय खालीलप्रमाणे सुचवले आहेत.

**(१) राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवून आणणे :–**

राष्ट्रीय उत्पन्नावरून दरडोई उत्पन्न काढतात. म्हणून राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवून आणली पाहिजे. राष्ट्रीय उत्पन्न जितके जास्त तितके दरडोई उत्पन्न अधिक राहते.

**(२) लोकसंख्या वाढीचा वेग रोखणे :–**

राष्ट्रीय उत्पन्नाला लोकसंख्येने भागून दरडोई उत्पन्न काढतात. म्हणून दरडोई उत्पन्न वाढते राहण्यासाठी लोकसंख्या वाढीचा वेग रोखलाच पाहिजे.

**(३) इतर उपाय :–**

दरडोई उत्पन्नात वाढ घडवून आणण्यासाठी इतरही काही उपाय सुचवता येतील. उदाहरणार्थ कृषी, कारागीरी क्षेत्रात व इतर प्राथमिक क्षेत्रात चांगले तंत्र वापरून उत्पादन करणे, कारागिरांना व्यावसायिक प्रशिक्षण देणे, कामगारांची कार्यक्षमता वाढविणे, निरक्षरता नष्ट करणे, शिक्षणाच्या पुरेशा व चांगल्या सोयी पुरवून चांगल्या दर्जाचे शिक्षण देणे इत्यादी उपाय योजून दरडोई उत्पन्नात वाढ घडवून आणता येईल.

**समारोप :–**

भारतातील दरडोई उत्पन्न सापेक्षतेने व निरपेक्षतेने खूपच कमी आहे. वरील विविध उपाय योजून दरडोई उत्पन्नात वाढ घडवून आणता येणे शक्य आहे. देशाच्या वास्तव दरडोई उत्पन्नात वाढ झाल्याशिवाय आंतराष्ट्रीय जगतात भारताला महासत्ता म्हणून ओळख मिळणार नाही. दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत भारताचा जगात १३६ वा क्रमांक असल्याने जागतिक बँक भारताला 'कमी विकसित देश' (Less Developed Country) समजते.

## १.२.६ सर्वसमावेशक वृद्धी (Inclusive Growth)

**प्रास्ताविक :–**

सर्वसमावेशक विकासाला 'सर्वसमावेशक वृद्धी' किंवा 'सर्वसमावेशक आर्थिक विकास' असे सुद्धा म्हणतात. सर्वसमावेशक वृद्धी या संकल्पनेचे महत्व अमर्त्य सेन यांच्यासारख्या अर्थशास्त्रज्ञांनी आणि जागतिक बँकेसारख्या आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांनी सुद्धा विषद केले आहे. ही संकल्पना जगभर मान्य झाली आहे. कारण देशाचा विकास हा सर्वसमावेशकच (सर्वांच्या फायदाचा) असला पाहिजे. ही संकल्पना ज्या देशात विकासाची प्रक्रिया चालू आहे, त्या विकसनशील देशांच्या दृष्टीने खूपच उपयुक्त आहे. भारताच्या ११ व्या पंचवार्षिक योजनेच्या मसुद्यामध्ये नियोजनकारांनी सर्वसमावेशक वृद्धीला महत्व दिल्याचे दिसून येते. भारताची बारावी पंचवार्षिक योजना सुद्धा देशाचा सर्वसमावेशक विकास घडून येईल अशाच प्रकारे तयार करणात आली आहे.

**सर्वसमावेशक वृद्धी म्हणजे काय?**

सर्वसमावेशक विकास म्हणजेच खरा विकास होय. 'सर्वसमावेशक वृद्धी' या संकल्पनेच्या काही व्याख्या खालील शब्दात मांडल्या आहेत.

(१) अमर्त्य सेन यांच्या मते, ''ज्या विकासामुळे दारिद्र्यात घट घडून येते, त्या विकासाला सर्वसमावेशक विकास असे म्हणतात.''

(२) महेंद्र देव आणि माधव सिंग यांच्या मते, ''सर्वसमावेशक वृद्धी म्हणजे उत्पादन घटकांचे अशा रीतीने न्याय वाटप करावे की त्यांचा लाभ समाजाच्या प्रत्येक घटकाला झाला पाहिजे.''

(३) ''देशाच्या आर्थिक विकासाचे किंवा आर्थिक वृद्धीचे फायदे जेंव्हा देशातील सर्व जनतेला प्राप्त होतात. तेंव्हा त्या विकासाला किंवा आर्थिक वृद्धीला सर्वसमावेशक वृद्धी असे म्हणतात.

स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी म्हणजे सन १९४७ साली भारत हा अविकसित किंवा मागासलेला देश होता. देशाचा मागासलेपणा घालवण्यासाठी भारत सरकारने सन १९५१ पासून देशात पंचवार्षिक योजनांचा कार्यक्रम राबविण्यास सुरवात केली. आत्तापर्यंत देशात १२ पंचवार्षिक योजना आणि सहा वार्षिक योजना पूर्ण झाल्या आहेत. या योजनांच्या अंमलबजावणीमुळे देशाच्या आर्थिक विकास दरात वाढ झाली असून अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रांची प्रगती होत आहे. भारत आता अविकसित किंवा मागासलेला देश राहिलेला नाही. जगातील एक प्रमुख विकसनशील देश म्हणून भारत आता ओळखला जातो. विकासाच्या दिशेने वेगाने वाटचाल करणारा देश अशी आंतराष्ट्रीय पातळीवर आपल्या देशाची प्रतिमा निर्माण झाली आहे.

**भारतातील विकासाला सर्वसमावेशक विकास म्हणता येईल का?**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या ७७ वर्षात आपण सर्वच क्षेत्रात मोठी प्रगती केली असली तरी झालेल्या विकासाला किंवा वृद्धीला सर्वसमावेशक विकास म्हणता येणार नाही, हे वास्तव आहे. भारतात अद्याप सर्वसमावेशक आर्थिक वृद्धी घडून आलेली नाही. भारतातील विकासाला सर्वसमावेशक विकास म्हणता येणार नाही, त्याची काही कारणे खालीलप्रमाणे दिली आहेत.

१) भारतात गरीबी, बेकारी या समस्या अद्याप शिल्लक आहेत. आर्थिक विकासाचे फायदे कोट्यावधी गरीब लोकांपर्यंत पोहचलेले नाहीत.

(२) देशातील आर्थिक विषमता कमी झालेली नाही. उलट आर्थिक विषमता दिवसेंदिवस वाढत आहे.

(३) देशातील प्रादेशिक असमतोलाची समस्या अद्यापही टिकून आहे.

(४) देशातील बहुसंख्य महिलांचे आर्थिक, शैक्षणिक सक्षमीकरण झालेले नाही.

(५) ग्रामीण भागाचा अद्यापही पूर्ण विकास झालेला नाही. शहरी आणि ग्रामीण अंतर वाढत आहे.

वरील सर्व कारणामुळे स्वातंत्र्योत्तर काळात भारताने सर्व क्षेत्रात अफाट प्रगती केली असली तरी किंवा आर्थिक वृद्धीच्या दरात वाढ घडून आली असली तरी झालेला विकास सर्वसमावेशक नाही असे म्हणावे लागते.

**सर्वसमावेशक वृध्दीचे निकष :–**

सर्वसमावेशक वृध्दी ठरविणाऱ्या/निश्चित करणाऱ्या घटकांची चर्चा थोडक्यात खालीलप्रमाणे केली आहे.

**१) दारिद्र्य निर्मूलन :–**

दारिद्र्य निर्मूलन हा सर्वसमावेशक वृध्दी ठरविणारा अत्यंत महत्वाचा घटक आहे. देशाचा आर्थिक विकास होत असताना देशातील दारिद्र्याचे प्रमाण कमी होत जाऊन दारिद्र्याचे संपूर्ण उच्चाटन झाले पाहिजे. देशाच्या आर्थिक विकासाचे फायदे गरीबांपर्यंत पोहचून गरीबीचे निर्मूलन झाले तर त्या आर्थिक वाढीला किंवा आर्थिक विकासाला सर्वसमावेशक वृध्दी असे म्हणतात.

**२) राहणीमानाचा उच्च दर्जा :–**

केवळ दारिद्र्याचे उच्चाटन झाले म्हणजे देशात सर्वसमावेशक आर्थिक वृध्दी घडून आली असे म्हणता येणार नाही. तर आर्थिक विकासाच्या विविध कार्यक्रमामुळे देशातील जनतेचे राहणीमान सुधारलेले असले पाहिजे. ज्या कुटुंबांकडे स्वतःच्या मालकीची वाहतुकीची साधने असतात, घराचा दर्जा चांगला असतो, घरात सुखसोचीच्या वस्तू पुरेशा प्रमाणात असतात आणि जी कुटुंबे आपल्या मुलाबाळांच्या शिक्षणावर, पालनपोषणावर चांगला खर्च करू शकतात त्या कुटुंबाचा राहणीमाना दर्जा चांगला आहे असे म्हणतात. अशा प्रकारे आर्थिक विकास दरातील वाढीमुळे देशातील लोकांच्या राहणीमानाचा दर्जा चांगला झाला असेल आणि सतत त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावत असेल तर देशातील आर्थिक विकास सर्वसमावेशक आहे, असे म्हणता येते.

**३) शिक्षणाच्या संधी :–**

चांगल्या, सकस व उच्च दर्जाच्या शिक्षणामुळे संबंधित व्यक्तीचा जसा फायदा होतो तसा राष्ट्राचाही फायदा होतो. राष्ट्राला चांगले मनुष्यबळ मिळून राष्ट्राची आर्थिक प्रगती होते. देशातील सर्व जनतेला प्राथमिक, माध्यमिक, विद्यापीठीय, वैद्यकीय, अभियांत्रिकी अशा सर्व प्रकारचे शिक्षण सहज व स्वस्तात उपलब्ध असेल, शिक्षणापासून कोणीही वंचित राहत नसेल, देशात १०० टक्के साक्षरता निर्माण झाली असेल, सरकार सर्व प्रकारच्या शिक्षणावर पुरेसा खर्च करत असेल तर देशात सर्वसमावेशक आर्थिक वृध्दी घडून आली आहे, असे म्हणता येते.

**४) चांगले आरोग्य :–**

जनतेचे आरोग्य चांगले असणे राष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असते. कारण त्यामुळे राष्ट्राला चांगले, कार्यक्षम, उत्पादक व निरोगी मनुष्यबळ मिळते. अविकसित आणि विकसनशील देशात जनतेच्या आरोग्याची जबाबदारी प्रामुख्याने सरकारची असते. कारण बहुसंख्य लोक खूपच गरीब असतात. रोगांच्या

साथी किंवा संसर्गजन्य आजारांच्या साथी नष्ट करण्यासाठी सरकारला प्रचंड खर्च करावा लागतो. सरकारी दवाखान्यांच्या उभारणीवर खर्च करावा लागतो. सरकारच्या आरोग्यावरील खर्चामुळे रोगराई, अशक्तपणा, कुपोषण, बालमृत्यू या आरोग्यविषयक समस्यांचे निराकरण झाले असेल, लोकांच्या आरोग्याचा दर्जा आणि आयुर्मान चांगले असेल तर देशात सर्वसमावेशक आर्थिक वृध्दी घडून आली आहे, असा निष्कर्ष काढता येतो.

**५) स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीचा दर्जा :–**

देशाचा विकास होत असताना त्या विकासाचे फायदे देशातील मुली आणि स्त्रियांना सुध्दा मिळाले पाहिजेत. स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने शिक्षणाचा, रोजगाराचा, व्यवसाय करण्याचा अधिकार मिळाला पाहिजे. आर्थिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात त्यांना पुरूषांच्या बरोबरीचा दर्जा मिळाला पाहिजे. देशातील स्त्रियांचे आर्थिक सक्षमीकरण झाले असेल तरच देशात घडून येत असलेल्या विकासाला सर्वसमावेशक विकास असे म्हणता येईल.

**६) सामाजिक समता :–**

समाजिक समता हा सुध्दा सर्वसमावेशक वृध्दीचा महत्वाचा निकष आहे. ज्या समाजात/देशात स्त्री–पुरूष, उच्च–नीच, सुशिक्षित–अशिक्षित, दलित–सवर्ण, स्थानिक–परप्रांतीय अशा प्रकारचे लिंगभेद, जातीभेद, धार्मिक भेद, वंश भेद, प्रादेशिक भेद अस्तित्वात नसतात त्या समाजात/देशात सामाजिक समता प्रस्थापित झालेली असते. आर्थिक विकासाची गती वाढत असताना सामाजिक विषमता कमी होत जाऊन सामाजिक समता प्रस्थापित झाली पाहिजे. तरच तो आर्थिक विकास सर्वसमावेशक विकास म्हणून ओळखला जातो.

**७) आर्थिक समता :–**

देशात आर्थिक विषमता असेल म्हणजे आर्थिक समानता प्रस्थापित झाली नसेल तर देशात सर्वसमावेशक वृध्दी झाली असे म्हणता येणार नाही. देशाचा आर्थिक विकास होत असताना आर्थिक समता निर्माण झाली पाहिजे. आर्थिक वृध्दीचा दर वाढत असताना आहेरे आणि नाहीरे या वर्गातील अंतर कमी कमी होत गेले पाहिजे. आर्थिक विषमता संपूर्णपणे नष्ट होणार नाही हे खरे असले तरी आर्थिक विषमतेचे स्वरूप व त्याचे परिणाम फारसे गंभीर असणार नाहीत याची काळजी सरकारला आर्थिक विकासाचे कार्यक्रम राबवताना घेता आली पाहिजे. शेतमजूरापेक्षा प्राध्यापकाचे आणि प्राध्यापकापेक्षा उद्योगपतींचे उत्पन्न जास्तच असणार. मात्र आर्थिक विषमता पराकोटीची नसावी व त्यामुळे बहुसंख्य जनतेला विपन्नाव्यस्थेत जगावे लागू नये एवढेच. अशा प्रकारे ज्या आर्थिक वृध्दीमुळे देशात आर्थिक विषमतेचा प्रश्न फारसा गंभीर नसतो त्या देशात सर्वसमावेशक विकास घडून येत आहे, असे म्हणता येईल.

**८) ग्रामीण विकास :–**

आर्थिक विकासाचे फायदे केवळ शहरी जनतेला मिळत असतील, ग्रामीण भागातील लोकांना फारसे फायदे मिळत नसतील, ग्रामीण भागात विविध सेवा सुविधांची वाणवा असेल, शहरी भागात सुविधांची

रेलचेल असेल तर आर्थिक वृध्दीचा दर कितीही समाधानकारक असला तरी त्या आर्थिक वृध्दीला किंवा विकासाला सर्वसमावेशक विकास असे म्हणता येणार नाही. आर्थिक विकास दरातील वाढीमुळे ग्रामीण भागाचा किंवा खेड्यांचा विकास घडून आला आणि विकासातील ग्रामीण-शहरी अंतर कमी झाले तरच देशाचा विकास सर्वसमावेशक आहे, असे म्हणता येते.

**९) बेरोजगारीचे निर्मूलन :-**

देशात बेकारीची समस्या अस्तित्वात नसेल तर देशात सर्वसमावेशक आर्थिक वृध्दी घडून आली आहे असे म्हणता येते. थोडक्यात बेकारीचे निर्मूलन झाल्याशिवाय सर्वसमावेशक आर्थिक वृध्दी घडून आली असे म्हणता येणार नाही. म्हणून बेकारीचे निर्मूलन हा सर्वसमावेशक आर्थिक विकास निश्चित करणारा महत्वाचा निकष किंवा घटक आहे.

**१०) जीवनावशक वस्तूंची मुबलकता :-**

जीवनावशक वस्तूंची मुबलकता हा सर्वसमावेशक आर्थिक वृध्दीचा महत्वाचा निकष आहे. देशातील जनतेला जीवनावशक वस्तू स्वस्त दरात आणि पुरेशा प्रमाणात मिळत असतील तर देशात सर्वसमावेशक विकास झाला आहे, असे म्हणता येते. देशाच्या आर्थिक वाढीचा दर असा असला पाहिजे की, ज्यामुळे लोकांना जीवनाशक वस्तू पुरेशा प्रमाणात आणि योग दरात मिळू शकतील. देशात जीवनाशक वस्तूंची टंचाई असेल आणि त्या वस्तू खरेदी करणे परवडत नसेल तर झालेल्या आर्थिक विकासाला सर्वसमावेशक विकास म्हणता येणार नाही.

अशा प्रकारे दारिद्र्य निर्मूलन, राहणीमानाचा उच्च दर्जा, शिक्षणाच्या संधी, चांगले आरोग्य, स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीचा दर्जा मिळणे, सामाजिक समता, आर्थिक समता, ग्रामीण विकास, बेरोजगारीचे निर्मूलन, जीवनावशक वस्तूंची उपलब्धता हे सर्वसमावेशक आर्थिक वृद्धीचे प्रमुख व महत्वाचे निकष आहेत. म्हणजे देशातील दरिद्र्याचे निर्मूलन झाले असेल, लोकांच्या राहणीमानाचा दर्जा उच्च असेल, लोकांना शिक्षणाच्या समान संधी उपलब्ध असतील, लोकांच्या आरोगाचा दर्जा चांगला असेल, देशात आर्थिक आणि सामाजिक विषमता तीव्र स्वरूपाची नसेल तर देशात सर्वसमावेशक वृद्धी घडून आली आहे, असे म्हणता येते. सर्वसमावेशक वृद्धीच्या वरील विविध निकषावरून असे दिसते की, सर्वसमावेशक वृद्धीच्या संकल्पनेत केवळ भौतिक विकासाला (उत्पन्नाला) महत्व नसते तर सामाजिक /मानवी विकासाला (आरोग्य, शिक्षण, पर्यावरण इत्यादी) सुद्धा महत्व असते. म्हणून सर्वसमावेशक वृद्धी म्हणजे भौतिक विकास आणि सामाजिक/मानवी विकास होय. उत्पन्नातील विषमता (Material Deprivation) नष्ट करणाबरोबरच सामाजिक वंचितता (Human Deprivation) नष्ट करणाला प्राधान्य देणे आवश्यक असते.

**सर्वसमावेशक वृद्धीसाठी भारत सरकारचे प्रयत्न :–**

देशात सर्वसमावेशक वृद्धी घडून येणे आवशक असले तरी ती लगेच घडून येत नाही अविकसित किंवा मागासलेल्या देशात जेंव्हा विकासाची प्रक्रिया सुरू होते. तेंव्हा विकासाचे फायदे थोड्या लोकानांच मिळतात. अनेक लोकांना दारिद्र्य, बेकारी या प्रश्नांशी सामना करावा लागतो, हा जगातील अनेक देशांचा अनुभव आहे. भारत, चीन, इत्यादी अनेक देशात आर्थिक विकासाची प्रक्रिया सुरू होऊन सुमारे ८० वर्षे झाली तरी या दोन्ही देशातील गरीबी, बेकारी, उपासमार, विषमता हे प्रश्न पूर्णपणे संपलेले नाहीत. म्हणून भारत सरकारने अनेक वर्षापासून नुसत्या विकासाला नव्हे तर सर्वसमावेशक विकासाला किंवा सर्वसमावेशक वृद्धीला महत्व दिले आहे. सर्वसमावेशक वृद्धीची प्रक्रिया ही दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे. सरकारला काळजीपूर्वक, पद्धतशीर आणि नियोजनपूर्वक सर्वसमावेशक वृद्धी घडवून आणावी लागते. त्यासाठी धोरण आखावे लागते. सर्वसमावेशक वृद्धी धोरण म्हणजे काय? ते खालील शब्दात स्पष्ट केले आहे.

''सरकारचे आर्थिक विषमता, सामाजिक विषमता, प्रादेशिक विषमता कमी करण्याचे, स्त्री–पुरूष विषमता/अंतर कमी करण्याचे, दारिद्र्य आणि बेकारी निर्मूलनाचे, देशातील शोषित व वंचित लोकांना न्याय आणि आर्थिक लाभ मिळवून देण्याचे धोरण म्हणजे सर्वसमावेशक वृद्धीचे धोरण होय.''

स्वातंत्र्योत्तर काळात भारताचा बराच आर्थिक विकास झाला. परंतु सर्वसमावेशक विकास झाला नाही हे खरे असले तरी सर्वसमावेशक आर्थिक विकास व्हावा यासाठी सरकारने स्वातंत्र्यप्राप्तीपासून प्रयत्न केले आहेत, हे वास्तव आहे. प्रत्येक पंचवार्षिक योजनेत सरकारने दारिद्र्य निर्मूलनासाठी, बेकारी निर्मूलनासाठी ज्या उपाययोजना केल्या त्या सर्वसमावेशक वृद्धीसाठीच केल्या आहेत. भारताच्या ११ व्या आणि १२ पंचवार्षिक योजनेची उद्दिष्ट्ये पाहिली तर ती सर्वसमावेशक आर्थिक वृद्धीसाठी पोषक अशीच आहेत. ११ व्या आणि १२ व्या पंचवार्षिक योजनेत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्पसंख्यांक, स्त्रिया, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय लोक यांच्या विकासावर भर दिला असून दारिद्र्य निर्मूलन आणि आंतरभूत सुविधा निर्माण करण्यासाठी भर दिला आहे. या विविध योजनांच्या माध्यमातून सरकार सर्वसमावेशक आर्थिक वृद्धी घडवून आणण्याचा प्रयत्न करीत आहे. सर्वसमावेशक विकास घडवून आणण्यासाठी भारत सरकारने पंतप्रधान जनधन योजना (PMJDY), राजीव ऋण योजना (RRY), आम आदमी विमा योजना (AABY), राष्ट्रीय सामाजिक सहाय्यता कार्यक्रम (NSAP), प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, अटल पेन्शन योजना, किसान कार्ड, प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना (PMKSY), राष्ट्रीय आरोग्य मिशन, (NHM), इंदिरा आवास योजना, राजीव आवास योजना, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना (PMGSY), एकात्मिक बालविकास सेवा योजना (ICDS), महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अशा शेकडो योजना आखून त्यांची अंमलबजावणी सूरू केली आहे.

**सर्वसमावेशक वृद्धी घडून येण्यासाठी उपाय/सूचना :-**

भारताचा दिवसेंदिवस झपाट्याने आर्थिक विकास होत असला तरी गरीबी, बेकारी, कुपोषण, बालमृत्यू, आर्थिक विषमता, शेतकऱ्यांच्या आत्महत्या या आढळून येणाऱ्या समस्या भारताचा विकास हा सर्वसमावेशक नाही हेच स्पष्ट करतात. शाश्वत विकासासाठी आणि कल्याणकारी राज्याच्या निर्मितीसाठी भारतात सर्वसमावेशक वृद्धी घडून येणे आवश्यक आहे. भारतात सर्वसमावेशक वृध्दी घडून यावी यासाठी काही उपाय खालीलप्रमाणे सुचवले आहेत.

**१) निरक्षरतेचे उच्चाटन व शिक्षणाचा दर्जा उंचावणे :-**

भारतात आजही जवळ जवळ २५ टक्के लोकांना त्यांच्या प्रादेशिक भाषेत लिहिता-वाचता येत नाही. निरक्षरतेमुळे बहुसंख्य लोकांना सरकारच्या विकास कार्यक्रमात सहभागी होता येत नाही. निरक्षरतेमुळे व अल्पशिक्षणामुळे अशिक्षित व अल्पशिक्षित लोकांना चांगल्या उत्पन्नाच्या नोकऱ्या मिळू शकत नाहीत. म्हणून निरक्षरतचे उच्चाटन करणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच केवळ निरक्षरतेचे उच्चाटन करून सर्वसमावेशक आर्थिक वृध्दीचे ध्येय गाठता येणार नाही तर आपल्या देशातील शिक्षणाचा दर्जा उंचावला पाहिजे. चांगले, सकस, व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्थांची सुविधा अत्यंत माफक खर्चात जनतेला उपलब्ध करून दिली पाहिजे. त्याशिवाय भारतीय तरूणांना चांगले उत्पन्न देणाऱ्या नोकऱ्या मिळणार नाहीत. तसेच भरपूर उत्पन्न देणारे व्यवसायही सुरू करता येणार नाहीत. थोडक्यात सर्वसमावेशक वृध्दी घडवून आणण्यासाठी देशातील निरक्षरतेचे उच्चाटन करणे, उच्च शिक्षितांचे प्रमाण वाढवणे आणि प्राथमिक ते विद्यापीठीय शिक्षणाचा दर्जा उंचावणे अत्यंत आवश्यक आहे.

**२) सार्वजनिक वितरण व्यवस्था बळकट करणे :-**

भारतात गरीब/दरिद्री लोकांचे प्रमाण २५ ते ४० टक्के एवढे मोठे असल्याने सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे महत्त्व अद्याप संपुष्टात आलेले नाही. सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील सरकारमान्य स्वस्त धान्य दुकाने ही गरीबांची आधारस्तंभ आहेत. म्हणून सरकारने ही व्यवस्था मोडीत न काढता या व्यवस्थेतील दोष काढून टाकून ही व्यवस्था अत्यंत बळकट बनवली पाहिजे. तरच आर्थिक विकासाचे फायदे गरीबांपर्यंत पोहोचतील.

**३) दारिद्र्य निर्मूलन आवश्यक :-**

भारताला स्वातंत्र्य मिळून ७७ वर्षे पूर्ण झाली तरी दारिद्र्याचे उच्चाटन करण्यात सरकारला, नियोजनकारांना यश आलेले नाही. आजही देशात २५ ते ३० टक्के लोक गरीब किंवा दरिद्री आहेत. आर्थिक विकासाचे फायदे या लोकांपर्यंत पुरेशा प्रमाणात पोहचलले नाहीत. जोपर्यंत दारिद्र्याचे उच्चाटन होत नाही, तोपर्यंत सर्वसमावेशक विकास घडून आला असे म्हणता येणार नाही. म्हणून दारिद्र्य निर्मूलनाच्या कार्यक्रमावर सरकारने भर दिला पाहिजे. आर्थिक विकासाच्या कार्यक्रमात (प्रक्रियेत) गरीबांना सहभागी केले पाहिजे. त्याशिवाय दारिद्र्य नष्ट होणार नाही. दारिद्र्य नष्ट झाल्याशिवाय झालेल्या आर्थिक विकासाला

सर्वसमावेशक विकास म्हणता येणार नाही. अमर्त्य सेन यांच्या मते, ''दारिद्र्याचा प्रत्यक्ष घनिष्ठ संबंध मनुष्यातील मूलभूत क्षमतापासून दुरावलेल्या गरीबांशी अधिक जवळचा आहे. गरीबाजवळ असणारे कमी उत्पन्न ही गौण बाब आहे. गरीबांच्या सुप्त क्षमता शक्तीत आणि कौशल्यात जसजशी वाढ होईल तसतशी त्या गरीबांना दारिद्र्यापासून मुक्त होण्याची स्वातंत्र्य प्रेरणा मिळते''

**४) ग्रामीण विकासावर भर :–**

सरकारने शहराबरोबरच खेड्यांच्या विकासाकडेही लक्ष दिले पाहिजे. कारण आजही देशातील जवळ जवळ ७० टक्के लोक खेड्यात राहतात आणि खेड्यांचा अद्यापही म्हणावा तसा विकास झालेला नाही. ग्रामीण भागात वीज, पाणी, रस्ते, शिक्षण, क्रीडांगणे इत्यादी सुविधा निर्माण केल्या पाहिजेत. ग्रामीण भागाचा विकास झाल्याशिवाय भारतात सर्वसमावेशक वृध्दी घडून आली असे म्हणता येणार नाही.

**५) शेतीचा विकास :–**

भारतात अल्पभूधारक आणि सीमांत शेतकऱ्यांचे प्रमाण जवळ जवळ ८० टक्के एवढे आहे. हे सर्व शेतकरी अत्यंत गरीब आहेत. म्हणून सरकारने या शेतकऱ्यांच्या शेतीच्या विकासाकडे लक्ष दिले पाहिजे. यामुळे एकूण कृषी उत्पादनातही वाढ होईल आणि अल्पभूधारक व सीमांत शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होईल. शेतीच्या विकासामुळे भूमिहीन शेतमजूरांनाही रोजगार आणि मजूरी अधिक मिळू शकेल. देशातील लहान शेतकरी, सीमांत शेतकरी व शेतमजूर यांचा विकास घडून आला तरच भारतात सर्वसमावेशक वृध्दी घडून आली असे म्हणता येईल.

**६) प्रादेशिक असमतोल कमी करणे :–**

आर्थिक विकासातील प्रादेशिक असमतोल कमी झाल्याशिवाय विकासाचे फायदे सर्व जनतेला मिळणार नाहीत व सर्वसमावेशक आर्थिक विकास/वृध्दी होणार नाही. म्हणून सरकारने डोंगरी व मागास राज्यांच्या विकासावर भर देणे आवश्यक आहे. राज्यांतर्गत आणि देशांतर्गत प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी सरकार अनेक वर्षापासून प्रयत्न करीत आहे. परंतु प्रादेशिक असमतोल फारसा कमी झालेला नाही. म्हणून सर्वसमावेशक आर्थिक वृध्दीसाठी सरकारने प्रादेशिक असमतोल कमी करणे अत्यंत आवश्यक आहे.

**७) वाढत्या लोकसंख्येला आळा घालणे :–**

जगात लोकसंख्या वाढीचा वेग सर्वात जास्त भारताचा आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे आर्थिक विकासाचे फायदे सर्व लोकांपर्यंत पोहचत नाहीत. म्हणून लोकसंख्या वाढीच्या वेगावर नियंत्रण ठेवले पाहिजे. गरीबांनी एकाच अपत्यावर कुटुंब नियोजन केले तर गरीबांची गरीबी कमी होईल आणि लोकसंख्या वाढीचा वेगही कमी राहील. त्यामुळे आर्थिक विकासाचे फायदे जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचून सर्वसमावेशक आर्थिक वृध्दीचे उद्दिष्ट साध्य होऊ शकेल. थोडक्यात, सर्वसमावेशक आर्थिक वृध्दीसाठी भारतासारख्या विकसनशील देशांनी वाढत्या लोकसंख्येला आळा घालणे अत्यंत आवश्यक आहे.

**९) किमान वेतन कायद्याची अंमलबजावणी कडक करणे :-**

भारतात अद्यापही प्राथमिक आणि इतर असंघटित क्षेत्रात कष्टकऱ्यांना सरकारने ठरवून दिलेल्या किमान वेतनापेक्षा कमी वेतन दिले जाते. त्यामुळे असंघटित क्षेत्रातील बहुसंख्य लोकांच्या प्राथमिक गरजा सुध्दा भागत नाहीत. म्हणून सरकारने किमान वेतन कायद्याची अंमलबजावणी कडकपणे, प्रामाणिकपणे केली पाहिजे. कोणालाही किमान वेतनापेक्षा कमी वेतन मिळणार नाही याची काळजी सरकारने घेतली पाहिजे.

**१०) सामाजिक सुरक्षितता योजनावरील खर्चात वाढ आवश्यक :-**

भारतात सामाजिक सुरक्षितता योजना राबवल्या जातात. सामाजिक सुरक्षिततेच्या अनेक चांगल्या योजना आहेत. या योजनांचा जास्तीत जास्त लोकांना जास्तीत जास्त फायदा व्हावा यासाठी या योजनावरील खर्चात सरकारने वाढ करणे आवश्यक आहे. तसेच या योजना सर्व गरजू व्यक्तीपर्यंत पोहचतील याची काळजी घेणे आवश्यक आहे. सामाजिक सुरक्षितता योजनांचे लाभ समाजातील वंचित लोकांपर्यंत पोहचले पाहिजेत. जागतिकीकरणाच्या नावाखाली सरकारने सामाजिक सुरक्षितता योजनावरील खर्च कमी करू नये. कारण तसे झाले तर सर्वसमावेशक वृद्धीचे उद्दिष्ट गाठणे शक्य होणार नाही.

**११) रोजगाराची/नोकरीची शंभर टक्के हमी :-**

भारत सरकारने देशातील प्रत्येक नागरिकाला रोजगाराची किंवा नोकरीची शंभर टक्के हमी दिली पाहिजे. नोकरी करण्यास पात्र असणाऱ्या प्रत्येकाला सरकारने नोकरी दिल्यास बेकारी, गरीबी या समस्या निर्माण होणार नाहीत. जोपर्यंत देशातील बेकारी, गरीबी नष्ट होत नाही तोपर्यंत सर्वसमावेशक आर्थिक वृद्धी दृष्टीस पडणार नाही. म्हणून सरकारने देशातील प्रत्येक नागरिकास रोजगाराची/नोकरीची हमी दिली पाहिजे.

**समारोप**

भारतासारख्या अनेक विकसनशील देशात आर्थिक विकासाची प्रक्रिया जोरात चालू आहे. परंतु या देशातील जवळजवळ ४० टक्के लोकांना आर्थिक विकासाचे लाभ फारसे मिळालेले नाहीत. आर्थिक विकासाचे फायदे देशातील सर्व जनतेपर्यंत पोहचत नाहीत तोपर्यंत सर्वसमावेशक आर्थिक वृद्धी झाली असे म्हणता येत नाही. भारतात सर्वसमावेशक आर्थिक वृद्धी घडून आली नसली तरी ती घडून येणे अत्यंत आवश्यक आहे. देशाचा विकास सर्वसमावेशक नसेल, आर्थिक विकासापासून देशातील काही लोक वंचित राहिले असतील तर अशा देशाला महासत्ता म्हणता येणार नाही. देशात सर्वसमावेशक आर्थिक वृद्धी घडून आली तर नक्षलवादी किंवा फुटीरवादी चळवळी निर्माण होणार नाहीत. विकास सर्वांच्यापर्यंत पोहचला नाही तर काही लोक हिंसक किंवा नक्षलवादी बनतात हा अनुभव आपण घेतला आहे व घेत आहोत. म्हणून नुसत्या आर्थिक विकासाला नव्हे तर सर्वसमावेशक आर्थिक विकासाला महत्व दिले पाहिजे.

## १.२.७ शाश्वत विकास (Sustainable Development)

**प्रास्ताविक :–**

शाश्वत विकासाला 'चिरंतर विकास', 'टिकाऊ विकास', 'चिरकालीन विकास', 'चिरंजीवी विकास', 'दीर्घकालीन विकास' असे सुध्दा म्हणतात. अलिकडच्या काळात संपूर्ण जगभर शाश्वत विकासाची संकल्पना चर्चिली जात असली तरी सन १९७२ मध्ये स्टॉकहोम येथे जी पहिली 'मानव आणि विकास परिषद' (पृथ्वी बचाओ परिषद) संपन्न झाली होती तेव्हापासून शाश्वत विकासाचे महत्त्व जगासमोर येऊ लागले होते. १९९२ मध्ये रिओ डी जानेरो येथे 'पर्यावरण व विकास परिषद' भरली हाती. या परिषदेला वसुंधरा परिषद असे म्हणतात. या परिषदेमुळे सुध्दा अशाश्वत विकासाऐवजी शाश्वत विकासाची कास धरली पाहिजे हे जगाच्या ध्यानात आले होते. २६ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २००२ या काळात संयुक्त राष्ट्र संघटनेने दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग येथे जी परिषद भरविली होती, त्या परिषदेचे नावच 'जागतिक शाश्वत परिषद' असे होते. या परिषदेमुळे सुध्दा शाश्वत विकासाची आवश्यकता जगाच्या ध्यानात आली होती. आता संपूर्ण जगभर विशेषत: अविकसित आणि विकसनशील देशात शाश्वत विकासाची संकल्पना महत्त्वाची मानली जाऊ लागली आहे. १९८७ च्या 'वर्ल्ड कमिशन ऑन एनव्हायरन्मेंट ॲन्ड डेव्हलपमेंट' (ब्रुटलँड रिपोर्ट) मध्ये शाश्वत विकासाची व्याख्या खालीलप्रमाणे दिली आहे.

''असा विकास जो भावी पिढ्यांची त्यांच्या स्वत:च्या गरजा भागवण्याची क्षमता कमी न करता सध्याच्या गरजा भागवतो.''

शाश्वत विकासाची आणखी एक व्याख्या सांगता येईल. ती अशी, ''मानवाच्या गरजा भागविणाची निसर्गामध्ये आज असणारी क्षमता भविष्यातही कायमपणे टिकून राहणाची खात्री असेल तर अशा विकासाला शाश्वत विकास असे म्हणतात.''

शाश्वत विकासासाठी प्रामुख्याने सरकारी पातळीवरून प्रयत्न केले जातात. म्हणून 'सध्याचा विकास भविष्यातही टिकून राहील याची काळजी घेणाऱ्या किंवा तसे उपलब्ध मनुष्यबळाचे व नैसर्गिक साधनसंपत्तीच्या सुयोग्य व पर्याप्त वापर करण्याचे नियोजन करणाऱ्या सरकारी धोरणास शाश्वत विकासाचे धोरण असे म्हणतात.

आज संपूर्ण जगालाच पर्यावरणीय समस्येने चिंतेत टाकले आहे. जगातील सर्वच देश विकासाचा वेग वाढविणाचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीवर प्रचंड ताण पडून झालेला विकास भविष्यात टिकून राहणाची खात्री कमी झाली आहे. देशाचा आज झालेला सर्व प्रकारचा विकास भविष्यात सुध्दा टिकून राहण्याची खात्री वाटत असेल तरच त्याला शाश्वत विकास म्हणतात. परंतु देशाचा विकास होत असताना नैसर्गिक साधनसंपत्ती संपुष्टात येत असेल, तिची गुणवाा व उत्पादकता ढासळत असेल, पर्यावरणाच्या प्रदूषणाची समस्या गंभीर स्वरूपाची बनली असेल तर आज झालेला किंवा होत असलेला

विकास भविष्यात टिकून राहील याची खात्री देता येत नाही. म्हणून अशा प्रकारच्या विकासाला अशाश्वत विकास असे म्हणतात.

थोडक्यात, ज्या आर्थिक विकासामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होतो त्या विकासाला शाश्वत विकास म्हणता येणार नाही. कारण अशा देशातील निसर्ग भविष्यातील मानवी पिढ्यांच्या गरजा भागवू शकणार नाही.

सारांश, शाश्वत विकासाच्या संकल्पनेत मानव जातीचा सध्याचा विकास जसा अभिप्रेत आहे तसाच भविष्यातील मानव जातीचा विकास सुध्दा अपेक्षित आहे.

**शाश्वत विकासाचे निर्देशांक** (Indicators of Sustainable Development)

देशाचा विकास हा शाश्वत आहे की अशाश्वत आहे हे पाहणे अत्यंत महत्वाचे असते. शाश्वत विकासाच्या निर्देशांकावरून आपणास शाश्वत विकासाची कल्पना येते. शाश्वत विकासाचे काही प्रमुख निर्देशक थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

**१) पर्याप्त लोकसंख्या :-**

देशाची लोकसंख्या जर पर्याप्त (Optimum) असेल तर त्या देशाचा आर्थिक विकास शाश्वत आहे, असे म्हणता येते. देशाची लोकसंख्या अतिरिक्त (Excess) असेल तर आर्थिक विकासावर विपरित परिणाम होतो. लोकसंख्या अतिरिक्त असेल तर नैसर्गिक साधनसंपत्तीचा अमर्याद वापर होतो. नैसर्गिक साधनांची पिळवणूक होते. त्यामुळे भावी पिढ्यांचे नुकसान होते. म्हणून ज्या देशांची लोकसंख्या अतिरिक्त असते त्या देशांचा विकास शाश्वत नसतो तर अशाश्वत किंवा अस्थिर असतो. म्हणून शाश्वत विकासासाठी देशाची लोकसंख्या पर्याप्त असणे आणि लोकसंख्या वृध्दीचा दर कमीत कमी असे आवशक असते. भारत, चीन सारख्या देशात सुमारे ४० ते ५० कोटी लोकसंख्या अतिरिक्त आहे. भारताची आजची एकूण लोकसंख्या सुमारे १४२ कोटीच्या आसपास आहे. त्यामुळे भारताचा आज थोडाफार विकास झाला आहे, तो भविष्यात टिकून राहिला याची खात्री/शाश्वती राहिलेली नाही.

**२) वास्तव राष्ट्रीय उत्पन्न :-**

वास्तव राष्ट्रीय उत्पन्न हा सुध्दा शाश्वत आर्थिक विकासाचा महत्वाचा निर्देशक आहे. वास्तव राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे वस्तूरूप उत्पन्न किंवा खरे उत्पन्न होय. वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात (वस्तू व सेवा यांच्या उत्पादनात) वाढ होणाचा दर सर्वोच्च असला पाहिजे. तरच देशातील चालू पिढ्यांच्या/वर्तमानातील लोकसंख्येच्या गरजा भागून भविष्यातील पिढ्यांच्या गरजा सुध्दा भागू शकतील. म्हणून वास्तव राष्ट्रीय उत्पन्न हा शाश्वत आर्थिक विकासाचा महत्वाचा निर्देशक आहे.

**३) पाण्याची उपलब्धता व वापर :-**

पाण्याची पुरेशी उपलब्धता आणि त्याचा योग वापर हा शाश्वत विकासाचा महत्वाचा निर्देशक आहे. पाण्याचा वापर पिणासाठीच केला जात नाही तर कृषी, उद्योग आणि पशुपालन व्यवसायासाठी मोठ्या

प्रमाणात केला जातो. त्यासाठी देशात पाण्याची उपलब्धता पुरेशा प्रमाणात असली पाहिजे. तसेच पाण्याचा वापरही योग्य व काटकसरीने झाला पाहिजे. देशात पाणी पुरेशा प्रमाणात उपलब्ध असेल तर देशाचा विकास शाश्वत आहे, असे म्हणता येते. देशात पाण्याची टंचाई असेल आणि पाण्याचा दुरूपयोग होत असेल तर देशात होत असलेला विकास हा अस्थिर विकास आहे किंवा अशाश्वत विकास आहे, असे म्हणता येईल.

**४) रोजगार संधीत वाढ :-**

देशात प्रचंड बेकारी असेल तर होत असलेल्या विकासाला शाश्वत विकास म्हणता येणार नाही. आर्थिक विकास होत असताना देशात पुरेशा रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या पाहिजेत. तरच होत असलेला विकास टिकून राहणाची खात्री देता येते. कारण बेरोजगारीमुळे चांगले मनुष्यबळ वाया जाते. बेरोजगार व्यक्तींचा उत्पादक कार्यासाठी वापर करता येत नाही. देशात विकास होत असताना पुरेशा रोजगार संधी निर्माण होत असतील तर लोकांवर बेरोजगार होणाची पाळी येत नाही. म्हणून रोजगाराभिमुख विकासाला शाश्वत विकास असे म्हणता येईल.

**५) जनतेचे उत्तम आरोग्य :-**

देशातील जनतेचे आरोग्य चांगले असणे देशाच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत आवशक असते. देशात कुपोषण, बालमृत्यू व इतर रोगाच्या साथींचे प्रमाण जास्त असेल तर देशाचा होत असलेला आर्थिक विकास शाश्वत विकास आहे, असे म्हणता येणार नाही. देशातील रोगराईचे, कुपोषण, बालमृत्यू इत्यादी समस्यांचे उच्चाटन झाले तरच देशातील विकासाला शाश्वत विकास असे म्हणतात. म्हणून देशातील जनतेचे उत्तम आरोग्य हा शाश्वत विकासाचा महत्वाचा निर्देशक आहे.

**६) दारिद्र्याचे उच्चाटन :-**

दारिद्र्याचे उच्चाटन हा शाश्वत आर्थिक विकासाचा अत्यंत महत्वाचा निर्देशक मानता येईल. आर्थिक विकासाची प्रक्रिया चालू असताना गरीबांचे प्रमाण कमी कमी होत गरीबी संपुष्टात आली पाहिजे. देशात दारिद्र्याचे प्रमाण मोठे असेल आणि विकासाचा/आर्थिक वृध्दीचा दर जास्त असूनही त्या देशातील विकासाला शाश्वत विकास म्हणता येणार नाही. देशाचा विकास भविष्यातही टिकून रहावा यासाठी देशातील वर्तमानातील दारिद्र्य नष्ट झाले पाहिजे. भारताचा विचार केला तर भारतात शेकडो वर्षापासून दारिद्र्याचा प्रश्न अस्तित्वात आहे. सरकारी आकडेवारीनुसार सध्या भारतात २५ टक्के लोक दारिद्र्य रेषेखाली आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण ८० टक्केपेक्षा जास्त होते. भारतातील दारिद्राची समस्या संपलेली नसल्याने भारतातील आर्थिक विकासाला शाश्वत विकास म्हणता येणार नाही.

**७) सुरक्षित व चांगले अन्नधान्य :-**

शाश्वत विकासाचा आणखी एक महत्वाचा निर्देशक म्हणजे देशातील अन्नधान्य सुरक्षित व चांगले असणे होय. अन्नधान्य जर प्रदूषित असेल तर त्याचे मानवी आरोगावर अत्यंत वाईट परिणाम होतात. जनुकीय बदल केलेले अन्नधान्य घातक असते. म्हणून देशातील सध्याच्या लोकसंख्येला आणि भावी

पिढ्यांना सुरक्षित व चांगले अन्नधान्य मिळणे आवशक आहे. असे सुरक्षित व चांगले अन्नधान्य देशात उपलब्ध असेल व पुढेही ते उपलब्ध राहणाची खात्री असेल तर होत असलेल्या किंवा झालेल्या आर्थिक विकासाला शाश्वत विकास असे म्हणता येईल.

**८) शुध्द/स्वच्छ हवा :–**

शुद्ध किंवा स्वच्छ हवा हा सुध्दा शाश्वत विकासाचा आणखी एक महत्वाचा निर्देशक आहे. जलद आर्थिक विकासासाठी देशाला औद्यागिकरणाची कास धरावी लागते. औद्यागिकरणाचा किंवा औद्योगिक विकासाचा वेग जितका जास्त तितका आर्थिक विकासाचा वेग जास्त राहतो. परंतु औद्योगिक विकासासाठी मोठमोठे औद्योगिक प्रकल्प उभे करावे लागतात. त्यामुळे हवा प्रदूषित होऊन मानवी आरोग बिघडते. त्वचा विकार, फुफ्फुसाचे विकार असे अनेक विकार किंवा आजार उद्भवतात. त्यामुळे होत असलेल्या किंवा झालेल्या आर्थिक विकासाला शाश्वत विकास असे म्हणता येणार नाही. औद्योगिक विकास होत असताना म्हणजे देशभर कारखानदारी क्षेत्राची वाढ होत असताना हवा प्रदूषित होत नसेल, लोकांना स्वच्छ किंवा शुध्द हवा उपभोगावयास मिळत असेल तर अशा देशाचा विकास हा शाश्वत विकास आहे, असे म्हणता येते.

**९) नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग वापर, संरक्षण व संवर्धन :–**

जलद आर्थिक विकासासाठी अविकसित आणि विकसनशील देशांना नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर करावा लागतो. नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर बेसुमार आणि चुकीचा झाला तर भावी पिढांचे मोठे नुकसान होते. पुन्हा निर्माण न होऊ शकणारी नैसर्गिक साधनसंपत्ती उदा. भूगर्भातील विविध प्रकारची खनिज संपत्तीचे साठे संपुष्टात येऊ लागतात. त्यामुळे भावी पिढ्यांना अशा प्रकारच्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा पुरेशा प्रमाणात उपभोग घेता येत नाही. म्हणून ज्या देशात विकासासाठी नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य वापर केला जात असेल, नैसर्गिक साधनसंपीचे संरक्षण व संवर्धन केले जात असेल तर अशा देशातील विकास दीर्घकाळ/चिरंतर टिकून राहणारा असतो. म्हणजेच तो शाश्वत असतो.

**१०) मानव विकास निर्देशांक :- (Human Resource Development)**

जर देशातील मनुष्यबळाचा/मानवी साधनसंपत्तीचा दर्जा चांगला असेल तर याचा अर्थ देशातील विकास शाश्वत विकास आहे, असा होतो. केवळ दरडोई उत्पन्नात आणि राष्ट्रीय उत्पन्नात वाढ म्हणजे आर्थिक विकास नव्हे. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत देशातील मानवी साधनसंपत्तीचा सुध्दा विकास झाला पाहिजे. मानव विकासाच्या बाबतीत भारत जगात खूप पिछाडीवर आहे. मानव विकासात १७८ देशात भारताचा १२८ वा क्रमांक आहे. यावरून भारत मानव विकासात किती मागासलेला आहे याची कल्पना येते. अमेरिका, जपान, फ्रान्स या राष्ट्रांचा मानव विकास निर्देशांक चांगला आहे. त्यामुळे त्या देशांचा आर्थिक विकास हा शाश्वत विकास आहे, असे म्हणता येते.

**११) योग्य तापमान :–**

शाश्वत विकासाचा आणखी एक महत्वाचा निर्देशक म्हणजे देशातील तापमान हा होय. तापमान योग्य असले पाहिजे. वाढत्या तापमानाची समस्या देशात निर्माण झालेली असेल तर आर्थिक विकासाचा दर उच्च असूनही त्याला शाश्वत विकास म्हणता येणार नाही. कारण भविष्यात असेच तापमान वाढत राहिले तर अनेक पर्यावरणीय समस्या निर्माण होऊन झालेला विकास भविष्यात टिकन राहणाची शाश्वती राहत नाही. म्हणून देशातील आजचे/ सध्याचे आणि भविष्यातील तापमान वाढणार नाही अशा प्रकारे देशाचा आर्थिक विकास घडून आला पाहिजे. तरच त्याला शाश्वत विकास म्हणता येईल. जागतिक तापमान वाढीच्या समस्येने अनेक देशांच्या विकासाच्या शाश्वतीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

अशा प्रकारे पर्याप्त लोकसंख्या, वास्तव राष्ट्रीय उत्पन्नातील वृध्दी, पाण्याची पुरेशी उपलब्धता व पाण्याचा योग्य वापर, रोजगार संधीत वाढ, जनतेचे उत्तम आरोग्य, दारिद्र्याचे समूळ उच्चाटन, सुरक्षित व चांगले अन्नधान्य, शुध्द किंवा स्वच्छ हवा, नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य वापर, मनुष्यबळाचा चांगला विकास इत्यादी शाश्वत विकासाचे प्रमुख निर्देशक आहेत. शाश्वत विकासाचे आणखी काही निर्देशक सांगता येतील. उदा. उर्जेचा योग्य वापर, स्थानिक गरजांची पूर्तता, नैसर्गिक आपत्तींचे व्यवस्थापन इ. शाश्वत विकासाचे निर्देशक असून शाश्वत विकासाच्या निर्देशकांचे आर्थिक निर्देशक, सामाजिक निर्देशक अशा गटात सुध्दा वर्गीकरण करता येते.

**जागतिक शाश्वत विकास परिषद –जोहान्सबर्ग : २००२**

२६ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २००२ या काळात दक्षिण अफ्रिकेतील जोहान्सबर्ग येथे संयुक्त राष्ट्रसंघाने (United Nations Organization) जागतिक शाश्वत विकास परिषद भरविली होती. या परिषदेत १०४ राष्ट्रांचे व सरकारांचे प्रमुख, राष्ट्रीय प्रतिनिधी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, व्यापार व उद्योग क्षेत्रातील लोक आणि युवक, शेतकरी, स्थानिक लोकसमूह, स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी, विज्ञान–तंत्रज्ञान क्षेत्रातील लोक, स्त्रिया, कामगार व ट्रेड युनियन्स यांचे प्रतिनिधी असे सुमारे २१,००० प्रतिनिधी सहभागी झाले होते. या परिषदेने सर्वानुमते एक '३७ कलमांचा जाहीरनामा' प्रसिध्द केला. या जाहीरनाम्यातील काही महत्वाची कलमे खाली दिली आहेत.

**अ) कलम ११ :–**

दारिद्र्याचे उच्चाटन, उत्पादन व उपभोग पध्दतीमध्ये बदल आणि आर्थिक–सामाजिक विकासाला पायाभूत असणाऱ्या नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण व व्यवस्थापन हे शाश्वत विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे याची आम्हाला जाण आहे.

**ब) कलम १२ :–**

मानवी समाजात गरीब आणि श्रीमंत यामध्ये विभागणीची खोल दरी आणि विकसित व विकसनशील देशामध्ये सतत वाढणारी दरी व जागतिक समृध्दी सुरक्षितता आणि स्थैर्य संकटात येत आहे.

**क) कलम १५ :–**

या जागतिक विषमता खोलवर रुजण्याचा धोका आपण पाहतो आहोत आणि गरीबांचे जीवन आमूलाग्रपणे बदलेल अशी रीतीने जर आपण कृती केली नाही तर जगातील गरीब जनतेचा तिचे प्रतिनिधी आणि ज्या लोकशाहीची आपण बांधिलकी मानतो ती लोकशाही, या दोन्हीवरचा विश्वास उडून जाईल.

**ड) कलम २१:–**

जगतिक मानव समाजाच्या हाती आज गरिबी उच्चाटन व शाश्वत विकासाची आव्हाने पेलण्याइतकी साधने आणि संसाधने उपलब्ध आहेत. हे आजचे वास्तव आहे. ही संसाधने मानव समाजाच्या कल्याणासाठी वापरली जावीत, यासाठी आम्ही सामूहिकपणे विशेष पावले टाकू.

जागतिक शाश्वत विकास परिषदेने सुमारे २२५ हून अधिक तास वाटाघाटी/चर्चा करून १५० कलमी 'अंमलबजावणी योजना' मान्य केली. या अंमलबजावणी योजनेतील १५० कलमे खालील उपविभागात वाटली गेली आहेत.

१) दारिद्र्याचे उच्चाटन :-

२) उत्पादन व उपभोगाच्या अशाश्वत पध्दती बदलणे :-

३) आर्थिक व सामाजिक विकासासाठी पायाभूत नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण व व्यवस्थापन

४) जागतिकीकरणाच्या दुनियेत शाश्वत विकास

५) आरोग्य आणि शाश्वत विकास

६) छोट्या बेटावरील विकसनशील देशांचा शाश्वत विकास

७) आफ्रिकेचा शाश्वत विकास

८) इतर प्रादेशिक विभागाबद्दल पुढाकार (दक्षिण व मध्य अमेरिका, आशिया पॅसिफिक प्रदेश, पश्चिम आशियाई प्रदेश, युरोप इत्यादी)

९) अंमलबजावणीची साधने

१०) शाश्वत विकासासाठी संस्थात्मक चौकट (उद्दिष्ट्ये, आंतरराष्ट्रीय पातळीवरील रचना, संयुक्त राष्ट्रसंघाची भूमिका, तिच्या विविध उपांगांची भूमिका, आंतराष्ट्रीय संस्थांची भूमिका, प्रादेशिक पातळीवरील रचना, राष्ट्रीय पातळीवरील रचना आणि महत्वाच्या गटांचा सहभाग)

अशा प्रकारे संयुक्त राष्ट्रसंघटनेने सन २००२ मध्ये जोहान्सबर्ग येथे जी जागतिक शाश्वत विकास परिषद भरविली होती त्या परिषदेमुळे शाश्वत विकासाचे महत्त्व अधोरेखित झाले. उत्पादन आणि उपभोगाच्या अशाश्वत पध्दती बदलल्याशिवाय शाश्वत विकास अशक्य आहे, हे या परिषदेमुळे जगाला अधिक ठळकपणे समजले.

**संयुक्त राष्ट्र संघाची सहस्त्रकातील विकासाची ध्येये (Milennium Development Goals) :-**

**अ) संयुक्त राष्ट्रसंघाने सन २००० ते २०१५ करिता निश्चित केलेली आठ ध्येये :-**

संयुक्त राष्ट्रसंघाने शाश्वत विकासासाठी आठ ध्येये निश्चित केली होती. ही ध्येये २०१५ पर्यंत पूर्ण करण्याचे ठरविण्यात आले होते. संयुक्त राष्ट्रसंघाने ठरविलेली ही आठ ध्येये खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत.

**१) कुपोषण आणि दारिद्र्य कमी करणे :-**

जगातील गरीब आणि विकसनशील राष्ट्रामध्ये कुपोषणाची आणि दारिद्र्याची समस्या गंभीर आहे. ज्यांची मिळकत दिवसाला एक डॉलरपेक्षा कमी आहे त्यांचा समावेशक दरिद्री लोकामध्ये करून दारिद्र्य कमी करण्याचे ध्येय निश्चित करणात आले. सर्वांसाठी पूर्ण उत्पादनक्षम आणि सन्मानाचा रोजगार उपलब्ध करणे आणि १९९० ते २०१५ दरम्यान भुकेलेल्यांचे प्रमाण अर्ध्यावर आणणे ही लक्ष्ये ठरविण्यात आली होती.

सन २०१५ पर्यंत कुपोषण आणि दारिद्र्य कमी करण्यासाठी जी वरील लक्ष्ये ठरविणात आली होती ती संपूर्ण साध्य झाली नाहीत. ही साध्ये काही प्रमाणात साध्य झाली. १) दारिद्र्य रेषेखाली राहणाऱ्या लोकांचे प्रमाण जागतिक पातळीवर अर्ध्या टक्क्यांनी घटले. २) विकसनशील देशात १९९० मध्ये प्रतिदिवस १.३ डॉलर्स उत्पन्न असणाऱ्यांचे प्रमाण ४७ टक्के कमी झाले. २०१० मध्ये हेच प्रमाण २२% नी कमी झाले. ३) १९९०-९२ दरम्यान कुपोषणाचे जागतिक पातळीवर असलेले २३.२ टक्के प्रमाण २०१०-१२ मध्ये १४.९ टक्क्यापर्यंत कमी करणात यश आले. (अद्याप ८७० दक्षलक्ष लोक कुपोषितांच्या वर्गात आहेत.)

**२) सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण :-**

सन २००२ ते २०१५ या कालावधीत साध्य करावयाचे संयुक्त राष्ट्रसंघाचे दुसरे महत्वाचे ध्येय (Goal) प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे हे होते. कारण आजही अविकसित आणि विकसनशील देशात निरक्षर लोकांचे प्रमाण मोठे आहे. (भारतात आजही सुमारे २४ टक्के लोक निरक्षर आहेत.) अविकसित आणि विकसनशील देशात आजही सर्व लोकांपर्यंत शिक्षण पोहचलेले नाही. म्हणून प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे किंवा सर्वांच्यापर्यंत शिक्षणाची सुविधा पोहचवणे हे महत्वाचे ध्येय संयुक्त राष्ट्रसंघटनेने सन २००५ साली निश्चित केले होते. हे ध्येय सन २०१५ पर्यंत पूर्ण करण्याचे ठरविले होते.

प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे ध्येय गाठणासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने 'सन २०१५ पर्यंत सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण मिळेल याची खात्री करणे' हे लक्ष्य (Target) समोर ठेवले होते. संयुक्त राष्ट्रसंघाचे हे ध्येय (Goal) आणि लक्ष्य (Target) कितपत साध्य झाले हे पाहणे आवशक आहे. यानुसार असे दिसते की - १) प्रौढ आणि युवकांमध्ये साक्षरता दर वाढला. २) लैंगिक असमानता कमी झाली. ३) शाळाबाह्य मुलांची संख्या सन २००० मध्ये १०२ दशलक्ष होती. २०११ मध्ये ती ५७ दक्षलक्ष इतकी कमी झाली. ४) विकसनशील देशामध्ये प्राथमिक शिक्षणाला प्रवेश घेणाऱ्यांची संख्या सन २०१० मध्ये ९० टक्क्यावर आली.

**३) महिलांना शिक्षणाच्या समान संधी देणे व त्यांचे सबलीकरण करणे :–**

बहुतेक अविकसित आणि विकसनशील देशात स्त्रियांना पुरूषांइतक्या शिक्षणाच्या संधी मिळत नाहीत. तसेच त्यांचे आर्थिक, समाजिक, शैक्षणिक सक्षमीकरण झालेले नाही. म्हणून संयुक्त राष्ट्रसंघाने सन २०१५ पर्यंत 'महिलांना शिक्षणाच्या समान संधी देणे व त्यांचे सबलीकरण करणे' हे ध्येय (Goal) ठरविले होते. हे ध्येय गाठण्यासाठी ' प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणातील लैंगिक असमानता दूर करणे आणि सन २०१५ पर्यंत महिलांना सर्व शिक्षणाची दारे खुली करणे' ही लक्ष्ये (Targets) संयुक्त राष्ट्रसंघाने ठरविली होती. काही प्रमाणात ही लक्ष्ये साध्य झाल्याचे दिसते. उदा. १) जागतिक स्तरावर शेतीबाह्य रोजगारातील महिलांचे प्रमाण सन २०१२ मध्ये ४० टक्क्यावर गेले. २) संसदेतील महिलांच्या प्रतिनिधीत्वाचा वाटा २० टक्क्यावर गेला. अशा प्रकारे महिलांच्या सबलीकरणाच्या बाबतीत संपूर्ण यश आलेले दिसत नाही.

**४) बालमृत्यूचे प्रमाण कमी करणे :–**

शून्य ते सहा या वयोगटातील बालकांच्या मृत्यूस बालमृत्यू असे म्हणतात. अविकसित आणि विकसनशील देशात आजही बालमृत्यूची समस्या गंभीर आहे. म्हणून बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने 'पाच वर्षाखालील बालमृत्यूचा दर १९९० च्या तुलनेत २०१५ मध्ये २/३ ने कमी करणे' हे लक्ष्य (Target) ठरविले होते. हे लक्ष्य गाठण्यात म्हणावे तितके यश आलेले नाही. कारण '१९९० पासून पाच वर्षाखालील मृत्यूदर ४७ टक्क्यांनी कमी झाला असून अद्यापही जगात दररोज सुमारे १७,००० बालमृत्यू होतात. आफ्रिका खंडाच्या मागासलेल्या भागात दहापैकी एका मुलाचा मृत्यू पाच वर्षाच्या आत होतो. विकसनशील देशांच्या तुलनेत हे प्रमाण १५ पटींनी जास्त आहे.'

**५) मातांच्या आरोगात सुधारणा करणे :–**

सन २०१५ पर्यंत 'मातांच्या आरोगात सुधारणा करणे' हे ध्येय (Goal) संयुक्त राष्ट्रसंघाने निश्चित केले होते. त्यासाठी १) १९९० ते २०१५ दरम्यान माता मृत्यूचे प्रमाण ७५ टक्क्यांनी कमी करणे आणि २) २०१५ मध्ये प्रजनन दराचे वैश्विक लक्ष्य साध्य करणे, ही लक्ष्ये (Targets) निर्धारित केली होती. ही लक्ष्ये गाठण्यात काही प्रमाणात यश आल्याचे दिसते. उदा १) जागतिक पातळीवर माता मृत्यूचे प्रमाण गेल्या दोन दशकात ४७ टक्क्यांनी कमी झाले आहे. २) विकसित भागामध्ये गर्भवती महिलांना किमान चार वेळा भेटून काळजीबाबत माहिती दिली जाते. विकसनशील देशामध्ये सर्वाधिक माता मृत्यू होणाऱ्या भागात विविध उपाययोजना करणात आल्या आहेत. यामध्ये बाळंतपणाच्या वेळी प्रशिक्षित व्यक्तींची उपस्थिती, गरोदरपणाच्या काळात पुरेसा पोषण आहार, योग्य आरोग्य सेवा, स्त्रियांना तातडीचे उपचार, कुटुंब नियोजनाची योग्य अंमलबजावणी आदी उपाय करण्यात आले आहेत. यांचे चांगले परिणाम दिसत आहेत.

**६) एच. आय. व्ही./एड्स, मलेरिया आणि इतर रोगाविरोधात लढा :–**

एच. आय. व्ही./एड्स, मलेरिया आणि इतर रोगाविरोधात लढा देण्याचे महत्त्वाचे ध्येय संयुक्त राष्ट्रसंघाने निश्चित केले होते. हे ध्येय यशस्वी करणासाठी १) सन २०१५ पर्यंत एच. आय. व्ही./एड्स प्रसार कमी–कमी करत नेणे. २) एच. आय. व्ही/एड्स विरोधात जागतिक स्तरावर उपचार उपलब्ध करून

देणे ३) २०१५ पर्यंत मलेरिया आणि इतर प्रमुख रोगांचा प्रादुर्भाव थांबविणे आणि त्याचे प्रमाण कमी–कमी करत नेणे ही लक्ष्ये (Targets) निश्चित करणात आली होती. या संदर्भात जे थोडेफार यश मिळाले ते असे १) जागतिक स्तरावर नव्याने एच. आय. व्ही. संसर्ग लोकांची संख्या २००१ ते २०११ पर्यंत ३३ टक्क्यांनी कमी झाली. वयाच्या १५ वर्षापर्यंतच्या एच. आय. व्ही. संक्रमित बालकांची संख्या २,९०,००० पर्यंत खाली आली. २) सन २०१२ मध्ये एच. आय. व्ही./एड्स विरोधात विक्रमी ९.७ दक्षलक्ष लोकांना उपचार मिळाले. ३) २००२ च्या दशकात मलेरियापासून होणाऱ्या मृत्यूची संख्या १.१ दशलक्ष पर्यंत आली. २० दशलक्ष लोकांना क्षयरोग उपचार मिळाले.

**७) योग्य पर्यावरण आणि त्याच्या संवर्धनाची खात्री :–**

योग पर्यावरण आणि त्याच्या संवर्धनाची खात्री हे आणखी एक महत्वाचे ध्येय संयुक्त राष्ट्रसंघाने निश्चित केले असून हे ध्येय साध्य करणासाठी काही लक्ष्ये (Targets) ठरविणात आली होती. ती अशी १) पर्यावरणीय साधनसंपत्तीचे नुकसान होऊ नये यासाठी देशातील धोरणे आणि कार्यक्रमात योग्य तथ्यांचा समावेश करणे. पर्यावरणीय साधनसंपत्तीचा ऱ्हास थांबविणे. २) जैवविविधता ऱ्हास होण्याचे प्रमाण २०१० पेक्षा आणखी कमी करणे. यासाठी योग्य उपाययोजना करणे. ३) सन २०१५ पर्यंत लोकसंख्येच्या प्रमाणात पिण्याचे पाणी आणि स्वच्छता व इतर मूलभूत बाबी समान प्रमाणात वाटून घेणे. ४) २०२० पर्यंत झोपडपट्ट्यामधील किमान १०० दशलक्ष लोकांचे राहणीमान सुधारणे.

पर्यावरण संवर्धनासाठी संयुक्त राष्ट्रसंघटनेने निश्चित केलेली लक्ष्ये गाठायला जगाला फारसे यश आलेले नाही. कारण – १) जागतिक स्तरावर कार्बनडाय ऑक्साईडचे उत्सर्जन १९९० पासून ४६ टक्क्यांनी वाढले आहे. २) जवळपास एक तृतीयांश समुद्री मत्स्य संपत्ती कमी झाली असून त्यामध्ये वाढ होणाचे प्रमाण कमी होत आहे. प्रजाती संरक्षित भाग वाढत असूनही तो नामशेष होणाचा धोका आहे. विशेषत: दक्षिण अमेरिका आणि आफ्रिकेमध्ये जंगले झपाट्याने नष्ट होत आहेत. ३) २.१ अब्जापेक्षा अधिक लोकांना पिणाचे पाणी मिळाले आहे. १९९० पसून गाठलेले हे उद्दिष्ट M.D.G ने (Milennium Development Goals) निर्धारित केलेल्या लक्ष्यापेक्षा अधिक आहे. जवळपास दोन अब्जापेक्षा अधिक लोक आता स्वच्छतेच्या योग्य पध्दती अवलंबतात. मात्र २.५ अब्ज लोक अद्यापही शौचालयांचा वापर करत नाहीत. ४) विकसनशील देशामध्ये झोपट्ट्यांमध्ये राहणाऱ्यांमध्ये ८६३ दशलक्षने वाढ झाली आहे.

**८) वैश्विक भागीदारी (Global Partnership for Development)** :-

अविकसित आणि विकसनशील देशांच्या शाश्वत विकासासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने United Nations Orgnization) जागतिक सहभागित्वाला/वैश्विक भागीदारीला महत्व दिले आहे. परंतु सन २००० ते २०१५ करिता वैश्विक भागीदारीसाठी लक्ष्ये (Targets) निश्चित करण्यात आली नव्हती.

**९) संयुक्त राष्ट्रसंघाने सन २०१५ ते ३० या कालावधीकरिता निश्चित केलेली १७ ध्येये :–**

संयुक्त राष्ट्रसंघाने सन २००० ते २०१५ या कालावधीकरिता शाश्वत विकासाची आठ ध्येये निश्चित केली होती. परंतु पर्यावरणाच्या व इतर समस्या वाढत असल्याने संयुक्त राष्ट्रसंघाने शाश्वत विकासाच्या

पूर्वीच्या आठ ध्येयामध्ये आणखी नऊ ध्येयांचा समावेश केला. नऊ ध्येये वाढवल्याने शाश्वत विकासाच्या ध्येयांची संख्या १७ झाली. संयुक्त राष्ट्रसंघाने सन २०१५ ते ३० या कालावधीकरिता निश्चित केलेली ही १७ ध्येये (Goals) खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत.

१) गरीबी नष्ट करणे.

२) सर्वांना प्राथमिक शिक्षण पुरविणे.

३) आरोगदायी जीवनाची खात्री आणि चांगल्यासाठी प्रोत्साहन.

४) सर्वसमावेशक आणि न्याय दर्जेदार शिक्षणाची खात्री देणे.

५) लैंगिक समानता आणणे

६) सर्वांना पुरेसे कायमस्वरूपी पाणी आणि स्वच्छतेच्या सुविधा देणे.

७) सर्वांना स्वस्त, विश्वसनीय, कायमस्वरूपी उर्जा देणे.

८) शाश्वत आर्थिक विकासासाठी सर्वांना पूर्ण उत्पादनक्षम आणि सन्मानजनक रोजगार उपलब्ध करून देणे.

९) पायाभूत सुविधा उभारणे, औद्योगिकीकरण वाढविणे आणि नाविन्यपूर्ण बाबींना प्रोत्साहन देणे.

१०) देशांच्या आतील व देशा-देशामधील विषमता कमी करणे.

११) शहरे आणि मानवी वस्त्या चांगल्या करणे.

१२) वापर आणि उत्पादनाची चांगली पध्दत तयार करणे.

१३) हवामानातील बदल आणि त्याच्या परिणामाबाबत तातडीची उपाययोजना करणे.

१४) शाश्वत विकासासाठी समुद्र आणि सागरी संसाधनांचा योग वापर करणे.

१५) वन, जमीन, जैवविविधता यांचे नुकसान थांबवण्यासाठी त्यांचे संरक्षण, संवर्धन आणि दर्जा राखण्यासाठी खात्रीचे उपाय करणे.

१६) शाश्वत विकासासाठी शांतताप्रिय आणि सर्वसमावेशक समाज निर्मिती करणे, सर्वांना न्याय मिळण्याची व्यवस्था करणे आणि हे अधिक प्रभावी करणे.

१७) सर्व अंमलबजावणीसाठी जागतिक सहभागाचे प्रमाण जास्तीत जास्त वाढविणे.

**शाश्वत विकासाची आवश्यकता :-**

जगातील काही देशांनी जलद आर्थिक विकास केला. परंतु त्या देशांना आता झालेला विकास भविष्यात टिकून राहील की नाही याची चिंता वाटू लागली आहे. निसर्गाचा/पर्यावरणाचा समतोल राखून झालेला विकास टिकवून ठेवणे हे मोठे आव्हान काही विकसित देशांसमोर आहे. भावी पिढ्यांचे जीवन

नरकमय न होण्यासाठी म्हणजेच सुखी व समाधानी होणासाठी शाश्वत विकासाची आवशकता आहे. सध्याच्या विकासाबरोबर भविष्यकालीन आर्थिक विकासासाठी शाश्वत विकासाचा मार्ग अनुसरणे महत्वाचे आहे.

**शाश्वत विकासासाठी उपाय :–**

जलद व सर्वसमावेशक विकासाबरोबर शाश्वत विकासाचे महत्व सुध्दा जगातील अनेक देशांना पटले असून या देशांनी भावी पिढ्यांच्या भवितव्याचा विचार करून शाश्वत विकासाला प्राधान्य देण्यास सुरुवात केली आहे. संयुक्त राष्ट्रसंघासारख्या काही आंतरराष्ट्रीय संघटना सुध्दा शाश्वत विकासासाठी विविध माध्यमातून प्रयत्न करत आहेत. जागतिक आर्थिक शाश्वत विकासासाठी काही उपाय पुढीलप्रमाणे सुचविले आहेत.

**१) अपुनर्नवीकरणीय साधनसंपत्तीचा काळजीपूर्वक वापर**

प्रत्येक देशाने अपुनर्नवीकरणीय साधनसंपत्तीचा अत्यंत काळजीपूर्वक वापर केला पाहिजे. कारण अशी साधनसंपत्ती एकदा वापरली की ती कायमची नष्ट होते. उदा. खनिज तेल, दगडी कोळसा इ. ही खनिज संपत्ती भावी पिढ्यांसाठी राखून ठेवली पाहिजे. तरच आपल्या भावी पिढ्यांना या नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर करून आर्थिक विकास करता येईल.

**२) दुर्मिळ नैसर्गिक साधनसंपत्तीला पर्याय शोधणे**

दुर्मिळ नैसर्गिक साधनसंपत्तीला पर्याय शोधणे व त्या पर्यायी साधनांचा वापर करणे आवशक आहे. उदा. खनिज तेलाला गॅसचा पर्याय आहे. तसेच गॅसलाही आणखी काही पर्याय शोधणे आवशक आहे. शाश्वत विकासासाठी हे अत्यंत आवश्यक आहे. पेट्रोलसारख्या खनिज तेलात इथेनॉल मिसळणे आवशक आहे. त्याशिवाय खनिज तेलाचा अमर्याद/बेसुमार उपसा थांबणार नाही.

**३) शाश्वत विकासासाठी कार्य करणाऱ्या संस्थांना विशेष मदत देणे आवश्यक**

शाश्वत विकासासाठी जनजागरण करणाऱ्या संस्था, परिषदा, संघटना यांना विविध देशांच्या सरकारांनी आणि आंतरराष्ट्रीय विीय संस्थांनी पुरेसे अर्थसहाय्य उपलब्ध करूण देणे आवश्यक आहे. उदा. संयुक्त राष्ट्रसंघाने सन २००२ मध्ये दक्षिण अफ्रिकेतील जोहान्सबर्ग येथे 'जागतिक शाश्वत विकास परिषद' भरविली होती. अशा परिषदा अधूनमधून होत असतात. अशा परिषदांना पुरेशी वित्तीय मदत पुरविणे आवश्यक आहे.

**४) अविकसित व विकसनशील देशांची जबाबदारी**

अविकसित आणि विकसनशील देशांनी शाश्वत विकासाच्या मुद्यावर एकत्र येणे आवशक आहे. अविकसित विशेषत: विकसनशील देशांनी नैसर्गिक साधनसंपत्तीचा प्रचंड व चुकीचा वापर सुरू केला आहे. त्यामुळे त्यांनी सध्या जो काही थोडाफार विकास केला आहे तो भविष्यात टिकून राहण्याची शाश्वती

राहिलेली नाही. म्हणून अविकसित आणि विकसनशील देशांनी शाश्वत विकासासाठी आदर्श विकास नीती स्वीकारली पाहिजे.

### ५) विकसित देशांची जबाबदारी

जागतिक शाश्वत विकासासाठी श्रीमंत देशांनी आपल्या पूर्वीच्या भूमिकेत बदल करणे आवशक आहे. या देशांनी आपल्या नागरिकांचे चोचले पुरविणाासाठी नैसर्गिक साधनसंपीचे जे शोषण चालवले आहे ते बंद केले पाहिजे.

### ६) जनतेच्या आरोग्याचा दर्जा उंचावणे आवश्यक

शाश्वत विकासासाठी अविकसित आणि विकसनशील देशांनी लोकांच्या आरोग्याकडे लक्ष दिले पाहिजे. एड्स सारख्या अनेक रोगांमुळे या देशातील लाखो लोक आतापर्यंत मृत्यूमुखी पडले आहेत. त्यामुळे चांगले/उत्पादक मनुष्यबळ नष्ट झाले आहे. एड्ससारख्या अनेक रोगांचे निर्मूलन केले नाही तर अविकसित व विकसनशील देशातील मानवजात नष्ट होणाची शक्यता आहे. त्यामुळे सध्याच्या विकासालाही मर्यादा पडतील आणि भविष्यातील विकासातही अडचणी निर्माण होतील. म्हणून शाश्वत विकासाचे ध्येय गाठण्यासाठी अविकसित आणि विकसनशील देशांनी लोकांच्या आरोग्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. एड्स, मलेरिया, इबोला, स्वाईनफ्ल्यू यासारख्या रोगांचे समूळ उच्चाटन केले पाहिजे.

### ७) शेतजमिनीचा योग्य वापर

शाश्वत विकासासाठी देशातील शेतजमिनींचा योग्य वापर होणे आवश्यक आहे. पाणी, रासायनिक खते, कीटकनाशके, जंतूनाशके यांच्या बेसुमार वापरामुळे शेतजमिनीची उत्पादकता कमालीची घटली आहे. शेतजमिनी भावी पिढांसाठी चांगल्या प्रकारे जतन करून ठेवल्या पाहिजेत. ती आपली जबाबदारी आहे. शेतजमिनींचा योग्य वापर केल्याशिवाय शाश्वत विकास शक्य नाही.

### ८) नैसर्गिक साधन संपीचे संरक्षण व संवर्धन

नैसर्गिक साधनसंपत्तीच्या संरक्षणाबरोबर मनुष्याने या साधनसंपत्तीचे संवर्धन सुध्दा केले पाहिजे. वनशेती किंवा वृक्षशेती करून जंगलांचे प्रमाण वाढवून मनुष्याला शुध्द हवेचे प्रमाण वाढवता येईल तसेच त्यामुळे पावसाचे प्रमाणही वाढेल. अशाच प्रकारे पडीक जमिनी लागवडीखाली आणून शेतजमिनीचे एकूण क्षेत्र वाढविता येईल. नैसर्गिक साधनसंपत्तीवरील ताण कमी होऊन भावी पिढांना त्याचा लाभ होईल. म्हणून शाश्वत विकासासाठी पाणी, जंगले इत्यादींचे संवर्धन आवशक आहे.

### ९) दारिद्र्याचे उच्चाटन

शाश्वत आर्थिक विकासासाठी दारिद्र्याचे उच्चाटन केले पाहिजे. तसेच भयानक वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येचा वाढीचा दर सुध्दा आटोक्यात ठेवला पाहिजे. लोकसंख्या वाढीचा वेग घटविल्याशिवाय नैसर्गिक साधनसंपत्तीवरील ताण कमी होणार नाही व शाश्वत विकासाचे ध्येयसुध्दा गाठता येणार नाही.

**१०) नागरिकांची जबाबदारी**

शाश्वत विकासाचे ध्येय गाठण्यात देशातील नागरिकांची भूमिकासुध्दा खूप महत्वाची आहे. शाश्वत विकासाच्या बाबतीत नागरिक जागरूक असले पाहिजेत. त्यासाठी त्यांनी सरकारजवळ आग्रह धरला पाहिजे. सरकारवर दबाव आणला पाहिजे. शाश्वत विकासाच्या धोरणाला, सरकारला उत्स्फूर्त पाठिंबा दिला पाहिजे व सहकार्य केले पाहिजे.

**११) जागतिक सहमती**

जागतिक शाश्वत विकासासाठी जागतिक सहमती असणे आवशक आहे. शाश्वत विकासाचा प्रश्न हा काही एक-दोन देशांच्या समोरचा प्रश्न नाही. जगातील अनेक देशांना हा प्रश्न भेडसावतो आहे. म्हणून शाश्वत विकासाचे ध्येय गाठण्यासाठी जगातील सर्व देशांची संमती असणे आवशक आहे. संयुक्त राष्ट्रसंघासारख्या (UNO) आंतरराष्ट्रीय संस्था जागतिक शाश्वत विकासासाठी जे प्रयत्न करत आहेत, जी धोरणे ठरवत आहेत त्यांना सहकार्य करणे ही आपली जबाबदारी आहे, याचे भान जगातील सर्व देशांनी ठेवले पाहिजे.

**समारोप :-**

आर्थिक विकास हा पर्यावरणाची किंवा नैसर्गिक साधनसंपत्तीची हानी करणारा नसावा हे आता संपूर्ण जगाला पटले असून जग त्या दिशेने हळू वेगाने का होईना पावले टाकीत आहे, ही अत्यंत चांगली बाब आहे. पर्यावरणाची हानी न करणारा आर्थिक विकास म्हणजे शाश्वत आर्थिक विकास ही शाश्वत विकासाची व्याख्या सर्वमान्य झाली असून जगातील विविध देशांची सरकारे शाश्वत विकासाला महत्व देऊ लागली आहेत. शाश्वत विकास ही संकल्पना अत्यंत महत्वाची आहे. कारण शाश्वत विकास म्हणजे असा विकास की ज्याचा लाभ देशातील सध्याच्या लोकसंख्येलाही मिळत असतो आणि भावी पिढ्यांनाही तो लाभ मिळणाची खात्री असते.

## १.२.८ नैसर्गिक साधनसंपत्ती आणि आर्थिक विकास

**प्रास्ताविक**

जमीन, हवामान, पाणी, वनसंपत्ती (जंगले), सूर्यप्रकाश (सौर उर्जा), नैसर्गिक वायू, खनिज संपत्ती, समुद्र (सागरी संपत्ती) ही नैसर्गिक साधनसंपत्तीची उदारणे आहेत. यांना नैसर्गिक साधनसंपत्ती असे म्हणतात. नवीकरणक्षम साधनसामग्री (Renewable Resources) आणि अनवीकरणक्षम (Non-renewable Resources) अशी दोन प्रकारची नैसर्गिक साधनसामग्री असते. ज्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा पुन्हा पुन्हा वारंवार/सतत/कायम उपयोग करता येतो किंवा जी नैसर्गिक साधनसंपत्ती पुनर्निर्माणक्षम असते, पुन्हा पुन्हा निर्माण होते, त्या साधनसंपत्तीला पुनर्निर्माणक्षम साधनसामग्री असे म्हणतात. भू संपत्ती (जमीन), वनसंपत्ती (जंगले), पाणी (पर्जन्य), समुद्र संपत्ती (मासे इत्यादी) ही नैसर्गिक साधनसंपत्ती नवीकरणक्षम (Renewale) असते. जी नैसर्गिक साधनसंपत्ती एकदा वापरली की नष्ट होते, ज्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा फक्त एकदाच

वापर करता येतो, वापर केल्यानंतर तिचा पुन्हा वापर करता येत नाही अशा नैसर्गिक साधनांना अनवीकरणक्षम, साधनसंपत्ती (Non-renewable Resources) असे म्हणतात. भूगर्भातील खनिज संपत्ती, खनिज तेल, नैसर्गिक वायू ही नैसर्गिक साधनसंपत्ती एकदा वापरल्यानंतर संपुष्टात येते. म्हणून तिला अनवीकरणक्षम साधनसंपत्ती/पुन्हा निर्माण होऊ न शकणारी नैसर्गिक साधनसंपत्ती असे म्हणतात. ही सर्व प्रकारची नैसर्गिक साधनसंपत्ती निष्क्रीय असते. भांडवलाच्या, यंत्रांच्या साहाय्याने मनुष्य या नैसर्गिक साधनांना वापरात आणतो.

**नैसर्गिक साधनसंपत्ती**

नैसर्गिक साधनसंपत्तीची आणि आर्थिक विकास या दोघांत अत्यंत जवळच संबंध असतो. नैसर्गिक साधनसंपत्तीच्या योग्य वापराने आर्थिक विकासाचा वेग कसा वाढतो ते पाहण्यापूर्वी भारतातील नैसर्गिक साधनसंपत्तीची थोडक्यात माहिती घेणे आवश्यक आहे. ती माहिती खालीलप्रमाणे दिली आहे.

**१) भू साधनसंपत्ती (जमीन)**

भारतात जमिनीचे एकूण क्षेत्रफळ ३२९ दशलक्ष हेक्टर आहे. त्यापैकी ३०५ दशलक्ष हेक्टर जमिनीची मोजणी पूर्ण झाली आहे. ४३ दशलक्ष हेक्टर जमीन नापीक आहे. जंगलव्याप्त क्षेत्र ६९ दशलक्ष हेक्टर आहे. १० दशलक्ष हेक्टर चराऊ जमीन आहे. मशागतीयोग्य पडीत क्षेत्र १३ दशलक्ष हेक्टर आहे. लागवडीखालील जमिनीचे क्षेत्रफळे १४० दशलक्ष हेक्टर आहे. दुहेरी पिकाखालील क्षेत्र ५४ दशलक्ष हेक्टर आहे. आणि पिकाखालील एकूण जमिनीचे क्षेत्रफळ १९४ दशलक्ष हेक्टर इतके आहे. एकूण जमिनीपैकी ६३ टक्के जमीन ही पिकाखालील जमीन आहे.

**२) वनसंपत्ती (जंगलसंपत्ती)**

भारताला ज्याप्रमाणे निसर्गाने भरपूर भूमी किंवा जमीन उपलब्ध करुन दिली आहे, त्याप्रमाणे जंगलसंपत्तीही भरपूर दिली आहे. भारतात ६९ दशलक्ष हेक्टर जमीन ही जंगलव्याप्त आहे. एकूण जमिनीच्या २२ टक्के जमिनीत झाडे किंवा जंगले आहेत. भारतात सर्वात जास्त वनक्षेत्र मध्यप्रदेश या राज्यात असून ते १५५३९ हजार हेक्टर एवढे आहे. आंध्रप्रदेशात हे क्षेत्र ६३९२ हजार हेक्टर एवढे आहे.

**३) पाणी (जलसंपत्ती)**

भारताला निसर्गाने जलसंपत्तीसुध्दा विपुल प्रमाणात दिली आहे. भारतात भूपृष्ठावरील उपलब्ध पाणी अंदाजे १३५६ कोटी एकर फूट आहे. भूगर्भातील उपयुक्त पाणी अंदाजे ३५ कोटी एकर फूट आहे. भूपृष्ठजल (Surface Water) १३५६ कोटी एकर फूट असले तरी यापैकी केवळ ५४ कोटी एकर फूट पाणी उपयुक्त आहे. भारतात दरवर्षी भूगर्भात झिरपणारे पाणी अंदाजे ६५ कोटी एकर फूट आहे. याला भू-गर्भजल (Underground water) असे म्हणतात. जमिनीच्या वरच्या थरात यापैकी ३५ कोटी एकर फूट पाणी साचून राहते. या पाण्याचा उपयोग करता येतो. ३० कोटी एकर फूट पाण्याचा उपयोग करता येत नाही.

कारण ते जमिनीत खूप खाली खोलवर झिरपते. हे पाणी फारसे उपयुक्त मानले जात नाही. कारण त्यात अनेक क्षार मिसळत असतात.

**४) समुद्रसंपत्ती**

भारताताला निसर्गाने समुद्र आणि समुद्र किनाराही उपलब्ध करुन दिला आहे. भारताला हजारो किलोमीटर लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे. भारताला ७५१७ किलोमीटर लांबीचा समुद्र किनारा उपलब्ध आहे. तसेच ३११६८० चौरस किलोमीटर समुद्रबूड जमीन भारतात आहे.

**५) सूर्यप्रकाश**

भारतात वर्षातील सरासरी आठ ते दहा महिने पुरेसा सूर्यप्रकाश उपलब्ध होतो. वनस्पतींच्या वाढीसाठी, सौरउर्जा प्राप्त करणासाठी सूर्यप्रकाश अत्यंत आवशक असते. सौर उर्जेचा वापर स्वयंपाक करणासाठी, छोट्या उद्योगात, वाहने चालविणासाठी उपयोगी पडतो. सूर्यप्रकाशाद्वारे वीजनिर्मितीसुध्दा करता येते. म्हणून सूर्यप्रकाश ही सुध्दा एक अत्यंत महत्वाची नैसर्गिक साधनसंपत्ती मानली जाते.

**६) खनिज संपत्ती**

भारतात भू गर्भात विविध प्रकारची खनिजसंपत्ती मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. यामध्ये कच्चे लोखंड हा एक धातू आहे. जगातील एकूण लोखंडापैकी ६.६ टक्के लोखंड भारतात आहे. मॅगनीज हे खनिज सुध्दा मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. भारतात मॅगनीजचे ३७.९ कोटी टन साठे असण्याचा अंदाज आहे. मॅगनीजच्या उत्पादनाच्या बाबतीत भारताचा जगात तिसरा क्रमांक लागतो. तांब्याचा एकूण साठा २५ कोटी टन इतका आहे. ॲल्यूमिनियम तयार करणासाठी लागणारे बॉक्साइट हे खनिज भारतात मोठ्या प्रमाणात होते. भारतात बॉक्साइटचे साठे २४० कोटी टन इतके आहेत. अभ्रकाचे उत्पादनही भारतात मोठ्या प्रमाणात होते. जगात जेवढे एकूण अभ्रकाचे उत्पादन होते, त्याच्या ८० टक्के उत्पादन एकट्या भारतात होते. जिप्समचे साठेही भारतात मोठ्या प्रमाणात आहेत. जिप्समचा उपयोग औषधे, सिमेंट आणि रासायनिक खते तयार करण्यासाठी केला जातो. भारतात १२१ कोटी टन जिप्समचे साठे असावेत असा अंदाज आहे. भारतात कोळशाचे साठेही मोठ्या प्रमाणात आहेत. भारतात दरवर्षी शेकडो दशलक्षटन कोळसा उत्पादित केला जातो. भारतात ८० टक्केपेक्षा अधिक वीज कोळशापासून केली जाते. भारतात भूगर्भात खनिज तेल सुध्दा सापडते. भारतात आसाम राज्यात खनिज तेलाचे साठे आढळतात. उद्योग क्षेत्र, वाहतूक क्षेत्रासाठी खनिज तेल अत्यंत आवशक असते. भारतात दरवर्षी काही दशलक्ष टन खनिज तेलाचे उत्पादन होते. घरगुती आणि औद्योगिक वापरासाठी नैसर्गिक वायू सुध्दा अत्यंत महत्वाचा व आवश्यक असतो. भारतात पश्चिम किनार पट्टीवर नैसर्गिक वायूचे साठे सापडले आहेत. भारतात नैसर्गिक वायूचे साठे ५४१०० कोटी घनमीटर इतके असावेत असा अंदाज आहे.

**सारांश**

जमीन, जंगले, पाणी, समुद्र, सूर्यप्रकाश आणि भूगर्भातील खनिज संपत्ती ही नैसर्गिक साधनसंपत्ती असून यापैकी बरीच नैसर्गिक साधनसंपी विपुल प्रमाणात उपलब्ध आहे तर काही नैसर्गिक साधनसंपत्ती उदाहरणार्थ खनिज तेल, लोखंड कमी प्रमाणात उपलब्ध आहे.

**नैसर्गिक साधनसंपत्ती या घटकाची आर्थिक विकासातील भूमिका**

**प्रास्ताविक**

राष्ट्रीय उत्पन्नात सतत दीर्घकाळ वाढ घडून येणाची प्रक्रिया म्हणजे आर्थिक विकासाची प्रक्रिया होय. देशाचा आर्थिक विकास अनेक घटकावर अवलंबून असतो. उदाहरणार्थ भांडवल, चांगले सरकार, नैसर्गिक साधनसंपत्ती यापैकी नैसर्गिक साधनसंपी हा घटक सुध्दा अत्यंत महत्वाचा आहे. नैसर्गिक साधनसंपत्ती आणि राष्ट्राचा आर्थिक विकास या दोन घटकात अत्यंत जवळचा संबंध असतो. नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर कसा व किती प्रमाणात केला जातो यावर देशाचा आर्थिक विकास अवलंबून असतो. देशात केवळ विपुल प्रमाणात नैसर्गिक साधनसंपत्ती असून चालत नाही. त्या साधनसंपत्तीला योग्य प्रकारे सक्रिय केले, पुरेशा प्रमाणात नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर केला तर देशाचा विकास होऊ शकतो. देशात विपुल प्रमाणात नैसर्गिक साधनसंपत्ती उपलब्ध असूनही जर या साधनसंपत्तीचा योग्य व पुरेशा प्रमाणात वापर केला नाही तर देशाचा विकास होत नाही. जमीन, पाणी, जंगले, समुद्र अशी काही नैसर्गिक साधनसंपत्ती आयात करता येत नाही. कच्चे लोखंड, खनिज तेल, नैसर्गिक वायू आयात करता येतो. पण त्याची भरमसाठ किंमत मोजावी लागते. नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य, पुरेसा वापर केला तर अप्रगत देश प्रगत होऊ शकतो. हे जगातील काही देशांनी सिध्द केले आहे. म्हणून देशाच्या आर्थिक विकासात नैसर्गिक साधनसंपत्तीची भूमिका अत्यंत महत्वाची असते. खालील काही मुद्यांवरून आपल्या हे आणखी लक्षात येईल.

**१) स्थूल देशांतर्गत उत्पादनात वाढ :–**

स्थूल देशांतर्गत उत्पादन (GDP) ही राष्ट्रीय उत्पन्नाची एक संकल्पना आहे. देशाचे राष्ट्रीय उत्पन्न जितके जास्त तितका देशाच्या आर्थिक विकासाचा दर जास्त राहतो. स्थूल देशांतर्गत उत्पादन (राष्ट्रीय उत्पन्न) हा आर्थिक विकासाचा एक निर्देशक (indicator) आहे. नैसर्गिक साधनसंपीचा योग प्रकारे, काळजीपूर्वक आणि पर्याप्त वापर केला तर कृषी, उद्योग या क्षेत्रातील उत्पादन वाढून स्थूल देशांतर्गत उत्पादन म्हणजेच राष्ट्रीय उत्पन्न वाढते. अशा प्रकारे राष्ट्रीय उत्पन्नात दरवर्षी वाढ होत असेल तर विकास दरातही दरवर्षी सातत्याने वाढ घडून येते. भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनात वाढ घडवून आणणाच्या बाबतीत नैसर्गिक साधनसंपत्ती या घटकाची भूमिका अत्यंत महत्वाची ठरली आहे.

**२) कृषी विकास :–**

भारतासारख्या देशांचा आर्थिक विकास प्रामुख्याने कृषी क्षेत्रावर अवलंबून असतो. कृषी विकासाचा दर जितका जास्त तितका आर्थिक विकासाचा दर जास्त राहतो. भारतात कृषी व्यवसाय ज्या जमीनीत केला

जातो, ती जमीन किंवा भूप्रदेश ही महत्वाची नैसर्गिक साधनसंपत्ती आहे. भारतात अमेरिका, चीनच्या खालोखाल भूप्रदेश उपलब्ध आहे. भारतात मोठ्या प्रमाणावर शेती व्यवसाय, केला जातो. अन्नपीके, व्यापारी पिके मोठ्या प्रमाणावर घेतली जातात. कृषीव्यवसाय करणासाठी लागणारी जमीन भारतात मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असून दरवर्षी कृषी उत्पादनात आणि कृषी उत्पादकतेत वाढ होत आहे. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात शेतीमुळे मोठी भर पडत आहे. कृषी व्यवसायासाठी (पिकासाठी) पाणी मोठ्या प्रमाणात लागते. हे पाणी सुध्दा देशात पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे. त्यामुळे कृषी उत्पादन आणि शेतीची उत्पादकता यामध्ये वाढ होण्यास मदत झाली आहे. शेतील लागणारी रासायनिक खते तयार करणासाठी आवशक असणारी खनिजे सुध्दा भारतात सापडत असल्याने त्याचा शेतीला चांगला लाभ झाला आहे. व होत आहे.

**३) औद्योगिक विकास :–**

औद्योगिक विकासासाठी म्हणजेच कारखानदारी क्षेत्राच्या प्रगतीसाठी जमीन, पाणी, लोखंड व इतर खनिज संपत्ती आवशक असते. दगडी कोळसा  व जंगलातील लाकूड आवश्यक असते. ही सर्व नैसर्गिक साधनसंपत्ती भारतात विपुल प्रमाणात उपलब्ध असल्याने भारताचा औद्योगिक विकास घडून आला आहे. कारखाने उभे करणासाठी जमीन मोठ्या प्रमाणात लागते. पाणी, लोखंड, सौरउर्जा, खनिज तेल लागते. त्याची पुरेशी उपलब्धता भारतात असल्याने भारताचा औद्योगिक विकास घडून येत आहे.

**४) वाहतूक क्षेत्राचा विकास :–**

भारतातील वाहतूक क्षेत्राच्या विकासासाठी नैसर्गिक साधनसंपत्तीची भूमिका महत्वाची आहे. रस्ते वाहतूकीसाठी लागणारी जमीन भारतात मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. त्यामुळे रस्ते वाहतूकीचा देशात वेगाने विकास होत आहे. जलवाहतूकीसाठी नद्या, समुद्र आवश्यक असतात. भारतात कित्येक नद्या बारमाही वाहतात. त्यामुळे जल वाहतूक क्षेत्रातही भारत प्रगती करत आहे. वाहतूक क्षेत्राला आवशक असणारी जमीन, पाणी, सौरउर्जा, खनिजतेल, लाकूड (जंगल संपत्ती) भारतात विपुल प्रमाणात उपलब्ध असल्याने व या साधनसंपत्तीचा पुरेसा वापर केला जात असल्याने वाहतूक क्षेत्राचा विकास देशात घडून येत आहे. त्यामुळे आर्थिक विकासही घडून येत आहे.

**५) निर्यातीत वाढ :–**

भारतातील मँगनिज सारख्या काही साधनसंपत्तीची निर्यात होत असते. त्यापासून देशाला परकीय चलन मिळते. आंतरराष्ट्रीय व्यापारातील तूट भरून काढणासाठी या परकीय चलनाचा वापर केला जातो. नैसर्गिक साधनावर (लाकडावर) प्रक्रिया करुन त्याची निर्यात केली जाते. त्यापासूनही देशाला परकीय चलन मिळते. त्या परकीय चलनाचा वापर आर्थिक विकासात वृध्दी घडवून आणण्यासाठी केला जातो.

**६) रोजगारात वृध्दी :–**

रोजगारात वाढ घडवून आणणाच्या बाबतीत नैसर्गिक साधनसंपत्तीची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. उदाहरणार्थ भारतातील जंगलात गौणवनोपज (Minor Forest Produce) गोळा करण्यासाठी दरवर्षी लाखो

लोक काम करत असतात. भारतातील काही लाख लोक उपजीवीकेसाठी, रोजगारासाठी जंगलावर अवलंबून आहेत.

**७) मासेमारी व्यवसायात वाढ :-**

भारताला खूप मोठा समुद्र व समुद्र किनारा लाभला असून या समुद्रात मासेमारी केली जाते. दरवर्षी मत्सोत्पादनात वाढ होत असून हजारो मच्छीमार मासेमारीचा व्यवसाय करतात. भारतात माशांच्या उत्पादनात, उपभोगात आणि निर्यातीत दरवर्षी मोठी वाढ होत आहे. त्याचा देशाच्या आर्थिक विकासालाही हातभार लागत आहे.

**८) सरकारी महसूलात वाढ :-**

नैसर्गिक साधनसंपत्तीच्या विक्रीपासून आणि वापरापासून सरकारला दरवर्षी मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळते. शेतीसाठी जो पाणीपुरवठा केला जातो त्यावरील सिंचन कर व इतर करांचे उत्पन्न सरकारला मिळते. देशातून जी खनिज संपत्ती, जंगल संपत्ती, समुद्र संपत्ती (मासे) निर्यात केली जाते, त्यापासूनही सरकारला उत्पन्न मिळते. अशा प्रकारे नैसर्गिक साधनसंपीच्या वापरापासून, विक्रीपासून सरकारला मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळते.

अशा प्रकारे नैसर्गिक साधनसंपत्ती आणि आर्थिक विकास या दोन घटकात अत्यंत जवळचे संबंध आहेत. भारतात जमीन, पाणी, हवामान, सूर्यप्रकाश, जंगले, खनिजे ही नैसर्गिक साधनसंपत्ती विपुल प्रमाणात उपलब्ध असल्याने आणि त्याचा उत्पादनाच्या प्रक्रियेत वापर केला जात असल्याने देशाचा जलद विकास घडून येत आहे. देशाचा मागासलेपणा घालावायचा असेल तर देशात विपुल प्रमाणात नैसर्गिक साधनसंपी असणे आणि तिचा योग्य प्रकारे वापर करणे आवशक असते. भारताने नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य आणि भरपूर वापर करुन आर्थिक विकासाचा वेग वाढवणाचे उद्दिष्ट पूर्ण केले आहे. म्हणून आर्थिक विकासात नैसर्गिक साधनसंपीची भूमिका महत्वाची असते हे सिध्द झाले आहे.

## १.३ सारांश

भारतीय अर्थव्यवस्था आज जगात झपाट्याने प्रगती करत आहे. स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या बाबतीत भारताचा जगात पाचवा क्रमांक आहे. भारत विकासाच्या देशाने जोरदार वाटचाल करत आहे. स्वातंत्र्यप्राप्तीच्यावेळी भारतीय अर्थव्यवस्था अविकसित किंवा मागासलेली होती. स्वातंत्र्य मिळून भारताला ७७ वर्षे पूर्ण झाली असून भारताचा मागासलेपणा खूपच कमी झाला आहे. भारत आज जगात विकसनशील देश म्हणून ओळखला जातो. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात दरवर्षी वाढ होत असली तरी अमेरिका आणि चीनपेक्षा आपले राष्ट्रीय उत्पन्न खूपच कमी आहे. दरडोई उत्पन्नातही भारत जगात खूपच मागे आहे. भारत सरकारने अलिकडच्या काळात नुसत्या विकासाऐवजी सर्वसमावेशक विकासावर आणि शाश्वत विकासावर भर दिला आहे.

## १.४ पारिभाषिक शब्द व त्यांचा अर्थ :-

१) विकसित अर्थव्यवस्था – अर्थव्यवस्थेच्या सर्वक्षेत्रांची प्रगती झालेली असणे.

२) अविकसित अर्थव्यवस्था – अर्थव्यवस्थेची सर्व क्षेत्रे मागासलेली असणे.

३) विकसनशील अर्थव्यवस्था – विकासाच्या दिशेने वाटचाल करणारी अर्थव्यवस्था

४) द्विक्षेत्रीय अर्थव्यवस्था – अर्थव्यवस्थेची विभागणी आधुनिक क्षेत्र आणि परंपरागत क्षेत्र अशा दोन भागात झालेली असणे.

५) उदयोन्मुख अर्थव्यवस्था – वेगाने विकास पावत असणारी अर्थव्यवस्था

६) राष्ट्रीय उत्पन्न – एका वर्षात तयार झालेल्या उत्पादनाची पैशातील किंमत

७) दरडोई उत्पन्न – राष्ट्रीय उत्पन्न भागिले देशाची लोकसंख्या

८) सर्वसमावेशक विकास – देशातील आर्थिक विकासाचे फायदे सर्व जनतेपर्यंत पोहचतात तेंव्हा त्या विकासाला सर्वसमावेशक विकास म्हणतात.

९) शाश्वत विकास – कायम स्वरुपी/दीर्घकाळ टिकणारा विकास

## १.४ स्वयंअध्ययन प्रश्न

१) भारताला स्वातंत्र्य मिळाले तेंव्हा भारतीय अर्थव्यवस्था ......होती.

अ) रिकामी ब) लंगडी क) अप्रगत ड) सर्व

२) भारताची अर्थव्यवस्था.......आहे.

अ) प्रगत ब) अप्रगत क) विकसनशील ड) स्थिर

३) भारताचे राष्ट्रीय उत्पन्न दरवर्षी.........आहे.

अ) वाढत ब) घटत क) स्थिर

४) ........हा सर्वसमावेशक विकासाचा निकष आहे.

अ) दारिद्र्य निर्मूलन ब) चांगले आरोग क) ग्रामीण विकास ड) सर्व

५) भारताच्या विकासाला सर्वसमावेशक विकास म्हणता.....

अ) येईल ब) येणार नाही.

६) .......विकास म्हणजे शाश्वत विकास होय.

अ) चिरंतन ब) टिकावू क) दीर्घकालीन ड) सर्व

## १.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१) ड २) क ३) अ ४) ड ५) ब ६) ड

## १.६ सरावासाठी प्रश्न

अ) टीपा द्या (१५० ते २०० शब्दात)

१) उदयोन्मुख भारतीय अर्थव्यवस्था

२) भारताचे दरडोई उत्पन्न कमी का आहे?

३) शाश्वत विकासाची संकल्पना स्पष्ट करा

४) सर्वसमावेशक वृध्दी म्हणजे काय?

ब) दीर्घोत्तरी प्रश्न (६०० ते ८०० शब्दात)

१) स्वातंत्र्यप्राप्तीच्यावेळची भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) विकसनशील भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

३) उदयोन्मुख भरतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

४) राष्ट्रीय उत्पन्न कमी असण्याची कारणे सांगून राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवून आणण्यासाठी उपाय सुचवा.

५) भारताचे दरडोई उत्पन्न कमी का आहे.? दरडोई उत्पन्न कसे वाढवता येईल?

६) सर्वसमावेशक वृध्दीचे निकष सांगून सर्वसमावेशक वृध्दी घडवून आणण्यासाठी उपाय सुचवा.

७) शाश्वत विकासाचे निकष स्पष्ट करा.

८) शाश्वत विकासासाठी उपाय सुचवा.

९) भारतातील नैसर्गिक साधनसंपत्तीची माहिती द्या.

१०) नैसर्गिक साधनसंपत्ती या घटकाची आर्थिक विकासातील भूमिका स्पष्ट करा.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


1. Datt and K.P.M Sundaram, 'Indian Economy' S. Chand and Company Limited, New Delhi

2 Puri V.K Misra S.K, 'Indian Economy', Himalaya publishing House, Mumbai

3 Agrwal A.N, 'Indian Economy', New Age International Publishers, New Delhi


❑❑❑

# घटक २
# भारतीय लोकसंख्या
# (Population in India)

**अनुक्रमणिका**

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ भारतीय लोकसंख्येचे संख्यात्मक आणि गुणात्मक विश्लेषण

२.२.२ भारताच्या लोकसंख्या वाढीची कारणे

२.२.३ भारतातील लोकसंख्या वाढीचे परिणाम

२.२.४ लोकसंख्या वाढीच्या नियंत्रणासाठी उपाय

२.२.५ कुटुंब नियोजन कार्यक्रमाची प्रगती आणि मूल्यमापन

२.२.६ सन २००० चे भारताचे लोकसंख्याविषयक धोरण

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द आणि त्यांचे अर्थ

२.५ स्वयंअध्ययनसाठी प्रश्न व त्यांची उारे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ

## २.० उद्दिष्ट्ये

दुसऱ्या घटकाचे शीर्षक 'भारताची लोकसंख्या' असे आहे. या घटकाचे वाचन केल्यानंतर आपणास पुढील बाबींची माहिती होईल.

(१) भारतातील लोकसंख्येची संख्यात्मक आणि गुणात्मक वैशिष्टो समजतील.

(२) भारताच्या लोकसंख्येचा आकार प्रचंड का आहे? त्याची माहिती होईल.

(३) भारताच्या जलद गतीने वाढणाऱ्या लोकसंख्येचे परिणाम समजतील.

(४) लोकसंख्या वाढीचा वेग कसा नियंत्रणात ठेवता येईल? ते समजेल

(५) भारतातील कुटुंब नियोजन कार्यक्रमाची प्रगती समजेल

(६) सन २००० च्या भारतीय लोकसंख्याविषयक धोरणाची माहिती होईल.

## २.१ प्रास्ताविक

'भारतीय लोकसंख्या' हा विषय अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, भूगोल तज्ञ आणि पर्यावरणतज्ञ यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा बनला आहे. हे सर्व तज्ञ आणि सरकार सतत या विषयावर चर्चा करत असतात. तज्ञ, सरकार आणि जागरूक नागरिक यांच्याकडून भारतीय लोकसंख्येच्या प्रश्नाबद्‌दल सतत चिंता व चिंतन केले जाते. भारताची लोकसंख्या प्रचंड वेगाने वाढत असल्याने हा विषय ही मोठी राष्ट्रीय समस्या बनली आहे. 'लोकसंख्या' या शब्दाची व्याख्या सुद्‌धा सांगता येते. एका विशिष्ट भू-प्रदेशात राहणाऱ्या लोकांची संख्या म्हणजे लोकसंख्या होय. याचा अर्थ सिनेमागृहात सिनेमा पाहणासाठी जमलेले लोक किंवा खेळाच्या मैदानात खेळ पाहणासाठी थांबलेले हजारो प्रेक्षक म्हणजे लोकसंख्या नव्हे. हे लोक तात्पुरत्या उद्देशासाठी (सिनेमा पाहणे, खेळ पाहणे) थांबलेले असतात.

## २.२ विषय विवेचन

भारतीय लोकसंख्येची संख्यात्मक वाढ झपाट्याने होत आहे. लोकसंख्येच्या बाबतीत आपला जगात दुसरा क्रमांक आहे. परंतु गुणात्मकदृष्टाा विचार केल्यास विकसित राष्ट्रांच्या तुलनेत आपल्या लोकसंख्येचा गुणात्मक दर्जा खूपच कमी आहे. १८७ देशात मानव विकासात आपला १३२ वा क्रमांक आहे. या प्रकरणात आपण भारतीय लोकसंख्येचे संख्यात्मक आणि गुणात्मक विश्लेषण पाहणार आहेत. तसेच भारताच्या वाढत्या लोकसंख्येची कारणे, लोकसंख्या वाढीचे परिणाम, लोकसंख्या वाढीचा वेग कमी करण्यासाठीचे उपाय, लोकसंख्या धोरण आणि भारतातील कुटुंब नियोजन कार्यक्रम या बाबींची माहिती पाहणार आहोत.

### २.२.१ भारतीय लोकसंख्येचे संख्यात्मक आणि गुणात्मक विश्लेषण

### (Quantitative and Qualitative Analysis of Indian Population)

**प्रास्ताविक :-**

लोकसंख्या आणि आर्थिक विकास या दोन घटकात अत्यंत जवळचे संबंध असतात. दोन्ही घटकांचा एकमेकावर परिणाम होत असतो. लोकसंख्येचा आर्थिक विकासावर आणि आर्थिक विकासाचा लोकसंख्येवर परिणाम होत असतो. म्हणून लोकसंख्येचा संख्यात्मक आणि गुणात्मक अभ्यास अत्यंत आवश्यक असतो. लोकसंख्येच्या संख्यात्मक आणि गुणात्मक अभ्यासावरून त्या देशाची लोकसंख्या राष्ट्राच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने कितपत उपयुक्त आहे ते समजते. लोकसंख्येच्या संख्यात्मक आणि गुणात्मक अभ्यासावरुन त्या देशाच्या लोकसंख्येचा आकार, जन्मदर व मृत्यूदर, उत्पादक व अनुत्पादक लोकसंख्या,

साक्षर व निरक्षर लोकसंख्या, आयुर्मान इत्यादी बाबींची माहिती समजते. म्हणून जगातील प्रत्येक देश आपल्या लोकसंख्येची संख्यात्मक आणि गुणात्मक वैशिष्ट्ये सतत तपासून पाहत असतो. लोकसंख्येच्या संख्यात्मक आणि गुणात्मक अभ्यासावरुन सरकारला लोकसंख्याविषयक धोरण (Population Policy) किंवा कुटुंब नियोजन धोरण (Family Planning Policy) किंवा कुटुंबकल्याण कार्यक्रम (Family welfare Programme) आणि आर्थिक धोरणे (Economic Policies) आखता येतात. म्हणून लोकसंख्येचा संख्यात्मक आणि गुणात्मक अभ्यास आवश्यक असतो.

**भारतीय लोकसंख्येचे संख्यात्मक विश्लेषण (Quantitative Analysis of Indian Population)**

**१) लोकसंख्येचा प्रचंड आकार**

भारतीय लोकसंख्येचा आकार प्रचंड आहे. लोकसंख्येच्या बाबतीत जगात चीनचा प्रथम तर भारताचा दुसरा क्रमांक लागतो. आज जगाची लोकसंख्या सुमारे ७०० कोटी इतकी असून एकट्या भारताची लोकसंख्या सुमारे १४० कोटी एवढी आहे. भारतात एका वर्षात जवळ जवळ एक कोटी बालके जन्म घेतात. दरवर्षी भारतात ऑस्ट्रेलिया देशाएवढी लोकसंख्या वाढते. भारताची लोकसंख्या जगाच्या एकूण लोकसंख्येच्या १८ टक्के इतकी आहे. तर भारताचे भौगोलिक क्षेत्रफळ जगाच्या एकूण भौगोलिक क्षेत्रफळाच्या २.४ टक्के इतके आहे. भारतीय लोकसंख्येचा स्वातंत्र्यपूर्वकाळातील आणि स्वातंत्र्योत्तर काळातील आकार खालील दोन तक्त्यांच्या द्वारे स्पष्ट केला आहे.

**अ) भारताची स्वातंत्र्यपूर्वकाळातील लोकसंख्या**

भारताची पहिली जनगणना सन १८८१ मध्ये झाली. भारतात दर दहा वर्षांनी जनगणना केली जाते. खालील तक्ता क्रमांक १ मध्ये १८९१ ते १९४१ या विविध जनगणना वर्षातील भारतातील लोकसंख्येची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक १ भारताची स्वातंत्र्यपूर्वकाळातील लोकसंख्या**

| अ. क्र | जनगणना वर्ष | लेकसंख्या (कोटी) | लोकसंख्येतील वाढ (+) आणि घट (-) (कोटी) |
|---|---|---|---|
| १ | १८९१ | २३.६० | - |
| २ | १९०१ | २३.६० | ० |
| ३ | १९११ | २५.२० | + १.६ |
| ४ | १९२१ | २५.१० | - . ०१ |
| ५ | १९३१ | २७.९० | + २.८ |
| ६ | १९४१ | ३१.९० | + ४.० |

स्रोत : सेनसस् ऑफ इंडिया २००१, सेरिज १

वरील तक्ता क्रमांक १ वरुन असे दिसते की, सन १८९१ साली भारताची लोकसंख्या २३.६० कोटी इतकी होती. १९०१ साली सुदधा भारताची लोकसंख्या तेवढीच होती. सन १९११ साली भारताची लोकसंख्या २५.२० कोटी इतकी होती. १९०१ ते १९११ या काळात भारताच्या लोकसंख्येत १.६ कोटींची भर पडली. सन १९११ साली भारताची लोकसंख्या २५.२० कोटी इतकी होती. ती १९२१ साली २५.१० कोटी झाली. १९११ ते १९२१ या दशकात भारताची लोकसंख्या घटली. जनगणना वर्ष १९३१ मध्ये भारताची लोकसंख्या २७.९० कोटी इतकी होती. ती १९४१ साली ३१.९० कोटी इतकी झाली. १९३१ ते १९४१ या काळात भारताच्या लोकसंख्येत चार कोटींनी वाढ घडून आली.

वरील तक्ता क्रमांक १ वरुन असे दिसते की, १८९१ ते १९२१ या काळात भारताच्या लोकसंख्येत फारशी वाढ घडून आली नाही. उलट १९११ च्या तुलनेत १९२१ मध्ये देशाच्या लोकसंख्येत घटच घडून आली. विविध रोगांच्या पसरलेल्या साथी आणि भयंकर दुष्काळ यामुळे लोक मोठ्या प्रमाणावर मृत्यू पावले. त्यामुळे १८९१ ते १९२१ या काळात भारताच्या लोकसंख्येत फारशी वाढ झाली नाही. १९२१ पासून भारताच्या लोकसंख्येत वेगाने वाढ होणास सुरवात झाली. म्हणून १९२१ या वर्षास लोकसंख्येच्या 'महाविभाजनाचे वर्ष' असे म्हणतात. १८९१ ते १९०१ या २० वर्षाच्या काळात भारताच्या लोकसंख्येत १.६ कोटींनी वाढ घडून आली. तर १९२१ ते १९४१ या २०वर्षाच्या काळात भारताच्या लोकसंख्येत ६.८ कोटींनी वाढ घडून आली.

**ब) भारताची स्वातंत्र्योत्तर काळातील लोकसंख्या:-**

खालील तक्ता क्रमांक २ मध्ये १९५१ ते २०११ या जनगणना वर्षातील भारतातील लोकसंख्येची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक २ भारताची स्वातंत्र्योत्तर काळातील लोकसंख्या**

| अ. क्र | जनगणना वर्ष | लोकसंख्या (कोटी) | लोकसंख्येतील वाढ (+) (कोटी) |
|---|---|---|---|
| १ | १९५१ | ३६.११ | ४.२१ |
| २ | १९६१ | ४३.९२ | ७.८१ |
| ३ | १९७१ | ५४.८२ | १०.९० |
| ४ | १९८१ | ६८.३३ | १३.५१ |
| ५ | १९९१ | ८४.६४ | १६.३१ |
| ६ | २००१ | १०२.८७ | १८.२३ |
| ७ | २०११ | १२१.०२ | १८.१५ |

वरील तक्ता क्रमांक २ वरुन असे दिसते की, सन १९५१ साली भारताची लोकसंख्या ३६.११ कोटी इतकी होती. १९६१ साली ती ४३.९२ कोटी इतकी झाली. १९५१ ते १९६१ या काळात भारताच्या लोकसंख्येत ७.८१ कोटींची भर पडली. १९४१ ते १९५१ या काळात भारताच्या लोकसंख्येत ४.२१ कोटींची भर पडल्याचे वरील दोन्ही तक्त्यावरुन दिसून येते. १९६१ ते १९७१ या काळात आपल्या देशाच्या लोकसंख्येत १०.९० कोटींनी भर पडली. १९७१ ते १९८१ या काळात भारताच्या लोकसंख्येत १३.५१ कोटींनी, १९८१ ते १९९१ या काळात १६.३१ कोटींनी, १९९१ ते २००१ या काळात १८.२३ कोटींनी आणि २००१ ते २०११ या काळात भारताच्या लोकसंख्येत १८.१५ कोटींनी वाढ घडून आली. २०११ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १२१.०२ कोटी असल्याचे वरील तक्ता क्रमांक दोन वरुन दिसून येते.

वरील तक्ता क्रमांक दोन वरुन असे दिसते की, १९९१ ते २००१ या दशकात भारताच्या लोकसंख्येत जेवढी वाढ झाली (१८.२३ कोटी) त्यापेक्षा २००१ ते २०११ या दशकात कमी वाढ झाली (१८.१५ कोटी). वरील तक्ता क्रमांक १ आणि २ वरुन असे दिसते की, स्वांतत्र्यपूर्वकाळापेक्षा स्वांतत्र्योत्तर काळात भारताच्या लोकसंख्येत मोठी वाढ घडून आली. १८९१ ते १९४१ या पन्नास वर्षाच्या काळात भारताच्या लोकसंख्येत ८.३ कोटींनी वाढ झाली. तर १९५१ ते २००१ या ५० वर्षाच्या काळात भारताच्या लोकसंख्येत ६६.७६ कोटींनी वाढ घडून आली. म्हणजे १८९१ ते १९४१ या काळाच्या तुलनेत १९५१ ते २००१या काळात भारताच्या लोकसंख्येत आठ पटीपेक्षा अधिक वाढ घडून आली. त्यामुळे स्वांतत्र्यपूर्वकाळापेक्षा स्वांतत्र्योत्तर काळात भारताच्या लोकसंख्येचा आकार मोठा असल्याने दिसते. स्वांतत्र्यपूर्वकाळापेक्षा स्वांतत्र्योत्तर काळात भारताच्या लोकसंख्येत प्रचंड वाढ होणाचे कारण म्हणजे स्वांतत्र्योत्तर काळात भारत सरकारने अनेक रोगांच्या साथींचे उच्चाटन करणात यश मिळवले. त्यामुळे मृत्यूदर कमी झाला. सरकारने दुष्काळावर मात करणात यश मिळवले. त्यामुळे दुष्काळाने व उपासमारीने मरणाऱ्यांची संख्या जवळजवळ शून्यावर आली.

**२) जन्मदर जास्त आणि मृत्यूदर कमी**

भारताच्या लोकसंख्येच्या बाबतीत आढळून येणारी आणखी एक ठळक बाब म्हणजे भारतात जन्मदर (Birth Rate) जास्त आहे आणि मृत्यूदर (Death Rate) कमी आहे. स्वांतत्र्यपूर्वकाळात मात्र यापेक्षा वेगळी परिस्थिती होती. खालील तक्ता क्रमांक ३ मध्ये स्वातंत्र्यपूर्वकाळातील आणि स्वातंत्र्योत्तर काळातील वार्षिक सरासरी जन्मदराची आणि मृत्यूदराची माहिती दिली आहे.

**तक्ता क्र. ३ भारतातील विविध दशकातील जन्मदर व मृत्यूदर**

| अ. क्र | वर्ष | जन्मदर (दर हजारी) | मृत्यूदर (हजारी) |
|---|---|---|---|
| १ | १८९१ – १९०० | ४५.८ | ४४.४ |
| २ | १९०१ – १९१० | ४८.१ | ४२.६ |
| ३ | १९११ – १९२० | ४९.२ | ४८.६ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | १९२१ – १९३० | ४६.४ | ३६.३ |
| ५ | १९३१ – १९४० | ४५.२ | ३१.२ |
| ६ | १९४१ – १९५० | ३९.९ | २७.४ |
| ७ | १९५१ – १९६० | ४०.० | १८.० |
| ८ | १९६१ – १९७० | ४१.२ | १९.२ |
| ९ | १९७१ – १९८० | ३७.२ | १५.० |
| १० | १९८५ – १९८६ | ३२.६ | ११.१ |
| ११ | २००१ | २६.१ | ८.७ |
| १२ | २०११ | २०.९ | ७.४ |

स्त्रोत: तक्ता क्रमांक १ प्रमाणे आणि इंडियन इकॉनॉमी, दत आणि सुंदरम

वरील तक्ता क्रमांक ३ मध्ये भारतातील स्वांतत्र्यपूर्वकाळातील आणि स्वांतत्र्योत्तर काळातील विविध वर्षातील वार्षिक सरासरी जन्मदर आणि मृत्यूदर दर्शविला आहे. एका वर्षात दर १००० लोकसंख्येमागे जन्मास येणाऱ्या अपत्यांची संख्या म्हणजे जन्मदर होय. आणि एका वर्षात दर १००० लोकसंख्येमागे मृत्यू पावणाऱ्या व्यक्तींची संख्या म्हणजे मृत्यूदर होय. १८९१ ते १९०० या काळात भारतात जन्मदर ४५.८ होता. आणि मृत्यूदर ४४.४ होता. १९०१ ते १९१० या काळात जन्मदर ४८.१ होता आणि मृत्यूदर ४२.६ होता. १९११ ते १९२० या काळात जन्मदर ४९.२ होता आणि मृत्यूदर ४८.६ होता. १८९१ ते १९२० या काळात जन्मदरात आणि मृत्यूदरात फारसा फरक नव्हता हे आपल्या लक्षात येते. १९२१ नंतर भारतात जन्मदर आणि मृत्यूदर यात तफावत पडण्यास सुरवात झाल्याचे दिसते. १९२१ पासून आजतागायत जन्मदर जास्त आणि मृत्यूदर कमी अशी परिस्थिती आहे. असे असले तरी अलीकडच्या काळात जन्मदर आणि मृत्यूदर दोन्हीही घटले आहेत. परंतु जन्मदर आणि मृत्यूदरातील तफावत मात्र फारशी कमी झालेली नाही. १९२१ ते १९३० या काळात जन्मदर आणि मृत्यूदर यातील तफावत १०.१ इतकी होती. म्हणून मृत्यूदरापेक्षा जन्मदर मोठा होता. १९३१ ते १९४० या काळात जन्मदर व मृत्यूदरातील तफावत १४ इतकी होती. १९४१ ते १९५० या काळात ही तफावत १२.५ होती. १९५१ ते १९६० या काळात जन्मदर व मृत्यूदरातील तफावत २२ एवढी होती. १९६१ ते १९७० या काळात जन्मदर आणि मृत्यूदरातील तफावत २२ एवढी होती. १९७१ ते १९८० या काळात ही तफावत २२.२ होती. १९८५-८६ मध्ये जन्मदर व मृत्यूदरातील तफावत २१.५ होती. सन २००१ मध्ये ही तफावत १७.४ होती. २०११ मध्ये जन्मदर व मृत्यूदरातील तफावत १३.५ एवढी होती. अशा प्रकारे स्वांतत्र्योत्तर काळात भारतातील जन्मदर व मृत्यूदर कमी झाला आहे. जन्मदर आणि मृत्यूदर यातील तफावत सुदधा कमी झाली आहे. असे असले तरी आजही भारतात जन्मदर जास्त आणि मृत्यूदर कमी आहे. भारतातील जन्मदर जास्त असणास काही घटक जबाबदार आहेत. उदाहरणार्थ १) अंधश्रध्दा २) दारिद्र्य ३) प्रत्येकाने लग्न केलेच पाहिजे अशी समजूत दृढ असणे ४) निरक्षरता व अल्पशिक्षितपणा ५) कुटुंब नियोजन कार्यक्रमाला कमी यश ६) उष्ण हवामान ७) कमी वयात विवाह ८) मुलगाचा हव्यास ९)

शेती प्रमुख व्यवसाय, भारतात मृत्यूदर घटणाची काही कारणे आहेत. उदाहरणार्थ, १) दुष्काळावर नियंत्रण २) रोगाच्या साथीवर नियंत्रण ३) दवाखान्यांच्या संख्येत वाढ ४) कुटुंब कल्याण कार्यक्रम-माता बाल संगोपन कार्यक्रम ५) पोषक आहाराचा सरकारकडून पुरवठा ६) स्वच्छ पिण्याचे पाणी इ. अशा प्रकारे भारतात जन्मदरात आणि मृत्यूदरात सतत घट होत असली तरी मृत्यूदरात ज्या वेगाने घट होत आहे, त्यापेक्षा खूपच कमी वेगाने जन्मदरात घट होत आहे. भारतात जन्मदरातील आणि मृत्यूदरातील तफावत खूप मोठी आहे. त्यामुळे भारतात लोकसंख्येचा स्फोट घडून आला आहे. भारतात सर्व राज्यात जन्मदर आणि मृत्यूदर सारखा नाही. काही राज्यात जन्मदर आणि मृत्यूदर जास्त आहे. तर काही राज्यात तो कमी आहे.

**३) लोकसंख्येचा वार्षिक वृदधी दर जास्त**

भारतीय लोकसंख्येचा आकार (Size of Population) मोठा आहे. त्याचप्रमाणे लोकसंख्या वाढीचा वार्षिक वृदधी दर (Rate of Growth of Population) सुध्दा मोठा आहे. त्यामुळे भारताची लोकसंख्या आकाराने मोठी असून जगात दोन क्रमांकाची लोकसंख्या बनली आहे. खालील तक्ता क्रमांक ४ मध्ये भारतातील लोकसंख्येचा एकत्रित वार्षिक वृध्दी दर (शेकडा) दर्शविला आहे.

**तक्ता क्रमांक ४ भारतीय लोकसंख्येचा वार्षिक वृध्दी दर**

| अ. क्र | वर्ष | वार्षिक वृध्दी दर |
|---|---|---|
| १ | १८९१ - १९२१ | ०.१९ |
| २ | १९२१ - १९५१ | १.२२ |
| ३ | १९५१ - १९८१ | २.१५ |
| ४ | १९८१ - १९९१ | २.११ |
| ५ | १९९१ - २००१ | १.९३ |
| ६ | २००१ - २०११ | १.६४ |

(स्त्रोत : इंडियन इकॉनॉमी, दत्त आणि सुंदरम, ६५ वी आवृत्ती)

वरील तक्ता क्रमांक चार वरुन असे दिसते की, १८९१ ते १९२१ या काळात भारतातील लोकसंख्येचा एकत्रित वार्षिक वृध्दी दर खूपच कमी म्हणजे ०.१९ टक्के एवढा होता. १९२१ ते १९८१ या काळात लोकसंख्या वृध्दी दरात वाढ झाल्याचे दिसते. १९८१ नंतर भारतीय लोकसंख्या वृध्दीचा दर घटत असल्याचे दिसते. १९५१ ते १९८१ या काळात भारतीय लोकसंख्या वाढीचा दर २.१५ टक्के होता. १९८१ ते १९९१ या काळात तो २.११ टक्के इतका कमी झाला. १९९१ ते २००१ या काळात लोकसंख्या वाढीचा दर १.९३ टक्के एवढा घटला. आणि २००१ ते २०११ या काळात लोकसंख्या वृध्दीचा वार्षिक दर १.६४ टक्के एवढा कमी झाला. अलीकडच्या काही दशकात भारतीय लोकसंख्या वाढीचा वार्षिक दर घटला असला तरी भारतीय लोकसंख्येचा आकार प्रचंड असल्याने फारसा परिणाम जाणवत नाही. लोकसंख्येच्या आकाराच्या दृष्टीने विचार करता भारतीय लोकसंख्या वाढीचा दर मोठाच असल्याचे स्पष्ट होते.

### ४) ग्रामीण आणि शहरी लोकसंख्या

भारतीय लोकसंख्येचा ग्रामीण लोकसंख्या आणि शहरी लोकसंख्या असाही अभ्यास केला जातो. भारताची ओळखच जगात 'ग्रामीण अर्थव्यवस्था' आणि 'खेड्यांचा देश' अशी आहे. भारतात सात लाखांच्या आसपास खेडी असून तेवढ्याच वाड्या आणि वस्त्या आहेत. भारतात आजही खेड्यात राहणाऱ्या लोकांचे प्रमाण मोठे आहे. खालील तक्ता क्रमांक पाच मध्ये भारतातील ग्रामीण आणि शहरी लोकसंख्येची टक्केवारी दर्शविली आहे.

तक्ता क्रमांक ५ भारतातील ग्रामीण आणि शहरी लोकसंख्येचे प्रमाण

| अ. क्र | वर्ष | ग्रामीण लोकसंख्येचे शेकडा प्रमाण | शहरी लोकसंख्येचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | १९०१ | ८९.० | ११.० |
| २ | १९११ | ८९.६ | १०.४ |
| ३ | १९२१ | ८८.७ | ११.३ |
| ४ | १९३१ | ८७.८ | १२.२ |
| ५ | १९४१ | ८५.९ | १४.१ |
| ६ | १९५१ | ८२.७ | १७.३ |
| ७ | १९६१ | ८२.० | १८.० |
| ८ | १९७१ | ८०.१ | १९.९ |
| ९ | १९८१ | ७६.७ | २३.३ |
| १० | १९९१ | ७४.३ | २५.७ |
| ११ | २००१ | ७२.२ | २७.८ |
| १२ | २०११ | ६८.८३ | ३१.१७ |

(स्त्रोत : इंडियन इकॉनॉमी, दत्त आणि सुंदरम, ६५ वी आवृत्ती)

वरील तक्ता क्रमांक पाच वरुन असे दिसते की, सन १९०१ साली भारतात खेड्यात राहणाऱ्या लोकांचे प्रमाण ८९.० टक्के एवढे होते. तर शहरात राहणाऱ्या लोकांचे प्रमाण ११ टक्के एवढे होते. सन २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण ६८.८३ टक्के एवढे होते. तर शहरात राहणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण ३१.१७ टक्के एवढे होते. शहरात राहणाऱ्या लोकांच्या संख्येत दरवर्षी वाढ होत आहे. तरीही आजसुध्दा शहरी लोकसंख्येपेक्षा ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण खूप मोठे आहे. भारतात सर्व राज्यात शहरी – ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण सारखे नाही. भारतातील ईशान्य पूर्वेकडील राज्यात ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण मोठे आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारताचा औद्योगिक विकास घडून आला. नवीन औद्योगिक वसाहती स्थापन झाल्या. बंदरांचा विकास झाला. त्यामुळे नवनवीन शहरे अस्तित्वात आली.

म्हणून स्वांतत्र्योत्तर काळात शहरांच्या संख्येत वाढ घडून आली आहे. असे असले तरी आजही भारताच्या ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांचे प्रमाण शहरात राहणाऱ्या लोकांपेक्षा जास्त आहे.

### ५) लोकसंख्येची घनता (Density of Population)

भारतात लोकसंख्येची घनता खूप जास्त आहे. एका चौरस किलोमीटर परिसरात राहणारी लोकांची संख्या म्हणजे लोकसंख्येची घनता होय. देशाच्या एकूण लोकसंख्येला जमिनीच्या एकूण क्षेत्रफळाने भागले असता लोकसंख्येची घनता समजते. भूमी–मानव गुणोत्तर (Land–Man Ratio) काढण्यासाठी लोकसंख्येची घनता ही संकल्पना वापरली जाते. खालील तक्ता क्रमांक सहा मध्ये विविध वर्षातील भारताची लोकसंख्येची घनता दर्शविली आहे.

**तक्ता क्रमांक ६ भारतातील विविध वर्षातील लोकसंख्येची घनता**

| अ. क्र | वर्ष | लोकसंख्येची घनता |
|---|---|---|
| १ | १९०१ | ७७ |
| २ | १९२१ | ८१ |
| ३ | १९५१ | ११७ |
| ४ | १९८१ | २०८ |
| ५ | १९९१ | २७४ |
| ६ | २००१ | ३२४ |
| ७ | २०११ | ३८२ |

वरील तक्ता क्रमांक सहा वरून असे दिसते की, प्रत्येक जनगणनेत भारताच्या लोकसंख्येच्या घनतेत वाढ होत गेली आहे. १९०१ च्या जनगणनेनुसार भारतात लोकसंख्येची घनता ७७ एवढी होती. ती २०११ च्या जनगणनेत ३८२ एवढी झाली. जनगणना वर्ष १९०१ च्या तुलनेत जनगणना वर्ष २०११ मध्ये लोकसंख्येच्या घनतेत जवळ जवळ पाचपट वाढ घडून आली. भारतात सर्व राज्यात लोकसंख्येची घनता सारखी नाही. काही राज्यात लोकसंख्येची घनता जास्त आहे तर काही राज्यात ती कमी आहे. भारतात सर्वात जास्त लोकसंख्येची घनता दिल्ली या राज्याची आहे. सन २०११ मध्ये दिल्ली राज्याची लोकसंख्येची घनता ११२९७ एवढी होती. तर लोकसंख्येची घनता सर्वात कमी हिमाचल प्रदेश या राज्याची असून ती १२३एवढी आहे. जम्मू कश्मीर या राज्याची लोकसंख्या घनता १२४ आहे. भारतात लोकसंख्येचा आकार आणि लोकसंख्या वाढीचा वेग मोठा असल्याने लोकसंख्येची घनता वाढत आहे. सन १९०१ साली जेवढाा जागेत ७७ लोक राहत होते तेवढ्याच जागेत २०११ मध्ये ३८२ लोकांना रहावे लागत आहे. लोकसंख्येची घनता वाढत असल्याने राहण्याच्या जागेवर मोठा ताण पडत आहे. नैसर्गिक, मानवी, धार्मिक, राजकीय आणि शैक्षणिक घटकांचा परिणाम लोकसंख्येच्या घनतेवर पडत असतो.

### ६) लोकसंख्येची वयानुसार रचना (Age Composition)

आर्थिक विकासाच्या आणि नियोजनाच्या दृष्टीने देशातील लोकांच्या वयोरचनेचा अभ्यास खूप महत्वाचा असतो. लोकसंख्येची ०ते १४ या वयोगटातील लोकसंख्या, १५ ते ६० या वयोगटातील लोकसंख्या, ६० वर्षापुढील लोकसंख्या अशा वयानुसार विभागणी केली जाते. ० ते १४ या वयोगटातील लोकसंख्या आणि ६० वर्षापुढील लोकसंख्या अनुत्पादक लोकसंख्या (unproductive population) मानली जाते. राष्ट्राच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने ही लोकसंख्या उपयोगी नसते १५ ते ६० या वयोगटातील लोकसंख्येला ‘उत्पादक लोकसंख्या’ (Productive Population) किंवा ‘कर्ती लोकसंख्या’ (working population) असे म्हणतात. देशाच्या आर्थिक विकासात या वयोगटातील लोकसंख्येची भूमिका खूप महत्वाची असते. या वयोगटातील लोकसंख्या जास्त असली पाहिजे. तरच आर्थिक विकासाचा वेग वाढवणे सरकारला, उदयोगसंस्थांना शक्य होते. खालील तक्ता क्रमांक ७ मध्ये भारतातील विविध वर्षातील लोकसंख्येची वयानुसार विभागणी दर्शविली आहे.

**तक्ता क्रमांक ७ : भारतीय लोकसंख्येची वयानुसार रचना (शेकडा प्रमाण)**

| अ.क्र | वर्ष | १४ वर्षाखालील लोकसंख्या (%) | १५ ते ६० या वयोगटातील लोकसंख्या (%) | ६० वर्षापेक्षा जास्त वयाची लोकसंख्या (%) |
|---|---|---|---|---|
| १ | १९११ | ३८.८ | ६०.२ | १.० |
| २ | १९२१ | ३९.२ | ५९.६ | १.२ |
| ३ | १९३१ | ३८.३ | ६०.२ | १.५ |
| ४ | १९६१ | ४१.० | ५३.३ | ५.७ |
| ५ | १९७१ | ४१.४ | ५३.४ | ५.२ |
| ६ | १९८१ | ३९.७ | ५४.१ | ६.२ |
| ७ | १९९१ | ३६.५ | ५७.१ | ६.४ |
| ८ | २००१ | ३५.६ | ५८.२ | ६.३ |
| ९ | २०११ | २९.५ | ६२.५ | ८.० |

स्रोत: इंडियन इकॉनॉमी, दत्त व सुंदरम, ६५ वी आवृत्ती.

वरील तक्ता क्रमांक वरुन सात वरुन असे दिसते की, भारतात प्रत्येक जनगणनेत वृध्दांचे (६० वर्षापुढील व्यक्तींचे) प्रमाण वाढत गेले आहे. १९११ साली वृध्दांचे प्रमाण १ टक्के होते. २०११ साली ते ८ टक्के एवढे वाढले आहे. प्रत्येक जनगणनेत १५ ते ६० या वयोगटातील उत्पादक लोकसंख्येचे प्रमाण वाढत गेल्याचे दिसते. २००१ मध्ये उत्पादक लोकसंख्येचे प्रमाण ५८.२ टक्के होते तर २०११ मध्ये हे प्रमाण ६२.५

टक्के एवढे वाढले असल्याचे दिसते. सन २०११ साली उत्पादक लोकसंख्येच प्रमाण ६२.५ टक्के होते तर अनुत्पादक लोकांचे प्रमाण ३७.५० टक्के एवढे होते. ही अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत चांगली बाब आहे.

**७) लिंगभेदानुसार लोकसंख्येची रचना (Sex Composition):-**

लोकसंख्याशास्त्रात लोकसंख्येचा लिंगभेदानुसार अभ्यास केला जातो. यावरुन देशात स्त्री पुरुषांचे प्रमाण समजते. स्त्रियांचे प्रमाण पुरुषापेक्षा जास्त आहे की कमी आहे हे समजते. स्त्रियांचे प्रमाण कमी असेल तर त्याचा अभ्यास करुन हे प्रमाण पुरुषांच्या बरोबरीने यावे यासाठी सरकारला धोरणे आखता येतात. खालील तक्ता क्रमांक आठ मध्ये भारतातील स्त्री – पुरुषांचे प्रमाण दर्शविले आहे. म्हणजे १००० पुरुषामागे स्त्रियांची संख्या किती आहे ते दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक ८ भारतातील स्त्री – पुरुष प्रमाण (Sex Ratio)**

| अ.क्र. | वर्ष | १००० पुरुषामागे स्त्रियांची संख्या |
|---|---|---|
| १ | १९०१ | ९७२ |
| २ | १९११ | ९६४ |
| ३ | १९२१ | ९५५ |
| ४ | १९३१ | ९५० |
| ५ | १९४१ | ९४५ |
| ६ | १९५१ | ९४६ |
| ७ | १९६१ | ९४१ |
| ८ | १९७१ | ९३० |
| ९ | १९८१ | ९३४ |
| १० | १९९१ | ९२७ |
| ११ | २००१ | ९३३ |
| १२ | २०११ | ९४० |

स्त्रोत: इंडियन इकॉनॉमी, दत्त व सुंदरम, ६५ वी आवृत्ती.

वरील तक्ता क्रमांक ८ वरुन असे दिसते की, भारतात १००० पुरुषामागे स्त्रियांची संख्या खूपच कमी आहे. १९०१ मध्ये १००० पुरुषामागे स्त्रियांची संख्या ९७२ होती. ती २०११ मध्ये ९४० एवढी घटली. १९०१ च्या तुलनेत २०११ मध्ये १००० पुरुषामागे स्त्रियांची संख्या खूपच कमी असल्याचे दिसते. असे असले तरी अलीकडच्या काही वर्षापासून स्त्रियांची संख्या वाढत आहे. १९९१ मध्ये १००० पुरुषामागे स्त्रियांची संख्या ९२७ होती. ती २००१ मध्ये ९३३ झाली आणि २०११ मध्ये ती ९४० इतकी वाढली. २०११ चा विचार करता १००० पुरुषामागे ६० स्त्रिया कमी आहेत. ही बाब चिंताजनक आहे. जगातील

विकसित देशात १००० पुरुषामागे स्त्रियांची संख्या १००० ते ११०० पर्यंत आहे. भारतात सर्व राज्यात स्त्री – पुरुष प्रमाण सारखे नाही. दिल्ली राज्यात १००० पुरुषामागे स्त्रियांची संख्या ८६६ आहे. तर केरळ राज्यात ती १०८४ एवढी आहे. २०११ मध्ये ग्रामीण स्त्री – पुरुष प्रमाण ९४९ होते तर शहरी स्त्री–पुरूष प्रमाण ९२९ एवढे होते.

**८) लोकसंख्येची व्यावसायिक रचना:–**

प्रत्येक देशाची अर्थव्यवस्था तीन क्षेत्रात विभागलेली असते. १) प्राथमिक क्षेत्र २) द्वितीय क्षेत्र ३) तृतीय क्षेत्र. प्राथमिक क्षेत्रात शेती, जंगल, मासेमारी, पशुपालन इत्यादी व्यवसायांचा समावेश असतो. द्वितीय क्षेत्रात खाण व्यवसाय, लहान व मोठे उद्योग, बांधकाम इत्यादी उदयोग व्यवसायांचा समावेश होतो. तृतीय क्षेत्रात व्यापार, वाणिज्य, वाहतूक, साठवण, दळणवळण आणि इतर सेवांचा समावेश होतो. प्राथमिक क्षेत्रास कृषीक्षेत्र, द्वितीय क्षेत्रास औदाेगिक क्षेत्र आणि तृतीय क्षेत्रास व्यापार व सेवा क्षेत्र असे म्हणतात. देशातील उत्पादक लोकसंख्या या तीन क्षेत्रात काम करत असते. खालील तक्ता क्रमांक ९ मध्ये विविध वर्षातील भारतातील श्रमिकांची व्यवसायिक रचना दर्शविली आहे.

**तक्ता क्रमांक ९ भारतीय श्रमिकांची व्यावसायिक रचना**

| अ. क्र | वर्ष | प्राथमिक क्षेत्र | द्वितीय क्षेत्र | तृतीय क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | १९५१ | ७२.१ | १०.७ | १७.२ |
| २ | १९६१ | ७१.८ | १२.२ | १६.० |
| ३ | १९७१ | ७२.१ | ११.२ | १६.७ |
| ४ | १९८१ | ६८.७ | १३.५ | १७.८ |
| ५ | १९९१ | ६६.८ | १२.७ | २०.५ |
| ६ | १९९९–२००० | ५६.७ | १७.५ | २५.८ |
| ७ | २००८ –०९ | ५०.०० | २१.९ | २८.१ |
| ८ | २०१४ | ४७.०० | २२ | ३१ |

वरील तक्ता ९ वरुन असे दिसते की, सन १९५१ पासून २०१४ पर्यंत प्राथमिक क्षेत्रात काम करणाऱ्यांचे प्रमाण घटत आहे. तर द्वितीय आणि तृतीय क्षेत्रात काम करणाऱ्यांचे प्रमाण वाढत आहे. असे असले तरी भारतात प्राथमिक क्षेत्रात काम करणाऱ्यांचे प्रमाण लक्षणीय आहे. सन २०१४ मध्ये भारतात प्राथमिक क्षेत्रात ४७ टक्के लोक काम करीत होते. द्वितीय क्षेत्रात २२ टक्के लोक काम करत होते. तृतीय क्षेत्रात ३१ टक्के लोक काम करत होते. विकसित देशात प्राथमिक क्षेत्रात काम करणाऱ्यांचे प्रमाण १ ते ५ टक्के एवढे आहे. तर आपल्या देशात आजही ते ४० टक्क्यापेक्षा जास्त आहे. अलीकडच्या काही वर्षात

भारतात औदयोगिक क्षेत्राचा, व्यापार व सेवा क्षेत्राचा झपाट्याने विकास होत असल्याने द्वितीय व तृतीय क्षेत्रात काम करणाऱ्यांचे प्रमाण वाढत आहे. भारतीय अर्थव्यवस्था विकसित बनत असल्याचे हे लक्षण आहे.

**ब) भारतीय लोकसंख्येचे गुणात्मक विश्लेषण (Qualitative Analysis of Indian Population):-**

एखाद्या देशाच्या लोकसंख्येचे संख्यात्मक (Quantitative) विश्लेषण जसे केले जाते, त्याप्रमाणे लोकसंख्येचे गुणात्मक विश्लेषण सुध्दा केले जाते. आर्थिक धोरण व लोकसंख्याविषयक धोरण ठरविण्यासाठी देशातील लोकसंख्येचा गुणात्मक अभ्यास सुध्दा महत्वाचा असतो. साक्षरतेच्या प्रमाणावरुन आणि आयुर्मानावरून देशातील लोकसंख्येचे गुणात्मक विश्लेषण केले जाते. भारतीय लोकसंख्येची गुणात्मक वैशिष्ट्ये थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत.

**१) साक्षरतेचे प्रमाण (Literacy Ratio)**

वय वर्षे सहा पेक्षा जास्त वयाच्या व्यक्तींना त्यांच्या मातृभाषेत लिहिता व वाचता येत असेल तर त्यांना साक्षर व्यक्ती असे म्हणतात. ज्यांना लिहिता वाचता येत नाही अशा व्यक्तींना निरक्षर व्यक्ती असे म्हणतात. सरकारला शैक्षणिक धोरण ठरविण्यासाठी, आर्थिक धोरणे ठरविणासाठी लोकसंख्येच्या साक्षरता प्रमाणाचा अभ्यास सरकारला करावा लागतो. म्हणून जगातील प्रत्येक देश साक्षर निरक्षर अशी लोकसंख्येची मोजणी करत असतो. खालील तक्ता क्रमांक १० मध्ये भारतातील विविध वर्षातील साक्षरतेचे प्रमाण दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक १० भारतातील साक्षर – निरक्षर लोकांचे प्रमाण**

| अ. क्र | वर्ष | साक्षर लोकांचे प्रमाण (%) | निरक्षर लोकांचे प्रमाण (%) | एकूण (%) |
|---|---|---|---|---|
| १ | १९५१ | १८.३० | ८१.७० | १०० |
| २ | १९६१ | २८.३० | ७१.७० | १०० |
| ३ | १९७१ | ३४.५० | ६४.५० | १०० |
| ४ | १९८१ | ४३.७० | ५६.३० | १०० |
| ५ | १९९१ | ५२.२० | ४७.८० | १०० |
| ६ | २००१ | ६४.८३ | ३५.१७ | १०० |
| ७ | २०११ | ७४.०४ | २५.९६ | १०० |

(स्त्रोत: इंडियन इकॉनॉमी, दत्त आणि सुंदरम, ६५ वी आवृत्ती)

वरील तक्ता क्रमांक १० वरुन असे दिसते की, भारतात दरवर्षी साक्षर लोकांचे प्रमाण वाढत आहे. आणि निरक्षर लोकांचे प्रमाण घटत आहे. सन १९५१ साली भारतात साक्षर लोकांचे प्रमाण केवळ १८.३० टक्के होते. २०११ साली हे प्रमाण ७४.०४ टक्के एवढे वाढले. १९५१ साली भारतात निरक्षर लोकांचे प्रमाण ८१.७० टक्के होते ते २०११ साली २५.९६ टक्के पर्यंत कमी झाले.

**पुरुष व स्त्री साक्षरता प्रमाण**

खालील तक्ता क्रमांक ११ मध्ये भारतातील पुरुष व स्त्री साक्षरता प्रमाणाची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक : ११ पुरुष व स्त्री साक्षरता प्रमाण**

| अ.क्र | वर्ष | पुरुष साक्षरता (%) | स्त्री साक्षरता (%) |
|---|---|---|---|
| १ | १९५१ | २७.२ | ८.९ |
| २ | १९६१ | ४०.४ | १५.३ |
| ३ | १९७१ | ४६.० | २२.० |
| ४ | १९८१ | ५६.५ | २९.५ |
| ५ | १९९१ | ६४.१ | ३९.३ |
| ६ | २००१ | ७५.८ | ५२.१ |
| ७ | २०११ | ८२.१४ | ६५.५ |

(स्त्रोत: तक्ता क्रमांक १० प्रमाणे)

वरील तक्ता क्रमांक ११ वरुन असे दिसते की, भारतात पुरुष साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. तर स्त्री साक्षरेतेचे प्रमाण कमी आहे. सन २०११ मध्ये भारतात पुरुष साक्षरतेचे प्रमाण ८२.१४ टक्के एवढे होते. तर स्त्री साक्षरेतेचे प्रमाण ६५.५ टक्के एवढे होते. असे असले तरी स्त्री साक्षरेतेचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. १९५१ मध्ये भारतात स्त्री साक्षरेतेचे प्रमाण ८.९ टक्के होते. ते २०११ मध्ये ६५.५ टक्के पर्यंत वाढले.

**२) लोकसंख्येचे सरासरी आयुर्मान (Life Expectancy)**

देशातील जनतेचे सरासरी आयुर्मान जितके जास्त तितका राष्ट्राचा फायदा होतो. देशातील लोकांचे आयुर्मान चांगले (मोठे) असेल तर देशाच्या आर्थिक विकासाचा वेग वाढतो. कारण लोकांच्या श्रमाचा, बुध्दीचा, अनुभवाचा, कौशल्याचा देशाला दीर्घकाळ उपयोग करुन घेता येतो. म्हणून देशातील लोकांचे सरासरी अपेक्षित आयुर्मान चांगले असणे महत्वाचे व आवश्यक असते. लोकांचे आयुर्मान चांगले असेल तर राष्ट्रीय उत्पादनात, उत्पन्नात वस्तूच्या मागणीत वाढ होते. त्यामुळे आर्थिक विकासाचा वेग वाढतो. लोकांचे आयुर्मान कमी असेल तर कुटुंबाने, सरकारने लोकांच्या शिक्षणासाठी, आरोग्यासाठी जी गुंतवणूक केलेली असते तिचा अपव्यय होतो. जन्माला आलेली व्यक्ती सरासरी किती वर्षे जिवंत राहू शकेल त्यावरुन सरासरी आयुर्मान काढतात. आयुर्मान काढण्यासाठी मृत्यूदराचा आणि मृत्यूसमयी जे वय असेल त्याचा विचार करतात. मृत्यूदर कमी असेल आणि मृत्यूसमयी वय जास्त असेल तर सरासरी आयुर्मान जास्त (चांगले) असते. खालील तक्ता क्रमांक १२ मध्ये भारतातील लोकसंख्येचे सरासरी आयुर्मान दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक १२ : भारतीय लोकसंख्येचे सरासरी आयुर्मान (वर्षे)**

| अ.क्र | कालमान | पुरुष | स्त्रिया | सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|
| १ | १९११–२१ | १९.४ | २०.९ | – |
| २ | १९२१–३१ | २६.९ | २६.९ | – |
| ३ | १९३१–४१ | ३२.१ | ३१.४ | – |
| ४ | १९४१–५१ | ३२.४ | ३१.७ | – |
| ५ | १९५१–६१ | ४१.९ | ४०.६ | ४१.२ |
| ६ | १९६१–७१ | ४७.१ | ४५.६ | ४६.४ |
| ७ | १९७१–८१ | ५४.१ | ५४.७ | ५४.० |
| ८ | २००१ | ६३.९ | ६६.९ | ६५.३ |
| ९ | २००२–२००६ | ६२.६ | ६४.२ | ६३.५ |

(स्त्रोत : तक्ता क्रमांक १० प्रमाणे)

वरील तक्ता क्रमांक १२ वरून असे दिसते की, दरवर्षी भारतीय लोकांचे सरासरी आयुर्मान वाढत आहे. १९५१ ते १९६१ या काळात भारतीय लोकांचे अपेक्षित सरासरी आयुर्मान ४१.२ वर्षे होते. ते २००२ – २००६ या वर्षात ६३.५ वर्षे एवढे वाढले आहे. भारतात पुरुषांपेक्षा स्त्रियांचे अपेक्षित आयुर्मान जास्त असल्याचे वरील तक्त्यावरुन दिसून येते.

**समारोप**

अशा प्रकारे भारतीय लोकसंख्येचे संख्यात्मक (Quntitative) आणि गुणात्मक (Qualitative) विश्लेषण वरीलप्रमाणे स्पष्ट केले आहे. या विश्लेषणावरुन भारतीय लोकसंख्येच्या बाबतीत पुढील गोष्टी प्राप्त होतात. किंवा या विश्लेषणावरुन भारतीय लोकसंख्येची पुढील वैशिष्ट्ये आपणास सांगता येतात.

१) भारतीय लोकसंख्येचा आकार प्रचंड आहे.

२) भारतात जन्मदर जास्त व मृत्यूदर कमी आहे.

३) भारतीय लोकसंख्या वाढीचा दर जास्त आहे.

४) भारतात ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण मोठे आहे. परंतु प्रत्येक जनगणनेत शहरात राहणाऱ्या लोकांचे प्रमाण वाढत आहे.

५) भारतात लोकसंख्येची घनता जास्त असून ती सतत वाढत आहे.

६) भारतात उत्पादक लोकसंख्येचे (१५ ते ६० वयाची लोकसंख्या) प्रमाण मोठे आहे. भारतात बालकांचे प्रमाण घटत असून वृध्दांचे प्रमाण वाढत आहे.

७) भारतात दर हजार पुरुषामागे स्त्रियांची संख्या कमी आहे. परंतु स्त्रियांची संख्या हळूहळू वाढत आहे.

८) भारतात प्राथमिक क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत आहे.

९) भारतात प्रत्येक जनगणनेत साक्षर लोकांचे प्रमाण वाढत आहे निरक्षर लोकांचे प्रमाण कमी होत आहे.

१०) भारतात प्रत्येक जनगणनेत लोकांचे सरासरी आयुर्मान वाढत चालले आहे.

## २.२.२ भारतीय लोकसंख्या वाढीची कारणे (Causes of Rapid Growth of Population)

**प्रास्ताविक :-**

भारतीय लोकसंख्येचा आकार प्रचंड आहे. लोकसंख्येच्या बाबतीत जगात चीनचा प्रथम तर भारताचा दुसरा क्रमांक लागतो. आज जगाची लोकसंख्या ७०० कोटीपेक्षा अधिक असून एकट्या भारताची लोकसंख्या १४० कोटीपेक्षा जास्त आहे. भारताची लोकसंख्या जगाच्या एकूण लोकसंख्येच्या १८ टक्के इतकी आहे. तर भारताचे भौगोलिक क्षेत्रफळ जगाच्या एकूण भौगोलिक क्षेत्रफळाच्या केवळ २.४ टक्के इतके आहे. सन १८९१ साली भारताची लोकसंख्या २३.६० कोटी होती. १९०१ साली देशाची लोकसंख्या तेवढीच होती. १९११ साली भारताची लोकसंख्या २५.२० कोटी होती. १९२१ साली ती २५.१० कोटी होती. १९३१ साली २७.९० कोटी १९४१ साली ३१.९० कोटी, १९५१ साली ३६.११ कोटी, १९६१ साली ४३.९२ कोटी, १९७१ साली ५४.८२ कोटी, १९८१ साली ६३.३३ कोटी, १९९१ साली ८४.६४ कोटी २००१ साली १०२.८७ कोटी, २०११ साली १२१.०२ कोटी होती. २०२१ ची जनगणना अद्याप झाली नाही. परंतु २०२१ च्या जनगणनेच्या अंदाजानुसार भारताची लोकसंख्या १४० ते १४४ कोटी असावी असे सांगितले जाते. १८९१ ते १९२१ या काळात भारताच्या लोकसंख्येत फारशी वाढ झाली नाही. १९२१ पासून भारताच्या लोकसंख्येत वेगाने वाढ होण्यास सुरवात झाली. म्हणून १९२१ या वर्षास लोकसंख्येच्या 'महाविभाजनाचे वर्ष' असे म्हणतात. स्वातंत्र्यपूर्वकाळापेक्षा स्वातंत्र्योत्तर काळात भारताच्या लोकसंख्येत प्रचंड वाढ घडून आली. आणि अजूनही लोकसंख्येत प्रचंड भर पडत आहे. भारताच्या जलद लोकसंख्यावाढीची काही कारणे खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत.

**(१) दारिद्र्य :-**

दारिद्र्याचा व लोकसंख्येचा अत्यंत जवळचा संबंध असतो. दरिद्री लोक आपल्या कुटुंबातील अपत्यांकडे उत्पन्नाचे साधन या दृष्टीने पाहतात. मुलाबाळांना शाळेत पाठविण्याऐवजी लहान वयातच कामाला जुंपले जाते. जास्तीत जासत उत्पन्न मिळविणासाठी जास्तीत जास्त अपत्यांना जन्माला घालण्याकडे गरीबांचा कल असतो. त्यामुळे भारतात गरीबांच्या कुटुंबाचा आकार नेहमी मोठा आढळतो. भारतात दारिद्र्य रेषेखालील लोकांची संख्या २५ टक्के पेक्षा जास्त असून भारताची लोकसंख्या वेगाने वाढणास भारतात दारिद्र्य हा घटक कारणीभूत ठरला आहे.

**(२) विवाह करणे बंधनकारक :-**

भारतातील सर्व स्त्री आणि पुरूष लग्नाचे वय झाले की लग्न करतातच. भारतात विवाह हा धार्मिक विधी मानला जातो. वयात आल्यानंतर सर्वांनी विवाह केलाच पाहिजे असे कुटुंबियांचे, समाजाचे बंधन असते. कुटुंबात, समाजात रहावयाचे असल्याने, समाजाचा दबाव असल्याने सर्व स्त्री-पुरूष विवाह करतात. त्यामुळे भारताच्या लोकसंख्येचा आकार मोठा राहिला आहे. आणि हा आकार दिवसेंदिवस वाढत आहे. भारतात बहुतेक सर्व विवाह १८ ते २२ वर्षापर्यंत होतात. स्त्रियांचा प्रजोत्पादन कालावधी खूप मोठा राहतो. त्यामुळे अपत्यनिर्मिती लवकर सुरू होते व ती दीर्घकाळपर्यंत चालते.

**(३) ग्रामीण व आदिवासी भागात कमी वयात विवाह :-**

भारताच्या शहरी भागात विवाहाचे सरासरी वय २२ वर्षापेक्षा जास्त आहे. शिक्षणाचा कालावधी मोठा असल्याने कित्येक मुला-मुलींची लग्ने २५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर होतात. परंतु ग्रामीण व आदिवासी भागात कमी वयात विवाह होतात. जगातील विकसित राष्ट्रांशी तुलना करता भारतात अद्यापही विवाहाचे सरासरी वय कमीच आहे. त्यामुळे भारतीय लोकसंख्या वाढीचा वेग जास्त आहे. विकसित देशात विवाहाचे सरासरी वय २९ वर्षे आहे. आपल्या देशात ते २० वर्षे किंवा त्याच्या आसपास आहे.

**(४) एकापेक्षा जास्त स्त्रियांशी विवाह करणाची प्रथा :-**

भारतात काही जातीत व धर्मात एक पुरूष तीन ते चार स्त्रियांशी विवाह करू शकतो. त्यामुळे देशाची एकूण लोकसंख्या प्रचंड वाढली आहे. १९४७ साली २ ते ३ कोटी असलेल्या मुस्लीम धर्माची लोकसंख्या आज २० कोटीच्या वर गेली आहे. अशा प्रकारे एकापेक्षा जास्त स्त्रियांशी विवाह करण्याची प्रथा अजूनही अस्तित्वात असल्यामुळे लोकसंख्या जलद गतीने वाढत आहे.

**(५) धार्मिक आणि राजकीय दृष्टिकोन :-**

लोकसंख्या विषयाकडे धार्मिक आणि राजकीय दृष्टिकोनातून पाहिले जाणे हे सुद्धा भारताच्या जलद लोकसंख्या वाढीचे एक महत्वाचे कारण ठरले आहे. काही धर्मियांना आपल्या धर्माची लोकसंख्या जास्त असावी असे वाटते. सामाजिक, राजकीय दबाव निर्माण करणासाठी अशा धर्माचे नेते आपल्या धर्मातील लोकांना लोकसंख्या वाढवण्यासाठी (अधिकाधिक अपत्यांना जन्म घालवण्यासाठी) प्रोत्साहन देत असतात. आपली लोकसंख्या प्रचंड वाढली तर आपणास सत्तेत, राजकारणात मोठा वाटा मिळेल असे त्यांना वाटते. त्यांच्या या दृष्टिकोनामुळे भारताच्या लोकसंख्या वाढीचा वेग वाढत आहे. भारतात इतर धर्मापेक्षा मुस्लींम लोकसंख्या वाढीचा वेग जास्त आहे.

**(६) निरक्षरता, अल्पशिक्षितपणा, अंधश्रध्दा, चुकीच्या समजुती :-**

भारतातील बहुसंख्य लोक अंधश्रद्धाळू आहेत. कारण भारतात निरक्षरतेचे व अल्पशिक्षित लोकांचे प्रमाण मोठे आहे. निरक्षर लोक २५ टक्के व अल्पशिक्षित लोक २५ टक्के आहेत. ५० टक्के लोक निरक्षर व अल्पशिक्षित आहेत. त्यामुळे अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी व परंपरावर विश्वास ठेवणाऱ्यांचे प्रमाण मोठे आहे.

'मुलगी हे परक्याचे धन', 'मुलगा म्हणजे वंशाचा दिवा' अशा चुकीच्या समजुती किंवा अंधश्रध्दा लोकांच्या मनात खोलवर रूजलेल्या आहेत. तसेच आपल्या मृत्यूनंतर आपले श्राद्ध घालवण्यासाठी व इतर धार्मिक विधी करण्यासाठी मुलगाच हवा, तो नसेल तर नरकात जावे लागेल अशी भीती काही लोकांना वाटते. त्यामुळे मुलगा होईपर्यंत अपत्यनिर्मिती चालूच ठेवली जाते. काही जण कन्यादानाचे पुण्य मिळवण्याकरिता सुरवातीला कितीही मुलगे झाले तरी मुलगी व्हावी म्हणून कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करत नाहीत. अशा प्रकारे भारतीय लोकांच्या मनातील अंधश्रद्धा, वेडगळ व चुकीच्या समजुती, अनिष्ट रूढींचा पगडा यामुळे भारताच्या लोकसंख्येत वाढ घडून येत आहे. सुमारे ५० टक्के लोक निरक्षर व अल्पशिक्षित आहेत. त्यांना कमी शिक्षणामुळे व शिक्षणच नसल्याने लोकसंख्येची समस्या ही राष्ट्रीय समस्या आहे असे वाटतच नाही, त्यामुळे लोकसंख्या भयानक वेगाने वाढत आहे.

**(७) कुटुंब नियोजन कार्यक्रमाचा अपुरा प्रसार :–**

भारतात सात लाखापेक्षा जास्त खेडी आहेत. तसेच लाखो वाड्या वस्त्या आणि पाडे आहेत. परंतु भारतात कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम अद्याप सर्व खेड्यापाड्यात चांगल्याप्रकारे किंवा प्रभावीपणे पोहचलेला नाही. त्यामुळे दुर्गम आणि अतिदुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी लोकांच्या कुटुंबांचा आकार मोठा आहे. ग्रामीण भागात ही जनन दर जास्त आहे. कारण सरकारी कर्मचाऱ्यांची उदासिनता व इतर विविध कारणामुळे कुटुंब नियोजन कार्यक्रमाची अंमलबजावणी भारताच्या खेड्यापाड्यात प्रभावीपणे होत नाही. त्यामुळे भारताची लोकसंख्या वेगाने वाढत आहे.

**(८) संयुक्त/एकत्र कुटुंब पध्दती :–**

भारताच्या ग्रामीण भागात अद्यापही एकत्र कुटुंब पध्दती आढळून येते. अशा कुटुंब पध्दतीने मुलांच्या पालनपोषणाचा, शिक्षणाचा व विवाहाचा खर्च कोणा एकाला सोसावा लागत नाही. कुटुंबातील सर्व खर्चाची जबाबदारी सामुदायिक असते. त्यामुळे एकत्र कुटुबांना मुलाबाळांचा आर्थिक भार विशेष जाणवत नाही. त्यामुळे एकत्र कुटुंबांचा आकार हा मोठा आढळून येतो. अशा प्रकारे भारतातील ग्रामीण लोकसंख्या वाढीस 'संयुक्त कुटुंब पद्धती' हा घटक कारणीभूत ठरला आहे.

**(९) सरकार व राजकीय पक्षांची उदासिनता :–**

भारतातील कोणत्याच राजकीय पक्षाने लोकसंख्येला आळा घालण्याबाबत कडक धोरण स्वीकारलेले आढळत नाही. आणीबाणीच्या काळात कुटुंब नियोजनाबाबत कडक धोरण स्वीकारल्यामुळे कॉंग्रेस पक्षाला सत्ता गमवावी लागली होती. त्यामुळे कुटुंब नियोजनाबाबत जर कडक धोरण स्वीकारले तर हातची सत्ता जाईल अशी भीती सत्तारुढ पक्षाला वाटते. विरोधी पक्ष सुद्धा या प्रश्नाला हात घालत नाही. कारण एक किंवा दोनच अपत्यांचा आग्रह धरला व तसा प्रचार केला तर आपणाला सत्ता मिळणार नाही किंवा निवडणुकीत लोक निवडूनच देणार नाहीत अशी भीती विरोधी पक्षांना वाटते. त्यामुळे सत्तेतील व विरोधी बाकावरील राजकीय पक्ष लोकसंख्या प्रश्नाला महत्व देत नाहीत. त्यामुळे भारताची लोकसंख्या बेसुमार वाढली आहे व ती तशीच वाढत आहे.

**(१०) दुष्काळावर मात :–**

स्वातंत्र्यपूर्वकाळात भारतात वारंवार दुष्काळ पडत. त्यामुळे उपासमारीने लाखो लोक मरत. त्यामुळे लोकसंख्यावाढीचा प्रश्न फारसा गंभीर नव्हता. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात सरकारने ओल्या व कोरड्या दुष्काळावर मात केली आहे. रस्ते, रेल्वे, विमान आणि जल वाहतूकीत सुधारणा घडवून आणली आहे. त्यामुळे हजार मैलावर काही तासात पाणी, अन्नधान्य पोहचवून दुष्काळाची तीव्रता कमी करणे शक्य झाले आहे. दुष्काळामुळे मरणाऱ्यांचे प्रमाण त्यामुळे शून्यावर आले आहे. भारत सरकारने दुष्काळाचे व्यवस्थापन खूप चांगल्या प्रकारे केले आहे. त्यामुळे मृत्यूदरात खूपच घट झाली आहे.

**(११) सांडपाणी व पिण्याचे पाणी यात सुधारणा :–**

सांडपाण्याची विल्हेवाट योग्य प्रकारे न झाल्यामुळे अनेक रोगांची लागण होऊन पूर्वी मृत्यूमुखी पडण्याचे प्रमाण जास्त होते. तसेच पिण्याचे पाणी स्वच्छ नसल्यानेही विविध रोग निर्माण होऊन मरणाऱ्यांचे प्रमाणही जास्त होते. परंतु आता स्वातंत्र्योत्तर काळात पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेत व शुद्धतेत पूर्वीच्या मानाने बरीचशी सुधारणा झाली आहे. सरकार जनतेला पाणी निर्जंतूक करून देत आहे. तसेच सांडपाण्याची चांगल्याप्रकारे विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न केला जात आहे, त्याचा परिणाम मृत्यू दरात घट होण्यात म्हणजेच लोकसंख्या वाढण्यात झाला आहे.

**(१२) उष्ण हवामान :–**

भारतातील उष्ण हवामान हा घटक सुद्धा भारतातील लोकसंख्या वाढीस कारणीभूत ठरला आहे. उष्ण हवामानामुळे मुले, मुली लवकर वयात येतात. त्यामुळे त्यांचे विवाह सुद्धा लवकर होतात. विवाह लवकर होत असल्यामुळे अपत्यप्राप्तीही लवकर होते. त्याच बरोबर अशा स्त्रियांचा प्रजोत्पादन कालावधी जास्त राहून कुटुंबाचा आकार मोठा राहतो. अशा प्रकारे उष्ण हवामान या कारणामुळे सुद्धा भारताची लोकसंख्या वेगाने वाढत आहे.

**(१३) मृत्यूदरात घट :–**

अनेक कारणामुळे भारतातील मृत्यूदरात स्वातंत्र्योत्तर काळात खूपच घट झाली आहे. सरकारने गावोगावी सरकारी दवाखाने काढले आहेत. या दवाखान्यात मोफत औषधोपचार केले जातात. खाजगी दवाखान्यांच्या संख्येतही मोठी वाढ झाली आहे. अनेक रोगांचे, साथीच्या रोगांचे उच्चाटन झाले आहे. अन्नाच्या उपलब्धेतत व दर्जात वाढ झाली आहे. त्यामुळे अर्भक मृत्यू, बालमृत्यू, मोठ्या वयाच्या व्यक्तींचे मृत्यू यांचे प्रमाण खूपच कमी झाले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात जन्मदरात सुद्धा घट झाली. परंतु मृत्यूदरात जेवढी घट झाली तेवढी जन्मदरात घट झाली नाही. जन्मदर व मृत्यूदरात यामध्ये मोठे अंतर आहे. जन्मदर जास्त आणि मृत्यूदर कमी यामुळे भारताची लोकसंख्या वेगाने वाढत आहे.

**सारांश,**

अशा प्रकारे भारतातील लोकसंख्या वाढीस वरीलप्रमाणे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय घटक जबाबदार आहेत. वैज्ञानिक प्रगतीने मृत्यूदरात घट झाली. परंतु विज्ञानानेच शोधून काढलेली संतती प्रतिबंधक साधने काही लोक वापरत नाहीत. त्यामुळे लोकसंख्या वेगाने वाढत आहे.

## २.२.३ भारतातील लोकसंख्या वृद्धीचे विकासावरील परिणाम

**प्रास्ताविक :–**

ज्या देशात लोकसंख्या पर्याप्त (योग्य प्रमाणात) असते त्या देशाच्या आर्थिक विकासावर लोकसंख्येचा प्रतिकूल परिणाम होत नाही. परंतु भारतासारख्या देशात लोकसंख्येचा आकार आणि लोकसंख्या वाढीचा वेग मोठा असतो त्या देशाच्या आर्थिक विकासावर वाढत्या लोकसंख्येचा प्रतिकूल परिणाम होतो. देशाची लोकसंख्या जलद गतीने वाढत असेल आणि देशाची लोकसंख्या अतिरिक्त असेल तर देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण होतात. भारतात लोकसंख्येचा स्फोट झाला असून भारतात अतिरिक्त (प्रमाणापेक्षा जास्त) लोकसंख्या आहे. भारतातील वाढत्या लोकसंख्येचे आर्थिक विकासावर होत असलेले परिणाम थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

**(१) बेकारीचा भस्मासूर :–**

भारतात बेकारीच्या प्रश्नाने उग्र स्वरूप धारण केले असून वाढती लोकसंख्या हा प्रमुख घटक त्यास जबाबदार आहे. लोकसंख्या वाढीचा वेग खूप जास्त असल्याने देशात बेकारीचा राक्षस दिवसेंदिवस अक्राळविक्राळ रूप धारण करत आहे. ग्रामीण व शहरी बेकारी, सुशिक्षितांची व अशिक्षितांची बेकारी, हंगामी व कायम स्वरूपाची बेकारी, छुपी व उघड बेकारी, अर्ध बेकारी व पूर्ण बेकारी अशी विविध प्रकारची बेकारी भारतात दिवसेंदिवस वाढत आहे. सन १९५१ मध्ये भारतात ३३ लक्ष लोक बेरोजगार होते. १९९१ मध्ये बेकारांची संख्या ३ कोटी ७१ लक्ष होती. सध्या दहा कोटीपेक्षा जास्त लोक देशात बेरोजगार आहेत. त्यामुळे श्रमशक्तीचा/उत्पादक मानवी साधनसंपत्तीचा नाश होत असून आर्थिक विकासावर त्याचा प्रतिकूल परिणाम होत आहे. बेकारांना बेकार भत्ता व इतर सवलती पुरवाव्या लागत असून सरकारला दरवर्षी कोट्यावधी रूपयांचा भुर्दंड सोसावा लागत आहे.

**(२) दारिद्र्य**

दारिद्र्य हे वाढत्या लोकसंख्येचे कारण आणि परिणाम सुध्दा आहे. सरकारी आकडेवारीनुसार भारतात दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण ४० टक्केपेक्षा जास्त आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे भारतात आजही दारिद्र्य टिकून आहे. ३० कोटीपेक्षा जास्त लोक भारतात दरिद्री असून भारत सरकारला दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमावर दरवर्षी कोट्यावधी रुपये खर्च करावे लागत आहेत. त्यामुळे विकास कामासाठी पैसा अपुरा पडत आहे.

**(३) आंतरराष्ट्रीय व्यापारावर प्रतिकूल परिणाम :–**

आयात व निर्यात हे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे दोन भाग असून आपल्या देशाची आयात नेहमीच निर्यातीपेक्षा जास्त असते. वाढती लोकसंख्या हे आयात जास्त असण्याचे प्रमुख कारण आहे. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा भागविण्यासाठी शेकडो वस्तू मोठ्या प्रमाणावर परदेशातून आयात कराव्या लागतात. आयातीवर सरकारला प्रचंड परकीय चलन खर्च करावे लागत आहे. त्यामुळे परकीय चलनाची गंगाजळी कमी होत असून आर्थिक विकासासाठी परकीय चलन अपुरे पडत आहे. वाढलेले उत्पादन वाढलेली लोकसंख्याच खाऊन टाकत असून त्यामुळे देशाची निर्यात आयातीपेक्षा कमी आहे. वाढत्या लोकसंख्येमुळेच जगाच्या एकूण निर्यातीत भारताचा वाटा अर्ध्या टक्क्यापेक्षा कमी आहे.

**(४) कर्जबाजारीपणात वाढ :–**

भारताचा कर्जबाजारीपणा दिवसेंदिवस वाढण्यास जे प्रमुख घटक जबाबदार आहेत त्यामध्ये वाढती लोकसंख्या हा महत्वाचा घटक आहे. वाढत्या लोकसंख्येच्या वाढत्या गरजा भागविणासाठी कर्ज काढण्याशिवाय सरकारला गत्यंतर नसते. भारतात केवळ लोकसंख्या जास्त नसून गरीब असणाऱ्यांची संख्या ही जास्त आहे. त्यामुळे सरकारला कर व इतर मार्गांनी मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाण अत्यंत कमी आहे. त्यामुळे देशातून व विदेशातून सरकारला कर्ज उभारणी करावी लागत असून देशांतर्गत व विदेशी कर्जाचा भार दिवसेंदिवस वाढत चालला आहे. विदेशी कर्जाची परतफेड परकीय चलनाच्या स्वरूपात आणि वस्तूंच्या स्वरूपात करावी लागते. त्यामुळे आर्थिक विकासावर प्रतिकूल परिणाम होत आहे.

**(५) कामगारांच्या कार्यक्षमतेवर प्रतिकूल परिणाम :–**

वाढत्या लोकसंख्येचा आणि कार्यक्षमतेचा अत्यंत जवळचा संबंध आहे. वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे भारतातील कामगारांच्या कार्यक्षमतेवर अत्यंत प्रतिकूल परिणाम घडून आला आहे. प्रगत राष्ट्रांच्या तुलनेत भारतातील कामगारांची कार्यक्षमता अत्यंत कमी आहे. विकसित राष्ट्रातील एक कामगार चार भारतीय कामगारांएवढे काम करतो. कुटुंबाचा आकार मोठा असल्याने भारतीय कामगार पुरेसा व सकस आहार घेऊ शकत नाहीत. तसेच बहुसंख्येने असणाऱ्या गरीबांना साधा आहार सुध्दा पोटभर मिळत नाही. त्यामुळे त्यांची कार्यक्षमता आणि उत्पादकता कमी आहे. कृषी, उद्योग इत्यादी विविध क्षेत्रात काम करणाऱ्या भारतीय कामगारांची कार्यक्षमता कमी असल्याने देशाच्या आर्थिक विकासाचा दर सुध्दा कमी राहिला आहे.

**(६) पायाभूत सुविधांची कमतरता व त्यावरील प्रचंड खर्च :–**

रस्ते, वीज, पाणी यांचा पायाभूत सुविधांमध्ये समावेश होतो. ग्रामीण, शहरी अशा सर्वच विभागातील लोकसंख्या वाढत असल्याने या सुविधांमध्ये कितीही वाढ केली तरी त्यांचा तुटवडा जाणवत आहे. या सुविधा अत्यंत आवशक आहेत. तरीही त्या पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देण्यात सरकारला अद्याप यश आलेले नाही. भारतात सात लाखापेक्षा जास्त खेडी आहेत. या सर्व खेड्यांना रस्ते, वीज, पाणी या सुविधा

पुरविण्यासाठी सरकारला आपली तिजोरी रिकामी करावी लागत आहे. भारतात ज्या पायाभूत सुविधा आहेत त्या पुरेशा नाहीतच. शिवाय त्यांचा दर्जाही कमी आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे भारतात पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर सरकारला प्रचंड खर्च करावा लागत आहे.

**(७) शेतीवरील लोकसंख्येचा प्रचंड ताण :–**

शेती हे भारतातील ग्रामीण भागातील लोकांच्या उपजीविकेचे आणि रोजगाराचे प्रमुख साधन आहे. परंतु वाढत्या लोकसंख्येमुळे शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण भारतात विकसित देशापेक्षा जास्त आहे. इंग्लंडमध्ये शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांचे प्रमाण २% तर अमेरिकेत ३% एवढे आहे. भारतात ५०% पेक्षा जास्त लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळे ग्रामीण भागात शेती क्षेत्रात सुप्त बेकारी/अदृश बेकारी वाढत आहे. त्यामुळे शेतीची उत्पादकता वाढणाऐवजी घटत आहे. अशा प्रकारे वाढत्या लोकसंख्येचा कृषी विकासावर प्रतिकूल परिणाम होत आहे. त्यामुळे आर्थिक विकासावरही प्रतिकूल परिणाम होत आहे.

**(८) अनुत्पादक लोकसंख्येत वाढ :–**

राष्ट्रीय उत्पन्नात योगदान देणारी लोकसंख्या म्हणजे उत्पादक लोकसंख्या होय आणि राष्ट्रीय उत्पन्नात योगदान नसणारी लोकसंख्या म्हणजे अनुत्पादक लोकसंख्या होय. अनुत्पादक लोकसंख्येमध्ये ० ते १४ या वयोगटातील व्यक्ती, ६० वर्षाच्या पुढील व्यक्ती आणि १५ ते ६० वयोगटातील कामधंदा न करणाऱ्या व्यक्तींचा समावेश होतो. वाढत्या लोकसंख्यमुळे अनुत्पादक लोकांचे प्रमाण वाढत असून त्याचे अर्थव्यवस्थेवर अनिष्ट परिणाम होत आहेत. अनुत्पादक लोकसंख्येचा भार उत्पादक लोकसंख्येला सोसावा लागतो. अनुत्पादक लोकसंख्या वस्तू आणि सेवांचा उपभोग घेते. परंतु उत्पादनाच्या किंवा आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत भाग घेत नाही. त्यामुळे वाढती अनुत्पादक लोकसंख्या हा घटक भारताच्या आर्थिक विकासातील प्रमुख अडसर बनला आहे.

**(९) प्रदूषणाची समस्या :–**

कमी लोकसंख्या असलेल्या देशांच्या तुलनेत प्रचंड लोकसंख्या असलेल्या भारतासारख्या देशात प्रदूषणाचा प्रश्न अत्यंत गंभीर स्वरूपाचा असतो असे आढळून आले आहे. हवेचे प्रदूषण, जमिनीचे प्रदूषण इत्यादी प्रदूषणाच्या समस्या भारतात अतिरिक्त लोकसंख्येमुळेच निर्माण झाल्या आहेत. या विविध प्रकारच्या प्रदुषणामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळत असून प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी भारत सरकारला दरवर्षी कोट्यावधी रूपये खर्च करावे लागत आहेत. त्यामुळे विकास कामासाठी पैसा अपुरा पडत आहे. त्यामुळे आर्थिक विकासात अडथळा निर्माण झाला आहे. विविध प्रकारच्या प्रदूषणामुळे कृषी क्षेत्राची उत्पादकता घटत असून आर्थिक विकासाच्या वेगावर प्रतिकूल परिणाम होत आहे.

**(१०) शिक्षणावरील खर्चात प्रचंड वाढ :–**

प्रचंड वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येचा परिपाक म्हणून भारतात शिक्षण घेणाऱ्यांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यामुळे शाळा, महाविद्यालये यांच्या संख्येत सतत वाढ होत असून त्या प्रमाणात सरकारचा खर्चही वाढत चालला आहे. शाळेबरोबरच शिक्षकांच्या संख्येतही वाढ होत असल्याने शिक्षणावरील खर्च अवाढव्य बनला आहे. अशा प्रकारे वाढत्या लोकसंख्येमुळे भारतात शाळा व शिक्षक यांच्या संख्येत प्रचंड वाढ होत असून शिक्षणावरील खर्चही बेसुमार वाढत चालला आहे.

**समारोप**

भारतात भयानक वेगाने लोकसंख्या वाढत असल्याने भारतातील वाढती लोकसंख्या हा आर्थिक विकासातील प्रमुख अडसर ठरला आहे. त्यामुळे विकसित देशापेक्षा आपल्या देशाच्या विकासाचा वेग खूपच कमी राहिला आहे.

## २.२.४ लोकसंख्या वाढीच्या नियंत्रणासाठी उपाय (Measures to Control Population)

**प्रास्ताविक :–**

भारतात लोकसंख्या वाढीचा दर अलिकडच्या काळात घटला असला तरी तो चीनपेक्षा जास्तच आहे. भारतात लोकसंख्येचा स्फोट झाला आहे. भारतात ३० ते ४० कोटी लोकसंख्या अतिरिक्त आहे. लोकसंख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. भारताला भविष्यात महासत्ता म्हणून उदयास यायचे असेल तर लोकसंख्या वाढीच्या दरावर (वेगावर) नियंत्रण ठेवणाशिवाय पर्याय नाही. भारतात वाढत्या लोकसंख्येमुळे (प्रचंड आकाराच्या लोकसंख्येमुळे) दारिद्र्य, बेकारी, पर्यावरणीय प्रदूषण, झोपडपट्ट्यांची वाढ, नैसर्गिक साधनसंपत्तीचा बेसुमार वापर इत्यादी समस्या निर्माण झाल्या आहेत. या समस्या सोडविणे आवशक आहे. लोकसंख्या वाढीमुळे निर्माण झालेल्या या समस्या सोडविण्यासाठी जन्मदर (Birth rate) म्हणजेच लोकसंख्या वाढीचा वेग आटोक्यात आणला पाहिजे. लोकसंख्या वाढीचा वेग आटोक्यात आणण्यासाठी काही उपाय खालीलप्रमाणे सुचवले आहेत.

**(१) निरक्षरतेचे उच्चाटन करणे :–**

भारतात आजही सुमारे २५ टक्के लोक निरक्षर आहेत. या सर्व निरक्षरांना साक्षर करणे आवशक आहे. तसेच एकही मनुष्य निरक्षर राहणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. कारण साक्षरता आणि लोकसंख्या यांचा जवळचा संबंध आहे. साक्षरतेचे प्रमाण जेवढे जास्त तेवढा लोकसंख्या वाढीचा वेग कमी असतो. केरळ राज्यात साक्षरतेचे प्रमाण जवळ जवळ १०० टक्के आहे. त्यामुळे त्या राज्यातील लोकसंख्या वाढीचा वेगही कमी राहिला आहे. बिहार सारख्या ज्या राज्यात निरक्षरतेचे प्रमाण मोठे आहे, त्या राज्यात लोकसंख्या वृद्धीचा दर जास्त असून लोकसंख्येत पडणारी भर मोठी आहे. म्हणून लोकसंख्या वाढीचा वेग कमी करणासाठी देशातील साक्षर लोकांचे प्रमाण १०० टक्क्यापर्यंत पोहचले पाहिजे.

**(२) अंधश्रध्दा निर्मूलन आवशक :–**

'मुलगा हा वंशाचा दिवा' अशासारख्या काही अंधश्रध्दा भारतातील कित्येक लोकांच्या मनात घट्ट रूतून बसल्या आहेत. त्यामुळे जन्मदर (लोकसंख्या वृद्धीचा दर) भारतात जास्त आहे. म्हणून सामाजिक कार्यकर्ते, सरकार, अंधश्रद्धा निर्मूलन करणाऱ्या संस्था या सर्वांनी लोकांच्या मनातील विविध अंधश्रध्दा नष्ट केल्या पाहिजेत. तसेच मृत्यूनंतरचे विधी करता यावेत म्हणून मुलगाच असला पाहिजे अशी एक गैरसमजूत (अंधश्रध्दा) रूढ आहे. म्हणून मृत्यूनंतरचे सर्व विधी ज्या कुटुंबात मुलगा नाही, त्या कुटुंबातील मुलींना (स्त्रियांना) करणाची परवानगी समाजाने दिली पाहिजे. त्याशिवाय मुलगा होईपर्यंत कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया न करणाऱ्यांचे प्रमाण कमी होणार नाही. थोडक्यात ज्या ज्या अंधश्रध्दामुळे, गैरसमजुतीमुळे लोकसंख्यावाढीचा वेग वाढलेला आहे, त्या सर्व अंधश्रध्दा नष्ट झाल्या पाहिजेत. त्याशिवाय कुटुंबाचा आकार लहान राहणार नाही.

**(३) प्रौढ शिक्षणाचा दर्जा उंचावणे आवशक :–**

साक्षर लोकांचे प्रमाण वाढविण्यासाठी सरकारकडून प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम संपूर्ण देशभर राबवला जात आहे. मात्र प्रौढांना किंवा तरूण अशिक्षितांना केवळ लिहा–वाचायला शिकवणे एवढाच माफक भाग प्रौढ शिक्षणात नसावा. लोकसंख्या वाढीचे दुष्पपरिणाम किंवा मोठ्या आकाराच्या कुटुंबाचे दुष्परिणाम (तोटे) तरूण व प्रौढ निरक्षरांना समजतील, पटतील अशा भाषेत सांगितले पाहिजेत. त्याशिवाय तरूण निरक्षर लोक आपल्या कुटुंबाचा आकार लहान ठेवणार नाहीत. प्रौढ किंवा वयस्कर निरक्षरांना मोठ्या आकाराच्या कुटुंबाचे दुष्परिणाम समजाऊन दिले तर ते आपल्या कुटुंबातील मुलांकडून किंवा सुनांकडून जास्त अपत्यांची अपेक्षा धरणार नाहीत. गुणवत्तापूर्ण प्रौढ शिक्षणाशिवाय 'मुलगा हा वंशाचा दिवा' यासारख्या अंधश्रध्दा व गैरसमजुती नष्ट होणार नाहीत. अंधश्रध्दा व वेडगळ समजुती नष्ट होतील अशा प्रकारच्या कथा, कविता, लघुनाटिका इत्यादींचा समावेश प्रौढ शिक्षणात (प्रौढासाठीच्या पुस्तकात) करावा. यामुळे लोकसंख्येच्या प्रश्नाविषयी लोकांच्यात जागृती निर्माण होऊन लोकसंख्या वाढीचा दर कमी होऊ शकेल.

**(४) उच्च शिक्षणाकडे विशेष लक्ष देणे आवशक :–**

उच्च शिक्षणाचा आणि कुटुंबाचा आकाराचा जवळचा संबंध आहे. उच्च शिक्षित व्यक्तींच्या कुटुंबाचा आकार लहान असतो. परंतु आपल्या देशात एकूण शिक्षित व्यक्तीमध्ये उच्च शिक्षित लोकांचे प्रमाण कमी आहे. लोकसंख्या वाढीचा वेग आटोक्यात यायचा असेल तर देशात उच्च शिक्षित लोकांची संख्या वाढणे आवशक आहे. म्हणून सरकारने प्राथमिक शिक्षणाइतके उच्च शिक्षणालाही, महत्व देणे आवशक आहे. सरकारने उच्च शिक्षणावरील खर्चात सतत (दरवर्षी) वाढ करावी. शाळा, महाविद्यालयांच्या संख्येत त्यांच्या गरजेनुसार वाढ करावी. तसेच त्यांच्या गुणात्मक वाढीकडेही लक्ष द्यावे. लोकसंख्या वाढीचा दर नियंत्रित करण्यामध्ये उच्च शिक्षणाची भूमिका खूप महत्वाची आहे. म्हणून सरकारने उच्च शिक्षणाकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. विकसित देशात लोकसंख्या वाढीची (अतिरिक्त लोकसंख्येची) समस्या आढळत नाही. कारण

त्या देशात उच्च शिक्षितांचे प्रमाण मोठे आहे. भारतातही उच्च शिक्षित कुटुंबाचा आकार लहान आहे. म्हणून भारतात सर्वांना उच्च शिक्षण मिळेल असे प्रयत्न केले पाहिजेत. सर्व गरीबांना, मध्यमवर्गीयांना सर्व प्रकारचे उच्च शिक्षण मोफत दिले पाहिजे. त्यामुळे लोकसंख्या वाढीचा दर तर कमी होईलच. शिवाय इतरही अनेक फायदे संबंधित व्यक्तींना आणि संपूर्ण राष्ट्राला मिळतील.

**(५) स्त्री शिक्षणास प्राधान्य देणे आवशक :–**

भारतात पुरूषांपेक्षा स्त्रियामध्ये निरक्षरतेचे प्रमाण मोठे आहे. स्त्री शिक्षणास प्राधान्य दिल्याशिवाय लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवणे कठीण आहे. स्त्रियांची शैक्षणिक पातळी आणि त्यांना देण्यात येणाऱ्या शिक्षणाचा दर्जा उंचावला तर कुटुंबात व समाजात त्यांना चांगली वागणूक मिळू शकेल. शिक्षणाशिवाय स्त्रियांचा आर्थिक व सामाजिक दर्जा उंचवणार नाही. स्त्रिया जर भरपूर शिकल्या तर सर्वत्र त्यांना पुरूषांच्या बरोबरीने दर्जा मिळेल. कुटुंबाचा आकार लहान (मर्यादित) ठेवण्याचे महत्व त्यांना पटेल. स्वत:च्या अपत्यांची संख्या किती असावी? ते ठरवण्याचा अधिकार स्त्रियांना मिळू शकेल. त्यामुळे लोकसंख्या वाढीचा वेग कमी होणास मदत होईल. शिक्षणाशिवाय लहान कुटुंबाचे फायदे स्त्रियांना समजणार नाहीत. उच्च शिक्षित स्त्रियावर दोन पेक्षा अधिक अपत्यांना जन्म द्यावा अशी सक्ती त्यांच्या नवऱ्यांकडून, सासू व सासरे यांच्याकडून होणार नाही. तसा दबाव आला तरी शिकलेल्या स्त्रिया त्यांचे ऐकणार नाहीत. म्हणून स्त्री शिक्षणास प्राधान्य देणे अत्यंत आवशक आहे.

**(६) स्त्रियांना नोकऱ्यात ५० टक्क्यापेक्षा जास्त आरक्षण ठेवावे :–**

नोकरदार स्त्री आणि कुटुंबाचा आकार या दोन घटकांचा जवळचा संबंध आहे. जगात सर्वत्र नोकरदार स्त्रियांच्या कुटुंबाचा आकार लहान आढळतो. भारतही त्यास अपवाद नाही. नोकरदार स्त्रिया एक किंवा दोन अपत्यावरच मुले बंद होण्याची शस्त्रक्रिया करतात. दोन पेक्षा जास्त अपत्यांना जन्म द्यावा असे त्यांना वाटत नाही. तेवढा वेळही त्यांच्याकडे नसतो. एकाच अपत्यावर कुटुंब नियोजन करणाऱ्यांचे (मुले होऊ न देण्याऱ्यांचे) प्रमाण वाढत आहे. आपल्या देशात लोकसंख्या वाढीचा वेग जास्त आहे. कारण आपल्या देशात नोकऱ्या करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण खूपच कमी आहे. जन्मदर (लोकसंख्या वाढ) आटोक्यात ठेवण्यासाठी सरकारने स्त्रियांना सरकारी आणि खाजगी क्षेत्रात ५० टक्क्यापेक्षा जास्त आरक्षण ठेवावे. नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण जसजसे वाढत जाईल. तसतसा जन्मदर घटत जाऊन लोकसंख्या वाढीचा वेग कमी होईल. म्हणून भारतातील जास्तीत जास्त स्त्रियांना शिक्षण, आरोग्य, वाहतूक दळणवळण, व्यापार, उद्योग, महसूल इत्यादी सर्व क्षेत्रात कायम स्वरूपाच्या नोकऱ्या दिल्या पाहिजेत. केवळ सरकारी क्षेत्रात आरक्षण न ठेवता खाजगी क्षेत्रात सुद्धा त्यांना काम करणाची संधी दिली पाहिजे. 'चूल आणि मूल' एवढेच स्त्रियांचे कार्यक्षेत्र राहता कामा नये. स्त्रियांना मोठ्या प्रमाणात नोकऱ्या मिळाल्यास लोकसंख्या वाढीचा वेग तर कमी होईलच शिवाय स्त्रियांचा देशाच्या आर्थिक विकासातील (राष्ट्रीय उत्पन्नातील) सहभाग सुद्‌धा वाढेल. देशाचाही मोठा फायदा होईल. याचा विचार सरकारने केला पाहिजे.

**(७) विवाह वयोमर्यादेचे पालन आवशक :–**

भारतात कायद्याने स्त्रीच्या विवाहाचे वय १८ आणि पुरूषांच्या विवाहाचे वय २१ वर्षे ठरवण्यात आले आहे. परंतु देशाच्या काही भागात या विवाह वयोमर्यादेचे पालन केले जात नाही. ग्रामीण व आदिवासी भागात काही मुला-मुलींचे विवाह १६ ते १८ या वयात होतात. म्हणजे कमी वयात विवाह होतात. त्यामुळे ग्रामीण व आदिवासी भागात अशा कुटुंबाचा आकार मोठा आहे. म्हणून लोकसंख्या वाढीचा वेग आटोक्यात ठेवण्यासाठी देशातील नागरिकांनी सरकारने ठरवून दिलेल्या विवाहाच्या वयाच्या नियमांचे (कायद्यांचे) पालन केले पाहिजे. सरकारने सुद्धा विवाहाच्या वयासंबंधींच्या कायद्यांची अंमलबजावणी अत्यंत काटेकोर व कडक केली पाहिजे. विवाह वयोमर्यादा कायद्याच्या बाबतीत लोकांच्यामध्ये पुरेशी जागरूकता आलेली नाही. ती निर्माण करणे आवश्यक आहे. शिक्षेपेक्षा प्रबोधनाच्या माध्यमातून वयोमर्यादेचे पालन करणास नागरिकांना तयार केले पाहिजे.

**(८) खाजगी दवाखान्यात मोफत कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया चालू करणे :–**

कित्येक ठिकाणी सरकारी दवाखान्यातील कर्मचारी चांगली, विश्वासार्ह सेवा देत नाहीत. लोकांचा खाजगी दवाखान्यावर जेवढा विश्वास आहे, तेवढा सरकारी दवाखान्यावर नाही. म्हणून खाजगी दवाखान्यात सुद्धा मोफत कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया सुरू झाल्या पाहिजेत. सरकारने त्यासाठी खाजगी दवाखान्यांना पुरेशी आर्थिक मदत करावी. सरकारी दवाखाने, तेथील डॉक्टर्स, कर्मचारी चांगली वागणूक देत नसल्याने लोक सरकारी दवाखान्यात जायला फारसे उत्सुक नसतात. कुटुंब नियोजन कार्यक्रमाला सहकार्य करणाऱ्या खाजगी डॉक्टरांना सरकारने योग्य ती मदत करावी. त्यांना विशेष पारितोषिके सुद्धा द्यावीत.

**(९) दारिद्र्य निर्मूलन :–**

बहुतेक सर्व गरीब किंवा दरिद्री लोक आपल्या अपत्याकडे उत्पन्नाचे साधन म्हणूनच पाहतात. त्यामुळे ते जास्तीत जास्त अपत्यांना जन्म देतात. मुले मोठी झाली की मजुरी करून, शेती कामात मदत करून, काम-धंदा करून कुटुंबाला आर्थिक हातभार लावतील असे दरिद्री लोकांना वाटते. त्यामुळे भारतात गरीब कुटुंबाचा आकार मोठा राहिला आहे. लोकसंख्या वाढीच्या वेगावर नियंत्रण ठेवणासाठी भारत सरकारने देशातील दारिद्र्याचे पूर्णपणे उच्चाटन केले पाहिजे. दारिद्र्य नष्ट केल्याशिवाय लोकांना उत्पन्नासाठी आपल्या अपत्यावर अवलंबून राहावे लागणार नाही. म्हणून सरकारने दारिद्र्य नष्ट करावे. तसेच दरिद्री लोकांना विश्वास देऊन त्यांना विविध सवलती देऊन त्यांचे कुटुंब नियोजनाच्या कार्यक्रमाला सहकार्य मिळवावे. थोडक्यात दारिद्र्य निर्मूलनाशिवाय जन्मदर (लोकसंख्या वाढीचा वेग) आटोक्यात येणार नाही. म्हणून दरिद्र्य निर्मूलन कार्यक्रम सरकारने अधिक जोरदारपणे राबवणे आवशक आहे.

**(१०) समान नागरी कायद्याची आवशकता :–**

भारतात सर्व राज्यात समान नागरी कायदा नाही. एक-दोन राज्यांनी केवळ समान नागरी कायदा केला आहे. समान नागरी कायदा संपूर्ण देशासाठी लागू केला पाहिजे. प्रत्येकाला एकाच स्त्रीशी विवाह करता येईल

आणि दोनच अपत्यांना जन्म देता येईल अशी कायद्यात स्पष्ट तरतूद करावी. त्यामुळे लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवता येऊन लोकसंख्येचा आकार वाढणार नाही. १९४७ सालीच समान नागरी कायदा करणे आवश्यक होते. परंतु तसे न केल्याने विशिष्ट समुदायाची लोकसंख्या दहा कोटीपेक्षा अधिक वाढल्याचे दिसून येते.

**(११) सर्वपक्षीय सहमतीची गरज :–**

आणीबाणीच्या काळात कुटुंब नियोजनाबाबत त्यावेळच्या काँग्रेस सरकारने कडक कायदा केला होता. त्यामुळे लोकसंख्या वाढीचा वेगही कमी झाला होता. परंतु या कडक कायदांमुळे (कायद्याच्या कडक अंमलबजावणीमुळे) त्या पक्षाचा भारतीय जनतेने निवडणूकीत पराभव केला. काही वर्षे काँग्रेसला सत्तेपासून दूर ठेवले. या बाबीचा देशातील सर्वच राजकीय पक्षांनी मोठा धसका घेतला. त्यामुळे कोणत्याही राजकीय पक्षाने आजअखेर लोकसंख्येच्या प्रश्नाबाबत (कुटुंब नियोजनाबाबत) कडक धोरण स्वीकारलेले नाही. सत्ता काबीज करणे व मिळवलेली सत्ता टिकवणे यासाठी कुटुंबनियोजन कार्यक्रम हा विषय कोणताही राजकीय पक्ष महत्वाचा विषय मानत नाहीत. म्हणून सत्ता व राजकारण बाजूला ठेवून मतपेटीचा विचार न करता लोकसंख्याविषयक कडक धोरण सर्व राजकीय पक्षांनी स्वीकारले पाहिजे. लोकसंख्येच्या प्रश्नावर (मुद्यावर) सर्व राजकीय पक्षांनी एकत्र आले पाहिजे.

**(१२) धार्मिक नेत्यांचे सहकार्य घेणे :–**

भारतात विशिष्ट धर्मातील नेते आपल्या धर्मातील लोकांची संख्या वाढावी असा छुपा आणि उघड प्रयत्न करताना दिसतात असे दिसून येत आहे. याचा एक पुरावा सुद्‌धा उघड करता येईल. भारताच्या प्रत्येक जनगणनेत एकूण लोकसंख्येत हिंदू धर्मियांचे शेकडा प्रमाण घटत आहे व मुस्लीम धर्मियांची लोकसंख्या आणि एकूण लोकसंख्येतील शेकडा प्रमाण वाढत आहे. त्यामुळे कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम यशस्वी होत नाही. म्हणून शासनाने कुटुंब नियोजन कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी (लोकसंख्या वाढीचा वेग आटोक्यात आणण्यासाठी) धार्मिक नेत्यांचे सहकार्य घेतले पाहिजे. त्यांच्यामार्फत सरकारने लहान आकाराच्या कुटुंबाचे महत्व लोकांच्या मनावर बिंबवले पाहिजे. धार्मिक नेत्यांच्या प्रभावाखाली असलेल्या जनतेचा कुटुंब नियोजन कार्यक्रमाला प्रतिसाद मिळवायचा असेल तर सरकारने कुटुंब नियोजनाच्या कार्यक्रमात धार्मिक नेत्यांच्या भूमिकेला महत्व दिले पाहिजे.

**(१३) लोकसंख्या शिक्षणाचा अभ्यासक्रमात समावेश करणे :–**

शालेय व महाविद्यालयीन शिक्षणात लोकसंख्या शिक्षणाचा व्यापक प्रमाणात समावेश केला पाहिजे. विद्यार्थ्यांना लोकसंख्या शिक्षणातील घटक प्रभावीपणे शिकवले पाहिजेत. लोकसंख्या वाढीची कारणे, दुष्परिणाम, उपाय, कुटुंब नियोजनाचे महत्व इत्यादी घटकांचा समावेश लोकसंख्या शिक्षणात करून विद्यार्थ्यांना लोकसंख्या प्रश्नाचे गांभिर्य पटवून दिले पाहिजे.

**(१४) लोकसंख्याविषयक धोरणाची अंमलबजावणी प्रभावीपणे करणे आवश्यक :–**

भारतात दर काही वर्षांनी केंद्र सरकार तसेच राज्य सरकारे सुद्‌धा लोकसंख्याविषयक धोरणे जाहीर करत असतात. लोकसंख्या वाढीचा वेग कमी करणे आणि लोकसंख्येची गुणवत्ता वाढवणे हे त्यामागचे प्रमुख उद्देश असतात. आपली लोकसंख्याविषयक धोरणे अत्यंत आकर्षक असतात. परंतु त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे व प्रामाणिकपणे होत नाही असे आढळते. यासाठी लोकसंख्याविषयक धोरणाची अंमलबजावणी प्रभावी व काटेकोर व्हावयास हवी.

**(१५) विशेष सवलती :–**

लोकसंख्या वाढीचा वेग आटोक्यात आणणासाठी सरकारने काही खास सवलती जनतेला दिल्या पाहिजेत. उदाहरणार्थ (१) बेघर व्यक्तीने एकाच अपत्यावर मुले बंद होण्याची शस्त्रक्रिया केली तर त्याला घर बांधून देणासाठी मदत करावी. अशाच बेघरांना घरे दावीत. (२) बेरोजगार तरूणांनी एकाच अपत्यावर कुटुंब नियोजन केल्यास त्यांना प्राधान्याने नोकऱ्या द्याव्यात. (३) एकाच अपत्यावर कुटुंब नियोजन करणाऱ्यांना प्राधान्याने दारिद्र्य निर्मूलन योजनांचे फायदे द्यावेत. (४) ज्यांना एकच अपत्य आहे व ज्यांनी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केली आहे, त्या कुटुंबातील अपत्याच्या शिक्षणाचा खर्च सरकारने करावा. अशा काही सवलती दिल्या तर अनेक लोक एकाच आपत्यावर कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया करतील. त्यामुळे जनन दर आटोक्यात येऊन लोकसंख्या वाढीच्या भयावह वेगाला आला बसू शकेल.

**समारोप :–**

देशाचा जलद आर्थिक विकास घडवून आणणासाठी, विकासाचे फायदे सर्व लोकांच्यापर्यंत पोहचावेत यासाठी देशाच्या लोकसंख्या वाढीचा वेग कमी होणे अत्यंत आवशक आहे. सरकारने वाढत्या लोकसंख्येमुळे निर्माण झालेल्या समस्या सोडविणासाठी विविध उपाय योजले पाहिजेत. तसेच लोकसंख्या वाढीचा वेग कमी करण्यासाठी सुद्धा विशेष पावले उचलली पाहिजेत.

## २.२.५ भारत सरकारचा कुटुंबनियोजन कार्यक्रम

**प्रास्ताविक:**

भारताच्या लोकसंख्येचा आकार प्रचंड आहे. सन १९०१ साली भारताची लोकसंख्या २३.६० कोटी इतकी होती. आज ती १४० कोटी पर्यंत जाऊन पोहचली आहे. १९०१ च्या तुलनेत आज भारताच्या लोकसंख्येत १०० कोटी पेक्षा अधिक भर पडली आहे. भारतात लोकसंख्येचा स्फोट झाला आहे हे वास्तव आहे. तसेच भारतात ३०ते ४० कोटी लोकसंख्या अतिरिक्त आहे. अतिरिक्त लोकसंख्येचा देश म्हणून भारताला जगात ओळखले जाते. प्रचंड आकाराच्या लोकसंख्येमुळे आणि वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्या वृद्धी दरामुळे भारतात अनेक आर्थिक आणि सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत. शेतीवर लोकसंख्येचा दबाव वाढला आहे. अन्नधान्याची महागाई भडकली आहे. निर्यातीवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. पायाभूत सोयीसुविधावर प्रचंड ताण पडला आहे. लोकसंख्या वाढीचे हे दुष्परिणाम टाळण्यासाठी लोकसंख्या

वाढीच्या दरावर नियंत्रण ठेवले पाहिजे हे ओळखून सरकारने देशात कुटुंबनियोजनाचा कार्यक्रम हाती घेतला. पुढे सरकारने कुटुंबनियोजन कार्यक्रम हे नाव बदलून कुटुंब कल्याण कार्यक्रम असे नाव ठेवले. भारत सरकारचा कुटुंब नियोजन कार्यक्रम हा सरकारच्या लोकसंख्या धोरणाचाच एक भाग आहे.

### लोकसंख्या धोरण

लोकसंख्या वाढीचा दर कमी करण्यासाठी सरकारने योजलेले काही उपाय म्हणजे लोकसंख्या धोरण होय. ज्या धोरणामुळे लोकसंख्येचा आकार (size of population) आणि लोकसंख्या वाढीचा वेग (Rate of Growth of population) यावर परिणाम होतो, त्यास लोकसंख्या धोरण असे म्हणतात. ज्या देशात लोकसंख्येचा आकार लहान असतो, लोकसंख्या खूप कमी असते, त्या देशात लोकसंख्या धोरणाचा उद्देश लोकसंख्येत वाढ करणे हा असतो. अशा देशांच्या लोकसंख्या धोरणात लोकसंख्या वाढीसाठी उपाय योजलेले असतात. भारतासारख्या ज्या देशात लोकसंख्या प्रचंड आकाराची असते त्या देशात लोकसंख्या वाढीचा दर कमी करणासाठी (जन्मदर नियंत्रणात ठेवण्यासाठी) उपाय सुचवलेले असतात. जन्मदर कमी करण्यासाठी भारतासारख्या देशात सरकारी पातळीवरुन कुटुंबनियोजन कार्यक्रमाची अमंलबजावणी केली जाते.

### कुटुंब नियोजन कार्यक्रम (Family Planning Programme)

स्वातंत्र्यपूर्वकाळात ब्रिटिश सरकारने लोकसंख्येच्या प्रश्नाकडे पूर्णत: दुर्लक्ष केले होते. परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र भारत सरकारने लोकसंख्या वाढ रोखण्याच्या उद्देशाने कुटुंबनियोजन कार्यक्रम राबवण्याला प्राध्यान्य दिले. ब्रिटिश सरकारने मृत्यूदर कमी करण्यासाठी उपाय योजले नाहीत. १९२१ नंतर भारतात लोकसंख्येत वाढ होत गेली. लोकसंख्या वाढीची समस्या निर्माण होऊन आज १०० वर्षे झाली आहेत. १००वर्षापूर्वीही लोकसंख्या वाढीचा प्रश्न देशात होताच. कारण साधनसंपत्ती कमी होती आणि तिचा पुरेसा उपयोग झाला नव्हता. १९३४ साली पॅरेलाल बद्दल यांनी लोकसंख्येच्या समस्येबद्दल Population Problem In India या पुस्तकात लेखन केले आणि जागृती निर्माण केली. प्रा. रघुनाथ धोंडो कर्वे यांनी लोकसंख्या वाढीचे गांभीर्य ओळखून संततीनियमन कार्यक्रमाचा प्रचार व प्रसार करणास सुरवात केली. त्यांनी १९२५ साली संतती नियमन चिकित्सालय सुरु केले. पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून सरकार देशात कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम राबवत आहे. लोकसंख्या वाढीचा दर कमी करणे हे भारताच्या आर्थिक नियोजनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या उद्दिष्ट्याच्या पूर्तीसाठी देशात सरकारकडून कुटुंबनियोजनाला प्राधान्य दिले गेले आहे. कुटुंब नियोजन कार्यक्रम सरकारी असला तरी तो ऐच्छिक आहे. लोकांनी स्वेच्छेने जाणीवपूर्वक आपल्या कुटुंबाचा आकार मर्यादित ठेवणे किंवा लहान ठेवणे म्हणजे कुटुंबनियोजन होय. कुटुंबनियोजन कार्यक्रमाअंतर्गत सरकार गर्भधारणा होऊ नये यासाठी गोळ्या, निरोध, तांबी इत्यादी साधने जनतेला पुरवते. तसेच गर्भधारणा कायमची बंद होणासाठी कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेचा पर्याय लोकांना देते. ही कुटुंब नियोजनाची साधने आहेत. भारतात कुटुंब नियोजन कार्यक्रमाला सन १९५२ पासून सुरवात झाली. कुटुंबात जन्माला आलेली मुले सुदृढ ठेवणे, कुटुंब सुखी व समाधानी निर्माण करणे, अधिक जबाबदार माता – पिता

तयार करणे, कुटुंबातील अपत्यांची संख्या कमीत कमी ठेवणे ही कुटुंब नियोजन कार्यक्रमाची उदिष्ट्ये आहेत.

**पंचवार्षिक योजना काळातील कुटुंब नियोजन कार्यक्रमाची प्रगती**

भारत सरकारने आर्थिक विकासाचा दर वाढवणे, रोजगार संधीत वाढ करणे, दारिद्र्य निर्मूलन करणे, लोकसंख्या वाढीचा वेग कमी करणे या उदिष्टांच्या पूर्तीसाठी सन १९५१ पासून देशात पंचवार्षिक योजनांची अंमलबजावणी करण्यास सुरवात केली आहे. आत्तापर्यंत १२ पंचवार्षिक योजना आणि सहा वार्षिक योजना पूर्ण झाल्या आहेत. या प्रत्येक योजनेत सरकारने कुटुंबनियोजन कार्यक्रमाची अंमलबजावणी केली आहे. त्याचा थोडक्यात आढावा खालीलप्रमाणे घेतला आहे.

**१) पहिली पंचवार्षिक योजना (१९५१–५६)**

पहिल्या पंचवार्षिक योजनेत इतर उदिष्टाबरोबर सरकारने लोकसंख्या वाढीचा वेग कमी करण्यासाठी कुटुंब नियोजन कार्यक्रमाच्या अंमलबजावणीवर लक्ष केंद्रित केले हाते. अनेक आर्थिक व सामाजिक विचारवंतांनी सरकारचे लोकसंख्या वाढीच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले होते. म्हणून पहिल्या योजनेपासूनच १९५२ पासून सरकारने कुटुंबनियोजन कार्यक्रम राबवायला सुरवात केली एप्रिल १९५० मध्ये सरकारने नियोजन मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली लोकसंख्या धोरण समितीची स्थापना केली. आरोग्य सेवा महासंचालकाच्या कार्यालयात कुटुंबनियोजन विभाग सुरु केला. मे १९५३ मध्ये फॅमिली प्लॅनिंग रिसर्च अॅन्ड प्रोग्राम कमिटीची स्थापना केली. मे १९५४ मध्ये फॅमिली प्लॅनिंग ग्रँटस कमिशनची स्थापना केली. पहिल्या योजनेत १४७ कुटुंब नियोजन केंद्रांची सरकारने स्थापना केली. पहिल्या योजनेत कुटुंब नियोजन कार्यक्रमासाठी सरकारने ६५ लाख रुपये खर्चाची तरतूद केली होती. परंतु प्रत्यक्षात केवळ १८.५ लाख रुपये एवढाच सरकारने खर्च केला.

**२) दुसरी पंचवार्षिक योजना (१९५६–६१)**

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत सुध्दा सरकारने लोकसंख्या वाढीच्या प्रश्नाला महत्व दिले. कारण लोकसंख्या वेगाने वाढत होती. दुसऱ्या योजनेत मे १९५६ मध्ये सरकारने स्वंतत्र 'मध्यवर्ती कुटुंब नियोजन मंडळाची' स्थापना केली. या काळात सरकारने फॅमिली प्लॅनिंग क्लिनिकची संख्या वाढवली. दुसऱ्या योजनेत या क्लिनिकची संख्या शहरी भागात ८२७ आणि ग्रामीण भागात १३७९ एवढी झाली होती. दुसऱ्या योजनेत सरकारने कुटुंब नियोजन कार्यक्रमासाठी ५ कोटी रुपये खर्चाची तरतूद केली होती. प्रत्यक्षात मात्र २.१५ कोटी रुपये एवढाच खर्च झाला. तरतूदी एवढा खर्च सरकारकडून झाला नाही.

**३) तिसरी पंचवार्षिक योजना (१९६१ ते १९६६)**

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत सुध्दा सरकारने कुटुंब नियोजन कार्यक्रमाला महत्वाचे स्थान दिले होते. या कार्यक्रमाला ठळक प्रसिध्दी मिळावी म्हणून उलटा लाल त्रिकोण वापरण्यास सुरवात केली. कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया केलेल्यांना आर्थिक मोबदला देण्यास सरकारने सुरवात केली. कुटुंब नियोजन केंदांची संख्या

वाढविण्यावर सरकारने भर दिला. दुसऱ्या योजना काळात शहरी भागात या केंद्राची संख्या १३६१ होती तर ग्रामीण भागात ३६७६ होती. ग्रामीण भागात ७०८ उपकेंद्रे सरकारने सुरू केली. तिसऱ्या योजनेत सरकारने कुटुंब नियोजन कार्यक्रमासाठी २५ कोटी रुपयांची तरतूद केली होती. त्यापैकी २४.९० कोटी रुपये सरकारने खर्च केले.

**४) तीन वार्षिक योजना (१९६६ते १९६९)**

सरकारने १९६६ नंतर पंचवार्षिक योजना सुरु केली नाही. त्याऐवजी १९६६ ते १९६९ या काळात एकेक वर्षाच्या तीन योजना राबवल्या. या तीन वार्षिक योजनेत सुध्दा सरकारने कुटुंब नियोजन कार्यक्रमाकडे दुर्लक्ष केले नव्हते. १९६६ ते ६९ या काळात भारतीय सार्वजनिक आरोग्य कार्यक्रमात कुटुंब नियोजन कार्यक्रमाचा समावेश केला. माता, बाल संगोपन कार्यक्रमाची कुटुंब नियोजन कार्यक्रमाशी सरकारने सांगड घातली. १९६९ पर्यंत शहरी भागात २५८६ कुटुंब कल्याण केंद्रे होती. ग्रामीण भागात ४२५० केंद्रे होती. ११७५२ उपकेंद्रे होती. १९६६ ते १९६९ या काळात कुटुंब नियोजन कार्यक्रमावर ७०.४० कोटी रुपये खर्च करण्याचे उद्दिष्ट सरकारने ठेवले होते. परंतु त्यापेक्षा अधिक म्हणजे ७२.२३ कोटी रुपये सरकारने खर्च केले.

**५) चवथी पंचार्षिक योजना (१९६९ ते १९७४)**

चवथ्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी १९६९ ते १९७४ असा होता. या योजनेत सुध्दा सरकारने कुटुंब नियोजन कार्यक्रमाला प्राधान्य दिले होते. चौथ्या पंचवार्षिक योजनेत जन्मदर ३९ वरुन ३२ वर आणण्याचे उद्दिष्ट सरकारने ठरवले होते. या योजना काळात सरकारने मोफत निरोध वाटप पध्दत सुरु केली. गर्भनिरोधक गोळ्या वाटपाच्या कार्यक्रमाची व्याप्ती वाढवली. देशभर नसबंदी कार्यक्रम राबवला. त्यासाठी शिबिरे घेतली. पुरुषांनी नसबंदी करावी यासाठी प्रयत्न केले. १९७२-७३ मध्ये ३१.२ लाख पुरुषांनी नसबंदी शस्त्रक्रिया केल्या. ८३ टक्के पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया शिबिरात करण्यात आल्या. चौथ्या योजनेत सरकारने फॅमिली प्लॅनिंग कौन्सिलची स्थापना केली. महिला डॉक्टरांच्या नेमणूका करणात आल्या. त्यांच्या संख्येत वाढ करणात आली. चौथ्या पंचवार्षिक योजनेत कुटुंब नियोजन कार्यक्रमासाठी सरकारने २७७ कोटी रुपयांची तरतूद केली होती. प्रत्यक्षात त्यापेक्षा जास्त म्हणजे ३१५ कोटी रुपये सरकारने खर्च केले. यावरुन सरकारने या कार्यक्रमाला किती महत्व दिले होते, हे आपल्या लक्षात येते. जन्मदर ३९ वरुन ३२ वर आणण्याचे उद्दिष्ट होते. परंतु प्रत्यक्षात जन्मदर ३५ पर्यंत कमी झाला.

**६) पाचवी पंचवार्षिक योजना (१९७४ ते १९७९)**

पाचव्या योजनेत सरकारने कुटुंबनियोजन कार्यक्रमाचे नाव बदलून कुटुंब कल्याण कार्यक्रम असे ठेवले. पाचव्या योजनेत सरकारने आणीबाणी जाहीर केली. सरकारने संसदेत राष्ट्रीय लोकसंख्या धोरण मांडले व संसदेची त्यास मान्यता घेतली. या काळात जनता पक्षाचे सरकार सत्तेत होते. त्या सरकारने एप्रिल १९७६ मध्ये नवे लोकसंख्याविषक धोरण जाहीर केले. सरकारने विवाहाचे वय वाढवले. मुलींचे विवाहाचे वय १५ होते ते १८ केले व मुलांचे वय १८ वरुन २१ वर्षापर्यंत वाढवले. नसबंदी शस्त्रक्रियावर अधिक भर दिला. कुटुंब नियोजनाबाबत राज्य सरकारची प्रगती पाहून राज्य सरकारांना ८ टक्के विशेष अनुदान देण्याचे केंद्र

सरकारने जाहीर केले. अशी १९७६ च्या लोकसंख्याविषयक धोरणाची वैशिष्ट्ये होती. आणीबाणी लागू केल्यामुळे नसबंदी शस्त्रक्रिया कार्यक्रम वेगाने राबवला. त्यामुळे नसबंदी शस्त्रक्रियांच्या संख्येत मोठी वाढ झाली. नसबंदी शस्त्रक्रिया करुन घेणाऱ्यांच्या आर्थिक मोबदल्यात वाढ केली. १९७६-७७ वर्षात ८२ लाख शस्त्रक्रिया झाल्या होत्या १९७८ वर्षात केवळ ६.४ लाख नसबंदी शस्त्रक्रिया झाल्या. सक्तीने /जबरदस्तीने सरकारने नसबंदी शस्त्रक्रिया कार्यक्रम राबवला. पाचव्या योजनेत कुटुंब नियोजन कार्यक्रमासाठी सरकारने ४९७ कोटी रुपयांची तरतूद केली होती. प्रत्यक्षात ३८० कोटी रुपये सरकारने खर्च केला.

**७) वार्षिक योजना (१९७९-८०)**

१९७९-८० या वर्षात सरकारने एक वार्षिक योजना राबवली. योजना एक वर्षाची असूनही सरकारने कुटुंब कल्याण कार्यक्रमाकडे दुर्लक्ष केले नाही. या कार्यक्रमावर सरकारने १९७९-८० या वर्षात ११८.५० कोटी रुपये खर्च केले.

**८) सहावी पंचवार्षिक योजना (१९८०-१९८५)**

सहाव्या पंचवार्षिक योजनेत सरकारने कुटुंबनियोजनाची काही दीर्घकालीन व अल्पकालीन उद्दिष्टे निश्चित केली. १) जन्मदर ३३ वरुन २०११ साली २१ पर्यंत खाली आणणे २) २००१ साली अपत्यांची संख्या ४.२ वरुन २.३ वर आणणे ३) मृत्यूदर १४ वरुन ९ पर्यंत खाली आणणे. सहाव्या योजनेत २ कोटी ४० लक्ष नसबंदी शस्त्रक्रिया करण्याचे उद्दिष्ट होते. हे उद्दिष्ट पूर्ण झाले नाही. प्रत्यक्षात १ कोटी ७० लाख एवढ्याच शस्त्रक्रिया झाल्या. १ कोटी १० लक्ष लोकांनी निरोध वापरावा अशी सरकारची अपेक्षा होती. प्रत्यक्षात केवळ ९३लाख लोकानीच निरोधाचा वापर केला. सहाव्या पंचवार्षिक योजनेत कुटुंब कल्याण कार्यक्रमासाठी सरकारने १४४८ कोटी रुपयांची तरतूद केली होती. १९८३ मध्ये राष्ट्रीय आरोग्य धोरण जाहीर केले.

**९) सातवी पंचवार्षिक योजना (१९८५ते१९९०)**

सातव्या पंचवार्षिक योजनेत कुटुंब कल्याण कार्यक्रमाकडे सरकारने विशेष लक्ष दिले. या योजनेत सन २००० पर्यंत गाठावयाची उद्दिष्टे निश्चित करणात आली होती. १) लोकसंख्या वाढीचा दर १.२ प्रतिशत आणणे २) जन्मदर (crude Birth Rate) हजारी २१ पर्यंत खाली आणणे ३) मृत्यूदर (crude Death Rate) हजारी ९ पर्यंत आणणे ४) बालमृत्यूदर हजारी ६० पर्यंत खाली आणणे ५) जननक्षम जोडपी आरोग्य संरक्षण दर (Couple Protection Rate) प्रतिहजार ६०आणणे. इ. सातव्या योजनेत सरकारने माता-बाल आरोग्य कार्यक्रमाला महत्व दिले. गरोदर स्त्रियांच्या आरोग्याची काळजी घेण्यावर भर दिला. आयुर्वेद, होमिओपॅथी, निसर्गोपचार अशा सर्व उपचार पध्दतीचा वापर करण्याला सरकारने परवानगी दिली. या योजनेत ३१ दशलक्ष नसबंदी शस्त्रक्रिया करणाचे उद्दिष्ट सरकारने ठेवले होते. प्रत्यक्षात २३.७० दशलक्ष नसबंदी शस्त्रक्रिया पूर्ण झाल्या. याबाबतीत ७६ टक्के यश आले. २१.२५ दशलक्ष लोकांनी कॉपर टी बसवावी असे उद्दिष्ट होते. प्रत्यक्षात २१.८० दशलक्ष लोकांनी कॉपर टी बसवून घेतली. याबाबतीत १०० टक्के पेक्षा

अधिक यश प्राप्त झाले. १४.५० दशलक्ष लोकांनी गर्भनिरोधक साधनांचा वापर करावा असे उद्दिष्ट सरकारने ठरवले होते. प्रत्यक्षात १५.९४ दशलक्ष लोकांनी त्याचा वापर केला. सातव्या योजना काळात ४५२३८ आरोग्य केंद्रे स्थापन करणात आली. या योजनेत कुटुंब कल्याण कार्यक्रमासाठी ३२५६ कोटी रुपयांची तरतूद करणात आली होती. प्रत्यक्षात ३१२१ कोटी रुपये खर्च करणात आले.

**१०) १९५१ पासून १९९० पर्यंत आठवी पंचवार्षिक योजना (१९९२ ते १९९७)**

कुटुंब नियोजन आणि कुटुंब कल्याण कार्यक्रम राबवूनही लोकसंख्या भयानक वेगाने वाढत होती. अशाच वेगाने लोकसंख्या वाढत राहिली तर आर्थिक विकासाची फळे सर्व लोकांच्यापर्यंत पोहचणार नाहीत. म्हणून सरकारने आठव्या पंचवार्षिक योजनेत सुध्दा जन्मदर कमी करण्यासाठी कुटुंबकल्याण कार्यक्रमाकडे विशेष लक्ष दिले. आठव्या योजनेत सरकारने कुटुंबाचे स्वास्थ्य या बाबीवर विशेष भर दिला होता. या योजनेत लोकसंख्या नियंत्रणासाठी काही उद्दिष्ट्ये ठरवण्यात आली होती. १) १९९७ पर्यंत लोकसंख्या वाढीचा दर १.७८ टक्के पर्यंत कमी करणे २) जननदर २७ पर्यंत खाली आणणे ३) मृत्यूदर ९.२ पर्यंत खाली आणणे. ४)लोकांचे आयुर्मान (पुरुषांचे सरासरी ६१ वर्षे व स्त्रियांचे ६२ वर्षे) वाढवणे. यापैकी काही उद्दिष्टे सरकारला गाठता आली. जननदर दर हजारी २६.४ पर्यंत घटला. प्रजनन दर ३.३ पर्यंत खाली आला. लोकसंख्या वाढीचा दर १.८५ टक्के पर्यंत कमी झाला. आठव्या योजनेत सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमावर आणि सुरक्षित मातृत्व यावर सरकारने भर दिला. आठव्या योजनेत कुटुंब कल्याण कार्यक्रमासाठी ६५०० कोटी रुपयांची तरतूद सरकारने केली होती.

**११) नववी पंचवार्षिक योजना (१९९७ते२००२)**

लोकसंख्या वाढीचा वेग कमी करणासाठी नवव्या पंचवार्षिक योजनेत सुध्दा सरकारने विशेष भर दिला होता. कारण प्रत्येक योजनेत दरवर्षी कुटुंब नियोजन आणि कुटुंब कल्याण कार्यक्रम राबवून सुध्दा लोकसंख्या वाढीची समस्या गंभीरच बनत चालली होती. म्हणून नवव्या पंचवार्षिक योजनेत लोकसंख्या वाढीचा वेग कमी करणासाठी सरकारने काही उद्दिष्ट्ये ठरवली होती. उदाहरणार्थ १) बालमृत्यूदर ५० पर्यंत खाली आणणे २) १८ वर्षाखालील मुलींना विवाह करण्यास बंदी घालणे ३) स्त्रियांची प्रसूती प्रशिक्षित व्यक्ती मार्फतच करणे ४) जन्मदर २३ पर्यंत खाली आणणे ५) लहान मुलांचे लसीकरण करणे (सार्वत्रिक लसीकरण) ६) गर्भपातास मान्यता देणे ७) बाळंतपणात होणाऱ्या स्त्रियांच्या (मातांच्या) मृत्यूचे प्रमाण कमी करणे. नवव्या योजनेत सरकारने संपूर्ण साक्षरता अभियानावरही भर दिला. याच योजना काळात १५ फ्रेब्रुवारी २००० मध्ये सरकारने आपले राष्ट्रीय लोकसंख्याविषयक धोरण जाहीर केले. पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय लोकसंख्या आयोगाची सरकारने स्थापना केली. या योजनेत कुटुंब कल्याण कार्यक्रमावर सरकारने १४१९४.१ कोटी रुपये खर्च केले. नवव्या योजनेत जन्मदर २६.१ पर्यंत कमी झाला. मृत्यूदर ८.७ पर्यंत घटला. पुरुष व स्त्रियांचे सरासरी आयुर्मान वाढले. पुरुषांचे आयुर्मान ६०.४ तर स्त्रियांचे ६१.८ पर्यंत वाढले.

### १२) दहावी पंचवार्षिक योजना (२००२ ते २००७)

दहाव्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी सन २००२ ते २००७ असा होता. या योजनेत सुध्दा सरकारने कुटुंब कल्याण कार्यक्रम (कुटुंब नियोजन कार्यक्रम) गतीने राबवला. कारण लोकसंख्या भयानक वेगाने वाढत होती. लोकसंख्या वाढीचा वेग रोखण्यासाठी सरकारने काही कठोर उपाय योजले. बिगर सरकारी संस्थांना कुटुंब कल्याण कार्यक्रमात सहभागी करुन घेण्यासाठी सरकारने धोरण आखले.

### १३) अकरावी पंचवार्षिक योजना (२००७ ते २०१२)

अकराव्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी सन २००७ ते २०१२ असा होता. या योजनेतही सरकारने लोकसंख्या वाढीचा दर नियंत्रित ठेवण्यावर भर दिला होता. कुटुंबकल्याण कार्यक्रम अधिक गतिशील बनवण्यासाठी सरकारने सर्व शिक्षा अभियानाचा उपयोग करुन घेतला.

### समारोप

अशा प्रकारे सरकारने स्वातंत्र्योत्तर काळात लोकसंख्या वाढीचा दर कमी करण्यासाठी पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून कुटुंब नियोजन व कुटुंब कल्याण कार्यक्रम राबवला. या कार्यक्रमाला मर्यादितच यश आले. लोकसंख्येचा आकार प्रचंड आणि भयावह झाला आहे. कुटुंब नियोजन कार्यक्रमाला फारसे यश प्राप्त झाले नाही. त्याची काही कारणे खालीलप्रमाणे आढळून आली आहेत.

१) नसबंदी करून घेणाऱ्यांना सरकारने आर्थिक मदत दिली. परंतु पैसे मिळवण्यासाठी बोगस शस्त्रक्रिया दाखवण्यात आल्या.

२) आणीबाणीच्या काळात नसबंदी करण्यासाठी सक्ती करणात आली. लोक प्रचंड नाराज झाले. आणीबाणी उठल्यावर नसबंदी शस्त्रक्रिया खूपच कमी झाल्या.

३) कुटुंब नियोजन कार्यक्रमावर सरकारने प्रचंड खर्च केला. परंतु जन्मदर अपेक्षेएवढा कमी झाला नाही. त्याला सरकारही जबाबदार आहे. कुटुंब नियोजन कार्यक्रमाची अंमलबजावणी शासकीय अधिकाऱ्यांनी योग प्रकारे केली नाही.

४) धर्माच्या आधारावर एका धर्माला नसबंदी शस्त्रक्रिया करण्यासाठी सवलत देणात आली. त्यामुळे एका धर्माची लोकसंख्या प्रचंड वाढली. हिंदूपेक्षा मुस्लीम लोकसंख्या वाढीचा वेग अधिक राहिला. हिंदूंची लोकसंख्या घटली आणि मुस्लीमांची लोकसंख्या वाढली

५) १९८० पर्यंत नपुसंक, विधवा, अविवाहित, वेडसर, विधूर स्त्री-पुरुषांची सुध्दा नसबंदी शस्त्रक्रिया केली गेली होती.

६) अशिक्षित, अल्पशिक्षित जनता - या जनतेला कुटुंब नियोजन कार्यक्रमाचे महत्वच पटलेले नाही.

## २.२.६ भारताचे सन २००० चे लोकसंख्याविषयक धोरण

**प्रास्ताविक**

स्वातंत्र्योत्तर काळात भारतात वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक आर्थिक, सामाजिक आणि राजकीय समस्या निर्माण झाल्या आहेत. म्हणून वाढत्या लोकसंख्येला आळा बसावा यासाठी प्रथम १९५१-५२ मध्ये भारत सरकारने लोकसंख्याविषयक धोरण जाहीर केले. आपल्या देशाच्या लोकसंख्या धोरणात जन्मदर कमी करणे, मृत्यूदर कमी करणे, लोकांची गुणवत्ता व कार्यक्षमता वाढविणे यावर भर देण्यात आला आहे. भारताच्या संदर्भात लोकसंख्याविषयक धोरणाची व्याख्या खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहे.

''जन्मदरात किंवा लोकसंख्या वाढीच्या वेगात घट करण्यासाठी आणि लोकांचा गुणात्मक दर्जा उंचावण्यासाठी सरकारने योजलेले विविध उपाय किंवा जाहीर केलेला कार्यक्रम म्हणजे लोकसंख्याविषयक धोरण होय.''

भारतातील लोकसंख्याविषयक धोरण हे वैशिष्ट्यपूर्ण आहे. कारण लोकसंख्या वाढीचा वेग कमी करणे हेच एकमेव उद्दिष्ट या धोरणाचे नाही. तर लोकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावणे, बालकांचे कुपोषण टाळणे, बालमृत्यू व अर्भक मृत्यूचे प्रमाण कमी करणे, स्त्रियांना व मुलांना सकस, पौष्टिक आहार पुरविणे, औषधे व लसीकरण कार्यक्रम राबविणे ही भारताच्या लोकसंख्याविषयक धोरणाची उद्दिष्ट्ये आहेत.

**सन २००० चे राष्ट्रीय लोकसंख्या धोरण :-**

भारत सरकारने १५ फेब्रुवारी २००० रोजी राष्ट्रीय लोकसंख्या धोरण जाहीर केले. सन २०४५ पर्यंत देशाची लोकसंख्या स्थिर ठेवण्याचे दीर्घकालीन उद्दिष्ट सन २००० च्या राष्ट्रीय लोकसंख्या धोरणात समाविष्ट आहे. सन २००० च्या भारताच्या राष्ट्रीय लोकसंख्या धोरणात खालील बाबींचा समावेश आहे.

**(१) बालमृत्यूचा दर कमी करणे :-**

सन २००० च्या राष्ट्रीय लोकसंख्या धोरणात देशातील बालमृत्यूदर दरहजारी ३० पर्यंत खाली आणण्याचे उदिष्ट ठरविण्यात आले आहे. कारण आजही आपल्या देशात बालमृत्यूची समस्या गंभीर आहे.

**(२) आरोग्य विमा :-**

दोन अपत्यांवर कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया करणाऱ्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाला ५००० रूपयांची आरोग्य विमा सुविधा देण्याचे सरकारने ठरविले आहे.

**(३) बालविवाह विरोधी कायद्याची अंमलबजावणी :-**

बालविवाह होऊ नयेत यासाठी बालविवाह विरोधी कायद्याची कडक अंमलबजावणी करण्याची भूमिका सरकारने घेतली आहे. कारण अजूनही देशाच्या काही भागात बालविवाह होतात.

**(४) स्त्रीलिंग निदान विरोधी कायद्याची अंमलबजावणी :-**

सोनोग्राफी यंत्राचा दुरूपयोग टाळण्यासाठी गर्भलिंग निदान विरोधी कायद्याची कडकपणे अंमलबजावणी करण्याचे सरकारने सन २००० च्या राष्ट्रीय लोकसंख्याविषयक धोरणात ठरविले आहे.

**(५) विवाह वयोमर्यादेचे पालन :–**

मुलीचे विवाहाचे वय १८ आणि मुलाचे विवाहाचे वय २१ वर्षे करण्यात आले असून या विवाह वयोमर्यादेचे पालन करण्यावर या धोरणात सरकारने भर दिला आहे.

**(६) माता मृत्यूदर खाली आणणे :–**

भारतात बाळंतपणात मृत्यू पावणाऱ्या स्त्रियांचा मृत्यूदर एक लाखास ४३७ इतका आहे. तो १०० च्या खाली आणण्याचे २००० च्या लोकसंख्या धोरणात ठरविण्यात आले आहे.

**(७) सार्वत्रिक लसीकरण :–**

देशातील एकही मूल कोणत्याही रोगाला बळी पडू नये यासाठी देशात सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमाची अंमलबजावणी करणाचे सरकारने राष्ट्रीय लोकसंख्या धोरणात नमूद केले आहे.

**(८) बाळंतपणे दवाखान्यात करणे :–**

बाळंतपणात माता मृत्यू आणि अर्भक मृत्यू उद्भवू नयेत यासाठी घरी बाळंतपणे न होता दवाखान्यात बाळंतपणे व्हावीत यासाठी सरकार प्रयत्न करणार आहे.

**(९) गर्भपाताची सुविधा :–**

सन २००० च्या राष्ट्रीय लोकसंख्या धोरणात सरकारने जनतेला सुरक्षित गर्भपाताची सोय उपलब्ध करून दिली आहे.

**(१०) जन्म, मृत्यूच्या नोंदी :–**

सन २००० च्या राष्ट्रीय लोकसंख्या धोरणात देशातील सर्व जन्माच्या, मृत्यूच्या, विवाहाच्या नोंदी करण्यावर भर देणात आला आहे.

**(११) लसींचा विकास :–**

प्लेग, कॉलरा इत्यादी आजार उद्भवू नयेत यासाठी सरकारने या विविध रोगावरील लसींचा विकास करण्याला प्राधान्य दिले आहे.

**(१२) बालकांना मोफत शिक्षण :–**

देशातील १४ वर्षांपर्यंतच्या मुला–मुलींना मोफत शिक्षण देण्यास प्राधान्य देण्याचे सरकारने सन २००० च्या राष्ट्रीय लोकसंख्या धोरणात ठरविले आहे.

**(१३) गळतीचे प्रमाण कमी करणे :–**

शालेय शिक्षण घेणाऱ्या मुला–मुलींना मोफत शिक्षण देण्यास प्राधान्य देण्याचे सरकारने सन २००० च्या राष्ट्रीय लोकसंख्या धोरणात ठरविले आहे.

**(१४) कुटुंबनियोजन करणाऱ्यांना पुरस्कार :–**

लोकांनी दोन पेक्षा कमी अपत्यावर कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया करावी यासाठी पुरस्कार देण्याची तरतूद सन २००० च्या लोकसंख्या धोरणात केली आहे.

**(१५) बिगर सरकारी स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य :–**

कुटुंब नियोजन कार्यक्रमात बिगर सरकारी स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य घेण्याचे सरकारने सन २००० च्या राष्ट्रीय लोकसंख्या धोरणात ठरविले आहे.

**(१६) स्थानिक स्वराज्य संस्थांना पुरस्कार :–**

सन २००० च्या राष्ट्रीय लोकसंख्या धोरणात लोकसंख्या नियंत्रणाचे कार्य उत्कृष्ट प्रकारे करणाऱ्या पंचायत समित्यांना आणि जिल्हा परिषदांना पुरस्कार देण्याचे सरकारने ठरविले आहे.

**(१७) सामाजिक न्याय विभागाबद्दल :–**

सन २००० च्या भारताच्या राष्ट्रीय लोकसंख्या धोरणात देशातील सामाजिक न्याय विभाग कुटुंब कल्याण खात्यास जोडण्याचे सरकारने ठरविले आहे.

**(१८) एड्स विषयक जगजागरण व उपाय योजना :–**

एड्स रोगावर नियंत्रण घालण्यासाठी सन २००० च्या राष्ट्रीय लोकसंख्याविषयक धोरणात सरकारने देशातील सर्व लोकांपर्यंत एड्स या रोगाची माहिती विविध माध्यमातून पोहचविण्याचे ठरविले आहे.

**(१९) राष्ट्रीय लोकसंख्याविषयक आयोगाची स्थापना :–**

सन २००० च्या भारताच्या राष्ट्रीय लोकसंख्या धोरणाचे वैशिष्ट्य म्हणजे या धोरणानुसार देशात पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय लोकसंख्याविषयक आयोग स्थापन करण्यात आला आहे.

**(२०) वृध्दांची काळजी :–**

सन २००० च्या भारताच्या राष्ट्रीय लोकसंख्या धोरणात देशातील ६० वर्षावरील वृध्दांची काळजी घेण्यावर भर दिला आहे. त्यासाठी विविध उपाय योजले आहेत.

**समारोप–**

अशा प्रकारे सन २००० चे भारतीय राष्ट्रीय लोकसंख्या धोरण अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. या धोरणात जन्मदर नियंत्रित करण्यावर जसा भर देण्यात आला आहे, त्याप्रमाणे देशातील लोकसंख्येची गुणवत्ता वाढवण्यावरही भर देण्यात आला आहे.

## २.३ सारांश

भारताची लोकसंख्या जगात वैशिष्ट्यपूर्ण आहे. संख्येचा विचार केला तर भारतीय लोकसंख्येचा जगात दुसरा क्रमांक लागतो. आणि गुणवत्तेचा (मानव विकासाचा) विचार केला तर १८७ देशात भारताचा १३२ वा क्रमांक लागतो. भारतीय लोकसंख्येचा गुणात्मक दर्जा फारसा चांगला नाही. भारतीय लोकसंख्येच्या संख्यात्मक आणि गुणात्मक विश्लेषणावरून भारतीय लोकसंख्येची काही ठळक वैशिष्ट्ये आपणाला जाणवतात. उदाहरणार्थ भारतात आजही दर १००० लोकसंख्येमागे स्त्रियांची संख्या कमी आहे. लोकसंख्येची घनता दिवसेंदिवस वाढत आहे. इत्यादी. विविध कारणामुळे भारताची लोकसंख्या वेगाने वाढत आहे. भारतात जन्मदर जास्त आहे आणि मृत्यूदर कमी आहे. जन्मदरात आणि मृत्यूदरात फार मोठी तफावत आहे. त्यामुळे प्रचंड वेगाने भारताची लोकसंख्या वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे आर्थिक विकासाचा दर अपेक्षे इतका वाढत नाही. वाढत्या लोकसंख्येमुळे महागाईची समस्या, दारिद्र्याची समस्या, बेकारीची समस्या इत्यादी समस्या देशात निर्माण झाल्या आहेत. लोकसंख्या वाढीचा वेग आटोक्यात आणण्यासाठी आणि लोकसंख्येचा गुणात्मक दर्जा उंचावण्यासाठी भारत सरकारने सन २००० मध्ये राष्ट्रीय लोकसंख्या धोरण अंमलात आणले आहे. तरीही लोकसंख्या वेगाने वाढत आहे आणि लोकसंख्येचा गुणात्मक दर्जा म्हणावा तेवढा वाढलेला नाही, हे वास्तव आहे.

## २.४ पारिभाषिक शब्द आणि त्यांचे अर्थ

(१) **जन्मदर** – १००० लोकसंख्येमागे जन्मणाऱ्या अपत्यांची संख्या म्हणजे जन्मदर (जनन दर) होय.

(२) **मृत्यूदर** – १००० लोकसंख्येमागे मृत्यू पावणाऱ्या व्यक्तींची संख्या

(३) **लोकसंख्येची घनता** – एका चौरस किलोमीटर मध्ये राहणाऱ्या लोकांची संख्या

(४) **स्त्री–पुरूष प्रमाण** – १००० पुरूषामागे स्त्रियांची संख्या

(५) **लोकसंख्या धोरण** :- जन्मदर कमी करणासाठी आणि लोकांचा गुणात्मक दर्जा उंचावणासाठी सरकारने योजलेले उपाय.

(६) **लोकसंख्या** – एका विशिष्ट भूप्रदेशात राहणाऱ्या लोकांची संख्या

## २.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न व त्यांची उत्तरे :–

प्र. १ खालीलपैकी एक पर्याय निवडा

(१) लोकसंख्येच्या बाबतीत भारताचा जगात................नंबर आहे.

(अ) १ (ब) २ (क) ३ (ड) ४

(२) चीनपेक्षा भारताच्या लोकसंख्या वाढीचा वेग............आहे.

(अ) कमी (ब) जास्त

(३) भारतीय लोकसंख्येचा गुणात्मक दर्जा...............आहे.

(अ) कमी (ब) जास्त (क) चांगला (ड) २ क्रमांकाचा

(४) आज अंदाजे भारताची लोकसंख्या ..... पेक्षा जास्त आहे.

(अ) १४० कोटी (ब) ६० कोटी (क) ७० कोटी (ड) ८० कोटी

(५) १८८१ साली भारताची लोकसंख्या......कोटी होती.

(अ) २३.६० (ब) २० (क) ३० (ड) ४०

(६) १९०१ साली भारताची लोकसंख्या ..... कोटी होती.

(अ) ४० (ब) २३.६० (क) २५ (ड) ५०

(७) .........या वर्षास लोकसंख्येच्या महाविभाजनाचे वर्ष म्हणतात.

(अ) १९११ (ब) १९२१ (क) १९३१ (ड) १९४७

(८) ..........या वर्षापासून भारताच्या लोकसंख्येत वेगाने वाढ होण्यास सुरवात झाली.

(अ) १९२१ (ब) १९११ (क) १९५१ (ड) १९८१

(९) दारिद्र्य व लोकसंख्या यांच्यात ...... संबंध असतात.

(अ) जवळचे (ब) दूरचे (क) यापैकी नाही.

(१०) दरिद्री लोकांच्या कुटुंबाचा आकार ......असतो.

(अ) लहान (ब) मोठा (ब) सांगता येत नाही.

(११) हवामान हा घटक भारतातील लोकसंख्यावाढीस कारणीभूत घटक.......... .

(अ) आहे (ब) नाही (क) यापैकी नाही

(१२) भारतात जन्मदर जास्त व मृत्यू दर...... आहे

(अ) कमी (ब) जास्त (क) यापैकी नाही.

(१३) भारतात दिवसेंदिवस मृत्यू दरात...... होत आहे.

(अ) वाढ (ब) घट (क) यापैकी नाही.

(१४) भारतात लोकसंख्येचा स्फोट झाला........

(अ) आहे (ब) नाही.

(१५) भारतातील लोकसंख्या अतिरिक्त .....

(अ) आहे (ब) नाही.

(१६) भारतात पहिले लोकसंख्याविषयक धोरण ...... मध्ये जाहीर झाले.

(अ) १९४७ (ब) १९५१ (क) १९७६ (ड) १९८०

(१७) भारतात मुलाचे विवाहाचे वय .......आहे.

(अ) २१ वर्षे (ब) १८ वर्षे (क) २५ वर्षे (ड) २६ वर्षे

(१८)भारताचे मुलीचे विवाहाचे वय.......आहे.

(अ) १८ वर्षे (ब) २० वर्षे (क) २२ वर्षे (ड) २१ वर्षे

**उत्तरे**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (१) ब | (२) ब | (३) अ | (४) अ | (५) अ | (६) ब |
| (७) ब | (८) अ | (९) अ | (१०) ब | (११) अ | (१२) अ |
| (१३) ब | (१४) अ | (१५) अ | (१६) ब | (१७) अ | (१८) अ |

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

**प्र. १ टीपा लिहा.**

(१) लोकसंख्येची घनता

(२) स्त्री-पुरूष प्रमाण

(३) लोकसंख्येची व्यावसायिक रचना

(४) भारतीय लोकसंख्येचा आकार

(५) जन्म दर

(६) मृत्यू दर

(७) शहरी व ग्रामीण लोकसंख्या

(८) भारतीय लोकसंख्येचे अपेक्षित आर्युमान

(९) भारतीय लोकसंख्येची वयोरचना

(१०) साक्षर-निरक्षर लोकसंख्या

**प्र.२ थोडक्यात उत्तरे द्या.**

(१) भारतीय लोकसंख्या वेगाने का वाढत आहे?

(२) भारतातील वाढत्या लोकसंख्येचे परिणाम स्पष्ट करा.

(३) लोकसंख्या वाढीचा वेग कसा कमी करता येईल?

(४) भारतीय लोकसंख्येची वैशिष्ट्ये सांगा?

(५) भारतातील कुटुंब नियोजन कार्यक्रमाची प्रगती सांगा.

(६) भारतातील कुटुंब नियोजन कार्यक्रमाचे मूल्यमापन करा.

**प्र.३ दीर्घोत्तरी प्रश्न**

(१) सन २००० चे भारताचे लोकसंख्याविषयक धोरण स्पष्ट करा.

(२) भारतातील लोकसंख्या वाढीची कारणे स्पष्ट करा.

(३) भारतातील लोकसंख्या वाढीचे परिणाम स्पष्ट करा.

(४) लोकसंख्या वाढीच्या नियंत्रणासाठी उपाय सुचवा

(५) भारतीय लोकसंख्येची संख्यात्मक आणि गुणात्मक वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


1. Datt and KPM sundaram, 'Indian Economy', S.Chand and company limited. New Delhi.
2. Puri V.K.Misra S.K, 'Indian Economy', Himalaya Publishing House Mumbai
3. Agarwal A.N 'Indian Economy' New Age International Publishers, New Delhi
4. Desai Mutalik and Bhalerao Nirmal, 'Bhartiya Arth wyavstha Nirali. Public cation, Pure.
5. Economic Survey of India - Handbook of Indian Statistics


❑❑❑

## घटक ३
## भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने भाग–१
## (Challenges Before Indian Economy)

**अनुक्रमणिका**


३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

३.२.१ भारतातील दारिद्र्य –कारणे, परिणाम आणि उपाय

३.२.२ भारतातील बेकारी –कारणे, परिणाम आणि उपाय

३.२.३ प्रादेशिक विषमता– कारणे, परिणाम आणि उपाय

३.२.४ समांतर अर्थव्यवस्था –काळा पैसा– कारणे, परिणाम आणि उपाय

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द

३.५ स्वयं अध्ययन व त्यांची उत्तरे

३.६ सरावासाठी प्रश्न

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


### ३.० उद्दिष्टे (Objectives)

'भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने' असे या प्रकरणाचे शीर्षक असून या प्रकरणाचा अभ्यास करण्यामागची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१) भारतातील दारिद्र्याचे स्वरूप माहित करून घेणे. दारिद्र्याची कारणे, परिणाम आणि उपाय समजून घेणे.

२) भारतातील बेकारीच्या समस्येची व त्यावरील उपायांची माहिती करून घेणे.

३) प्रादेशिक विषमतेची कारणे, परिणाम व उपाय समजून घेणे.

४) काळा पैसा कसा निर्माण होतो? त्याची कारणे, परिणाम आणि उपाय यांची माहिती घेणे.

## ३.१ प्रस्तावना

'भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने' असे या तिसऱ्या प्रकरणाचे शीर्षक आहे. या प्रकरणात भारतीय अर्थव्यवस्थेला भेडसावणाऱ्या दारिद्र्य, बेकारी, प्रादेशिक विषमता आणि वाढता काळा पैसा या आर्थिक समस्यांची चर्चा केली आहे. दारिद्र्य, बेकारी, प्रादेशिक विषमता आणि काळ्या पैशात सतत होत असलेली वाढ इत्यादी भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील प्रमुख समस्या आहेत. या समस्यांनाच भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने असे म्हणतात. भारतीय अर्थव्यवस्थेला भेडसावणाऱ्या ज्या प्रमुख समस्या आहेत त्या समस्यांचे आर्थिक, सामाजिक, राजकीय परिणाम गंभीर आणि दूरगामी असून सरकार या समस्यांची व या समस्यांच्या दुष्परिणामांची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न करत आहे. परंतु वाढत्या लोकसंख्येमुळे दारिद्र्य आणि बेकारी यासारख्या समस्यांचे पूर्णपणे निराकरण करण्यात सरकारला अपयश येत आहे.

## ३.२ विषय विवेचन :

भारतात दारिद्र्य, बेकारी, प्रादेशिक विषमता आणि काळा पैसा या समस्या का निर्माण झाल्या आहेत त्याची चर्चा या भागात करण्यात आली आहे. दारिद्र्य, बेकारी, प्रादेशिक विषमता आणि काळा पैसा निर्माण होण्याची कारणे आणि त्याचे दुष्परिणाम आणि या समस्यांच्या निराकरणासाठी सरकारने योजलेले उपाय याबाबतची माहिती या भागात दिली आहे.

### ३.२.१ भारतातील दारिद्र्य : कारणे, परिणाम आणि उपाय

**प्रास्ताविक**

ज्यांना आपल्या उत्पन्नातून अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि शिक्षण या प्राथमिक गरजासुद्धा भागवता येत नाहीत, अशा लोकांना दारिद्र्यरेषेखालील लोक असे म्हणतात. दरिद्री लोकांना निर्धन लोक असेही म्हणतात. दारिद्र्य हे भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील एक मोठे आव्हान असून दारिद्र्याची समस्या भारतातील अत्यंत जुनाट समस्या आहे. ही समस्या भारताला ब्रिटिश राजवटीतही भेडसावत होती. स्वातंत्र्यपूर्वकाळापासून भारतात दारिद्र्याची समस्या अस्तित्वात असून सन १९०१ मध्ये भारतात ९०% पेक्षा अधिक लोक दारिद्र्याशी सामना करत होते. १९४७ साली सुमारे ८० टक्के लोक दारिद्र्यरेषेखालील जीवन जगत होते. सरकारी आकडेवारीनुसार आज भारतात सुमारे २६ % लोक दरिद्री किंवा गरीब आहेत.

**दारिद्र्य म्हणजे काय?**

दरिद्री लोकांचे उत्पन्न एवढे कमी असते की, त्यांना आपल्या उत्पन्नातून प्राथमिक गरजा (आवश्यक गरजा/मूलभूत गरजा) सुद्धा भागवता येत नाहीत. अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि शिक्षण या मनुष्याच्या प्राथमिक आणि आवश्यक गरजा असतात. अपुऱ्या किंवा तुटपुंज्या उत्पन्नामुळे लोकांना आपल्या या महत्त्वाच्या गरजा पूर्ण करता येत नाहीत. गोडार्ड यांनी दारिद्र्याची व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

''कुटुंबातील सदस्यांचे पालन-पोषण करण्यासाठी आणि संपूर्ण कुटुंब निरोगी राहण्यासाठी जेवढ्या वस्तू लागतात तेवढ्या वस्तू त्या कुटुंबाला न मिळणे म्हणजे दारिद्र्य होय.''

सन २०००-२००१ च्या जागतिक विकास अहवालात दारिद्र्याची व्याख्या दिली असून ती खाली स्पष्ट केली आहे.

''सुस्थितीपासून संपूर्णपणे वंचित असणे म्हणजे दारिद्र्य होय.''

दारिद्र्य म्हणजे योग्य पध्दतीने अन्न व निवारा यांचा अभाव होय. या स्थितीमध्ये व्यक्तीला राहण्यासाठी योग्य पध्दतीचे घर, योग्य पध्दतीचे राहणीमान, चांगली आरोग्य सुविधा आणि पिण्याच्या पाण्याची चांगली सुविधा मिळत नाही.

नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ञ प्रा. अमर्त्य सेन यांनीही दारिद्र्याच्या प्रश्नाचा अभ्यास केला असून त्यांनी दारिद्र्याची व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

''एखाद्या व्यक्तीला त्याने जोपासलेल्या मूल्यांप्रमाणे जगता न येणे म्हणजे दारिद्र्य होय.''

जागतिक बँकेने दारिद्र्याची व्याख्या खालीलप्रमाणे दिली आहे.

''माणशी दर दिवशी एक डॉलर पेक्षा कमी उत्पन्न मिळवणाऱ्या व्यक्ती म्हणजे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती होय.''

किमान गरजा आणि प्रभावी मागणीच्या अंदाजासाठी १९८० ते ८५ मध्ये नेमलेल्या तज्ज्ञ गटाने दारिद्र्याची व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

''ग्रामीण भागासाठी दररोज प्रती व्यक्ती किमान २४०० कॅलरीज आणि शहरी भागासाठी किमान २१०० कॅलरीज मिळण्यासाठी लागणारे अन्न मिळवण्यासाठीची असमर्थता म्हणजे दारिद्र्य होय.''

डॉ. वि.म. दांडेकर, श्रीयुत पी.डी. ओझा यांनी प्रत्येक व्यक्तीला दररोज २२५० कॅलरीजची (उष्मांकाची) जगण्यासाठी गरज असते असे म्हटले आहे. म्हणून ज्यांना २२५० कॅलरीजपेक्षा कमी कॅलरीज दररोजच्या आहारातून मिळतात त्यांना दरिद्री व्यक्ती असे म्हणतात.

**भारतीय नियोजन आयोगाने दारिद्र्याची व्याख्या खालील शब्दात दिली आहे.**

''ग्रामीण भागातील ज्या मनुष्याला रोज प्रतिदिन २४०० उष्मांक आणि शहरी भागातील ज्या मनुष्याला रोज (प्रतिदिन) २१०० उष्मांक मिळत नाहीत, त्या मनुष्याला किंवा व्यक्तीला गरीब असे म्हणतात.''

व्यक्तीची किंवा कुटुंबाची आर्थिक क्षमता एवढी कमी असते की व्यक्ती आपल्या मूलभूत गरजा भागवू शकत नाही. म्हणून त्या व्यक्तीला दारिद्र्याच्या समस्येला तोंड द्यावे लागते. व्यक्तीची मूलभूत गरजा भागवण्याची आर्थिक क्षमता (किंवा आर्थिक स्थिती) नसणे म्हणजे दारिद्र्य होय.

**दारिद्र्य रेषा :**

व्यक्तीचे ''उत्पन्न'' हा निकष विचारात घेऊन दारिद्र्यरेषेची संकल्पना मांडण्यात आली आहे. देशातील लोकसंख्येचे दारिद्र्य रेषेखालील लोक आणि दारिद्र्य रेषेवरील लोक असे वर्गीकरण केले जाते. जेवढ्या

उत्पन्नातून (पैशातून) व्यक्ती आपल्या किमान मूलभूत गरजा पूर्ण करू शकते त्या उत्पन्नाच्या पातळीला दारिद्र्यरेषा असे म्हणतात. भारतात पैशाच्या मूल्यात सतत घट होत असल्याने दारिद्र्यरेषेची उत्पन्नपातळी वेळोवेळी वाढवावी लागते.

**भारतातील दारिद्र्याचे अंदाज/मोजमाप**

दारिद्र्याची समस्या सोडवण्यासाठी दारिद्र्याचे प्रमाण देशात किती आहे ते पाहावे लागते. दारिद्र्याचे निराकरण करण्यासाठी, दारिद्र्याच्या प्रश्नावर उपाययोजना सुचविता याव्यात यासाठी भारतातील अनेक तज्ज्ञ भारतातील दारिद्र्याच्या प्रश्नाचा अभ्यास करत आहेत. दारिद्र्याची समस्या स्वातंत्र्यपूर्वकाळात सुद्धा अस्तित्वात होती. ब्रिटिश राजवटीत ही समस्या फारच गंभीर होती. दादाभाई नौरोजी यांच्या लक्षात ही बाब आली होती. त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळातील ब्रिटिश राजवटीतील भारतातील दारिद्र्याचा अभ्यास करून Poverty and Unbrish Rule in India हा ग्रंथ लिहिला आणि त्या ग्रंथात भारतातील दारिद्र्याची समस्या, दारिद्र्याची कारणे आणि उपाययोजना या बाबींची माहिती दिली. भारतातील दारिद्र्याचे खरे कारण भारतातील ब्रिटिशांची राजवट हेच आहे असे दादाभाई नौरोजी यांनी आपल्या ग्रंथात नमूद करून ठेवले आहे. देशाला १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले. १९५१ साली पहिली पंचवार्षिक योजना सुरू झाली. आतापर्यंत १२ पंचवार्षिक योजना आणि सहा एकवार्षिक योजना पूर्ण झाल्या आहेत. या प्रत्येक पंचवार्षिक योजनेत भारत सरकारने दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमावर भर दिलेला आहे. भारताच्या आर्थिक नियोजनाचे उद्दिष्ट दारिद्र्य निर्मूलन हे आहे. भारताने आपल्या आर्थिक नियोजनाची जी प्रमुख उद्दिष्टे ठरवली आहेत, त्यामध्ये दारिद्र्य निर्मूलन हे एक प्रमुख उद्दिष्ट असून या उद्दिष्टापासून भारत सरकार तसूभरही ढळलेले नाही. पुढील अर्थतज्ज्ञांनी आणि तज्ज्ञ गटांनी भारतातील दारिद्र्याचे मोजमाप केले आहे.

| अ.नं. | तज्ज्ञ | वर्ष | दारिद्र्याचे प्रमाण (%) | | | दारिद्र्याचे निकष |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | ग्रामीण | शहरी | एकत्र | |
| १. | पी.डी. ओझा | १९६०-६१ | ५१.८० | ७.६० | - | १९६०-६१ च्या किंमतीनुसार दररोज दरडोई २२५० उष्मांक आवश्यक एवढा उष्मांक मिळवून देण्यासाठी ग्रामीण भागात दरडोई दरमाणसी ८ ते ११ रुपये आणि शहरी भागात १५ ते १८ रुपये उपभोग खर्च आवश्यक आहे. |
| | | १९६७-६८ | ७०.०० | - | - | |
| २. | दांडेकर आणि रथ | १९६८-६९ | ४०.०० | ५०.०० | ४१.०० | किमान पोषणासाठी म्हणजे २२५० उष्मांक असलेला आहार मिळण्यासाठी दरडोई दरवर्षी ग्रामीण भागात १८० रुपये आणि शहरी भागासाठी २७० रुपये आवश्यक आहेत. १९६८-६९ च्या किंमतीनुसार हा खर्च ग्रामीण भागासाठी ३२४ रुपये आणि शहरी भागासाठी ४८६ रुपये येतो. |
| ३. | वर्धन पी. के. | १९६०-६१ | ३८.०० | - | - | १९६०-६१ च्या किंमतीनुसार ग्रामीण भागात |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १९६८-६९ | ५४.०० | - | - | दरडोई मासिक उपभोग खर्च १५ रुपये आवश्यक आहे. |
| ४. | बी.एस.मिन्हास | १९५६-५७ | ६५.०० | - | - | ग्रामीण भागातील दरडोई दरवर्षी २४० रुपये उपभोग खर्च आवश्यक आहे. |
| | | १९६७-६८ | ५०.६० | - | - | |
| ५. | मॉन्टेकसिंग अहलुवालिया | १९५६-५७ | - | - | ५४.१० | १९६०-६१ च्या किंमतीनुसार ग्रामीण भागात मासिक १५ रुपये आणि शहरी भागात २० रुपये किमान उपभोग खर्च आवश्यक आहे. |
| | | १९६५-६६ | - | - | ५३.९० | |
| | | १९७३-७४ | - | - | ४६.१० | |
| ६. | सातवा वित्त आयोग | १९७०-७१ | ५३.०० | ५१.०० | ५२.०० | सातव्या वित्त आयोगाने कुटुंबाचा दरडोई मासिक खर्च आणि सरकारचा दरडोई होणारा मासिक खर्च समाविष्ट करून वर्धित दारिद्र्यरेषा तयार केली. |
| ७. | नियोजन मंडळ | १९७७-७८ | - | - | ४८.०० | १९७७-७८ च्या किमतीनुसार मासिक दरडोई उत्पन्नाची मर्यादा ग्रामीण भागासाठी ६५ रुपये आणि शहरी भागासाठी ७५ रुपये निश्चित केली. ग्रामीण भागातील एका व्यक्तीला रोज २४०० उष्मांक मिळाले पाहिजेत आणि शहरी लोकांना रोज २१०० उष्मांक मिळाले पाहिजेत. |
| ८. | डॉ. डी. टी. लकडावाला नियोजन मंडळ तज्ञ गट अहवाल १९९३ | १९७३-७४ | ५६.४० | ४९.२० | - | १९७३ ७४ हे मूळ वर्ष मानून दारिद्र्यरेषा ग्रामीण भागात दरडोई दरमहा ४९ रुपये आणि शहरी भागात ५७ रुपये उत्पन्न अशी निश्चित केली |
| | | १९८६-८७ | ३९.१० | ४०.१० | - | |
| ९. | सहावी पंचवार्षिक योजना | १९७९-८० | ५०.७० | ४०.०० | - | प्रत्येक व्यक्तीला ग्रामीण भागात दररोज २४०० उष्मांक व शहरी भागात २१०० उष्मांक मिळवून देणारा किमान आवश्यक आहार मानण्यात आला. १९७९-८० च्या किमतीनुसार असा आहार मिळवण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला दरमहा ग्रामीण भागात ७६ रुपये आणि शहरी भागात ८८ रुपये उत्पन्न मिळाले पाहिजे. १९८४- ८५ मध्ये किमान आवश्यक उपभोग खर्चाची मर्यादा प्रत्येकी दरमहा ग्रामीण भागासाठी १०७ रुपये आणि शहरी भागासाठी १२२ रुपये अशी वाढवण्यात आली. |
| १०. | जागतिक बँक | १९७० | ५३.०० | ४५.५० | ५२.४० | सहाव्या पंचवार्षिक योजनेतील किमान आवश्यक उष्मांकाचा निकष |
| | दारिद्र्यरेषे | १९८३ | ४४.९० | ३६.४० | ४२.५० | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | खालील | १९८८ १९७० | ४१.७० ३०.१० | ३३.६० २५.६० | ३९.६० २९.८० | |
| | अति दरिद्री | १९८३ | २२.८० | १७.७० | २१.८० | |
| | | १९८८ | २०.४० | १५.८० | १९.२० | |
| ११. | डॉ. सुरेश तेंडुलकर समिती | २००४–०५ | ४१.८ ० | २५.७० | ३७.२० | तेंडुलकर समितीने उष्मांक निकष न वापरता उपभोग खर्च निकष वापरला. २००४–५ वर्षाच्या किमती आधारभूत मानून ग्रामीण भागासाठी दरमहा ४४६.६८ रुपये आणि शहरी भागासाठी ५७८.८० रुपये खर्चाची मर्यादा ठरवली. हा किमान खर्च करु शकेल एवढे ज्याचे उत्पन्न नाही. त्या व्यक्तीला दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती मानण्यात आले. |
| १२. | राष्ट्रीय नमुना पाहणी | | | | | राष्ट्रीय नमुना पाहणी तज्ञांनी कुटुंबाचा उपभोगावरील खर्च हा निकष विचारात घेतला. |
| | ६१ वी फेरी | २००४–०५ | २८.३० | २५.७० | २७.५० | |
| | ६६ वी फेरी | २००९–१० | – | – | २९.८० | |
| | ६८ वी फेरी | २०११–१२ | – | – | २१.९० | |
| १३. | डॉ. सी. रंगनाथन समिती भारतीय नियोजन मंडळाने जून २०१२ मध्ये दारिद्र्याच्या समस्येचा अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या समितीचे अध्यक्ष | २०११–१२ | – | – | २९.५० | ग्रामीण भागासाठी प्रतिदिन प्रतिव्यक्ती ३२ रुपये शहरी भागासाठी प्रतिदिन प्रतिव्यक्ती ४७ रुपये एवढे उत्पन्न आवश्यक आहे. त्यापेक्षा कमी उत्पन्न असलेल्या व्यक्ती दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती होत. |
| १४. | नियोजन मंडळ मार्च २०१२ | २००९–१० | ३३.८० | २०.९० | २९.८० | नियोजन मंडळाने ग्रामीण भागासाठी दरडोई दरमहा ६७२.८० रुपये आणि शहरी भागासाठी ८५९.६० रुपये इतकी मर्यादा दारिद्र्यरेषेखाली निश्चित केली. |
| १५. | गौरव दत्त | १९५०–५१ | ५३.०० | ४३.०० | – | गौरव दत्त यांनी १९५१ ते १९९२ या काळातील भारतातील दारिद्र्याचा अभ्यास केला. त्यांच्यामध्ये ग्रामीण भागातील ज्या |
| | | १९९१–९२ | ३८.०० | ३३.०० | – | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | व्यक्तीला दररोज २४०० आणि शहरी भागातील व्यक्तीला दररोज २१०० चे उष्मांक मिळणारे अन्न मिळाले पाहिजे. ज्या व्यक्तींना दरडोई दर दिवशी या उष्मांकापेक्षा कमी उष्मांक असणारे अन्न मिळते त्या व्यक्ती दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती होत. २४०० उष्मांक मिळवण्यासाठी ग्रामीण भागातील एका व्यक्तीचा दरमहा ४९ रुपये आणि २१०० उष्मांक मिळवण्यासाठी शहरी भागातील एका व्यक्तीचा दरमहा ५७ रुपये खर्च आवश्यक आहे. |
| १६. | डॉ. सुरेश तेंडुलकर समिती | २०११-१२ | २५.७० | १३.७० | २१.९० | |
| १७. | सी. रंगनाथन समिती | २०११-१२ | ३०.९० | २६.४० | २९.५० | |

**भारतातील दारिद्र्याचे प्रमाण**

जागतिक बँकेचे गौरव दत्त यांनी सन १९५०-५१ ते १९९१-९२ या काळातील भारतातील दारिद्र्याचा अभ्यास केला असून त्यांनी या काळातील दारिद्र्यरेषेखालील लोकांची संख्या व प्रमाण यांची माहिती खालीलप्रमाणे दिली आहे.

**तक्ता क्र. २ – भारतातील दारिद्र्यरेषेखालील लोकांची संख्या व प्रमाण**

| अ.नं. | वर्ष | ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांची संख्या व प्रमाण | शहरी भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांची संख्या व प्रमाण | दारिद्र्यरेषेखालील लोकांची एकूण संख्या व प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | १९५०-५१ | १७०.६ | २८.१ | १९८.७ (१००) |
| २ | १९५६-६० | १८४.६ | ३४.८ | २१९.६ (१००) |
| ३ | १९६१-६५ | १८३.० | ३८.६ | २२१.६ (१००) |
| ४ | १९६६-७० | २५१.० | ५०.७ | ३०१.७ (१००) |
| ५ | १९७१-७५ | २५२.२ | ५४.६ | ३०६.८ (१००) |
| ६ | १९७६-८३ | २४६.० | ५८.१ | ३०४.१ (१००) |
| ७ | १९८४-९० | २२३.३ | ६७.७ | २९०.१ (१००) |
| ८ | १९९१-९२ | २४९.५ | ७३.३ | ३२२.८ (१००) |

Source : Compiled from Gaurav Datt (1996), Poverty in India-195-12, Trends and Decomposition World Bank

**भारतातील बहुआयामी दारिद्र्याचे प्रमाण**

(Proportion of Population who are multidimensionally poor )

खालील तक्ता क्र. १ मध्ये भारतातील दरिद्री लोकांचे प्रमाण दर्शविले आहे.

**तक्ता क्र. १- भारतातील बहुआयामी दारिद्र्याचे प्रमाण**

| अ.क्र. | वर्ष | दरिद्री लोकांचे प्रमाण |
|---|---|---|
| १ | २००५-०६ | ५५.३६ % |
| २ | २०१३-१४ | २९.१७ % |
| ३ | २०१५-१६ | २४.८५ % |
| ४ | २०१९-२१ | १४.९६ % |
| ५ | २०२२-२३ | ११.२८ % |

स्त्रोत : इंटरनेट

वरील तक्ता क्र. १ वरुन असे दिसते की, सन २००५-०६ च्या तुलनेत २०२२-२३ मध्ये भारतातील बहुआयामी दारिद्र्याचे प्रमाण घटले आहे. सन २००५-६ मध्ये भारतात ५५.३६ टक्के लोक दरिद्री होते. सन २०२२०२३ मध्ये हे प्रमाण ११.२८ टक्केपर्यंत घटले आहे.

**आत्यंतिक दारिद्र्याचे प्रमाण** (Extreme Poverty)

खालील तक्ता क्र. २ मध्ये भारतातील एकूण लोकसंख्येपैकी आत्यंतिक दारिद्र्याचे प्रमाण दर्शविले आहे.

**तक्ता क्र. २- भारतातील आत्यंतिक दारिद्र्याचे प्रमाण**

| अ.क्र. | वर्ष | एकूण लोकसंख्या | आत्यंतिक दारिद्र्य असलेली लोकसंख्या (Number of People living in Extreme Poverty) | आत्यंतिक दारिद्र्य असलेल्या लोकांचे प्रमाण (%) |
|---|---|---|---|---|
| १ | २०१६ | १३२.३७ | ७.५९ | ५.७ |
| २ | २०१८ | १३५.२९ | ६.२६ | ४.६ |
| ३ | २०२० | १३८.२१ | ६.७३ | ४.९ |
| ४ | २०२२ | १४०.८५ | ४.६९ | ३.३ |
| ५ | २०२४ | १४३.४८ | ३.४४ | २.४ |

स्त्रोत : www.world poverty.io

वरील तक्ता क्र.२ वरुन असे दिसते की, भारतात आत्यंतिक दारिद्र्याचे प्रमाण घटत आहे. सन २०१६ साली भारतात आत्यंतिक दारिद्र्य असलेल्या लोकांची संख्या ७ कोटी ५९ लाख एवढी होती आणि त्यांचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण ५.७ % एवढे होते. सन २०२४ साली आत्यंतिक दारिद्र्य असलेल्या लोकांची संख्या ३ कोटी ४४ लाख एवढी होती तर त्यांचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण २.४ टक्के एवढे होते.

**भारतातील काही प्रमुख राज्यातील बहुआयामी दारिद्र्याचे प्रमाण**

(Percentage of population who are multidimensionally poor)

खालील तक्ता क्र. ३ मध्ये भारतातील काही प्रमुख राज्यातील बहुआयामी दारिद्र्याचे प्रमाण दर्शविले आहे.

**तक्ता क्र. ३ भारतातील काही प्रमुख राज्यातील बहुआयामी दारिद्र्याचे प्रमाण**

| अ.क्र. | राज्य | NFHS-5(2019-21) दारिद्र्याचे प्रमाण | NFHS-4(2015-16) दारिद्र्याचे प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | बिहार | ३३.७६ | ५१.८९ |
| २ | झारखंड | २८.८१ | ४२.१० |
| ३ | उत्तरप्रदेश | २२.९३ | ३७.६८ |
| ४ | मध्यप्रदेश | २०.६३ | ३६.५७ |
| ५ | आसाम | १९.३५ | ३२.६५ |
| ६ | छत्तीसगड | १६.३७ | २९.९० |
| ७ | ओरिसा | १५.६८ | २९.३४ |
| ८ | राजस्थान | १५.३१ | २८.८६ |
| ९ | प.बंगाल | ११.८९ | २१.२९ |
| १० | गुजरात | ११.६६ | १८.४२ |

स्रोत : इंटरनेट

वरील तक्ता क्र. ३ वरुन असे दिसते की, सन २०१५-१६ च्या तुलनेत सन २०१९-२१ मध्ये सर्वच राज्यांचे बहुआयामी दारिद्र्याचे प्रमाण घटले आहे. भारतातील बहुआयामी दारिद्र्याचे प्रमाण घटत आहे हे वरील तक्त्यावरुन दिसून येते.

**भारतातील सर्वात जास्त बहुआयामी दारिद्र्याचे प्रमाण असलेली राज्ये**

खालील तक्ता क्र. ४ मध्ये भारतातील सर्वात जास्त बहुआयामी दारिद्र्याचे प्रमाण असलेल्या राज्यांची माहिती दिली आहे.

**तक्ता क्र. ४ : भारतातील सर्वात जास्त बहुआयामी दारिद्र्याचे प्रमाण असलेली राज्ये**

| अ.क्र. | राज्य | बहुआयामी दारिद्र्याचे प्रमाण (२०१९-२१)<br>**Head count Ratio (2019-21) of the population who are multidimensionally poor (%)** |
|---|---|---|
| १ | बिहार | ३३.७६ |
| २ | झारखंड | २८.८१ |
| ३ | मेघालय | २७.७९ |
| ४ | उत्तरप्रदेश | २२.९३ |
| ५ | मध्यप्रदेश | २०.६३ |
| ६ | आसाम | १९.३५ |
| ७ | छत्तीसगड | १६.३७ |
| ८ | ओरिसा | १५.६८ |
| ९ | नागालँड | १५.४३ |
| १० | राजस्थान | १५.३१ |
| ११ | अरुणाचल प्रदेश | १३.७६ |

स्त्रोत : इंटरनेट

वरील तक्ता क्र. ४ वरून असे दिसते की, २०१९-२१ मध्ये सर्वात जास्त बहुआयामी दारिद्र्याचे प्रमाण बिहार या राज्यात असून ते ३३.७६% आहे. त्याखालोखाल झारखंड राज्याचा क्रम लागतो. झारखंड मध्ये बहुआयामी दरिद्री लोकांचे प्रमाण २८.८१% आहे. मेघालय राज्यात ते २७.७९% आहे. उत्तरप्रदेश राज्यात ते २२.९३% आहे. अरुणाचल प्रदेशात बहुआयामी दरिद्री लोकांचे प्रमाण १३.७६ % आहे.

**दारिद्र्याच्या संकल्पना /प्रकार :**

सापेक्ष आणि निरपेक्ष दारिद्र्य, ग्रामीण आणि शहरी दारिद्र्य असे दारिद्र्याचे प्रमुख प्रकार आहेत. या प्रकारांचे थोडक्यात स्पष्टीकरण खालील प्रमाणे दिले आहे.

**१) सापेक्ष दारिद्र्य:**

सापेक्ष दारिद्र्याची संकल्पना समजण्यास सोपी आहे. उदाहरणार्थ भारताच्या तुलनेत अमेरिका खूपच प्रगत देश आहे. त्यामुळे भारतासारख्या देशातील काही श्रीमंत लोक अमेरिकेच्या दृष्टीने गरीब ठरू शकतात. म्हणजेच एखाद्या देशातील श्रीमंत मनुष्य दुसऱ्या देशात गरीब ठरू शकतो. यालाच सापेक्ष दारिद्र्य असे म्हणतात.

भारतात मोठ्या शहरांचा खूपच विकास झालेला आहे. तर तुलनेने ग्रामीण भाग मागासलेला आहे. शहरातील राहणीमान खर्चिक आहे. तर ग्रामीण भागातील राहणीमान कमी खर्चिक आहे. मोठ्या शहरात

ग्रामीण भागाच्या तुलनेत निवास भाडे, वस्तू व सेवांच्या किमती जास्त आहेत. त्यामुळे मोठ्या शहरातील गरीब माणूस खेडेगावातील मनुष्याच्या तुलनेत श्रीमंत ठरू शकतो.

एकाच देशातील लोकसंख्येचे उत्पन्नानुसार वेगवेगळे गट तयार करून सापेक्ष दारिद्र्याचे मापन केले जाते. देशात सर्वात कमी उत्पन्नाच्या गटाला दारिद्र्यरेषेखालील लोक असे म्हणतात. अशा प्रकारे उत्पन्नानुसार लोकसंख्येचे वेगवेगळे गट तयार करून सर्वात कमी उत्पन्न असणाऱ्या गटातील लोकसंख्येला सापेक्ष दारिद्र्य असे म्हणतात. सापेक्ष दारिद्र्याचे मोजमाप करताना एकाच देशातील लोकसंख्येची त्यांच्या उत्पन्नानुसार गटवारी करून तुलना केली जाते.

### २) निरपेक्ष दारिद्र्य:

मनुष्याला उपजीविकेसाठी किंवा जगण्यासाठी काही वस्तू व सेवांची गरज असते. त्या वस्तू व सेवा विकत घेण्यासाठी व्यक्तीकडे किमान उत्पन्न असावे लागते. तरच ती व्यक्ती आवश्यक वस्तू व सेवा खरेदी करू शकते. अशा आवश्यक वस्तू व सेवा खरेदी करण्याएवढे म्हणजेच किमान उपभोगाएवढे सुद्धा ज्यांचे उत्पन्न नसते, त्या व्यक्तींना दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असे म्हणतात. अशा दारिद्र्याला निरपेक्ष दारिद्र्य असे म्हणतात. अशा प्रकारे अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण इत्यादी किमान गरज भागविण्याची परिस्थिती नसणे म्हणजे निरपेक्ष दारिद्र्य होय. निरपेक्ष दारिद्र्याची संकल्पना ही व्यक्तीच्या उत्पन्नाच्या किंवा खर्चाच्या आधारे स्पष्ट केली जाते.दरिद्री व्यक्तीचे उत्पन्न एवढे कमी असते की ती व्यक्ती आपल्या उत्पन्नातून पुरेसे उष्मांक मिळवून देणारे अन्न खरेदी करु शकत नाही. शहरी भागातील एका व्यक्तीला दररोज त्याच्या आहारातून २१०० उष्मांक मिळाले पाहिजेत आणि ग्रामीण भागातील एका व्यक्तीला २४७० उष्मांक मिळाले पाहिजेत. असे भारतीय नियोजन आयोगाचे मत आहे. जी व्यक्ती एवढे उष्मांक मिळवून देणारे अन्न आपल्या उत्पन्नातून खरेदी करु शकत नाही, ती व्यक्ती दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती होय. यालाच निरपेक्ष दारिद्र्य असे म्हणतात.

### ३) ग्रामीण दारिद्र्य:

भारतात सात लाखापेक्षा जास्त खेडी असून खेड्यात राहणारे सीमांत शेतकरी, अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण कारागिर यांच्यात दारिद्र्य आढळते. कोरडवाहू शेतीचे मोठे प्रमाण, वेगाने वाढणारी लोकसंख्या, ग्रामीण औद्योगीकरणाचा मंद वेग, महागाई ही ग्रामीण दारिद्र्याची प्रमुख कारणे आहेत.

### ४) शहरी दारिद्र्य :

शहरी दारिद्र्यालाच नागरी दारिद्र्य असेही म्हणतात. ग्रामीण भागातून शहरात होत असलेले वेगवान स्थलांतर, रोजगार संधीची कमतरता, उद्योगात वापरले जाणारे आधुनिक तंत्रज्ञान व त्यामुळे उद्योगात काम न मिळणे इत्यादी शहरी दारिद्र्याची प्रमुख कारणे आहेत.

अशा प्रकारे दारिद्र्याचे सापेक्ष दारिद्र्य व निरपेक्ष दारिद्र्य आणि ग्रामीण दारिद्र्य व शहरी दारिद्र्य असे प्रकार असून या प्रकारांचे थोडक्यात स्पष्टीकरण वरीलप्रमाणे दिले आहे. भारतात सर्व प्रकारचे दारिद्र्य आढळते. भारतात शहरी दारिद्र्यापेक्षा ग्रामीण दारिद्र्याचा प्रश्न गंभीर आहे.

**भारतातील दारिद्र्याची कारणे**

भारतातील दारिद्र्यास आर्थिक, सामाजिक, नैसर्गिक घटक कारणीभूत आहेत. जनता आणि सरकार सुद्धा या समस्येस कारणीभूत आहे. भारतातील सर्व राज्यात दारिद्र्याची समस्या आढळून येते. ग्रामीण आणि शहरी भागात सुद्धा ही समस्या अस्तित्वात आहे. भारतातील दारिद्र्यास कारणीभूत असणाऱ्या काही घटकांची चर्चा थोडक्यात खालीलप्रमाणे केली आहे.

**१) प्रचंड आकाराची लोकसंख्या :**

भारतीय लोकसंख्येचा आकार प्रचंड आहे. लोकसंख्येच्या बाबतीत भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो. भारताच्या लोकसंख्या वृद्धीचा दर आणि लोकसंख्येचा आकार खूप मोठा आहे. भारतातील सुमारे ५० कोटी लोकसंख्या अतिरिक्त आहे. एकूण लोकसंख्येत दरवर्षी कोट्यावधी लोकांची भर पडते. आजमितीस भारताची लोकसंख्या सुमारे १४४ कोटी एवढी आहे. भारतीय लोकसंख्येचा आकार प्रचंड असल्याने भारतीय अर्थव्यवस्था किंवा भारत सरकार कोट्यावधी लोकांच्या प्राथमिक गरजा पूर्ण करू शकत नाही. त्यामुळे स्वातंत्र्य मिळून सुमारे ८० वर्षे झाली तरी भारतात दारिद्र्याचा प्रश्न अस्तित्वात आहे. अशा प्रकारे वाढती लोकसंख्या किंवा लोकसंख्येचा प्रचंड आकार हे भारतातील दारिद्र्याचे अत्यंत महत्त्वाचे कारण आहे.

**२) कुटुंबाचा मोठा आकार:**

भारतातील बहुसंख्य कुटुंबांचा आकार मोठा आहे. कुटुंबात सहा- सात सदस्य आढळून येतात. एकेका कुटुंबात चार ते सात अपत्ये असतात. कुटुंबांचा आकार मोठा असल्याने दरिद्री कुटुंब आणखी दरिद्री बनते. भारतातील लोक दरिद्री असण्यास केवळ सरकार हा घटक जबाबदार नाही तर जनतासुद्धा त्यास जबाबदार आहे. मोठ्या आकाराच्या कुटुंबास प्राधान्य देणारी जनता त्यांच्या दारिद्र्यास कारणीभूत आहे.

**३) आर्थिक विषमता**

भारतात आर्थिक समानता नाही. देशात संपत्ती व उत्पन्नाचे विषम वाटप झालेले आहे. देशातील थोड्या लोकांकडे राष्ट्रीय उत्पन्नाचा व मालमत्तेचा मोठा वाटा आहे. तर बहुसंख्य लोकांकडे राष्ट्रीय उत्पन्नाचा आणि मालमत्तेचा कमी वाटा आहे. घर, शेतजमीन, जनावरे, पैसा इत्यादी उत्पन्न व मालमत्ता काही लोकांच्याकडे खूपच कमी आहे. काहींच्याकडे अजिबात नाही. तर काहींच्याकडे उत्पन्न व मालमत्ता प्रचंड आहे. अशा प्रकारे भारतात शेकडो वर्षापासून स्थावर जंगम मालमत्ता आणि उत्पन्नाचे समान वाटप झालेले नाही. त्यामुळे भारतात दारिद्र्याची समस्या स्वातंत्र्यपूर्व काळापासून अस्तित्वात आहे.

**४) शेतीची अल्प उत्पादकता:**

१९५१ च्या तुलनेत आज भारतीय शेतीचे उत्पादकता खूपच वाढली असली तरी ती विकसित देशांच्या तुलनेत खूपच कमी आहे. तसेच कृषी उत्पादनांच्या वाढत्या किमतीमुळे कृषी मालाचा उत्पादन खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे वाढत्या उत्पादकतेचा फारसा फायदा शेतकऱ्यांना मिळत नाही. त्यामुळे भारतात सीमांत शेतकरी, अल्पभूधारक शेतकरी किंवा कोरडवाहू शेतकरी यांच्यामध्ये दारिद्र्याचे प्रमाण मोठे आहे.

**५) वाढती महागाई :**

विविध कारणांमुळे भारतात सतत जीवनावश्यक वस्तूंची टंचाई आणि त्यांची महागाई जाणवते. भारतातील महागाईचे वर्णन जीवघेणी महागाई असेच केले जाते. भारतातील सततच्या वाढत्या महागाईने मध्यमवर्गीयांचे सुद्धा अंदाजपत्रक कोलमडून पडते. त्यामुळे अनेक मागासवर्गीय गरीब किंवा दरिद्री बनतात. तांदूळ, गहू, ज्वारी, बाजरी, डाळी, कडधान्ये, खाद्यतेले, कपडे, घरभाडे, औषधे, प्रवास भाडे, भाजीपाला, वीज बिल, पाणीपट्टी, घरफाळा, भांडी यांच्या किमतीत सतत वाढ होत असून त्यामुळे भारतातील दारिद्र्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत आहे. अशा प्रकारे वाढती व भयंकर महागाई हे भारतातील दारिद्र्याचे एक प्रमुख कारण आहे.

**६) वाढती बेकारी :**

वाढती बेकारी हे सुद्धा भारतातील दारिद्र्याचे प्रमुख कारण आहे. भारतात ग्रामीण बेकारी, शहरी बेकारी, हंगामी बेकारी, छुपी बेकारी अशी सर्व प्रकारची बेकारी आढळून येते. भारतात आजमितीस सुमारे दहा कोटी लोक बेरोजगार आहेत. या बेरोजगारांकडे उत्पन्नाचे कोणतेच साधन नसल्याने त्यांना जीवनावश्यक गरजासुद्धा पूर्ण करता येत नाहीत. भारतात दिवसेंदिवस सर्व प्रकारची बेकारी वाढत आहे. वाढती लोकसंख्या किंवा प्रचंड आकाराची लोकसंख्या हा घटक प्रामुख्याने त्यास कारणीभूत आहे. त्यामुळे दारिद्र्य हटविण्यात सरकारला यश येत नाही. वाढत्या लोकसंख्येच्या प्रश्नामुळे दारिद्र्य हटविणे ही सरकारला सोपी बाब राहिलेली नाही.

**७) सर्वसमावेशक वृद्धींचा अभाव:**

अलीकडच्या काही दशकात भारताच्या आर्थिक विकासाचा दर वाढला असला तरी वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत विकासाचा दर किंवा विकासाचा वेग कमीच आहे. १९५१ च्या तुलनेत आज भारताचा प्रचंड आर्थिक विकास झाला असला तरी झालेला किंवा होत असलेला आर्थिक विकास हा सर्वसामावेशक (Inclusive) विकास नाही. आर्थिक विकास होत असला तरी विकासाची फळे कोट्यावधी लोकांपर्यंत (गरिबांपर्यंत) पोहचत नाहीत. देशाच्या विकासाची फळे श्रीमंतांना जास्त प्रमाणात प्राप्त होतात. गरिबांच्या वाट्याला विकासाचे फायदे फारसे येत नाहीत.

**८) श्रमिकांची कमी कार्यक्षमता :**

विकसित देशांच्या तुलनेत भारतातील श्रमिकांची कार्यक्षमता आणि उत्पादकता खूपच कमी आहे. अपुरा आणि निकृष्ट आहार हे कार्यक्षमता कमी असण्याचे प्रमुख कारण आहे. कार्यक्षमता आणि उत्पादकता कमी असल्याने चांगले उत्पन्न देणारा रोजगार किंवा कामधंदा मिळत नाही. त्यामुळे भारतात दारिद्र्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

**९) उत्पादकांना रास्त भाव न मिळणे :**

ग्रामीण भागातील कोरडवाहू व सीमांत शेतकरी, कारागिर हे गरीब आहेत. त्यांच्या गरीबीस किंवा दारिद्र्यास काही घटक कारणीभूत आहेत. त्यामध्ये त्यांच्या वस्तूंना किंवा प्राथमिक उत्पादनांना रास्त किंवा चांगला भाव न मिळणे हा घटकसुद्धा कारणीभूत आहे. विविध कारणांमुळे लहान शेतकरी, ग्रामीण कारागिर यांना त्यांच्या मालास रास्त भाव मिळत नाही. त्यामुळे त्यांना दारिद्र्यातून बाहेर पडणे शक्य होत नाही.

**१०) मागास किंवा कालबाह्य उत्पादन साधनांचा व तंत्रांचा वापर:**

भारतात आजही कृषी क्षेत्रात आणि लघु व कुटीर उद्योगात बऱ्याच ठिकाणी जुनाट (मागास) व कालबाह्य उत्पादन तंत्र वापरले जाते. ग्रामीण भागातील लहान शेतकऱ्यांना, कारागिरांना किंवा छोट्या व्यावसायिकांना फारसे उत्पन्न मिळत नाही. भारतातील ग्रामीण दारिद्र्याचे हे सुद्धा एक प्रमुख कारण आहे.

**११) ग्रामीण औद्योगिकरणाचा मंद वेग:**

भारताच्या ग्रामीण भागात आजही जवळजवळ ७०% जनता राहते. भारतात ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांची संख्या आजही मोठी आहे. परंतु भारताच्या शहरी भागात औद्योगिक विकास जेवढा झालेला आहे तेवढा ग्रामीण भागात झालेला नाही. भारतात ग्रामीण भागात औद्योगिकरणाचा वेग मंद आहे. शहरापेक्षा ग्रामीण भागात प्रचंड लोकसंख्या राहत असल्याने शहरापेक्षा ग्रामीण भागात लहान लहान उद्योगसंस्था मोठ्या प्रमाणात स्थापन होणे आवश्यक आहे. परंतु तसे झालेले नाही. भारतात ग्रामीण भागात कारखाने पुरेशा प्रमाणात स्थापन झालेले नसल्याने भारताच्या ग्रामीण भागात बेकारी आणि दारिद्र्य आढळून येते. अशा प्रकारे औद्योगिकरणाचा मंद वेग हे भारतातील बेकारीचे आणि दारिद्र्याचे एक कारण आहे.

**१२) गरिबांना नोकऱ्या न मिळणे :**

गरीब कुटुंबातील शिक्षित, प्रशिक्षित, बुद्धिमान लोकांना नोकऱ्या मिळणे ही सोपी बाब राहिलेली नाही. कित्येक शिक्षण संस्था शिपाई पदासाठी सुद्धा पाच ते दहा लाख लाच मागतात. शिक्षक, प्राध्यापक पदासाठी लाच मागतात किंवा बक्कळ रकमेची देणगी मागतात. एवढी रक्कम देणे गरीब कुटुंबांना शक्य होत नाही. त्यामुळे नोकरीपासून वंचित राहावे लागून गरिबांना दारिद्र्यातच खितपत पडावे लागते. लाचखोरीमुळे गरीब कुटुंबातील बुध्दिमान तरुणांना दारिद्र्य व बेकारीशी सामना करावा लागतो.

**१३) जात व धर्माचा अडसर:**

नोकरीवर किंवा कामावर ठेवणारे बरेच जण काम मागणाऱ्यांची जात आणि धर्म पाहतात. ठराविक जातीच्या लोकांना काम दिले जाते. काही जातीच्या लोकांना त्यांची पात्रता असूनही काम दिले जात नाही. त्यामुळे इतरांना बेकार राहावे लागून दारिद्र्यातच जगत राहणे नशीबी येते. सरकारचे जातीवर आधारित आरक्षण धोरणसुद्धा दारिद्र्य व बेकारीस कारणीभूत आहे. ज्या जातीच्या लोकांना कायद्यानुसार आरक्षण नाही पण आरक्षणाची किंवा सरकारी मदतीची ज्यांना गरज आहे त्यांना सरकारी सवलती मिळत नाहीत. त्यामुळे त्यांच्यात दारिद्र्याचे प्रमाण वाढत चालले आहे.

**१४) सरकारी योजनांचा दुरुपयोग:**

सरकारच्या बेकारी व दारिद्र्य निर्मूलनाच्या योजना खूप चांगल्या आहेत परंतु या योजनांच्या माध्यमातून मिळणाऱ्या वस्तूंचा आणि पैशाचा कित्येक गरीब लोक योग्य उपयोग करत नाहीत. त्यामुळे योजनांचे पुरेपूर फायदे गरिबांना मिळत नाहीत. त्यामुळे गरिबांची गरिबी किंवा दारिद्र्य हटत नाही.

**१५) व्यावसायिक शिक्षणासाठी पैसा नसणे:**

व्यावसायिक (यांत्रिक, तांत्रिक) शिक्षणामुळे नोकऱ्या मिळतात किंवा स्वतःचा छोटा मोठा उद्योग व्यवसाय उभा करता येतो हे खरे असले तरी बहुसंख्य लोक अपुऱ्या उत्पन्नामुळे आपल्या मुलाबाळांना चांगले व्यावसायिक शिक्षण देऊ शकत नाहीत. त्यामुळे त्यांना व त्यांच्या मुलाबाळांनाही दारिद्र्यातच खितपत पडावे लागते.

**१६) अनावश्यक खर्च:**

भारतातील बहुसंख्य लोक लग्नकार्य, जत्रा, मृत्यूनंतरचे विधी, देवाच्या नावावर बोकड कापणे इत्यादीसाठी उत्पन्न अपुरे पडले तर कर्ज काढून खर्च करतात. त्यामुळे उत्पन्नाचा काही भाग अशा अनुत्पादक बाबींवर आणि त्यासाठी काढलेले कर्ज फेडण्यातच खर्च होतो. भारतातील कित्येक गरीब लोक सावकारांच्या कर्जाच्या विळख्यात अडकून पडले असून दारिद्र्यातच जीवन जगणे त्यांच्या नशिबी आले आहे. बहुसंख्य लोक मुलांच्या शिक्षणावर, स्वयंरोजगारासाठी खर्च न करता अवांतर अनुत्पादक खर्च करतात.

**१७) व्यसनाधिनता:**

व्यसनाधिनता हा घटकसुद्धा भारतातील काही दरिद्री लोकांच्या दारिद्र्यास कारणीभूत असणारा महत्त्वाचा घटक आहे. दारिद्र्यरेषेखालील बऱ्याचशा व्यक्तींना दारू व तंबाखूचे व्यसन आहे. सतत दारू पिणाऱ्यांना काम मिळत नाही. त्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढत नाही. तसेच ज्या व्यक्ती काम करून कामाची वेळ संपल्यानंतर दारू पितात, गांजा ओढतात किंवा इतर व्यसने करतात त्यांचे उत्पन्न या व्यसनावर खर्च होते. त्यामुळे दरिद्री व्यक्ती दारिद्र्याच्या गाळातून बाहेर पडू शकत नाही.

**१८) व्यवसाय न चालणे :**

गरिबांनी बँकांचे व इतर वित्तीय संस्थांचे कर्ज घेऊन सुरू केलेले व्यवसाय फायद्यात न चालण्यास काही घटक जबाबदार आहेत. उदाहरणार्थ गरीब व्यावसायिक मोठ्या व्यावसायिकांशी स्पर्धा करू शकत नाहीत. तसेच मोठ्या व्यावसायिकांकडील वस्तू स्वस्त, दर्जेदार आणि विविध व्हरायटीच्या असतात. त्यामुळे बहुसंख्य ग्राहक गरिबांच्या वस्तूंकडे पाठ फिरवतात. त्यामुळे कित्येक गरीब व्यावसायिक कर्जबाजारी होऊन दारिद्र्याच्या गाळातच रुतून पडले आहेत.

**१९) कमी गतिशीलता :**

बिहार, उत्तर प्रदेश, राजस्थान इत्यादी काही राज्यातील लोकांच्या मध्ये जेवढी गतिशीलता आहे तेवढी गतिशीलता महाराष्ट्रीय लोकांच्यात नाही. अनेक परप्रांतियांनी महाराष्ट्र, गुजरात सारख्या राज्यात सुतारकाम, गवंडीकाम करून भरपूर पैसा मिळवला असून आपल्या मूळ गावी मोठमोठे बंगले बांधले आहेत. कित्येक परप्रांतियांची मुले महाराष्ट्रात चांगले शिक्षण घेत आहेत. मराठी माणसाची गतिशीलता कमी असल्याने जेथे चांगले उत्पन्न मिळण्याच्या संधी आहेत ती ठिकाणे दूर असल्याने तिथे ते जात नाहीत. त्यामुळे दारिद्र्य त्यांची पाठ सोडत नाही.

**२०) अपुरी /तुटपुंजी/ अनार्थिक शेती :**

भारतातील बहुसंख्य शेतकऱ्यांची शेती अपुरी/तुटपुंजी आहे. तसेच पुरेसे उत्पन्न न देणाऱ्या कोरडवाहू/जिरायत शेती असणाऱ्यांचे प्रमाण खूप मोठे आहे. शेतीतील उत्पन्न जेमतेम चार ते सहा महिनेच पुरते. त्यामुळे बहुसंख्य शेतकरी गरीब किंवा दरिद्री आहेत. सीमांत शेतकऱ्यांचे प्रमाण मोठे असून ते दिवसेंदिवस वाढत चालले आहे.

**२१) अनारोग्य/ आजारपण:**

दारिद्र्यामुळे आजारपण आणि आजारपणामुळे दारिद्र्य असे चित्र आपल्या देशात दिसते. म्हणजे दारिद्र्य असल्याने कुपोषण आणि त्यामुळे सततचे आजारपण आढळते. त्यामुळे कामास जाता येत नाही. त्यामुळे मजुरी किंवा उत्पन्न बुडते. उत्पन्न किंवा पैसा न मिळाल्याने औषधोपचारावर पुरेसा खर्च करता येत नाही. त्यामुळे आजारपण लवकर बरे होत नाही. त्यामुळे कुटुंबाच्या हालअपेष्टात वाढच होते. सारांश, अशा प्रकारे वाढती लोकसंख्या, आर्थिक विषमता, महागाई, बेकारी, निरक्षरता, औद्योगीकरणाचा मंद वेग, तुटपुंजी शेती, शेतीची कमी उत्पादकता इत्यादी विविध घटक भारतातील दारिद्र्यास जबाबदार आहेत. या घटकामुळे भारताला स्वातंत्र्य मिळून पाऊण शतक उलटून गेले तरी भारतातील दारिद्र्याची समस्या संपुष्टात येऊ शकलेली नाही.

**दारिद्र्याचे दुष्परिणाम**

दारिद्र्य ही दरिद्री व्यक्तीसमोरील जशी गंभीर समस्या आहे तशी ती समाजासमोरील किंवा राष्ट्रासमोरील देखील गंभीर समस्या आहे. भारतासारख्या ज्या देशात सर्वदूर ग्रामीण आणि शहरी भागात दारिद्र्य आढळून

येते, त्या देशात दारिद्र्य ही सामाजिक किंवा राष्ट्रीय समस्या मानली जाते. दारिद्र्याच्या समस्येमुळे आर्थिक, सामाजिक आणि राजकीय समस्या निर्माण होतात. दारिद्र्याच्या प्रश्नामुळे अर्थव्यवस्थेवर किंवा देशाच्या आर्थिक विकासावरही परिणाम होतो. म्हणून दारिद्र्याचा प्रश्न केवळ दरिद्री कुटुंबापुरता सीमित राहत नाही. दारिद्र्याच्या प्रश्नामुळे संपूर्ण अर्थव्यवस्था प्रभावित होत असल्याने आणि देशात दारिद्र्यरेषेखालील लोकांची संख्या प्रचंड असल्याने, दारिद्र्याचे प्रमाण घटण्याचा वेग अत्यंत कमी असल्याने आजही दारिद्र्य ही भारतीय अर्थव्यवस्थेला भेडसावत असलेली प्रमुख समस्या आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून ८० वर्षे पूर्ण होत आली असली तरी देशात दारिद्र्याचा प्रश्न शिल्लक असल्याने दारिद्र्य हे भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील प्रमुख आव्हान मानले जाते. भारतात दारिद्र्याचे जे दुष्परिणाम आढळून येतात, त्याची माहिती थोडक्यात खालीलप्रमाणे दिली आहे.

**१) मुलांना चांगले शिक्षण न मिळणे :**

दारिद्र्यामुळे दरिद्री कुटुंबाची शैक्षणिक प्रगती होत नाही. दरिद्री कुटुंबे आपल्या मुलाबाळांना चांगले शिक्षण देऊ शकत नाहीत. व्यावसायिक (धंदेवाईक-यांत्रिक, तांत्रिक) शिक्षण ते आपल्या मुलाबाळांना देऊ शकत नाहीत. त्यामुळे कुटुंबाची प्रगती होत नाही.

**२) चांगले उत्पन्न देणाऱ्या नोकऱ्या, कामधंदा न मिळणे :**

दरिद्री कुटुंबात यांत्रिक, तांत्रिक शिक्षण घेतलेल्यांचे प्रमाण खूपच कमी असते. त्यामुळे दरिद्री कुटुंबातील व्यावसायिक शिक्षण प्राप्त न केलेल्या अपत्त्यांना चांगले उत्पन्न देणाऱ्या नोकऱ्या किंवा कामधंदा मिळत नाही. त्यामुळे दरिद्री कुटुंबांचा गाडा दारिद्र्याच्या चिखलात अधिकच रुतून बसतो.

**३) कार्यक्षमता, उत्पादकता कमी राहणे:**

दारिद्र्यरेषेखालील लोकांची कार्यक्षमता आणि उत्पादकता अत्यंत कमी असते. दारिद्र्यामुळे कुटुंबातील कोणालाच पोटभर, चांगले व सकस अन्न मिळू शकत नाही. काही वेळा उपाशी, अर्धपोटी राहावे लागते. त्यामुळे दरिद्री कुटुंबातील व्यक्तींची कार्यक्षमता, उत्पादकता अत्यंत कमी राहते. त्यामुळे त्यांची मजुरी किंवा उत्पन्नसुद्धा कमी राहते.

**४) बालमजुरीची समस्या:**

देशात आजही बालमजुरीची समस्या अस्तित्वात आहे. भारतातील बालमजुरीच्या समस्येस जे घटक कारणीभूत आहेत त्यामध्ये दारिद्र्य हा घटक महत्त्वाचा घटक आहे. दरिद्री कुटुंबे आपल्या अपत्त्यांना उत्पन्नाचे साधन मानतात. त्यामुळे वयाच्या दहाव्या किंवा बाराव्या वर्षापासून दरिद्री कुटुंबातील मुले रोजगार करताना किंवा मोलमजुरी करताना दिसतात.

**५) शैक्षणिक गळतीत वाढ:**

शाळा किंवा शिक्षण अर्ध्यावर सोडून देणे, शाळेत सतत गैरहजर राहणे या शैक्षणिक समस्यांना विविध घटक जबाबदार आहेत. त्यामध्ये 'दारिद्र्य' हा सुद्धा एक महत्त्वाचा घटक आहे. शाळा बुडवून किंवा शिक्षण अर्ध्यावर कायमचे बंद करून बहुसंख्य दरिद्री कुटुंबातील मुले- मुली कामधंद्याच्या शोधात राहतात.

### ६) कामासाठी धडधाकट मजूर न मिळणे :

काही कामे शारीरिक कष्टाची असतात. रस्त्याची कामे, दगड फोडण्याची कामे, खड्डे खोदणे अशा कामासाठी मजूर मिळत नाहीत. परिसरात काम उपलब्ध असूनही दरिद्री कुटुंबातील लोकांना काम मिळत नाही. कारण अशी कामे त्यांना निभत नाहीत. अशा प्रकारे दारिद्र्याच्या समस्येमुळे कामासाठी धडधाकट मजूर मिळत नाहीत. ही समस्या देशभर जाणवते.

### ७) गुन्हेगारीत वाढ:

भारतात गुन्हेगारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. गुन्हेगारांनी देशातील सर्व तुरुंग खचाखच भरले आहेत. क्षमतेपेक्षा दीडपट, दुप्पट कैदी किंवा गुन्हेगार एकेका तुरुंगात दिसतात. भारतातील वाढत्या गुन्हेगारीस अनेक घटक कारणीभूत आहेत. त्यामध्ये गरिबी किंवा दारिद्र्य हा घटकसुद्धा कारणीभूत आहे. चोऱ्या, दरोडे यांचे प्रमाण वाढण्यास दारिद्र्य हा घटक जबाबदार असून त्यामुळे गुन्ह्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

### ८) सरकारवरील अवलंबित्वात वाढ:

सरकारच्या दारिद्र्य निर्मूलनाच्या अनेक योजना आहेत. कित्येक लोक कामधंदा सोडून पंचायत समिती, तहसीलदार कचेरी, ग्रामपंचायत कार्यालय लोकप्रतिनिधींची निवासस्थाने, राजकीय पक्षांची कार्यालये या ठिकाणी दिवस दिवसभर ठाण मांडून बसलेले दिसून येतात. सरकारकडून पैशाच्या किंवा वस्तूंच्या स्वरूपात मदत मिळावी व ती सतत निरंतर मिळावी अशी त्यांची अपेक्षा असते. कामधंदा सोडून योजना कशा पदरात पाडून घेता येतील यासाठी त्यांचा वेळ खर्च होत आहे. अशा प्रकारे दारिद्र्यामुळे दरिद्री लोकांचे सरकारवरील अवलंबित्व वाढत चालले आहे.

### ९) कुपोषण आणि बालमृत्यू :

भारतात आजही कुपोषण, अर्भक मृत्यू, बालमृत्यू यांचे प्रमाण मोठे आहे. ग्रामीण आणि शहरी भागापेक्षा भारताच्या आदिवासी भागात कुपोषणाची आणि बालमृत्यूची समस्या गंभीर आहे. कुपोषण आणि बालमृत्यूस अनेक घटक कारणीभूत आहेत. त्यामध्ये दारिद्र्य हा घटकसुद्धा कारणीभूत आहे. दारिद्र्य आणि कुपोषण, दारिद्र्य आणि बालमृत्यू या घटकांमध्ये अत्यंत जवळचे संबंध आहेत. भारतात दरिद्री कुटुंबांची संख्या मोठी असल्याने कुपोषण, अर्भक मृत्यू आणि बालमृत्यूचे प्रमाण देशात मोठे आहे.

### १०) सवलती बंद होण्याची भीती:

सरकारच्या, स्वयंसेवी संस्थांच्या आणि दानशूर व्यक्तींच्या दारिद्र्य निर्मूलन योजनांचा लाभ घेणाऱ्या बहुसंख्य लोकांना आपण दारिद्र्यरेषेच्या वर आलो तर आपल्या सवलती बंद होतील अशी भीती वाटते. त्यामुळे दारिद्र्य निर्मूलनाच्या कार्यक्रमात स्वतःचे योगदान देण्याऐवजी दारिद्र्यातच अडकून बसणे ते पसंत करतात. त्यामुळे दारिद्र्याची समस्या अधिकच गंभीर बनते.

**११) अनारोग्य / आजारपण:**

दरिद्री कुटुंबांना पुरेसा, पोटभर आणि सकस आहार मिळत नाही. त्यामुळे त्यांची प्रतिकारशक्ती कमी राहून आरोग्य बिघडणे किंवा सतत आजारी पडणे या समस्यांना त्यांना तोंड द्यावे लागते. आजारपणामुळे कामाचे खाडे होतात. काम उपलब्ध असले तरी कामावर जाता येत नाही. कामे निभत नाहीत. त्यामुळे उत्पन्न कमी राहून दारिद्र्याचा प्रश्न आणखीनच गंभीर बनतो.

**१२) अर्भकांची व मुलींची विक्री :**

भारतातील दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या कुटुंबांचा आकार मोठा असून कुटुंबातील अपत्यांची संख्या तीन ते चार एवढी असल्याचे दिसते. याचा गैरफायदा भारतातील काही संधीसाधू घेत असून ते गरिबांच्या अर्भकांची, लहान मुलांची व स्त्रियांची खरेदी करून त्यांची व त्यांच्या अवयवांची देशात व देशाबाहेर विक्री करत आहेत. गरीब मुलींचे विवाह पैसे घेऊन धनिकांशी लावून दिले जातात. ही स्त्रियांची एक प्रकारे विक्रीच असून कुटुंबांचा आकार मोठा असल्याने गरिबांनी हा मार्ग पत्करलेला दिसतो. अपत्यांची, स्त्रियांची खरेदी करणाऱ्यांकडून गरिबांना पैशाची लालूच दाखवली जाते. जगात दरवर्षी २० लाख मुलांची मुलींची विक्री केली जाते. या उद्योगाची वार्षिक उलाढाल पाच अब्ज डॉलर्स इतकी आहे. (दैनिक पुढारी दिनांक २८/१२/२०००). अशाप्रकारे मोठ्या आकाराचे कुटुंब गरिबांना पोसता येत नाही. त्यामुळे काही अपत्यांची व तरुण मुलींची त्यांना विक्री करावी लागते. हे अत्यंत गंभीर स्वरूपाचे व माणुसकीला काळीमा फासणारे आहे.

**१३) अकाली वृद्धत्व:**

दरिद्री कुटुंबातील व्यक्तींना पुरेसे, पोटभर अन्न खायला मिळत नाही. या कुटुंबातील व्यक्तींना जन्मल्यापासूनच कुपोषणाच्या किंवा अशक्तपणाच्या समस्येला तोंड द्यावे लागत असते. उपाशी, अर्धपोटी राहावे लागल्याने दरिद्री कुटुंबातील ३० ते ४० वर्षाच्या व्यक्ती वृद्ध व्यक्तीसारख्या दिसतात. अशा प्रकारे दारिद्र्यामुळे अकाली वृद्धत्व (लवकर म्हातारपण येणे), अकाली मृत्यू अशा समस्या निर्माण होतात.

**१४) देह व्यापारात वाढ:**

भारतात देहव्यापारास (वेश्याव्यवसायास) कायदेशीर परवानगी नाही. तरीही विविध कारणामुळे हा अनैतिक/बेकायदेशीर व्यापार भारतात दिवसेंदिवस वाढत आहे. त्याला दारिद्र्य हा भारताचा घटक महत्त्वाचा घटक कारणीभूत आहे. देह व्यापारातील स्त्रियांची परिस्थिती अत्यंत विदारक आहे. त्यांच्या मुलाबाळांना सन्मानाने जगता येत नाही. देह व्यापारात वाढ होणे ही चिंताजनक बाब असून दारिद्र्य हा महत्वाचा घटक त्यास कारणीभूत आहे.

**१५) सामाजिक दर्जा कमी :**

दारिद्र्याचा आणखी एक दुष्परिणाम म्हणजे दरिद्री व्यक्तींचा सामाजिक दर्जा कमी असतो. दरिद्री व्यक्तींना समाजात फारशी किंमत दिली जात नाही. श्रीमंत व्यक्तीलाच समाजात मानसन्मान किंवा प्रतिष्ठा असते. दरिद्री व्यक्तींची सर्व ठिकाणी अवहेलना होत असते. हा दारिद्र्याचा सामाजिक परिणाम मानता येईल.

**१६) देशाच्या आर्थिक विकासावर परिणाम :**

भारतात दरिद्री लोकांची संख्या प्रचंड असल्याने सरकारला दारिद्र्य निर्मूलनाच्या कार्यक्रमावर मोठा खर्च करावा लागतो. यापैकी बराचसा खर्च अनुत्पादक असतो. आरोग्य किंवा औषध उपचार यावर केलेला खर्च अल्पकाळात तरी अनुत्पादकच असतो. अशा खर्चामुळे उत्पादक कामासाठी किंवा विकास कामासाठी पैसा कमी पडतो. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाचा वेग वाढत नाही. राष्ट्राचा विकास कमी गतीने होतो. हा दारिद्र्याचा अर्थव्यवस्थेवर होणारा अत्यंत गंभीर परिणाम आहे.

**१७) लोकसंख्येच्या आकारात वाढ:**

दारिद्र्य आणि देशाची लोकसंख्या या दोन घटकात अत्यंत जवळचे संबंध आहेत. भारताच्या बाबतीत हे प्रकर्षाने जाणवते. भारतात लोकसंख्या वाढीचा वेग आणि लोकसंख्येचा आकार मोठा आहे. त्यास जे काही घटक कारणीभूत आहेत त्यामध्ये दारिद्र्य हा एक घटक कारणीभूत आहे. दारिद्र्यामुळे देशाच्या लोकसंख्या वाढीचा वेग वाढून लोकसंख्येचा आकार मोठा होतो. कारण दरिद्री कुटुंबांची जननक्षमता खूप जास्त असते. दरिद्री लोकांना असे वाटते की, आपल्या कुटुंबात जास्त आपत्ये असतील तर ती मोठी झाल्यानंतर मजुरी करून कुटुंबाला हातभार लावतील. त्यामुळे भारतात कित्येक दरिद्री कुटुंबात चार ते सहा अपत्ये दिसून येतात. अशा प्रकारे देशात दारिद्र्याचे प्रमाण जितके जास्त तितका लोकसंख्या वाढीचा वेग आणि लोकसंख्येचा आकार मोठा असतो. दारिद्र्यामुळे देशात अतिरिक्त लोकसंख्येचा प्रश्न निर्माण होतो. अतिरिक्त लोकसंख्येमुळे देशात अनेक आर्थिक व सामाजिक समस्या निर्माण होतात. या समस्यांशी मुकाबला करण्यासाठी सरकारला प्रचंड खर्च करावा लागतो. त्यामुळे देशाच्या प्रगतीचा वेग मंदावतो.

**१८) स्त्रियांशी संबंधित इतर प्रश्न :**

दारिद्र्यामुळे गर्भाशय भाड्याने देणे, स्त्रीबिजांची विक्री करणे, लहान मुला- मुलींची विक्री, मुला- मुलींची लग्ने लहान वयात करणे अशा समस्या भारतात निर्माण झाल्या आहेत. स्त्रियांशी संबंधित हे प्रश्न अत्यंत गंभीर असून दिवसेंदिवस या प्रश्नांची तीव्रता वाढत आहे. दारिद्र्य हा प्रमुख घटक त्यास कारणीभूत आहे.

**१९) शहरातील झोपडपट्यात वाढ:**

पोटापाण्यासाठी, उपजीविकेसाठी ग्रामीण भागातून लहान मोठ्या शहरात ग्रामीण भागातून दररोज लोकांचे लोंढेच्या लोंढे येत असतात. त्यामुळे शहरातील लोकांची संख्या प्रचंड वाढली आहे. शहराच्या बाहेर किंवा शहरात मिळेल त्या ठिकाणी या लोकांनी झोपड्या उभारून वास्तव्य करण्यास सुरुवात केली आहे. भारतात शहरातील झोपड्यांची आणि झोपडपट्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. वाढत्या झोपडपट्यांमुळे शहरातील सामाजिक स्वास्थ्य धोक्यात आले आहे.

**२०) व्यसनाधीनता, नैराश्य यामध्ये वाढ:**

दारिद्र्य आणि व्यसनाधिनता या दोन घटकात जवळचे संबंध आहेत. दारिद्र्य हे व्यसनाधीनतेचे कारण आणि परिणाम आहे. दारिद्र्यामुळे व्यसनाधीनतेत वाढ होते आणि व्यसनाधीनतेमुळे दारिद्र्यात वाढ होते.

दारिद्र्यामुळे किंवा गरिबीमुळे कुटुंब प्रमुखाला कुटुंबातील सदस्यांच्या मूलभूत गरजासुद्धा भागवता येत नाहीत. मुलाबाळांना चांगला आहार, चांगले शिक्षण देता येत नाही. त्यामुळे दुःख, नैराश्य घालवण्यासाठी बरेचसे लोक दारू, गांजा इत्यादी व्यसनांचा आधार घेतात. त्यामुळे व्यसनाधीनता वाढते.

**२१) एकूण उपभोगावर/ मागणीवर परिणाम:**

लोक वस्तू आणि सेवांची जी खरेदी करतात, त्यास उपभोग किंवा प्रभावी मागणी असे म्हणतात. एकूण मागणी किंवा एकूण उपभोग हा लोकांच्या उत्पन्नावर अवलंबून असतो. परंतु भारतात सुमारे ४० ते ५० कोटी लोक दरिद्री किंवा गरीब असल्यामुळे त्यांची विविध वस्तू व सेवांना असणारी मागणीसुद्धा कमी आहे. प्रभावी मागणी कमी असल्याने गुंतवणूक, उत्पादन, उत्पन्न, नफा या घटकावर प्रतिकूल परिणाम होतो.

**२२) शेती विकासावर प्रतिकूल परिणाम:**

दरिद्री लोक किंवा गरीब शेतकरी गरिबीमुळे शेतीत पुरेशी भांडवल गुंतवणूक करू शकत नाहीत. त्यामुळे शेतीची उत्पादकता वाढत नाही. शेतीपासून पुरेसे उत्पन्न मिळत नाही. भारतात गेल्या दहा वर्षात लाखो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्याची विविध कारणे असून त्यामध्ये दारिद्र्य हा प्रमुख घटक आहे.

**२३) अंधश्रद्धेमध्ये वाढ:**

दारिद्र्य आणि अंधश्रद्धा यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे. दारिद्र्यामुळे विविध प्रकारच्या अंधश्रद्धांमध्ये वाढ होते. बहुसंख्य दरिद्री कुटुंबे अंधश्रद्धेच्या विळख्यात अडकलेली आहेत. दारिद्र्यामुळे जशी अंधश्रद्धा वाढते, त्याप्रमाणे अंधश्रद्धेमुळे सुद्धा दारिद्र्य वाढते. जत्रा, यात्रांमध्ये देवाच्या नावावर बोकड कापणे, इतर अनिष्ट रूढी परंपरांच्या पालनासाठी खर्च करणे (जन्ममृत्यूच्या विधीवर, लग्न विधीवर भरमसाठ खर्च करणे) यामुळे कर्जबाजारी होऊन दरिद्री कुटुंबे आणखी दरिद्री होतात.

**२४) निरक्षरतेची समस्या:**

भारताला स्वातंत्र्य मिळून ८० वर्षे होत आली तरी आजही भारतात सुमारे २५% लोकसंख्या निरक्षर आहे. भारतात आर्थिक व औद्योगिकदृष्ट्या मागासलेल्या राज्यात निरक्षर लोकांचे प्रमाण मोठे आहे. ग्रामीण आणि आदिवासी भागात निरक्षरतेचे प्रमाण मोठे आहे. पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. भारतातील निरक्षरतेस अनेक घटक कारणीभूत आहेत. त्यामध्ये 'दारिद्र्य' हा एक घटक आहे. दरिद्री लोक आपल्या अपत्यांना शिक्षण देण्यास फारसे उत्सुक नसतात. त्यामुळे दरिद्री कुटुंबात निरक्षर व्यक्ती आढळतात. दारिद्र्यामुळे जशी निरक्षरता वाढते त्याप्रमाणे निरक्षरतेमुळे सुद्धा दारिद्र्यात वाढ होते. म्हणून निरक्षरता हे दारिद्र्याचे जसे कारण आहे तसेच निरक्षरता दारिद्र्याचा परिणामही आहे.

**२५) दारिद्र्याचे इतर परिणाम :**

दारिद्र्याचे इतरही काही दुष्परिणाम आढळून येतात. ते थोडक्यात खालील मुद्द्यांच्या साहाय्याने स्पष्ट केले आहेत.

१) दारिद्र्यामुळे देशातील भांडवल निर्मितीचा वेग कमी होतो.

२) दारिद्र्यामुळे लोकांना लाचारीचे जीवन जगावे लागते. सावकारासमोर लाचार, दीन व्हावे लागते.

३) दारिद्र्यामुळे देशात आर्थिक विषमता वाढते.

४) मानवी भांडवलाचा (मानवी साधन संपत्तीचा) दर्जा कमी राहतो.

५) परप्रांतीयांच्या समस्या निर्माण होतात. मागास राज्यातून विकसित राज्यात गरीब मजूर मोठ्या प्रमाणात स्थलांतर करतात. त्यामुळे काही समस्या निर्माण होतात.

६) काही राजकीय पक्ष किंवा पुढारी, राजकीय पक्षांचे कार्यकर्ते लोकांच्या गरीबीचा गैरफायदा घेतात. पैसे देऊन आपल्या पार्टीला मतदान करण्यास सांगतात. त्यामुळे चांगले लोक निवडून येत नाहीत. ज्यांच्याकडे पैसा नाही ते लोक निवडणुकीला उभे राहत नाहीत. कारण मते विकत घेण्यासाठी (लोकांना पैसे वाटण्यासाठी त्यांच्याकडे पैसे नसतात.

७) भारतासारख्या देशात नक्षलवादी चळवळींचा किंवा हिंसक चळवळींचा जन्म होण्यास आणि ही चळवळ अनेक राज्यात फोफावण्यास जे विविध घटक कारणीभूत आहेत त्यामध्ये आदिवासींचे दारिद्र्य हा प्रमुख घटक कारणीभूत आहे. दारिद्र्यामुळे तेथील आदिवासींनी सरकारच्या विरोधात शस्त्र उपसले आहे.

सारांश, अशा प्रकारे दारिद्र्याचे केवळ त्या दरिद्री कुटुंबालाच दुष्परिणाम भोगावे लागत नाहीत तर त्या समाजाला, सरकारला सुद्धा दारिद्र्याचे दुष्परिणाम जाणवतात. दारिद्र्याचे आर्थिक, सामाजिक, राजकीय दुष्परिणाम उद्भवतात. दारिद्र्य ही केवळ त्या दरिद्री कुटुंबापुरती सीमित असलेली समस्या नाही तर दारिद्र्य ही सामाजिक आणि राष्ट्रीय समस्या आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात ही समस्या होतीच. पण स्वातंत्र्य मिळून पाऊण शतक पूर्ण झाले तरी दारिद्र्याची समस्या संपुष्टात आलेली नाही. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारत या समस्येशी मुकाबला करत आहे.

**दारिद्र्याच्या निराकरणासाठी उपाय :**

दारिद्र्य हा भारताच्या आर्थिक विकासाच्या मार्गातील प्रमुख अडथळा आहे. दारिद्र्यामुळे लोकांची खरेदीशक्ती आणि परिणामकारक मागणी कमी होते. दारिद्र्यामुळे आर्थिक विषमता वाढते. दारिद्र्यामुळे दरिद्री माणसाला अत्यंत भयानक दयनीय अवस्थेत जीवन जगावे लागते. भयंकर हालअपेष्टा भोगाव्या लागतात. म्हणून दारिद्र्य निर्मूलन अत्यंत आवश्यक आहे. दारिद्र्याच्या निराकरणासाठी काही उपाय खालील प्रमाणे सुचवले आहेत.

**१) भूमिहीनांना शेतजमिनीचे वाटप करणे :**

आपल्या देशात ग्रामीण भागात गरीब भूमिहीन लोकांचे प्रमाण लक्षणीय आहे. ग्रामीण भागातील भूमिहीनांच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होत आहे. विविध कारणांमुळे शेतकरी लोक मजूर आणि भूमिहीन होत आहेत. भूमिहीनांमध्ये दरिद्री लोकांचे प्रमाण मोठे आहे. त्यांच्यातील दारिद्र्य संपुष्टात आणण्यासाठी सरकारने भूमिहीन आणि बेरोजगार कुटुंबांना उपजीविकेपुरती शेतजमीन द्यावी. त्यामुळे भूमिहीनांना भेडसावणारे बेकारी, दारिद्र्य व उपासमार हे प्रश्न संपुष्टात येतील.

**२) लोकसंख्या वाढीच्या वेगावर नियंत्रण ठेवणे:**

लोकसंख्या वाढ आणि दारिद्र्य या दोन घटकात जवळचे संबंध आहेत. दारिद्र्याचा प्रश्न वाढत्या लोकसंख्येने गंभीर केला आहे. भारतात लोकसंख्या वाढीचा वेग आणि लोकसंख्येचा आकार मोठा आहे. म्हणून भारतात दारिद्र्याचा प्रश्न आजही गंभीर स्वरूपाचा आहे. दारिद्र्याच्या निर्मूलनासाठी लोकसंख्या वाढीचा वेग आटोक्यात आणला पाहिजे. गरिबांच्या लोकसंख्या वाढीचा दर घटल्याशिवाय भारतातील दारिद्र्याचे प्रमाण कमी होणार नाही.

**३) दरिद्री कुटुंबाची जबाबदारी:**

दारिद्र्य निर्मूलनात दरिद्री कुटुंबाची जबाबदारीसुद्धा खूप महत्त्वाची आहे. दरिद्री कुटुंबांनी १) कुटुंब नियोजन कार्यक्रमास सहकार्य केले पाहिजे. त्यांनी स्वतःहून एकाच अपत्यावर कुटुंब नियोजन केले पाहिजे. लग्नानंतर लगेच अपत्यांना जन्मास घालू नये. तरच लोकसंख्या वाढीचा वेग आणि दारिद्र्याचे प्रमाण कमी होऊ शकेल. २) दरिद्री कुटुंबांनी सरकारच्या दारिद्र्य निर्मूलन योजनांचे फायदे घ्यावेत. परंतु सरकारी मदतीचा दुरुपयोग करू नये. ३) बँका, बचत गटांकडून घेतलेल्या कर्जाची वेळेवर परतफेड करावी. ४) दारू, तंबाखू इत्यादी सारख्या व्यसनांपासून दरिद्री कुटुंबातील लोकांनी दूर राहिले पाहिजे. ५) आपल्या मुलाबाळांना शाळेत घालावे. त्यांचे शिक्षण अर्ध्यावर बंद करू नये.

**४) महिला सक्षमीकरणाचा वेग वाढवणे:**

भारतात महिला सक्षमीकरणासाठी शासकीय पातळीवरून विविध उपाय योजले जात आहेत. तरीही अद्याप बहुसंख्य स्त्रियांचे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय सक्षमीकरण झालेले नाही. स्त्रिया आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्याशिवाय स्त्रियांच्यामधील दारिद्र्याचे प्रमाण कमी होणार नाही. महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्यास त्यांचे सामाजिक, शैक्षणिक सक्षमीकरण सुद्धा घडून येईल. देशातील सर्व स्त्रिया स्वतःच्या पायावर उभ्या राहतील. म्हणजे त्या आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होतील. असे महिला विकास धोरण सरकारने राबवण्याची आवश्यकता आहे.

**५) कृषी पूरक व्यवसायात वाढ आवश्यक :**

सरकारने ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांना पशुपालन (शेळी, मेंढी, गाय, म्हैस इत्यादी) व्यवसायासाठी प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. तसेच कुक्कुटपालन, वराहपालन, मधमाशी पालन इत्यादी

व्यवसाय करण्यासाठी प्रोत्साहन व आर्थिक मदत द्यावी. त्यामुळे ग्रामीण भागातील गरिबांना उत्पन्नाचे साधन मिळून त्यांचे दारिद्र्य नष्ट होईल.

**६) सरकारने महागाईवर (भाववाढीवर) नियंत्रण ठेवणे आवश्यक:**

भाववाढ किंवा महागाई हेसुद्धा दारिद्र्याचे प्रमुख कारण आहे. महागाईमुळे दारिद्र्य वाढत असून सरकारने महागाईवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. काही जीवनावश्यक वस्तूंच्या किमती सतत वाढत आहेत. आधुनिक तंत्राच्या वापराने उत्पादन खर्च घटला असताना सुद्धा वस्तूंच्या किमती वाढत आहेत. त्यावर सरकारने नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**७) स्वयंसेवी/ सेवाभावी संस्थांची भूमिका :**

दारिद्र्य निर्मूलनाच्या बाबतीत सरकार बरोबर सेवाभावी संस्थासुद्धा महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. दारिद्र्य निर्मूलनास उपयुक्त ठरतील अशी गरिबांच्या कल्याणाची कामे करणाऱ्या सेवाभावी संस्थांची संख्या आपल्या देशात खूपच कमी आहे. परंतु गरिबी निर्मूलनाच्या कार्यक्रमात योगदान देणाऱ्या सेवाभावी संस्था देशात मोठ्या प्रमाणात स्थापन होणे आवश्यक आहे. अशा संस्थांच्या स्थापनेस सरकारने प्रोत्साहन द्यावे. तसेच अशा संस्थांना पुरेशी आर्थिक मदतही द्यावी. त्यामुळे सरकारच्या दारिद्र्य निर्मूलनाच्या कार्यक्रमास चांगला हातभार लागू शकेल.

**८) अदृश्य स्वरूपातील वेठबिगारीचे उच्चाटन आवश्यक:**

भारताच्या दुर्गम आदिवासी भागात आजही काही प्रमाणात अदृश्य स्वरूपात (छुप्या स्वरूपात) वेठबिगारी आढळते. हे आदिवासी मजूर आजूबाजूच्या आणि दूरवरच्या जिल्ह्यात मोठ्या बागायतदार शेतकऱ्यांकडे अल्पशा कर्जाच्या परतफेडीसाठी अनेक वर्षे काम करतात. मजुरी खूपच कमी दिली जाते. त्यातून कर्जफेड करून घेतली जाते. अनेक वर्ष कर्ज फिटत नाही. अत्यंत दारिद्र्यात त्यांना दिवस काढावे लागतात. म्हणून देशाच्या दुर्गम भागात अस्तित्वात असणारी छुप्या /अदृश्य स्वरूपातील वेठबिगारी नष्ट करणे अत्यंत आवश्यक आहे. त्याशिवाय गरीब आदिवासींची गरिबी नष्ट होणार नाही.

**९) दुष्काळ हटवण्यासाठी प्रयत्न आवश्यक:**

कोरडा किंवा सुका दुष्काळ हेसुद्धा भारतातील दारिद्र्याचे प्रमुख कारण आहे. सरकारने दुष्काळी भागाचा विकास करण्यासाठी वेगाने पावले उचलली पाहिजेत. ज्या भागात पाऊस भरपूर पडतो आणि ज्या भागात धरणात व नद्यांमध्ये भरपूर पाणी आहे अशा ठिकाणचे पाणी दुष्काळी भागात वळवल्यास दुष्काळी भागातील बेकारी आणि दारिद्र्य नष्ट होईल. तसेच दुष्काळी भागात पायाभूत सुविधात वाढ केल्यास त्या भागात रोजगारही वाढेल आणि दुष्काळी भागातून शहरात होणारे स्थलांतरही रोखले जाईल.

**१०) शेतीचा सतत विकास घडवून आणणे:**

भारतातील ग्रामीण भागातील सीमांत शेतकरी, कोरडवाहू शेतकरी, भूमिहीन मजूर ,कारागिर हे प्रामुख्याने गरीब आहेत. हे सर्व घटक शेतीशी संबंधित आहेत. शेतीची प्रगती झाल्याशिवाय शेतीवर अवलंबून असणाऱ्या या घटकांचे दारिद्र्य नष्ट होणार नाही. म्हणून सरकारने शेतीच्या विकासाला सतत

प्राधान्य दिले पाहिजे. विकसित राष्ट्रांशी तुलना करता भारतीय शेतीची उत्पादकता खूपच कमी आहे. योग्य उपाययोजना केल्यास भारतीय शेतीची उत्पादकता (पिकांची उत्पादकता) दुप्पट, तिप्पट वाढू शकते. पण त्यासाठी लागणारे भांडवल गरीब शेतकऱ्यांजवळ नाही. म्हणून सरकारने गरिबांच्या शेतीची उत्पादकता वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न केले पाहिजेत. सरकारने गरीब शेतकऱ्यांना खते, बियाणे, अवजारे, कर्ज पुरवठा इत्यादी कृषी आदानांचा पुरवठा विशेष अनुदान किंवा विशेष (जादा)सवलती देऊन करावा. शेतीच्या उत्पादनात वाढ झाल्यास सीमांत शेतकरी आणि कोरडवाहू शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होईल. शेतमजुरांनाही अधिक रोजगार आणि अधिक मजुरी मिळेल. कृषी उत्पादनात वाढ झाल्याने एकूण राष्ट्रीय उत्पादनातही वाढ होईल. थोडक्यात ग्रामीण भागातील दारिद्र्य हटविण्यासाठी कृषी विकासाला प्राधान्य दिले पाहिजे. कारण भारतात एकूण शेतकऱ्यांपैकी सीमांत शेतकऱ्यांचे, गरीब शेतकऱ्यांचे प्रमाण खूप मोठे आहे.

**११) रोजगार संधीत वाढ करणे :**

दारिद्र्य नष्ट होण्यासाठी देशात पुरेशा रोजगार संधी निर्माण झाल्या पाहिजेत. भारतातील दारिद्र्याचे प्रमुख कारण रोजगाराची वाणवा किंवा रोजगाराची कमतरता हे आहे. लोकांना वर्षभर पुरेसा आणि खात्रीचा रोजगार मिळत नाही. त्यामुळे दारिद्र्याची समस्या निर्माण होते. म्हणून दारिद्र्य हटवण्यासाठी सरकारने देशभर जास्तीत जास्त आणि पुरेशा रोजगार संधी निर्माण केल्या पाहिजेत. लोकांना खात्रीचा आणि पुरेसा रोजगार मिळाला तर दारिद्र्य हटण्यास सुरुवात होईल.

**१२) भ्रष्टाचार निपटणे आवश्यक:**

देशातील दारिद्र्य संपविण्यासाठी स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने अनेक उपाययोजना केल्या आहेत. उदाहरणार्थ विविध रोजगार योजना देशात राबवल्या जातात. परंतु या योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे, प्रामाणिकपणे होत नाही. योजनांत भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात दिसून येतो. हा भ्रष्टाचार संपुष्टात येणे आवश्यक आहे. रोजगार योजना प्रभावीपणे, प्रामाणिकपणे राबवल्या पाहिजेत. सर्व रोजगार योजना भ्रष्टाचारमुक्त असल्या पाहिजेत.

**१३) सरकारने दारूबंदी करणे आवश्यक :**

दारूसारख्या व्यसनामुळेसुद्धा दारिद्र्य ओढवते. उत्पन्नातील काही हिस्सा दारूसारख्या व्यसनावर खर्च होतो. म्हणून सरकारने दारूबंदीचा कायदा केला पाहिजे. देशातील दारूची सर्व दुकाने बंद होणे आवश्यक आहे. दारुड्या लोकांना व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना सरकारने कोणतीही मदत अथवा सवलती देऊ नयेत. दारूबंदी यशस्वी झाली तर दारिद्र्याचे प्रमाण खूपच कमी होईल.

**१४) दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमावरील खर्चात वाढ आवश्यक:**

भारतात दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण २५% ते ४० टक्के एवढे असावे. जवळजवळ ३० कोटी लोक गरीब किंवा दरिद्री आहेत. भारतात दरिद्री लोकांचे प्रमाण प्रचंड असल्याने सरकारने दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमावरील खर्चात पुरेशी वाढ करणे आवश्यक आहे.

**१५) ग्रामीण भागातील सावकारी व्यवसायावर नियंत्रण ठेवणे:**

ग्रामीण भागात खाजगी बेकायदेशीर सावकारी मोठ्या प्रमाणात चालते. विविध कारणांमुळे ग्रामीण भागातील लहान शेतकरी, शेतमजूर, कारागिर यांना सरकारकडून कर्ज काढावे लागते. परंतु सावकारांच्या कर्जावरील व्याजाचे दर सहकारी संस्था, व्यापारी बँका यांच्या व्याजाच्या दरापेक्षा जास्त आहेत. त्यामुळे सावकारी कर्ज परवडत नाही. कर्ज लवकर फिटत नाही. सावकार जमीन, गुरे-ढोरे जप्त करतो. त्यामुळे दारिद्र्याचा प्रश्न आणखी गंभीर बनतो. म्हणून ग्रामीण, शहरी भागातील खाजगी बेकायदेशीर सावकारी पूर्णतः नष्ट होणे आवश्यक आहे. लोकांनी सावकाराऐवजी बँका, सहकारी संस्था आणि राष्ट्रीयकृत बँकांकडून कर्ज घेतले पाहिजे. त्यादृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**१६) जीडीपी मध्ये सतत आणि मोठ्या प्रमाणात वाढ होणे आवश्यक:**

जीडीपी म्हणजेच स्थूल देशांतर्गत उत्पादन (Gross Domestic Product) होय. अर्थव्यवस्थेच्या प्राथमिक, द्वितीय आणि तृतीय क्षेत्रापासून राष्ट्रीय उत्पन्नात भर पडत असते. जीडीपी मध्ये (राष्ट्रीय उत्पन्नात) सतत दरवर्षी मोठ्या प्रमाणात वाढ घडून आली तर दरडोई उत्पन्नात वाढ होऊन दारिद्र्याचे प्रमाण कमी होते. म्हणून दारिद्र्य हटविण्यासाठी देशाच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनात (जीडीपी मध्ये) वाढ होणे आवश्यक आहे.

**१७) सर्वसमावेशक विकास महत्त्वाचा:**

देशातील दारिद्र्य नष्ट होण्यासाठी केवळ राष्ट्रीय उत्पन्नात (आर्थिक विकास दरात/आर्थिक वृध्दी दरात) वाढ होऊन चालत नाही. देशाचा आर्थिक विकास घडून आला म्हणजे विकासाचे लाभ गोरगरीब जनतेपर्यंत पोहोचतीलच असे नाही. भारतात हे चित्र प्रकर्षाने दिसते. म्हणून अलीकडच्या काळात भारत सरकारने नुसत्या विकासाला नव्हे तर सर्वसमावेशक विकासाला महत्त्व दिले आहे. विकासाचे फायदे जेव्हा देशातील सर्व जनतेपर्यंत पोहोचतात आणि त्यामुळे दारिद्र्य नष्ट होते अशा विकासाला सर्वसमावेशक आर्थिक विकास किंवा सर्वसमावेशक वृद्धी असे म्हणतात. म्हणून दारिद्र्य निर्मूलनासाठी सर्वसमावेशक विकास महत्त्वाचा असून सरकारने आर्थिक विकास हा सर्वसमावेशक विकास असेल याकडे लक्ष दिले पाहिजे.

**१८) औद्योगीकरणावर भर देणे आवश्यक:**

देशाच्या सर्व भागात (ग्रामीण व शहरी भागात) देशभर कारखाने स्थापन करणे (कारखान्यांचे जाळे देशभर उभारणे) म्हणजे औद्योगीकरण होय. भारतात उद्योगांचे केंद्रीकरण झाले आहे. ग्रामीण भागात आणि मागासलेल्या राज्यात कारखाने कमी आहेत. मोठ्या शहरात आणि मुठभर राज्यातच कारखाने दिसून येतात. म्हणून सरकारने औद्योगिक विकासाबरोबर औद्योगीकरणावर (उद्योगांच्या विकेंद्रीकरणावर) भर देणे आवश्यक आहे. त्यामुळे दारिद्र्य आणि बेकारी यामध्ये घट होण्यास मदत होईल.

**१९) ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांमधील गुंतवणुकीत वाढ आवश्यक:**

भारतात ग्रामीण भागात दारिद्र्याची समस्या गंभीर आहे. भारतातील ग्रामीण भागातील दारिद्र्य हटविण्यासाठी सरकारने ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांवरील खर्चात वाढ करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात अद्यापही पायाभूत सुविधांची वाणवा आहे. पायाभूत सुविधांची (रस्ते वीज आरोग्य इत्यादी) कमतरता कमी करण्यासाठी सरकारने ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांमधील गुंतवणुकीत मोठी वाढ करणे आवश्यक आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांना उत्पन्नाचे आणि रोजगाराचे साधन मिळून त्यांचे दारिद्र्य कमी होईल.

**२०) सरकारने जात न बघता मदत करणे :**

भारतात जात बघून सरकारी सवलती दिल्या जातात. त्यामुळे ज्या जातीच्या लोकांना सरकारी मदत मिळत नाही किंवा ज्या जातीच्या लोकांना आरक्षणासारखी सवलत मिळत नाही त्या जातीत दारिद्र्य व बेकाराचे प्रमाण वाढत चालले आहे. महाराष्ट्रात मराठा, वाणी, लिंगायत, ब्राह्मण जातीत दारिद्र्य दिसून येते. महाराष्ट्रात आत्महत्या केलेल्या एकूण शेतकऱ्यांमध्ये मराठा शेतकऱ्यांचे प्रमाण ९०% पेक्षा जास्त आहे. म्हणून दारिद्र्य नष्ट करण्यासाठी जात हा निकष अन्यायकारक आहे. मनुष्याची जात कोणतीही असो प्रत्येक मनुष्याला सरकारने मदत केली पाहिजे. जात न बघता मनुष्याची अडचण किंवा गरज बघून सरकारने मदत केली पाहिजे. तरच खुल्या प्रवर्गातील लोकांचे दारिद्र्य नष्ट होण्यास मदत होईल.

**सारांश**

महागाई, बेकारी भांडवलाची टंचाई, औद्योगिकरणाचा मंद वेग, वाढती लोकसंख्या, आर्थिक विषमता इत्यादी कारणामुळे भारतात दारिद्र्याची समस्या निर्माण झाली आहे. दारिद्र्यामुळे आर्थिक विकासात अडथळे निर्माण झाले असून दारिद्र्याचे निर्मूलन केल्याशिवाय देशाचा आर्थिक विकास वेगाने वाढणार नाही. भारतातील प्रचंड दारिद्र्य भारताच्या महासत्ता बनण्यातील मोठा अडथळा ठरला आहे. देशातील २५ ते ४० टक्के लोक अत्यंत हलाखीचे जीवन जगत असतील तर ते निश्चितच देशाला भूषणावह नाही.

**दारिद्र्य निर्मूलनासाठी भारत सरकारने योजलेले उपाय**

स्वातंत्र्यपूर्वकाळात सुद्धा किंवा ब्रिटिश राजवटीत दारिद्र्यचा प्रश्न अस्तित्वात होता. ब्रिटिशांची जुलमी राजवट हेसुद्धा भारतातील दारिद्र्याचे कारण आहे. कारण ब्रिटिशांनी भारतातील खेड्यापाड्यातील लहान उद्योग, ग्रामोद्योग किंवा घरच्या घरी चालवले जाणारे कुटिर उद्योग बंद पाडले. त्यामुळे ब्रिटिश राजवटीत दारिद्र्य आणि बेकारीचा प्रश्न फारच गंभीर बनला होता. म्हणून स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने दारिद्र्य निर्मूलन कार्याकडे अधिक लक्ष दिले. भारताच्या प्रत्येक पंचवार्षिक योजनेत दारिद्र्य निर्मूलनासाठी सरकारने आर्थिक तरतूद केल्याचे दिसते. प्रत्येक पंचवार्षिक योजनेत दारिद्र्य निर्मूलनावरील खर्चात सरकारने वाढ केली आहे. दारिद्र्य निर्मूलनाच्या बाबतीत सरकार गंभीर असल्याचे दिसते. कारण ३० ते ४० कोटी लोक

दारिद्र्यरेषेखाली असणे ही बाब चांगली नाही. याची सरकारला जाणीव आहे. दारिद्र्य निर्मूलनासाठी सरकारने योजलेल्या उपायांची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे दिली आहे.

**१) लोकसंख्या नियंत्रणाचे उपाय** – कुटुंब नियोजन, कुटुंब कल्याण कार्यक्रमाची अंमलबजावणी १९५१ पासून चालू आहे. लोकसंख्या धोरण आखून त्याची अंमलबजावणी सरकार करत आहे.

**२) शिक्षणाचा प्रसार** – देशभर प्राथमिक शाळा सरकारने उघडल्या आहेत. पहिली ते सातवीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण सरकारने सक्तीचे आणि मोफत केले आहे. माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालयीन शिक्षणाची सुविधा सरकारने केली आहे. यांत्रिक, तांत्रिक, कौशल्याधारित शिक्षणाला सरकार प्रोत्साहन देत आहे. गरीबांना हे शिक्षण मोफत, कमी फी मध्ये दिले जात आहे.

**३) अन्नसुरक्षितता कायदा** – या कायद्याने मोफत व अल्प किमतीला अन्नधान्य सरकारकडून दिले जाते. देशातील कोट्यावधी लोक त्याचा लाभ घेत आहेत.

**४) सूक्ष्म व लहान उपक्रमांचा विकास** – लघु व कुटीर उद्योग, ग्रामीण भागातील छोटे छोटे उद्योग यांच्या विकासाकडे स्वातंत्र्य मिळाल्यापासून सरकार विशेष लक्ष देत आहे.

**५) सार्वजनिक वितरण व्यवस्थेची उभारणी –** भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारत सरकारने अन्नधान्य व इतर वस्तूंची स्वस्त (माफक) किमतीला विक्री करण्यासाठी सरकारने देशात मजबूत अशी सार्वजनिक वितरण व्यवस्थेची उभारणी केली आहे. सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानांमार्फत गरिबांना धान्य वाटप केले जाते.

**६) किमान वेतन कायदा –** सरकारने हा कायदा १९४८ साली केला आहे. सरकार किमान वेतन ठरवते. त्यात वेळोवेळी बदल करते. सरकारने ठरवून दिलेल्या वेतनापेक्षा कमी वेतन देता येत नाही.

**७) पडीक जमिनींचे वाटप** – सरकार आपल्या मालकीची पडीक जमीन शेती करण्यासाठी गरिबांना देत असते. लाखो गरीबांनी आत्तापर्यंत या योजनेचा लाभ घेतला आहे.

**८) सर्वसमावेशक वृद्धीचे धोरण –** आर्थिक विकासाचे फायदे देशातील सर्व जनतेपर्यंत पोहोचवणे म्हणजे सर्वसमावेशक वृद्धीचे धोरण होय. अकराव्या पंचवार्षिक योजनेत सरकारने सर्वसमावेशक वृद्धीला महत्त्व दिले होते. सरकार विकासाबरोबर (आर्थिक विकास वाढीच्या दरात वाढ घडवून आणण्याबरोबरच) सर्वसमावेशक विकासालाही आता प्राधान्य देत आहे.

**९) जमीन सुधारणा कार्यक्रम –** भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सरकारने जमीन सुधारणा कार्यक्रम हाती घेतला. दारिद्र्य निर्मूलन हा सुद्धा उद्देश त्यामागे होता. सरकारने १९४८ मध्ये जमीन सुधारणा कायदे केले. त्यानुसार मूळ कायदे करून जमीन असणाऱ्या कुळांना जमिनीचे मालकी हक्क दिले. कमाल जमीन धारणा कायदा करून गरिबांना दिलासा दिला.

**१०) सामाजिक सुरक्षितता योजनांची अंमलबजावणी** – सरकारने गरिबांना दिलासा व मदत देण्यासाठी देशात सामाजिक सुरक्षितता योजनांची अंमलबजावणी केली आहे. विमा योजना, भविष्य निर्वाह निधी योजना, निवृत्ती वेतन योजना, मोफत औषधे व आरोग्य सुविधा इत्यादी योजना सरकार राबवत आहे.

**११) आरोग्यावर भर** – गरिबांचे आरोग्य चांगले राहावे आणि त्यांना मोफत औषध उपचार मिळावेत यासाठी सरकारने गावोगावी प्राथमिक आरोग्य केंद्रे काढली आहेत. कुटिर रुग्णालये, जिल्हा रुग्णालये उघडली आहेत. या ठिकाणी गरिबांना मोफत औषधोपचार दिला जातो.

**१२) महिला सक्षमीकरणावर भर** – स्वातंत्र्यप्राप्तीपासूनच सरकारने महिलांच्या सक्षमीकरणावर भर दिला आहे. सरकारने महिला आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केली आहे. सरकार महिलांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय सक्षमीकरणावर भर देत आहे.

**१३) आर्थिक विषमता कमी करण्यावर भर** – वाढती आर्थिक विषमता हेसुद्धा भारतातील दारिद्र्याचे प्रमुख कारण आहे. म्हणून दारिद्र्याचे प्रमाण कमी करण्यासाठी सरकारने आर्थिक विषमता कमी करण्यावर भर दिला आहे. श्रीमंत लोकांच्या उत्पन्नावर सरकारने ३० टक्के एवढा आयकर बसवला आहे. श्रीमंताची श्रीमंती कमी करण्याचा प्रयत्न सरकार करत आहे.

**१४) दारिद्र्य निर्मूलनासाठी व रोजगार वृद्धीसाठी योजना** – सरकारने देशातील दारिद्र्य नष्ट करण्यासाठी व बेरोजगारी नाहीशी करण्यासाठी खालील उपाय (योजना) सुरू करून त्याची अंमलबजावणी केली आहे.

१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना

२) 'गरीब हटाव' २० कलमी कार्यक्रम (पंतप्रधान इंदिरा गांधी)

३) पाणीपुरवठा योजना

४) महिला समृद्धी योजना (महिलांचे बचत गट स्थापन करण्यास प्रोत्साहन व मदत)

५) किमान गरजा कार्यक्रम

६) अंत्योदय अन्न योजना

७) घरकुल योजना (इंदिरा आवास, वाल्मिकी आवास इत्यादी )

८) ग्रामीण भूमिहीन मजूर रोजगार हमी कार्यक्रम (१५ ऑगस्ट १९८३)

९) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम १९७८-७९

१०) रोजगार हमी योजना (१९७२, महाराष्ट्र शासन)

११) ट्रायसेम आणि ग्रामीण युवा स्वयंरोजगार प्रशिक्षण कार्यक्रम १९७९.

१२) जवाहर रोजगार योजना आणि जवाहर ग्राम समृद्धी योजना, फेब्रुवारी १९८९

१३) संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना– सप्टेंबर २०११

१४) स्वर्ण जयंती  शहरी रोजगार योजना – २ डिसेंबर १९९७

१५) पंतप्रधान रोजगार योजना

१६) संजय गांधी निराधार अनुदान योजना

१७) श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना

१८) इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ योजना

१९) अवर्षण प्रवणक्षेत्र कार्यक्रम

२०) वाळवंटी क्षेत्र विकास कार्यक्रम

२१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प

२२) दशलक्ष विहीर योजना

२३) पंतप्रधान ग्रामीण सडक योजना

२४) स्वर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना

२५) एकात्मिक बाल विकास कार्यक्रम

२६) प्रधानमंत्री ग्रामोदय योजना

२७) माध्यान्न भोजन कार्यक्रम

२८) ग्रामीण युवकांना प्रशिक्षण कार्यक्रम

**सारांश**

अशा प्रकारे दारिद्र्य निर्मूलनासाठी सरकारने वरील प्रमाणे विविध योजना आखून त्यांची अंमलबजावणी देशात सुरू केली आहे. दारिद्र्य हटविण्यासाठी सरकार स्वातंत्र्यप्राप्तीपासूनच प्रयत्न करत आहे. परंतु फारच धिम्या गतीने दारिद्र्य हटत आहे. त्याला काही घटक कारणीभूत आहेत. उदाहरणार्थ अद्यापही दरिद्री  कुटुंबांचा आकार मोठा आहे. लोकसंख्येत दरवर्षी कोट्यावधी लोकाची भर पडत आहे. त्यामुळे दारिद्र्य हटविण्यात सरकारला फार कमी यश येत आहे. सरकारला लोकसंख्या नियंत्रणाच्या कामी जनतेचे फारसे सहकार्य मिळत नाही. त्यामुळे दारिद्र्याचे प्रमाण हळू वेगाने घटत आहे. केंद्र सरकार आणि विविध घटक राज्ये यांनी दारिद्र्य निर्मूलनासाठी योजलेले उपाय, कार्यक्रम आणि  योजना अत्यंत चांगल्या आहेत. परंतु गरीब जनतेने सरकारला सहकार्य करण्याची आवश्यकता आहे.

## ३.२.२  भारतातील बेकारी : कारणे, परिणाम आणि उपाय

**प्रास्ताविक**

भारतीय अर्थव्यवस्थेला भेडसावणाऱ्या अनेक समस्यांपैकी बेकारीची समस्या ही अत्यंत उग्र समस्या असून बेकारीचा प्रश्न भारतात दिवसेंदिवस गंभीरच बनत चालला आहे. काम करण्याची तयारी असूनही

देशातील कोट्यावधी लोकांना काम मिळत नाही. देशात रोजगाराची मोठी चणचण जाणवते. रोजगाराची कमतरता किंवा बेरोजगारी ही केवळ त्या बेरोजगार व्यक्तीशी संबंधित समस्या नसून ती सामाजिक, राष्ट्रीय समस्या असते. कारण बेरोजगारीचे परिणाम केवळ त्या बेरोजगार व्यक्तीला भोगावे लागत नाहीत. संपूर्ण समाजाला बेकारीचे परिणाम भोगावे लागतात. देशात बेरोजगार व्यक्तींची संख्या मोठी असेल तर बेकारीचे परिणाम संपूर्ण अर्थव्यवस्थेवर होत असतात. भारतातही बेकारीची समस्या प्रचंड असल्याने आणि बेकारीचे अनेक आर्थिक, सामाजिक, राजकीय दुष्परिणाम दिसून येत असल्याने बेकारीने भारतीय अर्थव्यवस्थेवर फार मोठे आव्हान उभे केले आहे.

**रोजगार म्हणजे काय?**

जन्माला आलेल्या प्रत्येक नागरिकाला जगण्याचा अधिकार आहे. त्याला चांगले जीवन जगता यावे यासाठी त्याच्या पात्रतेप्रमाणे रोजगार किंवा कामाची संधी मिळाली पाहिजे. जेंव्हा व्यक्तीला त्याच्या कुवतीनुसार किंवा पात्रतेनुसार काम मिळते तेव्हा त्यास रोजगार असे म्हणतात. देशातील प्रत्येक व्यक्तीला (१५ ते ६० या वयोगटातील व्यक्तींना) काम देणे ही सरकारची जबाबदारी असते. भारताच्या राज्यघटनेत मार्गदर्शक तत्वामध्ये देशातील प्रत्येक व्यक्तीला रोजगार देण्याची जबाबदारी सरकारची आहे असे नमूद करण्यात आले आहे. परंतु सरकारला ही जबाबदारी पार पाडता येत नसल्याने स्वातंत्र्यप्राप्तीपासून आजअखेर भारताला/ भारतातील जनतेला बेकारीची समस्या भेडसावत आहे.

**बेरोजगारी म्हणजे काय?**

ज्या व्यक्तींना काम करण्याची इच्छा असते, परंतु काम शोधूनही काम मिळत नाही त्या व्यक्तींना बेरोजगार व्यक्ती असे म्हणतात. बेरोजगारीची एक सर्वसाधारण व्याख्या खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहे.

''शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सुदृढ (सक्षम) असूनही आणि प्रचलित वेतनदारावर काम करण्याची तयारी असूनही लोकांना जेंव्हा काम मिळत नाही, तेव्हा त्या स्थितीला बेरोजगारी असे म्हणतात.''

बेरोजगार व्यक्तीमध्ये बालकांचा आणि वृद्धांचा समावेश केला जात नाही. १५ ते ६० या वयोगटातील ज्या लोकांना इच्छा व पात्रता असूनही रोजगार मिळत नाही, त्यांचा समावेश बेरोजगार व्यक्तींमध्ये केला जातो. परंतु या वयोगटातील शिक्षण घेणारे विद्यार्थी, आळशी आणि प्रचलित वेतनापेक्षा जास्त वेतनाची मागणी करणारे व्यक्ती यांचा समावेश बेरोजगारांमध्ये केला जात नाही.

**भारतातील बेकारीची स्थिती:**

बेरोजगारीचा प्रश्न भारताला स्वातंत्र्यपूर्व काळापासून भेडसावत आहे. ब्रिटिश राजवटीत सुद्धा बेकारीची समस्या अस्तित्वात होती. ब्रिटनहून पक्का माल आणून तो भारतात विकण्याचे धोरण ब्रिटिश सरकारने स्वीकारल्यामुळे भारतातील ग्रामोद्योग बंद पडून भारतात दारिद्र्य आणि बेकारीची समस्या निर्माण झाली. भारतात लोकसंख्या प्रचंड वेगाने वाढत असल्याने स्वातंत्र्योत्तर काळातही सरकारला बेकारीचा प्रश्न सोडवता आलेला नाही. सन १९५१ मध्ये भारतातील बेरोजगारांची संख्या २५ लक्ष एवढी होती. १९७१ मध्ये देशात

एक कोटी ८७ लाख लोक बेकार होते. १९९७ मध्ये उघड किंवा खुल्या बेरोजगार व्यक्तींची संख्या देशात ३ कोटी ९० लाख एवढी होती. तर छुप्या बेकारांची संख्या जवळजवळ तेवढीच होती. २०२१-२२ मध्ये ३३.४ दशलक्ष लोक बेरोजगार होते.

**कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांचे प्रमाण**

खालील तक्ता क्रमांक एक मध्ये भारतातील किती टक्के श्रमिक अर्थव्यवस्थेच्या कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्रात काम करतात याची माहिती दिली आहे. ही माहिती सन २००८ ते २०२१ या काळातील आहे.

**तक्ता क्रमांक १: कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांचे प्रमाण :**

| अ.क्र. | वर्ष | विविध आर्थिक क्षेत्रे आणि त्यात काम करणाऱ्या श्रमिकांचे प्रमाण | | |
|---|---|---|---|---|
| | | कृषी (%) | (उद्योग) % | सेवा (%) |
| १ | २००८ | ५३.०९ | २०.९३ | २५.९४ |
| २ | २००९ | ५२.१२ | २१.६१ | २६.२७ |
| ३ | २०१० | ५१.०६ | २२.३८ | २६.५७ |
| ४ | २०११ | ४८.९६ | २३.५२ | २७.५२ |
| ५ | २०१२ | ४७.०० | २४.३६ | २८.६४ |
| ६ | २०१३ | ४६.०६ | २४.३६ | २९.०४ |
| ७ | २०१४ | ४६.०७ | २४.३८ | २९.५५ |
| ८ | २०१५ | ४५.५६ | २४.३४ | ३०.१७ |
| ९ | २०१६ | ४५.१२ | २४.२९ | ३०.५९ |
| १० | २०१७ | ४४.५२ | २४.४७ | ३१.०१ |
| ११ | २०१८ | ४३.८६ | २४.६९ | ३१.४५ |
| १२ | २०१९ | ४२.५० | २५.२० | ३२.४० |
| १३ | २०२० | ४५.६० | २३.७० | ३०.८० |
| १४ | २०२१ | १४.६० | १७.४० | ५२.२० |

स्रोत: https : // www.statista.com/statistics.

वरील तक्ता क्रमांक १ वरून असे दिसते की, सन २०२१ मध्ये भारतातील एकूण श्रमशक्तीपैकी १४.६०% श्रमिक कृषी क्षेत्रात काम करत होते. १७.४०% श्रमिक उद्योग क्षेत्रात काम करत होते आणि ५२.२०% श्रमिक सेवा क्षेत्रात काम करत होते. सन २००८ मध्ये कृषी क्षेत्रात काम करणाऱ्यांचे प्रमाण ५३.९% एवढे होते. २००८ च्या तुलनेत २०२१ मध्ये कृषी क्षेत्रात काम करणाऱ्यांचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून येते. सन २०२१ मध्ये उद्योग क्षेत्रात काम करणाऱ्यांचे प्रमाण १७.४०% होते. २००८ मध्ये हे प्रमाण २०.९३% एवढे होते. २००८ च्या तुलनेत २०२१ मध्ये उद्योग क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांचे प्रमाण कमी

झाल्याचे दिसते. सन २००८ मध्ये सेवा क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांचे प्रमाण २५.९४% होते. २०२१ मध्ये हे प्रमाण ५२.२०% एवढे म्हणजे जवळजवळ दुपटीने वाढल्याचे दिसते.

**भारतातील पुरुष आणि स्त्री रोजगारांचे प्रमाण**

खालील तक्ता क्रमांक २ मध्ये भारतातील विविध वर्षातील पुरुष आणि स्त्री रोजगाराचे प्रमाण दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक २: भारतातील पुरुष आणि स्त्री रोजगारांचे प्रमाण**

| अ.क्र. | वर्ष / फेरी | रोजगाराची स्थिती | | |
|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | एकूण |
| १ | १९७७-७८ (३२ वी फेरी) | ५४.३ | २९.७ | ४२.३ |
| २ | १९८३-८४ (३८ वी फेरी) | ५३.८ | २९.६ | ४२.० |
| ३ | १९८७-८८ (४३ वी फेरी) | ५३.१ | २८.५ | ४१.२ |
| ४ | १९९३-९४ (५० वी फेरी) | ५४.५ | २५.६ | ४२.० |
| ५ | १९९९-२००० (५६ वी फेरी) | ५२.७ | २५.९ | ३९.७ |
| ६ | २००४-०५ (६१ वी फेरी) | ५४.७ | २८.७ | ४२.० |
| ७ | २००७-०८ (६५ वी फेरी) | ५५.० | २४.६ | ३८.८ |
| ८ | २००९-१० (६६ वी फेरी) | ५४.६ | २२.८ | ३९.२ |
| ९ | २०११-१२ (६८ वी फेरी) | ५४.४ | २१.९ | ३८.६ |
| १० | २०१७-१८ (७४ वी फेरी) | ५२.१ | १६.५ | ३४.७ |
| ११ | २०१८-१९ (७५ वी फेरी) | ५२.३ | १७.६ | ३५.३ |
| १२ | २०१९-२० (७६ वी फेरी) | ५३.९ | २१.८ | ३८.२ |
| १३ | २०२०-२१ (७७ वी फेरी) | ५४.९ | २४.२ | ३९.८ |

स्त्रोत: भांडवलकर आर.बी.(डॉ.) 'भारतातील रोजगार प्रश्न : स्वरूप आणि समस्या' (अध्यक्षीय भाषण) मराठी अर्थशास्त्र परिषद, ४५ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन, नोव्हेंबर २०२२ पृ. क्र २८

वरील तक्ता क्रमांक २ वरून पुरुष रोजगारापेक्षा स्त्री रोजगाराचे प्रमाण कमी असल्याचे दिसते. २०२०-२१ मध्ये पुरुष रोजगाराचे प्रमाण ५४.९% एवढे आहे. तर स्त्री रोजगाराचे प्रमाण २४.२% एवढे आहे. २०१७-१८ च्या तुलनेत २०१८-१९, २०१९- २० आणि २०२०-२१ मध्ये स्त्री रोजगाराचे प्रमाण वाढत गेल्याचे दिसते. २०१७-१८ मध्ये स्त्री रोजगाराचे प्रमाण १६.५% होते. २०१८-१९ मध्ये ते १७.६%, २०१९-२० मध्ये २१.८% आणि २०२०-२१ मध्ये ते २४.२% असे रोजगाराचे प्रमाण वाढत गेल्याचे दिसते. २०१७-१८ च्या तुलनेत २०१८-१९, २०१९-२० आणि २०२०-२१ मध्ये पुरुष रोजगाराचे प्रमाण सुद्धा ५२.१% वरून ५२.३%, ५३.९% आणि ५४.९% एवढे वाढल्याचे दिसते.

**भारतातील ग्रामीण–शहरी रोजगारांचे प्रमाण**

खालील तक्ता क्रमांक ३ मध्ये भारतातील विविध वर्षातील ग्रामीण– शहरी रोजगाराचे प्रमाण दर्शविलेले आहे.

**तक्ता क्रमांक ३ भारतातील ग्रामीण– शहरी रोजगाराचे प्रमाण**

| अ.क्र. | वर्ष / फेरी | रोजगाराची स्थिती | |
|---|---|---|---|
| | | ग्रामीण | शहरी |
| १ | १९७७–७८ (३२ वी फेरी) | ४४.६ | ३४.१ |
| २ | १९८३–८४ (३८ वी फेरी) | ४४.५ | ३४.० |
| ३ | १९८७–८८ (४३ वी फेरी) | ४३.४ | ३३.७ |
| ४ | १९९३–९४ (५० वी फेरी) | ४४.४ | ३४.७ |
| ५ | १९९९–२००० (५६ वी फेरी) | ४१.७ | ३३.७ |
| ६ | २००४–०५ (६१ वी फेरी) | ४३.९ | ३६.५ |
| ७ | २००७–०८ (६५ वी फेरी) | ४१.८ | ३५.८ |
| ८ | २००९–१० (६६ वी फेरी) | ४०.८ | ३५.० |
| ९ | २०११–१२ (६८ वी फेरी) | ३९.९ | ३५.५ |
| १० | २०१७–१८ (७४ वी फेरी) | ३५.० | ३३.९ |
| ११ | २०१८–१९ (७५ वी फेरी) | ३५.८ | ३४.१ |
| १२ | २०१९–२० (७६ वी फेरी) | ३९.२ | ३५.९ |
| १३ | २०२०–२१ (७७ वी फेरी) | ४१.३ | ३६.३ |

स्रोत : तक्ता क्र.२ प्रमाणे पृ.क्र.२८

वरील तक्ता क्रमांक ३ वरून असे दिसते की, भारतात ग्रामीण रोजगारापेक्षा शहरी रोजगाराचे प्रमाण कमी आहे. २०२०–२१ मध्ये भारतात ग्रामीण रोजगाराचे प्रमाण ४१.३% होते. तर शहरी रोजगाराचे प्रमाण ३६.३% एवढे होते. २०१७–१८ च्या तुलनेत २०१८–१९, २०१९–२० आणि २०२०–२१ मध्ये ग्रामीण आणि शहरी रोजगाराचे प्रमाण वाढत गेल्याचे दिसते. २०१७–१८ मध्ये ग्रामीण रोजगाराचे प्रमाण ३५ टक्के होते. २०१८–१९ मध्ये हे प्रमाण ३५.८%, २०१९–२० मध्ये ३९.२% आणि २०२०–२१ मध्ये हे प्रमाण ४३.३% एवढे वाढल्याचे दिसते. २०१७–१८ मध्ये शहरी रोजगाराचे प्रमाण ३३.९% होते. ते २०१८–१९ मध्ये ३४.१%, २०१९–२० मध्ये ३५.९% आणि २०२०–२१ मध्ये ३६.३% एवढे वाढल्याचे दिसते.

**भारतातील श्रमशक्ती आणि बेरोजगारीचा दर**

खालील तक्ता क्रमांक चार मध्ये भारतातील श्रमशक्ती आणि बेरोजगारीच्या दराची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक ४ भारतातील श्रमशक्ती आणि बेरोजगारीचा दर**

| अ.क्र. | वर्ष | श्रमशक्ती(कोटीमध्ये) | बेरोजगारीचा दर(%) |
|---|---|---|---|
| १ | १९९१ | ३३.७० | ५.६० |
| २ | १९९३ | ३५.३० | ५.६९ |
| ३ | १९९५ | ३६.८० | ५.७६ |
| ४ | १९९७ | ३८.३० | ५.६१ |
| ५ | १९९९ | ३९.९० | ५.७४ |
| ६ | २००१ | ४१.९० | ५.५८ |
| ७ | २००३ | ४२.०० | ५.६४ |
| ८ | २००५ | ४६.८० | ५.६१ |
| ९ | २००७ | ४७.०० | ५.५७ |
| १० | २००९ | ४७.१० | ५.५४ |
| ११ | २०११ | ४७.५० | ५.४३ |
| १२ | २०१३ | ४८.८० | ५.४२ |
| १३ | २०१४ | ४९.७० | ५.४४ |
| १४ | २०१५ | ५३.७० | ५.४४ |
| १५ | २०१६ | ५०.५० | ५.४२ |
| १६ | २०१७ | ५०.३० | ५.३६ |
| १७ | २०१८ | ५०.९७ | ५.३३ |
| १८ | २०१९ | ५१.८२ | ५.२७ |
| १९ | २०२० | ५६.३४ | ८.०० |
| २० | २०२१ | ५७.१४ | ४.९८ |

स्रोत : तक्ता क्रमांक २ प्रमाणे ( पृ.क्र. ३०)

वरील तक्ता क्रमांक चार वरून असे दिसते की, १९९९ पासून २०२१ पर्यंत सतत श्रमशक्तीत वाढ होत आहे. १९९१ मध्ये भारतात ३३.७० कोटी श्रमिक होते. २०२१ मध्ये श्रमिकांची संख्या ५७.१४ कोटी एवढी होती. १९९१ मध्ये बेरोजगारीचा दर ५.६० टक्के होता. तो २०२१ मध्ये ४.९८% एवढा कमी झाल्याचे दिसते. २०२० मध्ये बेरोजगारीचा दर ८.०० टक्के एवढा होता. तो २०२१ मध्ये ४.९८% एवढा कमी झाल्याचे दिसते.

**रोजगाराच्या वर्गवारीनुसार रोजगाराचे प्रमाण**

खालील तक्ता क्रमांक पाच मध्ये रोजगाराच्या वर्गवारीनुसार भारतातील रोजगाराचे प्रमाण दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक ५ – रोजगाराच्या वर्गवारीनुसार रोजगाराचे प्रमाण (२०२०–२१)**

| अ.क्र. | रोजगाराची वर्गवारी | ग्रामीण | शहरी |
|---|---|---|---|
| १. | स्वयंरोजगार | ५७.८ | ३८.३ |
| २. | नियमित मजुरी मिळणारे | १३.१ | ४७.० |
| ३. | प्रासंगिक कामगार | २९.१ | १४.७ |
| | **एकूण** | **१००** | **१००** |

स्त्रोत: तक्ता क्रमांक दोन प्रमाणे (पृष्ठ क्र. ३१)

वरील तक्ता क्रमांक पाच वरून असे दिसते की, सन २०२०–२१ मध्ये ग्रामीण भागात स्वयंरोजगाराचे प्रमाण ५७.८% होते. शहरी भागात स्वयंरोजगार करणाऱ्यांचे प्रमाण ३८.३% होते. ग्रामीण भागात नियमित मजुरी मिळालेल्यांचे प्रमाण १३.१% होते. तर शहरी भागात हे प्रमाण ४७% होते. ग्रामीण भागातील प्रासंगिक कामगारांचे प्रमाण २९.१% होते. तर शहरातील प्रासंगिक कामगारांचे प्रमाण १४.७ टक्के होते.

**भारतातील सरकारी विभागातील वर्षनिहाय रिक्त पदांची संख्या**

खालील तक्ता क्रमांक आठ मध्ये भारतातील विविध सरकारी विभागातील वर्षनिहाय रिक्त पदांची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक ८ : भारतातील सरकारी विभागातील वर्षनिहाय रिक्त पदांची संख्या**

| अ.क्र. | वर्ष | रिक्त पदांची संख्या |
|---|---|---|
| १ | २०१४–१५ | ४,२१,६५८ |
| २ | २०१५–१६ | ४,२०,५४७ |
| ३ | २०१६–१७ | ४,१२,७५२ |
| ४ | २०१७–१८ | ६,८३,८२३ |
| ५ | २०१८–१९ | ९,१०,१५३ |
| ६ | २०१९–२० | ८,६७,३०२ |
| ७ | २०२०–२१ | ९,७९,३२७ |

स्त्रोत : तक्ता क्र. २ प्रमाणे (पृ.क्र. ३२)

वरील तक्ता क्रमांक आठ वरून असे दिसते की, एखादा अपवाद वगळता सन २०१४–१५ पासून सरकारी रिक्त पदांच्या संख्येत वाढ होत गेल्याचे दिसते. सन २०१४–१५ मध्ये रिक्त पदांची संख्या ४२१६५८

एवढी होती. २०२०-२१ मध्ये ही संख्या ९७९३२७ एवढी वाढल्याचे दिसते. नोकर भरती न करण्याचे सरकारचे धोरण याला कारणीभूत आहे.

**भारतातील स्त्री-पुरुष बेरोजगारीचा दर**

खालील तक्ता क्रमांक नऊ मध्ये भारतातील स्त्री-पुरुष बेरोजगारीच्या दराची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक ९ भारतातील स्त्री-पुरुष बेरोजगारीचा दर**

| अ.क्र. | वर्ष | स्त्री बेरोजगारीचा दर (Unemployment rate among females) | पुरुष बेरोजगारीचा दर (Unemployment rate among males) | एकत्रित |
|---|---|---|---|---|
| १ | २०२१ | ३.४ % | ४.५ % | ४.२ % |
| २ | २०२२ | ३.३ % | ३.७ % | ३.६ % |
| ३ | २०२३ | ३ % | ३.२ % | ३.१ % |

स्त्रोत : इंटरनेट

वरील तक्ता क्रमांक नऊवरून असे दिसते की, भारतातील बेरोजगारीचा दर सन २०२१ साली ४.२% होता. २०२२ साली तो ३.६% आणि २०२३ साली तो ३.१% एवढा घटला आहे. सन २०२१ च्या तुलनेत २०२२ आणि २०२३ मध्ये स्त्री आणि पुरुष बेरोजगारीचा दर घटत गेल्याचे दिसते. सन २०२१ मध्ये स्त्री बेरोजगारीचा दर ३.४% होता. २०२२ मध्ये ३.३% होता आणि २०२३ मध्ये तो ३ टक्के एवढा होता. सन २०२१ मध्ये पुरुष बेरोजगारीचा दर ४.५% होता. २०२२ मध्ये ३.७% आणि २०२३ मध्ये तो ३.२% एवढा होता.

**भारतातील ग्रामीण आणि शहरी बेकारीचा दर**

खालील तक्ता क्रमांक १० मध्ये भारतातील ग्रामीण आणि शहरी बेकारीचा दर दर्शविला आहे.

**तक्ता क्रमांक १०- भारतातील ग्रामीण आणि शहरी बेकारीचा दर**

| अ.क्र. | वर्ष | बेकारीचा दर (%) | |
|---|---|---|---|
| | | ग्रामीण | शहरी |
| १ | २०२१ | ३.३ % | ६.५ % |
| २ | २०२२ | २.८ % | ५.९ % |
| ३ | २०२३ | २.४ % | ५.२ % |

(स्त्रोत : इंटरनेट)

वरील तक्ता क्रमांक दहा वरून असे दिसते की, ग्रामीण बेकारी दरापेक्षा शहरी बेकारीचा दर जास्त आहे. २०२३ मध्ये ग्रामीण बेकारीचा दर २.४% होता. तर शहरी बेकारीचा दर हा ५.२% होता. तसेच वरील तक्त्यावरून असे दिसते की, सन २०२१ च्या तुलनेत २०२२ मध्ये आणि २०२३ मध्ये ग्रामीण आणि शहरी बेकारीचा दर घटलेला आहे. सन २०२१ मध्ये ग्रामीण बेकारीचा दर ३.३१ टक्के होता. २०२२ मध्ये तो २.८% झाला तर २०२३ मध्ये तो २.४ टक्के एवढा कमी झाला आहे. सन २०२१ मध्ये शहरी बेकारीचा दर ६.५% होता. २०२२ मध्ये तो ५.९% एवढा घटला तर २०२३ मध्ये तो ५.२% एवढा कमी झाला.

**भारतातील बेरोजगारांची संख्या**

खालील तक्ता क्रमांक ११ मध्ये भारतातील कामगारांची संख्या, एकूण रोजगार आणि बेरोजगारांची संख्या दर्शविली आहे.

| अ.क्र. | घटक | २०१९-२० | २०२१-२२ |
|---|---|---|---|
| १. | कामगार संख्या | ४४१.८ दशलक्ष | ४३५.२ दशलक्ष |
| २. | एकूण रोजगार | ४०८.९ दशलक्ष | ४०१.८ दशलक्ष |
| ३. | बेरोजगारी | ३२.९ दशलक्ष | ३३.४ दशलक्ष |

(स्त्रोत : इंटरनेट)

वरील तक्ता क्रमांक ११ वरून असेल दिसते की, २०१९-२० च्या तुलनेत २०२१-२२ मध्ये बेरोजगारांच्या संख्येत वाढ झाली आहे. २०१९-२० मध्ये बेरोजगारांची संख्या ३२.९ दशलक्ष होती. २०२१-२२ मध्ये ही संख्या ३३.४ दशलक्ष एवढी वाढली. २०१९-२० मध्ये कामगारांची संख्या ४४१.८ दशलक्ष होती. २०२१-२२ मध्ये ती ४३५.२ दशलक्ष एवढी कमी झाल्याचे दिसते. २०१९-२० च्या तुलनेत २०२१-२२ मध्ये कामगारांच्या संख्येत घट झाली असली तरी एकूण रोजगारात वाढ होण्याऐवजी घट झाल्याचे दिसते. २०१९-२० मध्ये ४०८.९ दशलक्ष एवढा रोजगार होता. तर २०२१-२२ मध्ये ४०१.८ दशलक्ष एवढा रोजगार होता.

**भारतातील बेकारीचे प्रकार**

भारतात ग्रामीण बेकारी, शहरी बेकारी, सुशिक्षितांची बेकारी, अशिक्षितांची बकारी, हंगामी बेकारी, छुपी बेकारी, औद्योगिक बेकारी, खुली बेकारी अशी विविध प्रकारची बेकारी दिसून येते. या बेकारीच्या प्रकारांचे थोडक्यात स्पष्टीकरण खालीलप्रमाणे दिले आहे.

**१. ग्रामीण बेकारी:**

भारतात सात लाख पेक्षा जास्त खेडी असून जवळ जवळ ६९ टक्के लोक खेड्यात राहतात. खेड्यात किंवा ग्रामीण भागात जी बेरोजगारी आढळून येते, त्यास ग्रामीण बेकारी असे म्हणतात. ग्रामीण बेकारी ही प्रामुख्याने शेती क्षेत्राशी संबंधित असून ग्रामीण भागात इतरही प्रकारची बेकारी अस्तित्वात आहे.

२. **शहरी बेकारी:**

भारतात ३१ टक्के लोक शहरात राहतात. ग्रामीण भागापेक्षा शहरात राहणाऱ्या लोकांचे प्रमाण कमी असले तरी शहरातही बेकार लोक असतात. म्हणून शहरात जी बेकारी आढळून येते, तिला शहरी बेकारी म्हणतात.

३. **खुली बेकारी:**

खुल्या बेकारीलाच उघड बेकारी किंवा उघडी बेकारी असे म्हणतात. अशी बेकारी स्पष्टपणे उघडपणे दिसून येते, म्हणून या बेकारीला खुली बेकारी असे म्हणतात.

४. **छुपी बेकारी :**

छुप्या बेकारीलाच अदृश्य बेकारी किंवा सुप्त बेकारी असे म्हणतात. भारतात अशी बेकारी प्रामुख्याने शेती क्षेत्रात दिसून येते. समजा एक एकरात काम करण्यासाठी ४ मजुरांची गरज असेल आणि प्रत्यक्षात त्यापेक्षा जास्त म्हणजे ५ किंवा ६ मजूर काम करत असतील तर हे एक ते दोन मजूर म्हणजे छुपे किंवा अदृश्य बेरोजगार होय.

५. **हंगामी बेकारी :**

हंगामी बेकारी ही प्रामुख्याने ग्रामीण भागात दिसून येते. वर्षभर काम करण्याची इच्छा व गरज असतानाही जर वर्षातील काही महिनेच रोजगार मिळत असेल तर अशा बेकारीला हंगामी बेकारी असे म्हणतात. उदा. भारतात कोरडवाहू शेतीत वर्षभर रोजगार मिळत नाही. साखर कारखाने सहा से आठ महिने चालू असतात. भात गिरण्या चार-पाच महिनेच चालू असतात. त्यामुळे हंगामी बेकारीची समस्या भारतात निर्माण झालेली पहावयास मिळते.

६. **अर्थवेळ बेकारी :**

भारतात काही लोकांना आठवड्यातून तीन चार दिवसच रोजगार मिळतो. अशा बेकारीला अर्धवेळ बेकारी असे म्हणतात.

७. **सुशिक्षितांची बेकारी :**

भारतात स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचा प्रसार वेगाने झाला, त्यामुळे भारतात सुशिक्षितांची बेरोजगारी वाढत आहे. इयत्ता दहावी किंवा त्यापेक्षा जास्त शिक्षण झालेल्या बेरोजगार व्यक्तींना सुशिक्षित बेकार असे म्हणतात.

८. **अशिक्षितांची बेकारी:**

भारतात आज २५% अशिक्षित किंवा निरक्षर लोक आहेत. अशा अशिक्षित व्यक्तींमध्ये ज्या व्यक्ती बेकार आहेत त्यांना अशिक्षित बेकार असे म्हणतात.

९. **औद्योगिक बेकारी:**

कारखाने आजारी पडल्याने किंवा बंद पडल्याने कामगारांवर बेकारची कुऱ्हाड कोसळते. अशा बेकारीस औद्योगिक बेकारी म्हणतात. औद्योगिकरणाचा वेग मंद असल्याने अशी बेकारी निर्माण होते.

अशा प्रकारे भारतात वरील विविध प्रकारची बेकारी आढळते. सुशिक्षितांची बेकारी केवळ शहरातच आढळते असे नाही तर ग्रामीण भागातसुध्दा सुशिक्षितांची बेकारी आढळते. भारतात शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात बेकारीची समस्या गंभीर स्वरुपाची आहे. दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या बेकारीने भारतीय अर्थव्यवस्थेसमोर मोठे आव्हान उभे केले आहे.

**भारतातील बेरोजगारीची कारणे :**

भारतातील बेरोजगारीस कारणीभूत असणाऱ्या काही घटकांचे थोडक्यात स्पष्टीकरण खालीलप्रमाणे दिले आहे.

१. **वाढती लोकसंख्या :**

वाढती लोकसंख्या हे भारतातील बेकारीचे प्रमुख कारण आहे. भारतात भयानक वेगाने लोकसंख्या वाढत असून जगात सर्वात जास्त लोकसंख्या वाढीचा वेग भारताचा आहे. लोकसंख्या वाढीमुळे श्रमशक्तीत किंवा श्रमाच्या पुरवठ्यात बेसुमार वाढ होत आहे. त्यामुळे भारतात बेकारीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीरच बनत चालला आहे.

२. **लघु व कुटिर उद्योगांची मंद गतीने वाढ :**

लघु व कुटिर उद्योग जितके जास्त तितका रोजगार जास्त निर्माण होतो. परंतु विविध कारणांमुळे भारतात लघु व कुटिर उद्योगांची वाढ अत्यंत मंद गतीने होत आहे. त्यामुळे रोजगार निर्मितीचा वेगही अत्यंत मंद आहे.

३. **उद्योजकता गुणधर्म असणाऱ्यांचे कमी प्रमाण:**

भारतात उद्योजकता गुणधर्म असणाऱ्यांचे प्रमाण खूपच कमी आहे. कर्ज काढून आणि पदरचे पैसे खर्चून उद्योग व्यवसाय सुरु करायला बहुसंख्य लोक घाबरतात. व्यवसाय धंदा चालला नाही तर आपण कर्जबाजारी होऊ अशी भीती त्यांना वाटते. त्यामुळे कर्जाची सुविधा उपलब्ध असूनही तिचा लाभ कित्येक जण घेत नाहीत. अशा प्रकारे उद्योजकता गुणधर्म असणाऱ्यांचे प्रमाण देशात कमी आहे. त्यामुळे बेकारीचे प्रमाण जास्त आहे.

४. **कोरडवाहू शेती :**

भारतातील जवळ जवळ ७० % शेती ही कोरडवाहू आहे. बहुतेक शेती ही पावसाच्या पाण्यावरच पिकते. त्यामुळे कोरडवाहू शेतीत वर्षातून एक ते दोन पिके घेता येतात. त्यामुळे कोरडवाहू शेतकरी आणि शेतमजूर यांना वर्षातील अनेक दिवस बेकार रहावे लागते. बागाईत शेतीत वर्षात ४ ते ६ वेळा पिके घेता

येतात. त्यामुळे बागाईत शेतीत रोजगार जास्त मिळतो. परंतु भारतात बागाईत शेतीचे प्रमाण केवळ ३० टक्के एवढेच असल्याने बेरोजगारीचे प्रमाण जास्त आहे.

**५. शेतीत यंत्रांचा वापरः**

भारतातील काही श्रीमंत शेतकरी आणि सहकारी साखर कारखाने शेतीत यंत्रांचा वापर करत आहेत. मळणी, कापणी, ऊस तोडणी इत्यादीसाठी यंत्रे वापरल्याने भारतात शेतीतील रोजगारावर परिणाम घडून आला आहे.

**६. व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्थांचे कमी प्रमाण:**

भारतातील कला, वाणिज्य, विज्ञान हे शिक्षण वाङ्मयीन शिक्षण आहे. ते व्यावसायिक शिक्षण नाही. भारतात व्यावहारिक/व्यावसायिक/तांत्रिक शिक्षण व प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांची संख्या कमी आहे. ज्या संस्था आहेत त्यापैकी बहुसंख्य संस्था शहरात आहेत. ग्रामीण भागात औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची मोठी कमतरता आहे. यामुळे बहुसंख्य विद्यार्थी वाङ्:मयीन शिक्षण घेतात. त्यामुळे त्यांना बेकार रहावे लागते.

**७. विविध कौशल्ये अंगी असणाऱ्यांचे प्रमाण कमी:**

चित्रकला, शिल्पकला, रंगकाम इ. विविध प्रकारची कौशल्ये अंगी असतील तर व्यक्तीला स्वतः व्यवसाय करता येतो किंवा या कौशल्याच्या जोरावर दुसरीकडे रोजगारही मिळविता येतो. परंतु अशा प्रकारची विविध कौशल्ये अंगी असणाऱ्यांचे प्रमाण भारतात कमी आहे. त्यामुळे बेकारीचा प्रश्न कठीण बनला आहे.

**८. कमी गतिशीलता :**

गतिशीलता म्हणजे कामा-धंद्यासाठी किंवा नोकरीसाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्याची लोकांची क्षमता होय. भारतात लोकांची गतिशीलता खूपच कमी आहे. त्यामुळे कित्येक लोकांना बेरोजगार रहावे लागते.

**९. खाजगीकरण :**

भारतात १९९१ पासून सरकारने खाजगीकरणाचे धोरण स्वीकारले आहे. सरकार काही उद्योग खाजगी क्षेत्राकडे सोपवत आहे. खाजगी उद्योजकांनी सरकारकडून घेतलेल्या उद्योगांचे यांत्रिकीकरण/आधुनिकीकरण सुरु केले असल्याने कर्मचारी अतिरिक्त झाले असून त्यांच्यावर बेकारीची कुऱ्हाड कोसळली आहे.

**१०. जागतिकीकरण :**

भारत सरकारने १९९१ पासून खाजगीकरणाबरोबरच जागतिकीकरणाचेही धोरण स्वीकारले आहे. त्यामुळे भारतात बहुराष्ट्रीय कंपन्यांना मुक्त प्रवेश मिळाला आहे. भारतातील टाटा, पार्ले यासारख्या मोठ्या आणि नामवंत कंपन्या या बहुराष्ट्रीय कंपन्यांपुढे हतबल झाल्या असून त्यांनी आपले काही कारखाने या बहुराष्ट्रीय कंपन्यांना विकून टाकले आहेत. विदेशी कंपन्यांना सरकारने समुद्रात मासेमारी करण्यासाठीही

परवानगी दिली आहे. त्यामुळे हजारो मच्छिमार बेरोजगार झाले असून जागतिकीकरणामुळे बेकारीत सतत वाढच होत आहे. म्हणून जागतिकीकरणाचे धोरण हा सुध्दा घटक भारतातील बेकारीस कारणीभूत ठरलेला महत्त्वाचा घटक आहे.

**११. श्रमाची लाज :**

श्रमाची लाज वाटणे हे भारतातील सुशिक्षित बेकारीचे एक प्रमुख कारण आहे. भारतातील मॅट्रिक आणि पदवीधर मोठ्या प्रमाणात बेकार आहेत. कारण शारीरिक कष्टाची त्यांना लाज वाटते. श्रमाची कामे करण्याचा त्यांना कमीपणा वाटतो. ते बेकार राहणे पसंत करतात. परंतु शारीरिक श्रमाची कामे करत नाहीत.

**१२. बालकामगारांचे वाढते प्रमाण:**

भारतात लाखांच्या संख्येने बालकामगार असून बालकामगारांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. बालकामगार कमी मजुरीत काम करतात. त्यामुळे त्यांना कामावर ठेवणे उद्योजकांना परवडते. परंतु बालकामगारांना रोजगार दिल्याने भारतात प्रौढ लोकांना व तरुणांना बेकार रहावे लागत आहे.

**१३. नोकरभरती न करण्याचे सरकारचे धोरण :**

शासकीय खात्यातील कर्मचारी निवृत्त झाले की त्यांच्या जागेवर सरकार नवीन नोकरभरती फारशी करत नाही. वाढत्या संगणकीकरणामुळे नवीन नोकरभरतीची गरज सरकारला वाटत नाही.

**१४. तोट्यातील उद्योग बंद करण्याचे स्वातंत्र्य**

१९९१ च्या नवीन आर्थिक धोरणात (औद्योगिक धोरणात) तोट्यात चालणारे उद्योग बंद करण्याची मुभा सरकारने खाजगी उद्योजकांना दिली आहे. त्यामुळे अनेक कारखाने बंद पडले असून हजारो कामगार देशात बेरोजगार झाले आहेत.

**१५. पंचवार्षिक योजनांना कमी यश** :

भारतात १९५१ पासून पंचवार्षिक योजना राबवल्या जात आहेत. आतापर्यंत भारतात १३ पंचवार्षिक योजना पूर्ण आल्या असून बारावी पंचवार्षिक योजना सुरू आहे. प्रत्येक पंचवार्षिक योजनेत बेकारीचा प्रश्न गंभीरच बनत गेल्याचे दिसते. अशा प्रकारे पंचवार्षिक योजनांना भारतात कमी यश आल्याने भारतातील बेकारीचा प्रश्न अद्यापही सुटू शकलेला नाही.

**१६. भांडवलाची टंचाई**

भारतात विविध कारणांमुळे भांडवलाची टंचाई आहे. त्यामुळे खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील भांडवल गुंतवणूकीचे प्रमाण कमी आहे. वाढत्या लोकसंख्येच्या आणि वाढत्या श्रमशक्तीच्या तुलनेने गुंतवणूक कमी होत असल्याने रोजगार वाढीचा दरही कमी आहे. त्यामुळे बेकारीचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे.

**१७. चिनी वस्तूंचे भारतीय बाजारपेठेवरील आक्रमणः**

भारतीय बाजारपेठेत चिनी वस्तूंचे आक्रमण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. सर्व प्रकारची खेळणी, इलेक्ट्रीक वस्तू इत्यादी विविध वस्तूंनी भारतीय बाजारपेठा गजबजल्या असून या वस्तू आकर्षक आणि स्वस्त असल्याने त्यांचा खप सतत वाढत आहे. त्यामुळे भारतात खेळणी उद्योगासारखे काही उद्योग बंद पडले असून चिनी वस्तूमुळे खेळणी तयार करणारे हजारो भारतीय कारागीर बेरोजगार झाले आहेत. अशा प्रकारे चिनी वस्तूंचे भारतीय बाजारपेठेवर जसजसे आक्रमण वाढत जाईल तसतशी भारतात बेकारी वाढत जाणार आहे. इतर देशातील वस्तूही भारतीय बाजारपेठेत दिसत आहेत. त्यामुळे बेकारीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत जाणार आहे.

**१८. निरक्षरता :**

निरक्षरता हे भारतीय बेकारीचे प्रमुख कारण आहे. कारण भारतात निरक्षर लोकांचे प्रमाण सुमारे २५ टक्के इतके आहे. निरक्षरतेमुळे भारतात साधी शिपायाचीसुध्दा नोकरी मिळत नाही. म्हणून निरक्षरता हे सुध्दा बेकारीचे कारण आहे.

**१९. सुशिक्षितांची वाढती संख्याः**

भारतात स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाच्या सुविधांमध्ये मोठी वाढ घडून आली. भारतात दिवसेंदिवस खाजगी शिक्षण संस्थांच्या शाळा व महाविद्यालयांच्या संख्येत वाढ होत आहे. त्यामुळे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येतही मोठी बाढ झाली आहे. परंतु या सुशिक्षितांना रोजगार उपलब्ध नसल्याने त्यांच्यावर बेकारीची कुऱ्हाड कोसळली आहे. अशा प्रकारे शिक्षणाच्या वाढत्या संधी आणि त्यामुळे शिक्षण घेणाऱ्यांच्या संख्येत वाढ हेसुद्धा भारतातील बेकारीचे प्रमुख कारण आहे.

**२०. कंत्राटी पद्धतीचा स्वीकार:**

खाजगी कंपन्यांनी आणि सरकारनेसुद्धा अलिकडच्या काळात कायम रोजगार पद्धत बंद करून कंत्राटी पद्धत स्वीकारली आहे. या पद्धतीमुळे कामगारांना वर्षभर काम मिळत नाही. काही महिने बसून काढावे लागतात. अशा प्रकारे कंत्राटी पद्धतीमुळेसुद्धा देशात बेकारीची समस्या निर्माण झाली आहे.

**२१. नैसर्गिक साधनसामग्रीचा अपुरा वापर:**

भारतात काही नैसर्गिक साधन संपत्ती विपुल प्रमाणावर आहे. विविध कारणांमुळे या साधनसामग्रीचा पुरेसा वापर केला जात नाही. त्यामुळे कामाची इच्छा व तयारी असूनही कित्येक लोकांना काम मिळत नाही. अशा प्रकारे नैसर्गिक साधन संपत्तीचा अपुरा वापर हे सुद्धा भारतातील बेकारीचे प्रमुख कारण आहे.

**२२. कामगार कपातीचे धोरण :**

भारतातील विविध कंपन्यांनी विविध कारणांमुळे कामगार कपातीचे धोरण स्वीकारले आहे. औद्योगिक क्षेत्राबरोबर सेवा क्षेत्रातील कंपन्यांनीसुद्धा कामगार कपातीचे धोरण अवलंबले आहे. आतापर्यंत हजारो

कामगारांना कामावरून कमी करण्यात आले आहे. कंपन्यांच्या कामगार कपातीच्या धोरणावर सरकारचासुद्धा अंकुश राहिलेला नसल्याने रोजगार वाढण्याऐवजी रोजगार कमी होत आहे. अशा प्रकारे कंपन्यांचे कामगार कपातीचे धोरण हा घटक सुद्धा भारतातील बेकारीस कारणीभूत ठरलेला महत्त्वाचा घटक आहे.

**२३. दारिद्र्य किंवा गरिबी :**

भारतातील वाढत्या बेकारीस दारिद्र्य किंवा गरीबी हा घटकसुद्धा कारणीभूत आहे. दारिद्र्य हे बेकारीचे कारण आणि परिणाम आहे. दारिद्र्यामुळे बेरोजगारी ओढवते आणि बेकारीमुळे दारिद्र्याची समस्या निर्माण होते. दारिद्र्यामुळे व्यक्तीला स्वतःचा व्यवसाय किंवा स्वयंरोजगार सुरू करता येत नाही. व्यवसाय सुरू करण्यासाठी लागणारे पुरेसे भांडवल गरीब व्यक्तींजवळ नसते. त्यामुळे दरिद्री व्यक्तींवर बेरोजगार राहण्याची पाळी येते. म्हणून दारिद्र्य किंवा गरिबी हा घटक बेकारीस कारणीभूत असणारा महत्त्वाचा घटक आहे.

**२४. कोरोना सारखी महामारी :**

भारतात काही वर्षांपूर्वी कोरोनासारखी महामारी (रोगराई) पसरली होती. जगातील अनेक देशात ही रोगराई पसरली होती. कोरोना हा एक संसर्गजन्य आजार असून तो झपाट्याने पसरतो. या रोगाने भारतातील काही लाख लोकांचा बळी घेतला होता. जीवित हानी होऊ नये यासाठी शेती वगळता उद्योग, व्यापार आणि सेवा क्षेत्रातील बरेच व्यवसाय सुमारे वर्षभर बंद होते. या काळात कोट्यावधी लोकांच्यावर बेकारीची कुऱ्हाड कोसळली होती. अशा प्रकारे कोरोनासारखी महामारीसुद्धा बेकारीची समस्या निर्माण करते असा भारताचा आणि जगाचा अनुभव आहे.

**सारांश:**

अशा प्रकारे भारतातील बेकारीस वरील प्रमाणे विविध घटक कारणीभूत आहेत. भारतात असंघटित क्षेत्र खूप मोठे आहे. असंघटित क्षेत्रात संघटित क्षेत्राप्रमाणे वर्षभर आणि खात्रीचा रोजगार मिळत नाही. त्यामुळे असंघटित क्षेत्रातील लाखो कामगारांना वर्षातील काही महिने बेरोजगार राहावे लागते. भारतात अर्धवेळ, पूर्णवेळ आणि छुप्या (अदृश्य) बेरोजगारांचे प्रमाण मोठे आहे. वाढते संगणकीकरण आणि वाढते यांत्रिकीकरण हे दोन घटक सुद्धा भारतातील बेकारीस कारणीभूत आहेत.

**बेरोजगारीचे दुष्परिणाम :**

भारतातील बेकारीची समस्या ही अत्यंत जुनाट समस्या आहे. बेकारी देशाच्या सर्व भागात आढळते. देशाच्या मागास राज्यात आणि पुढारलेल्या राज्यात अशा दोन्ही प्रकारच्या राज्यात बेकारी आढळते. तसेच ग्रामीण आणि शहरी भागातसुद्धा बेकारी आढळते. भारतात अशिक्षित आणि अल्पशिक्षित जसे बेरोजगार आहेत त्याप्रमाणे सुशिक्षित किंवा उच्च शिक्षित सुद्धा बेरोजगार आहेत. हे भारतीय बेरोजगारीचे ठळक वैशिष्ट्य आहे. भारतीय बेकारीचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे भारतात जशी उघड बेकारी दिसते तशी भारतात छुपी

किंवा अदृश्य बेकारीसुद्धा दिसते. या सर्व प्रकारच्या बेकारीचे आर्थिक, सामाजिक आणि राजकीय दुष्परिणाम उद्भवतात. त्या दुष्परिणामांचे थोडक्यात स्पष्टीकरण खालीलप्रमाणे दिले आहे.

**१) कृषी व्यवसायावर प्रतिकूल परिणाम:**

ग्रामीण भागात जी बेरोजगारी दिसते ती प्रामुख्याने कृषी क्षेत्राशी संबंधित आहे. कृषी क्षेत्राशी संबंधित बेकारी ही प्रामुख्याने छुपी बेकारी किंवा अदृश्य बेकारी असते. कुटुंबाचा आकार मोठा असल्याने आणि शेतीत सर्वांना पुरेसे काम नसल्याने जरी कुटुंबातील सर्व सदस्य शेतीत राबत असले तरी त्यातील काही श्रमिक किंवा सदस्य हे अतिरिक्त असतात. त्यांना छुपे बेकार किंवा अदृश्य बेकार असे म्हणतात. उदाहरणार्थ शेतीत चार मजुरांची गरज असेल आणि सहा मजूर काम करत असतील तर दोन मजूर हे छुपे किंवा अदृश्य बेरोजगार होय. अशा प्रकारची छुपी किंवा अदृश्य बेकारी भारताच्या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात आढळते. अशा अदृश्य किंवा छुप्या बेकारांचा शेती व्यवसायाला काहीच उपयोग होत नाही. अदृश्य बेकारीमुळे शेती उत्पादनात व उत्पन्नात काहीच भर पडत नाही. हा छुप्या बेकारीचा दुष्परिणाम आहे.

**२) दारिद्र्यात वाढ:**

बेकारी आणि दारिद्र्य या दोन घटकात अत्यंत जवळचे संबंध आहेत. देशात बेकारीचे प्रमाण मोठे असेल तर दारिद्र्याचे प्रमाणही मोठे राहते. बेरोजगारीमुळे व्यक्तीला उत्पन्न (वेतन/ मजुरी/ पगार) मिळत नाही. त्यामुळे बेरोजगार व्यक्ती व त्यांची कुटुंबे यांना दारिद्र्यरेषेखालील जीवन जगावे लागते. भारतात दारिद्र्याचे प्रमाण आजही मोठे आहे.कारण बेकारीचे प्रमाण देशात मोठे आहे. काट्यावधी लोक बेरोजगार आहेत. या सर्वांना जर रोजगार उपलब्ध करून दिला तर बेकारी नष्ट होऊन दारिद्र्याचे प्रमाणही कमी होऊ शकेल.

**३) सरकारी खर्चात वाढ:**

बेरोजगारीमुळे सरकारच्या खर्चात प्रचंड वाढ होत आहे. बेरोजगारांना जर काम मिळाले नाही तर सरकारला बेरोजगार भत्ता द्यावा लागतो. या भत्त्यावरील खर्चात दिवसेंदिवस वाढ होत आहे. बेरोजगारीमुळे निर्माण होणारी दारिद्र्याची समस्या सोडविण्यासाठी दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमावर सरकारला प्रचंड खर्च करावा लागतो. या खर्चातही दरवर्षी वाढ होत आहे. बेकारी नाहीशी करण्यासाठी सरकारला विविध रोजगार योजना आखून त्यांची अंमलबजावणी करावी लागते. त्यावरील खर्चातसुद्धा प्रचंड वाढ होत आहे. या खर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठी सरकारी कर्ज काढावे लागते. त्यामुळे कर्जबाजारीपणा वाढतो. दारिद्र्य आणि बेकारी निर्मूलनासाठी सरकारला प्रचंड खर्च करावा लागत असल्याने विकासकामासाठी पैसा कमी पडत आहे. हे बेरोजगारीचे दुष्परिणाम आहेत.

**४) स्थलांतराची समस्या:**

बेरोजगारीचा आणखी एक दुष्परिणाम म्हणजे बेकारीमुळे कामगारांच्या स्थलांतरात वाढ होते. कामाच्या शोधासाठी (उपजीविकेसाठी) खेड्यापाड्यातील बेरोजगार लोक पुढारलेल्या राज्यात किंवा नजिकच्या लहान

मोठ्या शहरात स्थलांतर करतात. त्या ठिकाणी कच्च्या झोपड्या बांधून ते राहतात. त्यामुळे झोपडपट्या वाढतात. झोपडपट्टीची समस्या निर्माण होते. बेरोजगारांच्या शहरातील स्थलांतरामुळे इतरही समस्या निर्माण होतात. उदाहरणार्थ शहरातील लोकांच्या संख्येत वाढ होऊन शहरातील मूळच्या लोकांच्या गरजा भागत नाहीत. शहरांची अस्ताव्यस्त वाढ होते. शहरातील सामाजिक स्वास्थ्य धोक्यात येते. शांततेला बाधा पोहोचते. अशा प्रकारे बेरोजगारीमुळे बेकार लोकांच्या स्थलांतरात वाढ होते. स्थलांतरामुळे अनेक समस्या निर्माण होतात. या समस्यांना जनतेला आणि सरकारला तोंड द्यावे लागते.

**५) वैफल्य /नैराश्य यात वाढ :**

व्यक्तीला वर्षांनुवर्षे बेरोजगार राहावे लागले तर ती व्यक्ती हताश किंवा निराश होते. वैफल्य, नैराश्य, उदासीनता वाढत जाऊन कित्येक बेरोजगार वेडसर बनल्याची उदाहरणे आहेत. भारतात बेरोजगारीमुळे वैफल्य येऊन वेडसर बनलेल्या तरुणांची, प्रौढांची संख्या वाढत आहे. हा बेकारीचा अत्यंत गंभीर दुष्परिणाम आहे. उच्चशिक्षित तरुणांच्यामधील नैराश्य वाढण्याची जी काही प्रमुख कारणे आहेत त्यामध्ये बेरोजगारी हा प्रमुख घटक आहे. उच्च शिक्षित तरुणांच्यातील वैफल्य, नैराश्य, उदासीनता वाढीस लागू नये यासाठी त्यांना त्यांच्या पात्रतेप्रमाणे रोजगार मिळणे अत्यंत आवश्यक आहे.

**६) कौटुंबिक कलह/ ताणतणाव:**

बेरोजगारीचा आणखी एक सामाजिक दुष्परिणाम म्हणजे बेरोजगारीमुळे बेरोजगार कुटुंबात कलह (भांडणतंटे) वाढत आहेत. वर्षांनुवर्षे बेरोजगार राहावे लागत असल्याने घरगुती भांडणात /वादविवादात वाढ होत असते. कौटुंबिक स्वास्थ्य धोक्यात आले आहे. घरातील शांतता भंग पावत असून बेरोजगार कुटुंबातील व्यक्तींमधील ताणतणाव वाढत आहेत.

**७) आत्महत्यांमध्ये वाढ:**

भारतात दरवर्षी हजारो उच्चशिक्षित बेरोजगार व्यक्ती आत्महत्या करताना दिसतात. बेरोजगार व्यक्तींच्या आत्महत्यांच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. बेरोजगारीच्या समस्येमुळे निर्माण झालेली वाढत्या आत्महत्येची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. सन २०२० मध्ये ३५४८ तरुण-तरुणींनी देशात आत्महत्या केल्या होत्या. अशा प्रकारे वर्षाला देशात हजारो तरुण, तरुणी आत्महत्या करत असून या आत्महत्यांमागे जी विविध कारणे कारणीभूत आहेत, त्यामध्ये बेरोजगारी हे एक प्रमुख कारण आहे.

**८) कुटुंबाचा आणि सरकारचा शिक्षणावरील खर्च वाया:**

बेरोजगारीचा आणखी एक दुष्परिणाम म्हणजे उच्च शिक्षण घेऊनही नोकऱ्या न मिळाल्याने त्या कुटुंबाने आणि सरकारने मुलामुलींच्या शिक्षणावर केलेला खर्च वाया जातो. बरीच कुटुंबे आपल्या मुला-मुलींवर स्वतःच्या उत्पन्नातून आणि कर्ज काढून शिक्षणावर खर्च करत असतात. सरकारसुद्धा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर प्रचंड खर्च करत असते. परंतु बेरोजगारीमुळे कुटुंबाचा आणि सरकारचा उच्च शिक्षणावरील खर्च वाया जात आहे.

### ९) अपुरे पोषण /कुपोषण:

कुपोषणाचा एक प्रकार म्हणजे अपुरे पोषण होय. बालकांच्या, तरुणांच्या आणि प्रौढांच्या कुपोषणाची अनेक कारणे आहेत. त्यापैकी एक कारण म्हणजे दारिद्र्य होय. दारिद्र्याचे प्रमुख कारण बेरोजगारी हे आहे. बेरोजगारीमुळे कुटुंबातील सर्वांना पोटभर व सकस अन्न खायला मिळत नाही. त्यामुळे अपुऱ्या पोषणाची (कुपोषणाची) समस्या निर्माण होते. भारतात कुपोषित बालकांचे प्रमाण आजही लक्षणीय आहे. त्यास जे विविध घटक जबाबदार आहेत त्यामध्ये दारिद्र्य आणि बेकारी हे दोन घटक प्रमुख आहेत. म्हणून कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी देशातील दारिद्र्य आणि बेकारी या दोन समस्यांचे निराकरण केले पाहिजे.

### १०) गुन्हेगारी, गुंडगिरी यात वाढ:

बेरोजगारीचा दिसून येणारा आणखी एक सामाजिक दुष्परिणाम म्हणजे बेकारीमुळे गुन्हेगारी, गुंडगिरी यात वाढ होते. जगण्यासाठी काही बेरोजगार लोक चोऱ्या, दरोडे या मार्गाचा अवलंब करतात. देशात चोऱ्या, दरोडे यांचे प्रमाण वाढत असून काही उच्च शिक्षित बेरोजगार तरुण आरोपी म्हणून पकडले जाऊ लागले आहेत. ही मोठी चिंतेची बाब आहे. तसेच काही बेरोजगार पैशासाठी गुंडगिरी करताना दिसत आहेत. थोड्या पैशासाठी मारामारीची आणि खुनाची सुपारी घेत आहेत. अशा प्रकारे भारतात चोऱ्या, दरोडे, खून, मारामारी, खंडणी, अपहरण यामध्ये जी वाढ होत आहे, त्यास जे विविध घटक कारणीभूत आहेत त्यामध्ये वाढती बेरोजगारी हा घटकसुद्धा कारणीभूत आहे. सर्वच बेरोजगार गुन्हेगारी विश्वात अडकलेले नाहीत हे खरे असले तरी भविष्यात गुन्हेगारी विश्व मोठे होऊ यासाठी बेरोजगारीची समस्या सरकारने तात्काळ सोडवली पाहिजे. अशा प्रकारे बेरोजगारीमुळे विविध प्रकारची गुन्हेगारी वाढून सामाजिक स्वास्थ्य धोक्यात येते. समाजाची अधोगती होते. हा बेरोजगारीचा भारतासारख्या देशात जाणवत असलेला अत्यंत गंभीर दुष्परिणाम आहे.

### ११) सरकारी मालमत्तेचे नुकसान:

काही पक्ष किंवा संघटना बेरोजगार युवकांना हाताशी धरून, त्यांना भडकावून सरकारच्या विरोधात आंदोलने करतात. जाळपोळीसारखे मार्ग अवलंबतात. सरकारी इमारती, वाहने, रेल्वे यांचे नुकसान करतात. हिंसक कारवाया करण्यासाठी बेरोजगार तरुणांचा वापर करून घेतला जातो. भारतात अत्यंत हिंसक मानली जाणारी नक्षलवादी चळवळ, बेरोजगार, आदिवासी तरुण-तरुणींचा सरकारी मालमत्तेचा विध्वंस करण्यासाठी, पोलिसांची हत्या करण्यासाठी सतत वापर करत असते. अशा प्रकारे बेरोजगारीच्या समस्येचे भांडवल करून काही अपप्रवृत्ती बेरोजगार तरुणांकडून सरकारी मालमत्तेचे प्रचंड नुकसान करत आहेत. हा बेरोजगारीचा अत्यंत महत्त्वाचा दुष्परिणाम आहे.

**१२) काळ्या/बेकायदेशीर व्यवसायात वाढ :**

भारतात सरकारची किंवा कायद्याची मान्यता नसलेले अनेक काळे व्यवसाय किंवा बेकायदेशीर व्यवसाय आढळतात. वेश्याव्यवसाय दिवसेंदिवस वाढत चालला आहे. दरवर्षी शेकडो, हजारो स्त्रिया या व्यवसायात येत आहेत. कित्येक गावात बेकायदेशीर दारूच्या भट्ट्या चालू आहेत. जुगार, मटका, स्मगलिंग यांचे प्रमाण वाढत आहे. देशात काळ्या व्यवसायात/अनैतिक व्यवसायात/बेकायदेशीर व्यवसायात दिवसेंदिवस वाढ होत असून त्यास विविध घटक कारणीभूत आहेत. त्यामध्ये वाढती बेकारी हा घटक सुद्धा कारणीभूत आहे. अशा प्रकारे काळ्या व्यवसायात/बेकायदेशीर व्यवसायात होत असलेली वाढ हा बेकारीचा व दारिद्र्याचा गंभीर दुष्परिणाम आहे.

**१३) श्रमशक्ती वाया जाणे:**

बेरोजगारीचा आणखी एक दुष्परिणाम म्हणजे बेरोजगारीमुळे देशातील श्रमशक्तीचा आर्थिक विकासासाठी वापर करता येत नाही. एकूण श्रमशक्तीपैकी जेवढ्या लोकांना रोजगार मिळत नाही. त्यांची श्रमशक्ती वाया जाते. भारतात दरवर्षी कोट्यावधी लोकांना बेरोजगार राहावे लागते. त्यामुळे चांगले मनुष्यबळ वाया जाते. भारतात दरवर्षी कोट्यावधी लोकांना बेरोजगार राहावे लागते. त्यामुळे त्यांची इच्छा व पात्रता असूनही राष्ट्रीय उत्पन्नाच्या प्रक्रियेत भाग घेता येत नाही. त्यामुळे स्थूल देशांतर्गत उत्पादनात (GDP मध्ये) भर पडत नाही. अशा प्रकारे बेरोजगारीमुळे राष्ट्रीय उत्पन्नात (GDP मध्ये) घट होते. श्रमशक्तीचा अपव्यय होतो. कोट्यावधी लोकांच्या शारीरिक व बौद्धिक श्रमाचा देशाचा विकासासाठी वापर करून घेता येत नाही.

**१४) व्यसनाधीनतेत वाढ:**

भारतात दारू, तंबाखू, गांजा व इतर व्यसनांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. तरुणांमध्ये विविध व्यसनांचे प्रमाण वाढत आहे. त्यास जे विविध घटक जबाबदार आहेत त्यामध्ये वाढती बेकारी हा घटकसुद्धा कारणीभूत आहे. बेरोजगारीमुळे आलेल्या नैराश्यातून अनेक युवक विविध व्यसनांचा आश्रय घेतात असे आढळून आले आहे. व्यसनाधीनतेमुळे अनेक तरुणांचे आयुष्य वाया गेले आहे. कित्येक व्यसनाधीन तरुण अकालीच मृत्यूमुखी पडत आहेत. व्यसनाधीन तरुणांच्या संख्येत वाढ हा बेकारीचा एक अत्यंत गंभीर दुष्परिणाम आहे.

**१५) वैवाहिक समस्या:**

बेरोजगारीचा भारतात प्रकर्षाने जाणवणारा आणखी एक सामाजिक दुष्परिणाम म्हणजे अनेक बेरोजगार तरुण तरुणींना वैवाहिक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. लग्न उशीरा होणे, लग्न आयुष्यभर न होणे, चांगला व मनासारखा जोडीदार न मिळणे अशा समस्यांना बेरोजगार युवकांना व युवतींना तोंड द्यावे लागत आहे. वयाची २५, ३० वर्षे ओलांडली तरी विवाह ठरत नाहीत. नोकरी नसल्यामुळे, कामधंदा नसल्यामुळे

विवाहाचे वय वाढत चालले आहे. त्यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. विवाह ठरत नसल्याने आत्महत्या करणाऱ्यांचे प्रमाण वाढत चालले आहे.

**१६) आर्थिक विषमतेत वाढ:**

भारतातील बेरोजगारीचा जाणवणारा आणखी एक दुष्परिणाम म्हणजे देशातील आर्थिक विषमता वाढीस लागत आहे. बेकारी मुळे काहीच उत्पन्न मिळत नाही. त्यामुळे गरीब आणि श्रीमंत यांच्यातील अंतर किंवा दरी वाढत आहे. भारतातील आर्थिक विषमतेस अनेक घटक कारणीभूत आहेत. त्यामध्ये वाढती बेकारी हा घटकसुद्धा जबाबदार आहे.

**१७) प्रभावी मागणीवर परिणाम:**

बेरोजगार आणि प्रभावी मागणी यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे. प्रभावी मागणी म्हणजे परिणामकारक मागणी होय. देशातील सर्व लोकांची (समाजाची) वस्तू व सेवांना जी मागणी असते, तिला प्रभावी मागणी असे म्हणतात. बेरोजगारीमुळे प्रभावी मागणी कमी होते. देशात बेकारीचे प्रमाण मोठे असेल तर प्रभावी मागणीत मोठी घट होते. प्रभावी मागणी ही खरेदीशक्तीवर अवलंबून असते. खरेदीशक्ती लोकांच्या उत्पन्नावर अवलंबून असते. बेरोजगारीमुळे प्रभावी मागणी कमी राहते. कोट्यावधी लोकांना बेकारीमुळे उत्पन्न मिळत नाही. त्यामुळे ते इच्छा व गरज असूनही वस्तू व सेवा खरेदी करू शकत नाहीत. त्यामुळे कोट्यावधी लोकांकडून वस्तू व सेवांना फारशी मागणी येत नाही. हा बेकारीचा प्रभावी मागणीवर दिसून येणारा महत्त्वाचा दुष्परिणाम आहे. प्रभावी मागणी कमी राहिल्याने उत्पादकांना उत्पादन कमी करावे लागते. त्यामुळे गुंतवणूक कमी होते. गुंतवणूक कमी राहिल्याने रोजगार वाढत नाही. अशा प्रकारे बेकारीमुळे प्रभावी मागणीची देशात कमतरता निर्माण होऊन उत्पादनात घट, गुंतवणुकीत घट, रोजगारात घट, नफ्यात घट असे दुष्परिणाम उद्भवतात. हा बेकारीचा मोठा आर्थिक परिणाम आहे.

**सारांश**

अशा प्रकारे बेरोजगारीचे वरीलप्रमाणे आर्थिक, सामाजिक, राजकीय दुष्परिणाम समाजातील सर्व घटकांना भोगावे लागतात. देशातील बेकारीचे प्रमाण जेवढे मोठे असेल तेवढे बेकारीचे दुष्परिणाम तीव्रतेने जाणवतात. बेरोजगारीचे दुष्परिणाम टाळण्यासाठी रोजगाराच्या संधीत वाढ घडवून आणणे अत्यंत आवश्यक आहे.

बेकारी निर्मूलनासाठी उपाय बेकारीमुळे भारतात अनेक आर्थिक आणि सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत. म्हणून बेकारीचे निर्मूलन होणे आवश्यक आहे. रोजगारात वाढ व्हावी यासाठी काही उपाय खालीलप्रमाणे सुचवले आहेत.

**१. वापरात नसलेल्या जमिनीचा वापरः**

भारतात हजारो हेक्टर जमीन वापराविना पड़ीक आहे. अशा जमिनीचा वापर केला तर कृषी उत्पादनात वाढ होईल आणि रोजगारातही वाढ होईल. म्हणून वापरात नसलेली जमीन वापरात आणणे आवश्यक आहे.

### २. सहकार क्षेत्राला मदत करणे :

भारतात सहकार क्षेत्रातील काही कारखाने बंद पडले आहेत. अशा कारखान्यांना मदत करून ते कारखाने पुन्हा चालू करण्याचा प्रयत्न सरकारने केला पाहिजे. तसेच बंद पडत असलेल्या सहकारी तत्वावरील कारखान्यांना वाचवण्यासाठी सरकारने पुढाकार घेतला पाहिजे. त्यामुळे ग्रामीण भागात बेकारी वाढणार नाही.

### ३. लोकसंख्या वाढीचा वेग कमी करणे :

वाढती लोकसंख्या हे भारतातील वाढत्या बेकारीचे प्रमुख कारण आहे. म्हणून लोकसंख्या वाढीचा वेग कमी करण्याची आवश्यकता आहे. त्याशिवाय बेरोजगारीचे प्रमाण कमी होणार नाही. भारतातील जननदर हा मृत्यूदरा एवढा किंवा त्यापेक्षा कमी झाला पाहिजे. त्याशिवाय बाढत्या लोकसंख्येचा आणि वाढत्या बेकारीचा प्रश्न सुटणार नाही.

### ४. मानवी भंडवलाचा दर्जा उंचावणे:

भारतात मानवी भांडवलाचा दर्जा अत्यंत सुमार किंवा निकृष्ट आहे. त्यामुळे लोकांना नोकऱ्या मिळत नाहीत किंवा मिळाल्या तरी चांगले उत्पन्न देणाऱ्या नोकऱ्या मिळत नाहीत, म्हणून मानवी साधन संपतीची गुणवत्ता उंचावण्यावर सरकारने भर दिला पाहिजे. त्याशिवाय बेकारी कमी होणार नाही.

### ५. आंतरसुविधात वाढ

वीज, पाणी, वाहतूक, शिक्षण, आरोग्य, दळणवळण इत्यादी सोयी सुविधांना आंतरसुविधा किंवा पायाभूत सुविधा असे म्हणतात. या पायाभूत सुविधांची आजही आपल्या देशात खूपच कमतरता आहे. या सुविधा वाढविण्यावर सरकारने भर दिला तर रोजगारही वाढेल आणि देशाच्या आर्थिक विकासाचाही वेग वाढेल. कारण पायाभूत सुविधांवरच देशाचा विकास अवलंबून असतो.

### ६. श्रमप्रधान तंत्राच्या वापरास महत्त्व:

भारतात बेरोजगारीचे प्रमाण मोठे आहे. म्हणून शक्य त्या ठिकाणी श्रमप्रधान तंत्राचा अवलंब करणे आवश्यक आहे. त्यामुळे रोजगारात वाढ होण्यास मदत होईल.

### ७. तारणाऐवजी कारण पाहून कर्ज सुविधा देणे:

भारतातील बहुसंख्य लोक गरीब आहेत. त्यामुळे कर्जासाठी त्यांच्याकडे पुरेसे तारण नाही. तारण नसल्याने बँकांकडून त्यांना कर्ज मिळत नाही. कर्ज मिळत नसल्याने व्यवसाय, धंदा करता येत नाही. म्हणून सुशिक्षित आणि होतकरू तरुणांना सरकारने तारणांची अट शिथिल करुन कमी व्याजदरात किंवा बिनव्याजी कर्ज द्यावे. त्यामुळे स्वयंरोजगारात वाढ होऊन बेकारीचे प्रमाण कमी होईल.

**८. ओलिताखालील क्षेत्रात वाढः**

बागाईत जमिनीत वर्षात चार ते सहा पीके घेता येतात. त्यामुळे कोरडवाहू शेतीपेक्षा बागाईत जमिनीत अधिक रोजगार मिळतो. म्हणून सरकारने ओलिताखालील क्षेत्रात वाढ करणे आवश्यक आहे. बागाईत जमिनीचे क्षेत्र वाढल्यास रोजगारात वाढ होऊन बेकारीचे प्रमाण कमी होईल.

**९. जास्तीत जास्त रोजगार पुरवणाऱ्या उद्योगांना सवलती :**

रोजगारात वाढ व्हावी यासाठी सरकारने जे उद्योग श्रमप्रधान आहेत किंवा जास्तीत जास्त रोजगार पुरवतात अशा उद्योगांना विविध सवलती द्याव्यात. त्यामुळे असे उद्योग वाढून रोजगारातही वाढ होईल.

**१०. प्रक्रिया उद्योगांचा विकास :**

काजू, आंबा, सीताफळ, अन्नधान्य, भाज्या इ. कृषीमालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांची संख्या जेवढी जास्त तेवढा रोजगार जास्त निर्माण होतो. कृषी मालावर प्रक्रिया करणारे जास्तीत जास्त उद्योग स्थापन झाले तर रोजगारातही वाढ होईल आणि नाशवंत कृषी मालाचे होणारे नुकसानही थांबेल.

**११. रोजगार योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करणेः**

भारतात सरकारकडून ग्रामीण आणि शहरी भागात रोजगार योजना राबविल्या जातात. पण या रोजगार योजनेत काही दोष आणि त्रुटी आहेत. तसेच भ्रष्टाचारही आहे. म्हणून रोजगार योजनांची अंमलबजावणी प्रामाणिकपणे व प्रभावीपणे झाली तर रोजगार योजनांना लोकांचे सहकार्य मिळून बेकारी निर्मूलनात रोजगार योजनांचे महत्व वाढू शकेल.

**१२. श्रीमंतांना गुंतवणूकीसाठी प्रोत्साहन द्यावे :**

भारतात आयकराचे दर खूप जास्त आहेत. श्रीमंत, अतिश्रीमंत यांच्याकडून सरकारने १० टक्केपेक्षा जास्त कर वसूल करु नये. त्यामुळे श्रीमंतांना आयकरातून वाचवलेला पैसा शेती, उद्योग व्यवसायात गुंतवता येईल. त्यामुळे रोजगारात वाढ होईल, श्रीमंतांकडे गुन्हेगार किंवा करबुडवे म्हणून सरकारने पाहू नये.

**१३. स्वयंरोजगारास प्रोत्साहन देणे:**

भारतात खाजगी व सरकारी क्षेत्रात नोकऱ्या मागणाऱ्यांची संख्या प्रचंड आहे. हजारात एखाद्यालाच नोकरी मिळते असे अनुभव आहे. प्रचंड बेकारी असल्याने सर्वांना नोकऱ्या देता येत नाहीत. म्हणून सरकारने स्वयंरोजगारास प्रोत्साहन दिले पाहिजे. नोकऱ्या मागणाऱ्या उच्चशिक्षित तरुणांनी सुद्धा नोकऱ्यांच्या मागे न लागता विविध प्रकारचे स्वयंरोजगार सुरू केले पाहिजेत. सरकारने स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी काही योजना सुरू केल्या आहेत. त्याचा लाभ तरुण-तरुणींनी घेतला पाहिजे. त्याशिवाय बेकारीचे प्रमाण कमी होणार नाही. भारतात नोकऱ्या कमी आहेत आणि नोकऱ्या मागणाऱ्यांची संख्या प्रचंड आहे. म्हणून सरकारने स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

**१४. काळ्या पैशाच्या गुंतवणुकीस परवानगी:**

भारतात काही लोकांच्याकडे मोठ्या प्रमाणात काळा पैसा आहे. सरकारच्या भयाने हा काळा पैसा चलनात येत नाही. ज्यांच्याकडे काळा पैसा आहे त्यांना सरकारने हा पैसा श्रम प्रधान उद्योगात गुंतवण्याची मुभा द्यावी म्हणजे रोजगार वाढेल. काळा पैसा नुसता पडून आहे. हा काळा पैसा जास्तीत जास्त रोजगार निर्माण करणाऱ्या उद्योगात गुंतवण्यासाठी सरकारने काळा पैसा धारकांना सवलती द्याव्यात. काळा पैसा पडून राहण्यापेक्षा जर तो योग्य प्रकारे गुंतवला तर रोजगारात वाढ घडून येईल.

**१५. ग्रामीण भागात सेवा क्षेत्राची वाढ आवश्यक:**

भारतात सेवा क्षेत्राची वाढ झपाट्याने होत आहे. सेवा क्षेत्रात सतत नवनवीन रोजगार संधी निर्माण होत आहेत. परंतु नागरी भागाच्या तुलनेत भारताच्या ग्रामीण भागात सेवा क्षेत्राच्या वृद्धीचा वेग कमी आहे. म्हणून ग्रामीण भागात सेवा क्षेत्राच्या विकासाला सरकारने प्रोत्साहन द्यावे. खाजगी व सरकारी क्षेत्रातील सेवा ग्रामीण भागात विस्तारल्या तर ग्रामीण भागातील बेकारी कमी होण्यास मदत होईल.

**१६. सरकारने नोकर कपातीचे धोरण बंद करणे आवश्यक:**

सरकारचे नोकर कपातीचे धोरण किंवा विविध कारणामुळे निर्माण झालेली रिक्त पदे न भरण्याचे धोरण भारतातील उच्चशिक्षितांच्या बेकारीस कारणीभूत ठरले आहे. म्हणून सरकारने हे धोरण बंद करणे आवश्यक आहे. आजमितीस सुमारे दहा लाख जागा रिक्त आहेत. सरकारच्या सर्व विभागात मोठ्या प्रमाणात रिक्त जागा आहेत. या रिक्त जागांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. म्हणून सरकारने नोकर भरती न करण्याचे धोरण बंद करावे. तसेच टप्प्याटप्प्याने (सावकाश) नोकर भरती न करता मोठ्या प्रमाणात नोकर भरती करावी. यामुळे उच्च शिक्षित बेकारांना नोकऱ्या मिळतील. त्यांच्या बुद्धीचा, ज्ञानाचा राष्ट्राला फायदा होईल. चांगले मनुष्यबळ वाया जाणार नाही.

**१७) नवीन शहरांची निर्मिती आवश्यक:**

देशात दरवर्षी किमान शंभर नवीन शहरे निर्माण झाली पाहिजेत. ही शहरे छोटी आणि आटोपशीर असावीत. अशा शहरात झोपडपट्यांना परवानगी असता कामा नये. शहरांच्या निर्मितीमुळे कुशल, अकुशल अशा सर्व प्रकारच्या नोकऱ्या मोठ्या प्रमाणात निर्माण होतील. स्वयंरोजगारात वाढ होईल. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकास दरातही वाढ होईल. कारण शहरांचा आणि आर्थिक विकासाचा अत्यंत जवळचा संबंध आहे. म्हणून बेरोजगारी कमी करण्यासाठी जलद आर्थिक विकासासाठी सरकारने दरवर्षी किमान १०० तरी नवीन शहरे निर्माण केली पाहिजेत. या शहरांची लोकसंख्या सरकारने ठरवून द्यावी. त्यापेक्षा अधिक लोकांना समाविष्ट करू नये. म्हणजे शहरांची वाढ अनियंत्रित होणार नाही.

**१८) बांधकाम व्यवसायाला प्रोत्साहन देणे आवश्यक :**

सध्या भारतातील बांधकाम व्यवसाय हा अत्यंत तेजीत चाललेला व्यवसाय आहे. या व्यवसायामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होतो. बांधकाम व्यवसाय हा रोजगार निर्माण करणारा महत्त्वाचा व्यवसाय

आहे. म्हणून सरकारने बांधकाम व्यवसाय वाढेल अशा प्रकारे बांधकाम व्यवसायाला सवलती द्याव्यात. त्यामुळे बांधकाम व्यवसाय वाढून या व्यवसायामुळे कुशल व अकुशल लोकांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळू शकेल.

**रोजगार निर्मितीसाठी, बेकारी कमी करण्यासाठी सरकारने योजलेले उपाय**

भारत सरकारने आणि महाराष्ट्र शासनाने रोजगार निर्मितीसाठी स्वातंत्र्यप्राप्तीपासूनच काही योजना आखल्या आहेत व त्याची अंमलबजावणी सुद्धा केली आहे. सरकारच्या या योजनांची माहिती थोडक्यात खालील प्रमाणे दिली आहे.

१) **कामासाठी अन्न कार्यक्रम** (Food for work programme)

हा कार्यक्रम सरकारने १९७७ मध्ये सुरू केला. ग्रामीण भागातील स्त्रियांना रोजगार देणे व त्यांचे जीवनमान उंचावणे हे या कार्यक्रमाचे उद्देश आहेत.

२) **रोजगार हमी योजना** (EGS)

महाराष्ट्रात १९७२ साली मोठा दुष्काळ पडला होता. हा दुष्काळ हटवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने १९७२ मध्ये (२८ मार्च १९७२) ही योजना सुरू केली. ग्रामीण भागातील बेकारी व दारिद्र्य नष्ट करणे हे या योजनेचे उद्देश होते.

३) **राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम :**

हा कार्यक्रम सरकारने ऑक्टोंबर १९८० मध्ये सुरू केला. ग्रामीण भागात रोजगार निर्माण करणे हा या योजनेचा उद्देश आहे.

४) **ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम:**

हा कार्यक्रम सरकारने १५ ऑक्टोंबर १९८३ रोजी सुरू केला. ग्रामीण भागातील भूमिहीन कुटुंबातील बेरोजगारांना रोजगार देण्यासाठी सरकारने हा कार्यक्रम सुरू केला. भूमिहीन कुटुंबातील एका व्यक्तीला शंभर दिवस रोजगार पुरवणे हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

५) **नेहरू रोजगार योजना:**

नेहरू रोजगार योजना देशात २ ऑक्टोबर १९८९ रोजी सुरू करण्यात आली. शहरी भागातील बेरोजगार युवकांना रोजगार देण्यासाठी ही योजना सरकारने सुरू केली असून दरवर्षी दहा लाख शहरी बेकाराना रोजगार देण्याचे उद्दिष्ट होते.

६) **दशलक्ष विहिरींची योजना :**

ही योजना सरकारने १९८८-८९ मध्ये सुरू केली. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम आणि ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रमांची उपायोजना म्हणून ही योजना सरकारने सुरू केली. १ जानेवारी १९९६

पासून सरकारने स्वतंत्रपणे ही योजना राबवण्यास सुरुवात केली. ही योजना केंद्र पुरस्कृत असून केंद्राचा वाटा ८० टक्के आणि राज्याचा वाटा २० टक्के आहे. दारिद्र्यरेषेखालील अल्पभूधारक आणि सीमांत शेतकऱ्यांसाठी (बिगर अनुसूचित जाती जमातीच्या) ही योजना सरकारने सुरू केली आहे.

**७) रोजगार आश्वासित योजना :**

ही योजना दोन ऑक्टोबर १९९३ पासून सुरु करण्यात आली आहे. दारिद्र्यरेषेखालील भूमिहीन शेतमजुरांना रोजगार मिळावा यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत प्राथमिक शाळा, अंगणवाड्यांचे बांधकाम, पाणलोट विकास कार्यक्रम यावर खर्च केला जातो.

**८) जवाहर रोजगार योजना :**

ही योजना सरकारने १ एप्रिल १९८९ पासून सुरू केली. ही योजना संपूर्ण भारतभर ग्रामपंचायतीद्वारे राबवली गेली. गावातील प्रत्येक कुटुंबातील एका सदस्याला गावाच्या जवळ वर्षातील ५० ते १०० दिवस रोजगार देणे हे या योजनेचे उद्दिष्ट होते. शेतीची कामे जेव्हा बंद असतात त्यावेळी ही योजना सुरू होते.

**९) स्वर्ण जयंती शहरी रोजगार योजना:**

ही योजना सरकारने १ डिसेंबर १९९७ रोजी सुरू केली. शहरी भागातील बेकारी कमी करण्यासाठी सरकारने ही योजना सुरू केली. युवकांना स्वयंरोजगारासाठी मदत करणे हा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेसाठी केंद्र सरकार ७५ टक्के आणि राज्य सरकार २५% खर्च करते.

**१०) स्वर्ण जयंती ग्राम रोजगार योजना:**

ही योजना सरकारने एप्रिल १९९९ मध्ये सुरू केली. ग्रामीण भागातील गरिबांना स्वयंरोजगार पुरविण्यासाठी सरकारने ही योजना सुरू केली आहे.

**११) प्रधानमंत्री रोजगार योजना** (PMRY):

ही योजना १९९३ पासून सुरू केली आहे. सुशिक्षित बेकारांना शाश्वत रोजगार (स्वयंरोजगार) उपलब्ध करून देण्यासाठी सरकारने ही योजना सुरू केली आहे.

**१२) प्रधानमंत्री ग्राम सडक योजना:**

ही योजना सरकारने २५ डिसेंबर २००० रोजी सुरू केली. भारत सरकारचे ग्रामीण मंत्रालय ही योजना राबवते. ग्रामीण भागात रस्ते तयार करणे व त्या माध्यमातून रोजगार निर्माण करणे हे या योजनेचे उद्देश आहेत.

**१३) अंत्योदय अन्न योजना:**

ही योजना सरकारने डिसेंबर २००० मध्ये सुरू केली. या योजनेअंतर्गत सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे गरिबांना स्वस्त दरात गहू व तांदूळ दिला जातो. गहू २ रुपये किलो दराने आणि तांदूळ ३ रुपये किलो दराने दिला जातो. एप्रिल २००२ पासून एका कुटुंबाला ३५ किलो धान्य दिले जाते.

**१४) प्रधानमंत्री ग्रामोदय योजना:**

ही योजना सरकारने २००० ते २००१ मध्ये सुरू केली. ग्रामीण भागातील शाश्वत मानवी विकासासाठी ही योजना सुरू केली आहे. प्राथमिक आरोग्य, प्राथमिक शिक्षण, पिण्याचे पाणी आणि पोषण यावर या योजनेचा भर आहे.

**१५) संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना :**

ही योजना सप्टेंबर २००१ मध्ये सुरू करण्यात आली. जवाहर ग्राम समृद्धी योजना आणि रोजगार आश्वासन योजना या दोन्ही योजनांचे एकत्रीकरण करून ही योजना सरकारने सुरू केली आहे.

**१६) इंदिरा आवास योजना:**

ही योजना १९८९ मध्ये सुरु करण्यात आली. ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांना मोफत घरे बांधून देण्यासाठी सरकारने ही योजना सुरू केली आहे.

**१७) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना:**

ग्रामीण भागातील वाढत्या बेकारीची समस्या सोडविण्यासाठी सरकारने ही योजना सुरू केली आहे. त्यासंबंधीचा कायदा सप्टेंबर २००५ मध्ये सरकारने पास केला. ही योजना २ फेब्रुवारी २००६ पासून सुरू झाली. १ एप्रिल २००८ पासून संपूर्ण भारतात ही योजना लागू करण्यात आली. २ ऑक्टोंबर २००९ मध्ये 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना' असे या योजनेचे नामकरण करण्यात आले. ग्रामीण भागातील लोकांना रोजगाराचा कायदेशीर हक्क प्राप्त करून देणे हा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेवरील खर्च केंद्र सरकार ८० टक्के करते. ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला एका वर्षात शंभर दिवसांचा रोजगार उपलब्ध करून दिला जातो. महिलांना या योजनेत प्राधान्य दिले आहे. ३३% महिला कमीत कमी असल्या पाहिजेत अशी अट आहे. वनीकरण, भूविकास, जलसंधारण, पूर नियंत्रण अशी कामे काढली जातात. रस्ते तयार करणे अशीही कामे काढली जातात. दिवसाला २०० रुपये मजुरी दिली जाते. ही योजना जगातील सर्वात मोठी रोजगार हमी योजना मानली जाते.

**१८) पं. दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना**

ही योजना सरकारने २०१४ मध्ये सुरू केली. ग्रामीण भागातील दारिद्र्य कमी करण्यासाठी आणि शाश्वत रोजगार पुरवण्यासाठी सरकारने ही योजना सुरू केली आहे. ग्रामीण भागातील १९ ते ३९ वयोगटातील लोकांना प्रशिक्षण दिले जाते व त्यानंतर नियुक्ती दिली जाते.

**१९) मुद्रा योजना** (MUDRA):

मुद्रा योजना सरकारने ८ एप्रिल २०१५ रोजी सुरू केली. (Micro Units Development and Refinance Agency) सूक्ष्म, लहान उद्योगांना कर्ज पुरवठा करण्यासाठी ही योजना सुरू केली आहे. मुद्रा योजनेद्वारे २०१६-१७ मध्ये २ कोटी १८ लाख लोकांना ८१,१२ ,७२१ कोटी रुपयांचा कर्ज पुरवठा केला गेला होता.

**२०) स्टार्टअप इंडिया:**

स्टार्ट अप इंडिया योजना सरकारने जानेवारी २०१६ मध्ये सुरू केली. हुषार, बुद्धिमान, होतकरू तरुणांना प्रोत्साहन देण्यासाठी ही योजना सुरू केली आहे.

**२१) आत्मनिर्भर भारत योजना:**

कोरोना महामारीच्या काळात असंख्य लोकांचे रोजगार गेले. त्यांच्यासाठी सरकारने आत्मनिर्भर भारत योजना सुरू केली आहे. या योजनेचा उद्देश लोकांना सामाजिक सुरक्षिततेचे फायदे मिळवून देणे हा होता.

**२२) राष्ट्रीय कौशल्य धोरण:**

सन २००९ मध्ये सरकारने राष्ट्रीय कौशल्य धोरण जाहीर केले. राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेची स्थापना करण्यात आली. स्वयंरोजगाराला प्रोत्साहन देणे, नवप्रवर्तन आणि उद्योजकता वाढीस लावणे व त्या माध्यमातून रोजगार निर्मिती करणे हे या योजनेचे उद्देश आहेत. भारतात २२ मंत्रालयामार्फत विविध प्रकारचे कौशल्य कार्यक्रम आयोजित केले जातात. सन २०१५ मध्ये भारतात स्किल इंडिया मिशनची स्थापना करण्यात आली आहे.

**२३) प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना:**

सन २०१६ मध्ये ही योजना सुरू करण्यात आली आहे. तरुणांच्यात विविध प्रकारची कौशल्ये विकसित करणे हा या योजनेचा उद्देश आहे. कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातात.

**२४) मेक इन इंडिया:**

२५ सप्टेंबर २०१४ रोजी सरकारने मेक इन इंडिया ही योजना सुरू केली. उद्योजकतेला प्रोत्साहन देणे, औद्योगिकरण आणि रोजगार निर्मिती हे या योजनेचे उद्देश आहेत.

**समारोप**

अशा प्रकारे बेकारी ही भारतातील केवळ आर्थिक समस्या नसून ती एक सामाजिक आणि राष्ट्रीय समस्या आहे. कारण बेकारीमुळे भारतात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. वाढत्या बेकारीमुळे भारताच्या आर्थिक विकासात मोठा अडथळा निर्माण झाला आहे. म्हणून सरकारने बेकारी कमी करण्यासाठी विविध रोजगार योजना आखलेल्या आहेत व त्या योजनांची अंमलबजावणी केली आहे.

## ३.२.३ प्रादेशिक विषमता – कारणे, परिणाम आणि उपाय

**प्रास्ताविक**

प्रादेशिक असमतोल म्हणजेच विभागीय असंतुलन होय. विभागीय असमतोलास प्रादेशिक विषमतोल असेही म्हणतात. प्रादेशिक असमतोलाची समस्या ही भारतीय अर्थव्यवस्थे समोरील प्रमुख समस्या आहे. भारतात २९ घटक राज्ये आहेत. यापैकी काही राज्यांचा विकास झाला आहे. तर काही राज्ये मागासलेली आहेत. अशा प्रकारे भारतात सर्व राज्यांचा विकास झालेला नाही. म्हणून यास प्रादेशिक असमतोल असे म्हणतात. भारतात उत्तर भाग, वायव्य आणि पश्चिम भाग जेवढे प्रगत आहेत तेवढे पूर्व भाग, आग्नेय आणि

ईशान्य भाग प्रगत नाहीत. भारतात महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, तामिळनाडू, आंध्रप्रदेश, हरियाणा, पंजाब, पश्चिम बंगाल इ. अनेक राज्ये मागासलेली आहेत. प्रादेशिक असमतोलाची व्याख्या थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहे.

''जेव्हा एखाद्या देशातील काही प्रदेश विकसित असतात आणि काही प्रदेश अविकसित असतात तेव्हा त्याला प्रादेशिक विषमता किंवा विभागीय असंतुलन असे म्हणतात.''

**प्रादेशिक असमतोलाचे स्वरुप :**

भारतात पंजाब, महाराट्र, गुजरात इ. राज्यात दरडोई उत्पन्न जास्त आहे. तर बिहार, ओरिसा राज्यात दरडोई उत्पन्न अत्यंत कमी आहे. गुजरात, महाराष्ट्रासारख्या काही प्रगत राज्यांचा उत्पादन वाढीचा दर जास्त आहे. तर पश्चिम बंगाल, केरळ सारख्या राज्यातील उत्पादन वाढीचा दर खूपच कमी आहे. भारतात प्रगत राज्यात विजेचा दरडोई उपभोग जास्त आहे. तर मागास राज्यात तो खूपच कमी आहे. प्रगत राज्यात वाहनांची संख्या, रस्त्यांची लांबी, रेल्वे मार्गाची लांबी, टेलिफोनचा वापर जास्त आहे. तर मागास राज्यात वाहनांची संख्या कमी आहे. रस्त्यांची लांबी कमी आहे. रेल्वेमार्गाची लांबी आणि रेल्वे सुविधा खूपच कमी आहेत. मागास राज्यात टेलिफोनचा वापर करणाऱ्यांचे प्रमाणही कमी आहे. पंजाब, हरियाणासारख्या राज्यात बागाईत जमिनीचे प्रमाण मोठे आहे तर मागास राज्यात बागाईत शेतजमिनीचे प्रमाण खूपच कमी आहे. अशा प्रकारे भारतातील काही राज्यात दरडोई उत्पन्न, उत्पादन वृध्दीचा दर, विजेचा दरडोई उपभोग, पायाभूत सुविधा जास्त आहेत. तर काही राज्यात दरडोई उत्पन्न, उत्पादन वृध्दीचा दर, विजेचा दरडोई उपभोग कमी आहे. तसेच पायाभूत सुविधाही कमी आहेत. म्हणून भारतात विकासाच्या बाबतीत विभागीय असमतोल दिसून येतो.

**प्रादेशिक असमतोलाची/विभागीय असमतोलाची कारणे :**

भारतात काही राज्ये प्रगत आहेत तर काही राज्ये अप्रगत आहेत. म्हणजेच भारतात विभागीय असमतोल आहे. या विभागीय असमतोलाची काही कारणे थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत.

**१) ब्रिटिशांची अन्यायी राजवट :**

भारतात ब्रिटिशांनी सुमारे १५० वर्षे राज्य केले. बिटिशांची राजवट जुलमी, अन्यायी आणि विकासाला घातक होती. ब्रिटिशांना भारताचा विकास करायचा नव्हता. तर साधनसंपत्तीची लूट करावयाची होती. त्यामुळे ब्रिटिशांनी आपल्या सोयीच्या वाटणाऱ्या काही ठराविक राज्यातील मुंबई, कलकत्तासारख्या शहरांच्या विकासाकडेच लक्ष दिले. इतर सर्व राज्यांच्या विकासाकडे पूर्णतः दुर्लक्ष केले. म्हणून भारतातील प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न हा काही आजचा प्रश्न नसून ब्रिटिशांच्या काळापासून अस्तित्वात असलेला प्रश्न आहे.

**२) नैसर्गिक परिस्थिती :**

भारतातील प्रादेशिक असमतोलास नैसर्गिक घटकसुध्दा कारणीभूत आहेत. आसाम, नागालँड, सिक्कीम, मेघालय, मणिपूर इ. काही राज्यात डोंगराळ प्रदेश मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे विकासाला मर्यादा

पडतात. त्यामुळे ही राज्ये अनेक बाबतीत महाराष्ट्र, पंजाब, गुजरात इ. राज्यांच्या तुलनेत मागासलेली आहेत.

**३) सीमा भागाचा फारसा विकास न करण्याचे धोरण**

पाकिस्तान आणि चीनच्या सीमेवर जी राज्ये आहेत त्या राज्यांचा फारसा विकास झालेला नाही. याला सरकारी धोरण कारणीभूत आहे. पाकिस्तान व चीनने भारताबरोबर युध्द छेडले तर या दोन देशांच्या सीमेवरील राज्यांचे मोठे नुकसान संभवते. सीमेवरील राज्यांची जीवित व वित्त हानी मोठ्या प्रमाणावर होऊ नये यासाठी सरकारकडूनच सिक्कीम, अरुणाचल प्रदेश, काश्मीर इ. काही राज्यात फारशी गुंतवणूक केली जात नाही. कारण पाकिस्तान किंवा चीन बरोबर युध्द भडकले तर सीमावर्ती राज्यात केलेली अब्जावधी रुपयांची गुंतवणूक काही क्षणात नष्ट होऊ शकते. म्हणून सरकार सीमावर्ती राज्यात फारशी गुंतवणूक करत नाही. त्यामुळे भारतात स्वातंत्र्यानंतरसुध्दा प्रादेशिक असमतोल आढळून येतो.

**४) गुंतवणूकदारांचे धोरण**

देशी आणि विदेशी गुंतवणूकदारांचे गुंतवणूकीचे धोरण भारतातील प्रादेशिक असमतोलास कारणीभूत ठरले आहे. देशी आणि विदेशी गुंतवणूकदार महाराष्ट्र, गुजरात सारख्या राज्यातच गुंतवणूक करण्याला पसंती देतात. ज्या राज्यात पायाभूत सुविधा आणि इतर सुविधा मुबलक प्रमाणात आहेत, त्याच राज्यात गुंतवणूक करणे गुंतवणूकदारांना किफायतशीर वाटते. त्यामुळे देशी व विदेशी गुंतवणूकदार त्यांना सोयीच्या व सुरक्षित असणाऱ्या राज्यात किंवा प्रदेशातच गुंतवणूक करतात. त्यामुळे विकसित राज्येच आणखी विकसित होतात तर मागासलेली राज्ये मागासलेलीच राहतात.

**५) सहकारी चळवळीचा असमतोल विकास**

महाराष्ट्र, गुजरात, पंजाब, तामिळनाडू इ. सारख्या थोड्या राज्यातच सहकारी चळवळीचा चांगला विकास झाला आहे. तर बिहार, आसाम, नागालँड इ. विविध राज्यात सहकारी चळवळीचा फारसा विकास झालेला नाही. ज्या राज्यात सहकारी चळवळीचे काम चांगले आहे त्या राज्यात कृषी, औद्योगिक विकास चांगला झालेला आहे. त्यामुळे त्या राज्यात दरडोई उत्पन्न व रोजगारात वाढ घडून आली आहे. ज्या राज्यात मोठ्या प्रमाणावर सहकारी संस्था स्थापन झालेल्या नाहीत त्या राज्यातील लोकांना सहकाराचे फायदे फारसे मिळाले नाहीत. त्यामुळे तेथील लोकांचे दरडोई उत्पन्न कमी आहे. अशा प्रकारे सहकारी चळवळीचा असमतोल विकास हेसुध्दा भारतातील प्रादेशिक विषमतेचे प्रमुख कारण आहे.

**६) मागास राज्यांचे उत्पन्न कमी :**

भारतात २८ घटक राज्ये असून सर्व राज्यांचे उत्पन्न सारखे नाही. काही राज्यांना कर व इतर साधनांपासून अधिक उत्पन्न मिळते. तर काही राज्यांना उत्पन्नाच्या विविध साधनांपासून अत्यंत कमी उत्पन्न मिळते. महाराष्ट्र, गुजरात, पंजाबसारख्या राज्यांना कर व इतर साधनांपासून जेवढे उत्पन्न मिळते, तेवढे उत्पन्न भारताच्या पूर्व, आग्नेय आणि ईशान्येकडील राज्यांना मिळत नाही. त्यामुळे या राज्यांना विकासासाठी पैसा

अपुरा पडतो. अशा प्रकारे ज्या राज्यांचे उत्पन्न कमी आहे ती राज्ये अप्रगत राहिली आहेत. त्यामुळे भारतात विभागीय असंतुलन दिसून येते.

**७) उत्पादक लोकसंख्येचे प्रमाण असमान**

भारतात प्रत्येक राज्यात उत्पादक लोकसंख्येचे प्रमाण सारखे नाही. काही राज्यात उत्पादक लोकसंख्येचे प्रमाण जास्त आहे. तर काही राज्यात ते कमी आहे. १५ ते ६० या वयोगटातील लोकसंख्येस उत्पादक लोकसंख्या असे म्हणतात. उत्पादक लोकसंख्येचे प्रमाण जितके जास्त तितका देशाच्या विकासाचा वेग जास्त राहतो. भारतात काही राज्ये प्रगत आहेत आणि काही राज्ये अप्रगत आहेत. म्हणजेच भारतात विकासाच्या बाबतीत विभागीय असंतुलन आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे सर्व राज्यात उत्पादक लोकसंख्येचे प्रमाण सारखे नाही. महाराष्ट्र, गुजरात, पंजाब सारख्या राज्यात उत्पादक लोकसंख्येचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे या राज्यांचा वेगाने विकास होत आहे. याउलट आसाम, नागालँड, मणिपूर, अरुणाचल प्रदेश इ. राज्यात लोकसंख्येचा आकार कमी आहे. तसेच उत्पादक लोकसंख्येचे प्रमाणही कमी आहे. त्यामुळे ही राज्ये अद्यापही मागासलेली राहिली आहेत.

**८) लोकसंख्येचा गुणात्मक दर्जा कमी**

राज्याचा किंवा देशाचा आर्थिक विकास हा केवळ लोकसंख्येवर किंवा श्रमाच्या पुरवठ्यावर अवलंबून नसतो. तर लोकसंख्येच्या गुणात्मक दर्जावरसुध्दा अवलंबून असतो. भारतातील सर्व राज्यातील लोकसंख्येचा गुणात्मक दर्जा सारखा नाही. महाराष्ट्र, गुजरात सारख्या आठ ते दहा राज्यातील लोकसंख्येचा गुणात्मक दर्जा चांगला आहे. त्यामुळे त्या राज्यांचा चांगला विकास होत आहे. भारतातील उर्वरित राज्यातील लोकसंख्येचा गुणात्मक दर्जा चांगला नाही. त्यामुळे ती राज्ये विकासाच्या बाबतीत पिछाडीवर राहिली आहेत. म्हणून भारतात प्रादेशिक असमतोल दिसून येतो.

**९) औद्योगिक प्रगती असमान:**

राज्याचा किंवा देशाचा आर्थिक विकास हा औद्योगिक विकासावरसुध्दा अवलंबून असतो. औद्योगिक विकासाचा वेग जितका जास्त तितका देशाच्या आर्थिक विकासाचा वेग जास्त राहतो. भारतात विभागीय असंतुलन आढळण्याचे प्रमुख कारण म्हणजे भारतात असमतोल औद्योगिक विकास झाला आहे. म्हणजे महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, गुजरात सारख्या थोड्या राज्यातच औद्योगिक विकास घडून आला आहे. तर उर्वरित राज्यात उद्योगधंद्यांचे प्रमाण खूपच कमी आहे. त्यामुळे या राज्यांचा विकासाचा दर सुध्दा कमी आहे. अशा प्रकारे असमतोल औद्योगिक विकास हे भारतातील विभागीय असमतोलाचे प्रमुख कारण आहे.

**१०) शहरीकरणाचा वेग कमी–जास्त**

शहरीकरणासच नागरीकरण असे म्हणतात. आर्थिक विकास ज्या विविध घटकांवर अवलंबून असतो त्यापैकी शहरीकरण हा एक महत्त्वाचा घटक आहे. शहरीकरणाचा वेग जास्त असेल तर आर्थिक विकासाचा वेग जास्त राहतो. भारतात सर्व राज्यात शहरीकरणाचा वेग सारखा नाही. महाराष्ट्र, गुजरातसारख्या काही

राज्यात शहरीकरणाचा वेग चांगला आहे. या राज्यात शहरांची आणि शहरात राहणाऱ्या लोकांची संख्या जास्त आहे. याउलट आसाम, अरुणाचल प्रदेश सारख्या अनेक राज्यात शहरीकरणाचा वेग कमी आहे. शहरांची संख्या कमी आहे. त्यामुळे त्या राज्यांचा विकासाचा वेग सुद्धा कमी आहे. अशा प्रकारे भारतात ज्या राज्यात शहरीकरणाचा वेग मंद आहे त्या राज्यांना शहरीकरणाचे फायदे मिळत नाहीत. त्यामुळे ती राज्ये मागासलेली राहिली आहेत. म्हणून मागास राज्यात शहरीकरणाचा मंद वेग हेसुद्धा भारतातील विभागीय असमतोलाचे मुख्य कारण ठरले आहे.

**११) मागास भागात पायाभूत सुविधांची कमतरता:**

ज्या आर्थिक, सामाजिक सुविधांवर देशाचा विकास अवलंबून असतो त्या सुविधांना पायाभूत सुविधा असे म्हणतात. वाहतूक, दळणवळण, ऊर्जा, पाणी, शिक्षण आरोग्य इत्यादींना पायाभूत सुविधा असे म्हणतात. भारतात सर्व राज्यात पायाभूत सुविधांची संख्यात्मक आणि गुणात्मक प्रगती सारखी झालेली नाही. महाराष्ट्र, गुजरात, पंजाब इत्यादी सारख्या आठ-दहा राज्यात पायाभूत सुविधा जेवढ्या प्रमाणात आहेत तेवढ्या प्रमाणात बिहार, ओरिसा, आसाम इत्यादी अनेक राज्यात नाहीत. त्यामुळे त्या राज्यांचा विकास झालेला नाही. कारण पायाभूत सुविधा मुबलक प्रमाणावर असतील तरच शेती उद्योग आणि व्यापार क्षेत्राचा विकास होऊन राज्याचा विकास घडून येतो. अशा प्रकारे भारतात मागास राज्यात पायाभूत सुविधांची कमतरता आहे. म्हणून त्या राज्यांचा उत्पादन वाढीचा आणि दरडोई उत्पन्न वृद्धीचा वेग कमी आहे.

अशा प्रकारे वरील विविध कारणांमुळे भारतात विकासाच्या बाबतीत असमतोल निर्माण झाला आहे. म्हणजेच काही राज्ये विकसित आहेत तर काही राज्ये अविकसित आहेत.

**प्रादेशिक असमतोलाचे दुष्परिणाम**

प्रादेशिक असमतोल ही भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील प्रमुख समस्या आहे. भारत हा खंडप्राय देश आहे. सुमारे २९ घटक राज्ये भारतात आहेत. प्रत्येक राज्याची नैसर्गिक परिस्थिती किंवा नैसर्गिक साधनसंपत्ती सारखी नाही. त्यामुळे काही प्रमाणात विभागीय असमतोल किंवा प्रादेशिक विषमता राहणारच. भारतात प्रादेशिक विषमता अस्तित्वात आहे. तिचे काही दुष्परिणाम जाणवतात. ते दुष्परिणाम थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

**१) स्थलांतराची समस्या :**

प्रादेशिक असमतोल म्हणजे देशातील काही भाग प्रगत असणे आणि काही भाग मागासलेले असणे होय. देशात जर अशा प्रकारची विषमता अस्तित्वात असेल तर अप्रगत (मागास) भागातून प्रगत भागात लोक मोठ्या प्रमाणात स्थलांतर करतात. भारतात हे प्रकर्षाने जाणवत आहे. मागास भागातून दरवर्षी हजारो लोक महाराष्ट्र, गुजरात सारख्या राज्यात पोटापाण्यासाठी येत आहेत. मागास राज्यातून प्रगत राज्यात होणारे स्थलांतराचे प्रमाण वाढत चालले आहे. मागास भागातून उत्पादक किंवा कार्यकारी लोकसंख्या प्रगत राज्यात मोठ्या प्रमाणात स्थलांतरित होत असल्यामुळे प्रगत राज्ये आणखी प्रगत होत आहेत. तर मागास राज्ये

आणखी मागास होत आहेत. म्हणजेच स्थलांतरामुळे प्रादेशिक विषमतेत वाढ होत आहे. मागास भागातून चांगले/उत्पादक मनुष्यबळ विकसित राज्यात स्थलांतरित होत असल्याने मागास राज्यात चांगल्या मनुष्यबळाचा तुटवडा पडून मागास राज्यांचे नुकसान होत आहे. तसेच प्रादेशिक विषमतेमुळे उद्धवणाऱ्या स्थलांतरामुळे इतरही काही समस्या निर्माण होत आहेत. त्यातील मुख्य समस्या म्हणजे परप्रांतियांची समस्या. इतर राज्यातून जे मजूर किंवा अन्य लोक दुसऱ्या राज्यात कामासाठी जातात त्यांना परप्रांतिय असे म्हणतात. या परप्रांतिय लोकांना स्थानिक लोकांकडून मोठा विरोध होत आहे. परप्रांतिय मजूर कमी मजुरीत काम करतात. कामावर अनुपस्थित राहत नाहीत. त्यामुळे स्थानिक ठेकेदार, कारखानदार यांच्याकडून परप्रांतिय मजुरांना अधिक मागणी आहे. परप्रांतियांमुळे आम्हाला काम मिळत नाही अशी भावना स्थानिक लोकांची झाली आहे. त्यामुळे परप्रांतियांबद्दलचा द्वेष वाढीस लागला आहे. परप्रांतियांना हुसकावून लावणे, त्यांना मारहाण करणे असे प्रकार वाढत आहेत. अशा प्रकारे प्रादेशिक असमतोलामुळे जी स्थलांतराची समस्या उद्धवते त्यामुळे इतरही काही गंभीर प्रश्न निर्माण होतात. म्हणून प्रादेशिक विषमता कमी केली पाहिजे. मागास प्रदेशांचा विकास घडवून आणला पाहिजे.

### २) राष्ट्रीय उत्पन्नात घट

प्रादेशिक असमतोलाचा आणखी एक दुष्परिणाम म्हणजे प्रादेशिक असमतोलामुळे देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात घट होते. मागास प्रदेशात शेती, उद्योग, व्यापार ही क्षेत्रे मागासलेली असतात. त्यामुळे उत्पादन व उत्पन्न कमी राहते. राज्याचे स्थूल उत्पादन कमी असल्याने स्थूल देशांतर्गत उत्पादन सुद्धा कमी राहते. भारतात सात ते आठ राज्ये प्रगत आहेत. बाकीची २०-२२ राज्ये तुलनेने मागासलेली आहेत. मागासलेल्या राज्यांचे उत्पन्न कमी असल्याने त्या राज्यांचा एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा सुद्धा कमी आहे.अशा प्रकारे प्रादेशिक विषमतेमुळे (काही राज्ये मागासलेली असल्याने) राष्ट्रीय उत्पन्नात कमी भर पडते. त्यामुळे स्थूल देशांतर्गत उत्पादनातील वाढीचा दर (जीडीपी चा दर) कमी राहतो. म्हणून प्रादेशिक विषमतेचे प्रमाण कमी केले पाहिजे. म्हणजेच मागास प्रदेशातील कृषी, उद्योग, व्यापार, वाहतूक, दळणवळण क्षेत्रांचा विकास घडवून आणला पाहिजे. त्याशिवाय मागास राज्यांचा आणि देशाच्या आर्थिक विकासाचा दर वाढणार नाही.

### ३) नक्षलवादी चळवळी/ हिंसक चळवळी निर्माण होणे :

भारताच्या काही राज्यात नक्षलवादी चळवळ (हिंसक चळवळ) गेल्या अनेक दशकांपासून आजही अस्तित्वात आहे. त्याचे प्रमुख कारण प्रादेशिक विषमता हेच आहे. जी राज्ये मागासलेली आहेत अशा राज्यातच प्रामुख्याने नक्षलवादी चळवळीसारख्या हिंसक चळवळी फोफावलेल्या दिसून येतात. राज्यांचा मागासलेपणा वर्षानुवर्षे कमी न झाल्याने म्हणजेच राज्यांचा फारसा आर्थिक विकास न झाल्याने तेथील गरीब आदिवासी लोकांनी हिंसक कारवाया सुरू केल्या आहेत. गेली ३०-४० वर्षे या कारवाया सुरू आहेत. त्यामुळे राष्ट्रीय किंवा सरकारी मालमत्तेचे आत्तापर्यंत अब्जावधी रुपयांचे नुकसान झाले आहे.

**४) दारिद्र्याची समस्या :**

भारतासारख्या देशात प्रादेशिक विषमतेमुळे आणखी एक समस्या निर्माण झाली आहे आणि ती म्हणजे दारिद्र्याची समस्या होय. भारतातील दारिद्र्याची अनेक कारणे आहेत. त्यामध्ये प्रादेशिक असमतोल हे एक कारण आहे. प्रगत राज्यापेक्षा मागास राज्यात दारिद्र्याचे प्रमाण मोठे आहे. भारतातील दारिद्र्य नष्ट न होण्याचे प्रमुख कारण भारतात प्रादेशिक विषमता आहे.म्हणजेच मागासलेल्या राज्यांची संख्या प्रगत राज्यापेक्षा जास्त आहे. मागासलेल्या राज्यात कृषी, उद्योग, व्यापार ही सर्व क्षेत्रे मागासलेली असल्याने राज्य उत्पन्न आणि दरडोई उत्पन्न कमी आहे. मागास राज्यात रोजगाराच्या किंवा उत्पन्न मिळवण्याच्या संधी कमी असल्याने त्या राज्यात दारिद्र्याची समस्या गंभीर आहे.

**५) स्वतंत्र राज्याची मागणी:**

प्रादेशिक विषमतेचा आणखी एक दुष्परिणाम म्हणजे देशात जर प्रादेशिक विषमता असेल तर मागासलेल्या राज्यातील किंवा पुढारलेल्या राज्यातील काही पक्ष किंवा संघटना स्वतंत्र राज्याची मागणी करतात. त्यामुळे नवीन राज्ये निर्माण होतात. स्वतंत्र राज्याची मागणी मागास आणि प्रगत दोन्ही राज्ये करतात.

**६) स्वतंत्र देशाची मागणी:**

प्रादेशिक विषमता खूपच तीव्र किंवा गंभीर स्वरूपाची असेल तर मागासलेली राज्ये किंवा प्रगत राज्ये स्वतंत्र देशाची मागणी करू शकतात. किंवा देशाच्या अखंडतेला, एकात्मतेला आव्हान देऊ शकतात. भारतातील पंजाब प्रांतातून होणाऱ्या 'खलिस्तान'च्या मागणीला केवळ धार्मिक रंग नाही. काही प्रदेश फारच प्रगत असणे किंवा एखाद्या देशातील काही प्रदेश खूपच अविकसित अथवा मागासलेले असणे हे देशाच्या अखंडतेच्या दृष्टीने धोक्याच्या असते. म्हणून सरकारने प्रादेशिक विषमता कमी करण्यावरच भर दिला पाहिजे. म्हणजे मागास राज्यांना प्रगत राज्यांच्या बरोबरीने आणण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. जगातील काही देशात काही प्रांतांनी किंवा राज्यांनी स्वतंत्र देशाची मागणी करून ती मान्य करून घेतली आहे. अशा प्रकारे प्रादेशिक विषमता खूपच गंभीर स्वरूपाची असेल तर अखंड देशाचे तुकडे पडू शकतात. भारत सरकारनेसुद्धा याबाबतीत फारच सावधगिरी बाळगली पाहिजे. देशाचे तुकडे होऊ नयेत यासाठी, देश अखंड राहावा यासाठी सरकारने प्रादेशिक विषमता कमी करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. प्रादेशिक विषमता वाढणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

**७) बेकारीची समस्या:**

प्रादेशिक विषमतेमुळे देशात जशी दारिद्र्याची समस्या निर्माण होते तशी बेकारीचीसुद्धा समस्या निर्माण होते. बेकारीस जे अनेक घटक जबाबदार आहेत, त्यामध्ये प्रादेशिक असमतोल हा घटकसुद्धा जबाबदार आहे. प्रादेशिक विषमतेमुळे बेकारीत वाढ होते. कारण ज्या देशात प्रादेशिक विषमतेची समस्या आढळून येते त्या देशातील मागास राज्यात बेकारीचा प्रश्न दिसून येतो. मागास राज्यातील सर्व क्षेत्रे मागासलेली असतात.

तसेच कारखानदारीची फारशी वाढ झालेली नसते. देशी व विदेशी गुंतवणूकदार गुंतवणूक करण्याचे धाडस करत नाहीत. त्यामुळे मागास राज्यात रोजगार वाढत नाही. अशा प्रकारे प्रादेशिक विषमतेमुळे बेकारी वाढून बेकारीची समस्या गंभीर बनते.

**८) राज्यांची नाराजी**

सरकार आयकर व इतर कर बसवून उत्पन्न मिळवते. त्या उत्पन्नातील काही भाग सरकार मागास राज्यांच्या कल्याणासाठी खर्च करत असते. प्रगत राज्यातून उत्पन्न गोळा करून त्यातील काही हिस्सा मागास राज्यांच्या विकासासाठी खर्च करण्याचे सरकारचे धोरण आहे. परंतु या बाबतीत विरोध होताना दिसत आहे. काही राज्ये सरकारच्या या धोरणाला विरोध करत आहेत. प्रगत राज्यातून उत्पन्न गोळा करून त्याचा अधिक हिस्सा मागास राज्यांना देण्याचे सरकारचे धोरण आमच्यावर अन्यायकारक आहे असे प्रगत राज्यातील लोकप्रतिनिधींना वाटते. मागास राज्यांना उत्पन्नातील अधिक वाटा देण्याच्या सरकारच्या धोरणाबद्दल प्रगत राज्यातील राजकीय पक्षांची व जनतेची नाराजी वाढत आहे.

**९) सरकारी उत्पन्नात घट :**

सरकारला आयकर, जीएसटी इत्यादी विविध मार्गाने महसूल मिळतो. परंतु मागास राज्यात कृषी, उद्योग, व्यापार, वाहतूक, दळणवळण, बँकिंग या क्षेत्रांची फारशी प्रगती झालेली नसल्याने सरकारला मागासलेल्या राज्यातून करांच्या व इतर रूपाने फारसे उत्पन्न मिळत नाही. मागास प्रदेशातील सर्व क्षेत्रे मागासलेली असल्याने करापासून फारसे उत्पन्न मिळत नाही. म्हणून भारतासारख्या ज्या देशात प्रादेशिक असमतोलाची समस्या अस्तित्वात आहे, त्या देशांना कर व इतर साधनांपासून खूपच कमी महसूल मिळतो. हा प्रादेशिक विषमतेचा एक महत्त्वाचा दुष्परिणाम आहे. या दुष्परिणामाची तीव्रता कमी करण्यासाठी सरकारने प्रादेशिक विषमता वाढीस लागणार नाही आणि प्रादेशिक विषमता कमी होईल असे धोरण आखले पाहिजे.

**१०) सरकारवर आर्थिक बोजा :**

प्रादेशिक विषमतेचा आणखी एक दुष्परिणाम म्हणजे प्रादेशिक विषमतेमुळे सरकारवर फार मोठा आर्थिक बोजा पडतो. मागास प्रदेशांचा मागासलेपणा घालवण्यासाठी सरकारला प्रचंड खर्च करावा लागतो. खाजगी गुंतवणूकदार आणि विदेशी गुंतवणूकदार मागास राज्यात गुंतवणूक करण्याचे धाडस करत नाहीत. त्यामुळे सरकारला पुढाकार घेऊन विविध क्षेत्रात प्रचंड गुंतवणूक करावी लागते. गुंतवणूकदारांनी मागास प्रदेशात गुंतवणूक करावी यासाठी सरकारला गुंतवणूकदारांना काही सवलती द्याव्या लागतात. सरकार गुंतवणूकदारांना करामध्ये सवलती देते तसेच कर्जावरील व्याजदरात सवलती देते. अनुदानेसुद्धा देते. त्यामुळे सरकारवर मोठा आर्थिक बोजा पडतो. मागास प्रदेशांच्या विकासासाठी प्रसंगी सरकारला कर्ज घ्यावे लागते. हा प्रादेशिक विषमतेचा एक मोठा दुष्परिणाम आहे. म्हणून सरकारने प्रादेशिक विषमता वाढणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

### ११) पर्यटन व्यवसायावर प्रतिकूल परिणाम:

मागासलेल्या राज्यात पर्यटन व्यवसायाची चांगली वाढ होऊ शकते. परंतु मागास राज्यात पायाभूत सुविधांची कमतरता असल्याने देशी आणि विदेशी पर्यटक तिकडे फारसे जात नाहीत. त्यामुळे मागास राज्यात पर्यटन व्यवसाय वाढत नाही. म्हणून सरकारने मागास राज्यांच्या विकासावर अधिक भर दिला पाहिजे. म्हणजे प्रादेशिक विषमता कमी करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. मागास राज्यांना प्रगत राज्यांच्या बरोबरीने आणण्याचे प्रयत्न सरकारने केले पाहिजेत.

### सारांश

अशा प्रकारे भारतासारख्या ज्या देशात प्रादेशिक विषमतेची समस्या आढळून येते त्या देशांना प्रादेशिक विषमतेच्या काही समस्यांना तोंड द्यावे लागते. प्रादेशिक विषमतेमुळे स्थलांतर वाढून शहरावर ताण पडतो. प्रगत राज्यात अस्वस्थता, अशांतता निर्माण होते. स्थलांतरित नागरिकांबद्दल नाराजी निर्माण होते. नक्षलवादी (हिंसक) चळवळी निर्माण होतात. प्रादेशिक विषमतेमुळे दारिद्र्य, बेकारी आणि आर्थिक विषमता ह्या समस्या अधिकच गंभीर होतात. देशांतर्गत उत्पादनात कमी भर पडते. त्यामुळे आर्थिक विकासाचा दर कमी राहतो. नैसर्गिक कारणामुळे आणि पाकिस्तान, चीनच्या सीमेवरील राज्यांच्या सुरक्षिततेच्या कारणासाठी फारसा विकास न करण्याचे सरकारचे धोरण असल्यामुळे प्रादेशिक विषमता थोडी-फार राहणारच. देशातील सर्वच राज्यांचा सारखाच समतोल विकास होऊ शकत नाही. कारण प्रत्येक राज्याची आर्थिक, नैसर्गिक परिस्थिती वेगवेगळी आहे. काही राज्यात नैसर्गिक परिस्थिती चांगली आहे. नैसर्गिक साधनसंपत्ती विपुल प्रमाणात आहे. तर काही राज्यात निसर्ग प्रतिकूल आहे. नैसर्गिक साधनसंपत्ती कमी प्रमाणात आहे. असे असले तरी प्रादेशिक विषमता फारशी वाढीस लागणार नाही याची काळजी सरकारने घेतली पाहिजे.

### विभागीय असमतोल कमी करण्यासाठी उपाय:

नैसर्गिक कारणामुळे आणि चीन व पाकिस्तानच्या सीमेवरील राज्यांचा फारसा विकास करता येत नसल्याने भारतात विकासाच्या बाबतीत प्रादेशिक असमतोल राहणारच आहे. परंतु हा प्रादेशिक असमतोल कमी करणे शक्य आहे आणि आवश्यक सुद्धा आहे. सीमेवरील राज्ये सोडून इतर राज्ये जी मागासलेली आहेत त्यांचा मागासलेपणा कमी केल्याशिवाय भारतातील विभागीय असमतोल कमी होणार नाही. भारतातील मागासलेल्या राज्यांचा मागासलेपणा कमी व्हावा यासाठी काही उपाय खालीलप्रमाणे सुचवले आहेत.

### १) मागास राज्यात विदेशी गुंतवणूक आकर्षित करणे:

विदेशी गुंतवणुकीमुळे आर्थिक विकासाचा वेग वाढतो. परंतु भारतात विदेशी गुंतवणूक ही प्रामुख्याने महाराष्ट्र, गुजरात सारख्या प्रगत राज्यातच मोठ्या प्रमाणात होते. विदेशी गुंतवणूकदार मागास राज्यात गुंतवणूक करण्यास नाखूष असतात. म्हणून मागास राज्यात विदेशी गुंतवणुकीचा ओघ यावा यासाठी सरकारने प्रयत्न करणे आवश्यक आहे. मागास राज्यात विदेशी गुंतवणूक यावी यासाठी सरकारने विदेशी

गुंतवणूकदारांना किंवा कंपन्यांना विशेष सवलती द्याव्यात. त्यामुळे मागास भागात विदेशी गुंतवणूक वाढून मागास भागाच्या विकासास चालना मिळेल.

**२) नदीजोड प्रकल्पाची अंमलबजावणी करणे :**

राष्ट्रीय नदी जोड प्रकल्पाची चर्चा होते परंतु त्याची अंमलबजावणी मात्र होत नाही. म्हणून सरकारने जलद आर्थिक विकासासाठी आणि प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी राष्ट्रीय, राज्य आणि जिल्हा पातळीवर नदी जोड प्रकल्प राबवला पाहिजे. त्याचे अनेक फायदे देशाला होणार आहेत. मागास, दुष्काळी भागाला, वाळवंटी भागाला पाण्याची सुविधा मिळून मागास भागातील शेतीचा, औद्योगिक क्षेत्राचा विकास घडून येणार आहे. म्हणून मागास प्रदेशांना जास्तीत जास्त लाभ मिळावा अशा प्रकारचे नियोजन करून सरकारने देशभर नदीजोड प्रकल्प तयार करून त्याची अंमलबजावणी केली पाहिजे.

**३) मागास भागात पायाभूत सुविधा वाढविणे :**

भारतातील मागासलेल्या राज्यात रस्ते, लोहमार्ग, वीज, पाणी, दळणवळण इत्यादी पायाभूत सुविधांची कमतरता आहे. तसेच या सुविधांचा दर्जाही फारसा चांगला नाही. म्हणून सरकारने मागास भागात जास्तीत जास्त पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर भर द्यावा. तसेच या सुविधा वर्षभर उपलब्ध होतील असे प्रयत्न सरकारने करावेत. त्याशिवाय मागासलेल्या राज्यात औद्योगिक क्षेत्रात गुंतवणूक करण्यासाठी उद्योजक पुढे येणार नाहीत. अशा प्रकारे मागास राज्यात पायाभूत सुविधांचा विकास केल्याशिवाय मागास राज्यांचा मागासलेपणा कमी होणार नाही.

**४) मागास राज्यातील शेतीचा विकास घडवून आणणे:**

शेतीचा विकास घडून आल्याशिवाय देशाचा विकासाचा दर वाढत नाही. परंतु भारतातील मागासलेल्या राज्यातील शेती मागासलेली आहे. त्यामुळे मागास राज्यांचा आणि देशाचा आर्थिक विकासाचा दर कमी आहे. म्हणून मागासलेल्या राज्यांचा मागासलेपणा दूर करण्यासाठी त्या राज्यातील शेतीची उत्पादकता वाढवली पाहिजे. मागासलेल्या राज्यातील शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी सिंचन सुविधात वाढ, धरण, पाटबंधारे इत्यादींच्या सुविधेत वाढ करणे इत्यादी उपाय योजले पाहिजेत. मागास राज्यात शेतीचा विकास घडून आल्यास तेथील लोकांच्या उत्पन्नातही वाढ होईल आणि राज्याच्या उत्पन्नातही वाढ होईल.

**५) मागास राज्यात पर्यटन स्थळांचा विकास :**

भारतातील गोव्यासारखे राज्य प्रगत असण्याचे प्रमुख कारण म्हणजे तेथे पुष्कळ पर्यटन स्थळे असून जगभरातील पर्यटक गोव्यात दरवर्षी मोठ्या संख्येने येतात. त्यामुळे तेथील लोकांच्या रोजगारात वाढ झाली असून उत्पन्नातही वाढ झाली आहे. पर्यटन व्यवसायामुळे गोवा राज्याचे उत्पन्न हे अधिक आहे .म्हणून भारतातील प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी सरकारने मागास राज्यात पर्यटन स्थळांचा विकास करण्याचे धोरण आखावे. तसेच मागास राज्यात नवनवीन पर्यटन स्थळे निर्माण करून त्याची माहिती देशातील तसेच जगभराच्या पर्यटकांना द्यावी. यामुळे मागास राज्यात पर्यटकांचा ओघ वाढून मागास

राज्यातील लोकांना मिळणाऱ्या रोजगारात, दरडोई उत्पन्नात वाढ होऊन मागास राज्यांचा मागासलेपणा दूर होईल.

**६) मागास राज्यात सार्वजनिक गुंतवणूक वाढवणे :**

सार्वजनिक गुंतवणूक म्हणजे सरकारी गुंतवणूक होय. १९९१ पासून म्हणजे नवीन आर्थिक धोरण स्वीकारल्यापासून भारत सरकार अर्थव्यवस्थेतून हळूहळू आपली जबाबदारी किंवा गुंतवणूक कमी करत आहे. परंतु मागास भागाची प्रगती व्हायची असेल तर सरकारने मागास भागात पुढाकार घेऊन मोठी गुंतवणूक केली पाहिजे. त्याशिवाय मागासलेल्या राज्यांचा मागासलेपणा दूर होणार नाही. अशा प्रकारे भारतातील विभागीय असंतुलन कमी करण्यासाठी भारत सरकारने मागास राज्यात विविध देशात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली पाहिजे.

**७) नैसर्गिक साधन संपत्तीचा पुरेपूर व काळजीपूर्वक वापर:**

खनिजे, जंगले, पाणी, हवामान इत्यादींना नैसर्गिक साधनसंपत्ती असे म्हणतात. या नैसर्गिक साधनसंपत्तीवरच राज्याचा किंवा देशाचा विकास अवलंबून असतो. भारतात जेवढी एकूण मागासलेली राज्ये आहेत त्यापैकी बहुसंख्य राज्यात विविध नैसर्गिक साधन संपत्ती विपुल प्रमाणात आहे. या साधनसंपत्तीचा योग्य, पुरेपूर वापर जर झाला तर तेथील लोकांच्या आणि राज्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्यांचा मागासलेपणा कमी होईल. थोडक्यात भारतातील विकासातील प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी सरकारने मागास राज्यातील नैसर्गिक साधन संपत्तीचा पुरेपूर व काळजीपूर्वक वापर केला पाहिजे.

**८) मागास राज्यांना द्यावयाच्या मदतीत वाढ करणे :**

मागास राज्यांचा मागासलेपणा दूर करण्यासाठी केंद्र सरकारकडून मागास राज्यांना आर्थिक मदत दिली जाते. परंतु ही मदत अपुरी असल्याने अद्याप मागास राज्ये प्रगत राज्यांच्या बरोबरीने येऊ शकलेली नाहीत. म्हणून सरकारने मागास राज्यांना आर्थिक मदत वाढवून द्यावी. त्याशिवाय मागास राज्यांच्या उत्पादन वाढीचा दर वाढणार नाही.

**९) मागास राज्यात नाणेबाजार व भांडवल बाजाराचा विकास करणे:**

अल्पमुदतीचा कर्ज पुरवठा करणाऱ्या संस्थांचा समावेश नाणेबाजारात होतो. तर दीर्घ मदतीचा कर्ज पुरवठा करणाऱ्या संस्थांचा समावेश भांडवल बाजारात होतो. भारतातील मागासलेल्या राज्यात नाणेबाजाराचा आणि भांडवल बाजाराचा फारसा विकास झालेला नाही. म्हणून सरकारने मागास राज्यात खाजगी, सहकारी व सरकारी बँकांच्या जास्तीत जास्त शाखा उघडणे, दीर्घ मुदतीचा कर्ज पुरवठा करणाऱ्या औद्योगिक, वित्तीय संस्थांना मदत करणे इत्यादी उपाय योजले पाहिजेत. त्याशिवाय मागास राज्यातील शेती व उद्योगांचा विकास होणार नाही.

**१०) मागास राज्यात नवीन शहरांची निर्मिती :**

प्रगत राज्यापेक्षा मागास राज्यात शहरांची संख्या कमी आहे. म्हणून सरकारने मागास राज्यात पुरेशा प्रमाणात योग्य आकाराची शहरे निर्माण करावीत. नवीन शहरांच्या निर्मितीमुळे उद्योग, व्यवसाय, व्यापार यामध्ये वाढ होऊन रोजगारात, दरडोई उत्पन्नातही वाढ होईल. म्हणून मागास राज्यात नवीन शहरांच्या निर्मितीवर सरकारने भर द्यावा.

**११) मागास राज्यात औद्योगीकरण घडवून आणणे:**

पाकिस्तान व चीन या देशांच्या सीमेवरची राज्ये वगळता उर्वरित मागास राज्यात औद्योगीकरण घडवून आणले पाहिजे. मागास राज्यात औद्योगिक विकास घडून आला तर तेथील रोजगारात, दरडोई उत्पन्नात आणि राज्य उत्पादनातही वाढ घडून येईल.

अशा प्रकारे भारतातील मागासलेल्या राज्यांचा मागासलेपणा कमी करण्यासाठी म्हणजेच भारतातील विभागीय असंतुलन दूर करण्यासाठी वरीलप्रमाणे विविध उपाय योजणे आवश्यक आहे.

## ३.२.४ समांतर अर्थव्यवस्था – काळा पैसा (Parallel Economy – Black Money)

**प्रास्ताविक**

भारतात स्वातंत्र्योत्तर काळात काळ्या पैशाची समांतर अर्थव्यवस्था निर्माण झाली आहे. अर्थव्यवस्थेत काळ्या पैशाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. काळ्या पैशाला बेहिशेबी पैसा किंवा बेकायदेशीर पैसा असे म्हणतात. देशात अशा काळ्या पैशाचे प्रमाण एवढे वाढले आहे की त्यामुळे काळ्या पैशाची एक प्रकारे समांतर अर्थव्यवस्थाच निर्माण झाली आहे. या काळ्या पैशाचे आकारमान दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे काही गंभीर समस्याही देशात निर्माण झाल्या आहेत. काळ्या पैशाचे प्रमाण कमी करण्यासाठी सरकारने अनेक कठोर उपाय योजले आहेत. तरीही काळ्या पैशाची निर्मिती थांबलेली नाही. देशात दिवसेंदिवस वाढत असलेला काळा पैसा हे सरकार समोरील आणि भारतीय अर्थव्यवस्थे समोरील फार मोठे आव्हान आहे. या प्रकरणात काळा पैसा निर्माण होण्याची कारणे, काळ्या पैशाचे परिणाम आणि काळा पैसा रोखण्यासाठी सरकारने योजलेले उपाय या बाबींची चर्चा केली आहे.

**काळा पैसा म्हणजे काय?**

जो पैसा हिशेबात नसतो अशा बेहिशेबी पैशाला काळा पैसा असे म्हणतात. काळ्या पैशाला सरकारची, कायद्याची मान्यता नसते. म्हणून अशा पैशाला बेकायदेशीर पैसा असे म्हणतात. अशा काळ्या पैशाचे प्रमाण प्रचंड वाढले की देशात बेहिशेबी अर्थव्यवस्था तयार होते. तिलाच बेकायदेशीर अर्थव्यवस्था किंवा समांतर अर्थव्यवस्था अथवा काळ्या पैशाची समांतर अर्थव्यवस्था असे म्हणतात. ज्या व्यवहारांना समाजाची मान्यता नसते किंवा कायद्याची मान्यता नसते अशा व्यवहारातून निर्माण होणाऱ्या पैशाला काळा पैसा असे म्हणतात. उदाहरणार्थ चोऱ्या, दरोडे, भ्रष्टाचार किंवा लाचलुचपत इतर अनैतिक व्यवसाय (जुगार,

साठेबाजी व सट्टेबाजी इ.) यातून जे उत्पन्न मिळते, त्याला काळा पैसा असे म्हणतात. बेकायदेशीर व्यवहारातून किंवा बेकायदेशीर व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात केला जात नाही. कॅल्डॉर समितीने काळ्या पैशाची व्याख्या खालील शब्दात केली आहे.

''आयकर (Income Tax) चूकवून जो पैसा मिळवला जातो किंवा जवळ बाळगला जातो, त्याला काळा पैसा असे म्हणतात.''

कॅल्डॉर यांची काळ्या पैशाची व्याख्या सोपी आणि सुटसुटीत असली तरी ती परिपूर्ण नाही. कारण काळा पैसा केवळ आयकर चुकल्यामुळे किंवा बुडवल्यामुळे निर्माण होत नाही. इतरही अनेक मार्गांनी काळा पैसा निर्माण होतो. म्हणून कायद्याची मान्यता नसणाऱ्या व्यवहारातून निर्माण होणारा पैसा म्हणजे काळा पैसा ही काळ्या पैशाची व्याख्या अधिक व्यापक किंवा परिपूर्ण मानता येईल.

**भारतातील काळा पैसा –**

भारतात नेमका किती काळा पैसा आहे, ते ठामपणे किंवा अचूकपणे सांगता येत नाही. काळ्या पैशाचा अभ्यास अनेक तज्ञांनी केला आहे. तसेच काही समित्यांनी आणि संस्थांनी सुध्दा भारतातील काळ्या पैशाचा अंदाज लावण्याचा प्रयत्न केला आहे. कॅल्डॉर, डी.के रांगणेकर, ओ. पी चोप्रा, पी.एस.गुप्ता, संजीव गुप्ता, सूरज गुप्ता, वांछू समिती, डी. के. रांगणेकर समिती, नियोजन मंडळ, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक फायनान्स अॅन्ड पॉलीसी (NIPFP) यांनी भारतातील काळ्या पैशाचा सखोल अभ्यास करून काळ्या पैशाच्या निर्मितीची कारणे आणि काळ्या पैशाचे आकारमान शोधून काढण्याचा प्रयत्न केला आहे. भारतात किती काळा पैसा असवा? याचे अंदाज या तज्ञांनी व समित्यांनी दिले आहेत. भारतातील काळ्या पैशाचे अंदाज थोडक्यात खालीलप्रमाणे दिले आहेत.

**भारतातील विविध कालखंडातील काळा पैसा**

| अ.क्र. | समितीचे नाव/तज्ञांचे नाव | वर्ष | काळा पैसा | एकूण राष्ट्रीय उत्पन्नाशी (GNP) काळ्या पैशाचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | एन कॅल्डॉर | १९५३-५४ | ६०० कोटी रुपये | ६% |
| २ | ओ. पी. चोप्रा | १९६०-६१ | ९१६ कोटी रुपये | ६.१% |
| | | १९६१-६२ | ७१६ कोटी रुपये | ४.५% |
| | | १९६५-६६ | १४३९ कोटी रुपये | ६.४% |
| | | १९६८-६९ | १३१८ कोटी रुपये | ४% |
| | | १९७३-७४ | ४७५७ कोटी रुपये | ८.१% |
| | | १९७६-७७ | ८०९८ कोटी रुपये | १०.५% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | वांछू समिती | १९६१-६२ | ७०० कोटी रुपये | ४.४% |
| | | १९६५-६६ | १००० कोटी रुपये | ४.२% |
| | | १९६८-६९ | १४०० कोटी रुपये | ४.२% |
| ४ | डी. के. रांगणेकर | १९६१-६२ | ११५० कोटी रुपये | ७.२% |
| | | १९६५-६६ | २३५० कोटी रुपये | ८.८% |
| | | १९६८-६९ | २८३३ कोटी रुपये | ८.६% |
| | | १९६९-७० | ३०८० कोटी रुपये | ८.४% |
| ५ | पूनम गुप्ता आणि संजय गुप्ता | १९६८-६९ | ४४०५ कोटी रुपये | १३.४% |
| | | १९७३-७४ | १५८९५ कोटी रुपये | २७% |
| | | १९७६-७७ | ३००१५ कोटी रुपये | ३९% |
| | | १९७८-७९ | ४६८६७ कोटी रुपये | ४८.८% |
| ६ | नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक फायनान्स अॅन्ड पॉलिसी (डॉ. आचार्य, डॉ. राजा चेलय्या) | १९८०-८१ | २०३६२ कोटी रुपये ते २३६७८ कोटी रुपये | १८ ते २१% |
| | | १९८३-८४ | ३१५८४ कोटी रुपये ते ३६७८४ कोटी रुपये | १८ ते २१% |
| ७ | सूरज बी. गुप्ता | १९८०-८१ | ५०९७७ कोटी रुपये | ४१.७% |
| | | १९८७-८८ | १,४९,२९७ कोटी रुपये | ५०.७% |
| ८ | पार्लमेंट स्थायी समिती | १९९४-९५ (१९८०-८१ च्या किंमतीनुसार) | ३ लाख कोटी रुपये | |
| | | १९९४-९५ (चालू किंमतीनुसार) | ११ लाख कोटी रुपये | |

वरील तक्त्यावरुन भारतातील काळ्या पैशाची आपणास कल्पना येते. काळ्या पैशाचे प्रमाण आज राष्ट्रीय उत्पन्नाच्या ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त असावे असा तज्ञांचा अंदाज आहे. सन १९५३-५४ साली भारतात काळ्या पैशाचे प्रमाण एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६ टक्के एवढे होते. आज ते ५० टक्क्यावर गेले आहे. यावरून काळ्या पैशाचे प्रमाण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ५० टक्के इतके झाल्याने भारतात काळ्या पैशाची समांतर निर्माण झाली आहे असे म्हटले जाते.

**काळा पैसा निर्माण होण्याची कारणे**

भारतात दिवसेंदिवस काळा पैसा वाढत आहे. १९५३-५४ साली भारतात केवळ ६०० कोटी रुपये काळा पैसा होता आणि त्याचे एकूण राष्ट्रीय उत्पन्नाशी प्रमाण सहा टक्के एवढे होते. आज काळा पैसा १५ लाख कोटीपेक्षा अधिक वाढला असून या काळ्या पैशाचे राष्ट्रीय उत्पन्नाशी असेलेले प्रमाण सुध्दा ५० टक्केच्या वर गेले आहे. काळ्या पैशाच्या निर्मितीची आणि काळ्या पैशाच्या वाढीची कारणे थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत.

**१) चोरटी आयात/स्मगलिंग**

स्वातंत्र्योत्तर काळात भारतात काळ्या पैशाच्या प्रमाणात वाढ होण्याची जी अनेक कारणे आहेत त्यामध्ये चोरटी आयात हा घटक महत्वाचा आहे. यालाच स्मगलिंग असे म्हणतात. ही स्मगलिंग प्रामुख्याने समुद्रमार्गे होते. चोरट्या आयातीमुळे मोठ्या प्रमाणात काळा पैसा निर्माण होतो. कारण अशी आयात चोरुन केली जात असल्याने या आयातीपासून सरकारला शुल्क मिळत नाही. सीमा शुल्काचे दर जास्त असल्याने स्मगलर स्मगलिंग करतात. त्यामुळे सरकारचे उत्पन्न बुडते. स्मगलिंग रोखण्यात सरकारला संपूर्ण यश आलेले नाही. त्यामुळे काळ्या पैशाच्या निर्मितीत आणि प्रमाणात (आकारात) वाढ होत आहे.

**२) उत्पन्न करांचे दर जास्त –**

उत्पन्न करालाच प्राप्ती कर, आय कर (Income Tax) असे म्हणतात. भारतात आयकरांचे दर जास्त आहेत. व्यक्तीला, उद्योगसंस्थांना १० टक्क्यापासून ३० टक्क्यापर्यत आयकर द्यावा लागतो. लोकांना व कंपन्यांना करांचे दर खूप जास्त वाटतात. त्यामुळे कर चुकवण्याची किंवा कर बुडवण्याची इच्छा त्यांना होते. अनेक लोक सरकारला कमी उत्पन्न दाखवतात आणि कमी कर भरतात. अशा प्रकारे कर कमी भरुन लोक जे उत्पन्न जवळ बाळगतात किंवा जेवढ्या रकमेचा कर बुडवतात तेवढ्या रकमेला काळा पैसा असे म्हणतात. अशा प्रकारे सरकार अधिक दराने जनतेकडून आयकर वसूल करत असल्याने बहुतेक लोक कर बुडवतात किंवा कमी उत्पन्न दाखवून कमी कर भरतात.

**३) भ्रष्ट कर्मचारी व अधिकारी –**

भारतात काळा पैसा निर्माण होण्याला आणि तो वाढण्याला भ्रष्ट सरकारी कर्मचारी आणि अधिकारी सुध्दा जबाबदार आहेत. उद्योजकांना सरकारच्या विविध खात्याकडून विविध परवाने घ्यावे लागतात. त्यावेळी परवाने देताना काही भ्रष्ट कर्मचारी व अधिकारी उद्योजकांकडून लाच घेतात. ही लाचेची रक्कम म्हणजेच काळा पैसा होय. अशा प्रकारे भ्रष्ट, लाचखोर कर्मचारी आणि अधिकारी यांनी काळ्या पैशाचा प्रश्न देशात खूपच गंभीर करुन ठेवला आहे. दरवर्षी भारतात शेकडो कर्मचारी आणि अधिकारी लाच घेतल्याच्या कारणावरून पकडले जातात. त्यांच्याकडून अब्जावधी रुपयांची बेहिशोबी मालमत्ता जप्त केली जाते. फक्त २ टक्के भ्रष्ट कर्मचारी, अधिकारी सापडतात. ९८ टक्के सापडत नाहीत. त्यांच्याकडे कितीतरी

अब्ज कोटी रुपये काळा पैसा असावा. अशा प्रकारे भ्रष्ट कर्मचारी व अधिकारी यांच्या भ्रष्ट कारभाराने भारतात काळा पैसा निर्माण होत आहे. आणि दिवसेंदिवस तो वाढत आहे.

**४) शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार –**

शिक्षण क्षेत्रातील नोकरभरतीत काही संस्थाचालक आणि काही राजकारणी प्रचंड भ्रष्टाचार करत आहेत. शिपाई, क्लार्क, शिक्षक, प्राध्यापक यांच्याकडून भरतीच्यावेळी १० लाखापासून ६० लाखापर्यंत रकमा गोळ्या केल्या जातात. या भ्रष्ट संस्थाचालकांनी आणि राजकारण्यांनी आपल्या संस्थेतील काही शिक्षक, प्राध्यापकांना, कारकुनांना दलाल बनवले असून त्यांच्यामार्फत ते दरवर्षी कोट्यावधी रुपये वसूल करत असून हा पैसा ते शिक्षणसंस्थेत जमा करत नसून स्वत:कडे ठेवून घेत आहेत. शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार दिवसेंदिवस वाढत असून या क्षेत्रामुळे देशातील एकूण काळ्या पैशात दरवर्षी कितीतरी अब्ज रुपयांची भर पडत आहे.

**५) माल विक्रीची खोटी माहिती शासनाला देणे –**

काही व्यापारी अनीतीचा मार्ग पत्करुन व्यापार करतात. कर चुकवण्यासाठी किंवा कर बुडवण्यासाठी अनैतिक मार्गाचा वापर करतात. आपल्या विक्रीची खोटी माहिती सरकारला देतात. विक्री कमी दाखवतात. ग्राहकांना पावती देत नाहीत. दिली तर कमी रकमेची देतात. अशा प्रकारे कमी विक्री दाखवून विक्री कर बुडवतात. त्यामुळे काळ्या पैशाची निर्मिती होते.

**६) अनैतिक व्यवसायात वाढ –**

जुगार, वेशाव्यवसाय (देह विक्री) यासारख्या अनैतिक आणि बेकायदेशीर व्यवसायातून दरवर्षी अब्जावधी रुपयांची भारतात उलाढाल होत असते. या व्यवसायांना समाजाची व कायद्याची मान्यता नसते. सरकारला या बेकायदेशीर व्यवसायातून काहीही उत्पन्न मिळत नाही. भारतातील सेक्स मार्केट अत्यंत तेजीत असून सरकारला अंधारात ठेवून या मार्केटमधील व्यवहार चालतात. त्यामुळे काळ्या पैशाच्या प्रमाणात भारतात दिवसेंदिवस वाढ होत आहे.

**७) चोरबाजारातील व्यवहार –**

काही उत्पादक, विक्रेते, वितरक आपला माल चोर बाजारात विकतात. चोरबाजारातील अशा व्यवहारांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे काळ्या पैशाचे प्रमाणही वाढत चालले आहे. अशा प्रकारे भारतात ठिकठिकाणी असलेले व तेजीत चालत असलेले चोरबाजार आणि त्या बाजारातील व्यवहार यामुळे काळ्या पैशाची निर्मिती वाढत आहे.

**८) स्थावर मालमत्तेच्या मूल्याच्या खोट्या नोंदी –**

स्थावर मालमत्तेच्या खरेदी-विक्री व्यवहारातून स्टॅम्प ड्यूटीच्या स्वरुपात सरकारला दरवर्षी अब्जावधी रुपये महसूल मिळतो. ही स्टॅम्प ड्यूटी जनतेला न परवडणारी अशीच आहे. त्यामुळे घर, जमीन, प्लॉट,

बंगले यांची खरेदी-विक्री करणारे लोक आपापसात संगमनत करुन सरकारला स्थावर जंगम मालमत्तेचे मूल्य कमी दाखवतात. उदाहरणार्थ ३०लाख रुपयांची प्रॉपटी खरेदी केली असेल तर शासनाला ती १५ लाख रुपयातच खरेदी केली आहे असे सांगितले जाते. त्यामुळे ३० लाख रुपयावर स्टॅम्प ड्यूटी न भरता १५ लाख रुपयावरच स्टॅम्प ड्यूटी भरली जाते. जेवढी स्टॅम्प ड्यूटी भरली जात नाही, तेवढा काळा पैसा देशात निर्माण होतो. अशा प्रकारे स्थावर मालमत्तेचे मूल्य कमी दाखवून दरवर्षी कितीतरी अब्ज रुपयांचा काळा पैसा देशात निर्माण केला जातो.

**९) कर कायद्यातील त्रुटी –**

भारतातील कर कायद्यात काही त्रुटी किंवा उणिवा आहेत. त्याचा गैरफायदा घेऊन दरवर्षी कोट्यावधी रुपयांचा कर चुकवला जातो. कर कसा चुकवावा? सरकारला कर कमी कसा भरता येईल? यासंदर्भात मार्गदर्शन करणारे तज्ञ देशात असून हे तज्ञ व्यापारी, उद्योजक, नोकरदार यांच्याकडून भरमसाठ फी घेऊन कर बुडविण्याविषयी मार्गदर्शन करत असतात. त्यामुळे सरकार कर कमी मिळतो. कर कायद्यातील त्रुटींचा आधार घेऊन अशा प्रकारे जेवढ्या रकमेचा कर चुकवला जातो तेवढा काळा पैसा देशात निर्माण होतो.

**१०) कमी कार्यक्षम कर वसुली यंत्रणा –**

भारतातील कर वसुली यंत्रणा तितकशी कार्यक्षम नाही. ही यंत्रणा कमी कार्यक्षम आहे. या यंत्रणेतील कर्मचारी अधिकारी प्रभावीपणे कर वसुली यंत्रणा राबवत नाहीत. काही कर्मचारी व्यापारी, उद्योजक यांच्या कर चोरीकडे दुर्लक्ष करतात. काही अधिकारी भ्रष्ट आहेत. संबंधिताकडून कर वसुली करण्याऐवजी त्यांचाकडून विशिष्ट रक्कम घेऊन कर चुकवेगिरीकडे दुर्लक्ष केले जाते. अशा प्रकारे कर वसुली यंत्रणेतील काही कर्मचारी व अधिकारी भ्रष्ट, अकार्यक्षम, लाचखोर असल्याने कर बुडवणाऱ्यांचे फावते. करचुकवेगिरी वाढते. त्यामुळे काळ्या पैशाचे प्रमाणही वाढते. अशा प्रकारे भारतातील कर वसुली यंत्रणेतील काही भ्रष्ट कर्मचारी व अधिकारी यांच्यामुळे कर बुडवणाऱ्यांना कर बुडवण्यास प्रोत्साहन मिळते.

**११) वाढती सरकारी गुंतवणूक –**

स्वांतत्र्योत्तर काळात भारतात राज्य व केंद्र सरकारचा खर्च वाढला आहे. भारतात अर्थिक विकासाचे मोठमोठे प्रकल्प उभे केले जात आहेत. सिंचन प्रकल्प, पाटबंधारे प्रकल्प, धरण बांधणी प्रकल्प रस्ते व रेल्वे बांधणी प्रकल्प, लोखंड पोलाद प्रकल्प अशा प्रकल्पावरील सरकारी खर्च प्रचंड वाढला असून त्यामुळे काळ्या पैशाची निर्मितीही देशात वाढली आहे. प्रकल्पावरील एकूण खर्चाच्या २० ते २५ टक्के रकमेची मागणी काही अधिकारी, राजकीय पक्ष, राजकीय नेते करतात असे समाजात बोलले जाते. त्यामुळे काळा पैसा भारतात वाढत आहे. जेवढी टक्केवारी किंवा लाच दिली जाते तेवढा काळा पैसा निर्माण होतो. सरकार विकासासाठी प्रचंड खर्च करीत आहे. परंतु मध्यस्थ किंवा दलाल ठेकेदारांकडून मोठ्या रकमा उकळत आहेत. त्यामध्ये सरकारी कर्मचारी, अधिकारी सुध्दा सामील आहेत, असे समाजात बोलले जाते.

**१२) राजकीय पक्षांना खूष करणे –**

आपल्या फायद्यासाठी राजकीय पक्षांना उद्योजकांना खूष करावे लागते. विशेषत: सत्तारुढ राजकीय पक्षांना खूष ठेवावे लागते. काही उद्योजक सर्वच राजकीय पक्षांशी चांगले संबंध ठेवण्याचा प्रयत्न करत असतात. चुकीच्या गोष्टीवर सरकारने कार्यवाही करू नये, विरोधी राजकीय पक्षांनी आपल्या विरोधात आवाज उठवू नये यासाठी सर्वच राजकीय पक्षांना उद्योजक भरमसाठ देणग्या देत असतात. या देणग्या देता याव्यात यासाठी त्यांच्याकडून कर चुकवेगिरी केली जाते. कर देण्याचे टाळणे, कर कमी देणे असे प्रकार अवलंबले जातात. तसेच देणगी व्यतिरिक्त इतर जादा रक्कम राजकीय नेत्यांना द्यावी लागते. त्याची पावती दिली जात नाही. हे दोन नंबरचे (बेकायदेशीर) व्यवहार होतात. राजकीय पक्षांना व नेत्यांना अशा प्रकारच्या रकमा मोठ्या प्रमाणात मिळत असतात अशी समाजात चर्चा आहे. त्यातून काळा पैसा निर्माण होतो.

**१३) वाढता भोगवाद –**

भारतात भोगवाद/चंगळवाद/चैनबाजी वाढत आहे. भारतीय बाजारपेठेत इलेक्ट्रीक, इलेक्ट्रॉनिक्स, अभियांत्रिकी वस्तू मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी आलेल्या आहेत. भारी किंमतीचे फर्निचर उपलब्ध आहे. मोठमोठी घरे, बंगले, चार चाकी गाड्या यांचा हव्यास वाढत चालला आहे. या वस्तू खरेदी करता याव्यात यासाठी भ्रष्टाचार करून पैसा गोळा केला जातो. वार्षिक काही लाख उत्पन्न असणाऱ्या कित्येक कर्मचाऱ्यांकडे कोट्यावधी रुपयांची मालमत्ता आढळून आली आहे. अशा प्रकारे वाढत्या भोगवादामुळे भारतात काळ्या पैशाची निर्मिती वेगाने होत आहे.

अशा प्रकारे विविध कारणामुळे भारतात काळ्या पैशाचे प्रमाण वाढत आहे. भ्रष्टाचार हे काळ्या पैशाच्या निर्मितीचे एक कारण असून भ्रष्टाचाराच्या बाबतीत भारताचा जगात ८७ वा क्रमांक लागतो. स्मगलिंग, काळा बाजार, करांचे दर जास्त असणे, कर वसुली यंत्रणेतील भ्रष्टाचार इत्यादी कारणामुळे भारतात काळा पैसा वाढत आहे.

**काळ्या पैशाचे परिणाम**

दरवर्षी प्रचंड वेगाने वाढणारा काळा पैसा हे भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील फार मोठे आव्हान आहे. देशात काळा पैसा दिवसेंदिवस वाढतच चालला आहे. या काळ्या पैशाने भारतीय अर्थव्यवस्था प्रभावित झाली आहे. काळ्या पैशाचे काही गंभीर परिणाम थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

**१) सरकारी महसूलात घट –**

सरकारला आयकर व इतर करांपासून महसूल मिळतो. परंतु भारतात सर्वच करांचे दर जास्त असल्याने कर बुडवण्याची आणि कर कमी भरण्याची प्रवृत्ती आढळते. त्यामुळे सरकारचा महसूल बुडतो. सरकारला खूप कमी महसूल मिळतो. व्यापारी, उद्योजक, जनता मिळून सरकारचा जेवढा कर बुडवतात तेवढी महसूलात घट होते. दरवर्षी कितीतरी कोटी रुपये कर चुकवला जातो. त्यामुळे सरकारचे नुकसान होते.

**२) प्रामाणिक करदात्यावर अन्याय –**

पगारी नोकरदार कर बुडवू शकत नाहीत. आपले उत्पन्न त्यांना लपवता येत नसल्याने त्यांना कर बुडवता येत नाही. अप्रामाणिक उद्योजक, व्यापारी कर बुडवत असल्याने महसूल वाढवण्यासाठी सरकार वस्तूवरील व सेवावरील करांचे दर वाढवते. त्यामुळे प्रामाणिक करदात्यांचे नुकसान होते. कारण त्यांना कर बुडवता येत नाही. त्यामुळे त्यांच्यावर अन्याय होतो.

**३) काळ्या पैशाची समांतर अर्थव्यवस्था –**

भारतात एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ५० टक्क्यापेक्षा अधिक काळा पैसा आहे. काळ्या पैशाचा प्रभाव अर्थव्यवस्थेत वाढत आहे. अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रात काळा पैसा वाढत आहे. त्यामुळे देशात काळ्या पैशाची एक समांतर अर्थव्यवस्था निर्माण झाली आहे.

**४) चंगळवादात वाढ –**

चंगळवाद हे काळ्या पैशाच्या निर्मितीचे कारण आहे. तसेच काळ्या पैशाचा परिणामही चंगळवादच आहे. कर चुकवून, भ्रष्टाचार करून हातात आलेला काळा पैसा वाट्टेल तसा खर्च केला जातो. कष्ट न करता हा पैसा मिळवला जातो. त्यामुळे हा पैसा चैनबाजीवर खर्च केला जातो. त्यामुळे चंगळवादात किंवा भोगवादात भारतात मोठी वाढ झाली आहे.

**५) घरे, जमिनी यांच्या किंमतीत वाढ –**

काळा पैसा भारतात घरे, प्लॉट, फ्लॅट, बंगले, शेतजमिनी यांच्या खरेदीत गुंतवला जातो. काळा पैसा असणारे लोक घरासाठी, जमिनीसाठी व इतर वस्तूसाठी भरमसाठ किंमत सहजरित्या देतात. त्यामुळे भारतात घरे, प्लॉट, बंगले, यांच्या किंमतीत मोठी वाढ घडून येत आहे. त्यामुळे घर विकत घेणे, शेतजमिनी विकत घेणे या बाबी सामान्य लोकांच्या हातात राहिलेल्या नाहीत.

**६) जीवनावश्यक वस्तूंची टंचाई –**

काळा पैसा असणाऱ्या लोकांकडून चैनीच्या वस्तूंची मागणी केली जाते. या वस्तूंसाठी काळा पैसा धारक अधिक किंमत देण्यास तयार असतात. त्यामुळे उत्पादक अशा वस्तूंच्या उत्पादनासाठी मोठी गुंतवणूक करतात. जीवनावश्यक वस्तूंच्या उत्पादनासाठी फारशी गुंतवणूक करत नाहीत. गरीब व मध्यमवर्गीय लोक ज्या वस्तूंची मागणी करतात त्या वस्तूंचे उत्पादन करण्यासाठी गुंतवणूकदार फारसा रस दाखवत नाहीत. त्यामुळे जीवनावश्यक वस्तूंची टंचाई निर्माण होऊन या वस्तूंच्या किंमती भडकतात. भारतात हेच अनुभवास येत आहे. भारतातील जीवनावश्यक वस्तूंच्या टंचाईस आणि भाववाढीस वाढता काळा पैसा हा घटक कारणीभूत ठरला आहे.

**७) सरकारची आर्थिक धोरणे प्रभावित –**

भारतात काळ्या पैशाचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. त्यामुळे सरकारची काही आर्थिक धोरणे यशस्वी होत नाहीत. बँकांची पतनियंत्रण धोरणे यशस्वी होत नाहीत. पैशाचा पुरवठा नियंत्रित करण्याच्या बाबतीत

रिझर्व बँकेला अपयश येते. अर्थव्यवस्थेत काळ्या पैशाचे प्रमाण प्रचंड असल्याने पतनियंत्रणाचे उपाय योजूनही पैशाचा पुरवठा अपेक्षेइतका कमी होत नाही.

**८) आर्थिक विषमतेत वाढ –**

भारतात कित्येक व्यापारी, उद्योजक, नोकरदार, राजकारणी यांच्याकडे काळा पैसा प्रचंड प्रमाणात आहे. त्यामुळे आर्थिक विषमता वाढत आहे. आर्थिक विषमतेची जी अनेक कारणे आहेत त्यामध्ये काळ्या पैशात वाढ हे एक प्रमुख कारण आहे.

**९) निवडणुकांतील भ्रष्टाचार –**

कित्येकजण काळा पैसा निवडणुका जिंकण्यासाठी वापरतात. निवडणूकीत प्रचंड खर्च करावा लागतो. त्यासाठी काळा पैसा संबंधितांना उपयोगी पडतो. त्यामुळे चांगले, विद्वान, प्रामाणिक लोक निवडणुकीला उभे राहत नाहीत किंवा उभे राहिले तरी काळ्या पैसेवाले लोकांच्या पुढे टिकत नाहीत किंवा निवडून येत नाहीत.

**१०) अनैतिकतेत वाढ –**

काळ्या पैशामुळे देशात अनैतिकता वाढत आहे. देशात काळा पैसा धारकांचे आणि काळ्या पैशाचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. या पैशाचा उपयोग काळा पैसा असणारे लोक जुगार, सट्टेबाजी यामध्ये गुंतवतात किंवा खर्च करतात. भारतात देहविक्रीचा बाजार वाढण्यास काळा पैसा हा घटक सुध्दा कारणीभूत ठरला आहे. अनेक लॉज, हॉटेल यामध्ये असा व्यवसाय केला जातो. काळा पैसा असणारे अनेक लोक या सेक्स मार्केटमधील ग्राहक असल्याचे आढळत आहे. अशा प्रकारे काळ्या पैशामुळे अनैतिकतेत वाढ झाली आहे. काळ्या पैशाचा वापर करुन गुंडांना पैसे देऊन खून होत असल्याचेही आढळत आहे.

**११) आर्थिक विकासावर प्रतिकूल परिणाम –**

काळा पैसा सरकारकडे येत नाही. तो व्यक्ती, संस्था, संघटना, उद्योगसंस्था यांच्याकडे राहतो. दरवर्षी कोट्यावधी रुपये काळा पैसा निर्माण होत असतो. तो सरकारला मिळत नसल्याने सरकारचे मोठे नुकसान होते. विकास कामासाठी सरकारला पैसा अपुरा पडतो. सरकारला कर्ज काढून किंवा खाजगीकरणाच्या माध्यमातून विकासाचे प्रकल्प सुरू करावे लागतात. काळा पैसा देशात जितका जास्त प्रमाणात असतो. तितका विकासावर जास्त प्रतिकूल परिणाम होतो.

अशा प्रकारे काळ्या पैशाचे दुष्परिणाम थोडक्यात वरीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत. राजकीय क्षेत्रात हा पैसा मोठ्या प्रमाणात खर्च केला जात आहे. त्यामुळे प्रामाणिक लोक निवडून येणे दुरापास्त झाले आहे. भारतातील काही काळा पैसा धारकांनी आपला काळा पैसा विदेशातील बँकात ठेवला आहे. काही काळा पैसाधारकांनी काळ्या पैशातून सरकारचे आणि सहकारी क्षेत्रातील बंद पडलेले कारखाने विकत घेण्याचे सत्र सुरु केले आहे. काळ्या पैशामुळे देशात अनैतिकता, गुन्हेगारी, सामाजिक व आर्थिक विषमता, महागाई, चंगळवाद यामध्ये वाढ होत चालली आहे.

**काळा पैसा निर्माण होऊ नये यासाठी सरकारने योजलेले उपाय**

बेकायदेशीर मार्गाने (उदाहरणार्थ कर चुकवून) निर्माण होणारा पैसा म्हणजे काळा पैसा (Black Income) होय. काळ्या पैशाला काळे उत्पन्न (Black Money) आणि काळी संपत्ती (Black Wealth) असेही म्हणतात. या काळ्या पैशाचे प्रमाण देशात दिवसेंदिवस वाढत आहे. त्याचे अर्थव्यवस्थेवर अत्यंत प्रतिकूल परिणाम होत आहेत. म्हणून काळा पैसा निर्माण होऊ नये यासाठी सरकारने काही उपाय योजले आहेत. त्याची माहिती थोडक्यात खालीलप्रमाणे दिली आहे.

**१) करांच्या दरात घट –**

भारतात करांचे दर जास्त आहेत. त्यामुळे कर चुकवेगिरीचे प्रमाण मोठे आहे. त्यामुळे काळ्या पैशाचे प्रमाण जास्त आहे. लोकांनी कर चुकवून किंवा कर बुडवून अथवा कमी उत्पन्न दाखवून कमी कर भरुन काळा पैसा निर्माण करु नये यासाठी सरकारने वेळोवेळी आयकराचे (प्राप्ती कराचे) दर कमी केले आहेत. १९९०–९१ मध्ये वैयक्तिक आयकर कमाल ६१.९% होता. तो सरकारने ५४% वर आणला त्यानंतर ४०% वर आणला. १९९७–९८ मध्ये तो ३०% वर आणला. इतर करांच्या दरातही सरकारने घट केली. लोकांनी कर बुडवू नये असा सरकारचा यामागे उद्देश होता. परंतु हा ३० टक्के कर सुध्दा लोकांना खूप जास्त वाटतो. त्यामुळे कर चुकवेगिरी करण्याचे प्रमाण फारसे कमी झालेले नाही. आयकर, निगम कर व इतर करांचे दर कमी करुनही काळ्या पैशावर नियंत्रण ठेवण्यात सरकारला फारसे यश आलेले नाही.

**२) विविध समित्यांची स्थापना –**

कर चुकवल्यामुळे किंवा सरकारला कमी कर भरल्यामुळे काळा पैसा निर्माण होतो. लोकांनी कर चुकवू नये आणि काळा पैसा निर्माण होऊ नये यासाठी स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने काही समित्यांची नेमणूक केली. या समित्यांना कर रचनेचा अभ्यास करण्यास सांगून शिफारशी मागवल्या व त्या शिफारशीची अमंलबजावणी केली. कॅल्डॉर समिती (१९५३–५४), वांछू समिती, रांगणेकर समिती, प्रत्यक्ष कर प्रशासकीय चौकशी समिती (१९५६), १९९१ ची प्रत्यक्ष कर चौकशी समिती, चोप्रा समिती, गुप्ता समिती अशा विविध समित्यांनी भारतीय कर रचनेचा अभ्यास करुन कर चुकवेगिरीचे प्रमाण कमी करण्यासाठी सरकारला काही महत्वपूर्ण शिफारशी केल्या. या समित्यांच्या शिफारशींची अंमलबजावणी सरकारने केली. कर रचनेत मोठे बदल केले. बहुविध कर दर होते. त्याऐवजी करांचे दर दोन ते तीनच ठेवले. उत्पादन शुल्क, सीमा शुल्क, विक्री कर, कंपनी कर यांचे दर कमी केले. करांचे जाळे अधिक व्यापक व भक्कम करण्यात आले. कर भरण्यास पात्र असलेली कोणतीही व्यक्ती करांच्या जाळ्यातून सुटणार नाही अशी काळजी सरकारने घेतली. त्यामुळे सरकारच्या कर महसूलात दीडपट वाढ घडून आली. जेवढा कर महसूल वाढला तेवढा काळा पैसा देशातून कमी झाला असा याचा अर्थ होतो.

### ३) नोटा रद्द करणे –

भारी किंमतीच्या नोटा रद्द करण्याचा मार्ग सरकारने काही वेळा अवलंबला आहे. कारण काळा पैसा बाळगणारे लोक भारी किंमतीच्या (जास्त मूल्याच्या) नोटा जवळ बाळगतात. भारी किंमतीच्या नोटा साठवून ठेवतात. काळा पैसा लपवण्यासाठी जास्त किंमतींच्या नोटा वापरल्या जातात. म्हणून सरकारने प्रथम १९४६ मध्ये विमुद्रिकरणाच्या धोरणाचा अवलंब केला. यालाच निर्मूल्यीकरण असेही म्हणतात. याद्वारे १४४ कोटी रुपयांचे चलन सरकारने बंद केले. भारी किंमतीच्या नोटा रद्द करण्याचा हा निर्णय सरकारने १९४६ च्या प्रत्यक्ष कर चौकशी समितीच्या शिफारशीच्या आधारे घेतला होता. काळ्या पैशाचे प्रमाण आणि त्याचे दुष्परिणाम वाढतच चालल्याने सरकारने पुन्हा १६ जानेवारी १९७८ मध्ये चलनातून भारी किंमतीच्या नोटा रद्द करण्याचा निर्णय घेतला व तो अमंलात आणला. या निर्णयानुसार सकरारने १०००, ५०००, १०००० रुपये किंमतीच्या (मूल्याच्या) नोटा रद्द केल्या. या नोटा बँकेत जमा करण्याचे आदेश सरकारने काढले. त्यानुसार बँकेत १२५ कोटी रुपये जमा झाले. चलनात १४५ कोटी रुपये होते. त्यापैकी १२५ कोटी रुपये बँकेत जमा झाल्याने २० कोटी रुपये किंमतीच्या नोटा बँकेकडे परत आल्या नाहीत. अशाच प्रकारे काही वर्षापूर्वी केंद्र सरकारने (भाजप सरकारने) नोटबंदीचा निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली आणि भारी किंमतीच्या नोटा चलनातून रद्द करण्याचा निर्णय सरकारने घेतला.

### ४) मालमत्तेची तपासणी –

बेकायदेशीर मार्गाने पैसे मिळवणाऱ्या लोकांची माहिती सरकारला मिळत असते. त्यानुसार सरकार दरवर्षी व्यापारी, उद्योजक, कलावंत यांच्या मिळकतीची, संपत्तीची, मालमत्तेची, बँकेतील ठेवींची, इतर गुंतवणूकीची माहिती घेत असते. काही व्यावसायिकांवर अचानक धाडी टाकत असते व त्या माध्यमातून कागदपत्रांची तपासणी करुन संबंधितांना दंड करून करांची वसुली करत असते. कर बुडवणाऱ्या लोकांना वचक बसावा असा त्यामागचा उद्देश असतो. दरवर्षी सरकार कर चुकवणाऱ्यांवर धाडी टाकून कोट्यावधी रुपये वसूल करत असते. तरीही काळा पैसा बाळगण्यावर म्हणावा असा वचक बसलेला दिसत नाही.

### ५) स्वेच्छा उत्पन्न प्रकटीकरण योजना (Voluntary disclosure of Income Scheme-VDIS)

कडक मार्गाने कर वसुली करण्याऐवजी लोकांना आवडेल अशा मार्गाने कर वसुली केली तर अधिक कर वसुली होईल आणि तेवढा काळा पैसा कमी होऊन सरकारकडे येईल या उद्देशाने सरकारने स्वेच्छा उत्पन्न प्रकटीकरण योजना देशात काही वेळा राबविली आहे. त्यानुसार प्रथम ही योजना १९५१ मध्ये अमंलात आणली. आतापर्यंत जवळ जवळ पाच वेळा सरकारने स्वेच्छा उत्पन्न प्रकटीकरण योजना देशात राबवली आहे. लोकांनी आपली संपत्ती जाहीर करावी. ही संपत्ती कोठून आणली? कशी जमा केली? कर किती चुकवला? काळा पैसा किती जवळ बाळगला? याची तपासणी सरकार करणार नाही. कोणतीही कायदेशीर व दंडात्मक कारवाई अशा लोकांवर केली जाणार नाही असा विश्वास सरकारने दिला. १९५१ मध्ये सरकारला या योजनेपासून १० कोटी ९० लाख रुपये कर महसूल मिळाला. सरकारवर विश्वास ठेवून लोकांनी स्वेच्छेने आपले उत्पन्न जाहीर केले. ही जाहीर केलेली रक्कम सुमारे ५० कोटी रुपये इतकी होती.

१९६५ मध्ये सरकारने ही योजना जाहीर केली. लोकांनी ५२.८१ कोटी रुपये उत्पन्न जाहीर केले. त्यावर सरकारने ६० टक्के कर बसवला. त्यामुळे सरकारला ३०.८० कोटी रुपये महसूल मिळाला. याच वर्षी सरकारने पुन्हा ही योजना लागू करुन सुमारे २० कोटी रुपये महसूल मिळवला. १९७५ मध्ये तिसऱ्यांदा ही योजना जनेतेसाठी लागू केली. त्यावेळी लोकांनी स्वेच्छेने जाहीर केलेले उत्पन्न व मालमत्ता १५७८ कोटी रुपये किंमतीची होती. त्यापासून सरकारला २४९ कोटी रुपये महसूल प्राप्त झाला. १९८५ मध्ये चौथ्यांदा सरकारने ही योजना जाहीर केली. त्यानुसार लोकांनी १०७७८.३४ कोटी रुपये मूल्यांची संपत्ती व उत्पन्न जाहीर केली. सरकारने त्यावर ४८८.७९ कोटी रुपयांचा कर आकारला. जुलै १९९७ मध्ये सरकारने पाचव्यांदा ही योजना जाहीर केली. ३३००० कोटी रुपये मूल्याची सपंत्ती स्वेच्छेने लोकांनी जाहीर केली. त्यावर सरकारने ३० टक्के कर आकारला आणि १०,००० कोटी रुपये मिळवले. अशा प्रकारे काळा पैसा चलनातून कमी करण्यासाठी भारत सरकारने स्वेच्छा उत्पन्न प्रकटीकरण योजना वेळोवेळी राबवली असून त्यामार्फत देशातील काळा पैसा जाणून घेण्याचे व त्यावर कर बसवून तो कर वसूल करण्याचे काम केले आहे. या योजनेद्वारे सरकारने आतापर्यंत हजारो कोटी रुपये करांच्या द्वारे वसूल केले आहेत.

६) **ऐच्छिक ठेव योजना** (Voluntary Deposits Scheme 1991)

लोकांनी आपला काळा पैसा बाहेर काढावा, बँकेत ठेवावा आणि त्या पैशाचा विकास कामासाठी उपयोग करता यावा यासाठी सरकारने सन १९९१ मध्ये काळा पैसा धारकांसाठी ऐच्छिक ठेव योजना लागू केली. ही योजना स्वेच्छा उत्पन्न प्रकट योजनेसारखीच होती. या योजनेनुसार काळा पैसा धारकांना आपला काळा पैसा ठेवींच्या स्वरुपात नॅशनल हाउसिंग बँकेत ठेवीच्या स्वरुपात ठेवण्याची परवानगी सरकारने दिली. ही रक्कम काळा पैसा धारकांनी कोठून व कशी गोळा केली? याची चौकशी न करण्याचे व कोणतीही कारवाई न करण्याचे आश्वासन सरकारने दिले. या योजनेनुसार जमा झालेल्या एकूण ठेवीपैकी ६० टक्के रक्कम कायदेशीर मानली जाईल आणि ४० टक्के रक्कम बेकायदेशीर मानून ती रक्कम सरकार काढून घेईल असे जाहीर करण्यात आले. तसेच ६० टक्के रकमेवर सरकार काळा पैसा धारकांना व्याज देईल असे आश्वासन सरकारने दिले. या योजनेतून सरकारला सुमारे १२० कोटी रुपये मिळाले. अशा प्रकारे काळा पैसा बाहेर काढण्यासाठी, काळ्या पैशाचे दुष्परिणाम रोखण्यासाठी सरकारने ऐच्छिक ठेव योजना राबवली होती. पण त्याद्वारे फारसा काळा पैसा मात्र बाहेर आला नाही.

७) **विशेष रोखे योजना** (Special Bearer Bond Scheme 1981)

सन १९८१ मध्ये सरकारने विशेष रोखे योजना काळा पैसा धारकांसाठी जाहीर केली. काळा पैसा बाहेर काढण्यासाठी सरकारने १०,००० रुपये किंमतीचे बॉण्डस विक्रीस काढले. या बॉण्डची मुदत १० वर्षे होती आणि १० वर्षानंतर बॉण्डस खरेदीदारांना (काळा पैसा धारकांना) १२००० रुपये देण्याचे सरकारने जाहीर केले होते. म्हणजे १० वर्षानंतर काळा पैसा पांढरा पैसा करण्याची संधी सरकारने दिली होती. या योजनेचा काही काळा पैसा धारकांनी लाभ घेतला आणि १९८२-८३ मध्ये सुमारे हजार कोटी रुपये सरकारकडे जमा झाले.

## ८) **सुवर्ण बॉण्ड योजना** (The Gold Bond Sceme, 1993)

देशातील काळा पैसा बाहेर काढण्यासाठी सरकारने सन १९९३ मध्ये सुवर्ण रोखे योजना सुरु केली. काळा पैसा बाळगणाऱ्यांना सरकारचे सुवर्ण बॉण्ड खरेदी करता येतील आणि त्यासाठी पैसे कोठून आणले? याची चौकशी सरकार करणार नाही असे आश्वासन सरकारने दिले. या योजनेद्वारे सुमारे ५५००कोटी रुपयांच्या सुवर्ण बॉण्डसची विक्री होईल अशी सरकारची अपेक्षा होती. सुवर्ण बॉण्ड्स काळा पैसा धारकांना विकून हजारो कोटी रुपयांचा काळा पैसा बाहेर काढण्याचा प्रमुख उद्देश सरकारचा ही योजना जाहीर करण्यामागे होता.

**समारोप –**

अशा प्रकारे देशातील काळा पैसा बाहेर काढण्यासाठी सरकाने वरीलप्रमाणे विविध उपाय योजले आहेत. तरीही काळ्या पैशाच्या निर्मितीवर पूर्णपणे नियंत्रण ठेवण्याात सरकारला यश आलेले नाही. काळ्या पैशाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे आजही भारतात आयकराचे व इतर करांचे दर खूप जास्त आहेत. नोकरदारांना वर्षातील तीन ते चार महिन्यांचा पगार करांच्या रुपाने द्यावा लागतो. आयकर, वस्तू व सेवा करील कर, इतर शुल्क या पोटी लोकांना ६० ते ७०टक्के रक्कम सरकारला भरावी लागते. त्यामुळे कर चुकवण्याची प्रवृत्ती बळावत चालली आहे. त्यामुळे काळा पैसा वाढतच चालला आहे. सरकारने प्राप्ती कराची मर्यादा १० टक्क्यावर आणली तर कर चुकवण्याची मानसिकता व इच्छा लोकांना होणार नाही. वस्तू व सेवावरील करही सरकारने कमी केले पाहिजेत.

## ३.३ सारांश:

'दारिद्र्य' हे भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील एक मोठे आव्हान असून दारिद्र्याची समस्या ही भारतातील अत्यंत जुनाट समस्या आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळापासून ही समस्या देशात अस्तित्वात आहे. बेरोजगारीची समस्या सुद्धा जुनाट आणि इंग्रजी राजवटीपासून अस्तित्वात आहे. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी खेड्यापाड्यातील छोटे छोटे उद्योग पद्धतशीरपणे बंद पाडले. त्यांनी पक्का माल आपल्या मायदेशातून आणून भारतात विकायला सुरुवात केली. त्यामुळे देशातील उद्योग बंद पडून कारागीर, कामगार बेकार होण्यास सुरुवात झाली. त्याचे दुष्परिणाम स्वातंत्र्योत्तर काळात काही वर्षापर्यंत जाणवत होते. भारत सरकारने ग्रामीण भागातील उद्योगांच्या व कारागिरांच्या हिताकडे लक्ष देण्यास सुरुवात केल्याने छोटे छोटे उद्योग किंवा कुटिर उद्योग स्थापन होऊ लागले. परंतु लोकसंख्येत दरवर्षी प्रचंड वाढ घडून येत असल्याने बेकारीची समस्या गंभीरच बनत राहिली.

सरकारने रोजगार संधीत मोठ्या प्रमाणात वाढ करूनही प्रचंड लोकसंख्या वाढीमुळे बेकारीची समस्या नष्ट होऊ शकत नाही. दारिद्र्य आणि बेकारी या समस्यांचे मूळ कारण प्रचंड वेगाने वाढणारी लोकसंख्या हेच आहे. लोकसंख्या वाढीचा वेग आटोक्यात आणल्याशिवाय या दोन्ही समस्या नष्ट होणार नाहीत. दारिद्र्य आणि बेरोजगारीबरोबर प्रादेशिक विषमता (विभागीय असमतोल) ही समस्या सुद्धा भारतात गंभीर स्वरूपाची आहे. देशातील काही प्रदेश किंवा काही राज्ये पुढारलेली आहेत. तर काही प्रदेश किंवा काही राज्ये ही

मागासलेली आहेत. त्याला प्रादेशिक असमतोल असे म्हणतात. या प्रादेशिक असमतोलामुळे काही आर्थिक, सामाजिक, राजकीय समस्या निर्माण झाल्या आहेत. विभागीय असमतोलामुळे पुढारलेल्या राज्यात 'परप्रांतीयांची समस्या' ही समस्या निर्माण झाली आहे. ही समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. बिहार, उत्तर प्रदेश सारख्या मागासलेल्या राज्यातून महाराष्ट्र, गुजरात सारख्या राज्यात मोठ्या प्रमाणात लोक कामधंद्यासाठी येत आहेत. रोज हजारो परप्रांतीय पुढारलेल्या राज्यात दाखल होत आहेत. त्यामुळे त्यांच्याविरुद्धचा असंतोष स्थानिक पातळीवर वाढत चालला आहे. काळ्या पैशात दिवसेंदिवस वाढ होत असून आयकाराचे मोठे दर हे त्याचे एक प्रमुख कारण आहे. १५ लाख रुपयापेक्षा अधिक वार्षिक उत्पन्न असणाऱ्यांना भारतात ३० टक्के एवढा आयकर भरावा लागतो. काळ्या पैशात वाढ होण्याची इतरही कारणे आहेत. काळ्या पैशाची समांतर अर्थव्यवस्था देशात निर्माण झाली आहे. वाढत्या काळ्या पैशाचे दुष्परिणाम अर्थव्यवस्थेवर होत आहेत. काळ्या पैशाचे आर्थिक, सामाजिक, राजकीय दुष्परिणाम गंभीर स्वरूपाचे असून सरकारने काळ्या पैशाचे प्रमाण कमी करण्यासाठी काही उपाय योजले आहेत. तरीही काळ्या पैशाचे प्रमाण फारसे कमी झालेले नाही.

## ३.४ पारिभाषिक शब्द व त्यांचे अर्थ

१) **दारिद्र्य** : कुटुंबातील सदस्यांचे पालन पोषण करण्यासाठी आणि संपूर्ण कुटुंब निरोगी राहण्यासाठी जेवढ्या वस्तू लागतात तेवढ्या वस्तू त्या कुटुंबाला न मिळणे म्हणजे दारिद्र्य होय.

२) **सापेक्ष दारिद्र्य** : एखाद्या देशातील श्रीमंत मनुष्य दुसऱ्या देशात गरीब ठरू शकतो. याला सापेक्ष दारिद्र्य असे म्हणतात.

३) **निरपेक्ष दारिद्र्य** : आवश्यक वस्तू व सेवा खरेदी करण्याएवढे म्हणजेच किमान उपभोगाएवढे सुद्धा ज्यांचे उत्पन्न नसते त्या व्यक्तींना दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असे म्हणतात. अशा दारिद्र्याला निरपेक्ष दारिद्र्य असे म्हणतात.

४) **बेरोजगारी** : शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या सुदृढ, सक्षम असूनही आणि प्रचलित वेतनदरावर काम करण्याची तयारी असूनही लोकांना जेव्हा काम मिळत नाही तेव्हा त्या स्थितीला बेरोजगारी असे म्हणतात.

५) **खुली बेकारी** : खुल्या बेकारीलाच उघड बेकारी किंवा उघडी बेकारी असे म्हणतात. अशी बेकारी स्पष्टपणे उघडपणे दिसून येते. म्हणून या बेकारीला खुली बेकारी असे म्हणतात.

६) **छुपी बेकारी** : छुप्या बेकारीलाच अदृश्य बेकारी किंवा सुप्त बेकारी किंवा प्रच्छन्न बेकारी असे म्हणतात. अशी बेकारी प्रामुख्याने ग्रामीण भागात कृषी क्षेत्रात दिसून येते. कुटुंबाचा मोठा आकार आणि तुटपुंजी शेती यामुळे छुपी बेकारी निर्माण होते. कुटुंबात सदस्य जास्त असतात आणि शेतजमीन कमी असते. ज्या जमिनीच्या तुकड्यावर चारच लोकांची गरज असते त्या जमिनीत सहा ते सात सदस्य

(कामगार) काम करत असतात. दोन ते तीन कामगारांची गरज नसते. या कामगारांना अदृश्य कामगार असे म्हणतात.

७) **आंतरसुविधा** : वीज, पाणी, वाहतूक, शिक्षण, आरोग्य, दळणवळण इत्यादी सोयी सुविधांना आंतर सुविधा किंवा पायाभूत सुविधा असे म्हणतात.

८) **विभागीय असमतोल** : जेव्हा एखाद्या देशातील काही प्रदेश विकसित असतात आणि काही प्रदेश अविकसित असतात तेव्हा त्यास प्रादेशिक विषमता किंवा विभागीय असंतुलन असे म्हणतात.

९) **काळा पैसा** : कष्ट न करता मिळवलेला पैसा. ज्या पैशावर कर भरला पाहिजे परंतु भरला जात नाही असा कर चुकवलेला पैसा हा काळा पैसा होय. बेकायदेशीर, सरकारी मान्यता नसलेला पैसा म्हणजे काळा पैसा.

१०) **समांतर अर्थव्यवस्था** : देशात पांढऱ्या पैशाएवढा काळा पैसा निर्माण होणे याला काळ्या पैशाची समांतर अर्थव्यवस्था असे म्हणतात.

## ३.५ स्वयंअध्ययन प्रश्न

अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.

१) एखाद्या व्यक्तीला त्याने जोपासलेल्या मूल्यांप्रमाणे जगता न येणे म्हणजे दारिद्र्य होय अशी दारिद्र्याची व्याख्या ...........यांनी केली.

अ) अमर्त्य सेन ब) केन्स क) माल्थस ड) वि.म. दांडेकर

२) कुटुंबातील सदस्यांचे पालन पोषण करण्यासाठी आणि संपूर्ण कुटुंब निरोगी राहण्यासाठी जेवढ्या वस्तू लागतात तेवढ्या वस्तू त्या कुटुंबाला न मिळणे म्हणजे दारिद्र्य होय अशी दारिद्र्याची व्याख्या ....यांनी केली आहे

अ) केन्स ब) सेन क) गोडार्ड ड) रथ

३) माणसी दर दिवशी एक डॉलर पेक्षा कमी उत्पन्न मिळवणाऱ्या व्यक्ती म्हणजे दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती अशी दारिद्र्याची व्याख्या ........यांनी केली आहे.

अ) विकास बँक ब) सरकार क) जागतिक बँक ड) सेन

४) डॉ. वि.म. दांडेकर आणि पी.डी. ओझा यांनी प्रत्येक व्यक्तीला दररोज .....कॅलरीजची (उष्मांकाची) जगण्यासाठी गरज असते असे म्हटलेले आहे.

अ) २००० ब) २२५० क) २३०० ड) २४००

५) .........या वयोगटातील ज्या लोकांना इच्छा व पात्रता असूनही रोजगार मिळत नाही, त्यांचा समावेश बेरोजगार व्यक्तींमध्ये केला जातो.

अ) २० ते ६० ब) १५ ते ५५ क) २० ते ७० ड) १५ ते ६०

६) भारतात .........क्षेत्रात काम करणाऱ्यांचे प्रमाण मोठे आहे.

अ) कृषी ब) उद्योग क) सेवा

७) कृषी क्षेत्रात काम करणाऱ्यांचे (श्रमिकांचे) प्रमाण दिवसेंदिवस .....आहे.

अ) घटत ब) वाढत क) स्थिर

८) भारताच्या श्रमशक्तीत दिवसेंदिवस ..........होत आहे.

अ) घट क) वाढ क) स्थिर

९) .......... क्षेत्रात छुपी बेकारी आढळते.

अ) कृषी ब) उद्योग क) व्यापार ड) सेवा

१०) बेकारी व दारिद्र्य या दोन घटकात ...........संबंध आहेत.

अ) ऋण ब) धन क) यापैकी नाही

११) बेकारी व दारिद्र्याचा प्रभावी मागणीवर.......... परिणाम होतो.

अ) अनुकूल ब) प्रतिकूल क) यापैकी नाही

१२) बेकारीमुळे प्रभावी मागणी .....

अ) घटते ब) स्थिर राहते क) वाढते

१३) बेरोजगारी समस्या......... आहे.

अ) स्थानिक ब) राष्ट्रीय क) इतर

१४) महाराष्ट्रात रोजगार हमी योजना ........मध्ये सुरू झाली.

अ) १९७० ब) १९७१ क) १९७३ ड) १९७२

१५) नेहरू रोजगार योजना ........मध्ये सुरू झाली.

अ) १९८९ ब) १९९० क) १९९२ ड) १९९५

१६) 'कामासाठी अन्न कार्यक्रम'...... मध्ये सुरू झाला.

अ) १९८० ब) १९७७ क) १९९० ड) २०१७

१७) दशलक्ष विहिरींची योजना ......मध्ये सुरू झाली.

अ) १९८८ ब) १९९१ क) १९९२ ड) १९९४

१८) रोजगार आश्वासित योजना....... पासून सुरू करण्यात आली.

अ) २ ऑक्टोबर १९९३ ब) १९९४

क) १९९५ ड) १९९७

१९) जवाहर रोजगार योजना ......... पासून सुरु झाली.

अ) १९९० ब) १ एप्रिल १९८९ क) १९९५ ड) १९९८

२०) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कार्यक्रम सरकारने .........मध्ये सुरू केला.

अ) ऑक्टोंबर १९८० ब) १९९० क) २००१

२१) ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम .........रोजी सुरू झाला .

अ) २००१ ब) १९९० क) १५ ऑक्टोंबर १९८३

२२) सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना...... रोजी सुरू झाली.

अ) १ डिसेंबर १९९७ ब) १९९८ क) १९९९ ड) २०२३

२३) सुवर्ण जयंती ग्राम रोजगार योजना ......मध्ये सुरू झाली.

अ) एप्रिल १९९९ ब) २००० क) २००१ ड) २००२

२४) प्रधानमंत्री रोजगार योजना .......पासून सुरू केली आहे.

अ) १९९० ब) १९९१ क) १९९२ ड) १९९३

२५) प्रधानमंत्री रोजगार योजना (PMRY) ......पासून सुरू केली आहे.

अ) १९९० ब) १९९१ क) १९९२ ड) १९९३

२६) प्रधानमंत्री ग्राम सडक योजना ......रोजी सुरू झाली.

अ) २५ डिसेंबर २००० ब)२००१ क)२००२ ड) २००३

२७) अंत्योदय अन्य योजना ..........रोजी सुरू झाली.

अ) डिसेंबर २००० ब) २००१ क) २००२ ड) २००४

२७) प्रधानमंत्री ग्रामोदय योजना .....मध्ये सुरू झाली

अ) २००१ ब) २००५ क) २०१० ड) २०२०

२८) संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना .......मध्ये सुरू करण्यात आली.

अ) २००२ ब) सप्टेंबर २००१ क) २००४ ड) २०१०

२९) इंदिरा आवास योजना .......मध्ये ग्रामीण भागातील दरिद्री लोकांना मोफत घरे बांधून देण्यासाठी सरकारने सुरू केली आहे.

अ) १९८९ ब) १९९० क) १९९९ ड) २०००

३०) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा .......मध्ये संमत झाला.

अ) २००४ ब) सप्टेंबर २००५ क) २००६ ड) २००७

३१) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ......मध्ये सुरू झाली.

अ) २ फेब्रुवारी २००६ ब)२००७ क) २००९ ड) २०१०

३२) ... पासून संपूर्ण भारतात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरू झाली

अ) २००७ ब) एक एप्रिल २००८ क)२००९ ड) २०१०

३३) पंडित दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना सरकारने ...........मध्ये सुरू केली.

अ) २०१४ ब) २०१५ क) २०१६ ड) २०१७

३४) मुद्रा योजना सरकारने .........मध्ये सुरू केली.

अ) २०१४ ब) ८ एप्रिल २०१५ क) २०१६ ड) २०२०

३५) स्टार्ट अप इंडिया योजना सरकारने .......मध्ये सुरू केली.

अ) २०१६ ब) २०२० क) २०२२ ड) २०२४

३६) राष्ट्रीय कौशल्य धोरण ..........मध्ये सरकारने जाहीर केले .

अ) २००१ ब) २००४ क) २००८ ड) २००९

३७) .........मध्ये भारतात स्किल इंडिया मिशनची स्थापना करण्यात आली आहे.

अ) २०१५ ब) २०१६ क) २०१७ ड) २०२०

३८) 'मेक इन इंडिया' ही योजना सरकारने ..........रोजी सुरू केली.

अ) २५ सप्टेंबर २०१४ ब) २०१५ क) २०१७ ड) २०१९

३९) भारतातील ईशान्य पूर्वेकडील राज्ये.......... आहेत.

अ) मागासलेली ब) पुढारलेली क) यापैकी नाही

४०) परप्रांतियांची समस्या ......मुळे निर्माण झाली आहे.

अ) प्रादेशिक असमतोल ब) बेकारी क) दारिद्र्य ड) सर्व

४१) भारतात कर चूकवेगिरी .........आहे.

अ) वाढत  ब) घटत  क) स्थिर

४२) भारतात काळ्या पैशात दिवसेंदिवस ..........होत आहे.

अ) घट  ब) वाढ  क) स्थिर

४३) ..........हे काळ्या पैशाच्या निर्मितीचे कारण आहे.

अ) कर चोरी किंवा कर चुकवेगिरी  ब) दारिद्र्य  क) बेकारी

४४) काळ्या पैशाने ..........अर्थव्यवस्था निर्माण होते.

अ) समांतर  ब) चुकीची  क) अविकसित  ड) विकसनशील

४५) नोटाबंदी हा ........समस्येवरील उपाय आहे.

अ) दारिद्र्य  ब) बेकारी  क) काळा पैसा  ड) महागाई

**स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) अ | २) क | ३) क | ४) ब | ५) ड |
| ६) क | ७) अ | ८) ब | ९) अ | १०) ब |
| ११) ब | १२) अ | १३) ब | १४) ड | १५) अ |
| १६) ब | १७) अ | १८) अ | १९) ब | २०) अ |
| २१) ड | २२) अ | २३) अ | २४) ड | २५) ड |
| २६) अ | २७) अ | २८) ब | २९) अ | ३०) ब |
| ३१) अ | ३२) ब | ३३) अ | ३४) ब | ३५) अ |
| ३६) ड | ३७) ब | ३८) अ | ३९) अ | ४०) ड |
| ४१) अ | ४२) ब | ४३) अ | ४४) अ | ४५) क |

## ३.६ सरावासाठी प्रश्न

### अ) टीपा लिहा (थोडक्यात उत्तरे द्या)

१)दारिद्र्य  २) बेकारी  ३) प्रादेशिक विषमता ४) काळा पैसा

५) बहु आयामी दारिद्र्य  ६) दारिद्र्याचे प्रकार  ७) बेकारीचे प्रकार  ८) दारिद्र्याचे परिणाम

९) बेकारीचे परिणाम  १०) काळ्या पैशाचे परिणाम

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न**

१) भारतातील दारिद्र्याची कारणे स्पष्ट करा.

२) दारिद्र्याचे परिणाम विशद करा.

३) दारिद्र्य निर्मूलनासाठी कोणते उपाय सुचवता येतील.

४) दारिद्र्य निर्मूलनासाठी सरकारने कोणते उपाय योजले आहेत.

५) दारिद्र्य म्हणजे काय ते सांगून दारिद्र्याची कारणे, परिणाम आणि उपाय स्पष्ट करा.

६) भारतातील बेकारीची कारणे स्पष्ट करा.

७) बेरोजगारीचे दुष्परिणाम स्पष्ट करा.

८) बेरोजगारी निर्मूलनासाठी कोणते उपाय सुचवता येतात.

९) रोजगार वृद्धीसाठी सरकारने योजलेल्या उपायांची किंवा योजनांची चर्चा करा.

१०) बेकारी म्हणजे काय ते सांगून बेकारीची कारणे, परिणाम व उपाय स्पष्ट करा.

११) प्रादेशिक असमतोलाची कारणे स्पष्ट करा.

१२) प्रादेशिक विषमतेचे परिणाम स्पष्ट करा.

१३) भारतातील विभागीय असमतोल कमी करण्यासाठी उपाय सुचवा.

१४) प्रादेशिक विषमता म्हणजे काय ते सांगून प्रादेशिक विषमतेची कारणे परिणाम आणि उपाय सुचवा

१५) काळ्या पैशाची समांतर अर्थव्यवस्था ही संकल्पना स्पष्ट करा.

१६) भारतात काळा पैसा का वाढत आहे?

१७) काळ्या पैशाचे दुष्परिणाम स्पष्ट करा.

१८) काळ्या पैशाचे प्रमाण कमी करण्यासाठी सरकारने योजलेले उपाय स्पष्ट करा.

१९) काळा पैसा म्हणजे काय ते सांगून काळ्या पैशाच्या निर्मितीची कारणे व परिणाम व उपाय स्पष्ट करा.

२०) भारतीय अर्थव्यवस्थेसमोर प्रमुख आव्हाने कोणती आहेत? दारिद्र्य, बेकारी, प्रादेशिक विषमता, काळा पैसा या आव्हानांची चर्चा करा.

### ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

1. Datt and K.P.M., Sundaram, 'Indian Economy", S- Chand and Company limited New Delhi
2. Puri V.k., Misra s.k. "Indian Economy", Himalaya Publishing House, Mumbai
3. Agarwal A.N., "Indian Economy, New International Publishers, New Delhi.
4. Economy Survey of India
5. Handbook of Indian statistics

❑❑❑

## घटक ४
## भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने – भाग २
## (Challenges before Indian Economy)

**अनुक्रमणिका**

४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

४.२.१ पर्यावरणीय प्रदूषण – कारणे आणि उपाय

४.२.२ कमी भांडवल निर्मिती दर – कारणे आणि उपाय

४.२.३ आर्थिक विषमता – कारणे, परिणाम आणि उपाय

४.२.४ सामाजिक विषमता – कारणे, परिणाम आणि उपाय

४.२.५ कमी मानव विकास निर्देशांक – कारणे, परिणाम आणि उपाय

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द व त्यांचा अर्थ

४.५ स्वयंअध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे

४.६ सरावासाठी प्रश्न

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

### ४.० उद्दिष्टे (Objectives)

'भारतीय अर्थव्यवस्थेमोरील आव्हाने' असे या प्रकरणाचे शीर्षक असून या प्रकरणाचा अभ्यास करण्यामागची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१) पर्यावरणीय प्रदूषणाची समस्या जाणून घेणे.

२) भारतातील भांडवल निर्मितीचा दर कमी असण्याची कारणे समजून घेणे.

३) आर्थिक विषमतेची कारणे, परिणाम आणि उपाय यांची माहिती घेणे.

४) सामाजिक विषमतेची कारणे, परिणाम आणि उपाय यांची माहिती घेणे.

५) भारतातील मानव विकास निर्देशांक कमी का आहे? त्याची माहिती घेणे.

## ४.१ प्रस्तावना

भारतीय अर्थव्यवस्थेसमोर अनेक आव्हाने आहेत. या आव्हानानाच भारतीय अर्थव्यवस्थेला भेडसावणाऱ्या आर्थिक आणि सामाजिक समस्या असे म्हणतात. पर्यावरणीय प्रदूषणाची समस्या ही त्यापैकी एक समस्या आहे. या प्रकरणात पर्यावरणीय प्रदूषणाची कारणे आणि त्यावरील उपाय या बाबींची माहिती दिली आहे. भांडवल निर्मितीचा दरही आपला कमी आहे. त्याचीही कारणे आणि त्यावरील उपाय यांची माहिती या प्रकरणात दिली आहे. आर्थिक आणि सामाजिक विषमता देशात आढळते. या दोन्ही समस्या निर्माण होण्याची कारणे, त्यांचे परिणाम आणि उपाय या बाबींची माहिती या प्रकरणात दिली आहे. भारताचा मानव विकास निर्देशांक सुध्दा खूपच कमी आहे त्याची कारणे या प्रकरणात दिली आहेत.

## ४.२ विषय विवेचन

पर्यावरणीय प्रदूषण, भांडवल निर्मितीचा कमी दर, आर्थिक विषमता, सामाजिक विषमता, कमी मानव विकास निर्देशांक या घटकांची थोडक्यात चर्चा खालीलप्रमाणे केली आहे.

### ४.२.१ पर्यावरणीय प्रदूषणाची समस्या : कारणे आणि उपाय

**प्रास्ताविक :–**

'पर्यावरण' ही अत्यंत व्यापक संकल्पना असून पर्यावरणाचे नैसर्गिक (भौतिक) आणि मानवनिर्मित (सांस्कृतिक) पर्यावरण हे प्रमुख दोन घटक आहेत. मनुष्याच्या सभोवतालची एकूण परिस्थती म्हणजे पर्यावरण होय. भारतीय समाज विज्ञान कोश (खंड) यामध्ये पर्यावरणाची व्याख्या पुढीलप्रमाणे दिली आहे.

**पर्यावरणाची व्याख्या :–**

''पृथ्वीवरील जमीन, पाणी आणि वातावरण यांनी बनलेला भौतिक परिसर, त्यात आढळणाऱ्या निर्जीव व सजीव सृष्टीतील विविध घटक आणि त्या सर्वांचे परस्पर संबंध म्हणजे पर्यावरण होय.''

जगातील अनेक देशासमोर सध्या ज्या काही प्रमुख समस्या आहेत, त्यामध्ये पर्यावरणीय प्रदूषणाची समस्या ही प्रमुख समस्या आहे. भारतासारख्या विकसनशील देशात तर ही समस्या दिवसेंदिवस गंभीरच बनत चालली आहे. सुमारे २०० वर्षापूर्वी इंग्लंडमध्ये औदोगिक क्रांती झाली, तेंव्हापासून ही समस्या निर्माण झाली आहे.

**पर्यावरणीय प्रदूषण म्हणजे काय?**

प्रदूषण या मराठी शब्दास इंग्रजीत 'Pollution' हा शब्द आहे. तो 'Pollutus' या लॅटिन शब्दापासून बनला आहे. 'Pollutus' म्हणजे दूषित करणे किंवा अस्वच्छ करणे होय. प्रदूषण हे पर्यावरणाशी संबंधित असल्याने प्रदूषणालाच 'पर्यावरणीय प्रदूषण' असेही म्हणतात. जमीन, हवा, पाणी इत्यादी नैसर्गिक

साधनसंपत्तीचा समावेश पर्यावरणात होत असतो. या पर्यावरणीय घटकांचा ऱ्हास होणे म्हणजे प्रदूषण होय. दूषित पदार्थामुळे पर्यावरणाची हानी होते किंवा पर्यावरणाचे दूषितीकरण घडून येते. त्यास पर्यावरणीय प्रदूषण असे म्हणतात. प्रदूषणास नैसर्गिक आणि मनुष्यनिर्मित असे घटक कारणीभूत असतात. या घटकांमुळे पर्यावरणातील घटक दूषित होतात. त्यांची कार्यक्षमता कमी होते. दर्जा खालावतो किंवा त्यामध्ये हानिकारक बदल होतात त्यास पर्यावरणीय प्रदूषण असे म्हणतात.

**पर्यावरणीय प्रदूषणास कारणीभूत घटक :–**

भारतातील पर्यावरणीय प्रदूषणास प्रामुख्याने खालील घटक जबाबदार आहेत.

**१) सांडपाणी, इतर टाकावू पदार्थ नदीत सोडून दिले जाणे**

भारतात आजही काही ठिकाणी घरातील, कारखान्यातील सांडपाणी, टाकावू पदार्थ (मळी इत्यादी) नदीत, ओढ्यात सोडून दिले जाते. त्यामुळे पिण्याचे पाणी अशुद्ध झाले आहे. पाण्याची गुणवत्ता कमी झाली आहे.

**२) शेतीत रासायनिक द्रव्यांचा वाढता वापर**

भारतात हरित क्रांती घडवून आणणासाठी (अधिक कृषी उत्पादन निर्माण करण्यासाठी) सन १९६० पासून कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रासायनिक खते, कीटकनाशके, जंतुनाशके वापरली जात आहेत. त्यामुळे शेतजमिनी प्रदूषित होत आहेत. रासायनिक विषारी द्रव्ये जमिनीत खोलवर जात असल्याने भारतीय शेतीची उत्पादकता घटली आहे. पावसाच्या पाण्याने शेतीत वापरलेली रासायनिक द्रव्ये नदीत, ओढ्यात वाहत जात असल्याने नदीतील, ओढ्यातील पाणी प्रदूषित बनले आहे.

**३) वृक्षतोड :–**

नवीन रस्ते तयार करणे, रस्त्याचे रुंदीकरण, रेल्वे मार्गाची बांधणी, नवीन कारखाने स्थापन करणे, थंड हवेच्या ठिकाणी हॉटेल्स्‌ची उभारणी करणे यासाठी भारतात ठिकठिकाणी प्रचंड वृक्षतोड केली जात आहे. भारतात पर्यटकांच्या निवासाची, खाण्यापिण्याची सोय करण्यासाठी थंड हवेच्या ठिकाणी जंगलांचा अक्षरश नाश चालला आहे. त्यामुळे जमिनीची धूप होणे, पावसाचे प्रमाण कमी होणे अशा समस्या निर्माण झाल्या आहेत.

**४) वाढते औद्योगिकरण:–**

जलद आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी भारतासारख्या अनेक देशांनी औद्योगिकरणाचा मार्ग स्वीकारला आहे. विविध प्रकारच्या पर्यावरणीय प्रदूषणास वाढते औद्योगिकरण हा घटक सुद्धा कारणीभूत ठरला आहे. नवनवीन कारखाने उभे करणासाठी काही प्रमाणात पिकाऊ शेतजमिनींचा सुद्धा वापर केला जात आहे. त्यामुळे शेतजमिनीचे क्षेत्र कमी होत आहे.

**५) वाढती लोकसंख्या :–**

वाढती लोकसंख्या आणि पर्यावरण यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे. जगात सर्वात जास्त लोकसंख्या वाढीचा वेग भारताचा असून आज मितीस भारताची लोकसंख्या १४० कोटीच्या आसपास आहे. अनेक तज्ञांच्या मते भारताची लोकसंख्या अतिरिक्त आहे. या अतिरिक्त लोकसंख्येला जगविण्यासाठी नैसर्गिक साधनसामग्रीचा बेसुमार वापर भारतात केला जात आहे. भारतात झाडी तोडून ती जमीन अन्नधान्याच्या लागवडीखाली आणण्याचे प्रमाण खूप वाढले आहे. त्यामुळे जंगलांचे वाळवंटीकरण होत आहे. जंगलतोडीचे भयानक दुष्परिणाम तीव्र स्वरुपात जाणवू लागले आहेत. हवा प्रदूषण, पाणी प्रदूषण, जमीन प्रदूषण, आवाज प्रदूषण, अन्न प्रदूषण इत्यादी पर्यावरणीय समस्या या वाढत्या लोकसंख्येमुळेच निर्माण झाल्या आहेत.

**६) शेतजमिनीत पाण्याचा अतिवापर :–**

भारतात अनेक ठिकाणी शेतकऱ्यांकडून शेतजमिनीत पाण्याचा गरजेपेक्षा जास्त वापर केला जातो. पाणी वापराविषयी अज्ञान आणि इतर कारणामुळे शेतजमिनीत पाण्याचा अतिवापर होत असल्याने जमीनी नापीक होणे, क्षारपड होणे अशा समस्या निर्माण झाल्या आहेत.

**७) खाणी उघडण्यास परवानगी:–**

सन १९९१ पासून भारतात आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम राबवला जात आहे. त्यालाच नवीन आर्थिक धोरण असे म्हणतात. तेंव्हापासून भारतात आदिवासी भागात आणि जंगल भागात देशी आणि विदेशी कंपन्यांना मोठमोठ्या खाणी उघडण्याची परवानगी सरकारने दिली आहे. त्यामुळे जंगलतोड मोठ्या प्रमाणावर होत आहे. पर्यावरणाचा समतोल ढासळत आहे.

**८) शहरीकरण :–**

भारतात दरवर्षी शहरांची संख्या वाढत आहे. तसेच शहरात राहणाऱ्या लोकांची संख्या सुद्धा वाढत आहे. शहरीकरणामुळे सुद्धा पर्यावरणाचा समतोल ढासळत आहे. शहरीकरणामुळे निर्माण झालेली एक महत्वाची समस्या म्हणजे कचऱ्याची समस्या होय. शहरात दररोज कचऱ्याचे ढिगच्या ढीग साठत असून कचऱ्याची योग विल्हेवाट लावणे कठीण झाले आहे. कचऱ्याच्या ढिगातून निघणाऱ्या विषारी वायूमुळे नागरिकांना अनेक आजार होत आहेत. शहरीकरणामुळे सांडपाण्याची समस्या सुद्धा बिकट बनली असून या सांडपाण्यामुळे जमिनी प्रदूषित व निरुपयोगी होत आहेत. शहरात विविध प्रकारच्या वाहनांची संख्या प्रचंड वाढल्याने शहरात हवेच्या प्रदूषणाची समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे श्वसनाचे विकार, फुफ्फुसाचे विकार, कॅन्सर असे आजार लोकांना जडत आहेत.

**९) जंगलातील वणवे/आगी : –**

भारतात दरवर्षी देशाच्या कोणत्या ना कोणत्या भागात जंगलांना आगी किंवा वणवे लागत असतात. जंगलांना लागणारे वणवे हे सुद्धा पर्यावरणाच्या ऱ्हासाचे प्रमुख कारण आहे. जंगलातील वणव्यांना मनुष्य

तसेच निसर्ग सुध्दा कारणीभूत आहे. जंगलातील वणव्यामुळे लाखो झाडे जळून नष्ट होतात. त्यामुळे पावसाचे प्रमाण कमी होत आहे.

**१०) हवामानातील बदल :–**

गेल्या काही वर्षापासून जगातील अनेक देशांना हवामान बदलाची किंवा तापमान वाढीची समस्या गंभीरपणे जाणवू लागली आहे. भारतालाही ही समस्या जाणवत असून या समस्येच्या परिणामांना तोंड द्यावे लागत आहे. हवामान बदलामुळे सुद्धा पर्यावरणीय प्रदूषणाची समस्या निर्माण होते. सुनामी लाटा, चक्रीवादळ यामुळे असंख्य वृक्ष मुळापासून उखडून पडतात. त्यामुळे जमिनीची धूप होते. चांगली सुपीक माती वाहून जाते.

**११) कालव्यातील पाण्याची गळती :–**

भारतातील पर्यावरणीय प्रदूषणाच्या समस्येस कालव्यातील पाणाची गळती हा घटक कारणीभूत आहे. कालव्यांच्या आसपासच्या शेतजमिनी खराब होणाचे एक कारण म्हणजे अनेक कालव्यांचे बांधकाम मजबूत नाही. त्यामुळे कालव्यातील काही पाण्याची गळती होऊन आजूबाजूला डबकी साठतात. तसेच शेतजमिनी खराब होतात.

**१२) नैसर्गिक घटक :–**

पर्यावरणीय प्रदूषणास मानवी घटकाबरोबरच नैसर्गिक घटक सुद्धा कारणीभूत असतात. निसर्गाच्या प्रकोपामुळे पर्यावरणीय प्रदूषणाची समस्या निर्माण होते. भारतात दरवर्षी कोठे ना कोठे पूर, महापूर अतिवृष्टी, ढगफुटी यासारख्या नैसर्गिक आपत्ती उद्‌भवत असतात. त्यामुळे अर्थव्यवस्थेचे अतोनात नुकसान होते. GDP वृद्धी दर घटतो.

**समारोप**

अशा प्रकारे पर्यावरणीय प्रदूषणास वरीलप्रमाणे विविध घटक कारणीभूत आहेत. पर्यावरणीय प्रदूषणामुळे कृषी उत्पादनात घट होणे, कृषी विकासाचा दर घटणे, श्रमिकांची कार्यक्षमता व उत्पदकता घटणे, दुष्काळाची तीव्रता वाढणे, आर्थिक विकासाच्या वृद्धीचा दर घटणे अशा समस्या निर्माण झाल्या आहेत.

**पर्यावरणीय प्रदूषणाच्या समस्येच्या निराकरणासाठी उपाय :–**

भारतासहित जगातील अनेक देशांना पर्यावरणीय प्रदूषणाची समस्या भेडसावत आहे. शाश्वत आर्थिक विकासासाठी, विकासदरात वृध्दी घडवून आणणासाठी पर्यावरणीय प्रदूषणाच्या समस्येचे निराकरण केले पाहिजे. पर्यावरणीय प्रदूषणामुळे आर्थिक विकासाचा दर वाढत नसल्याने जगातील अनेक देशांनी पर्यावरणीय प्रदूषणाच्या समस्येच्या निराकरणाकडे आपले लक्ष वळवले आहे. पर्यावरणीय प्रदूषणाची समस्या नाहीशी करण्यासाठी काही उपाय खालीलप्रमाणे सुचवले आहेत.

**१) लोकसंख्या वाढीच्या वेगावर नियंत्रण ठेवणे :–**

पर्यावरणीय प्रदूषणास लोकसंख्या वाढ हा घटक जबाबदार आहे. भारतातील ३०ते ४०कोटी लोकसंख्या अतिरिक्त आहे. म्हणून लोकसंख्या वाढीचा वेग कमी केल्याशिवाय जंगलासारख्या नैसर्गिक साधनसंपत्तीवरील ताण कमी होणार नाही. लोकसंख्या वाढीचा वेग कमी झाल्यास जंगलतोडीचे प्रमाण खूपच कमी येईल.

**२) शहरातील लोकांची संख्या पर्याप्त ठेवणे आवश्यक:–**

भारतात कित्येक शहरातील लोकसंख्या प्रचंड आहे. त्यामुळे हवेचे, पाण्याचे, आवाजाचे प्रदूषण (वाढत्या वाहन संख्येमुळे) निर्माण झाले आहे. म्हणून शहरातील लोकसंख्या पर्याप्त किंवा आटोपशीर ठेवणे आवशक आहे.

**३) प्रदूषण करणाऱ्या वाहनांना, कारखान्यांना बंदी घालणे:–**

काही वाहन कंपन्यांची वाहने दोषयुक्त आहेत. त्यांच्यामुळे मोठ्या प्रमाणात पर्यावरण दूषित होते. म्हणून हवा प्रदूषित करणाऱ्या वाहनांना आणि प्रदूषणाची समस्या निर्माण करणाऱ्या कारखान्यांना बंदी घातली पाहिजे.

**४) कचऱ्यापासून खत तयार करणे :–**

गावागावात जो कचरा तयार होत असतो त्याचे वर्गीकरण करावे आणि खत करण्यायोग्य कचऱ्याचे खत करावे व ते शेतीला उपलब्ध करुन द्यावे. कचऱ्यामुळे जे प्रदूषण होते ते खतनिर्मितीमुळे कमी करता येईल.

**५) वृक्षारोपनात वाढ :–**

प्रत्येक खेड्यात, वाडीवर, वस्तीवर जास्तीत जास्त वृक्षारोपन केले पाहिजे. प्रत्येक गावात ३० ते ४०टक्के जमिनीवर वृक्षारोपन केले पाहिजे. त्यामुळे हवेतील ऑक्सिजनचे प्रमाण वाढेल. कार्बन डॉयऑक्साईडचे प्रमाण कमी होईल. पावसाचे प्रमाण वाढेल.

**६) वृक्षतोडीवर मर्यादा :–**

सरकारने वृक्षतोडीचे प्रमाण ठरवून दिले पाहिजे. वृक्षतोडीवर मर्यादा आणल्या पाहिजेत. त्याशिवाय पावसाचे प्रमाण वाढणार नाही आणि जमिनीची धूप कमी होणार नाही.

**७) पाण्याचे नियोजन :–**

शेतकऱ्यांनी पिकांना पाणी देण्यापूर्वी पाण्याचे योग्य नियोजन करावे. मगच पिकांना पाणी द्यावे. योग्य प्रमाणात पाणी दिले तर जमिनी नापीक किंवा खराब होणार नाहीत तसेच रासायनिक द्रव्यांचा शेतीत वापर टाळला पाहिजे. त्याशिवाय जमिनीचे व पाण्याचे प्रदूषण थांबणार नाही.

### ८) नैसर्गिक आपत्तीचे व्यवस्थापन:–

सरकारने पूर, महापूर, ढगफुटी, अतिवृष्टी या नैसगिक आपत्तींचे योग व्यवस्थापन करावे. आपत्तीपूर्व आणि आपत्तीपश्चात व्यवस्थापन योग प्रकारे केल्यास नैसर्गिक आपत्तीमुळे (पूराच्या पाण्यामुळे) शेतजमिनींचे जे नुकसान होते, ते नुकसान होणार नाही.

### ९) पर्यावरण कायद्यांची अमंलबजावणी कडकपणे करावी.

पर्यावरणीय प्रदूषणाची समस्या निर्माण होऊ नये यासाठी सरकारने कायदे केले आहेत. पण त्या कायद्यांची अमंलबजावणी प्रामाणिकपणे व प्रभावीपणे होत नाही. म्हणून सरकारने पर्यावरण कायद्यांची अमंलबजावणी प्रामाणिकपणे व कडक करावी.

### १०) इतर उपाय

पर्यावरणीय प्रदूषणाची समस्या निर्माण होऊ नये यासाठी प्रदूषण निर्माण करणाऱ्या कंपन्यांचे परवाने रद्द करावेत. प्रकल्पातील टाकावू, घातक, रासायनिक पदार्थ नदीत, पाण्यात सोडल्यामुळे पाणी प्रदूषित होते. जमिनी प्रदूषित होतात. म्हणून असे प्रकल्प बंद करणे आवशक आहे. सरकारने इतरही काही उपाय योजले पाहिजेत. उदाहरणार्थ वाहनांची संख्या नियंत्रित करणे, चराई बंदी, कुऱ्हाड बंदी कार्यक्रम अमंलात आणणे, पडीक जमिनींचे नंदनवन करणे, मानवी मलमूत्राचे सुरक्षित विसर्जन करणे इ. उपाय योजले पाहिजेत.

### समारोप:–

अशा प्रकारे पर्यावरणीय प्रदूषणाचा आणि आर्थिक विकासाचा अत्यंत नजिकचा संबंध आहे. प्रदूषणामुळे अर्थव्यस्थेतील महत्वाचा घटक असणाऱ्या कृषी क्षेत्राची मोठी हानी घडून येते. शिवाय इतरही आर्थिक व बिगर आर्थिक परिणामांना तोंड द्यावे लागते. ते टाळण्यासाठी आणि आर्थिक विकास दरात वृद्धी घडवून आणण्यासाठी पर्यावरणीय प्रदूषणाच्या समस्येचे निराकरण केले पाहिजे.

## ४.२.२ भारतातील भांडवल निर्मितीची समस्या

### प्रास्ताविक:–

भारतात आजही वार्षिक भांडवल निर्मितीचा दर अत्यंत कमी आहे. आर्थिक विकासासाठी भांडवल अपुरे पडते. त्यामुळे भारताला नेहमी विदेशी भांडवलाची गरज भासते. भांडवल ही खूप व्यापक संकल्पना आहे. भांडवल म्हणजे केवळ पैसा नव्हे. मनुष्यनिर्मित उत्पादनाची साधने म्हणजे भांडवल होय. या अर्थाने मनुष्याने निर्माण केलेल्या उत्पादनाच्या सर्व साधनांचा समावेश भांडवल या संकल्पनेत होतो. भांडवलाची निर्मिती मनुष्य करत असल्याने मनुष्याला भांडवलाच्या साठ्यात वाढ घडवून आणता येते. यंत्रसामग्री हे भांडवलाचे एक उदाहरण सांगता येईल. भांडवल निर्मितीचा दर देशांतर्गत बचतीवर अवलंबून असतो. बचत जितकी जास्त तितकी भांडवनिर्मिती जास्त. बचतीचा उत्पादक कामासाठी वापर वाढला तर भांडवल निर्मितीचा दर वाढतो. बचतीचा विनियोग उत्पादक कामासाठी झाला पाहिजे. एकूण बचतीपैकी बचतीचा जो

भाग भांडवली वस्तूंच्या उत्पादनासाठी गुंतवला जातो, त्याला गुंतवणूक प्रक्रिया किंवा भांडवल निर्मितीची प्रक्रिया असे म्हणतात. भांडवलामध्ये भौतिक भांडवलाचाही समावेश होतो आणि मानवी भांडवलाचासुद्धा समावेश होतो. देशाच्या आर्थिक विकासासाठी भौतिक आणि मानवी भांडवल या दोन्ही प्रकारच्या भांडवलाची आवश्यकता असते. देशात पुरेशा पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी, बेरोजगारी कमी करण्यासाठी, देशातील नैसर्गिक साधन संपत्तीचा पुरेपूर वापर करण्यासाठी आणि मनुष्यबळाची किंवा लोकसंख्येची गुणवत्ता वाढविण्यासाठी भांडवलनिर्मितीचा दर अधिक असणे आवश्यक असते.

**भारतातील भांडवल निर्मितीचा दर कमी असण्याची कारणे**

अविकसित देशापेक्षा भारतातील भांडवल निर्मितीचा दर ५ टक्के ते ७ टक्के च्या आसपास आहे. विकसित देशात हा दर १५ टक्क्यापेक्षा जास्त आहे काही देशात तो २०ते२५ टक्के एवढा आहे. भारतात अलीकडच्या काळात भांडवल निर्मितीचा दर वाढत असला तरी विकसित देशांच्या तुलनेत तो खूपच कमी आहे. भांडवलाची समस्या किंवा अपुरे भांडवल हा भारताच्या आर्थिक विकासातील प्रमुख अडथळा आहे. विकसित देशांच्या तुलनेत भारतात आजही भांडवल निर्मितीचा दर कमी असण्याची काही कारणे खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत.

**१) बचत कमी:–**

विविध कारणामुळे भारतात बचतीचा दर कमी आहे. भारतात बचत करणाऱ्या लोकांचे प्रमाण खूपच कमी आहे. गरीब, मध्यमवर्गीय लोकांचे प्रमाण सुमारे ८० टक्के एवढे आहे. गरीबांची बचत जवळ जवळ शून्य आहे. मध्यम वर्गीय लोकांचा खर्च (राहणीमानाचा खर्च) जास्त असल्याने त्यांची बचत कमी आहे. लोकांचे सरासरी दरडोई उत्पन्न कमी असल्याने आणि त्यांचा उपभोगावर जास्त पैसा खर्च होत असल्याने बचत निर्मितीचा आणि भांडवल निर्मितीचा दर भारतात कमी आहे. विकसित देशात गरीबीचे प्रमाण शून्य आहे. तेथील लोकांचे दरडोई उत्पन्न जास्त आहे. त्यामुळे विकसित देशात बचत आणि भांडवलनिर्मितीचा दर जास्त आहे.

**२) बचत गोळा करणाऱ्या वित्तीय संस्थांची कमतरता:–**

बँका, पोस्ट ऑफिस इत्यादी वित्तीय संस्था लोकांची बचत गोळा करणाचे काम करत असतात. त्यामुळे भांडवलनिर्मितीला पोषक वातावरण निर्माण होते. परंतु भारतात आजही लोकांची बचत गोळा करणाऱ्या वित्तीय संस्थांची कमतरता आढळते. त्यामुळे पुरेशी बचत गोळा होऊ शकत नाही. भारतात भांडवल निर्मितीचा दर कमी असण्याचे हे एक प्रमुख कारण आहे.

**३) अनुत्पादक गुंतवणूक :–**

बचतीचा विनियोग उत्पादक कामासाठी केला तरच भांडवल निर्मितीचा दर वाढतो. बचतीचा जो भाग उत्पादक क्षेत्रातील गुंतवणूकीसाठी वापरला जातो त्याला भांडवल निर्मिती असे म्हणतात. अशा प्रकारे बचतीचेच रुपांतर भांडवल निर्मितीमध्ये होत असते. परंतु त्यासाठी बचतीची गुंतवणूक उत्पादक क्षेत्रात झाली

पाहिजे. परंतु भारतात आजही बचतीचा विनियोग अनुत्पादक क्षेत्रात केला जातो. उदाहरणार्थ टिकावू उपभोग्य वस्तूंची खरेदी, चैनीच्या वस्तू, मोठमोठी घरे बांधणे, सोन्याचांदीचे दागिणे खरेदी करणे, अलीशान मोटारी खरेदी करणे यासारख्या अनुत्पादक बाबीमध्ये बरेच लोक आपली बचत गुंतवतात किंवा खर्च करतात. अलीकडच्या काळात भोगवाद किंवा चंगळवाद वाढला आहे. त्यामुळे अनुत्पादक उपभोग खर्च खूपच वाढला आहे. बचतीची गुंतवणूक उत्पादक क्षेत्रात पुरेशी होत नसल्याने राष्ट्रीय उत्पादनात (राष्ट्रीय उत्पन्नात) आणि रोजगार संधीत फारशी वाढ होत नाही. थोडक्यात भारतात बचतीचा फार मोठा भाग चैनीच्या वस्तू खरेदी करण्यासाठी खर्च केला जात असल्याने भांडवल निर्मितीचा दर अल्प आहे.

**४) औद्योगिक व कृषी उत्पादकता कमी :–**

भांडवल निर्मितीचा दर हा अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांच्या उत्पादकतेवरही अवलंबून असतो. परंतु विविध कारणामुळे भारतातील औद्योगिक आणि कृषी क्षेत्राची उत्पादकता कमी आहे. स्वातंत्र्योत्तर काळात ही उत्पादकता वाढली असली तरी विकसित देशांच्या तुलनेत ही उत्पादकता खूपच कमी आहे. अशा प्रकारे कृषी व औद्योगिक क्षेत्राची उत्पादकता कमी असल्याने उत्पन्न, बचत कमी आहे. बचत निर्मितीचा दर कमी असल्याने भांडवल निर्मितीचा दरही कमी आहे.

**५) भविष्यकाळाच्या बाबतीत अनिश्चितता:–**

कित्येक संयोजकांना भविष्यकाळाच्या बाबतीत अनिश्चितता वाटते. एखाद्या प्रकल्पात गुंतवणूक केली तर दीर्घकाळ नफा मिळेल याची खात्री वाढत नाही त्यामुळे भांडवलाची गुंतवणूक कमी राहते. त्यामुळे भांडवलनिर्मितीचा वेग वाढत नाही.

**६) प्रचंड लोकसंख्या:–**

प्रचंड आकाराची लोकसंख्या हा घटक सुध्दा भारतीील भांडवल निर्मितीच्या मार्गातील प्रमुख अडथळा आहे. एकूण लोकसंख्येत अनुत्पादक लोकसंख्येचे प्रमाणही मोठे आहे. अनुत्पादक लोकसंख्येचा आणि इतर लोकसंख्येचा उपभोगावरील खर्च प्रचंड आहे. वाढत्या लोकसंख्येच्या वाढत्या गरजा भागवण्यासाठी प्रचंड खर्च करावा लागत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे उपभोग खर्च वाढला असून त्यामुळे बचत निर्मितीचा दर आणि भांडवल निर्मितीचा दर सुध्दा घटला आहे.

**७) आवश्यक शिक्षण, प्रशिक्षणाचा अभाव:–**

उद्योग, व्यवसायासाठी पुरेसे शिक्षित, प्रशिक्षित मनुष्यबळ आवश्यक असते. परंतु अशा मनुष्यबळाची देशात खूपच कमतरता आहे. देशातील २५टक्के लोक अशिक्षित आहेत. २५टक्के अल्पशिक्षित आहेत. तसेच कित्येक लोकांनी केवळ वाङ्मयीन (पुस्तकी) शिक्षण घेतले असून त्याचा नोकरी मिळवणासाठी, कामधंदा करण्यासाठी (स्वयंरोजगारासाठी) उपयोग होत नाही. उद्योग, व्यवसायासाठी आवश्यक असणारे शिक्षण व प्रशिक्षण अंगी असणाऱ्या लोकांचे प्रमाण देशात खूपच कमी आहे. त्याचाही प्रतिकूल परिणाम भांडवल निर्मितीच्या दरावर होत आहे.

**८) मागासलेले उत्पादन तंत्र:–**

भारतात उत्पादन प्रक्रियेत अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरले जाते. तसेच अनेक ठिकाणी जुनाट किंवा मागासलेले सुध्दा तंत्रज्ञान वापरले जाते. लघुउद्योग, मध्यम उद्योगांच्या मालकांना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर परवडत नाही. त्यामुळे बहुतेक लहान आणि मध्यम उद्योगात जुनाट तंत्रज्ञान वापरले जाते. त्यामुळे भांडवल निर्मितीचा दर वाढत नाही.

**९) पायाभूत सुविधांची कमतरता:–**

देशाचा आर्थिक विकास हा पायाभूत सुविधावर अवलंबून असतो. वाहतूक, सिंचन, आरोग्य, शिक्षण या सुविधांना पायाभूत सुविधा असे म्हणतात. या सुविधा देशात पुरेशा प्रमाणात उपलब्ध असतील तर खाजगी उत्पादक, संयोजक वेगवेगळे उद्योग व्यवसाय सुरू करतात. म्हणजे भांडवली गुंतवणूक करतात. परंतु भारतात अजूनही काही ठिकाणी पायाभूत सुविधांची कमतरता आहे. त्यामुळे त्या ठिकाणी खाजगी उत्पादकांची/भांडवलदारांची फारशी गुंतवणूक होत नाही. त्यामुळे भारतात भांडवल निर्मितीचा दर कमी आहे.

**१०) सुप्त बेकारी:–**

भारतात प्रछन्न किंवा सुप्त बेकारीचे प्रमाण प्रचंड आहे. देशातील कोट्यावधी बेरोजगार त्यामध्ये मोडतात. त्यांची सीमांत उत्पादकता शून्य आहे किंवा कमी आहे त्यांचा उपभोग खर्च जास्त आणि बचत शून्य आहे किंवा बचत खूपच कमी आहे. त्यामुळे भांडवल निर्मितीचा दर कमी आहे.

**सारांश**

अशा प्रकारे भारतातील भांडवल निर्मितीचा दर कमी असण्यास वर नमूद केलेले घटक कारणीभूत आहेत. भांडवल निर्मितीचा कमी दर किंवा भांडवलाची टंचाई हा घटक आर्थिक विकासातील मुख्य अडथळा बनला आहे. कारण भांडवल निर्मिती दर कमी असल्याने विकासाचा दरही कमी राहिला आहे.

**भारतातील भांडवल निर्मितीचा दर वाढावा यासाठी उपाय**

विकसित देशांच्या तुलनेत भारतातील भांडवल निर्मितीचा वेग कमी आहे. आर्थिक विकासाचा वेग वाढावा यासाठी भांडवल निर्मितीचा वेग वाढणे अंत्यत आवशक आहे. भारतातील भांडवल निर्मितीचा दर वाढावा यासाठी काही उपाय खालीलप्रमाणे सुचवले आहेत.

**१) सरकारची भूमिका:–**

देशातील भांडवल निर्मितीचा दर वाढावा यासाठी सरकार महत्वाची भूमिका बजावू शकते. सरकारने पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी पुढे येऊन प्रचंड गुंतवणूक केली पाहिजे. देशभर मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा निर्माण केल्या पाहिजेत. पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्यास खाजगी गुंतवणूकदार गुंतवणूकीसाठी पुढे येतील. त्यामुळे गुंतवणूकीची प्रक्रिया सुरू होण्यास मदत होईल.

**२) सुयोग्य करविषयक धोरण:–**

भारतात आयकराचे व इतर कर अद्यापही खूप जास्त आहेत. त्यामुळे खाजगी गुंतवणूकीची इच्छा व प्रेरणा राहत नाही. त्यामुळे सरकारने आपले करविषयक धोरण साधे, सोपे, सुटसुटीत आखावे. करांचे दर कमी करावेत. जाचक, अनावश्यक कर काढून टाकावेत. तरच खाजगी गुंतवणूक मोठ्या प्रमाणात होऊ शकेल.

**३) सार्वजनिक क्षेत्राची उत्पादकता वाढवणे:–**

खाजगी क्षेत्राच्या तुलनेत भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगसंस्थांची कार्यक्षमता आणि उत्पादकता कमी आहे. म्हणून सार्वजनिक क्षेत्राची उत्पादकता वाढवणे अत्यंत आवश्यक आहे. खाजगी व सार्वजनिक दोन्ही क्षेत्राची उत्पादकता वाढल्यास भांडवल निर्मितीचा दर वाढण्यास मदत होईल.

**४) आयात निर्यात धोरण**

सरकारचे आयात–निर्यात धोरण सुध्दा उद्योगसंस्थांच्या फायद्याचे असले पाहिजे. देशातील भांडवल निर्मितीच्या दरावर सरकारच्या आयात–निर्यात धोरणाचा सुध्दा परिणाम होत असतो. म्हणून सरकारने आयात–निर्यात धोरणाचा भांडवल निर्मितीच्या दरावर प्रतिकूल परिणाम होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. त्याशिवाय खाजगी गुंतवणूक वाढणार नाही.

**५) मनुष्यबळाची गुणवत्ता वाढवणे:–**

आजही भारतातील मानवी भांडवलाचा दर्जा खूपच कमी आहे. देशात लोकसंख्या प्रचंड आहे परंतु लोकसंख्येची गुणवत्ता खूपच कमी आहे. मानव विकासाच्या बाबतीत भारताचा १७६ देशात १३३ वा क्रमांक आहे. यावरून आपला मानवी भांडवलाचा दर्जा किती कमी आहे. याची आपणास कल्पना येते. मानवी भांडवलाचा दर्जा उंचावला तर आर्थिक विकासाचा वेग वाढणास मदत होते. हे जगातील अनेक देशांनी सिध्द केले आहे. म्हणून भांडवल निर्मितीचा आणि आर्थिक विकासाचा वेग वाढावा यासाठी देशातील मनुष्यबळाची गुणवत्ता वाढली पाहिजे. त्यासाठी सरकारने शिक्षण, आरोग्य, संशोधन यावर प्रचंड खर्च केला पाहिजे.

**६) अतिरिक्त श्रमशक्तीचा वापर करणे:–**

भारतात आज सुमारे १४० कोटी लोकसंख्या आहे. सुमारे ४०ते५० कोटी लोकसंख्या अतिरिक्त आहे. त्यामुळे सुप्त आणि उघड बेकारीचे प्रमाणही मोठे आहे. या सर्व अतिरिक्त श्रमिकांना उत्पादन क्षेत्रात वळवून उत्पादनात व रोजगारात वाढ घडवून आणता येते. म्हणून सरकारने देशातील अतिरिक्त श्रमशक्तीचा वापर करुन भांडवलनिर्मितीचा वेग वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

### ७) उद्योजक, संयोजक निर्माण होणे आवशक:-

भांडवल निर्मितीच्या प्रक्रियेत उद्योजक आणि संयोजकांची भूमिका अत्यंत महत्वाची असते. त्यासाठी देशात पुरेशा प्रमाणात उद्योजक व संयोजक असणे आवश्यक असते. परंतु देशात उद्योजक, धाडसी संयोजक यांची आजही कमतरता आहे. म्हणून देशात पुरेशा प्रमाणात उदोजक व संयोजक तयार होतील असे वातावरण सरकारने निर्माण केले पाहिजे.

### ८) तांत्रिक ज्ञानाची पातळी वाढविणे आवशक :-

भांडवल निर्मितीचा दर तांत्रिक ज्ञान, अत्याधुनिक तंत्रज्ञान या बाबीवर सुध्दा अवलंबून असतो. परंतु विकसित देशांच्या तुलनेत देशात विविध क्षेत्रात दर्जेदार तंत्रज्ञान वापरले जाते. म्हणून सर्व क्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरले पाहिजे. तांत्रिक ज्ञानाची पातळी सतत वाढती राहील याकडे सरकारने लक्ष दिले पाहिजे.

### ९) दरडोई उत्पन्नात व बचतीत वाढ:-

बचत हा भांडवल निर्मितीचा एक मार्ग आहे. बचतीतूनच भांडवल निर्मिती होते. बचत ही लोकांच्या उत्पन्नावर अवलंबून असते. म्हणून लोकांच्या दरडोई उत्पन्नात वाढ झाली पाहिजे. दरडोई उत्पन्न वाढले की बचत वाढून भांडवल निर्मितीचा दरही वाढण्यास मदत होते.

### १०) भांडवलाचा योग्य विनियोग आवश्यक:-

बचतीचा किंवा भांडवलाचा विनियोग अनुत्पादक गुंतवणूकीसाठी केला तर भांडवल निर्मितीचा दर वाढत नाही. म्हणून भांडवलाचा किंवा बचतीचा जास्तीत योग्य व काळजीपूर्वक वापर केला पाहिजे. उत्पादक क्षेत्रात जास्तीत जास्त गुंतवणूक केली पाहिजे. तरच भांडवलनिर्मितीचा दर वाढण्यास मदत होईल.

### सारांश

भारतात विकसित देशांच्या तुलनेत भांडवल निर्मितीचा दर कमी आहे. आर्थिक विकासाच्या वृध्दीचा दर वाढावा यासाठी भांडवलनिर्मितीचा दर वाढणे आवश्यक आहे. भांडवलनिर्मितीचा दर वाढावा यासाठी काही उपाय वरीलप्रमाणे सुचवले आहेत. या उपायांनी भांडवल निर्मितीचा दर वाढण्यास मदत होऊ शकेल.

## ४.२.३ भारतातील आर्थिक विषमता- कारणे, परिणाम आणि उपाय

### प्रास्ताविक आणि व्याख्या

भारतातील वाढती आर्थिक विषमता ही भारतीय अर्थव्यस्थेसमोरील प्रमुख समस्या आहे. भारतातील वाढत्या आर्थिक विषमतेची कारणे आणि उपाय यांचा अभ्यास करण्यापूर्वी आपणास आर्थिक विषमता म्हणजे काय? हे अगोदर पाहणे आवश्यक आहे. आर्थिक विषमता म्हणजे उत्पन्नातील विषमता किंवा

संपत्तीमधील विषमता किंवा मालमत्तेतील विषमता होय. आर्थिक विषमतेची एक सोपी व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

''देशातील लोकांच्या उत्पन्नात फार मोठी तफावत असणे म्हणजे आर्थिक विषमता होय. म्हणजे थोडया लोकांच्या मालकीची जास्त संपत्ती असणे होय, तर बहुसंख्य लोकांच्या मालकीची अगदी थोडी मालमत्ता किवा संपत्ती असणे होय.''

ज्या देशात गरीब आणि श्रीमंत असे दोन वर्ग दिसून येतात, त्या देशात आर्थिक विषमता आहे असा त्याचा अर्थ होतो आर्थिक विषमता असलेल्या देशात श्रीमतांची संख्या मूठभर असते, तर गरीबांची संख्या प्रचंड असते. थोडक्यात राष्ट्रीय उत्पन्नाचे आणि मालमत्तेचे (शेतजमीन, गुरे. कारखाने, दुकाने इत्यादी) देशातील जनतेत असमान वाटप होणे म्हणजे आर्थिक विषमता होय. काही लोकांना राष्ट्रीय उत्पन्नाचा मोठा वाटा मिळत असतो तर बहुसंख्य लोकांना राष्ट्रीय उत्पन्नाचा अत्यंत कमी वाटा मिळत असतो. यालाच उत्पन्नातील विषमता किवा आर्थिक विषमता असे म्हणतात.

**आर्थिक विषमतेचे स्वरुप**

भारतात श्री. ओझा, श्री. भट्ट, श्री. रणदिवे, श्री. भट्टाचार्य, श्री. मुखर्जी, श्री अय्यंगार, श्री. महालनोबीस, प्रा. दांडेकर आणि प्रा. रथ यानी आर्थिक विषमतेच्या प्रश्नाचा अभ्यास केला आहे. तसेच जागतिक बँक, भारतीय रिझर्व बँक इत्यादी संस्थांनी सुध्दा आर्थिक विषमतेचे अंदाज स्पष्ट केले आहेत. रिझर्व बँकेच्या अभ्यासानुसार १९५३-५४ ते १९५६-५७ या कालावधीमध्ये ग्रामीण भागातील ५०टक्के लोकांच्याकडे एकूण उत्पन्नाच्या ६९ टक्के हिस्सा होता. तर ५० टक्के लोकांच्याकडे एकूण उत्पन्नाच्या फक्त ३१ टक्के हिस्सा होता. तर तळाच्या ५० टक्के लोकांच्याकडे एकूण उत्पन्नाच्या फक्त २५ टक्के हिस्सा होता. जागतिक बँकेच्या अभ्यासानुसार सन १९९७ मध्ये भारतातील वरच्या उत्पन्न गटातील १० टक्के कुटुंबाकडे एकूण उत्पन्नाच्या ३३.५० टक्के हिस्सा होता. तर सर्वात खालच्या म्हणजे तळातील २० टक्के कुटुंबाकडे एकूण उत्पन्नाच्या फक्त ८.१० टक्के हिस्सा होता.

भारतात केवळ उत्पन्नाचे (पैशातील उत्पन्नाचे) असमान वाटप झाले आहे असे नाही. तर शेतजमीन, कारखाने, दुकाने, जनावरे या मालमत्तेचेही असमान वाटप झाले आहे. त्यामुळे आर्थिक विषमता किवा आर्थिक असमानता निर्माण झाली आहे.

**भारतातील आर्थिक विषमतेची कारणे–**

भारतात शहरी भागातही आर्थिक विषमता आढळते आणि ग्रामीण भागातही आर्थिक विषमता आढळते. भारतातील आर्थिक विषमतेची किंवा उत्पन्न व मालमत्तेतील विषमतेची काही कारणे थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत.

**१. मालमत्ता मिळविण्याचा हक्क –**

भारतात प्रत्येक नागरिकाला मालमत्ता मिळविण्याचा किंवा त्या मालमत्तेचा मर्जीप्रमाणे विनियोग करण्याचा कायदेशीर अधिकार आहे. मालमत्ता मिळवण्यावर बंधने नाहीत. त्यामुळे श्रीमंत शेतकरी, श्रीमंत

व्यापारी, श्रीमंत कारखानदार अधिकाधिक उत्पन्न व मालमत्ता मिळवण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे श्रीमंत अधिक श्रीमंत होत जातात. त्याचा परिणाम गरीब व श्रीमंत यांच्यातील अंतर वाढण्यात म्हणजेच आर्थिक विषमता निर्माण होण्यात होतो.

**२. वारसा हक्क–**

भारतात लोकशाही असून वारसा हक्काचे कायदे करण्यात आले आहेत. या कायदयानुमार व्यक्तीच्या मृत्यूनंतर तिची मालमत्ता तिच्या वारसांना मिळते. समाजवादी देशाप्रमाणे व्यक्तीच्या मत्यूनंतर तिची मालमत्ता सरकारच्या मालकीची होत नाही. अशा प्रकारे भारतात वारसा हक्काचे कायदे असल्याने श्रीमंत व्यक्तींच्या मत्यूनंतर त्यांची मालमत्ता त्यांच्या मुलांच्या नावे होते. त्यामुळे श्रीमंतांची मुले श्रीमंत होतात. गरीबांची मालमत्ता फारशी नसल्याने गरीबांची मुले गरीब राहतात. त्यामुळे भारतात आर्थिक विषमता निर्माण झाली आहे.

**३. शेतजमिनीच्या मालकी हक्कांचे केंद्रीकरण–**

भारतात ग्रामीण भागात आर्थिक विषमता आढळण्याचे प्रमुख कारण म्हणजे ग्रामीण भागातील थोडया श्रीमंत शेतकऱ्यांकडे पुष्कळ प्रमाणात शेतजमीन आहे. तर बहुसंख्य गरीब शेतकऱ्यांकडे कमी प्रमाणात शेतजमीन आहे. ग्रामीण भागातील काही लोक तर भूमिहीनच आहेत. भारतात १५टक्के शेतकऱ्यांच्या मालकीची ६१ टक्के शेतजमीन आहे. तर ८५ टक्के शेतकऱ्यांच्या मालकीची फक्त ३९ टक्के शेतजमीन आहे. भारतात अडीच एकर पेक्षा कमी कोरडवाहू जमीन असणाऱ्या गरीब शेतकऱ्यांचे प्रमाण खूप मोठे आहे. अशा प्रकारे भारतात मूठभर श्रीमंत शेतकऱ्यांकडे शेतजमिनीच्या मालकी हक्काचे केंद्रीकरण झाले आहे. त्यामुळे ग्रामीण भागात आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात दिसून येते.

**४. कर चुकवेगिरी व काळा पैसा:–**

भारतात कर बुडविण्याऱ्यांचे प्रमाण मोठे आहे. अशा कर चुकवेगिरीतून काळा पैसा निर्माण होतो. तसेच चोरटा व्यापार, बेकायदेशीर धंदे इत्यादी माध्यमातून काळा पैसा निर्माण होतो. भारतात सध्या दोन लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त काळा पैसा आहे. भारतात काळया पैशाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून कर बुडवणारे श्रीमंत होत चालले आहेत. त्यामुळे भारतात आर्थिक विषमता निर्माण झाली आहे.

**५. गरीबांच्या लोकसंख्येत वेगाने वाढ :–**

अतिरिक्त लोकसंख्या आणि आर्थिक विषमता यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे. भारताची लोकसंख्या अतिरिक्त असून यामध्ये गरीबांचीच लोकसंख्या प्रचंड आहे. श्रीमंतांच्या कुटुंबाचा आकार अत्यंत लहान असून श्रीमंतांच्या लोकसंख्या वाढीचा वेग खूपच कमी आहे. गरीबांच्या कुटुंबाचा आकार मोठा असल्याने त्यांचा खर्च जास्त राहून ते अधिकच गरीब होत आहेत.

**६. भ्रष्टाचार / लाचखोरी:–**

भ्रष्टाचार किंवा लाचखोरी हे सुध्दा आर्थिक विषमतेचे प्रमुख कारण आहे. सरकारच्या विविध खात्यातील कित्येक कर्मचारी लाच घेतल्याशिवाय काम करत नाहीत. एकेक कर्मचारी महिन्याला पगाराच्या

१० पट ते १०० पट रक्कम लाच म्हणून घेतो. दरवर्षी अनेक कर्मचारी लाखो रूपये लाच घेताना पोलिसांकडून पकडले जातात. या पकडलेल्या कित्येक कर्मचाऱ्यांकडे कोटयावधी रूपयांची बेहिशोबी रोकड आणि स्थावर जंगम मालमत्ता सापडली आहे.

**७. हरित क्रांती–**

हरित क्रांती हे सुध्दा आर्थिक विषमतेचे प्रमुख कारण ठरले आहे. हरित क्रांतीमुळे भारतात आर्थिक विषमता वाढत आहे. भारतात सन १९६० नंतर हरित क्रांती घडून आली. १९६० नंतर सरकारी प्रयत्नांनी भारतीय शेतीची मोठी प्रगती झाली. कृषी उत्पादनात प्रचंड वाढ झाली. त्याला हरित क्रांती असे म्हणतात. परंतु हरित क्रांती ही फक्त भारताच्या महाराष्ट्र, पंजाब, इत्यादी निवडक सात-आठ राज्यातच झाली. तसेच हरित क्रांतीचे जास्तीत जास्त लाभ फक्त श्रीमंत शेतकऱ्यांनाच झाले. ग्रामीण भागातील गरीब शेतकरी आणि शेतमजूर यांना हरित क्रांतीचे फारसे लाभ झाले नाहीत.

**८. सरकारी धोरण भांडवलदारांच्या फायद्याचे:–**

भारतात सरकारकडून भांडवलदारांना / कारखानदारांना विविध सवलती दिल्या जातात. उदाहरणार्थ करामध्ये सवलती, कर्जमाफी, जागा (जमीन) घेण्यासाठी सवलती इत्यादी विविध सवलती भांडवलदारांना सरकारकडून दिल्या जातात. त्यामुळे भांडवलदारांचाच/कारखानदारांचाच फायदा होत आहे. सरकारने आत्तापर्यंत कितीतरी लाखो कोटी रुपयांच्या करसवलती आणि कर्जमाफी या उद्योगांना दिली आहे. त्याचा फायदा उद्योग क्षेत्राला होत आहे. सवलती देण्याच्या धोरणामुळे सुध्दा या उद्योगांची ताकद वाढून आर्थिक शक्तीचे किंवा संपत्तीचे केंद्रीकरण देशात घडून आले आहे. सरकारचे भांडवलदारधार्जिणे धोरण हे भारतात आर्थिक विषमता वाढण्याचे एक प्रमुख कारण आहे.

**९. भाववाढ/महागाई:–**

सतत होत असलेली भाववाढ किंवा महागाई हे सुध्दा भारतातील आर्थिक विषमतेचे एक प्रमुख कारण आहे. भाववाढीमुळे व्यापारी, दुकानदार यांचाच फायदा होत असून त्यांच्या नफ्यात वाढ होत असल्याने ते दिवसेंदिवस श्रीमंत होत आहेत. याउलट महागाईमुळे गरीब लोकांना वस्तू व सेवांसाठी जादा किंमत मोजावी लागत असल्याने त्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. अशा प्रकारे भाववाढीमुळे व्यापारी, उत्पादक श्रीमंत होत असून हमाल, कामगार, शेतमजूर, कारागिर इत्यादी लोक गरीब बनत आहेत. म्हणून जीवघेणी महागाई हे सुध्दा भारतातील आर्थिक विषमतेचे प्रमुख कारण आहे.

**१०. नवीन अर्थिक धोरण**

भारत सरकारने सन १९९१ पासून नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केला असून खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण, इत्यादी द्वारे नवीन आर्थिक धोरणाची अंमलबजावणी केली जात आहे. नवीन आर्थिक धोरणाचा लाभ भारतातील मोठ्या उदयोगांना होत असून या उदयोगांचे मालक दिवसेंदिवस श्रीमंत होत आहेत. त्याची श्रीमंती वाढत आहे. यालट नवीन आर्थिक धोरणामुळे कित्येक कामगारांवर बेकारीची

कुऱ्हाड कोसळत असून त्यांच्या उत्पन्नाचे स्त्रोत बंद झाले आहेत. अशा प्रकारे नवीन आर्थिक धोरणामुळे सुध्दा देशात आर्थिक विषमता निर्माण झाली आहे व होत आहे.

**११. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारचे उद्योग क्षेत्राला मदत करण्याचे धोरण :**

भारतात आज मूठभर औद्योगिक घराण्यांकडे औद्योगिक साम्राज्य असलेले दिसते. याचे प्रमुख कारण म्हणजे देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारत सरकारने उद्योग क्षेत्राच्या विकासाकडे दिलेले विशेष लक्ष होय. १९४७ पर्यंत देश ब्रिटिशांच्या ताब्यात होता. ब्रिटिश सरकारने देशाच्या विकासाकडे लक्ष न देता देशाचे आर्थिक शोषण करण्याकडे, संपत्तीची, मालमत्तेची लूट करण्याकडेच विशेष लक्ष दिले. त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेची सर्वच क्षेत्रे खूपच मागासलेली राहिली होती. म्हणून देशाचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी भारत सरकारने देशाच्या आर्थिक विकासाला प्राधान्य दिले. औद्योगिक क्षेत्र खूपच मागासलेले होते. या क्षेत्रात खाजगी गुंतवणूक वाढली तर हे क्षेत्र मजबूत होईल म्हणून सरकारने खाजगी क्षेत्राला प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले. शेकडो, हजारो एकर जमिनी अत्यंत कमी किमतीत किंवा जवळजवळ मोफत देण्यात आल्या. टाटा सारख्या उद्योजकांना सरकारने भरपूर सवलती दिल्या. त्याचा लाभ खाजगी क्षेत्रातील उद्योगांनी घेतला. त्यामुळे त्यांची मक्तेदारी निर्माण होऊन त्यांच्याकडे आर्थिक शक्तीचे केंद्रीकरण झाले. आर्थिक विषमतेचे हे सुद्धा एक प्रमुख कारण आहे.

**१२. परकीय स्पर्धेपासून संरक्षण देण्याचे धोरण:**

विकसित देशातील वस्तू स्वस्त व दर्जेदार असतात. ब्रिटिशांनी आपल्या राजवटीत भारतात पक्का माल विकण्याचे धोरण स्वीकारले. त्यामुळे खेड्यापाड्यातील असंख्य छोटे छोटे उद्योग बंद पडले. कामगार, कारागीर बेकार झाले. त्यामुळे दारिद्र्यात व आर्थिक विषमतेत भरच पडली. दारिद्र्य, बेकारी, विषमता वाढू नये यासाठी आणि स्वदेशी उद्योग बंद पडू नयेत त्यासाठी भारत सरकारने भारतीय उद्योगांना परकीय स्पर्धेपासून संरक्षण देण्याचे धोरण स्वीकारले. परकीय वस्तूंच्या आयातीवर बंदी घालणे, आयात वस्तूंची संख्या नियंत्रित करणे, आयात वस्तूच्या प्रमाणावर बंधने घालणे असे उपाय सरकारने योजले. त्यामुळे खाजगी क्षेत्राची वाढ होण्यास मदत झाली. परकीय स्पर्धेपासून देशी उद्योगांना संरक्षण देण्याचे धोरण स्वीकारल्यामुळे भारतातील उद्योगांचा फायदा झाला. त्यांनी उत्पादन केलेला माल देशात चांगल्या प्रकारे खपण्यास मदत झाली. परंतु हे धोरण अनेक वर्षे चालू ठेवल्यामुळे या उद्योगांची मक्तेदारी निर्माण होऊन संपत्ती किंवा मालमत्ता मोठ्या प्रमाणात त्यांच्या हातात एकवटली. भारतात आजही आर्थिक विषमता किंवा संपत्तीमधील विषमता दिसते. त्याचे एक प्रमुख कारण सरकारने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर उद्योग क्षेत्राला परकीय स्पर्धेपासून जे संरक्षण दिले होते ते आहे.

**१३) सरकारवर दबाव आणण्याचे धोरण :**

मोठे उद्योग विविध माध्यमातून सरकारवर दबाव आणून आपणाला पाहिजे तसे नियम व कायदे करून घेतात. सरकारला किंवा सरकारमधील विविध राजकीय पक्षांना मोठमोठ्या देणग्या देऊन विविध सवलती, मोठे उद्योग पदरात पाडून घेतात. सत्तेतील आणि विरोधी पक्षातील नेत्यांशी चांगले संबंध ठेवून सर्वच

राजकीय पक्षांना मोठमोठ्या देणग्या देऊन मोठमोठे उद्योजक आपल्या उद्योगांच्या वाढीस अनुकूल ठरतील असे कायदे, तरतुदी करून घेतात. सरकारची औद्योगिक धोरणे आपल्याला फायदेशीर होतील अशी तयार करण्याची अपेक्षा हे उद्योग सरकारकडे व्यक्त करतात. अशा प्रकारे मोठे उद्योग मोठे होण्याचे म्हणजे आर्थिक विषमता निर्माण होण्याचे प्रमुख कारण म्हणजे या उद्योगांकडून सरकारवर दबाव आणून पाहिजे तसे नियम बनवून घेतले जाणे हे होय.

**१४) तांत्रिक प्रगती :**

भारतात अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणात तांत्रिक यांत्रिक प्रगती झाली आहे. तंत्रज्ञानाच्या बाबतीत भारताचा जगात बराच वरती क्रमांक आहे. भारतातील मोठ्या उद्योगांना जागतिक दर्जाचे, उच्च दर्जाचे, अत्याधुनिक तंत्रज्ञान आपल्या उद्योगात वापरले आहे. रोज सतत नवनवीन तांत्रिक प्रगती देशात होत आहे. तांत्रिक प्रगतीचा मोठ्या उद्योगांना अधिक लाभ होत आहे. मुळातच त्यांची आर्थिक शक्ती दांडगी असल्याने त्यांना नवीन तंत्रज्ञान वापरणे खर्चिक वाटत नाही. नवीन तंत्रज्ञानाच्या वापरामुळे या उद्योगांच्या नफ्यात प्रचंड वाढ झाली आहे व होत आहे. त्यामुळे हे उद्योग आर्थिकदृष्ट्या दिवसेंदिवस बदनाम होत आहेत. त्यामुळे संपत्तीचे केंद्रीकरण घडून येत आहे. म्हणजेच आर्थिक विषमता वाढीस लागत आहे.

**१५) बोगस कंपन्यांची प्रचंड वाढ:**

वार्षिक वीस लाखापेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्या आयकरदात्यांना ३० टक्के एवढा मोठा आयकर भरावा लागतो. तसेच उद्योगांना इतरही अनेक कर भरावे लागतात. हे कर चुकवता यावेत यासाठी आणि नवीन कंपन्यांना मिळणारे फायदे मिळवता यावेत यासाठी उद्योजकांनी १०, २०, ५०, १०० कंपन्या उघडण्याचे धोरण स्वीकारले आहे. भारतात काही राजकारणी लोकांनीसुद्धा हे धोरण अवलंबले आहे. एकेका राज्यकर्त्यांनी शेकडो कंपन्या उघडल्या आहेत. त्यामुळे आयकर वाचवणे त्यांना शक्य झाले आहे. बोगस कंपन्या व सरकारी मान्यता घेऊन स्थापन केल्या जात असलेल्या असंख्य कंपन्या यामुळे उद्योजक अधिक सधन होत आहेत. त्यांची श्रीमंती दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे आर्थिक विषमता वाढत आहे.

**१६) परवाना देणाऱ्या सरकारी कार्यालयांचे चुकीचे धोरण:**

सरकारकडून उद्योग चालू करण्यासाठी विविध परवाने घ्यावे लागतात. परवाना देणारे कित्येक अधिकारी लहान उद्योगापेक्षा मोठ्या उद्योगांच्या मालकांना जलद परवाने देतात. त्यामुळे मोठे उद्योग लवकर स्थापन होतात. त्यांचे उत्पादन लवकर सुरू होते. तसेच परवाने देताना कित्येक अधिकारी मोठ्या लाचेची मागणी करतात. मोठे उद्योग लाच देऊन, देणग्या देऊन सहज परवाने मिळवू शकतात. लहान उद्योगांना ते शक्य होत नाही. परवाने देताना सरकारी अधिकारी दुजाभाव करतात. मोठ्या उद्योगांना अधिक महत्त्व देतात. त्यामुळे मोठ्या उद्योगांची आर्थिक शक्ती वाढत आहे.

**१७) बँकिंग क्षेत्रावर वर्चस्व:**

सन १९६९ मध्ये तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी भारतातील १४ मोठ्या व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. कारण या बँका शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करत नव्हत्या. केवळ उद्योगांनाच या बँका कर्ज

पुरवठा करत होत्या. राष्ट्रीयीकरणापूर्वी या बँकांवर उद्योग क्षेत्राचे मोठे वर्चस्व होते. मोठे व्यापारी, मोठे व्यावसायिक, मोठे उद्योजक यांचे मोठ्या बँकांवर/ बँकिंग क्षेत्रावर वर्चस्व होते. या बँकांकडून त्यांनी मोठ्या प्रमाणात अर्थसहाय्य (कर्जे) घेऊन आपल्या उद्योगांचा विकास करून घेतला. अशा प्रकारे मोठे उद्योग अधिकच मोठे होत जाण्याचे प्रमुख कारण म्हणजे १९६९ पर्यंत बँकिंग क्षेत्रावर त्यांचे मोठे वर्चस्व होते. त्यामुळे संपत्तीचे केंद्रीकरण घडून येऊन आर्थिक विषमता देशात वाढीस लागली.

**१८) मोठमोठ्या वित्तीय संस्थांची मदत:**

औद्योगिक क्षेत्राला दीर्घ मुदतीचा व प्रचंड रकमेचा कर्ज पुरवठा आवश्यक असतो. त्यासाठी सरकारने देशात अनेक वित्तीय संस्थांची स्थापना केली. ICICI, SFCs, LIC अशा वित्तीय संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. औद्योगिक क्षेत्राला कर्ज पुरवठा करण्यासाठी खास भारतीय औद्योगिक विकास बँकेची स्थापना केली आहे. या मोठ्या वित्तीय संस्थांनी आजपर्यंत भारतीय उद्योगांना मोठी मदत केली आहे. वित्तीय संस्थांकडून उद्योगांना प्रचंड भांडवल किंवा कर्ज उपलब्ध होते. त्याचा फायदा मोठ्या उद्योगांनी घेतला असून त्यांनी आपल्या उद्योगांच्या संख्येत, नफ्यात वाढ घडवून आणली आहे. अशा प्रकारे भारतात मोठ्या उद्योगांची आर्थिक ताकद वाढण्याचे प्रमुख कारण म्हणजे मोठमोठ्या वित्तीय संस्थांनी त्यांना केलेली प्रचंड आर्थिक मदत ही आहे. संपत्तीच्या केंद्रीकरणाचे किंवा आर्थिक विषमतेचे हे प्रमुख कारण आहे.

**१९) सार्वजनिक क्षेत्राचा संकोच करण्याचे धोरण:**

अलिकडच्या काळात भारत सरकारने सार्वजनिक क्षेत्राचा संकोच करण्याचे धोरण स्वीकारले आहे. नवीन सरकारी उद्योग सुरू करण्याचे बंद केले आहे. सरकारने आतापर्यंत आपले काही आजारी, सतत तोट्यात चालणारे उद्योग बंद करून ते उद्योग विकण्याचे धोरण स्वीकारले आहे. सरकारी उद्योगांच्या खाजगीकरणाचे आणि निर्गुंतवणुकीचे धोरण स्वीकारले आहे. त्यामुळे खाजगी उद्योग क्षेत्र अधिकाधिक बळकट होत आहे. अशा प्रकारे सरकारने सार्वजनिक क्षेत्राचा संकोच करण्याचे धोरण स्वीकारले असल्याने खाजगी उद्योगांची आर्थिक ताकद वाढत आहे. त्यामुळे संपत्तीचे केंद्रीकरण वाढून आर्थिक विषमता वाढत आहे.

**२०) मक्तेदारी आणि प्रतिबंधक व्यवहार कायद्यात सुधारणा :**

भारतात मोठ्या उद्योगांची मक्तेदारी वाढू नये, आर्थिक विषमता निर्माण होऊ नये यासाठी 'मक्तेदारी आणि प्रतिबंधक व्यवहार कायदा' (MRTP ACT) बनवण्यात आला आहे. परंतु १९९१ च्या औद्योगिक धोरणात या कायद्यातील जाचक तरतुदी रद्द करण्यात आल्या आहेत. परवान्याची सक्ती केलेल्या उद्योगांना त्यातून मुक्त केले. देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने शस्त्रास्त्र उद्योग महत्त्वाचा मानला जातो. असे काही उद्योग सोडून कोणतेही उद्योग सुरू करण्यास परवानगीची गरज राहणार नाही अशी तरतूद सरकारने केली.उद्योगांच्या वाढीवर नियंत्रणे घालणाऱ्या एमआरटीपी ॲक्टमध्ये सरकारने सुधारणा केल्या. त्यामुळे उद्योगांची वाढ आणि भरभराट होण्यास मदत झाली. एमआरटीपी ॲक्ट मध्ये सुधारणा केल्यामुळे औद्योगिक विकासातील अडथळे कमी झाले. त्यामुळे उद्योगांची आर्थिक ताकद वाढली. परंतु आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण झाले.

**२१) बौद्धिक संपत्तीतील विषमता :**

देशातील प्रत्येक नागरिकाची बुद्धी सारखी नाही. जे बुद्धिमान आहेत, हुशार आहेत त्यांना जास्त उत्पन्न मिळते. जे बुद्धिमान नाहीत, हुषार नाहीत त्यांना कमी उत्पन्न मिळते. प्रत्येकाकडे असणारी बौद्धिक मालमत्ता सारखी नाही. बुद्धीच्या जोरावर अधिक उत्पन्न मिळवून देणारे व्यवसाय, उद्योगधंदे करता येतात. बुद्धीच्या जोरावर चांगले उत्पन्न देणाऱ्या नोकऱ्या मिळवता येतात. अशा प्रकारे बौद्धिक संपत्तीतील विषमतेमुळेसुद्धा आर्थिक विषमता निर्माण होते.

**२२) असंघटित क्षेत्राचे मोठे अस्तित्व:**

भारतात एकूण कामगारांपैकी जवळजवळ २० टक्के कामगार संघटित क्षेत्रात काम करतात. संघटित क्षेत्रात काम करणाऱ्यांचे प्रमाण खूपच कमी आहे. संघटित क्षेत्रात वेतनाचे दर (पगार) जास्त आहेत. असंघटित क्षेत्रात मजुरीचे दर किंवा पगार खूपच कमी आहेत. त्यामुळे भारतात उत्पन्नातील विषमता आढळते. म्हणून असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्यांचे मोठे प्रमाण हा घटक भारतातील वाढत्या आर्थिक विषमतेस कारणीभूत ठरलेला महत्त्वाचा घटक आहे .

**२३) महागाई किंवा भाववाढ :**

भारतातील आर्थिक विषमतेस वाढती महागाई किंवा भाववाढीची परिस्थिती हा घटकसुद्धा कारणीभूत आहे. भारतात विविध कारणांमुळे जीवनावश्यक वस्तूंची व इतर वस्तूंची भाववाढ दिसून येते. भारतातील महागाईचे वैशिष्ट्य म्हणजे ही महागाई गरिबांना जाणवते. श्रीमंतांना जाणवत नाही. महागाईमुळे गरीब आणखी गरीब होतात. श्रीमंत व्यापारी, उत्पादक किंवा कारखानदार यांचा महागाईमुळे फायदा होतो. महागाईमुळे हा श्रीमंत वर्ग आणखी श्रीमंत होतो. महागाईमुळे गरिबांची गरिबी वाढते, तर श्रीमंतांची श्रीमंती वाढते. म्हणून भारतातील आर्थिक विषमतेस महागाई किंवा भाववाढ हा घटक कारणीभूत ठरलेला महत्त्वाचा घटक आहे.

**२४) सर्वसमावेशक वृद्धीचा अभाव:**

स्वातंत्र्योत्तर काळात भारताचा अफाट आर्थिक विकास झाला. कृषी, उद्योग, व्यापार आणि सेवा क्षेत्राचा चांगला विकास झाला. स्थूल देशांतर्गत उत्पादनात, राष्ट्रीय उत्पन्नात किंवा जीडीपीमध्ये दरवर्षी मोठी वाढ घडून येत आहे. परंतु आर्थिक विकासाचे फायदे देशातील सर्व जनतेपर्यंत अद्याप पोहोचू शकले नाहीत. विकासाचे फायदे काही लोकांना मोठ्या प्रमाणात मिळतात तर काही लोकांना कमी प्रमाणात मिळतात. अशा प्रकारे देशाच्या आर्थिक विकासाचे फायदे देशातील सर्व जनतेला पुरेशा प्रमाणात मिळत नाहीत. त्यामुळे आर्थिक विषमता निर्माण होते व ती वाढीस लागते.

**सारांश:–**

अशा प्रकारे भारतातील आर्थिक विषमतेस वरील विविध घटक जबाबदार आहेत. वरील घटकाशिवाय अन्य काही घटक आर्थिक विषमतेस जबाबदार आहेत. सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे आर्थिक विषमता (गरीब व श्रीमंत यांच्यातील दरी) वाढत आहे.

**आर्थिक विषमतेचे परिणाम**

आर्थिक विषमता (मालमत्तेतील विषमता /संपत्तीतील विषमता/ उत्पन्नातील विषमता) केवळ भारतातच आढळते असे नाही तर जगभर आढळते. विकसित देशातसुद्धा आर्थिक विषमता आढळते. सर्व प्रकारच्या अर्थव्यवस्थेत विषमता आढळते. गरीब आणि श्रीमंत यांच्यातील अंतर जितके जास्त तितकी विषमता अधिक आढळते. आर्थिक विषमतेच्या स्वरूपावर आर्थिक विषमतेच्या परिणामांची तीव्रता अवलंबून असते. आर्थिक विषमता गंभीर किंवा तीव्र स्वरूपाची असेल तर परिणामांची गंभीरतासुद्धा जास्त असते. भारतात जी आर्थिक विषमता आढळून येते तिचे काही परिणाम थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

**१) दारिद्र्यः**

दारिद्र्य हे आर्थिक विषमतेचे कारण आणि परिणाम आहे. देशात गरीब आणि श्रीमंत यांच्यात मोठे अंतर असणे म्हणजे देशात आर्थिक विषमता असणे होय. आर्थिक विषमता कमी होण्याऐवजी सतत वाढत असेल तर देशात दारिद्र्याचा प्रश्न गंभीर होतो. आर्थिक विषमता वाढणे याचा अर्थ देशातील गरीब आणि श्रीमंत यांच्यातील अंतर वाढलेले असणे होय. आर्थिक विषमता वाढत असेल तर त्याचा फायदा श्रीमंतांना अधिक होतो. श्रीमंत अधिक श्रीमंत होतात आणि गरीब अधिक गरीब होतात. भारतात आजही दारिद्र्याची समस्या अस्तित्वात आहे. भारतातील दारिद्र्यास अनेक घटक कारणीभूत आहेत. त्यामध्ये आर्थिक विषमता हा प्रमुख घटक आहे. आर्थिक विषमतेमुळे भारतात दारिद्र्याची समस्या अस्तित्वात आहे. देशात दारिद्र्याचे प्रमाण जेवढे मोठे तेवढी आर्थिक विषमता जास्त राहते आणि देशात आर्थिक विषमता जेवढी मोठी तेवढे दारिद्र्याचे प्रमाण अधिक राहते. अशाप्रकारे दारिद्र्य हे आर्थिक विषमतेचे कारण आणि परिणाम आहे. म्हणून आर्थिक विषमता कमी करण्यासाठी देशातील दारिद्र्य नष्ट केले पाहिजे.

**२) सामाजिक विषमतेत वाढ :**

आर्थिक विषमतेमुळे सामाजिक विषमतेत वाढ होते. गरीब लोक आणि श्रीमंत लोक देशात असणे म्हणजे आर्थिक विषमता होय. गरिबांचा सामाजिक दर्जा कनिष्ठ असतो आणि श्रीमंतांचा सामाजिक दर्जा चांगला असतो. गरिबांना गरीबीमुळे समाजात फारशी किंमत नसते. श्रीमंतांना समाजात जास्त मानसन्मान असतो. गरिबांना तसा मान-सन्मान नसतो. आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात असेल तर देशात सामाजिक विषमता सुद्धा अधिक राहते.

**३) हिंसक चळवळींचा उदय :**

भारतात नक्षलवाद्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून जी चळवळ सुरू केली आहे, ती चळवळ सरकारविरोधी असून हिंसक चळवळ आहे. या चळवळीने भारताच्या काही भागात मोठा हिंसाचार माजवला आहे. सरकारी मालमत्तेचे प्रचंड नुकसान केले आहे. नक्षलवाद्यांची ही हिंसक चळवळ आदिवासी लोकांची असून या चळवळीच्या कारवाया अद्याप चालूच आहेत. नक्षलवादी चळवळीसारख्या हिंसक चळवळी

निर्माण होण्याची जी कारणे आहेत त्यामध्ये एक प्रमुख कारण आहे ते म्हणजे आदिवासींचे दारिद्र्य. ग्रामीण आणि शहरी समाजापेक्षा आदिवासी भागात दारिद्र्याचे प्रमाण मोठे आहे. आर्थिक विषमतेमुळे दारिद्र्याचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. त्यामुळे हिंसक चळवळीनी जन्म घेतला आहे. अशाप्रकारे भारतात ज्या हिंसक चळवळी आढळतात त्यास आदिवासींचे दारिद्र्य आणि आर्थिक विषमता हे घटक कारणीभूत आहेत.

**उत्पन्नातील आणि संपत्तीमधील विषमता कमी करण्यासाठी सरकारने योजलेले उपाय:**

भारतात उत्पन्नातील आणि संपत्तीमधील विषमता (आर्थिक विषमता) मोठी आहे. वर्ल्ड इनइक्विलिटी रिपोर्टनुसार (२०२२) जगात सर्वात जास्त आर्थिक विषमता असणाऱ्या देशांच्या यादीत भारताचा समावेश आहे. वरच्या दहा टक्के लोकांच्याकडे एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ५७% राष्ट्रीय उत्पन्न आहे आणि वरच्या १ टक्के लोकांच्याकडे एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या २२ टक्के उत्पन्न आहे. तळातील ५० टक्के लोकांच्याकडे एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या १३ टक्के उत्पन्न आहे. वरच्या १० टक्के लोकांच्याकडे एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ७७ टक्के उत्पन्न आहे. १ टक्के श्रीमंत भारतीय लोकांकडे राष्ट्रीय संपत्तीच्या ५३% संपत्ती आहे. मोठ्या संख्येने असणाऱ्या गरीब लोकांच्याकडे राष्ट्रीय संपत्तीच्या ४.१% संपत्ती आहे. अशा प्रकारे भारतात आर्थिक विषमता आढळून येते. ही विषमता उत्पन्नातील आणि संपत्तीमधील आहे. ही विषमता कमी करण्यासाठी किंवा विषमता वाढू नये यासाठी भारत सरकारने स्वातंत्र्यप्राप्तीपासूनच प्रयत्न केले आहेत. आर्थिक विषमता कमी करण्यासाठी सरकारने योजलेल्या उपायांची माहिती थोडक्यात खालीलप्रमाणे दिली आहे.

**१) जमीन सुधारणा कार्यक्रम :**

स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने आर्थिक विषमता कमी करण्यासाठी जमीन सुधारणा कार्यक्रम १९४८ मध्ये राबवला. भारतात ब्रिटिशांच्या काळात स्थावर जंगम मालमत्तेची विषमता खूप मोठ्या प्रमाणात होती. भारताच्या काही राज्यात एक एका जमीनदाराकडे हजारो एकर शेतजमीन होती. ही विषमता कमी करण्यासाठी सरकारने जमीन सुधारणा कायदे केले. कमाल जमीनधारणा कायदा केला. एका कुटुंबाला कोरडवाहू शेतजमीन किंवा बागायत जमीन जास्तीत जास्त (कमाल) किती बाळगता येईल याचा कायदा सरकारने केला. त्यापेक्षा अधिक शेतजमीन एका कुटुंबाला विकत घेता येणार नाही अशी कायद्यात तरतूद केली. तसेच जमिनीच्या मालकी हक्कातील विषमता कमी करण्यासाठी सरकारने 'कसेल त्याची जमीन' आणि 'कुळकायदे' केले. त्यानुसार भारतातील हजारो कुळांना शेतजमिनीची मालकी मिळाली. अशाप्रकारे स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने कमाल जमीनधारणा आणि कुळ कायदे केले. या कायद्यामुळे जमीनदारी नष्ट झाली. शेकडो हजारो एकर जमिनी ज्यांच्या मालकीची होती त्यांना आपल्या जमिनी सरकारला (कुळांना) द्याव्या लागल्या. या कायद्यानुसार ज्यांच्याकडे अतिरिक्त जमिनी होत्या, त्या जमिनी सरकारने काढून घेतल्या आणि त्या जमिनी भूमिहीनांना व कुळांना दिल्या. त्यामुळे स्थावर जंगम मालमत्तेतील विषमता कमी होण्यास मदत झाली.

**२) प्रत्यक्ष करात वाढ :**

उत्पन्नातील विषमता कमी करण्यासाठी भारत सरकार प्रत्यक्ष करात वेळोवेळी वाढ करत असते. उत्पन्न कर (इन्कम टॅक्स), संपत्ती कर, मालमत्ता कर या करात वाढ करून श्रीमंतांची श्रीमंती कमी करण्याचा प्रयत्न सरकार करत असते. वार्षिक वीस लाखांपेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्यांना ३० टक्के एवढा आयकर भारतात द्यावा लागतो. लाखो नोकरदार वर्षाला दहा लाखांपेक्षा अधिक रक्कम आयकरापोटी सरकारला देत असतात. अशा प्रकारे भारतात आयकाराचे आणि इतर प्रत्यक्ष करांचे दर खूप जास्त आहेत. श्रीमंतांकडून अधिक दराने आयकर व इतर कर वसूल केले जातात व गरिबांकडून प्रत्यक्ष कर वसूल केले जात नाहीत.

**३) अप्रत्यक्ष कर आकारणी धोरण :**

भारतात वस्तू व सेवांवर जे कर बसवले जातात त्या करांना अप्रत्यक्ष कर असे म्हणतात. जीएसटी हे अप्रत्यक्ष कराचे एक उदाहरण आहे. भारतात कमाल २८% पर्यंत जीएसटी आकारला जातो. केंद्र सरकार आणि राज्य सरकार जीएसटी वसूल करते. त्या करांना सीजीएसटी आणि एसजीएसटी असे म्हणतात. गरीब लोक ज्या वस्तू व सेवा खरेदी करतात त्यांच्याकडून कमी दराने कर वसूल केले जातात. सोने-चांदीचे दागिने, उंची फर्निचर, सेंट आणि इतर सर्व चैनीच्या, विलासी वस्तूंवर अधिक दराने सरकार कर आकारणी करते. गरीब खरेदी करत असलेल्या जीवनावश्यक वस्तूंवर सरकार कमी दराने कर आकारणी करते. श्रीमंतांची श्रीमंती कमी करणे आणि गरिबांची गरिबी कमी करणे हा त्यामागचा उद्देश आहे.

**४) सार्वजनिक वितरण व्यवस्थेची उभारणी:**

गरिबांची गरिबी वाढू नये यासाठी सरकारने देशात प्रभावी सार्वजनिक वितरण व्यवस्था (Public Distribution system) उभारली आहे. सरकारने देशात ठिकठिकाणी गावोगावी 'सरकारमान्य स्वस्त धान्य दुकाने' उघडली आहेत. या दुकानांमार्फत सरकारकडून गरिबांना अत्यंत कमी दरात अन्नधान्य, डाळी, साखर इत्यादी वस्तूंचा पुरवठा केला जातो. त्यामुळे गरिबांचे भाववाढीपासून संरक्षण होत आहे. भारत सरकारने देशात 'अन्नसुरक्षितता कायदा' (Food security act) पास केला असून देशात त्या कायद्याची अंमलबजावणी सुरू केली आहे. या कायद्यानुसार अत्यल्प दरात गरिबांना अन्नधान्य दिले जाते.

**५) किमान वेतन कायदा:**

भारतात विविध क्षेत्रात कामगारांना खूप कमी वेतन दिले जात होते. म्हणून सन १९४८ मध्ये सरकारने किमान वेतन कायदा पास करून त्याची अंमलबजावणी सुरू केली. या कायद्यानुसार सरकारकडून किमान वेतनाचे दर ठरवले जातात. या किमान वेतनाच्या दरात वेळोवेळी वाढ केली जाते. या किमान वेतनापेक्षा कमी वेतन मालकांना देता येत नाही. तसे केले तर दंडाची तरतूद सरकारने केली आहे. अशा प्रकारे गरिबांना कमी मजुरी मिळू नये यासाठी आणि आर्थिक विषमता वाढीस लागू नये यासाठी देशात किमान वेतन कायद्याची अंमलबजावणी १९४८ पासून केली जात आहे.

### ६) राष्ट्रीयीकरण:

भारतात सरकारला खाजगी उद्योग व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण करण्याचा अधिकार आहे. राष्ट्रीयीकरण म्हणजे खाजगी उद्योगावरील खाजगी मालकी नष्ट करून त्यावर सरकारची मालकी प्रस्थापित करणे होय. खाजगी उद्योग व्यवसाय काढून घेऊन तो आपल्या ताब्यात घेणे म्हणजे सरकारीकरण किंवा राष्ट्रीयीकरण होय. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने सिमेंट कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण केले. विमा व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण केले. १९६९ मध्ये १४ मोठ्या खाजगी व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. अशाप्रकारे भारतात सरकारने १९९१ पर्यंत राष्ट्रीयीकरणाचे धोरण राबवून त्याचा अधिक फायदा देशातील गोरगरीब जनतेला कसा होईल याची काळजी घेतली. राष्ट्रीयीकरणाचे अनेक उद्देश होते. त्यामध्ये आर्थिक विषमता कमी करणे हा एक उद्देश होता.

### ७) सार्वजनिक क्षेत्र बळकट करण्यावर भर:

भारताला सन १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारत सरकारने सार्वजनिक क्षेत्र बळकट करण्यावर मोठा भर दिला. सरकारने अनेक उद्योग सार्वजनिक क्षेत्रात काढले. सार्वजनिक क्षेत्रात प्रचंड गुंतवणूक केली. एस.टी., रस्ते वाहतूक, रेल्वे वाहतूक सुरू करून या सेवांचा फायदा सरकार गरिबांना कमी दर आकारून देत आहे. रेल्वे व्यवसाय आजतागायत शंभर टक्के सरकारी मालकीचा आहे. अनेक मोठ्या बँका सरकारी मालकीच्या आहेत. आर्थिक विकासात वाढ घडवून आणणे या उद्देशाबरोबरच आर्थिक विषमता कमी करणे हा सुद्धा यामागे सरकारचा उद्देश होता. १९९१ पासून नवीन आर्थिक धोरण स्वीकारण्यापासून जरी सार्वजनिक क्षेत्राचा संकोच केला जात असला तरी किंवा खाजगीकरणाचे धोरण स्वीकारले असले तरी सार्वजनिक क्षेत्रात आजही हे महत्त्वाचे उद्योग व्यवसाय कार्यरत आहेत.

### ८) मक्तेदारी प्रतिबंधक कायदा (MRTP Act)

भारतात उद्योगांची मक्तेदारी निर्माण होऊ नये यासाठी व मोजके उद्योगच देशात मोठे होऊ नयेत यासाठी सरकारने मक्तेदारी प्रतिबंधक कायदा केला आहे. या कायद्यानुसार एखाद्या उद्योगाला किती मर्यादेपर्यंत वाढ करता येईल ते ठरवण्यात आले आहे. त्या मर्यादेपेक्षा अधिक गुंतवणूक करता येत नाही. त्यामुळे उद्योगांची मक्तेदारी निर्माण होत नाही. १९९१ पासून नवीन आर्थिक धोरण स्वीकारल्यापासून सरकारने मक्तेदारी प्रतिबंधक कायद्यात बऱ्याच दुरुस्ती आणि सुधारणा केल्या आहेत.

### ९) सहकारी चळवळीला प्रोत्साहन:

स्वातंत्र्यपूर्वकाळात ब्रिटिश सरकारने सन १९०४ साली पहिला सहकारी कायदा पास केला. त्यानुसार भारतात सहकारी चळवळीस सुरुवात झाली. सन १९१२ साली सहकाराचा दुसरा कायदा केला. १९१९ साली तिसरा कायदा केला आणि सरकारने भारतात विविध प्रकारच्या सहकारी संस्थांच्या स्थापनेस प्रोत्साहन व मदत केली. भारतात सरकारकडून सहकार क्षेत्राला मोठ्या प्रमाणात मदत केली जाते. भारतात शेकडो साखर कारखाने, सूतगिरण्या आणि इतर उद्योग सहकार क्षेत्रात आहेत. सहकारी बँका भारतात कार्यरत

आहेत. सहकारी तत्त्वावर शेती आणि वाहतूक व्यवसाय देशात चालतो. सहकारी संस्थांना मिळणारा नफा लाभांशाच्या स्वरूपात सभासदांना त्यांनी संस्थेशी केलेल्या व्यवहारांच्या प्रमाणात दिला जातो. खाजगी उद्योगांचे मालक असा नफा वाटत नाहीत. त्यामुळे आर्थिक विषमता वाढीस लागते. जास्तीत जास्त उद्योग व्यवसाय सहकारी क्षेत्रात स्थापन झाले तर नफ्याची वाटणी त्या संस्थेच्या सर्व सभासदांमध्ये केली जाते. त्यामुळे विषमता निर्माण होत नाही. म्हणून सरकारने १९०४ पासून आजतागायत सहकारी क्षेत्राला मदत करण्याची भूमिका घेतली आहे. त्यामुळे दुर्बल किंवा गरीब लोकांना सहकारी क्षेत्राचा लाभ होत आहे. गरिबांची गरिबी कमी करण्यासाठी म्हणजेच देशातील आर्थिक विषमता कमी करण्यासाठी सहकार क्षेत्र देशात प्रभावी ठरले आहे.

**१०) सामाजिक सुरक्षितता योजना:**

भारतात सरकारकडून संघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना ज्याप्रमाणे सामाजिक सुरक्षितता योजनांचा लाभ दिला जातो त्याप्रमाणे असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्यांना सुद्धा या योजनेचा लाभ दिला जातो. बेकार भत्ता, भविष्य निर्वाह निधी, पेन्शन, अपघाती विमा अशा प्रकारच्या योजनांना सामाजिक सुरक्षिततेच्या योजना असे म्हणतात. याचा फायदा गरिबांना मोठ्या प्रमाणात होत असून गरिबांना या योजना उपयुक्त ठरत आहेत.

**११) विविध रोजगार योजनांची अंमलबजावणी :**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने विविध रोजगार योजना आखून त्यांची अमलबजावणी केली आहे. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नेहरू रोजगार योजना अशा विविध योजना राबवून सरकार गोरगरिबांना उत्पन्नाचे साधन देत आहे. रोजगार योजना राबवून सरकार गरिबांना रोजगार देऊन त्यांची गरिबी कमी करण्याचा प्रयत्न करत आहे.

**१२) आरक्षण धोरण:**

अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्गीय यांच्या कल्याणासाठी सरकारने आरक्षणाचे धोरण स्वीकारले आहे. त्यानुसार विविध जाती जमातीतील गरिबांना नोकऱ्यांत व शिक्षणात सरकारने आरक्षण ठेवले आहे. आर्थिक विषमता कमी करण्यासाठी किंवा गरिबी नष्ट करण्यासाठी हा उपाय अत्यंत प्रभावी ठरला आहे. अनेक मागासवर्गीयांनी आरक्षणाचा लाभ घेऊन आपली आर्थिक व शैक्षणिक प्रगती केली आहे.

**१३) स्वयंरोजगारास प्रोत्साहन व मदत:**

कुटीर उद्योग, हस्तोद्योग, ग्रामोद्योग तसेच इतर सर्व प्रकारच्या स्वयंरोजगारास सरकारकडून मोठे प्रोत्साहन दिले जात आहे. पोल्ट्री व्यवसाय, दुग्ध व्यवसाय अशा स्वयंरोजगारांना सरकारकडून कमी व्याजात कर्ज, अनुदान व इतर सवलती दिल्या जातात. त्याचाही मोठा लाभ होत असून विषमता कमी होण्यास मदत होत आहे.

अशा प्रकारे आर्थिक विषमता (उत्पन्नातील व संपत्ती मधील विषमता) कमी करण्यासाठी सरकारने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर वरील विविध उपाय योजले आहेत. आर्थिक विषमता फार वाढणार नाही याची काळजी सरकार घेत आहे. तरीही विविध कारणांमुळे आर्थिक विषमता टिकून असल्याचे आपल्या लक्षात येते.

**आर्थिक विषमता कमी करण्यासाठी उपाय:–**

भारतात दिवसेंदिवस आर्थिक विषमता वाढत असून ही आर्थिक विषमता कमी करण्यासाठी काही उपाय प्रस्तुत अभ्यासकाने खालीलप्रमाणे सुचवले आहेत.

१. **रोजगारात वाढ करणे:–**

बेरोजगारी हे आर्थिक विषमतेचे प्रमुख कारण आहे. म्हणून आर्थिक विषमता कमी करण्यासाठी सरकारने जास्तीत जास्त रोजगार संधी निर्माण केल्या पाहिजेत. लोकांना खात्रीचा व कायमचा रोजगार मिळाला तर त्यांना नियमित उत्पन्न मिळून आर्थिक विषमता कमी होईल. रोजगार योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे व प्रामाणिकपणे केली पाहिजे.

२. **पडीक जमिनींचे वाटप करणे:–**

भारतात ग्रामीण भागातही आर्थिक विषमतेचे प्रमाण मोठे आहे. म्हणून सरकारने ग्रामीण भागातील भूमिहीन शेतमजूरांना पडिक जमिनीचे वाटप करावे यामुळे शेतीच्या उत्पादनात वाढ होईल आणि शेतमजूरांच्या उत्पन्नातही वाढ होईल.

३. **कर चुकवेगिरीस आळा घालणे:–**

भारतात कर चुकवेगिरीचे प्रमाण प्रचंड आहे. प्रामाणिकपणे कर भरणाऱ्यांची संख्या कमी आहे. कर चुकवून काही लोक अतिश्रीमंत झाले आहेत. म्हणून कर चोरी किंवा कर चुकवेगिरी रोखण्यासाठी सरकारने योग्य ती पावले उचलेली पाहिजेत. त्यामुळे कर चुकवेगिरीसारख्या वाईट मार्गांनी श्रीमंत होणाऱ्यांचे प्रमाण कमी होईल.

४. **लोकसंख्या वाढीच्या वेगावर नियंत्रण ठेवणे–**

भारतात गरीबांची लोकसंख्या वेगाने वाढत असल्याने गरीब लोक अधिकच गरीब होत आहेत. म्हणून गरीबांच्या लोकसंख्या वाढीचा वेग रोखणे अत्यंत आवश्यक आहे. गरीबांना एकाच अपत्यावर कुटंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेण्यास उद्युक्त केले पाहिजे त्याशिवाय गरीबीचे व आर्थिक विषमतेचे प्रमाण कमी होणार नाही.

५. **लाचखोरीस पायबंद घालणे:–**

भारतात बहुसंख्य शासकीय कार्यालयात आणि शिक्षण संस्थांमध्ये लाच दिल्याशिवाय गोरगरीबांची कामेच होत नाहीत. अशा प्रकारे गरीब आणि मध्यमवर्गीयांकडून लाच खाऊन अनेक कर्मचारी कोट्याधीश झाले आहेत. म्हणून लाचखोरीस पायबंद घालण्यासाठी सरकारने कडक कायदे केले पाहिजेत. त्याशिवाय

भ्रष्टाचार आणि लाचखोरीचे प्रमाण कमी होणार नाही. भ्रष्टाचार व लाचखोरीचे प्रमाण कमी झाले तर आर्थिक विषमताही कमी होईल.

**६. दारिद्र्य निर्मूलनः–**

प्रचंड दारिद्र्य हे सुध्दा भारतातील आर्थिक विषमतेचे प्रमुख कारण आहे. दारिद्र्य हे आर्थिक विषमतेचे कारण आणि परिणाम आहे. आर्थिक विषमता कमी करण्यासाठी देशातील दारिद्र्य नष्ट झाले पाहिजे. गरीबांच्या उत्पन्नात व राहणीमानात वाढ होईल अशी आर्थिक धोरणे सरकारची असली पाहिजेत. दारिद्र्य नष्ट झाल्याशिवाय गरीब व श्रीमंत यांच्यातील दरी कमी होणार नाही.

**७. ग्रामीण भागात अधिक प्रमाणात गुंतवणूक करणे:–**

भारतात ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात खाजगी गुंतवणूकीचे प्रमाण जास्त आहे. म्हणून ग्रामीण भागात खाजगी गुंतवणूकीला प्रोत्साहन देण्याचे काम सरकारने केले पाहिजे. तसेच ग्रामीण भागात सार्वजनिक गुंतवणूक सुध्दा मोठ्या प्रमाणात होणे आवश्यक आहे. त्याशिवाय ग्रामीण भागातील लोकांचे उत्पन्न वाढणार नाही.

**८. असंघटीत क्षेत्राकडे विशेष लक्ष पुरविणेः–**

भारतात ९०% पेक्षा अधिक श्रमिक असंघटित क्षेत्रात काम करतात. संघटित क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांचे प्रमाण खूप कमी आहे. म्हणून सरकारने कामगारांच्या कल्याणासाठी विशेष योजना आखल्या पाहिजेत. त्याशिवाय असंघटित क्षेत्रातील कामगारांचे वास्तव उत्पन्न वाढणार नाही.

**९. गरीब शेतकऱ्यांच्या शेतीची उत्पादकता वाढविणेः–**

भारतात श्रीमंत शेतकऱ्यांकडे स्वत:चे भांडवल भरपूर आहे. त्यांची आर्थिक शक्ती दांडगी आहे. त्यामुळे त्यांच्या शेतीची उत्पादकता जास्त आहे. परंतु गरीब शेतकऱ्यांना भांडवलाअभावी शेतीचा विकास करता येत नाही. त्यामुळे त्यांच्या शेतीची उत्पादकता कमी आहे. शेतीची उत्पादकता कमी असल्याने त्यांना उत्पन्नही कमी मिळते. म्हणून सरकारने गरीबांच्या शेतीची उत्पादकता वाढवण्यावर भर दिला पाहिजे.

**१०. सरकारने चुकीची धोरणे बदलणे आवश्यकः**

सरकारच्या काही चुकीच्या धोरणामुळे सुद्धा देशात आर्थिक विषमता निर्माण झाली आहे. सरकारी खात्यात नवीन नोकरभरती न करणे किवा नोकर भरती उशीरा करणे, शिक्षण क्षेत्रात विनाअनुदान किंवा कायम विनाअनुदानाचे धोरण राबवून शिक्षकांना जगण्याइतके सुध्दा वेतन न देणे, वर्षानुवर्षे तुटपुंज्या पगारावर राबवून घेणे, शिक्षणक्षेत्रातील लाचखोरीकडे कानाडोळा करणे इत्यादी विविध कारणे सुध्दा आर्थिक विषमतेस कारणीभूत आहेत. म्हणून सरकारने विनाअनुदानित धोरण रद्द करून देशभरातील सर्व शाळा, महाविद्यालये अनुदानित करावीत. शिक्षक प्राध्यापकांना योग्य (संपूर्ण) पगार दयावा. त्याशिवाय आर्थिक विषमता कमी होणार नाही.

**११. हरित क्रांती घडवून आणताना काळजी घेणे आवश्यक:-**

पहिल्या हरित क्रातीचे लाभ श्रीमंत शेतक-यांनाच अधिक मिळाले. त्यामुळे भारताच्या ग्रामीण भागात आर्थिक विषमता वाढली. म्हणून दुसरी कांती हरित क्रांती घडवून आणताना सरकारने विशेष काळजी घेतली पाहिजे. हरित क्रांतीचे लाभ देशभरातील गरीब शेतकऱ्यांना सुध्दा मिळवून दिले पाहिजेत. तसेच ज्या राज्यात हरित क्रांती झाली नाही, अशा राज्यात सुध्दा हरित क्रांती घडवून आणली पाहिजे. तरच गरीब शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण कारागिर यांच्या उत्पन्नात वाढ होऊन ग्रामीण भागातील आर्थिक विषमता कमी होईल.

**१२. प्रादेशिक विषमता कमी करणे:-**

भारतात प्रादेशिक (विभागीय) विषमता आढळते. भारतात आर्थिक विकास झाल्या आहे. परंतु तो असंतुलित आहे. देशातील सर्व राज्यांचा सारखा विकास झालेला नाही. एकूण २९ राज्यांपैकी ५ ते ६ राज्यांचाच बऱ्यापैकी आर्थिक विकास झालेला आहे. उर्वरित राज्ये विकासाच्या बाबतीत बरीचशी मागे आहेत. ईशान्य पूर्वेकडील राज्ये तर खूपच मागासलेली आहेत. त्यामुळे तेथील लोकांचे उत्पन्न कमी आहे. म्हणून मागासलेल्या राज्यांचा आर्थिक विकास घडवून आणला पाहिजे. प्रादेशिक आर्थिक विषमता कमी झाली तर आर्थिक विषमता सुध्दा कमी होऊ शकेल. म्हणून सरकारने समतोल आर्थिक विकासाला प्राधान्य दिले पाहिजे. मूठभर राज्यांच्याच विकासावर भर न देता देशातील सर्व राज्यांच्या विकासावर सरकारने भर दिला पाहिजे.

**१३. आर्थिक विकास सर्वसमावेशक हवा:-**

स्वातंत्र्यानंतरच्या ७५ वर्षात भारताच्या आर्थिक विकासाचा वेग वाढला. देशाने अनेक क्षेत्रात प्रगती केली. परंतु आर्थिक विकासाचे फायदे सर्व जनतेपर्यंत पोहचले नाहीत. त्यामुळे आर्थिक विषमतेची समस्या देशात निर्माण झाली आहे. आर्थिक विषमतेची तीव्रता कमी करण्यासाठी सरकारने नुसत्या विकासाला नव्हे तर सर्वसमावेशक विकासाला प्राधान्य दिले पाहिजे.

**सारांश:-**

जगभरातील सर्वच देशात आर्थिक विषमता आहे. विकसित देशातही आर्थिक विषमता आहे. परंतु भारताइतकी ती गंभीर स्वरूपाची नाही. भारतातील आर्थिक विषमतेचे स्वरूप गंभीर स्वरूपाचे असून आर्थिक विषमता कमी केली पाहिजे. गरीब व श्रीमंत यांच्यातील अंतर कमी केले पाहिजे. आर्थिक विकासाचे फायदे गरीब, वंचित घटकापर्यंत पोहचवून आर्थिक विषमतेची तीव्रता कमी केली पाहिजे.

## ४.२.४ भारतातील सामाजिक विषमता

**प्रास्ताविक :**

आर्थिक विषमता आणि सामाजिक विषमता ह्या संकल्पना वेगवेगळ्या असल्या तरी त्या एकमेकांशी संबंधित आहेत. कारण आर्थिक विषमतेमुळे सामाजिक विषमता निर्माण होते आणि सामाजिक विषमतेमुळे

आर्थिक विषमता निर्माण होते. विकसित देशापेक्षा अविकसित आणि विकसनशील देशात सामाजिक विषमता जास्त तीव्र स्वरुपाची आढळून येते. सामाजिक विषमतेची संकल्पना तिच्या काही व्याख्यावरुन अधिक चांगल्या प्रकारे स्पष्ट करता येईल.

''ज्या देशातील समाजात लिंगभेद, धर्मभेद, वंशभेद, जातीभेद, वर्णभेद, वर्गभेद अशा प्रकारचे भेद अस्तित्वात असतात व त्यामुळे नागरिकांना भेदभावाची वागणूक मिळत असते, त्यास सामाजिक विषमता असे म्हणतात.''

भारतासारख्या अनेक देशातील समाजात स्त्री-पुरुष, उच्च-नीच, सुशिक्षित-अशिक्षित अशा प्रकारचे जे भेद आढळतात, त्यामुळे सामाजिक विषमता निर्माण होते. सामाजिक विषमतेची आणखी एक व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

''ज्या देशात किंवा समाजात काही लोकांना खूप चांगली प्रतिष्ठा असते तर काही लोकांना प्रतिष्ठा नसते अथवा कमी प्रतिष्ठा असते. त्या समाजात समता प्रस्थापित झालेली नसते म्हणजेच तेथे सामाजिक विषमता अस्तित्वात असते.''

**भारतातील सामाजिक विषमतेचे स्वरुप/वैशिष्ट्ये**

१) अशिक्षित-शिक्षित

२) मालक-मजूर

३) पुरुष-स्त्री

४) दलित - सवर्ण

५) हिंदू-मुस्लिम

६) शहरी-ग्रामीण

७) श्रीमंत - गरीब

८) स्थानिक-परप्रांतीय

**भारतातील सामाजिक विषमतेची कारणे / समता प्रस्थापित करण्याच्या मार्गातील अडथळे :**

भारतातील सामाजिक विषमतेची समस्या ही जुनाट समस्या असून भारत पारतंत्र्यात होता तेंव्हा ही समस्या फारच गंभीर स्वरुपाची होती. देशाला स्वातंत्र्य मिळून ७७ वर्षे होत आली तरी ही समस्या अस्तित्वात आहे. भारतातील सामाजिक विषमतेस आर्थिक, सामाजिक आणि राजकीय घटक जबाबदार असून हे घटक समता प्रस्थापित करण्याच्या मार्गातील अडथळे बनून राहिले आहेत. भारतातील सामाजिक विषमतेची कारणे म्हणजेच समता प्रस्थापित करण्याच्या मार्गातील प्रमुख अडथळे थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

**१) निरक्षरता व अल्पशिक्षितपणा :**

भारतात सुमारे २५ टक्के लोक निरक्षर आहेत व आणखी जवळ जवळ तेवढेच लोक अल्पशिक्षित आहेत. म्हणजे देशातील ५०% लोक निरक्षर व अल्पशिक्षित आहेत. अशा प्रकारे भारतीय समाजात शिक्षित, अल्पशिक्षित आणि निरक्षर अशा तीन प्रकारच्या व्यक्ती आढळतात. भारतात शिक्षित व्यक्तीपेक्षा अशिक्षित आणि अल्पशिक्षित व्यक्तींचा सामाजिक दर्जा कनिष्ठ आहे. समाजातील उच्च शिक्षित व्यक्ती अशिक्षित आणि अल्पशिक्षित व्यक्तीपासून दूर राहणेच पसंत करतात. निरक्षर व अल्पशिक्षित लोकांना शिक्षित, उच्चशिक्षित लोकांकडून कमी लेखले जाते. तसेच ते निरक्षर व अल्पशिक्षित लोक स्वत:लाही कमी लेखतात. त्यामुळे भारतात सामाजिक विषमता दिसते.

**२) आर्थिक विषमता / गरीबी :**

आर्थिक विषमता किंवा गरीबी हे सुद्धा भारतातील सामाजिक विषमतेचे प्रमुख कारण आहे. भारतीय समाजाची विभागणी श्रीमंत, गरीब, मध्यमवर्गीय अशी झाली आहे. भारतात सुमारे ४० टक्के लोक गरीब आहेत. ४० टक्के मध्यमवर्गीय आहेत आणि २० टक्के लोक श्रीमंत आहेत. श्रीमंत लोकाना संपत्तीच्या जोरावर स्वतःची प्रगती करता येते. पैशाअभावी गरीबांना विकासाच्या संधी मिळत नाहीत अशा प्रकारे देशात गरीबांची (नाही रे वर्गाची) संख्या मोठी असल्याने सामाजिक विषमता कमी करणे कठीण बनले आहे.

**३) जातीभेद/जातीव्यवस्था :**

भारतात हजारो जातीचे लोक राहतात. काही जातीचे लोक स्वतःला दुसऱ्या जातीपेक्षा श्रेष्ठ समजतात किंवा कनिष्ठ समजतात. शासकीय किंवा सार्वजनिक ठिकाणी काम करणारे कित्येक लोक डोक्यात जात ठेवून काम करताना दिसतात. ते दुसऱ्या जातीतील गुणी, विद्वान लोकांचा द्वेष करतात, तिरस्कार करतात. त्यांना वाईट वागणूक देतात. गुणी लोकांना डावलून आपल्या जातीतील गुणवत्ता नसणाऱ्यांना पद, प्रतिष्ठा देतात. भारतात दिवसेंदिवस छुप्या स्वरुपात जातीभेद वाढतच आहे. त्यामुळे भारतात सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या मार्गात अडचणी निर्माण झाल्या आहेत.

**४) स्त्रियांचा कमी दर्जा:**

विकसित देशापेक्षा भारतातील स्त्रियांचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय दर्जा अत्यंत कनिष्ठ आहे. पुरुष जेवढे अधिकार आणि स्वातंत्र्य उपभोगतात तेवढे अधिकार आणि स्वातंत्र्य भारतात स्त्रियांना उपभोगता येत नाही. स्त्री-पुरुष भेदभाव अस्तित्वात असल्यामुळे सामाजिक समता प्रस्थापित करणे शक्य होत नाही.

**५) समाजाची विभागणी तीन समुदायात :**

भारतात शहरी, ग्रामीण आणि आदिवासी असे तीन प्रकारचे समुदाय आढळून येतात. या तिन्ही समुदायांची किंवा समाजाची वैशिष्ट्ये वेगवेगळी आहेत. यापैकी आदिवासी समुदाय हा शहरापासून दूर

अंतरावर डोंगरावर, डोंगराच्या पायथ्याला आणि जंगलाशेजारी वास्तव्य करतो. शहरी, ग्रामीण आणि आदिवासी लोकांना परस्परांबद्दल फारसा विश्वास वाटत नाही.

**६) वाढता प्रादेशिकवाद :**

भारतात जसा जातीयवाद दिसतो तसा प्रादेशिकवादही लोकांच्या मनात दिसतो. हा प्रादेशिकवाद दिवसेंदिवस वाढतच चालला आहे. अनेक राज्यात स्थानिक, परप्रांतिय असा वाद विकोपाला गेला आहे. बिहार, आसाम, झारखंड, उत्तरप्रदेश इत्यादी सारख्या अनेक मागासलेल्या राज्यातून कोट्यावधी लोक महाराष्ट्र, गुजराथ, कर्नाटक इत्यादी सारख्या पुढारलेल्या राज्यात उपजीविकेसाठी स्थायिक झाले आहेत. त्यांच्या मोठ्या संख्येने स्थायिक होण्यामुळे स्थानिक पातळीवर काही प्रश्न निर्माण झाले आहेत. भारतात अनेक ठिकाणी परप्रांतियांच्यामुळे आंदोलनेही झाली आहेत. या आंदोलनामुळे सामाजिक स्वास्थ्य धोक्यात आले असून त्यामुळे सामाजिक समता प्रस्थापित करणे कठीण बनले आहे.

**७) भाषिक वाद:**

भारतात मराठी–कन्नड सारखे भाषिक वाद आजही अस्तित्वात आहेत. सीमाभागातील मराठी भाषिक आणि कन्नड भाषिक एकमेकांचे तोंडही पहायला तयार नाहीत. मराठी भाषिक आणि कन्नड भाषिकामध्ये सतत संघर्ष सुरु असलेला दिसतो. तसेच दक्षिणेतील राज्ये हिंदी भाषेला विरोध करताना दिसतात. त्यामुळे अखिल भारतीय पातळीवर समता प्रस्थापित करणे अत्यंत कठीण बनले आहे.

**८) गलिच्छ राजकारण :**

गलिच्छ किंवा घाणेरडे राजकारण हा सुद्धा समता प्रस्थापित करण्याच्या मार्गातील प्रमुख अडथळा आहे. गलिच्छ राजकारणाला राजकीय भ्रष्टाचार असे सुद्धा म्हणता येईल. स्वतःच्या स्वार्थासाठी (निवडून येण्यासाठी किंवा सत्ता मिळविण्यासाठी) काही राजकीय पक्ष किंवा नेतेमंडळी समाजात दुहीची बीजे पेरत असतात. समाज एकसंघ राहणार नाही असा प्रयत्न करतात. त्यामुळे भारतात सामाजिक विषमता दिसून येते.

**९) प्रचंड लोकसंख्या :**

प्रचंड लोकसंख्या हे सुद्धा सामाजिक विषमतेचे एक कारण आहे. भारतात गरीब आणि मागास वर्गीयांच्या लोकसंख्या वाढीचा वेग खूप जास्त आहे. त्यामुळे समता प्रस्थापित करण्याच्या मार्गात अडचणी निर्माण झालेल्या आहेत. कारण ज्यांचा समाजात दर्जा कमी आहे त्यांची लोकसंख्या प्रचंड वेगाने वाढत आहे. त्यामुळे सामाजिक विषमता कमी होत नाही.

**१०) वाढती बेकारी :**

भारतात आजमितीस दहा कोटी लोक बेरोजगार आहेत. यामध्ये सुशिक्षित बेकारांची संख्या मोठी आहे. बेकार युवक–युवतींना कुटुंबात, समाजात फारशी किंमत मिळत नाही. समाजात बेरोजगारांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने समता प्रस्थापित करणे कठीण बनत चालले आहे.

**११) शिक्षणाचा दर्जा चांगला नसणे:**

भारतातील शिक्षणाचा दर्जा फारसा चांगला नाही. शालेय किंवा महाविद्यालयीन अभ्यासक्रमात मूल्य शिक्षणाचा समावेश आहे. परंतु मूल्य शिक्षणाशी संबंधित घटक काही शिक्षकांकडून चांगल्या प्रकारे/प्रभावीपणे शिकवले जात नसावेत. कारण कित्येक विद्यार्थी जात बघून मैत्री करताना दिसतात. दुसऱ्या जातीचा असेल तर त्याला एकाकी पाडले जाते. शिक्षकांना अशा गोष्टी फारशा माहिती नसतात किंवा माहिती झाल्या तरी काही शिक्षक तिकडे कानाडोळा करतात. असे जातियवादी विद्यार्थी पुढे मोठेपणी डोक्यात जात ठेवून दुसऱ्याचा द्वेश करत राहतात. त्यामुळे समता प्रस्थापित करणे कठीण बनते. भारतातील सामाजिक विषमतेचे हे एक प्रमुख कारण आहे.

**१२) शोषण /फसवणूक आणि भ्रष्टाचार :**

शोषण, फसवणूक आणि भ्रष्टाचाराचे वाढते प्रमाण हे घटक सुद्धा सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या मार्गातील प्रमुख अडथळे आहेत. कारण शोषण, फसवणूक व भ्रष्टाचारामुळे गुणी, प्रामाणिक व्यक्तीवर होतो. त्यांना विकासाची संधी मिळत नाही. तसेच समाजात वागणूकही चांगली मिळत नाही

**१३) नैतिकतेचा/माणुसकीचा ऱ्हास:**

सामाजिक विषमतेचे प्रमुख कारण म्हणजे नैतिकतेचा किंवा माणुसकीचा सतत होत असलेला ऱ्हास हे होय. माणसामधील माणुसकी दिवसेंदिवस संपत चालली आहे. त्यामुळे भाषिक, धार्मिक, जातीय भेदांची दरी सुद्धा रुंदावत चालली आहे. माणुसकी दुर्मिळ होत चालल्याने समाजातील भेदभाव वाढीस लागला आहे. अशा प्रकारे नैतिकतेचा किंवा माणुसकीचा ऱ्हास हे सुद्धा सामाजिक विषमतेचे प्रमुख कारण आहे.

अशा प्रकारे भारतातील सामाजिक विषमतेस आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक घटक कारणीभूत आहेत. त्यामुळे संपूर्णपणे सामाजिक सामाजिक समता प्रस्थापित करणे दिवसेंदिवस कठीण बनत आहे. असे असले तरी स्वातंत्र्यपूर्व काळात सामाजिक विषमतेची समस्या जेवढी गंभीर स्वरुपाची होती, तेवढी आज ती नाही. ही बाब चांगली आहे.

**सामाजिक विषमतेचे परिणाम:**

देशात जर समता नसेल म्हणजेच सामाजिक विषमता असेल तर विविध दुष्परिणामांना जनतेला आणि सरकारला तोंड द्यावे लागते. सामाजिक विषमतेचे आपल्या देशात दिसून येत असलेले काही दुष्परिणाम थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

**१) जातीय/धार्मिक दंगली:**

भारतातील जातीय दंग्यांची जी काही कारणे आहेत त्यामध्ये सामाजिक विषमता हे एक कारण आहे. भारतात दरवर्षी देशाच्या कोणत्या ना कोणत्या भागात जातीय/धार्मिक दंगली उद्धवत असतात. देशात सामाजिक समता प्रस्थापित झाली नसल्यानेच या दंगली उद्‌भवत असल्याचे आपण पाहतो.

**२) दारिद्र्य/गरीबी :**

भारतातील दारिद्र्याची अनेक कारणे आहेत. सामाजिक विषमता हे सुद्धा आपल्या देशातील दारिद्र्याचे एक कारण आहे. सामाजिक विषमतेमुळे आर्थिक विषमता किंवा दारिद्र्याची समस्या निर्माण होते. दारिद्र्य हे सामाजिक विषमतेचे कारण आणि परिणाम सुद्धा आहे. सामाजिक विषमतेमुळे काही लोकांना प्रगतीची संधी मिळत नाही. त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती सुधारत नाही. त्यांना गरीबच रहावे लागते.

**३) बेकारी/रोजगारापासून वंचित :**

सामाजिक विषमतेचा समाजावर होणारा आणखी एक परिणाम म्हणजे जातीच्या व धर्माच्या नावाखाली काही लोकांना रोजगार दिला जात नाही. त्यांना नोकऱ्यात डावलले जाते. त्यामुळे त्यांना रोजगारापासून वंचित रहावे लागते. भारतात हे प्रकर्षाने दिसते.

**४) मानवी हक्कांची पायमल्ली :**

देशात समता प्रस्थापित झाली नसेल तर त्या देशात अपप्रवृत्तीच्या लोकांकडून मानती हक्कांची पायमल्ली होते. भारतात हे चित्र सर्रास दिसते. गुंड, अतिरेकी प्रवृत्तीच्या लोकांकडून निरपराध लोकांच्यावर अन्याय होत असल्याच्या घटना आपण अधुनमधुन प्रसिद्धी माध्यमातून वाचतो व पाहतो.

**५) उत्पन्नातील विषमतेत वाढ :**

आर्थिक विषमता म्हणजेच उत्पन्नातील विषमता होय. भारतात दिवसेंदिवस वाढत असलेली आर्थिक विषमता हे सामाजिक विषमतेचे कारण आणि परिणाम सुद्धा आहे. सामाजिक विषमतेमुळे जातीच्या कारणावरुन तसेच अन्य कारणावरुन कित्येक लोकांना विकासाच्या/रोजगाराच्या संधी मिळत नाहीत. त्यामुळे आर्थिक विषमतेचा प्रश्न गंभीर बनत आहे.

**६) कार्यक्षमतेवर प्रतिकूल परिणाम :**

सामाजिक विषमतेचा आणखी एक दुष्परिणाम म्हणजे सामाजिक विषमतेमुळे हुषार, बुद्धीमान लोकांची कार्यक्षमता कमी होते. कारण त्यांच्याकडे भरपूर ज्ञान किंवा बौद्धिक संपत्ती असूनही त्यांच्या योग्यतेचे काम त्यांना मिळत नाही. भारतात हे चित्र प्रकर्षाने दिसते.

**७) लोकशाहीचा/स्वातंत्र्याचा आनंद न मिळणे :**

देशात जर समता प्रस्थापित झाली नसेल तर देशातील काही लोकांना लोकशाहीचा किंवा स्वातंत्र्याचा आनंद उपभोगावयास मिळत नाही. ज्या देशात सामाजिक विषमता असते त्या देशात जातीयवाद, प्रादेशिकवाद अस्तित्वात असतो. त्यामुळे जातीच्या, प्रादेशिकतेच्या नावावर काही घटकांकडून काही लोकांना लोकशाहीचे अधिकार उपभोगू दिले जात नाहीत.

**८) गुन्हेगारीत वाढ :**

भारतातील वाढत्या गुन्हेगारीस जे विविध घटक जबाबदार आहेत, त्यामध्ये सामाजिक विषमता हा एक महत्वाचा घटक आहे. सामाजिक विषमतेमुळे विविध प्रकारच्या छोटया-मोठ्या गुन्ह्यात आणि गुन्हे

करणाऱ्यांच्या संख्येत वाढ होत आहे. भारतासारख्या ज्या देशात असमानता असते म्हणजे सामाजिक विषमता अस्तित्वात असते त्या देशात पारधी किंवा फासेपारधी सारख्या लोकांना समाजाकडून चांगली वागणूक मिळत नाही. त्यामुळे चोऱ्या, दरोडे, फसवणूक करणे इत्यादी गुन्हेगारी कारवाया त्यांच्या हातून होतात. अशा प्रकारे भारतात दिवसेंदिवस गुन्हे करणाऱ्यांच्या संख्येत वाढ होत आहे. त्यास जी विविध कारणे जबाबदार आहेत त्यामध्ये सामाजिक विषमता हे एक कारण आहे.

**९) देशाची आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रतिमा खराब :**

देशात सामाजिक विषमता असणे अनेक कारणासाठी चांगले नसते. सामाजिक विषमतेमुळे देशाची आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रतिमा खराब होते. देशाची आंतरराष्ट्रीय जगतात बदनामी होते.

**१०) राज्यक्रांतीचा धोका**

देशात सामाजिक विषमता उग्र स्वरुपाची असेल तर लोक असंतुष्ट, असमाधानी राहतात. सामाजिक स्वास्थ्य नष्ट होते. क्रांती करण्यास लोक प्रवृत्त होतात. म्हणून देशात सामाजिक विषमता फार काळ व गंभीर असणे अत्यंत धोक्याचे असते.

**११) व्यसनाधिनतेत वाढ :**

व्यसनाधिनतेची जी अनेक कारणे आहेत त्यामध्ये सामाजिक विषमता हे सुद्धा एक कारण आहे. ज्या देशात सामाजिक विषमता असते त्या देशात काही लोकांना समाजात फारशी चांगली किंमत नसते. इतरांकडून त्यांना चांगली वागणूक मिळत नसते. त्यामुळे त्यांच्यात व्यसनाधिनता वाढीस लागते.

**१२) राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यात अडथळा :**

सामाजिक विषमता जर देशात असेल तर राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यास अडथळा निर्माण होतो. ज्या देशात सामाजिक विषमता असते त्या देशात जातीभेद, धर्मभेद, लिंगभेद, वंशभेद इत्यादी विविध प्रकारचे भेद अस्तित्वात असतात. भारतात सामाजिक समता प्रस्थापित झाली नसल्यानेच अधून-मधून जातीय धार्मिक दंगे उद्भवत असतात. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यात अडचणी येतात.

**१३) समाजात तणाव, भीती व घृणा :**

सामाजिक विषमतेचा आणखी एक दुष्परिणाम म्हणजे समाजात विविध प्रकारचे भेद अस्तित्वात असल्याने काही लोकांमध्ये दुसऱ्या समाजातील लोकांबद्दल भीतीचे, संशयाचे वातावरण असते. काही लोक दुसऱ्या जातीच्या, धर्माच्या लोकांची घृणा करत असतात. काही लोक तर अक्षरशः जीव मुठीत घेऊनच जगताना दिसतात.

**१४) आर्थिक विकासावर परिणाम :**

सामाजिक विषमतेचा आर्थिक विकासावर सुद्धा परिणाम होत असतो. कारण सामाजिक विषमतेमुळे काही लोकांना चांगल्या शिक्षणाची, रोजगाराची, विकासाची संधी मिळत नाही. त्यामुळे त्यांना राष्ट्रीय

उत्पन्नाच्या प्रक्रियेत इच्छा असूनही भाग घेता येत नाही. अशा प्रकारे सामाजिक विषमतेचा राष्ट्रीय उत्पन्नावर म्हणजेच आर्थिक विकासावरही परिणाम घेत असतो.

**१५) शहराकडे स्थलांतर :**

भारतात ग्रामीण भागातून शहराकडे स्थलांतर करणाऱ्या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. या स्थलांतरास जे विविध घटक कारणीभूत आहेत त्यामध्ये सामाजिक विषमता हे सुद्धा कारण जबाबदार आहे. सामाजिक विषमतेमुळे ग्रामीण भागातील काही लोकांना असुरक्षित वाटते. त्यामुळे ते शहरात कायमचे स्थलांतरित होतात. त्यामुळे शहरातील लोकांची संख्या वाढून तेथील सोयीसुविधांवर ताण पडतो. भारतात पुणे, मुंबई सारख्या मोठ्या शहरात दलितांची आणि मुस्लिमांची संख्या जास्त दिसते. दलित, मुस्लिमांना शहरात अधिक सुरक्षित वाटते आणि रोजगारही सहज मिळतो. ३०-४० वर्षापूर्वी ग्रामीण भागातून शहरात स्थायिक होणाऱ्या दलित, मुस्लिमांचे प्रमाण मोठे होते. कारण त्या वेळी सामाजिक विषमता तीव्र स्वरुपाची होती. आज उपजीविकेसाठी स्थलांतर वाढले आहे.

**१६) कल्याणकारी राज्य निर्मितीत अडथळा :**

भारतासारख्या अनेक देशांनी कल्याणकारी राज्य निर्माण करण्यावर भर दिला आहे. परंतु देशात सामाजिक विषमता असेल तर कल्याणकारी राज्य निर्माण होऊ शकत नाही. म्हणून सामाजिक विषमतेमुळे कल्याणकारी राज्याचे स्वप्न किंवा उद्दिष्ट साकार होऊ शकत नाही. सामाजिक विषमता कमी केल्याशिवाय कल्याणकारी राज्य निर्माण होऊ शकत नाही.

**१७) बुद्धीमान लोकाचे विदेशात स्थलांतर :**

सामाजिक विषमतेचा आणखी एक दुष्परिणाम म्हणजे सामाजिक विषमतेमुळे बुद्धीमान, विद्वान लोक परदेशात स्थलांतर करतात. भारतासारख्या देशात जातीवर आधारित आरक्षण असल्याने त्यांना नोकरीची/कर्तबगारीची संधी मिळत नाही. ते लोक अमेरिका, इंग्लंडसारख्या देशात स्थलांतर करतात. याला मानवी भांडवलाचे उड्डाण असे म्हणतात. स्थलांतर करणाऱ्या बुद्धीमान लोकांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून त्यांच्या ज्ञानाचा देशाला उपयोग करुन घेता येत नाही. भारतातील मानवी भांडवलाचे विदेशात होणारे हे उड्डाण थांबविण्यासाठी सामाजिक विषमता नष्ट करणे आवश्यक आहे.

**१८) शोषितांच्या/वंचितांच्या संख्येत वाढ :**

देशात सामाजिक विषमता पराकोटीची असेल तर शोषितांच्या/वंचित लोकांच्या संख्येत वाढ होते. शोषितांच्या संख्येत वाढ झाल्यास सरकारला सामाजिक समता प्रस्थापित करणे कठीण बनते. भारतात वंचितांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यास जे विविध घटक कारणीभूत आहेत त्यामध्ये सामाजिक विषमता हा एक महत्वाचा घटक आहे. म्हणून शोषितांचे/वंचितांचे प्रमाण कमी करायचे असेल तर भारतातील सामाजिक विषमता नष्ट होणे आवश्यक आहे.

**१९) सर्वसमावेशक वृद्धीच्या मार्गातील अडथळा :**

सामाजिक विषमता हा सर्वसमावेशक आर्थिक वृद्धीच्या मार्गातील प्रमुख अडथळा आहे. आर्थिक विकासाचे फायदे जेव्हा देशातील सर्व जाती, धर्माच्या लोकांपर्यंत पोहचतात तेव्हा सर्वसमावेशक आर्थिक वृद्धी घडून आली असे म्हणता येते. परंतु सामाजिक विषमतेमुळे काही लोकांना विकासापासून वंचित रहावे लागते. काही लोकांना आर्थिक विकासाचे लाभच मिळत नाहीत तर काही लोकांना खूपच कमी लाभ मिळतात. त्यामुळे सर्वसमावेशक आर्थिक वृद्धीचे ध्येय सरकारला गाठता येत नाही. सामाजिक विषमतेसारख्या विविध कारणामुळे देशातील काही लोक विकासापासून वंचित राहत असतील तर त्या विकासाला सर्वसमावेशक विकास म्हणता येणार नाही.

**२०) महासत्ता बनण्यात अडथळा :**

एखाद्या देशाच्या केवळ राष्ट्रीय उत्पन्न आणि दरडोई उत्पन्नात वाढ झाली म्हणजे त्या देशाची प्रगती झाली किंवा अमेरिकेइतका आर्थिक विकास झाला म्हणजे तो देश महासत्ता बनला असे ठामपणे म्हणता येणार नाही. देशात सामाजिक विषमता अस्तित्वात नसेल आणि राष्ट्रीय उत्पन्नात सतत वृद्धी घडून येत असेल तरच त्या देशाला विकसित देश किंवा महासत्तेच्या दिशेने वाटचाल करणारा देश असे म्हणता येईल. भारताला महासत्ता बनवण्याचे / विकसित राष्ट्र बनवण्याचे सरकारचे ध्येय आहे. हे ध्येय गाठण्यासाठी सरकारी पातळीवरुन अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी जोरदार प्रयत्न केले जात आहेत. देशाचा वेगाने आर्थिक विकास घडून येत आहे. मात्र ज्या वेगाने आर्थिक विकास घडून येत आहे, त्या वेगाने सामाजिक विषमता कमी होताना दिसत नाही. म्हणून सामाजिक विषमतेचा प्रश्न अस्तित्वात असलेल्या भारतासारख्या देशात आर्थिक विकास गतीने होत असतानाही त्या विकासाला अर्थ उरत नाही. अशा प्रकारे भारताला महासत्ता बनण्यास जे प्रमुख अडथळे आहेत त्यामध्ये सामाजिक विषमता हा एक महत्वाचा अडथळा आहे. भारताच्या कृषी, उद्योग, व्यापार इत्यादी क्षेत्रांची प्रगती अमेरिकेपेक्षा अधिक झाली आणि सामाजिक विषमता जर गंभीर स्वरुपाची असेल तर भारतातीलच नव्हे तर जगातील विचारवंत, अर्थतज्ञ भारताला महासत्ता म्हणण्याचे धाडस करणार नाहीत. म्हणून भारताला महासत्ता म्हणून किंवा विकसित देश म्हणून उदयास यायचे असेल तर देशातील सामाजिक विषमतेच्या निर्मूलनाकडे सरकारने गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे.

**सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी उपाय :**

सामाजिक विषमता अगदी पूर्णपणे नष्ट करता येणे अशक्य असले तरी ती बऱ्याचशा प्रमाणात कमी करता येणे शक्य आहे. कारण नैसर्गिक भेद नष्ट करता येत नाहीत हे खरे असले तरी मानव निर्मित भेद, अनिष्ट मानवी प्रवृत्ती इत्यादी नष्ट करणे शक्य आहे. कायदे, प्रबोधन, मूल्यशिक्षण इत्यादी विविध माध्यमातून सामाजिक विषमता कमी करता येणे शक्य आहे. सामाजिक विषमता पूर्णपणे नष्ट करता आली नाही तरी ती एवढी कमी झाली पाहिजे की सामाजिक विषमतेचे अनिष्ट परिणाम जाणवणार नाहीत किंवा समाजातील कोणत्याही घटकाचे त्यामुळे नुकसान होणार नाही. या ठिकाणी सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी सरकारने

योजलेल्या काही उपायांची माहिती दिली आहे. तसेच प्रस्तुत अभ्यासकाने काही उपाय सुचवलेले आहेत. त्याचीही माहिती दिली आहे.

**अ) सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी सरकारने योजलेले उपाय :**

स्वातंत्र्यपूर्वकाळात राजाराम मोहन रॉय यांच्यासारख्या काही समाजसुधारकांमुळे इंग्रज शासकांनी सामाजिक विषमता कमी करण्यासंदर्भात थोडेफार प्रयत्न केले होते. ते अतिशय तोकडे होते. स्वातंत्र्य प्राप्तीपासून भारत सरकारने सामाजिक विषमता कमी करण्यावर भर दिला आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी जे उपाय योजले त्याची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे दिली आहे.

**१) अस्पृश्यता पाळण्यास बंदी:**

अस्पृश्यता नष्ट केल्याशिवाय सामाजिक विषमता नष्ट घेणार नाही हे ओळखून भारत सरकारने कायदा करुन अस्पृश्यता पाळण्यास बंदी घातली आहे. 'एक गाव एक पाणवठा' ही योजना सरकारने अस्पृश्यता निर्मूलनासाठीच राबवली आहे. एका गावात अनेक जातीधर्माचे लोक राहतात. त्यांनी एकाच पाणवठ्यावर पिण्याचे पाणी भरावे, लोकांनी एकोप्याने रहावे आणि उच्च-नीचतेला / अस्पृश्यतेला थारा देवू नये असे सरकारचे त्यामागे उद्देश आहेत. या जातीचा पाणवठा वेगळा, त्या जातीचा पाणवठा वेगळा अशी परिस्थिती अस्तित्वात होती. यामुळे काही लोकांना हीन लेखले जात होते. परंतु आता एक गांव-एक पाणवठा ही योजना लोकांना मान्य होवू लागली आहे.

**२) वेठबिगारी निर्मूलन कायदा:**

भारतात स्वातंत्र्यपूर्वकाळात ग्रामीण भागात वेठबिगारी पद्धत अस्तित्वात होती. त्या काळात जमिनदारी पद्धत होती. त्यामुळे वेठबिगारी आढळत होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संरकारने या पद्धतीचे भयावह दुष्परिणाम विचारात घेवून ही पद्धत कायदा करुन कायमची नष्ट केली आहे. सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी सरकारने उचललेले हे एक चांगले पाऊल आहे.

**३) नोकऱ्यात, शिक्षणात आणि राजकारणात आरक्षण :**

आर्थिक, सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी सरकारने कायदा करुन सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या जातीच्या लोकांना आणि अल्पसंख्याक समुदायाच्या लोकांना नोकऱ्यात, शिक्षणात आणि राजकारणात आरक्षण ठेवले आहे. त्यामुळे त्यांचा आर्थिक आणि सामाजिक दर्जा उंचावण्यास मदत होत आहे.

**४) आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन :**

जातीव्यवस्था किंवा जातीभेद हे भारतातील सामाजिक विषमतेचे एक प्रमुख कारण आहे. म्हणून सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी भारतात सरकारकडून आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन दिले जात आहे. आंतरजातीय विवाह करणाऱ्यांना आर्थिक मदतीबरोबरच इतरही मदत सरकार देत आहे

**५) महिला सक्षमीकरणासाठी प्रयत्न :**

स्त्री-पुरुष भेदभाव नष्ट झाल्याशिवाय आणि स्त्रियांचे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय सक्षमीकरण झाल्याशिवाय सामाजिक विषमता कमी होणार नाही म्हणून भारत सरकारने महिला व मुलीच्या सबलीकरण कार्यक्रमावर भर दिला आहे. महिलांच्या सक्षमीकरणासाठी / कल्याणासाठी सरकारने अनेक योजना आखून त्या राबविण्यास सुरवात केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ८० टक्के आरक्षण ठेवण्याचा उद्देश महिलांचे समाजातील स्थान उंचावणे हेच आहे. सरकारने महिला सक्षमीकरणासाठी काही कायदे केले आहेत. तसेच काही योजना सुरु केल्या आहेत. सरकारने १९९७ मध्ये कस्तुरबा गांधी शिक्षण योजना सुरु केली आहे. तसेच महिला स्वयंसिध्द, बालिका समृध्दी योजना' या योजना सुरु केल्या आहेत.

**६) शिक्षणात मूल्य शिक्षणाचा समावेश :**

आदर्श विद्यार्थी/आदर्श नागरीक घडविण्यासाठी सरकारने शिक्षणात मूल्य शिक्षणाचा समावेश केला असून लहान वयाच्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात तसेच काही अंशी शिक्षणातही सरकारने मूल्यशिक्षणाचा समावेश केला आहे. शिक्षणसंस्थांमधून चांगले/आदर्श नागरीक तयार झाले तर सामाजिक विषमता कमी होण्यास मदत होणार आहे.

**७) प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे:**

भारतातील सामाजिक विषमतेस जबाबदार असणाऱ्या अनेक घटकांमध्ये निरक्षरता हा एक महत्वाचा घटक आहे. म्हणून निरक्षरतेचे उच्चाटन केल्याशिवाय सामाजिक विषमता नष्ट करणे अशक्य आहे. म्हणून भारत सरकारने स्वातंत्र्यानंतर प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले आहे. तसेच माध्यमिक, उच्च माध्यमिक, विद्यापीठीय शिक्षणाच्या सोयीत वाढ व सुधारणा सरकार करत आहे.

**८) दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम :**

दारिद्र्य हे सामाजिक विषमतेचे कारण आणि परिणाम आहे. म्हणून सामाजिक विषमता कमी करण्यासाठी भारत सरकारकडून दारिद्र्य निर्मूलनाच्या अनेक योजना राबवल्या जात आहेत.

**९) राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना :**

महिलांना समाजात चांगली वागणूक मिळावी, त्यांचे शोषण थांबावे यासाठी सरकारने १९९२ मध्ये राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना केली आहे. संपूर्ण देशात सर्व राज्यात महिला आयोगाची स्थापना करण्यात आली आहे.

**१०) घटनात्मक तरतुदी :**

सामाजिक विषमता निर्माण होऊ नये यासाठी भारताच्या राज्यघटनेतसुध्दा विविध तरतुदी केल्या आहेत. घटनेनुसार देशातील सर्व नागरिकांना हक्क, अधिकार दिले आहेत. काहींना कमी व काहींना जास्त

हक्क दिलेले नाहीत. स्त्री व पुरुष भेदभावांना घटनेने मूठमाती दिली आहे. सामाजिक विषमता निर्माण होणार नाही किंवा ती वाढणार नाही याची काळजी घटनाकारांनी घेतली आहे.

अशा प्रकारे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी वरीलप्रमाणे विविध उपाय योजले आहेत. परंतु अद्यापही काही खेड्यात उच्चनीचंता आढळते. छुप्या स्वरुपात किंवा अदृश्य स्वरुपात वेठबिगारी आढळते. स्त्रियांचा समाजातील दर्जा अजूनही कनिष्ठ आहे. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे असूनही अद्यापही सुमारे २५ टक्के लोक निरक्षर आहेत. त्यामुळे सामाजिक विषमता टिकून आहे.

**ब) प्रस्तुत अभ्यासकाने सुचवलेले उपाय:**

सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. परंतु सामाजिक विषमता नष्ट करणे ही केवळ सरकारची एकट्याची जबाबदारी नाही तर समाजातील सर्व घटकांची ती जबाबदारी आहे. समाजातील सुशिक्षित युवक, विचारवंत, साहित्यीक, सामाजिक कार्यकर्ते, राजकारणी, शिक्षणसंस्था इत्यादी घटक सामाजिक विषमतेचे निर्मूलन करुन सामाजिक समता प्रस्थापित करण्यात महत्वाचे योगदान देऊ शकतात. सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी प्रस्तुत अभ्यासक काही उपाय खालीलप्रमाणे सुचवू इच्छितो.

**१) लोकांचा वैचारिक दर्जा उंचावणे आवश्यक :**

समाजातील बहुसंख्य लोकांची वैचारिक उंची खूपच कमी आहे. कित्येक लोक असे आहेत की त्यांच्याकडे पैसा, स्थावर मालमत्ता प्रचंड आहे. शैक्षणिक पात्रता चांगली आहे. परंतु वैचारिक उंची खूपच कमी आहे. त्यामुळे त्यांच्याकडून लिंगभेद, जातीभेद, भाषिकभेद, प्रादेशिक भेद असे वेगवेगळ्या प्रकारचे भेदभाव पाळले जातात व त्यांना खतपाणी घातले जाते. त्यामुळे सामाजिक विषमतेचा प्रश्न गंभीरच बनतो. लोकांचा वैचारिक दर्जा उंचावल्याशिवाय सामाजिक विषमता नष्ट होणार नाही. म्हणून सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी लोकांची वैचारिक बैठक चांगली पाहिजे. म्हणून विविध माध्यमातून लोकांचा वैचारिक दर्जा उंचावण्यासाठी प्राधान्य दिले पाहिजे.

**२) सामाजिक कार्यकर्ते व सामाजिक संस्थांची जबाबदारी:**

सामाजिक समता प्रस्थापित करण्यामध्ये सामाजिक कार्यकर्ते व सामाजिक संस्था चांगली भूमिका पार पाडू शकतात. परंतु त्यांचे प्रयत्न मात्र प्रामाणिक हवेत. काही सामाजिक कार्यकर्ते व सामाजिक संस्था यासंदर्भात अत्यंत उत्कृष्ट कार्य करीत आहेत. त्यांना लोकांचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळाला पाहिजे. केवळ प्रसिद्धीसाठी आणि पुरस्कारासाठी तकलादू काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्ते आणि सामाजिक संस्था यांचे प्रबोधन करून त्यांच्या शक्तीचा उपयोग सामजिक समता प्रस्थापित करण्यासाठी केला पाहिजे.

**३) राजकीय पक्षांची जबाबदारी:**

सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या संदर्भात राजकीय पक्ष आणि त्यांचे नेते चांगली भूमिका पार पाडू शकतात. जातीय, धार्मिक विद्रोह पसरणार नाही अशी विचारसरणी मांडणे, त्यासंदर्भात सतत कार्यकर्त्यांचे आणि जनतेचे प्रबोधन करणे याकडे राजकीय पक्षांनी लक्ष दिले पाहिजे.

### ४) साहित्यीक व इतर बुद्धीजीवींची जबाबदारी:

साहित्यीक व इतर बुद्धीजीवी लोकांनी आपली लेखनी आणि वाणी सामाजिक विषमतेच्या निर्मूलनासाठी खर्च केली तर त्याचे चांगले परिणाम दिसून येतील. कारण साहित्यीक, विचारवंत, बुद्धीजीवी यांच्याबद्दल समाजाच्या मनात आदराची भावना असते. त्यांचे अनुकरण करण्याचा लोक प्रयत्न करत असतात. म्हणून समाज दुभंगणार नाही, जातीय व धार्मिक तेढ निर्माण होणार नाही अशा प्रकारचे लेखन साहित्यीक, विचारवंतांनी करणे आवश्यक आहे.

### ५) युवकांची भूमिका :

सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या संदर्भात युवा वर्गाची भूमिका सुद्धा खूप महत्वाची आहे. विज्ञानाची कास धरणे, जातीभेद न पाळणे, दुसऱ्या जातीचा द्वेश न करणे या बाबींना युवकांनी प्राधान्य दिले पाहिजे. तशा प्रकारचे संस्कार त्यांच्यावर शाळा-कॉलेजातून व घरातून झाले पाहिजेत. त्याशिवाय सामाजिक विषमता निर्मूलन करण्याच्या संदर्भात युवकांचे अपेक्षित सहकार्य लाभणार नाही.

### ६) धार्मिक उन्माद थांबणे आवश्यक:

काही धर्माचे लोक आपल्या धर्मातील लोकांना दुसऱ्या धर्मातील लोकांच्या विरोधात कोंबड्या झुंजवाव्यात तसे झुंजवतात. अधुन-मधून चिथावणीखोर/भडक भाषणे देतात. विविध धर्मातील निरागस, निष्पाप युवक त्यांच्या भूलथापांना भुलून त्यांच्या विळख्यात अडकतात. समाज विघातक कृत्यामध्ये सहभागी होतात. म्हणून धार्मिक उन्माद नष्ट झाल्याशिवाय सामाजिक समता प्रस्थापित होणार होणार नाही आपापल्या धर्मावर श्रद्धा हवी. परंतु दुसऱ्या धर्माला कमी लेखणे व त्या धर्मातील लोकांचा द्वेष करणे चुकीचे आहे हे लोकांच्या मनावर ठसवणे आवश्यक आहे. असे झाले तर युवा वर्ग धार्मिक उन्माद पसरवू पाहणाऱ्यांच्या हातातील बाहुले बनणार नाही.

### ७) सरकारी कर्मचाऱ्यांची जबाबदारी:

सार्वजनिक ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्यांनी जातीभेद न पाळणे अत्यंत आवश्यक आहे. कार्यालयात कामासाठी आलेल्या लोकांची जात, धर्म, प्रदेश न पाहता सचोटीने कामे केली पाहिजेत. डोक्यात जात न ठेवता कामे केली पाहिजेत. जातीद्वेशाने पछाडलेले कर्मचारी सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या मार्गातील मोठा अडथळा बनून राहिले आहेत.

### ८) सर्वांना विकासाची / प्रगतीची संधी :

ज्या देशातील लोकांना आपला विकास करण्याची समान संधी उपलब्ध असते, विकासाच्या संधीपासून कोणालाही वंचित ठेवले जात नाही त्या देशात सामाजिक विषमता फारशी आढळत नाही. म्हणून सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी देशातील सर्व लोकांना प्रगतीच्या पुरेशा संधी उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. जात, धर्म, वंश, प्रदेश, लिंग इत्यादी भेदभाव पुढे करुन कोणाचीही विकासाची संधी हिरावून घेतली जाता कामा नये. अर्थात जरी सर्वांना विकासाची समान संधी उपलब्ध करुन दिली तरी प्रत्येक व्यक्तीची क्षमता

सारखी नसल्याने ज्याची क्षमता जास्त आहे तो पुढे जाईल. ज्याची क्षमता कमी आहे तो मागे राहील. त्यामुळे थोडी-फार विषमता राहणारच. परंतु ही विषमता जाणवणार नाही अथवा मानवी जीवनाला हानीकारक ठरणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

**९) लोकांना मूलभूत हक्क आणि स्वातंत्र्य असणे आवश्यक:**

देशातील लोकांना मूलभूत आणि सर्व प्रकारचे स्वातंत्र्य असणे म्हणजे समता होय. देशातील काही लोकांना मानवी हक्कापासून किंवा मूलभूत हक्कापासून वंचित ठेवले जात असेल किंवा त्यांना राज्यघटनेने बहाल केलेल्या स्वातंत्र्याचा आनंद उपभोगावयास मिळत नसेल तर त्या देशात समता नव्हे तर विषमताच असते. म्हणून विषमता नष्ट करुन देशात सामाजिक समता प्रस्थापित करायची असेल तर नागरिकांना राज्यघटनेने दिलेले सर्व मूलभूत हक्क आणि सर्व प्रकारची स्वातंत्र्ये उपभोगावयास मिळाली पाहिजेत.

**१०) प्रसिद्धी माध्यमांची जबाबदारी :**

प्रसिद्धी माध्यमामध्ये मुद्रित माध्यमा बरोबरच इलेक्ट्रॉनिक माध्यमे सुद्धा आता खूपच प्रभावी व लोकप्रिय ठरत आहेत. या सर्व प्रकारच्या प्रसिद्धी माध्यमांनी सामाजिक विषमता वाढीस लागणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. तशा प्रकारे जनतेचे प्रबोधन केले पाहिजे. परंतु काही प्रसिद्धी माध्यमे सामाजिक एकोपा टिकविण्याऐवजी व निर्माण करण्याऐवजी सामाजिक विषमतेच्या वाढीलाच खतपाणी घालताना दिसतात. त्यामुळे समता प्रस्थापित करणे कठीण जाते. म्हणून प्रसिद्धी माध्यमांनी केवळ खपाचा आणि उत्पन्नाचा विचार न करता सामाजिक विषमतेच्या निर्मूलनाला प्राधान्य दिले पाहिजे.

**११) मानवी मूल्यांची जोपासना :**

सत्य, शांती, सद्वर्तन, सहकार, समता, न्याय, राष्ट्रभक्ती आणि उत्कृष्टता ही अत्यंत महत्वाची मानवी मूल्ये आहेत. मानवाला या मानवी मूल्यांचा विसर पडत चालला आहे. त्यामुळे समाजात समता प्रस्थापित करण्यात अडथळे येत आहेत. म्हणून मानवी मूल्यांची जोपासना/अंगीकार केल्याशिवाय सामाजिक विषमता संपुष्टात आणणे अशक्य आहे.

**१२) इतर उपाय :**

सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी वरील उपायाबरोबरच इतरही काही उपाय सुचवता येतील. उदा सर्व जातीधर्मातील शोषित, वंचित, गरीब लोकांना पुढे येण्यासाठी सरकारने मदत केली पाहिजे. कारण शोषित, वंचित, गरीब लोक देशात जोपर्यंत आहेत तोपर्यंत सामाजिक समता प्रस्थापित करणे शक्य होणार नाही हे लक्षात घेतले पाहिजे. गरीबी निर्मूलनाबरोबरच घरात व समाजात मुलाइतकेच मुलींना महत्व देणे, स्त्रियावरील अवाजवी निर्बंध कुटुंबाने व समाजाने काढून टाकणे, अज्ञान व सर्व प्रकारच्या अंधश्रद्धांचे निर्मूलन करणे, छुप्या/अदृश्य स्वरुपात अस्तित्वात असलेली वेठबिगारी नष्ट करणे, अस्पृश्यता ही मानव निर्मित आहे हे लोकांच्या मनावर ठसवणे व अस्पृश्यता पाळणाऱ्यावर, सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या लोकांना

भेदभावाची, तुच्छतेची वागणूक देणाऱ्यावर कडक कारवाई करणे इत्यादी विविध उपाय योजून सामाजिक विषमता कमी करता येईल.

**समारोप :**

स्वातंत्र्योत्तरकाळात भारताने देशाच्या आर्थिक विकासाकडे चांगले लक्ष दिले. त्यामुळे देशाचा झपाट्याने आर्थिक विकास होत आहे. परंतु सामाजिक विषमता म्हणावी तेवढी कमी झालेली नाही. आर्थिक विकास जेवढा महत्वाचा आहे तेवढीच सामाजिक समता प्रस्थापित होणे महत्वाची आहे. कारण भारतातील सामाजिक विषमता आणि तिचे दुष्परिणाम गंभीर स्वरुपाचे आहेत. सामाजिक विषमतेमुळे देशातील आर्थिक व सामाजीकदृष्ट्या मागासलेल्या लोकांना सन्मानाने जगता येत नाही. म्हणून सामाजिक विषमतेच्या निर्मूलनाला प्राधान्य दिले पाहिजे. सर्वसमावेशक वृद्धीचे ध्येय गाठण्यासाठी, कल्याणकारी राज्याच्या प्रस्थापनेसाठी, सामाजिक एकोपा आणि राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यासाठी सामाजिक विषमतेचे निर्मूलन अत्यंत आवश्यक आहे.

## ४.२.५ मानव विकास निर्देशांक (HDI)

**प्रास्ताविक :–**

बांगला देशातील अर्थतज्ञ महबूब–उल–हक यांना मानव विकास निर्देशांकाचे जनक मानले जाते. नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ञ अर्मत्य सेन यांनी देखील 'मानव विकास निर्देशांक' या संकल्पनेचे समर्थन केले असून मानव विकास निर्देशांकाच्या अभ्यासात मोलाची भर घातली आहे. UNDP (United Nations Development Programme) मार्फत दरवर्षी 'मानव विकास अहवाल' (Human Development Report) प्रसिद्ध केला जातो. या अहवालातून जगातील जवळ जवळ सर्व देशांच्या मानव विकासाची माहिती दिली जाते. आर्थिक विकास आणि मानव विकास या दोन बाबी परस्परांशी संबंधित आहेत. देशाचा आर्थिक विकास हा ज्या अनेक घटकावर अवलंबून असतो, त्यापैकी मानव विकास हा एक अत्यंत महत्वाचा घटक आहे. देशातील मानवी साधन संपत्तीचा दर्जा जर चांगला असेल तर आर्थिक विकासाचा दरही चांगला राहतो. तसेच राष्ट्राचा आर्थिक विकास जर सर्वसमावेशक असेल तर विकासाचे लाभ देशातील सर्व जनतेपर्यंत पोहचून देशातील मनुष्य बळाचा दर्जाही चांगला राहतो. अशा प्रकारे आर्थिक विकास आणि मानव विकास या संकल्पना परस्परांशी संबंधित आहेत.

**मानव विकास म्हणजे काय?**

जगातील प्रत्येक देश आता आर्थिक विकासाबरोबर मानव विकासाला महत्व देत आहे. मानव विकासाची एक सोपी व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

''देशातील जनतेला दीर्घायुषी व निरोगी (आरोगदायी) जीवन जगता येत असेल, साक्षरतेचे प्रमाण चांगले असेल आणि लोकांच्या राहणीमानाचा दर्जा उच्च असेल तर त्या देशातील मनुष्यबळाच्या प्रगतीला मानव विकास (चांगला मानवी विकास ) असे म्हणतात.''

UNDP ने आपल्या मानव विकास अहवालात 'मानव विकास' ही संकल्पना खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहे.

''जेंव्हा देशातील लोकांचे जास्तीत जास्त कल्याण घडून येते किंवा ज्यामुळे लोकांचे जास्तीत जास्त कल्याणाचे ध्येय साध्य होते, त्यास मानव विकास असे म्हणतात.''

अर्थतज्ञ महबूब-उल-हक यांच्या प्रयत्नांनी व त्यांच्या मार्गदर्शनाखाली UNDP ने १९९० मध्ये जो मानव विकास अहवाल प्रसिद्ध केला, त्यामध्ये तीन महत्वाच्या निर्देशांकाचा विचार केला आहे. ते निर्देशांक असे आहेत.

(अ) मानव विकास निर्देशांक (Human Development Index - HDI)

(ब) लिंगाधरित विकास निर्देशांक (Gender Related Development Index- GDI)

(क) मानव दारिद्र्य निर्देशांक (Human Poverty Index- HPI)

यापैकी मानव विकास निर्देशांकाची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे दिली आहे.

**मानव विकास निर्देशांकाचे घटक**

मानव विकास निर्देशांक तयार करण्यासाठी खालील तीन घटकांचा विचार केला जातो.

**(१) निरोगी जीवन आणि दीर्घायुष्य (A long and healthy life as measured life expectancy at birth)**

देशातील जनता दीर्घायुषी आणि निरोगी असली पाहिजे. तरच त्या देशातील मानव विकासाचा दर्जा (मूल्य) उच्च आहे, असा त्याचा अर्थ होतो. जन्मावेळचे सरासरी आर्युमान दीर्घ (भरपूर) असणे आवशक आहे.

**(२) शिक्षण :-**

मानव विकास निर्देशांकाचा दुसरा महत्वाचा घटक शिक्षण हा आहे. देशातील जनतेला शिक्षण जेवढे पुरेसे (किंवा जास्तीत जास्त) व चांगले मिळेल, तेवढा मानव विकासाचा दर्जा चांगला राहतो. यामध्ये प्रौढ साक्षरता प्रमाणाचा विचार केला जातो. तसेच प्राथमिक, माध्यमिक व विद्यापीठीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण, त्यांची वर्गातील उपस्थिती इत्यादी घटक विचारात घेतले जातात.

**(३) चांगले राहणीमान :-**

जनतेचे उच्च राहणीमान किंवा चांगले राहणीमान हा मानव विकास निर्देशांकाचा तिसरा महत्वाचा घटक आहे. देशातील राहणीमानाचा दर्जा चांगला/उच्च असेल तर त्या देशातील मानव साधनसंपत्तीचा विकास घडून आला आहे, असा निष्कर्ष काढता येतो. वास्तव राष्ट्रीय उत्पन्न आणि दरडोई उत्पन्न चांगले

(उच्च) असेल तर लोकांच्या राहणीमानाचा दर्जाही चांगला असतो. म्हणून उच्च राहणीमान प्राप्त करण्यासाठी नागरिकांच्या सरासरी दरडोई उत्पन्नात वाढ झाली पाहिजे.

अशा प्रकारे निरोगी व दीर्घायुषी जीवन, साक्षरतेचे १०० टक्के प्रमाण व सर्व प्रकारच्या शिक्षणाच्या संधींची उपलब्धता आणि उच्च राहणीमान हे मानव विकास निर्देशांकाचे महत्वाचे तीन घटक आहेत.

**मानव विकास निर्देशांक तयार करण्यासाठी (मोजण्यासाठी) विचारात घेतली जाणारी कमाल व किमाल मूल्ये (Maximum and Minimum Values for calculating HDI)**

खालील तक्ता क्रमांक १ मध्ये मानव विकास निर्देशांक तयार करणासाठी विचारात घेतली जाणारी कमाल व किमान मूल्ये दर्शविली आहेत.

**तक्ता क्रमांक १**

**मानव विकास निर्देशांक मोजणासाठी विचारात घेतली जाणारी कमाल व किमाल मूल्ये**

| अ. क्र. | घटक/निर्देशांक | कमाल मूल्य | किमान मूल्य |
|---|---|---|---|
| १ | जन्मावेळची अपेक्षित आयुर्मर्यादा | ८५ | २५ |
| २ | (अ) प्रौढ साक्षरता दर | १०० | ० |
| | (ब) स्थूल साक्षरता दर (Gross Enrolment Ratio) | १०० | ० |
| ३ | दरडोई उत्पन्न (GDP Per capita – PPP-US$) | ४०,००० | १०० |

मानव विकास निर्देशांकाच्या वरील तीन घटकांची कमाल व किमान मूल्ये विचारात घेऊन मानव विकास निर्देशांक काढला जातो. मानव विकास निर्देशांक काढण्यासाठी खालील सूत्र वापरतात.

$$\text{परिणाम निर्देशांक} = \frac{\text{प्रत्यक्ष मूल्य} - \text{किमान मूल्य}}{\text{कमाल मूल्य} - \text{किमान मूल्य}}$$

$$\text{Dimension Index} = \frac{\text{Actual value} - \text{Minimum value}}{\text{Maximum value} - \text{Minimum value}}$$

जागतिक मानव विकास अहवालामध्ये (२०१४) मानव विकासाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे दिले आहे.

(१) अति उच्च मानव विकास (Very High Human Development-HDI 0.8 and above)

(२) उच्च मानव विकास (High Human Development-HDI 0.7 to 0.8)

(३) मध्यम मानव विकास (Medium Human Development-HDI 0.5 to 0.7)

(४) निम्न मानव विकास (Low Human Development-HDI less than 0.5)

**मानव विकास अहवाल २०२२**

संयुक्त राष्ट्रसंघाने सन २०२१-२२ चा मानव विकास अहवाल नुकताच जाहीर केला आहे. मानव विकास निर्देशांकामध्ये १९१ देशामध्ये भारताचा १३२ वा क्रमांक आहे. स्वित्झर्लंडचा प्रथम क्रमांक असून दक्षिण सुदानचा शेवटचा क्रमांक आहे. मानव विकास निर्देशांकानुसार जगातील पहिले पाच देश असे आहेत. १) स्वित्झर्लंड २) नॉर्वे ३) आईसलँड ४) हाँगकाँग ५) ऑस्ट्रेलिया. मानव विकास निर्देशांकानुसार शेवटचे पाच देश असे आहेत (१८७) बुरूंडी (१८८) सेंट्रल आफ्रिकन रिपब्लिक (CAR) (१८९) नायजर (१९०) चाड (१९१) साऊथ सुदान

जगाचा सरासरी मानव विकास निर्देशांक ०.७३२ आहे. भारताचा या यादीत १३२ वा क्रमांक असून भारताचा मानव विकास निर्देशांक ०.६३३ आहे. २०२१ च्या मानव विकास अहवालात मानव विकासात भारताचा क्रमांक १३१ होता. ६९.७ वर्षावरून ६७.२ वर्षे इतकी आयुर्मानात घट झाल्याने भारत एका अंकाने घसरला आहे.

खालील तक्ता क्रमांक २ मध्ये भारताच्या शेजारील देशांचा मानव विकास निर्देशाक दर्शविला आहे.

| अ. क्र | देशाचे नाव | १९१ देशात मानव विकासातील क्रमांक |
|---|---|---|
| १ | श्रीलंका | ७३ |
| २ | चीन | ७९ |
| ३ | बांगला देश | १२९ |
| ४ | भूतान | १२७ |
| ५ | पाकिस्तान | १६१ |
| ६ | नेपाळ | १४३ |
| ७ | म्यानमार | १४९ |
| ८ | भारत | १३२ |

स्रोत: इंटरनेट

सन २०२० च्या अहवालात १८९ देशामध्ये भारताचा १३१ वा क्रमांक होता. खालील तक्ता क्रमांक ३ मध्ये सन २०२१ वर्षातील जगातील काही देशांचे मानव विकास निर्देशांक व त्यांची क्रमवारी (Rank) दर्शविली आहे.

| अ.क्र | देश | रँक | मूल्य |
|---|---|---|---|
| १ | स्वित्झर्लंड | १ | ०.९६२ |
| २ | नॉर्वे | २ | ०.९६१ |
| ३ | इंग्लंड | १८ | ०.९२९ |
| ४ | जपान | १९ | ०.९२५ |
| ५ | अमेरिका | २१ | ०.९२१ |
| ६ | चीन | ७९ | ०.७६८ |
| ७ | भारत | १३२ | ०.६३३ |

स्त्रोत : इंटरनेट

२०२१ नुसार मानव विकासाच्या बाबतीत १९१ देशात स्वित्र्झलंडचा प्रथम क्रमांक लागतो. सन २०१५ मध्ये स्वित्झलंडचा तिसरा क्रमांक होता. नॉर्वेचा दुसरा क्रमांक आहे. इंग्लंडचा १८ वा, जपानचा १९ वा, अमेरिकेचा २१ वा, चीनचा ७९ वा आणि भारताचा १३२ वा क्रमांक लागतो.

मानव विकासाच्या बाबतीत २०१५ मध्ये भारताचा १८८ देशात १३१ क्रमांक होता, तो २०२१ मध्ये १३२ व्या स्थानावर आला आहे. भारताने मानव विकासाच्या बाबतीत चीनच्या तुलनेत प्रगती केली नसल्याचे दिसते. मानव विकासाच्या बाबतीत भारत मध्यम मानव विकास गटात मोडतो. तर चीन मात्र उच्च मानव विकास गटात मोडतो. स्वित्झर्लंड, नॉर्वे, आइसलँड, हाँगकाँग, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, जपान, अमेरिका हे देश अतिउच्च मानव विकास गटात मोडतात.

**भारताच्या मानव विकास निर्देशांकात सुधारणा :–**

भारताच्या मानव विकास निर्देशांकात हळूहळू सुधारणा होत आहे हे खालील ४ क्रमांकाच्या तक्त्यावरून आपल्या लक्षात येईल. खालील तक्त्यात विविध वर्षातील भारताचा मानव विकास निर्देशांक दर्शविला आहे.

**तक्ता क्रमांक ४ विविध वर्षातील भारताचा मानव विकास निर्देशांक**

| अ.क्र | वर्ष | मानव विकास निर्देशांक (HDI) |
|---|---|---|
| १ | १९७५ | ०.४१२ |
| २ | १९८५ | ०.४७६ |
| ३ | १९९५ | ०.५४६ |
| ४ | २००४ | ०.६१९ |
| ५ | २००७ | ०.६१२ |
| ६ | २०११ | ०.५४७ |

| | | |
|---|---|---|
| ७ | २०१५ | ०.६२४ |
| ८ | २०२२ | ०.६३३ |

(स्रोत : दत्त व सुंदरम, 'इंडियन इकॉनॉमी, आवृत्ती ६५, पृ.क्र.७० व इंटरनेट)

**भारताचा मानव विकास निर्देशांक कमी असणाची कारणे**

मानव विकास निर्देशांकाच्या बाबतीत आज भारताचा जगात १३२ वा क्रमांक आहे. भारताचा २०२२ चा मानव विकास निर्देशांक ०.६३३ आहे. जगाचा सरासरी मानव विकास निर्देशांक ०.७३२ आहे. जगाच्या सरासरी निर्देशांकापेक्षा भारताचा मानव विकास निर्देशांक खूपच कमी आहे. भारतातील मानव विकास दर्जा कमी असणास काही घटक कारणीभूत आहेत. त्या घटकांची थोडक्यात चर्चा खालीलप्रमाणे केली आहे.

**(१) निरक्षरता :–**

भारतात आजही निरक्षरतेचे प्रमाण मोठे आहे. जवळपास २५% लोक हे निरक्षर आहेत. त्यांना लिहा–वाचायला येत नाही. भारताला स्वातंत्र्य मिळून ७७ वर्षे पूर्ण झाली तरी अद्‌याप निरक्षरतेचे पूर्णपणे उच्चाटन झालेले नाही. निरक्षरता हा मानव विकासासाठी प्रमुख अडथळा बनला आहे. शिवाय २५ टक्केपेक्षा अधिक लोक हे अल्पशिक्षित आहेत. त्यांना केवळ लिहा–वाचायला येते. त्यांचाही देशाच्या विकासाला फारसा हातभार लागत नाही.

**(२) अपेक्षित आयुर्मान कमी :–**

प्रत्येक जनगणनेत भारतीय नागरिकांचे सरासरी आयुर्मान वाढत असले तरी विकसित देशांच्या तुलनेत भारतीय नागरिकांची जन्मावेळची अपेक्षित आयुमर्यादा ही अद्याप कमीच आहे. त्यामुळे मानव विकास निर्देशांकाच्या बाबतीत भारत खूपच मागे आहे.

**(३) प्रचंड लोकसंख्या :–**

भारताची लोकसंख्या प्रचंड आहे. आजची भारताची लोकसंख्या १४० कोटीपेक्षा जास्त आहे. ४० ते ५० कोटी किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या अतिरिक्त आहे. प्रचंड लोकसंख्येमुळे व वाढत्या लोकसंख्येमुळे देशातील सर्व जनतेला पुरेसे व चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळत नाही. कुपोषण, बालमृत्यू, सततचे आजारपण या समस्या गंभीर होत आहेत. सरकारला सर्व लोकांपर्यंत चांगल्या आरोग्य सुविधा (वैद्यकीय सुविधा) पोहचवता येत नाहीत. वाढत्या लोकसंख्येमुळे शिक्षण, आरोग्य या सुविधावर प्रचंड ताण पडला आहे. त्यामुळे मानव विकासाच्या बाबतीत आपण जगातील विकसित देशांच्या तुलनेत खूपच मागे राहिलो आहोत.

**(४) तांत्रिक व्यावसायिक, वैद्यकीय शिक्षणाच्या सुविधा कमी :–**

भारतात वाङ्मयीन शिक्षणाच्या सुविधा बऱ्यापैकी आहेत. परंतु तुलनेने तांत्रिक, व्यावसायिक (धंदेवाईक), वैद्यकीय शिक्षणाच्या सुविधा अत्यंत कमी आहेत. त्यामुळे भारतातील मानव विकास निर्देशांक कमी आहे.

**(५) उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण कमी :–**

भारतात प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणापेक्षा उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन (विद्यापीठीय) शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण अद्यापही कमी आहे. त्यांची वर्गातील उपस्थिती सुद्धा खूपच कमी आहे. त्यामुळे भारताचा मानव विकास निर्देशांक कमी आहे.

**(६) कोरोनासारखी महामारी (रोगराई) :–**

भारताचा मानव विकास निर्देशांक कमी असणास कोरोनासारखी महामारी (रोगराई) सुद्धा कारणीभूत ठरली आहे. सन २०२१ च्या मानव विकास अहवालात मानव विकास निर्देशांकात जगात भारताचा क्रमांक १३१ वा होता. तो २०२२ मध्ये १३२ झाला आहे. कोरोनामुळे भारतीय नागरिकांचे आयुर्मान घटले. ६९.७ वर्षावरून ६७.२ वर्षे इतके आयुर्मान कोरोनामुळे कमी झाले. त्यामुळे मानव विकास निर्देशांकात भारताची एका अंकाने घसरण झाली. अशा प्रकारे मानव विकासाचा दर्जा कमी असण्यास कोरोनासारखी आपत्ती सुद्धा कारणीभूत ठरली आहे.

**(७) स्त्रियांना कमी महत्व :–**

भारतात आजही काही स्त्रियांना कुटुंबात, समाजात चांगला दर्जा दिला जात नाही. बहुसंख्य स्त्रिया आजही चूल आणि मूल एवढ्या पुरत्याच मर्यादित आहेत. एकूण लोकसंख्येत स्त्रियांची संख्या जवळजवळ निम्मी आहे. स्त्रियांना चांगल्या संधी मिळत नाहीत. त्यांचा दर्जा निम्न आहे. त्यामुळे सुद्धा भारतातील मानव विकासाचा दर्जा चांगला नाही.

**(८) दारिद्र्य :–**

भारतात आजमितीस सुमारे २५ टक्केपेक्षा अधिक लोक दारिद्र्य रेषेखाली आहेत. अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण या प्राथमिक गरजा सुद्धा त्यांना आपल्या उत्पन्नातून भागवता येत नाहीत. गरीब लोक आपल्या मुलांना सुद्धा चांगले शिक्षण देऊ शकत नाहीत. चांगला आहार देऊ शकत नाहीत. त्यामुळे चांगले मनुष्यबळ (मानवी भांडवल) देशात तयार होत नाही.

**सारांश**

अशा प्रकारे वरील विविध कारणामुळे भारतातील मानव विकास निर्देशांक जागतिक सरासरी मानव विकास निर्देशांकापेक्षा खूपच कमी आहे. चीनपेक्षा आपण खूपच मागे आहोत. चीनचा मानव विकास निर्देशांकांत जगात ७९ वा क्रमांक आहे. तर भारताचा १३२ वा क्रमांक आहे. ही बाब भारताला निश्चितच भूषणावह नाही.

भारतातील मानव विकासाचा निर्देशांक उंचावण्यासाठी म्हणजेच मानवी विकासासाठी काही उपाय खालीलप्रमाणे सुचवले आहेत.

(१) सरकारने शिक्षणाचा दर्जा (quility) उंचावला पाहिजे.

(२) धंदेवाईक, यांत्रिक, तांत्रिक, वैद्यकीय शिक्षणाच्या सोयी वाढवल्या पाहिजेत.

(३) लोकसंख्या वाढीचा वेग कमी केला पाहिजे.

(४) जात, धर्मापेक्षा गुणवत्ता व लायकी, कार्यक्षमता याला महत्व दिले पाहिजे.

(५) जात्यंधता, धर्माधता, निरक्षरता, व्यसनाधिनता नष्ट केली पाहिजे.

## ४.३ सारांश

भारतात पर्यावरणीय प्रदूषणाची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. भारतात सर्व प्रकारचे प्रदूषण आढळते. हवेचे प्रदूषण, पाण्याचे प्रदूषण, जमिनीचे प्रदूषण, आवाजाचे प्रदूषण इत्यादी सर्व प्रकारचे प्रदूषण वाढत चालले आहे. वाढत्या प्रदूषणाचे अनेक आर्थिक, सामाजिक परिणाम जाणवत आहेत. प्रदूषण आणि विकास या दोन घटकात जवळचे संबंध आहेत. प्रदूषणाचे प्रमाण वाढत राहिले तर शाश्वत विकासाची समस्या आणखीनच गंभीर होणार आहे. म्हणून सर्व प्रकारचे प्रदूषण रोखणे आवश्यक आहे. भारतात भांडवल निर्मितीचा दर सुध्दा कमी आहे. आर्थिक वृध्दीचा दर वाढवण्यासाठी भांडवल निर्मितीचा दर वाढणे आवश्यक आहे. आर्थिक विषमता आणि सामाजिक विषमता या समस्यांचा सुध्दा निपटारा झाला पाहिजे. सामाजिक विषमता कमी होत आहे. परंतु आर्थिक विषमता वाढत आहे. भारताचा मानव विकास निर्देशांक सुध्दा खूपच कमी आहे. तो वाढणे अत्यंत आवश्यक आहे.

## ४.४ पारिभाषिक शब्द व त्यांचे अर्थ

१) **पर्यावरण** – मनुष्याच्या सभोवतालची एकूण परिस्थिती म्हणजे पर्यावरण होय.

२) **प्रदूषण** – पर्यावरणीय घटकांचा ऱ्हास होणे म्हणजे प्रदूषण होय.

३) **भांडवल** – मनुष्यनिर्मित उत्पादनाची साधने म्हणजे भांडवल होय.

४) **भांडवल निर्मिती** – बचतीचा उत्पादक कामासाठी विनियोग करणे.

५) **सामाजिक विषमता** – नागरिकांना भेदभावाची वागणूक मिळणे.

६) **मानव विकास** – जेव्हां देशातील लोकांचे जास्तीत जास्त कल्याण घडून येते तेव्हा त्यास मानव विकास असे म्हणतात.

## ४.५ स्वयंअध्ययन प्रश्न

अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा पूर्ण करा.

१) प्रदूषण हा शब्द.........शब्दापासून बनला आहे.

अ) मराठी  ब) इंग्रजी  क) रोमन  ड) लॅटिन

२) पर्यावरणीय प्रदूषणाचा विकासावर...........परिणाम होतो.

अ) अनुकूल ब) प्रतिकूल

३) भारतात विकसित देशांच्या तुलनेत भांडवल निर्मितीचा दर .........आहे.

अ) कमी ब) जास्त क) स्थिर

४) ..........कमी असल्याने भारतात भांडवल निर्मितीचा दर कमी आहे.

अ) बचत ब) वित्तीय संस्थांची संख्या क) उत्पादक गुंतवणूक ड) सर्व

५) भारतात आर्थिक विषमता.......आहे

अ) जास्त ब) कमी

६) भारतात सामाजिक विषमता पूर्वीच्या तुलनेत......आहे.

अ) वाढत ब) घटत

७) विकसित देशांच्या तुलनेत भारताचा मानव विकास निर्देशांक..........आहे.

अ) कमी ब) जास्त

**स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे**

१) ड २) ब ३) अ ४) ड ५) अ

६) ब ७) अ

## ४.६ सरावासाठी प्रश्न

अ) टीपा द्या (१५० ते २०० शब्दात)

१) पर्यावरणीय प्रदूषण

२) आर्थिक विषमता

३) सामाजिक विषमता

४) मानव विकास

ब) थोडक्यात उत्तरे द्या. (३०० ते ४०० शब्दात)

१) पर्यावरणीय प्रदूषणाची कारणे सांगा

२) भांडवल निर्मितीचा दर का कमी आहे?

३) आर्थिक विषमतेची कारणे सांगा

४) सामाजिक विषमतेची कारणे सांगा

क) दिर्घोत्तरी प्रश्न (६०० ते ८०० शब्दात)

१) पर्यावरणीय प्रदूषणाची कारणे सांगून प्रदूषण कमी करण्यासाठी उपाय सुचवा.

२) भांडवल निर्मितीचा दर कमी असण्याची कारणे सांगून भांडवल निर्मितीचा दर वाढवण्यासाठी उपाय सुचवा.

३) आर्थिक विषमतेची कारणे, परिणाम व उपाय सुचवा.

४) सामाजिक विषमतेची कारणे, परिणाम व उपाय सांगा

५) भारताचा मानव विकास निर्देशांक कमी असणाची कारणे सांगून मानव विकासासाठी उपाय सुचवा.

## ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


1) Datt and K.P.M sundaram, 'Indian Economy', S. chand and company limitied, New Delhi

2) Puri V.K., Misra S.K. 'Indian Economy', Himalaya publishing House, Mumbai

3) Agrwal A.N., 'Indian Economy', New Age International Publisher, New Delhi.


❑❑❑